# रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – एक ऐतिहासिक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास
विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर
केलेला शोधप्रबंध


संशोधक
ज्योती नामदेव पेठकर

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सदाशिव मारुती गावडे


डिसेंबर,२०१४

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिकशास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) या पदवीसाठी पेठकर ज्योती नामदेव यांनी, रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – एक ऐतिहासिक अभ्यास या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पुर्ण केलेले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत. हे संशोधन पूर्णपणे नवीन असून प्रस्तुत प्रबंध यापूर्वी कोणत्याही विद्यापीठात अन्य पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे                                                            मार्गदर्शक

दिनांक : / /२०१४

(प्रा. डॉ. सदाशिव मारुती गावडे)

# प्रतिज्ञापत्र

मी पेठकर ज्योती नामदेव प्रतिज्ञापूर्वक जाहीर करते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत इतिहास या विषयातील विद्यावाचस्पती(पीएच.डी.) या पदवीसाठी सादर केलेला, रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – एक ऐतिहासिक अभ्यास, हा माझा स्वतःचा शोधप्रबंध असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण : पुणे संशोधक

दिनांक : / /२०१४

(पेठकर ज्योती नामदेव)

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled, रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – एक ऐतिहासिक अभ्यास Submitted by Pethakar Jyoti Namdev to Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune for the award of the degree of Doctor of philosophy (Ph.D.) is a bonafide record of the research work carried out by her under my supervision. The contents of the thesis, in full or parts have not been submitted to any other Institute or University for the award of any other degree or diploma.

Furthermore, in accordance with the UGC rules 2009: that govern the Ph.D. students, the students has completed the due process that includes Entrance Examination, Interview and pre-submission Viva.

**Place: Pune** **Signature of Research Guide**

**Date -**

**Signature of Head of the Department**

**Office seal**

# ऋणनिर्देश

रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – एक ऐतिहासिक अभ्यास, हा प्रस्तुत प्रबंध लेखनाचा विषय आहे. रत्नागिरी हा दक्षिण कोकणातील एक महत्त्वाचा जिल्हा आहे. मध्ययुगीन इतिहासामध्ये या जिल्ह्याच्या भौगोलिक स्थानामुळे त्यास सामरिक महत्त्व होते. शिवकालामध्ये स्वराज्य स्थापना व संरक्षणामध्ये या जिल्ह्यातील किल्ल्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शिवोत्तर काळामध्येही ही परंपरा कायम राहिली. आधुनिक काळामध्ये स्थानिक इतिहासास महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिकोत्तर इतिहास पद्धतीमध्ये अशा स्थानिक इतिहासास महत्त्व असते. या अभ्यास विषयाच्या संशोधनासाठी मध्ययुगीन काळातील लिखित साहित्य मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले हा अभ्यास विषय दुर्लक्षित राहिला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले हा अभ्यास विषय दुर्लक्षित राहिला आहे. माझे रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व मंडणगड तालुक्यामध्ये दिर्घकाळ वास्तव्य आहे. त्यामुळे या अभ्यास विषयाबद्दल माझ्या मनात जिज्ञासा जागृत झाली. म्हणून प्रस्तुत विषयाची प्रबंध लेखनासाठी निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी डॉ.सदाशिव मारूती गावडे हे मला मार्गदर्शक म्हणून लाभले. प्रबंध लिहिताना इतिहास लेखनाच्या पद्धतीशास्त्रापासून ते शुद्धलेखनापर्यंत सर्व गोष्टी बिनचूक व्हाव्यात, असा त्यांचा आग्रह असतो. ‘रत्नागिरी जिल्हयातील किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व’ हा ‘स्थानिक इतिहासा’चा एक भाग आहे.

प्रस्तुत संशोधन करत असताना सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष व मंडणगड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच सर्व सहकारी प्राध्यापक व कर्मचारी यांचे मला अनमोल प्रोत्साहन व सहकार्य लाभले. तसेच महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री.डी.ए.जगताप यांनी मला सदर संशोधन कार्यासाठी मुबलक ग्रंथसंपदा उपलब्ध करून दिल्याबद्दल या सर्वांचे विशेष आभार मानते.

याशिवाय पुणे विद्यापीठ इतिहास विभागातील सर्व प्राध्यापक तसेच या विद्यापीठातील ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई विद्यापीठाच्या कलिना व फोर्ट येथील ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी, शासकीय अभिलेखागार, मुंबई व पुणे या कार्यालयाचे विभाग प्रमुख व त्यांचे सहकारी, मुंबई पुरातत्त्व विभागाचे प्रमुख व सर्व सहकारी या सर्वांनी प्रस्तुत संशोधनासाठी

आवश्यक ते संदर्भग्रंथ व संदर्भ साधने वेळोवेळी मला पुरविले त्याबद्दल त्यांचे मी शतशः आभार मानते.

प्रस्तुत संशोधन ज्यांच्यामुळे मी पूर्ण करू शकले. त्या भारत इतिहास संशोधन मंडळाचे संचालक श्री.एस.म.माटे तसेच ग्रंथपाल सौ.बागाईतकर, सहाय्यक सौ.गुजर, श्री देशपांडे, श्री. आंबवडेकर, श्री.आंबेडकर यांनी वेळोवेळी संदर्भ साहित्य व त्यांच्या नक्कल प्रत उपलब्ध करून दिल्या. याशिवाय मंडळामध्ये इतिहास संशोधक व अभ्यासक श्री.गजानन मेहंदळे, सौ.अनुराधा कुलकर्णी, मेजर जोशी, श्री.चांदोरकर, श्री.महेश तेंडुलकर, श्री.सचिन जोशी व मोडी लिप्यांतर करुन देणारे कै. श्री. पाळंदे यांचे मार्गदर्शनाचा लाभ मला झाला. त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी संदर्भ साधने शासकिय अभिलेखागार, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे व डेक्कन अभिमत विद्यापीठाचे ग्रंथालय यांच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध झाली. या सर्व संस्थांचे चालक, ग्रंथपाल व सेवकवर्ग यांची मी अत्यंत आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील तात्विक व सामाजिकशास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ.श्रीकांत कार्लेकर, इतिहास विभाग प्रमुख डॉ. संध्या पंडित यांची मोलाची मदत झाली. त्याचप्रमाणे माजी इतिहास विभागप्रमुख डॉ.श्रद्धा कुंभोजकर व प्रशासकीय कर्मचाऱ्यांची संशोधनासाठी मोलाची मदत झाली.

माझ्या या संशोधन प्रवासामध्ये प्रा.डॉ. दत्तात्रय कोरडे व माझे कुटुंबीय अमित, सुमित, शर्मिली, उर्वी व इतर मित्र–मैत्रीणी यांचे ऋण शब्दबद्ध करणे अशक्य आहे. या व्यतिरिक्त प्रस्तुत संशोधन कार्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अनेकांचा हातभार लागलेला आहे. स्थल मर्यादेअभावी सर्वाचा उल्लेख करणे शक्य नाही. या सर्व व्यक्तीचे व घटकांचे मी मनापासून आभार मानते.

प्रस्तुत प्रबंधाचे टंकलेखन सौ.जान्हवी गणेश चव्हाण व प्रभु विठ्ठल ढोमे यांनी केले. त्यांचेही मी आभार मानते.

संशोधिका

ज्योती नामदेव पेठकर

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | प्रकरणाचे नांव | पृष्ठ क्रं |
|---|---|---|
| ● | प्रमाणपत्र | I |
| ● | प्रतिज्ञापत्र | II |
| ● | प्रमाणपत्र | III |
| ● | ऋणनिर्देश | IV-V |
| १. | पार्श्वभूमी | १ ते ५३ |
| | प्रबंधाचे शिर्षक, संशोधन विषयाची निवड, संशोधन समस्या संशोधनाची | |
| | उद्दिष्टे, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन विषयाचे महत्त्व | |
| | संशोधनाच्या पद्धती, संशोधनासाठी वापरलेली साधने, संशोधनाची | |
| | गृहितके, सिद्धांत कल्पना, उपलब्ध संशोधन साधनांची चिकित्सा | |
| | प्रबंधाचा आराखडा, किल्ला या शब्दाचा अर्थं, भारतातील किल्ल्यांचे | |
| | प्राचीनत्व, मध्ययुगीन काळातील किल्ल्याविषयीची माहिती, | |
| | महाराष्ट्रातील किल्ले, मध्ययुगीन काळातील किल्ल्यांचे महत्त्व, | |
| | किल्ल्यांचे प्रशासन, किल्ल्यांचे बांधकाम, गनिमी कावा युद्धतंत्राचा | |
| | विकास,किल्ल्यांचे प्रकार, महाराष्ट्रातील किल्ल्यांची जिल्हानिहाय यादी | |
| | महाराष्ट्रातील किल्ल्यांची समुद्रसपाटीपासून उंची. | |
| २. | रत्नागिरी जिल्हयातील किल्ले | ५४ ते ११७ |
| ३. | बाणकोट, मंडणगड, पालगड किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व | ११८ ते २३५ |
| ४. | सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व | २३६ ते ३२८ |
| ५. | उपसंहार | ३२९ ते ३४५ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ३४६ ते ३६२ |
| | परिशिष्ट्चे | ३६३ ते ३६७ |
| | नकाशे | ३६८ ते ३७१ |
| | छायाचित्रे | ३७२ ते ३८३ |

# प्रकरण पहिले
# पार्श्वभूमी

## प्रस्तावना

भारतामध्ये प्राचीन काळापासून किल्ल्यांचे अस्तित्त्व आढळते. महाराष्ट्रामध्ये चिरकी–नेवासा, इनामगाव दायमाबाद, जोर्वे याठिकाणी मोठ्या शिळा एकमेकांवर रचून संरक्षणात्मक तट उभारलेले आढळतात. रानटी पशू, नैसर्गिक आपत्ती व शत्रू यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी किल्ल्यांचा उपयोग प्राचीन मानवाने केला. मॅसिडोनियन, सुमेरियन व हडप्पा संस्कृतीमध्ये किल्ल्यांचे अवशेष आढळतात. भारतामध्ये इतिहासपूर्व काळापासून सुरु झालेली दुर्गबांधणीची कला वैदिक काळ, महाजनपदे, मौर्य, गुप्त, राजपूत, सुलतान व मोगल काळापर्यंत दिवसेंदिवस विकसीत होत गेली. हळूहळू या किल्ले बांधणीच्या तंत्रामध्ये विकास होत गेला.

मध्ययुगीन काळामध्ये युद्धपद्धती व युद्धतंत्रे यामध्ये बदल झाला. त्यामुळे किल्ल्यांचे महत्त्व या कालखंडामध्ये अधिकच वाढले. किल्ले हे राजसत्ता, सामर्थ्य व स्थापत्याचे प्रतिक बनले. मध्ययुगामध्ये भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर किल्ले उभारले गेले. किल्ले बांधताना ते अधिकाधिक दुर्गम करण्यात आले. भारतामध्ये महाराष्ट्र, राजस्थान, मध्यप्रदेश, आध्रंप्रदेश, कर्नाटक या राज्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत अधिक किल्ले आहेत.

महाराष्ट्रामध्ये उत्तरेकडून दक्षिणेकडे लांबच्या लांब पसरलेल्या सह्याद्री पर्वतरांगानी गिरीदुर्ग उभारण्यासाठी अनेक मोक्याच्या जागा पुरवल्या. याच सह्याद्री पर्वतांच्या पश्चिमेला जवळच समुद्रकिनारा आहे. खाडीच्या मुखाशी मिळणाऱ्या या डोंगरसुळक्यांचा उपयोग सुद्धा किल्ला बांधण्यासाठी झाला. याशिवाय समुद्रामध्ये निर्माण झालेल्या निसर्गनिर्मित बेटांनीसुद्धा दुर्गबांधणीस जागा पुरविली. सह्याद्रीमध्ये दिमाखाने उभ्या असलेल्या शेकडो गिरीदुर्गांनी स्वराज्यांच्या अंतर्गत प्रदेशाचे संरक्षण केले.

महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचे सखोल ज्ञान असलेल्या छत्रपती शिवरायांनी तिचा अचूक उपयोग स्वराज्याची स्थापना, विस्तार, संरक्षण व विकास यासाठी करुन घेतला. महाराष्ट्रातील प्रत्येक दुर्गम जागेची त्यांनी किलेबंदी केली. प्राचीन काळापासून कोणत्याही राजाने छत्रपती शिवाजी इतका किल्ल्यांचा उपयोग साम्राज्य रक्षणासाठी करुन घेतला नाही. शिवरायांनी किल्ल्यांच्या बळावरच दिल्लीच्या बादशाहीला व परकियाना यशस्वीपणे तोंड दिले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर आलेल्या संभाजी, राजाराम, ताराबाई, शाहू या राज्यकर्त्यांनी व त्यांच्या हजारो सहकाऱ्यांनी किल्ल्यांचे महत्त्व जाणले होते. मोगल बादशहा औरंगजेबाने पंचवीस वर्षे सतत आक्रमणे करुनसुद्धा मराठ्यांचे राज्य नामशेष झाले नाही. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मराठ्यांच्या राज्याचे खरे सामर्थ्य या किल्ल्यांमध्ये होते. त्यामुळेच पेशवे दुसऱ्या बाजीरावाचा पराभव केल्यानंतर मराठ्यांच्या सामर्थ्याचे खच्चीकरण करण्यासाठी इंग्रजांनी जाणिवपूर्वक सुरुंग लावून अनेक अजिंक्य किल्ले नामशेष केले.

रत्नागिरी जिल्ह्यातील हिंमतगड, मंडणगड, बाणकोट, पालगड, सुवर्णदुर्ग, रसाळगड, जयगड, पूर्णगड, रत्नदुर्ग यासारख्या अनेक किल्ल्यांनी आदिलशाही, बादशाही इंग्रज व पोर्तुगीज यांचा पाठींबा असलेल्या सिद्दीला शक्तीहिन केले. कान्होजी आंग्रेने रत्नागिरी जिल्ह्यातील याच किल्ल्यांच्या साक्षीने आपले साम्राज्य उभे केले. या किल्ल्यांमुळेच आंतरराष्ट्रीय व्यापारावर मराठा राज्यकर्त्यांनी नियंत्रण ठेवले. ज्या ज्या वेळी मराठा साम्राज्यामध्ये यादवी, राजकीय अराजक निर्माण झाले. त्या त्या वेळी राज्यकर्ते महत्त्वाचे सरदार यांनी याच किल्ल्यांचा आश्रय घेतला. जो जो मराठ्यांची सत्ता ताब्यात घेण्याचा प्रयत्न करायचा तो तो हे किल्ले जिंकण्याचा प्रयत्न करायचा. मराठ्यांचे राज्य शेवटचा श्वास घेत असताना सुद्धा या किल्ल्यांनी इंग्रजांना प्रखर विरोध केला.

## संशोधन विषयाचे शिर्षक

रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – ऐतिहासिक अभ्यास

## संशोधन विषयाची निवड –

महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासामध्ये सतराव्या शतकामध्ये एक नवे पर्व निर्माण झाले. छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा द्रष्टेपणाने अचूक उपयोग करुन घेत किल्ल्यांची उभारणी केली. या किल्ल्यांच्या आधारावर गनिमी कावा युद्ध–पद्धतीचा विकास केला. पोर्तुगीज व इंग्रज यासारख्या परकियांचा एतद्देशियांना असणारा संभाव्य धोका अचूक ओळखला. त्यांना शह देण्यासाठी शिवाजी महाराजांनी आरमार व स्वराज्य उभारले. त्यांना स्वराज्याच्या संरक्षणातील किल्ल्याचे महत्त्व चांगलेच माहित होते.

मध्ययुगीन काळातील विशेषतः शिवकाळातील किल्ल्यांबाबत अनेक शौर्य व कर्तृत्त्व कथा प्रसिद्ध आहेत. लोकस्मृतींमध्ये अढळ स्थान मिळविलेल्या या लोककथा व मिथकांनी आजही शिवकाल जिवंत ठेवला आहे. आजही महाराष्ट्रीयनांच्या अस्मिता छत्रपती शिवाजी

महाराजांशी निगडीत आहे. सिंहगड – तानाजी मालुसरे, पन्हाळा–शिवा काशिद, विशाळगड–बाजीप्रभू देशपांडे, प्रतापगड–अफजलखान वध अशा अनेक पराक्रमगाथा किल्ल्यांशी निगडीत आहे. पुरदंर व वज्रगड मुरारबाजीच्या नायकत्त्वाचा साक्षीदार आहे. सज्जनगड संत रामदासांच्या स्मृती जागवतो.

महाराष्ट्रातील अनेक तज्ज्ञांनी व अभ्यासकांनी सुक्ष्मपणे इतर अनेक किल्ल्यांचा अभ्यास सूक्ष्मपणे केला आहे. कोकणातील रायगड, विजयदुर्ग असे अपवाद वगळता इतर किल्ल्यांचा अभ्यास झाला नाही. रत्नागिरी जिल्ह्याच्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे त्याचे व जिल्ह्यातील किल्ल्यांचे स्वराज्यामध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. रत्नागिरीला लाभलेला समुद्रकिनारा मध्ययुगीन व्यापारी वाहतुकीसाठी खुप महत्त्वाचा होता. रत्नागिरी जिल्ह्यातील सह्याद्रीचे उत्तुंग डोंगर कडे, खोल दऱ्या व समुद्र यांनी हा प्रदेश अधिकच दुर्गम बनला होता. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचे सामरिक, आरमारी व राजकीय महत्त्व खुप आहे. आजवर दुर्लक्षित राहिलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचे मध्ययुगीन इतिहासातील भूमिका अधोरेखीत करणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून संशोधिकेने रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – ऐतिहासिक अभ्यास हा विषय निवडला आहे. संशोधिकेने रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड तालुक्यातील मंडणगड, बाणकोट, खेड तालुक्यातील फक्त पालगड तर दापोली तालुक्यातील सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा अशा एकूण सात किल्ल्यांचा नमुना म्हणून सूक्ष्म अभ्यास या प्रबंधामध्ये केला आहे.

## संशोधन समस्या –

संशोधनाचा विषय निश्चित केल्यानंतर या विषयाचा अभ्यास व संशोधन करताना खालील महत्त्वाचे संशोधन प्रश्न मनामध्ये आले.

१) अभ्यास विषयातील किल्ल्यांचे नेमके भौगोलिक स्थान कोणते?

२) रत्नागिरी जिल्ह्यातील भौगोलिक स्थिती व मंडणगड, बाणकोट, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांच्या स्थानांचा काही आंतरसंबंध आहे का?

३) रायगड व प्रतापगड हे डोंगरी किल्ले तसेच विजयदुर्ग व कुलाबा या जलदुर्गांशी बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचा काही परस्पर संबंध आहे का?

४) बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांना काही ऐतिहासिक संदर्भ आहेत का?

५) या किल्ल्यांचा शिवकाळ व शिवोत्तर काळातील ऐतिहासिक भूमिकेमध्ये काही बदल झाले का?

६) मराठे व सिद्दी किंवा मराठे व पोर्तुगीज, इंग्रज यांच्या संघर्षामध्ये या किल्ल्यांना काही महत्त्व होते का?

७) उपरोक्त किल्ल्यांच्या इतिहासाची या परिसरातील आर्थिक विकासाशी काही सांगड घालता येईल का?

**संशोधनाची उद्दिष्ट्ये –**

दापोली व मंडणगड हे पर्यटन तालुके म्हणून जाहीर झाले आहेत. या तालुक्यातील किल्ल्यांचा पर्यटनासाठी उपयोग होतो. हौशी पर्यटक व गिर्यारोहकांना आपापल्या दैनंदिन कामकाजामुळे या किल्ल्यांविषयीची सखोल माहिती व एत्द्देशीय संदर्भ माहित करुन घेणे अशक्य असते. इतिहासाच्या अभ्यासकालाच हे काम करावे लागते. अनेक परकीय व भारतीय अभ्यासकांनी महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांचा अभ्यास व संशोधन केले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा हे किल्ले अभ्यासापासून दुर्लक्षित राहिले आहेत. त्यामुळे संशोधिकेने या किल्ल्यांचा अभ्यास करण्याचे निश्चित केले. हा अभ्यास करताना खालील उद्दिष्ट्ये ठेवली होती.

१) इतिहासपूर्व काळापासून भारतामध्ये आदिमानवाने संरक्षणासाठी तटबंदीचा उपयोग केला. या संरक्षणात्मक बांधकामाचा विकास मध्ययुगामध्ये दुर्गम किल्ल्यांच्या रुपामध्ये झाला. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती व किल्ल्यांची संख्या यांच्यातील परस्पर संबंध शोधणे.

२) ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख असलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले व प्रत्यक्षात अस्तित्त्वात असणारे किल्ले यांची ओळख पटविणे.

३) रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व किल्ल्यांची तपशिलवार माहिती पाहणे.

४) बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांच्या शिवकाळ ते उत्तर पेशवाई काळापर्यंतच्या ऐतिहासिक भूमिकेचा मागोवा घेणे.

५) कोकणमधील लष्करी हालचालीच्या काळामध्ये बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचे लष्करी डावपेचांमधील महत्त्व तपासणे.

६) उपरोक्त किल्ल्यांचा इतिहास जिज्ञासू, अभ्यासक व सर्वसामान्यांना करुन देणे.

## संशोधनाची व्याप्ती व मर्यादा –

संशोधिकेने सध्या अस्तित्त्वात असणाऱ्या रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमा अंतर्गत मर्यादित असलेल्या किल्ल्यांची माहिती व ओळख पटविण्याचा प्रयत्न केला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचे विविध ऐतिहासिक कागदपत्रांमधील, संदर्भ ग्रंथामधील उल्लेख, विविध अभ्यासक व गिर्यारोहकांनी केलेल्या नोंदी, पुरातत्त्व विभागाने दिलेली यादी या सर्वांचा तुलनात्मक अभ्यास करुन संशोधिकेने रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची संख्या निश्चित केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये २६ किल्ले व ४ गढ्या असे एकूण ३० किल्ले आहेत.

या सर्व किल्ल्यांचा अभ्यास सखोलपणे करण्यास संशोधिकेच्या व्यक्ती म्हणून मर्यादा आहेत. संशोधिकेचे दीर्घकाळ वास्तव्य दापोली व मंडणगड तालुक्यामध्ये आहे. त्यामुळे संशोधिकेने दापोली तालुक्यातील सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, गोवा, मंडणगड तालुक्यातील बाणकोट, मंडणगड, खेड तालुक्यातील पालगड या किल्ल्यांचा शिवकाळापासून ते मराठा राज्याच्या अस्तापर्यंत इतक्या दीर्घकाळाच्या इतिहासाचा सूक्ष्मपणे मागोवा घेतला आहे. या किल्ल्यांचे राजकीय, सामरीक व डावपेचात्मक महत्त्व या प्रबंधात प्रदर्शित केले आहे. त्याचबरोबर संशोधिकेने या किल्ल्यांची वर्तमान स्थिती अधोरेखित केली आहे. दापोली, मंडणगड व खेड तालुक्यांच्या पर्यटन विकासाच्या माध्यमातून आर्थिक विकास साधण्यासाठी या किल्ल्यांचा उपयोग कसा करता येईल. याची विचार संशोधिकेने केली आहे. तसेच या किल्ल्यांचे वास्तुशास्त्रीय विश्लेषण संशोधिकेने केले नाही. मध्ययुगीन काळामध्ये रत्नागिरी जिल्हयातील प्रस्तुत किल्ल्यांचा महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांशी सामरीक व प्रशासकीय आंतरसंबंध होता. परंतु विषयाची व्याप्ती वाढत असल्यामुळे त्याचे विश्लेषण सविस्तरपणे घेतले नाही. ही या संशोधन विषयाची मर्यादा आहे.

## संशोधन विषयाचे महत्त्व –

रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले – ऐतिहासिक अभ्यास, या विषयावर संशोधनात्मक अभ्यास करताना संशोधिकेला रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक स्थिती व रत्नागिरी जिल्ह्यातील

किल्ल्यांचे स्थान यामध्ये परस्पर संबंध असल्याचे जाणवले. विविध साहित्यांचा तुलनात्मक अभ्यास करुन संशोधिकेला रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची संख्या व यादीकरण निश्चित करता आले. तसेच या किल्ल्यांच्या इतिहासाचा स्थूलमानाने आढावा घेता आला.

आजपर्यंत अभ्यासक, तज्ञ यांच्याकडून दुर्लक्षित राहिलेल्या बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचा इ.स. १६०० ते १८१८ एवढ्या दीर्घकाळाचा सूक्ष्म इतिहास संशोधिकेने प्रकाशात आणला आहे. या किल्ल्यांचे लष्करी व्यूहरचनेतील महत्त्व, रायगड सारख्या महत्त्वाच्या किल्ल्याभोवतीच्या संरक्षक वलयातील स्थान, दुय्यम सहाय्यक किल्ले म्हणून भूमिका प्रस्तुत प्रबंधामध्ये प्रदर्शित केली आहे. मध्ययुगीन इतिहासामध्ये उपरोक्त किल्ल्यांना लष्करी व राजकीयदृष्ट्या महत्त्व होते.

या अभ्यासातून प्रकाशमान झालेल्या इतिहासाची सांगड पर्यटन क्षेत्राच्या विकासाशी घालण्यासंबंधीचा विचार प्रस्तुत प्रबंधात करण्यात आला आहे. हाच प्रयोग रत्नागिरी जिल्ह्यातील इतर किल्ल्यांबाबत करणे शक्य आहे. या विचाराप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्याचा निसर्ग व पर्यावरणपुरक विकास साधने शक्य आहे.

## संशोधनाच्या पद्धती –

१) प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधिकेने निवेदनात्मक व विश्लेषणात्मक संशोधनपद्धती उपयोग केला आहे.

२) हे संशोधन करताना प्रत्यक्ष भेट, अनौपचारीक गप्पा यांच्या माध्यमातून माहिती मिळवली आहे.

३) संशोधिकेने उपलब्ध असलेल्या प्राथमिक व दुय्यम संदर्भ साहित्याचे सखोल अध्ययन व आढावा घेतला आहे.

४) दुय्यम संदर्भ साहित्यामधील विश्लेषणात्मक विवेचनाचे अध्ययन केले आहे.

५) याशिवाय छायाचित्रे, स्थानिक लोककथा यांचा उपयोग संशोधनासाठी करण्यात आला आहे.

६) अधिकृत संस्थांकडून संशोधनविषयाची आवश्यक ती माहिती मिळविली आहे.

## संशोधनासाठी वापरलेली साधने –

संशोधिकेने प्रस्तुत विषयाचे संशोधन करताना खालील साधनांचा उपयोग केला आहे.

१) प्राथमिक ऐतिहासिक लिखित साधने

२) दुय्यम ऐतिहासिक लिखित साधने

३) प्रत्यक्ष भेट व अभ्यास

४) फोटो व नकाशे

५) लोककथा व अनौपचारिक गप्पा

६) वर्तमानपत्रे व मासिके

७) इंटरनेट

## संशोधनाची गृहितके –

१) भारतामध्ये इतिहासपूर्व काळापासून संरक्षणासाठी किल्लेसदृश्य वास्तूंचा उपयोग केला होता.

२) महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती व महाराष्ट्रातील किल्ल्यांची संख्या यांच्यामध्ये आंतरसंबंध आहे.

३) रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक स्थिती व रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचे प्रकार यामध्ये परस्पर संबंध आहे.

४) रत्नागिरी जिल्ह्याच्या विशिष्ट भौगोलिक स्थानामुळे मोगल बादशहा व आदिलशहा यांच्या या जिल्ह्यावरील आक्रमणामध्ये प्रत्यक्ष व मानसिक अडथळा निर्माण झाला.

५) सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, गोवा, बाणकोट, मंडणगड, पालगड या किल्ल्यांचे लष्करी डावपेचांच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्व होते.

६) रायगड सारख्या महत्त्वाच्या किल्ल्याच्या संरक्षणासाठी उभारलेल्या किल्ल्यांच्या संरक्षक वलयामध्ये सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, गोवा, बाणकोट, मंडणगड, पालगड व गोवा या किल्ल्यांना स्थान होते.

७) रायगड, प्रतापगड या महत्त्वाच्या किल्ल्यांना सहाय्यक म्हणून सुवर्णदुर्ग, मंडणगड, बाणकोट या किल्ल्यांचा उपयोग होत होता.

८) बाणकोट किल्ल्याला आधार म्हणून मंडणगड किल्ल्याचे खूप महत्त्व होते.

९) सुवर्णदुर्ग व बाणकोट किल्ले मराठ्यांच्या आरमार विकासास सहाय्यक ठरले.

१०) मराठा व सिद्दी संघर्षाची प्रमुख केंद्रे सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, गोवा, बाणकोट, मंडणगड व पालगड हे किल्ले होती.

११) शिवकाळापासून ते मराठा राज्याच्या अस्तापर्यंत इतिहासामध्ये कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा, बाणकोट, मंडणगड व पालगड या किल्ल्यांनी महत्त्वाची ऐतिहासिक भूमिका बजावली.

## सिद्धांत कल्पना–

१) प्राचीन काळापासून ते ब्रिटिश काळापर्यत संरक्षणासाठी किल्ल्यांचा कमीअधिक उपयोग केला जात होता.

२) मध्ययुगातील आंतरराष्ट्रीय वाहतूक व व्यापार यांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असणाऱ्या कोकण प्रदेशावर वर्चस्व ठेवण्यासाठी रत्नागिरी जिल्हयातील किल्ल्यांचे महत्त्व होते.

३) रत्नागिरी जिल्हयातील भौगोलिक स्थितीतूनच अनेक लहान–मोठया किल्ल्यांची निर्मिती झाली आहे.

४) मराठयांची राजधानी रायगड या किल्ल्याच्या संरक्षणार्थ रत्नागिरी जिल्हयातील किल्ल्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

५) सुवर्णदुर्ग व बाणकोट यासारख्या किल्ल्यांनी मराठयांच्या आरमारात फार मोलाचे कार्य केले होते.

६) शिवकाळापासून ते मराठा राज्याच्या अस्तापर्यत रत्नागिरी जिल्हयातील किल्ल्यांनी फार मोठी कामगिरी केली होती.

## उपलब्ध संशोधन साधनांची चिकित्सा –

आधुनिक काळामध्ये किल्ले हा अनेक अभ्यासकांच्या व जिज्ञासूंच्या आकर्षणाचा विषय झाला आहे. दिवसेंदिवस पर्यटन व गिर्यारोहण यांची आवड वाढत चालली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील किल्ले या विषयावर विपुल साहित्य उपलब्ध आहे. विशेषतः या दहा वर्षामध्ये गिर्यारोहणास मार्गदर्शक म्हणून अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. गॅझेटियर, अनेक संदर्भग्रंथ, पुस्तके, पीएच.डी. व एम.फिल. या विषयांसाठीचे संशोधकीय प्रकल्प, शोधनिबंध, विद्यापीठांना सादर केलेले शोधप्रकल्प यामध्ये महाराष्ट्रातील किल्ले हा विषय हाताळलेला दिसतो.

उपरोक्त साहित्यामधील काही अपवाद वगळता त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले हा विषय स्वतंत्रपणे आला नाही. महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांबरोबर रत्नागिरी जिल्ह्यातील काही किल्ल्यांचाच संदर्भ या साहित्यामध्ये आला आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील अधिकतर किल्ल्यांची माहिती आपल्याला गॅझेटियरमध्ये मिळते. हे गॅझेटियर ब्रिटिश काळामध्ये इ.स. १८८० मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सीकडून प्रकाशित झाले आहे. त्याचे अनेक खंड प्रकाशित झाले असून खंड दहामध्ये रत्नागिरी व सावंतवाडी या विभागा अंतर्गत रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व प्रकारची माहिती प्रकाशित केली आहे. त्यामुळे त्यामध्ये उपरोक्त दोन्ही जिल्ह्यातील किल्ल्यांची एकत्र माहिती मिळते. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची स्वतंत्रपणे माहिती मिळत नाही. या गॅझेटियरमधील फक्त रत्नागिरी व सावंतवाडी डिस्ट्रिट विभागाचे स्वतंत्रपणे पुनर्प्रकाशन महाराष्ट्र सरकारच्या गॅझेटियर विभागाने इ.स. १९९६ मध्ये केले. याच विभागाने २०११ मध्ये बॉम्बे प्रेसिडेन्सीने प्रकाशित केलेले Gazetteer, Vol. X पुनर्प्रकाशित केले आहे. १ मे १९८१ रोजी रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे निर्माण झाले. या विभाजनानंतर महाराष्ट्र सरकारच्या गॅझेटियर विभागाने दोन वेळा बॉम्बे प्रेसिडेन्सीने प्रकाशित केलेले गॅझेटियर नव्या बदलाचा कोणताही संदर्भ न घेता, कोणतीही सुधारणा न करता या गॅझेटियरचे पुनर्प्रकाशन केले आहे. महाराष्ट्रातील इतर अनेक जिल्ह्यांची स्वतंत्रपणे व मराठीमध्ये भाषांतरीत केलेली गॅझेटियर उपलब्ध आहेत. परंतु रत्नागिरी जिल्ह्याबाबत मात्र हा न्याय अजूनही झाला नाही. त्यामुळे अभ्यासकांचा रत्नागिरी जिल्हा व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील नेमके किल्ले कोणते याबद्दल गोंधळ उडतो. गॅझेटियरच्या वरील सर्व आवृत्तींमध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची माहिती खुप अल्पप्रमाणात आहेत. गॅझेटिअर हाच रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची माहिती मिळविण्याचे प्रमुख साधन आहे.

विविध विद्यापीठांमध्ये पीएच.डी. व एम. फिल या पदव्या प्राप्त करण्यासाठी सादर केलेल्या संशोधन प्रबंधामध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांचा उल्लेख येतो. डॉ. पी. एन. देशपांडे यांनी पीएच.डी.ची पदवी मिळविण्यासाठी १९७१ साली "Maratha Forts, A Study of Forts with reference to the Royal Period of Maratha History' हा पुणे विद्यापीठामध्ये इतिहास विभागाला सादर केलेला संशोधन प्रबंध किल्ल्यांच्या अभ्यासातील मैलाचा दगड आहे. यामध्ये महाराष्ट्रातील किल्ल्यांची भौगोलिक व भुगर्भीय पार्श्वभूमी, शिवकाळातील किल्ल्यांचे

स्वराज्यातील महत्त्व, किल्ल्यांसाठी जागेची निवड, किल्ल्यांची स्थिती, राजांनी निर्माण केलेल्या किल्ल्यांच्या साखळ्या, किल्ल्यांचे बांधकाम, त्यावरील विविध इमारती, संरक्षणात्मक बांधकाम यांचे सविस्तर विश्लेषण केले आहे. डॉ. देशपांडे यांनी आपल्या प्रबंधामध्ये किल्ल्यांचे प्रशासन, प्रशासनामध्ये अधिकारी, कर्मचारी, शिबंदीतील अधिकारी व सैनिक, त्यांची कर्तव्ये, वेतनाचे स्वरुप, त्यांचे बदली, पदोन्नती, शिक्षा याबाबत सविस्तर संशोधकीय विश्लेषण केले आहे. याशिवाय किल्ल्यांवरील पाणीपुरवठा, राखीव निधीची तरतूद, जंगलांचे जतन, याबरोबरच विविध किल्ल्यांना शत्रूने दिलेल्या वेढ्याच्या वेळी प्रतिकार, लढवले गेलेले डावपेच यांचा या प्रबंधामध्ये आढावा घेतला आहे. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांसंदर्भात उल्लेख नाही.

निवृत्त विंग कमांडर नरवणे एम. जी. यांनी पुणे विद्यापीठातील संरक्षण विभागाला ४ डिसेंबर १९९२ रोजी ‘The Forts of Maharashtra’ हा प्रबंध सादर केला. या प्रबंधामध्ये त्यांनी महाराष्ट्रातील किल्ल्यांचे अक्षवृत्त, रेखावृत्त, भौगोलिक स्थिती यांच्या आधारे किल्ल्यांचे वर्गीकरण, यादीकरण केले आहे. याशिवाय या किल्ल्यांचे लष्करी डावपेचांबाबतचे महत्त्व शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या प्रबंधामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा उल्लेख फक्त यादीमध्ये व सुवर्णदुर्गचा एक आरमारी किल्ला म्हणून येतो.

सौ. रमा रविंद्र लोहोकर यांनी पुणे विद्यापीठातील इतिहास विभागाला ‘‘किल्ले रायगडावरील राजकीय बदल–एक ऐतिहासिक दृष्टीकोन’’ या विषयावर पीएच.डी. पदवीसाठी संशोधन प्रबंध सादर केला आहे. प्रबंधाचा विषय रायगड हाच किल्ला असल्याने त्यामध्ये रायगड किल्ल्याचे प्राथमिक स्वरुप, भौगोलिक महत्त्व, शिवकाल ते दुसरा बाजीराव पेशवे काळापर्यंतची ऐतिहासिक पार्श्वभूमी व रायगडावरील वास्तू एवढी अभ्यासाची व्याप्ती आहे.

प्रा. पी. आर. पाटील यांनी पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाला एम. फिल पदवी मिळविण्यासाठी १९९२ मध्ये ‘‘शिवकालीन पुणे जिल्ह्यातील किल्ले’’ हा संशोधन प्रबंध सादर केला. यामध्ये त्यांनी शिवकाळातील किल्ले, त्यांचे प्रकार, शिवपूर्व किल्ले व शिवाजी राजांनी बांधलेले किल्ले, शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांची वैशिष्ट्ये व राजांनी किल्ल्यांना दिलेली नावे यांचा संक्षिप्त आढावा घेतला आहे. प्रा. पाटील यांचा पुणे जिल्ह्यातील किल्ले हाच अभ्यासाचा विषय असल्याने त्यामध्ये पुणे जिल्ह्याचे भौगोलिक स्थान व पुणे जिल्ह्यातील किल्ले यांचा अल्प परिचय करुन दिला. या प्रबंधामध्ये प्रा. पाटील यांनी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी, तोरणा,

राजगड, पुरंदर व सिंहगड या किल्ल्यांचा संशोधनपर आढावा घेतला आहे.

आर. व्ही. रामदास यांनी मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागाला पीएच.डी. पदवी मिळविण्यासाठी इ.स. १९६५ मध्ये "Relations between the Marathas & the Siddis of Janjira" हा संशोधन प्रबंध सादर केला. हा प्रबंध खास किल्ल्यां संदर्भात नाही. मराठा व जंजिऱ्याचा सिद्दी यांच्या संबंधाबाबतचे संशोधन यामध्ये आहे. सिद्दीचा जंजिरा प्रांत माझ्या अभ्यासविषयाच्या प्रदेशा जवळचा आहे. या प्रबंधामध्ये माझ्या अभ्यास विषयाच्या ऐतिहासिक घडामोडींचा अल्प संदर्भ येतो. सिद्दी व मराठा यांच्या संघर्षाचे प्रमुख केंद्र कोकण हेच आहे. या प्रबंधामध्ये मराठे–सिद्दी संघर्षकाळातील रत्नागिरी जिल्ह्यातील काहीच किल्ल्यांचा ओझरता संदर्भ येतो.

चिंतामण गोगटे यांनी इ.स. १९०७ मध्ये ‘महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग १ व २’ प्रकाशित केले. त्यावेळी आत्ताचे महाराष्ट्र भाषिक राज्याची निर्मिती व रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन झाले नव्हते. उपरोक्त ग्रंथाच्या भाग दोन मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांविषयीची माहिती दिली आहे. या माहितीचा प्रमुख आधार बॉम्बे प्रेसिडेन्सीने प्रकाशित केलेले गॅझेटिअर हा आहे. याशिवाय यामध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील किल्ल्यांची ओळख पटविताना अभ्यासकाचा होणारा संभ्रम या उणिवा कायम राहतात.

श्री. महादेवशास्त्री जोशी यांनी जोशी ब्रदर्स, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्राची धारातीर्थे हे पुस्तक प्रकाशित केले. यामध्ये पुणे, सातारा, कोल्हापूर परिसरातील किल्ल्यांबरोबर कोकणातील फक्त सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रायगड, अलिबागचा किल्ला, जंजिरा, वसई व माहिम या किल्ल्यांची माहिती दिली आहे.

श्री. रविंद्रनाथ वामन रामदास यांनी श्री रामदास प्रकाशनातर्फे इ.स. १९६२ मध्ये महाराष्ट्राचे जलदुर्ग ही पुस्तिका प्रकाशित केली. श्री. महेश मंगेश तेंडुलकर यांनी इ.स. २००५ मध्ये ‘कथा सागरी दुर्गांच्या भाग १’ इ.स. २००९ मध्ये ‘शिवकालीन दुर्ग व दुर्गव्यवस्था’ व ‘गड मंदिरावरील द्वारशिल्प’ ही पुस्तके प्रकाशित केली. यामध्ये सुवर्णदुर्ग किल्ला व किल्ल्यांचे प्रशासन यांचा ऊहापोह केला आहे..

श्री. सतिश गुरुसिद्ध अक्कलकोट यांनी सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली यांचेतर्फे दुर्गचे दोन खंड प्रकाशित केले आहे. यामध्ये विविध साहित्यातील दुर्गांचे संदर्भ प्रशासन याबरोबरच

अनेक किल्ल्यांची सारांश रुपामध्ये माहिती दिली आहे. या पुस्तकामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील काही निवडक किल्ल्यांची अत्यल्प माहिती दिली आहे.

श्री. श्रोत्री व श्री. पुराणिक यांनी लिहिलेली व श्री. स. वि. पाडळीकर यांनी संपादित केलेली 'महाराष्ट्र : दुर्गसंपत्ती' ही पुस्तिका भारतीय इतिहास संकलन समिती महाराष्ट्र यांच्या मार्फत इ.स. २००१ मध्ये प्रकाशित केली. या पुस्तिकेमध्ये किल्ल्यांचे मजबूत बांधकाम, दुरुस्ती, राज्य संरक्षणातील कार्य, दुर्ग संरक्षणाचे कार्य, अमात्यांची दुर्गनीति व काही प्रसिद्ध किल्लेदार यांचा धावता आढावा घेतला आहे.

श्री. जोगळेकर स. आ. यांनी १९५२ मध्ये सह्याद्री हे ५०९ पानांचे पुस्तक प्रकाशित केले. हा ग्रंथ प्रामुख्याने सह्याद्री पर्वत रांगाचे वैशिष्ट्य, सह्याद्री रांगांदरम्यानचा प्रदेश, त्या प्रदेशातील किल्ले, त्यांची वैशिष्ट्य व इतिहास यांचा समग्र आढावा घेतला आहे. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांसंदर्भात सविस्तर वर्णन नाही. श्री. खरे ग. ह. संपादित दुर्ग, श्री. बेंद्रे वा. सि. गड–कोट–दुर्ग व त्यांची वास्तू (१९५९), श्री. आपटे बी. के. यांनी "Sea & Hill Forts of Western India" 1998 & A History of Maratha Navy & Merchant Ships", 1973' ही पुस्तके लिहिली. श्री. बेंद्रे यांच्या पुस्तकामध्ये सर्व किल्ल्यांच्या बांधकामाच्या वैशिष्ट्यांचा आढावा घेतला आहे. तर श्री. आपटे यांनी आपल्या पुस्तकामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील विशेषतः जलदुर्गांचा आरमाराच्या दृष्टीकोनातून संदर्भ दिला आहे.

श्री. पारसनिस द. ब. यांनी इ.स. १९०४ मध्ये 'मराठ्यांचे आरमार' हे पुस्तक लिहिले. यामध्ये मराठ्यांच्या आरमाराच्या विकासाचा संदर्भ देताना रायगड, विजयदुर्ग, वसई, रेवदंडा, देवगड, कुलाबा या किल्ल्यांबरोबरच सुवर्णदुर्ग, अंजनवेल या रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा ओझरता उल्लेख केला आहे. श्री. गजानन भास्कर मेहेंदळे व श्री. संतोष शिंत्रे यांनी पुर्णपणे प्राथमिक साधनांचा अभ्यास करुन 'शिवछत्रपतींचे आरमार' हा मौल्यवान ग्रंथ परम्मित्र पब्लिकेशनतर्फे इ.स. २०१० मध्ये प्रकाशित केला. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील सुवर्णदुर्ग या किल्ल्यांचा उल्लेख आहे.

रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्रात किल्ल्यांचे प्रशासन, बांधकाम करताना घ्यावयाची काळजी, अधिकारी, सैन्य व कारागिर यांचे सविस्तर विश्लेषण आहे. बखर साहित्यामध्ये विविध प्रांतातील किल्ल्यांची यादी बांधकाम व दुरुस्ती यांचे त्रोटक उल्लेख आहेत.

Sidney Toy `Most Fortified Cities of India' (1965) 'History of Fortification' (1955), 'Strongholds of India' (1957), अमृत वर्मा यांचा 'Forts of India', रमेश देसाई यांचा 'Shivaji the last Great Fort Architect', श्री. ए. पी. सिंग यांचे 'Forts & Fortification in India' कमलापुर जे. एन. यांचे 'The Deccan Forts', माटे एम. एस. यांचे 'Maratha Architecture' अशी इंग्रजीमध्ये लिहिलेली न संपणारी अशी अनेक पुस्तके आहेत. भारत व दख्खनच्या किल्ल्यांचा, त्यांच्या बांधकामाचा, त्यांच्या वैशिष्ट्यांचा आढावा या ग्रंथामध्ये आहे. सिडनी टॉय यांनी आपल्या ग्रंथांमध्ये सिंहगड, शिवनेरी व पुरंदर या डोंगरी किल्ल्यांचे स्थापत्य विषयक दृष्टीकोनातून विवेचन केले आहे. भारतातील स्थापत्याचे गाढे अभ्यासक पर्सी ब्राऊन यांनी आपल्या ग्रंथांमध्ये किल्ल्यांचे वास्तूशास्त्रीय दृष्टीकोनातूनच विवेचन केले आहे. University of Michigan या विद्यापीठाच्या Center For South & Southeast Asian Study या विभागाने इ.स. १९७९ मध्ये स्टेवर्ट गॉर्डन (Stewart Gordon) यांचे "Forts & Social Control in the Maratha State' हे पुस्तक प्रकाशित केले. या ग्रंथामध्ये मराठा राज्यांमध्ये सामाजिक नियंत्रण ठेवण्यामध्ये किल्ल्यांची भूमिका स्पष्ट केली आहे.

श्री. सचिन जोशी यांनी अंजनवेलची वहिवाट या साहित्यामध्ये उल्लेखलेल्या रत्नागिरी जिल्ह्यातील माणिकदुर्ग, कासारदुर्ग व किल्ले नवते/गुढे यांची ओळख पटविलेली आहे. रत्नागिरी जिल्ह्याची दुर्गजिज्ञासा याशिवाय विविध नियतकालिके व वृत्तपत्रे यांच्यामध्ये अनेक अभ्यासकांनी किल्ल्यांसंदर्भात लेख प्रकाशित केले आहे. श्री. जे. बुरटॉन-पेज (J. Burton - Page) यांनी "A Study of Fortification in the Indian Subcontinent from the Thirteenth to the Eighteenth Century A.D." या लेखामध्ये भारतीय उपखंडामध्ये १३ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत दुर्गबांधणीचा विकास कसा झाला. याचे विवेचन केले आहे.

श्री. एफ. जे. व्हॅर्ली (F. J. Varley) यांनी "On the Water Supply of Hill Forts in Western India" या लेखामध्ये पश्चिम भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील डोंगरी किल्ल्यांवरची पाणीपुरवठ्याची उपलब्धता व सोय कशाप्रकारे होती याचे विवेचन केले आहे.

**प्रबंधाचा आराखडा –**

संशोधन आराखड्यामध्ये प्रस्तुत प्रबंधामध्ये विषयाच्या सुलभीकरणासाठी पाच प्रकरणांमध्ये विभागणी केली आहे.

**प्रकरण पहिले– पार्श्वभूमी**

यामध्ये संशोधन आराखडा दिलेला आहे. संशोधन विषयाची निवड, संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाच्या पद्धती, संशोधनासाठी वापरलेली साधने, संशोधनाची गृहितके, सिद्धांत कल्पना, उपलब्ध संशोधन साधनांची चिकित्सा व प्रबंधाचा आराखडा याची माहिती दिलेली आहे.

किल्ल्यांच्या विविध शब्दकोशीय व्याख्या दिल्या आहेत. जागतिक किल्ल्यांचा धावता उल्लेख या प्रकरणामध्ये करुन भारतातील किल्ल्यांचे प्राचीनत्त्व अनेक लिखित व पुरातत्त्वीय पुराव्यांच्या आधारे निश्चित केले आहे. तसेच महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचे वैशिष्ट्य सांगून त्याचा महाराष्ट्राच्या इतिहासावर झालेला प्रभाव स्पष्ट करण्यात आला आहे. याशिवाय मध्ययुगीन काळातील किल्ल्यांचे महत्त्व स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर दुर्गराज शिवाजी महाराजांचा किल्ल्यांबाबतचा दृष्टीकोन विशद केला आहे. तसेच किल्ल्याची दुर्गमता, युद्धतयारी, खर्च, प्रशासन, बांधकाम यांच्या आधारे किल्ल्यांचे मराठ्यांच्या राज्यातील व्यवस्था व महत्त्व स्पष्ट केले आहे. गनिमी काव्याच्या युद्ध पद्धतीचे विवेचन करुन या युद्धपद्धतीचा किल्ल्यांशी असणारा आंतरसंबंध स्पष्ट केला आहे.

**प्रकरण दुसरे– रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले**

यामध्ये रत्नागिरी जिल्ह्याचे विशिष्ट भौगोलिक स्थान स्पष्ट केले आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या इतिहासाचा मागोवा या प्रकरणामध्ये सविस्तरपणे घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. विविध अभ्यासकांचा व गिर्यारोहकांचा रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची संख्या व उल्लेख यांचा परामर्श घेऊन रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांची संख्या निश्चित केली आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व किल्ल्यांची सविस्तरपणे ऐतिहासिक माहिती दिलेली आहे.

**प्रकरण तिसरे – बाणकोट, मंडणगड व पालगड या किल्ल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

या प्रकरणामध्ये शिवकाळापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंतच्या उपरोक्त किल्ल्यांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. प्राथमिक साधनांच्या आधारे छत्रपती शाहूकाळातील या किल्ल्यांवर सिद्दीशी झालेला संघर्ष सविस्तर नमूद केला आहे. छत्रपती शाहूनंतरच्या काळातील महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनांच्या संदर्भात या किल्ल्यांची ऐतिहासिक भूमिका या किल्ल्यांवर घडलेल्या घटनांचे आधारे स्पष्ट केले आहे. इंग्रजांशी झालेल्या शेवटच्या संघर्षकाळामध्ये हे किल्ले इंग्रजांच्या ताब्यामध्ये कधी गेले. या प्रकरणाच्या शेवटी लिहिले आहे.

**प्रकरण चौथे– सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी**

यामध्ये सुवर्णदुर्ग किल्ल्याचा शिवकाळापासून तर कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचा शिवोत्तर काळापासूनचा इतिहास स्पष्ट केला आहे. हाच इतिहासाचा धागा पकडत मराठेशाहीच्या अस्तापर्यंत (इ.स. १८१८) या किल्ल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद केली आहे.

**प्रकरण पाचवे– उपसंहार**

भारतामध्ये किल्ल्यांचे प्राचीनत्त्व इतिहासपूर्वकाळापर्यंत जाते हे विविध पुराव्यांच्या आधारे सिद्ध केले आहे. या प्रकरणामध्ये महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती व किल्ल्यांची संख्या यांच्यामध्ये असणारा आंतरसंबंध स्पष्ट केला आहे. रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक रचना व जिल्ह्यातील किल्ल्यांचे प्रकार यातील परस्पर संबंध स्पष्ट केला आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या भौगोलिक घटकांमधील सह्याद्री डोंगररांगांनी आदिलशाही व मोगल बादशाही आक्रमणात मानसिक अडथळा आणला, हा निष्कर्ष काढला आहे. या प्रकरणामधून बाणकोट, मंडणगड, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचे सामरिक, प्रशासकीय व राजकीय महत्त्व अधोरेखित केले आहे.

## किल्ला या शब्दाचा अर्थ

किल्ला या शब्दाची विश्वकोशिय व संस्कृतीकोशिय व्याख्या अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहे. शत्रूंपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे, म्हणून बांधलेल्या वास्तूस किल्ला म्हणतात.[१] सभोवती तटबंदी करुन म्हणजे मजबूत भिंती बांधून जे सुरक्षित स्थान निर्माण केले जाते, त्याला किल्ला म्हणतात[२] Fort या संज्ञेचा स्थापत्य शिल्पकोशिय अर्थ गड, किल्ला, दुर्ग, कोट, कुट, कोटी, भूमीकट, भुईकोट असा दिला आहे.[३]

संरक्षणासाठी बांधलेल्या अशा वास्तूला इंग्रजीत फोर्ट, कॅसल, सिटलँड, बर्ग असे म्हटले जाते. तर मराठीमध्ये त्यास दुर्ग, गढी कोट, गड असेही म्हटले जाते. फोर्ट, किल्ला व दुर्ग या शब्दांचे इंग्रजी, मराठी व हिंदी शब्दकोशिय अर्थ खालील प्रमाणे दिले आहेत.

Fort - a fortified military building, enclosure or position (from latin fortis “strong”), Fort – a strong building that is used for military defence

लष्करी संरक्षणासाठी वापरायची दणकट इमारत, किल्ला, कोट. फोर्टला समानार्थी वापरल्या जाणाऱ्या फोर्टरेस या शब्दाचा अर्थ _Fortress - a fortidied town, or large fort or castle (from French fortresse strength or a strong place), Fortress – a military stronghold] esp – a strongly fortified town. (Related to FORT)[४] मराठीमध्ये किल्ला या शब्दाचा अर्थ संरक्षणासाठी तटबंदी केलेली जागा, गड, दुर्ग.[५] किल्ला Castle[६] किला या हिंदी शब्दाचा अर्थ लडाई के समय बचाव के लिए बनाया हुआ सुदृढ स्थान, दुर्ग, गढ, कोट, किल्ला, दुर्ग या हिंदी शब्दाचा अर्थ विशेष प्रकार का वह बडा और दृढ भवन जिसमे राजा और सिपाही आदी रहते है, दुर्गम, कठीण, किल्ला, गढ, कोट.[७]

या सर्वावरुन किल्ला म्हणजे लष्करी दृष्टीने संरक्षित केलेली वास्तू होय. जगप्रसिद्ध व समृद्ध असलेल्या प्राचीन रोमन संस्कृतीत किल्ले बहुधा उंच ठिकाणी बांधत.[८] दारुगोळा व तोफांच्या युद्धातील वापराबरोबर किल्ल्यांच्या प्राचीन बांधणीत परिवर्तन होऊ लागले. या गडकोटांचे सामर्थ्य वाढविण्यात शेकडो वर्षे मानवी बुद्धी व कौशल्य खर्ची पडले. त्यामुळे संरक्षणाचे हे साधन कार्यक्षम व सामर्थ्यवान झाले. शत्रूंच्या शस्त्रास्त्रांच्या वाढत्या विविधतेबरोबर आपापली राहण्याची ठिकाणे भक्कम करण्याची प्रवृत्ती वाढत गेली. युरोपमध्ये सतराव्या शतकात रेखागणिताच्या आधारे किल्ल्यांची बांधणी करण्याचा पुरस्कार मार्ची नावाच्या वास्तूविशारदाने केला. अठराव्या शतकात कॉर्मान्टेन या फ्रेंच वास्तूतज्ञाने किल्ल्यांभोवतीचे खंदक व तटबंदी यांच्या बांधकामात सुधारणा केल्या.

## भारतातील किल्ल्यांचे प्राचीनत्व

प्राचीन काळापासून मानवाने स्वसंरक्षणार्थ निर्माण केलेल्या अनेक साधनांपैकी किल्ले हे एक महत्वाचे साधन आहे. आजही उत्खननामध्ये या प्राचीन दुर्गांचे उध्वस्त अवशेष आढळतात. मानवी संस्कृतींच्या विकासाबरोबर दुर्गबांधणीच्या तंत्रातही विकास होत गेला. टोळी

राज्यांच्या विकासाबरोबर शेजारील शत्रुच्या संकटाच्या निराकरणाची गरज निर्माण झाली. विविध प्रकारच्या संहारक शक्तींना तोंड देण्याची खबरदारी घेण्यात येऊ लागली. यातून गडकोटांच्या वास्तू भक्कम व अभेद्य करण्यामध्ये दिवसेंदिवस प्रगती झाली.

जगाच्या प्राचीन संस्कृतीत सिरिया, मुडीगाक, कोटदिजी, हडप्पा येथे किल्ल्यांचे अवशेष आढळतात. इ.पू. २२८ च्या दरम्यान चीनमध्ये २४०० कि.मी. लांब भिंत बांधली. ही भिंत म्हणजे एक प्रकारचा परकोट आहे. युरोपमध्ये १० व्या शतकानंतर नार्मडी, प्रोटेफेक्ट, चैत्युगेलार्ड आणि ब्रेस्ट यासारखे अनेक किल्ले उभे राहिले. बॅस्टिलचा किल्ला अठराव्या शतकातील फ्रेंच राज्यक्रांतीशी निगडित आहे.

भारतातसुद्धा शेकडो किल्ले, कोट, गढ्या आहेत. या किल्ल्यांनी अनेक लढाया, कत्तली, जय, पराजय, बलिदान पाहिले आहे. हे किल्ले भूतकाळ जीवंत करतात व नव्या पिढीला प्रेरणा देतात. भारतात महाराष्ट्र मध्यप्रदेश व राजस्थान येथे सर्वाधिक किल्ले आहेत. महाराष्ट्रातील सर्वोच्च किल्ला सालेरगड असून त्याची उंची १६१२.३ मीटर आहे. सातवाहन राजाने उभारलेला धोडप हा दुसरा उंच किल्ला आहे.[९] मेवाडचा राजा कुंभने आपल्या मेवाड राज्यात ३२ किल्ले व गढ्या उभारल्या. मारवाडचे नवकोट व हाडौतीचे किल्ले प्रसिद्ध होते. राजस्थानमधील किल्ल्याचे स्थापत्य खुपच प्रगत होते. मध्यप्रदेशमधील बुंदेलखंड, बघेलखंड, नेमाडक्षेत्र उध्वस्त किल्ल्यांनी गजबजलेले आहे. येथील कालिंजर, अजयगड, गुर्गी हे अभेद्य किल्ले होते. कर्नाटक, आंध्र, तामिळनाडूच्या किल्ल्यांचे स्थापत्य शिल्पदृष्टीने महत्वाचे आहे. चालुक्यांची राजधानी बदामीचा किल्ला, हंपीच्या अवशेषांमध्ये त्या त्या साम्राज्यांचे वैभव प्रतिबिंबित होते. गिनिज बुकमधील झेस्कोस्लाव्हाकिया व स्कॉटलँडच्या किल्ल्यांच्या प्रचंडपणास मागे टाकून चितोड किल्ल्याचे नाव प्रचंडपणासाठी गिनिज बुक रेकॉर्डमध्ये नोंदले गेले आहे. मांडू किल्ला जगातील दुर्गम किल्ल्यांपैकी एक आहे. दिल्लीचा लाल किल्ला राष्ट्रीय ऐक्य आणि अस्मितेचे प्रतिक आहे. डॉ. भगवतीशरण उपाध्याय यांच्यामते दिल्ली–आग्राच्या किल्ल्यांसारखे सुंदर किल्ले साऱ्या आशियात नाहीत.[१०]

कोटदीजी येथे इ.पू. तीन हजारच्या सुरुवातीची हडप्पापूर्व संस्कृतीची तटबंदीयुक्त वस्ती आढळते.[११] हडप्पा येथे शंभर वर्षापूर्वी केलेल्या उत्खननात भिंतीने वेढलेल्या शहराचे दर्शन होते. मोहेंजोदडो येथे तटाचे व नदीस वेगळे वळण लावण्यासाठी बांधलेल्या तटबंदीचे अवशेष आढळतात.[१२]

महाराष्ट्रात चिरकी नेवासा येथील आद्य पुराश्मयुगीन संस्कृती ही अॅश्युलियन परंपरेतील आहे. येथील एका खड्ड्यात बेसाल्टच्या मोठ्या शिळा अर्धवर्तुळाकार स्वरुपात रचून ठेवलेल्या आढळतात. या शिळा वस्तीस्थानाला तट किंवा कुंपण घालण्यासाठी नियोजनपूर्वक रचलेल्या आढळतात. आदिमानवाने हेतूपूर्वक वास्तू निर्माण करण्याची सुरुवात या ठिकाणी आपल्याला आढळते.[१३] ताम्राश्मयुगामध्ये (इ.पू. १४००) इनामगाव येथील वस्तीला वारंवार पुराचा धोका निर्माण झाल्यामुळे तेथील लोकांनी नदीच्या पात्रातून येणरे पुराचे पाणी कालव्याद्वारे वळवून घेतले व एक बंधारा बांधला. त्याशिवाय पुरापासून संरक्षण होण्यासाठी तट उभारले.[१४]

वेद, कल्पसुत्र, स्मृतीशास्त्र, नीतीशास्त्र, पुराणे, शिल्पशास्त्र, रामायण, महाभारत व इतर अनेक साहित्यांमध्ये दुर्गांचे व अनेक तटबंदीयुक्त शहरांचे वारंवार उल्लेख येतात. दुर्ग व तटबंदीयुक्त शहरांचे सर्वप्रथम संदर्भ ऋग्वेदात मिळतात. दिक्षितार आपल्या वॉर इन इन्शिअंट इंडिया या ग्रंथात म्हणतात की, ऋग्वेद संहितेवरून टोळ्या पुर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तटबंदीमध्ये रहात. या तटांना दगडी भिंतीनी मजबुती आणली होती.[१५] अंग राज्याची राजधानी चंपा (सध्याचे चंपारण्य) येथे उत्खननात इ.पू. पाचव्या शतकातील मातीचा किल्ला आढळतो.[१६] इ.पू. पाचव्या शतकात गंगेच्या खेड्यातील नगराभोवती खंदक वा भिंत असे व पुष्कळदा ती तटबंदी केलेली असे.[१७] भारतातील गंगेच्या खोऱ्यातील या नगरांच्या उदयाबरोबर नागरी व ग्रामीण यांच्यातील फरक संरक्षक भिंती व तटबंदी यांच्यामुळे ओळखला जाण्यास सुरुवात झाली. जरी या संरक्षक भिंती व तटबंदी अजून भव्य नव्हत्या तरी त्या नागरी व ग्रामीण यातील सीमारेषा दर्शवतात.[१८]

मौर्यकालीन भारतीय नगरांबाबत मॅगेस्थेनिस लिहतो की उंच ठिकाणी वसवलेल्या नगरांमध्ये वीटा व गारांचा वापर केला जात असे.[१९] मगेस्थेनिसच्या काळी पाटणा हे जगातील सर्वात मोठे शहर होते. त्याने वर्णन केलेली कुंपने व मनोरे पाटणाबांकापूर येथे प्रत्यक्ष आढळून आले आहेत.[२०] मौर्यकाळाविषयीची अधिक माहिती आपल्याला कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात मिळते. दुर्ग म्हणजे तटबंदी केलेले राजधानीचे शहर सर्व राज्याचा कारभार पाहण्यासाठी सोयीच्या ठिकाणी असलेल्य नगराला दुर्गाच्या संरक्षणाची आवश्यकता असते. या मध्यवर्ती दुर्गाशिवाय राज्याच्या सीमेवर चार दिशांना चार दुर्ग बांधावेत असा सल्ला कौटिल्य देतो. याशिवाय मध्यवर्ती दुर्गाचे बांधकाम, या दुर्गाने संरक्षित नगराचे नियोजन कसे करावे याचेही

मार्गदर्शन कौटिल्याने केले आहे. या नगराची व्यवस्था पाहणाऱ्या नागरिक या अधिकाऱ्याच्या कार्याचे वर्णनसुद्धा कौटिल्याने केले आहे. या ग्रंथातील तेरावे अधिकरण दुर्ग काबिज करण्याचे उपाय हे आहे. शत्रुस जिंकण्यासाठी, त्यास गुढ उपाय करुन दुर्गाबाहेर येण्यास प्रवृत्त करणे, वेढा देणे, हल्ला करुन दुर्ग काबीज करणे याविषयी चर्चा केली आहे.[२१]

कौटिल्याने दुर्गांचे प्रमुख चार व त्यांचे आठ उपप्रकार सांगितले आहेत ते खालीलप्रमाणे.

१) औदक (जलदुर्ग) (अ) अन्तर्दिप – बेटावर (ब) स्थल –
पाण्याने वेढलेल्या भूभागावर

२) पर्वतदुर्ग (गिरीदुर्ग) (अ) प्रांतर – खडकांनी बनलेला (ब) गुहा – गुहेच्या स्वरुपातील

३) धन्वदुर्ग (वाळवंटी) (अ) निरुदकस्तंभ– जल व झुडपे नसलेला (ब) ईरिणय क्षारयुक्त जमिनीचा

४) वनदुर्ग (जंगली)– (अ)खंजनोदक (दलदल व पाणी असलेला) (ब) स्तंबगहन – दाट झुडपांनी वेढलेला

यापैकी जलदुर्ग व पर्वतदुर्ग हे जनपदाच्या संरक्षणासाठी तर धन्वदुर्ग व वनदुर्ग हे संकटावेळी आश्रय घेण्यास उपयोगी आहेत. किल्ल्याबाहेर वरुन झाकलेला पण आतमध्ये शत्रूला त्रस्त करणारी साधने असलेला मार्ग तयार करावा. किल्ल्याच्या भिंतीच्या दोन्ही बाजूस मेंढ्याच्या डोक्याच्या आकाराची रचना करुन द्वार तयार करावे. जमिनीत वर असलेल्या भागाच्या दुप्पट पुरलेले खांब तयार करावेत. सुरक्षित तळमजला, गुप्त जीना असलेला वरचा मजला, अडसरयुक्त दरवाजे, इंद्रकील (बंद केलेल्या दरवाजात आत जमिनीत अडकावयाचा खिळा), आतबाहेर करण्यासाठी लहान दार असावे. हत्तीच्या धडका रोखण्यासाठी लोखंडी व अणकुचीदार अडसर दाराबाहेर लावावेत. गड उतरण्यासाठी अरुंद मार्ग हस्तिनख असावा. खंदकावरुन येण्यासाठी मातीचा रस्ता किंवा काढता घालता पुल करावा. याशिवाय सुरक्षिततेसाठी गोपूर, मोठी विहिर सानिध्य असलेले पुष्करिणीद्वार हे दरवाजे असावेत. याशिवाय चारी बाजूला खोल्या, कि ज्यांच्या भिंतीना शरसंधान करण्यासाठी छिद्रे असलेला कुमारीपुर दरवाजा, खडबडीत दुमजली खोली असलेले मुंडकद्वार करावे. शस्त्रास्त्रे ठेवण्यासाठी लांबरुंद चर खणावेत. त्यामध्ये दगड–धोंडे, कुदळ, कुऱ्हाड, बाण, गदा, कोयते, हातौडे, दंडे,

चाके, यंत्रे, शताघ्नि, लोखंडी सूळ, अणकुचीदार टोके असलेले बांबू, आग लावणारे पदार्थ अशा शस्त्रास्त्र म्हणून वापरण्यायोग्य अनेक गोष्टी साठवून ठेवाव्यात.[२२]

इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात किल्ल्यांच्या वास्तुशास्त्रातील प्रगती शिशुपालगढ (ओरिसा) येथे सापडलेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन कळते उत्खननामध्ये तेथे इ.पु. ३०० मधील तटबंदी युक्त वसतीस्थान सापडले आहे.[२३] इसवीसनाच्या सुरुवातीस कुशाणांनी दुर्गबांधणीच्या कलेत महत्वाची भर घातली. विशिष्ट प्रकारे आधार दिलेली भक्कम तटबंदी, मारा करण्यासाठी खास प्रकारची छिद्रे (जंग्या) व अनियमित जागी भव्य बुरुज ही कुशाणकाळातील किल्ल्यांची वैशिष्ट्ये आहेत.[२४] इ.पू. पहिल्या शतकातील कलिंगच्या खारवेल राजाने किल्ल्यांची चांगली दुरुस्ती केली होती. खारवेलने उत्तरेतील गोरथगिरी हा समर्थ किल्ला ध्वस्त केला.[२५]

प्लिनीने सातवाहनकालीन तीस शहरांना तटबंदी होती असे लिहून ठेवले आहे. उत्खननामध्ये तेलंगण येथे या तटबंद्यांचे अवशेष आढळले आहेत.[२६] प्राचीन तामीळ वाङ्मय व शिलालेखातून इसवीसनाच्या सुरुवातीस मदुरा या तटबंदीयुक्त शहराची माहिती मिळते.[२७] सातवाहन काळातील करीमनगर हे ठिकाण किल्ल्याचा निर्देश करते.[२८] चालुक्यांनी बदामी डोंगरावर किल्ला बांधून राजधानी केली. सहाव्या शतकात पहिल्या पुलकेशीने बदामी या तटबंदीयुक्त नगराची उभारणी केली व त्यास राजधानीचा दर्जा दिला.[२९] ८ व्या शतकात (७१२) मध्ये महंमद बिन कासिमने सिंधमधील देवल या शहरास ज्याचे संरक्षण दगडाची समर्थ तटबंदी करत होते त्यास वेढा दिला. त्याचे सैनिक शिड्या लाऊन तटबंदीवर चढले व देवलवर वर्चस्व मिळवले. याचवेळी मृत्यू पावलेल्या सिंधच्या दाहिर राजाची विधवा राणी राणीबाईने रावर किल्ल्यावरुन अरबांचा प्रतिकार केला.[३०]

## मध्ययुगीन काळातील किल्ल्याविषयीची माहिती

महाराष्ट्रात यादवांची राजधानी ही सुरुवातीला चंद्रादित्यपूर व नंतर देवगिरी या दुर्गांवर होती. कोल्हापूरच्या शिलाहारांचे वास्तव्य पन्हाळा किल्ल्यावर होते. महाराष्ट्रामध्ये किल्ल्यांची निर्मिती राष्ट्रकूट चालुक्य काळापासूनच होते. दुसऱ्या तैल चालुक्याने अठ्ठ्याऐंशी किल्ले घेतले असे मानगोळी येथील लेखात म्हटले आहे. सातारा परिसरात असलेले सामनगड, वैराटगड, वसंतगड, भूदरगड, पांडवगड, बावडा, चंदन–वंदन, खेळणा, रांगणा, नांदगिरी, पन्हाळा हे किल्ले दुसरा भोजराजा याने बांधल्याची नोंद आहे.[३१] मध्ययुगामध्ये नगरांच्या सुरक्षिततेसाठी तटबंदी

आवश्यक होती. नगरांच्या तटबंदीबाहेर सतत नव्या वसाहती होत राहिल्याने पुन्हा नवी तटबंदी बांधावी लागे.[३२] वारंगळचा किल्ला दक्षिणेत विशालतेसाठी व सुदृढतेसाठी सुप्रसिद्ध होता. त्यामध्ये सत्तर बुरुज असून त्यांचे संरक्षण प्रत्येकी एक सेनानायक करत होता.[३३]

इस्लामी सत्ता भारतात दृढ झाल्यानंतर सत्ताधीशांनी इराण व तुर्कस्थानमध्ये प्रगत झालेले दुर्गबांधणीचे तंत्र भारतात वापरले. बहामनी राज्यकर्त्यांनी युरोप व इराण मधील तंत्राप्रमाणे किल्ले व तटबंद्या बांधल्या. दुहेरी तट, अर्धवर्तुळाकार बुरुज, द्वारसंरक्षके, एकामागोमाग एक असलेली परंतु एकमेकाना काटकोनात छेदणारी प्रवेशद्वारे, मारा करण्याच्या व लपण्याच्या खास जागा, पडकोट व जंग्या ही बहामनीकालीन किल्ल्यांची वैशिष्टये होती. तोफखाना, दारुगोळा यांच्या वापराबरोबर पाकळ्या असलेल्या बुरुजांची निर्मिती सुरु झाली. उदा. गोवळकोंडा व नळदुर्ग. बहामनी राज्यकर्त्यांनी लष्करी सोयीच्या दृष्टीने सपाट प्रदेशात तटबंदीयुक्त नगरे वसवली. पश्चिम किनारपट्टीवर पोर्तुगिजांना शह देण्यासाठी निजामशहाने (१५९२) कार्ल्याच्या डोंगरावर किल्ला उभारला. त्यावरुन चौल व रेवदंडा दरम्यानच्या समुद्रावर लक्ष ठेवता येत असे.[३४] शिवपूर्वकाळात आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही या शाह्यांच्या ताब्यात अनेक किल्ले होते.

सोळाव्या सतराव्या शतकात भारतात व युरोपात सुद्धा तटबंदीयुक्त शहरांचे महत्त्व वाढले व गिरीदुर्गांचे महत्व कमी झाले. चार्लस सिंगर “Fortified towns rather than castles became the pivots of the real Defensve system” असे म्हणतो.

अशा दुर्लक्षित गिरीदुर्गांचा उपयोग छ. शिवरायांनी आपल्या स्वराज्य स्थापनेत व स्वराज्य संरक्षणात अचुक करुन घेतला. त्यांनी किल्ल्यांचे महत्व ओळखले होते. म्हणूनच ते म्हणतात. “संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्गे नसता मोकला देश परचक्र येतांच निराश्रय प्रजा भग्न होऊन देश उद्वस होतो. देश उद्वस जाल्यावरी राज्य यैसें कोण्हास म्हणावे?”[३५] सतराव्या शतकात लिहिल्या गेलेल्या व संभाजी महाराजांच्या नावावर मोडणाऱ्या बुधभूषणम् या ग्रंथात शिवरायांनी कर्नाटकापासून सह्याद्री पर्वताच्या पलिकडे बागलाणपर्यंत स्वराज्य रक्षणासाठी किल्ले बांधल्याचा उल्लेख केला आहे. त्याने किल्ल्यातील तटबंदीवरुन शेकडो सैनिक हजारोशी युद्ध करु शकतात म्हणून किल्ल्यांचा आश्रय करण्याचा सल्ला दिला आहे. त्याने आपल्या ग्रंथात किल्ल्यांचे सहा प्रकार सांगितले आहेत.[३६]

## महाराष्ट्रातील किल्ले

### महाराष्ट्राची भौगोलिक स्थिती

"Geography without History Seemth a Carcase without motion, a History without Geography wandereth as a vagrant without a certain habitation". – John Smith, 1624

महाराष्ट्राला आर्थिक, भौगोलिक व ऐतिहासिकदृष्ट्या वेगळेपणा आहे. आजच्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० रोजी झाली. या राज्यात कोकणसह पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या सर्व मराठी भाषिक प्रदेशांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याचा आकार अनियमित स्वरूपाचा आहे. पण जर भूमितीय व्याखेत बसवायचा असेल तर तो काटकोन त्रिकोण आहे. इ.स. सतराव्या, अठराव्या शतकातील मराठी भाषिक प्रदेशसुद्धा जवळपास हाच होता.[३७] राज्याच्या पश्चिमेस उत्तर दक्षिण पसरलेल्या ७२० कि. मी. लांबीचा अरबी समुद्र हा या काटकोन त्रिकोणाचा पाया मानता येईल. तर पश्चिमेकडून पूर्वेकडे ८०० कि.मी. अंतरावर असणाऱ्या टोकास या काटकोन त्रिकोणाचा शिरोबिंदू मानता येईल. दक्षिणेस गोवे, उत्तरेस ठाणे जिल्ह्याची सरहद्द व पूर्वेस नागपूर या तीन बिंदूनी हा त्रिकोण पूरा होतो.[३८] महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार त्रिकोणाकृती असून दक्षिणेकडे चिंचोळा तर उत्तरेकडे रुंद होत गेला आहे. त्याचा पाया काटकोणात व त्याचे निमुळते टोक पूर्वेस गोंदियाकडे आहे.

महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार १५°४४'' उत्तर अक्षवृत्त ते २२°६'' उत्तर अक्षवृत्त आहे तर रेखांश विस्तार ७२°३६'' पूर्व रेखावृत्त ते ८०°५४'' पूर्व रेखावृत्त आहे.[३९] (१५.८ उ.अ. ते २२.१ उ. अ. व ७२.६ पू. रे. ते ८०.९ पू.रे.) महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३,०७, ७१३ चौ.कि.मी. आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राचा भारतात तिसरा क्रमांक आहे. महाराष्टाला ७२० कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा आहे. महाराष्ट्राच्या वायव्य भागात सातमाळा डोंगरारांगा, गाळणा टेकडी व सातपुडा पर्वतरांगेतील अक्राणी टेकड्या, उत्तरेस सातपुडा पर्वतरांगा व त्याच्या पूर्वेस गाविलगड टेकड्या आहेत, तर ईशान्येस दरकेसा टेकड्या, पूर्वेस चिरोली टेकड्या व भामरागड डोंगर या महाराष्ट्रास नैसर्गिक सीमा निर्माण करतात. दक्षिणेस पठारावर हिरण्येकेशी नदी व कोकणात तेरेखोल नदी तर पश्चिमेस अरबी समुद्र अशा महाराष्ट्राच्या नैसर्गिक सीमा आहेत.[४०] महाराष्ट्राच्या वायव्य दिशेला गुजरात राज्य व दादरा व नगर हवेली हे केंद्रशासित प्रदेश आहेत. महाराष्ट्राच्या उत्तरेस मध्य प्रदेश तर आग्नेय दिशेला आंध्र प्रदेश आहे तर पूर्व व काही ईशान्य

दिशेस छत्तीसगड हे राज्य आहे. राज्याच्या दक्षिणेस गोवा व कर्नाटक ही राज्ये आहेत. इ.स. २०११च्या जनगणनेप्रमाणे राज्याची लोकसंख्या ११ कोटी २३ लक्ष ७३ हजार इतकी आहे. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या देशाच्या ९.२९% आहे. महाराष्ट्रातील स्त्री पुरुष प्रमाण १०००–९२५ असे आहे.[४१]

## सह्याद्रीची निर्मिती

सुमारे दोन कोटी वर्षापूर्वी म्हणजे चतुर्थक काळाच्या उत्तरार्धात भारतीय महाद्वीप आशिया खंडाला येऊन धडकले. या धडकेमुळे हिमालय पर्वताची निर्मिती झाली तसेच दक्षिणेचे पठार पश्चिमेकडे उचलले जाऊन ते पश्चिमेकेडे प्रचंड उंच झाले. पश्चिम किनाऱ्यावरील विवर्तनिकीमुळे (भूगर्भातील प्रावरणात होणाऱ्या हालचालींमुळे भूकवचात हालचाल होते त्यांना विवर्तनिकी म्हणतात) ही प्रक्रिया जलद झाली. दख्खनचे पठार वर उचलले गेल्यामुळे त्यांस पूर्वेकडे उतार निर्माण झाला. अशा तऱ्हेने सह्याद्रीची निर्मिती झाली.

## महाराष्ट्राचे भौगोलिक विभाग

भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचे कोकण, देश व विदर्भ असे तीन भाग पडतात. भुपृष्ठाप्रमाणे महाराष्ट्राचे कोकण किनारा, पश्चिम घाट किंवा सह्याद्री व इतर डोंगररांगा (उंचवट्याचा प्रदेश) व पठारी प्रदेश असे तीन भाग पडतात. डॉ. इरावती कर्वे यांच्या मते सांस्कृतिक वैशिष्ट्ये व ऐतिहासिक वसाहतींच्या दृष्टीने १) कोकणपट्टी २) गोदा व कृष्णा यांचे खोरे ३) तापी व पूर्णेचे खोरे आणि ४) वर्धा व वैनगंगेचे खोरे असे महाराष्ट्राचे चार स्वाभाविक विभाग पडतात.[४२] प्राकृतिक रचनेप्रमाणे आपण महाराष्ट्राचे पडलेले कोकण किनारपट्टी, पश्चिम घाट किंवा डोंगररांगा व पठार हे तीन विभाग पाहू.

## कोकण

महाराष्ट्राचा अगदी पश्चिमेकडील भाग म्हणजे कोकण किनारपट्टी होय. समुद्र किनाऱ्यापासून सह्याद्रीपर्यंतची अरुंद पट्टी म्हणजे कोकण. या चिंचोळ्या प्रदेशाला पूर्वेकडे सह्याद्री व पश्चिमेकडे अरबी समुद्र या नैसर्गिक सीमा लाभल्या आहेत. कोकण किनारपट्टीची दक्षिणोत्तर लांबी सुमारे ७२० कि.मी. आहे. उत्तरेस डहाणूपासून दक्षिणेस वेंगुल्यापर्यंत किंवा उत्तरेस दमणगंगा नदीपासून दक्षिणेस तेरेखोल नदीपर्यंत कोकणचा विस्तार आहे. पश्चिम घाटामुळे कोकणची रुंदी सगळीकडे सारखी नाही. सरासरी रुंदी ३० ते ६० कि.मी. आहे.

मुंबईच्या उत्तरेस तुलनात्मक दृष्ट्या सह्याद्री पर्वत पठाराकडे वळल्याने तिची रुंदी जास्त आहे. उत्तरेकडे काही भागात किनारपट्टी ९० ते ९५ कि.मी. रुंद आहे. उदा: उल्हास नदीच्या खोऱ्यात कोकणची रुंदी १०० कि.मी. आहे, तर दक्षिणेकडे काही भागात ती ४० ते ४५ कि. मी. इतकी कमी रुंद आहे. कोकणचे भौगोलिक क्षेत्रफळ सुमारे ३०,३९४ चौ.कि.मी. आहे.[४३] सह्याद्रीच्या उतारावरुन समुद्राकडे वेगाने वाहणारा प्रवाह व झीज झालेल्या डोंगररांगा हे या भुभागाचे वैशिष्ट्य.[४४]

सह्याद्री पर्वतामधून निघालेले डोंगरकडे पश्चिमेस किनाऱ्यापर्यंत जातात. त्यामुळे कोकण हा डोंगर दऱ्यांनी युक्त व कमी उंचीचा सखल भाग आहे. अनेक ठिकाणी कमी उंचीच्या टेकड्या व डोंगराचे सुळके आढळतात. किनाऱ्यापासून पूर्वेकडे सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंत ही उंची २५० मी. पर्यंत वाढते. सह्याद्रीच्या पायथ्याशी उतार मंद आहे.[४५] कोकण किनाऱ्यावर काही ठिकाणी डोंगरांची बेटेच झाली आहेत. त्यावरच आपल्याला सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जंजिरा हे जलदुर्ग उभारलेले दिसतात.

भुपृष्ठीय वैशिष्ट्यानुसार कोकणाचे उत्तर व दक्षिण कोकण असे दोन भाग पडतात. डहाणू ते श्रीवर्धन या प्रदेशाचा समावेश उत्तर कोकणात होतो. उंच, उंच खडक रांगा व चंद्रकोरीच्या आकाराचे समुद्रकिनारे हे या भागाचे वैशिष्ट्य आहे.श्रीवर्धन ते रेडी या दरम्यानचा प्रदेश दक्षिण कोकणात समाविष्ट होतो. उत्तर कोकणापेक्षा हा भाग चिंचोळा असुन या भागातील किनारा तुलनेने सरळ व अरुंद आहे.[४६]

**पश्चिम घाट किंवा डोंगररांगा (देश)**

महाराष्ट्र राज्यातील पश्चिम घाट किंवा सह्याद्रीच्या मुख्य पर्वतरांगा जवळजवळ ४०० कि.मी. उत्तर–दक्षिण लांब असून त्या पश्चिम किनाऱ्याला समांतर आहेत. या पर्वत रांगांमुळे कोकण व देश असे दोन भाग निर्माण होतात. या डोंगररांगाची समुद्रसपाटीपासून सरासरी उंची ८०० ते १३०० मी. आहे.

**१) शंभूमहादेव डोंगररांगा –**

रायरेश्वरापासून शिंगणापूर पर्यंत पसरलेल्या रांगेला शंभूमहादेव डोंगर म्हणतात. या डोंगररांगा सातारा व सांगली जिल्ह्यातून पुढे कर्नाटकात जातात. शंभूमहादेव डोंगरावर काही ठिकाणी सपाट माथ्याचे प्रदेश आहेत.

**२) हरिश्चंद्र –** (बालाघाट डोंगररांगा )

गोदावरीच्या दक्षिणेस हरिश्चंद्र – बालाघाट डोंगररांग आहे. या डोंगर रांगांच्या पश्चिम भागास हरिश्चंद्र घाट तर पूर्वेस बालाघाट म्हणतात. पुढे हीच डोंगररांग आंध्र प्रदेशात जाते. या डोंगररांगावरसुद्धा सपाट माथ्याचे प्रदेश आहेत. बालाघाट हा सपाट माथ्याचा प्रदेश आहे.

**३) सातमाळा –**

अजिंठा डोंगररांगा नाशिक जिल्ह्यात सातमाळा डोंगररांग आहे. अजिंठा टेकड्यांचा उतार उत्तरेकडे तीव्र असून दक्षिणेकडे गोदावरी नदीच्या खोऱ्याकडे मंद आहे. ही डोंगररांगा तुटक असून तिची दिशा पश्चिम–पूर्व आहे. डोंगराच्या पश्चिम भागास सातमाळा डोंगर असे म्हणतात. नाशिक जिल्ह्याच्या वायव्य टोकावर सातमाळा डोंगर सुरु होतो. पुढे याच्या रांगा मनमाडच्या पलिकडे अजिंठा टेकड्या म्हणून ओळखल्या जातात. सातमाळा–अजिंठा डोंगररांगांचा उतार पूर्व बाजूस सौम्य तर पश्चिमेस तीव्र आहे.

याशिवाय महाराष्ट्रात काही डोंगर व टेकड्या आहेत. उदा. धूळे जिल्ह्यात गाळणा डोंगर, औरंगाबाद जिल्ह्यात वेरुळ डोंगर, हिंगोली व नांदेड जिल्ह्यात अनुक्रमे हिंगोली व मुदखेड डोंगर आहेत. विदर्भामध्ये नागपूर जिल्ह्यात गरमसूर डोंगर, गोंदिया जिल्ह्यात दरकेसा टेकट्या, गडचिरोली जिल्ह्यात चिरोली टेकड्या, भामरागड व सुरजागड डोंगर आहेत. पूर्वेकडे अजिंठ्यापासून डोंगराचे दोन सुळके होतात. त्यापैकी एक रांग देवगिरी सिंदखेडवरुन दक्षिणेस परभणी व नांदेड जिल्ह्यातून जाते. तिला निर्मल रांग असे म्हणतात. उत्तरेस असणारी रांग यवतमाळ जिल्ह्यातून जिल्ह्यातून जाते.

**सातपुडा पर्वतरांग व डोंगररांगा**

महाराष्ट्राच्या उत्तर सरहद्दी जवळ सातपुडा रांग पसरलेली आहे. महाराष्ट्रात सातपुडा पर्वतरांगेचा फारच थोडा भाग आहे. महाराष्ट्रामध्ये सातपुड्याच्या काही डोंगररांगा उत्तर महाराष्ट्रात पसरल्या आहेत.

**पठारी प्रदेश**

सह्याद्रीच्या पूर्वेस हा विस्तृत पठारी प्रदेश आहे. पश्चिमेकडील सह्याद्रीपासून पूर्वेकडे या पठाराची रुंदी जवळजवळ ७०० कि.मी. आहे. समुद्र सपाटीपासून त्याची उंची ९०० मी. आहे. मध्यभागात या पठाराची समुद्रसपाटीपासूनची उंची ३०० ते ४०० मी. आहे. पूर्व विदर्भातील

वैनगंगा खोऱ्यात ही उंची ३०० मी. इतकी कमी होते. महाराष्ट्राच्या पठारी प्रदेशाला पश्चिमेकडून पूर्वकडे व काही प्रमाणात उत्तरेकडून ईशान्येकडे उतार आहे.[४७]

**दख्खनची पठारे**

दख्खनच्या पठारी प्रदेशात डोंगररांगांवर काही प्रदेशात लहान लहान पठारे तयार झाली आहेत.

**१) बालाघाट डोंगरावर अहमदनगर –**

बालाघाट पठार तयार झाले आहे. या पठारामुळे उत्तरेस गोदावरी व दक्षिणेस भीमा नदीचे खोरे अलग झाले आहे. या पठाराची पश्चिमेकडील उंची ८५० मी. व पूर्व बाजूला उंची ६०० मी. आहे. या पठाराचा उतार वायव्य – आग्नेय असून त्याचे मोठ्या प्रमाणात विदारण झाले आहे.

२) शंभू महादेव डोंगराच्या उंच भागात सासवडचे पठार आहे.

३) याशिवाय औंध पठार व खानापूर  जत पठार आहे.

४) सातमाळा – अजिंठा डोंगरावर बुलढाणा व मालेगाव पठार आहे.

५) मराठवाड्यात मांजरा पठार आहे.

६) उत्तर महाराष्ट्रात धूळे  नंदुरबार जिल्ह्यात सातपूडा डोंगररांगात तोरणमाळ पठार आहे.[४८]

**महाराष्ट्राच्या भौगोलिकतेचा महाराष्ट्राच्या इतिहासावर पडलेला परिणाम**

महाराष्ट्राच्या अवघड चिंचोळी खडकाळ कोकण किनारपट्टी, देशावरील पठारे, नद्या, त्यांची खोरी, बेसाल्ट, लहरी मान्सून, काळी माती, सह्याद्री, पश्चिम घाट, दाट जंगल या सर्व भौगोलिक स्थितीचा महाराष्ट्राच्या मानवी इतिहासावर दूरगामी परिणाम झाला आहे. म्हणूनच आंतरविद्याशाखीय दृष्टिकोनातून इतिहास अभ्यास करताना येथील भूगोलाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्राच्या कमी पावसाच्या पठारी प्रदेशात मानवी अस्तित्वाचे पुरावे चाळीस हजार वर्षापूर्वी त्याने वापरलेल्या दगडी हत्यारांवरुन मिळतात. ह्या अश्मयुगीन मानवाच्या अस्तित्वाचे पुरावे कोकणात सुद्धा सापडतात. पाटणे (गिर खोऱ्यात) अश्मयुगीन माणसाच्या कलात्मकतेचे पुरावे आढळतात. त्याने शहामृगाच्या अंड्याच्या कवचापासून मणी बनविले होते. चार पाच हजार वर्षापूर्वी कोकणात माणूस गुहेत राहू लागल्याचा पुरावा मिळतो. गोदावरी खोऱ्यात चार

हजार वर्षापूर्वीच शेती संस्कृतीची सुरुवात महाराष्ट्रात आढळते. तापी, गोदावरी, भीमा या नद्यांच्या काठावर ताम्राश्मयुगीन संस्कृती बहरली. इ.पू. ६०० पर्यंत महाराष्ट्रात ताम्राश्म संस्कृतीचे अस्तित्व आढळते. कोकण किनारपट्टी व विदर्भाचा काही भाग सोडल्यास महाराष्ट्रात सर्वत्र ताम्राश्मयुगीन लोकांनी वस्ती केली होती. इनामगाव (ता. शिरुर, जिल्हा पूणे), दायमाबाद (ता. श्रीरामपूर, जिल्हा – अहमदनगर) येथे सापडलेल्या अवशेषांनी तेथील ताम्राश्मयुगीन लोकजीवनाच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक जीवनावर प्रकाश टाकला आहे.[४९]

अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरा नदीकाठच्या चिरकी–नेवासा येथील उत्खननात एका खड्ड्यात बेसाल्टच्या मोठमोठ्या शिला अर्धवर्तुळाकार स्वरुपात मुद्दाम रचून ठेवलेल्या आढळल्या. वसतीस्थानाला तट किंवा कुंपण म्हणून अशाप्रकारची वास्तू योजनापूर्वक तयार केली होती.[५०]

पश्चिम महाराष्ट्रामध्ये मोगल बादशहा व विजापूरच्या आदिलशहाचे वर्चस्व होते. पण येथील डोंगर, दऱ्यांच्या दुर्गम प्रदेश व अपुऱ्या दळणवळणाच्या साधनांमुळे हा प्रदेश उपरोक्त राज्यातील इतर प्रदेशांशी घट्ट जोडला गेला नव्हता. पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्री डोंगररांगा, घाट, समुद्रकिनारे यांचा उपयोग करुन शिवाजी राजांनी मोक्याच्या ठिकाणी किल्ले बांधले. त्यांच्या मदतीने जलद हालचाली केल्या. येथील भू–रचनेशी सुसंगत गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा विकास केला. सह्याद्री पर्वत व अरबी समुद्र यांनी मराठा स्वराज्याचे रक्षण केले. या सर्वांमुळे औरंगजेबासारखा मोगल बादशहा पंचवीस वर्षे सर्व लवाजमा व विशाल सैन्यासह महाराष्ट्रात ठाण मांडून बसला तरी मराठ्यांवर निर्णायक विजय मिळवू शकला नाही.

**महाराष्ट्रातील किल्ल्यांचा विकास**

महाराष्ट्रात किल्ल्यांची प्राचीनता इ.पू. १५०० पर्यंत मागे जाते. जोर्वे संस्कृतीतील आद्य शेतकऱ्यांनी महाराष्ट्रात संरक्षणासाठी प्रथम तटबंदी उभारल्याचे पुरावे मिळतात. उत्तरोत्तर किल्ल्यांच्या वास्तुशास्त्रात प्रगती होत गेली. चालुक्य, शिलाहार, यादव, राष्ट्रकूट राज्यकर्त्यांनी किल्ल्यांच्या दुर्गमतेत वाढ केली. बहामनी शासकांनी प्रगत व परकीय तंत्रज्ञान किल्ल्यांच्या बांधणीसाठी वापरले. शिवपूर्वकाळात संगमेश्वरचा राजा जाखुराय याने प्रसिद्ध बहामनी सरदार महंमद गवान व सेनापती खलफ हसन बसरी याच्याशी आपल्या दुर्गम किल्ल्यांच्या मदतीने लढा दिला. बहामनी सत्तेची शकले झाल्यानंतर आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही या तीन

शाह्यांनी व त्याच बरोबर मोगल बादशहांनी महाराष्ट्रातील किल्ल्यांवर वर्चस्व ठेवण्याचे प्रयत्न केले.

पण खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील दुर्गमतेचा व सह्याद्री पर्वतरांगांचा उपयोग स्वराज्यासाठी करुन घेतला तो छ. शिवरायांनीच. त्यांनी गिरीदुर्गांच्या साखळ्या तयार करुन स्वराज्य स्थापना व स्वराज्य विस्तार केला.

शिवपूर्वकाळापासून महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी या भौगोलिक परिस्थितीचा फायदा सत्ता टिकविण्यासाठी घेतला. शिवकाळातही या भौगोलिकतेचा लाभ घेत मोठ्या सत्ताधिशांना यशस्वीरित्या टक्कर देणारे स्वराज्य उभे राहिले. दक्षिणेतील राजकारणात महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीने व त्यावरील गिरिदुर्गांनी महत्वाची भूमिका बजावली आहे.

महाकवी नुसरती शिवाजीराजांच्या तोंडी घातलेल्या संवादात म्हणतो, "हा प्रदेश माझ्या (शिवाजीच्या) जीवाची आशा आहे. ते माझ्या आडोशाचे घर आहे. हे रण (अरण्य) वन व पहाड ही माझी सेना होय. अशी भूमी जिथपर्यंत आहे. तिथपर्यंत माझे गड सुद्धा आहेत. ही झडती, टेहळणीची माझी ठिकाणे आहेत. नद्या व नाल्यांच्या खंदकाचे ते आधार आहेत. या सेवकाचे सर्वप्रकारच्या झाडांच्या जाळ्यांचे कोट किल्ले आहेत. प्रत्येक झाड, झुडूप म्हणजे माझ्या सैन्याचा व्युह आहे. ते नेहमी सहस्त्रावधी खंजीर बनून भोसकत असतात. ते अडवून खूप परेशान करतात. माझे प्रत्येक झाड म्हणजे माझा दुर्दम्य, अटळ असा सैनिक आहे."[५१]

महाराष्ट्रात अनेक लहानमोठे किल्ले आहेत. साहित्यिक उल्लेख व प्रत्यक्ष सापडलेले किल्ले यांच्या मध्ये तफावत आढळते.

## शिवकालीन किल्ले

सतराव्या शतकातील राजकीय सत्ताकारणात या किल्ल्यांना छ. शिवाजी महाराजांच्यामुळे आगळेच महत्व प्राप्त झाले. त्यांनी आपल्या राजकारणाच्या व लष्करी हालचालींच्या केंद्रस्थानी किल्ल्यांना आणले. त्यामुळे सतराव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यतचा राजकीय इतिहास म्हणजे मुख्यत: किल्ल्यांचा इतिहास आहे. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात मराठ्यांचे राज्य समूळ नष्ट करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनीने मराठ्यांच्या शक्तीस्थानांना किल्ल्यांनाच लक्ष्य केले.

छ. शिवाजी महाराज यांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांनी स्वराज्याची सुरुवात तोरणा किल्ल्यापासून केली. पन्हाळा व प्रतापगड असे किल्ले त्यांच्या पराक्रमाचे साक्षीदार आहेत. त्यांच्या प्रमुख हालचाली किल्ल्यांच्या आधारानेच झाल्या. ऐन संकटात त्यांच्या किल्ल्यांनीच त्यांना अनेक वेळा वाचवले. त्यांचा राज्याभिषेक व मृत्यू रायगडवरच झाला. अनेक किल्ले शिवाजीराजांच्या पराक्रमामुळे प्रसिद्ध पावले. याबाबत डॉ. बाळकृष्ण म्हणतात, “शिवाजी महाराजांचा जन्म दुर्गात झाला. महाराजांना वैभव प्राप्त झाले तेही सर्व दुर्गांमुळेच झाले. त्यांच्याच प्रयत्नांनी त्यांच्या ताब्यातील दुर्गांना सामर्थ्य प्राप्त झाले. त्यांचे दुर्ग म्हणजे भारतातील त्यांच्या शत्रूंना धाक होता. त्यांच्या राज्याची ती संवर्धन भूमी होती. त्यांच्या विजयाचा तो पाया होता. त्यांच्या वाढत्या महत्वाकांक्षेची ती शिडी होती. दुर्ग हेच त्यांचे निवासस्थान व तेच त्यांच्या आनंदाचे निधान होते. अनेक दुर्ग त्यांनी स्वत: बांधले व जे जुने होते त्या सर्वांना महाराजांनी बळकटी आणली.”[५२] मुरारबाजीच्या नायकत्वाचे पुरंदर व वज्रगड हे साक्षीदार आहेत तर सिंहगडचा इतिहास तानाजी मालुसरेच्या वीरगाथा संबंधित किल्ल्यांशिवाय पूर्ण होऊच शकत नाहीत.

चिटणीस बखरीत शिवाजी राजांच्या ताब्यातील किल्ल्यांची संख्या ३१७ आहे.[५३] रघुनाथ हणमंते उर्फ चित्रगुप्तने आपल्या बखरीत ही संख्या ३६१ देतो. २४० पहाडी किल्ले १३ जंजिरे पाणियांतील. १०८ भुईकोट एकूण ३६१[५४] सभासद राजांच्या किल्ल्यांची एकूण बेरीज २४० करतो.[५५] वेगवेगळ्या बखरीत राजांच्या किल्ल्याविषयीचे संदर्भ वेगवेगळे आले आहेत.

## मध्ययुगीन काळातील किल्ल्यांचे महत्त्व

महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासावर छ. शिवरायांचा प्रभाव आहे. शिवपूर्वकालीन बहामनी, विजयनगर सत्ता व त्यानंतर निर्माण झालेल्या प्रबळ आदिलशाही, निजामशाही तसेच शिवोत्तर काळातील पेशवाई यापेक्षा शिवकाळ अधिक दैदिप्यमान आहे. म्हणूनच मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास म्हणजे शिवकाळाचा इतिहास. एतद्देशीयांच्या स्वराज्य निर्मितीचा इतिहास. या इतिहासाचे किल्ले हे व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणूनच शिवकाळाचा इतिहास हा किल्ल्यांच्या अभ्यासाशिवाय अपूर्ण आहे. मध्ययुगात पातशाहीमध्ये अशी पद्धत होती की जहागीर म्हणून एखादा प्रदेश जहागीरदारास दिला असेल व त्या प्रदेशात किल्ले असतील तर त्या किल्ल्यांवर

पातशहाची सत्ता असे. शिवाजी राजांनी मात्र ही पद्धत धुडकावून लावत आपल्या जहागिरीतील सिंहगड, पुरंदर सारखे किल्ले इ.स. १६४६ पर्यंत जिंकले व आपले सार्वभौमत्व सिद्ध केले होते.[५६]

"सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रु उरावर आहे, तो आला तरी, नवे–जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत."[५७] संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो. देश उध्वस्त झाल्यावरी राज्य ऐसे कोणास म्हणावे."[५८]

"आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. नदी नाले उतरुन जाण्यास वाट नाही अत्यंत मजबूत असे साठ किल्ले आज माझे तयार आहेत. पैकी काही समुद्र किनाऱ्यालगत आहेत. बिचारा अफजलखान फौज घेऊन आला आणि नाहक मृत्यूमुखी पडला. हा सर्व प्रकार तुम्ही बादशाहास कळवित का नाही?"[५९] छ. शिवाजी राजांच्या व अमात्यांच्या उपरोक्त उदाहरणांवरुन शिवाजी राजांचा आपल्या किल्ल्यांवर किती विश्वास होता हे लक्षात येते. शिवाजी महाराजांच्या जीवनात किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्व होते. एवढेच नव्हे त्यांचे व या किल्ल्यांचे परस्पर नाते एकदम घट्ट होते.

महाराष्ट्राची नैसर्गिक रचना किल्ल्यांच्या निर्मितीला उपयुक्त असल्याने छ. शिवरायांनी त्याचा अचूक उपयोग करुन घेतला. सह्याद्री पर्वताच्या पश्चिमेस थोड्या अंतरावर समुद्रकिनारा आहे. सह्याद्री पर्वतात उगम पावलेल्या नद्या तसेच काही डोंगरकडे समुद्राला मिळालेले आहेत. हे डोंगर जेथे समुद्राला जाऊन मिळाले आहेत त्यापैकी अनेक खाड्यांच्या मुखाशी किल्ले बांधले आहेत. मुंबई ते गोव्यापर्यंतच्या समुद्रकिनाऱ्यावर लगतच्या डोंगरावर व कधीकधी समुद्रामध्येही अनेक किल्ले आहेत. खांदेरी, उंदेरी, अलिबागचा किल्ला (कुलाबा), जंजिरा, बाणकोट, अंजनवेल, जयगड, रत्नागिरी, देवगड, सुवर्णदुर्ग हे अशाप्रकारचे किल्ले आहेत. महाराष्ट्राचे समुद्राच्या बाजूने संरक्षण करण्यासाठी या किल्ल्यांची निर्मिती केली आहे. याशिवाय सह्याद्रीच्या डोंगररांगामधील शेकडो डोंगरी किल्ले महाराष्ट्राच्या अंतर्भागाचे रक्षण करण्याकरिता उभारले आहेत. मराठेशाहीत छ. शिवाजींपासून ते पेशवाईच्या अखेरपर्यंत या किल्ल्यांचे महत्व कायम टिकलेले दिसते.

छ. शिवाजी महाराजांचा किल्ल्याबाबतचा दृष्टिकोन

एकशतं योधयति दुर्गस्थाऽस्त्रधरो यदि ।

शतं दशसहस्राणि तस्माद्दुर्गे समाश्रयेत ।।

शुक्रनीती, अध्याय ४

अर्थ  दुर्गाच्या आश्रयाने एक सशस्त्र मनुष्य शंभराशी लढू शकतो. शंभर माणसे दहा हजार लोकांशी लढू शकतात. यास्तव राजाने किल्ल्याचा आश्रय घ्यावा.

छ. शिवाजी महाराजांनी डोंगरी किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण केल्या. डोंगरी किल्ल्यांच्या या साखळ्या, त्यांच्यामधील भौगोलिक स्थान व परस्परसंबंध यांचा उपयोग चक्रव्युहासारखा केला जात असे. अनेक वेळा शत्रु यामध्ये अडकत असे. मुख्य किल्ल्यांचे संरक्षण करण्यासाठी जवळच मोक्याच्या जागी किल्ल्यांचा समूह निर्माण केला जात असे. रायगड, सुवर्णदुर्ग व सिंधुदुर्ग याची उत्तम उदाहरणे आहे. किल्ल्याजवळच पाण्याच्या बाजूने शत्रुच्या आरमारास प्रतिकार करण्याची उपयायोजना केली जात असे. अलिबागच्या किनाऱ्यावर हिराकोट, सुवर्णदुर्गच्या संरक्षणासाठी किनाऱ्यावर कनकदुर्ग, फत्तेगड व गोवागड, तर सिंधुदुर्गाच्या रक्षणासाठी पद्मगड, राजकोट व सर्जेकोट यांचे बांधकाम केले आहे. बाणकोट, मंडणगड, पालगड अशी किल्ल्यांची साखळी सुद्धा आरमारी व जमिनी वरुन शत्रुला कोंडीत पकडण्यासाठी उपयोगी पडत असे. अशा किल्ल्यांच्या साखळीतून होणाऱ्या माऱ्यातून वाचणे अथवा युद्ध करणे शत्रुला अवघड होत असे. छ. शिवरायांना आपल्या स्वराज्याची खरी संपत्ती हे गडकोटच आहेत याची जाणीव होती. स्थानिक किल्ल्यांचे महत्व आज्ञापत्रातील उल्लेखावरुन लक्षात येते. "गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राजलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहूना गडकोट म्हणजे आपले प्राणरक्षण."[६०]

स्वराज्याच्या संरक्षणातील गडकोटांचे महत्व शिवरायांनी अचुक ओळखले होते. आपल्या लुटीतील, खजीन्यातील काही हिस्सा ते दुर्गांच्या उभारणीत, दुरुस्तीमध्ये व शिबंदीवर खर्च करत. हे दुर्ग व त्यावरील पराक्रमी शिबंदी दोघांच्या परस्परपुरक पराक्रमानेच स्वराज्याचे संरक्षण होते. हे दुर्गच स्वराज्याचे खरे राखणदार आहेत. याबद्दल शिवाजीला आत्मविश्वास होता. छ. शिवाजी महाराज मुघल अधिकाऱ्यांना खरमरित शब्दात याची जाणीव करुन देतात. ते

म्हणतात, "आमच्या या कठीण प्रदेशात कल्पनेचा घोडासुद्धा नाचवणे कठीण आहे. आमचा प्रदेश अवघड व डोंगराळ आहे. नदी नाले उतरुन जाण्यास वाट नाही. अत्यंत मजबूत असे साठ किल्ले माझे तयार आहेत. त्यापैकी काही समुद्रकिनाऱ्यालगत आहे."[६१] महाराष्ट्रात महत्वाच्या ठिकाणी अनेक डोंगरी किल्ले होतेच. तरी सुद्धा राजकीय लष्करी हालचालीसाठी एखादी जागा महत्वाची वाटली त्या ठिकाणीही शिवाजी महाराजांनी नवे किल्ले उभारले. कोकण किनारपट्टी सुरक्षित करण्यासाठी, आरमारी सामर्थ्य वाढविण्यासाठी जलदुर्ग उभारणीकडे शिवाजी महाराजांनी अधिक लक्ष दिले. डोंगरी किल्ल्यांबाबत तर शिवकालात स्वतंत्र शास्त्रच निर्माण झाले. स्वराज्याच्या संरक्षणामध्ये किल्ल्यांचे महत्व सांगताना डॉ. एस. एस. ऐन म्हणतात. "The defensive value of these forts had been amply demonstrated during aurangzib's invasion. Each fort cost the Mughal Emperor an enormous loss of men, money & time"[६२] शिवाजी राजांनी अनेक छोटे किल्ले बांधले त्यावर पाणी सुद्धा नसे. अशा किल्ल्यांचा उपयोग शत्रू पाठीवर आला किंवा शत्रूने अचानक हल्ला केला तर पटकन या किल्ल्यांवर आश्रय घेण्यासाठी होत असे. शत्रू एकदम तटास भिडत नाही. शत्रू चालून येत आहे बघून किल्ल्यावरचे लोक सावध होऊन वरुन दगड लोटतील. त्यामुळे शत्रू बिथरेल. आपल्या लोकांना वेळ, इतर सामग्री मिळेल. जवळपासच्या किल्ले, कोट, सुभे ठाण्यांवरुन मदत मिळेल. किल्ल्याला अपाय होणार नाही अशा विचाराने लहानमोठे किल्ले उभारले.[६३]

## किल्ल्यांचे प्रशासन

स्वराज्याच्या संरक्षणासाठी किल्ले महत्वाचे होते. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी त्याची दुर्गमता, मजबूत संरक्षणात्मक बांधकाम, सुसज्ज शस्त्रास्त्रे, भरपूर अन्नधान्य व पाणीसाठा याबरोबरच त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे कर्तव्यदक्ष अधिकारी व शिबंदी व कामगार हे होते. छ. शिवाजी महाराज हे उत्तम प्रशासक व मनुष्यपारखी होते. किल्ल्यांचे स्वराज्यातील महत्व ओळखल्यामुळे ते गडावरील अधिकारी व इतर कामगार, सैन्य नेमताना अतोनात काळजी घेत. त्यांच्या शिस्तीची, कर्तव्यदक्षतेची वारंवार परीक्षा घेत. गडावरील प्रशासनामध्ये तेथील अधिकारी, त्यांचे पारस्पारिक संबंध, कार्य, कार्यालय व कारखाने यांची व्यवस्था या सर्वांचा समावेश होतो. शिवाजी राजांनी किल्ल्यांची अत्यंत चोख व्यवस्था ठेवली होती.

किल्ल्याभोवतालच्या प्रदेशाचे व किल्ल्याचे संरक्षण किल्लेदारास करावयाचे होते. ही सर्व व्यवस्था राखणारे अधिकारी किल्ल्यावर असत. किल्ल्यावर समान दर्जा व अधिकार असणारे तीन अधिकारी असत. त्यांच्या जबाबदाऱ्या व खाती स्वतंत्र असत. पण तरीही त्यांचे परस्परांवर नियंत्रण असे. किल्ल्यावरील लहान गोष्टींचा निर्णय त्यांना आपापसात चर्चा करुनच घ्यावा लागत असे. परस्परांच्या सहकार्यानेच ते किल्ल्यांचा कारभार पहात. किल्ल्यावर हवालदार, सबनीस व कारखानीस असे समान दर्जाचे व अधिकाराचे तीन अधिकारी असत. गडावरील धान्यकोठी व युद्धसाहित्य यांची व्यवस्था पाहणारा कारखानीस नावाचा अधिकारी नेमला जात होता.[६४]

चिटणीस हा किल्ल्यांच्या व्यवस्थेवर भाष्य करताना म्हणतात, किल्ले, कोट ठाणी घेतली त्यांच्या बंदोबस्त सुभेदार एक, हवालदार व कारखानीस व सबनीस व सरनोबत व तट–सरनोबत व फडणीस कारखाननीस याचा हस्तक हे दरखी अधिकारी (यांच्या हस्तकी, देखरेखी अधिकारी) करुन दिले.[६५] किल्ल्यावरील हवालदार हा गडकरी किंवा किल्लेदार म्हणूनही ओळखला जातो. किल्ल्यातील सैन्य व किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या परिसरातील प्रजेवर या हवालदाराचीच सत्ता होती. हवालदारावर किल्ल्याच्या संरक्षणाची प्रमुख जबाबदारी असे म्हणून रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, किल्ल्याचा जीव तो किल्ल्याचा हवालदार.[६६] हवालदार हा प्रामाणिक, कुलीन मराठा व कुटुंबवत्सल असे. तो मुद्राधारी अधिकारी होता. हवालदाराकडे किल्ल्याच्या चाव्या असत. रात्री किल्ल्याचे दरवाजे बंद करुन कुलूप लावणे व सकाळी उघडणे ही कामे त्यास स्वतःच करावी लागत. इतर कोणावर या कामाची जबाबदारी सोपवली जात नसे. कोणत्याही स्थितीत रात्रीचे किल्ल्याचे दरवाजे उघडायचे नाहीत अशी शिवाजी महाराजांची हवालदारांना सक्त ताकीद होती. मल्हार रामराव चिटणीस म्हणतात, हवालदाराची बारकाईने परीक्षा घेऊन मगच त्याच्यावर विश्वास ठेवत.[६७] पन्हाळ्याच्या हवालदाराची राजांनी एकदा परीक्षा घेतली. रात्री पन्हाळ्याच्या किल्ल्यावर जाऊन महाराज आले, गनिमाची झड (पाठलाग) मागे आली आहे, दरवाजा उघडून किल्ल्यावरी घेणे असे सांगितले.[६८] हवालदार आपल्या सर्व अधिकाऱ्यासहित तटावर आला. त्याने प्रत्युत्तर केले की, रात्रीचा किल्ल्याचा दरवाजा उघडू नये हा नियम राजांनी घालून दिला आहे. म्हणून दरवाजा उघडत नाही. शत्रूला किल्ल्याच्या पायथ्याच्या सैन्यास सावध करुन रोखून धरतो.

महाराजांनी तटाजवळच दरवाजाशी थांबावे. किल्ल्यावरुनही तोफा व इतर बंदोवस्ताने शत्रू पुढे येणार नाही याची काळजी घेतो.[६९] शिवाजी राजांनी अनेक प्रकारचा धाक दाखवूनही हवालदाराने दरवाजा उघडला नाही. त्या बद्दल शिवाजी राजांनी आज्ञा तसे चालता, इमानी, इतबारी, प्रमाण आहात, असे म्हणून त्याचा गौरव व पदोन्नती केली.[७०]

राजांची शिस्त मोडणाऱ्या, भ्रष्ट व विश्वास घातकी किल्लेदारांना कडक शिक्षा केल्या जात. हवालदाराच्या ताब्यात किल्ल्या असत. आपल्या धन्याने किल्ले म्हणजे आपली परमाप्रिय ठेव आपल्याला संभाळण्यास दिली आहे. याची सदैव जाणीव ठेऊन दिवसरात्र किल्ल्याचे रक्षण करावे.[७१] प्रत्येक हवालदाराची दर तीन वर्षांनी बदली करत. किल्ल्याचा हवालदार किल्ल्याचे संरक्षण करताना मृत्युमुखी पडला तर त्याच्या भाऊबंदास, मुलास त्या किल्ल्यावर हवालदार म्हणून नेमले जात नसे. किल्ल्याच्या कामास विश्वासू माणसे मिळणे कठीण होते. एकाच घरातील भावांना किल्लेदार नेमताना जवळच्या किल्ल्यावर नेमले जात नसे. अमात्य म्हणतात, त्यांस समीप समीप किल्ल्यावर न ठेवावे. दूर दूर किल्ले, असतील अशा किल्ल्यांचे मामले सांगून सेवा घ्यावी.[७२] हवालदारांना रात्रंदिवस कचेरीस हत्यारबंद शिपायांसहित सावध असावे लागे. त्यास किल्ल्याखालील नाकी, वाटेत ठिकठिकाणी, मेटा या सर्व ठिकाणी सैन्य व लष्करी ठाणी ठेवावी लागत.[७३] किल्ला अधिक महत्वाचा असेल तर, तर त्याच्या व्यवस्थेसाठी एकापेक्षा अधिक हवालदार नेमले जात. या सर्व हवालदारांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी सरहवालदारावर सोपविली जात असे.[७४] हवालदारास किल्ल्याच्या सभोवतालच्या प्रदेशातील चौकीवर सैनिक, राखणदार नेमावे लागत. आजुबाजूच्या लोकांना चाकरीवर ठेऊन त्यांचा उदरनिर्वाह होण्याची काळजी घ्यावी लागत असे. एवढे करुनही एखाद्याने त्या प्रदेशात चोरी केली तर त्याचा शिरच्छेद केला जात असे.[७५] हवालदार कचेरीचा कारभार पहात. किल्ल्यातील लोकांचे वेतन, अन्नधान्य, दारुगोळा व उपयुक्त सामान आणण्याचे काम तोच करत असे. किल्ल्याचा प्रमुख हवालदारच असे. त्याचा शिक्का महत्वाच्या कागदपत्रांवर असे. किल्ला व त्यांच्या दरवाजाच्या बंदोबस्ताचे काम हवालदाराकडेच असे.[७६]

हवालदाराला त्याच्या कामात मदत करणारा सहाय्यक अधिकारी म्हणजे सरनोबत. सरनोबत व तटसरनोबत हे मराठे असत.[७७] सरनोबत हा तटबंदीची पाहणी करणारा व संरक्षण करणारा अधिकारी असे.[७८] हा सरनोबत युद्धकलेत हवालदाराप्रमाणे पराक्रमी व अनुभवी असे.

हवालदाराच्या अनुपस्थितीत तो किल्ल्याचा कारभार पहात असे. इतर वेळी हवालदाराच्या आज्ञेत राहून त्याची सत्ता गडाच्या मेटांवर, अलंगांवर सैनिक व सैन्यावर चाले.[७९] किल्ल्याचे संरक्षण, सैन्यव्यवस्था, सैन्यभरती, पहाऱ्याची व्यवस्था, प्रत्यक्ष युद्धावेळी आखावयाचे लष्करी डावपेच यासंबंधीचे कार्य सरनोबत यास करावे लागे. सरनोबत याची बदली दर चार वर्षांनी केली जात असे.[८०] किल्ल्याच्या आकाराप्रमाणे व गरजेप्रमाणे या सरनोबताच्या मदतीस एक किंवा अधिक तटसरनौबत दिले जात. वेगवेगळ्या तटांवरचे पहारे, वेगवेगळ्या माची व किल्ल्यावरील मोक्याच्या जागांच्या पहाऱ्यांची व्यवस्था पाहाण्याचे काम तटसरनौबत यास करावे लागे.[८१] तटसरनोबत यांचीही बदली केली जात असे.[८२] सरनोबत, तटसरनौबत यांनासुद्धा चाकर, सेवक, दिवटी नेमून दिली जात असे. किल्ल्याच्या संरक्षणासाठी जागता पहारा अत्यंत आवश्यक होता. ही कामे हवालदार, सरनोबत व इतर अधिकाऱ्यांना करावी लागत.

सरनोबताच्या हाताखाली तटसरनोबत, सरनाईक, नाईक हे दुय्यम दर्जाचे अधिकारी काम करत. सरनौबत व इतर अधिकाऱ्यांच्या मदतीला दहा सैनिकांची एक तुकडी (दाहिजा) देत. त्यापैकी एक नाईक (प्रमुख) इतर नऊजण सैनिक (पाईक) असत.[८३] स्वत: शिवाजी महाराज हे पारखून नाईक व पाईक ठेवत. किल्ल्याचे महत्व व आकार तसेच परिस्थिती पाहून किल्ल्यावर शिबंदी ठेवली जात असे.[८४] शिबंदीमध्ये बंदुका, भालाईत, पट्टेकरी, किरकोळ शस्त्रधारी, तलवारी, धनुष्यबाण वापरणारे सैन्य असे.[८५] बारगीर शिपायांच्या बदल्या केल्या जात. तटसरनौबत, बारगीर, सदर सरनौबत, हवालदार यांना बंदुकी व तोफा चालविण्याचे ज्ञान असावे.[८६] किल्ल्यावरील बंदोबस्ताप्रमाणे त्याच्या पायथ्याच्या प्रदेशाचासुद्धा बंदोबस्त ठेवावा लागे. किल्ल्याच्या तटाखाली प्रत्येक माचीवर मेटे असे. या मेट्यांच्या राखणीचे व बंदोबस्ताचे काम मेटकऱ्यांकडे असे. ते आपल्या चौक्यांवर हजर राहून आसपास शत्रूच्या हालचालींवर नजर ठेवत. आजुबाजूचे रान राखत. शत्रूला चुकीचा रस्ता सांगून चकवत. त्यांना किल्ल्याच्या पायथ्याच्या सर्व बातम्या किल्ल्यावरील अधिकाऱ्यांना कळवाव्या लागत.

किल्ल्याच्या तटबंदीच्या रक्षणासाठी रामोशी, भिल्ल व इतर भटक्या, जंगली जमातीतील लोकांना नेमले जात असे. ते जंगलात रहात असल्याने तसेच निशाचर असल्याने रात्रीचे उत्तम पहारेकरी म्हणून विशेषत: टेहेळणी करण्यात तरबेज असत. छ. शिवाजी हा पहिला सार्वभौम

राजा होता की ज्याने प्रथमच किल्ल्याचे पहारेकरी म्हणून रामोशांना नेमले. त्यांनीसुद्धा मनापासून स्वामीनिष्ठेने आपले कर्तव्य बजावले. शिवाजी महाराजांच्या नंतरच्या काळात रामोशी, भिल्ल आणि कोळी यांना वतने देण्यात आली. किल्ल्याचे संरक्षण व इतर संरक्षणाशी संबंधित कामे ही त्यांची वंशपरंपरागत कर्तव्ये मानली गेली.[८७] तटाबाहेरील बंदोबस्ताचे काम रामोशी जातींच्या लोकांबरोबर महार जातीतील लोकांकडे सोपविले होते. आसपासच्या प्रदेशातील चोऱ्या थांबविण्यासाठी किल्ल्यावरील बेरडावर त्या प्रदेशाची जबाबदारी सोपवली.[८८]

हवालदारास शक्यतो १२५ ते १५० होन वार्षिक पगार दिला जात असे. त्यातील २५ होन त्याच्या वैयक्तिक (खाशा) चाकरांसाठी होते.[८९] त्याच्या हाताखालील मुजुमदाराची तैनात वार्षिक ३६ होन होती. याच ठिकाणी चार तटसरनौबतांना प्रत्येकी वार्षिक तैनात बारा होन देऊन कोट उटळूरच्या तटबंदीचा भार घेण्यासाठी पाठविले व ७ बारगिरांना प्रत्येकी ९ होन देऊन तेथेच नेमले.[९०] २६ जुलै १६७७ च्या एका सरकारी पत्रात वर्धनगड किल्ल्यावर तिमाजी नारायण यास दरमहा तीन होन तैनात देऊन नेमले.[९१]

किल्ला ज्याप्रकारचा, डोंगरी, भुईकोट, जलदुर्ग असेल त्याप्रमाणे त्याच्या पहाऱ्याच्या व्यवस्थेत बदल होत. जलदुर्गांमधील अंतर्गत व्यवस्था थोडी वेगळी असे. तेथे आरमारी लढवय्याना योग्य स्थान व अधिकार दिला जाई. किल्ल्यांचा आकार व त्यावरील शिबंदीच्या गरजेप्रमाणे त्यावर ब्राम्हण, ज्योतिषी, मांत्रिक, शस्त्रवैद्य, जखमा बांधणारे, लोहार, सुतार, वडारी, चांभार यांची पदे निर्माण करत व आवश्यकतेप्रमाणे त्यांच्याकडून काम करून घेतले जाई.

किल्ल्यावर माणसे नेमताना अनेक प्रकारची काळजी घेतली जात असे. प्रामाणिकपणा त्याची स्वामीनिष्ठा, पराक्रम पारखूनच त्यांची नेमणूक किल्ल्यावर केली जात असे. चंचल, चोरटे, खुनी, विक्षिप्त, दारुडे, कैफी, भांग पिणारे, नशाखोर, फितबखोर लोक किल्ल्यावर नेमू नयेत असा सल्ला अमात्य देतात. किल्ल्याच्या पायथ्याच्या प्रदेशातील देशमुख, पाटील, कुलकर्णी, चौगुले अशी वंशपरंपरागत मिळकत व वतन असलेल्या लोकांना त्यांच्या वतनापासून पाच, दहा गावे दूर असलेल्या किल्ल्यांवर नेमावे कारण ते वारंवार घरी जातील, वतनाच्या आशेने फितुर होतील म्हणून किल्ल्याजवळचे लोक त्याच किल्ल्यावर नेमले जात नसत.[९२] किल्ल्यांशी दगाफटका करणारांना कठोर शिक्षा दिल्या जात. त्यांच्या बेईमानीचा संशय आल्यास त्याला नोकरीवरुन काढून टाकावे. भाऊ–भाऊ जवळच्या किल्ल्यावर अधिकारी

म्हणून नेमले जात नसत.[९३]

## किल्ल्यांचे बांधकाम

शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या बांधकामास व संरक्षणास खुप महत्व दिले होते. महाराष्ट्रात शिलाहार राजे, संगमेश्वरचा राजा जाखुराय यांनी किल्ल्यांचा उपयोग राज्यरक्षणासाठी केला होता. शिवपूर्वकाळापासूनच महाराष्ट्रात किल्लेबांधणीच्या तंत्रात विकास झाला होता. परंतु शिवकाळात किल्ल्याच्या बांधकामाची विशिष्ट शैली विकसित झाली. राजांनी हिरोजी इंदुलकर यांच्यासारख्या स्थपतीचा (अभियंता) उपयोग किल्लेबांधणीत करुन घेतला. शिवाजी महाराजांनी किल्ले बांधल्याचे, संरक्षणात्मक दृष्टीकोनातून दुरुस्त केल्याचे अनेक समकालीन पुरावे मिळतात. महाराजांनी कल्याणापासून राजापूरपर्यंत कोकण घेतले. किल्ले कोट घेऊन बंदोबस्त केला.[९४] गडकोट नवे बांधिले राजापुरानजीक उंच डोंगर बाळा राजा नामे होता तो घेऊन त्याजवर गड बांधोन कुलदेश काबीज केला आणि आपली ठाणी बसविली.[९५] जो जो देश स्वशासनवश न होय त्या त्या देशी स्थलविशेष पाहून गड बांधिले, तसेच जलदुर्ग बांधिले.[९६] छ. शिवाजी महाराजांच्या बेटांवरील किल्ल्याचे विशेष उल्लेखनीय उदाहरण म्हणजे सुवर्णदुर्ग किंवा सोनगड. त्याच्या प्रचंड भिंती थेट समुद्रातून वर येतात. तटबंदीचा बराचसा भाग भक्कम खडक फोडून तयार केला आहे. बाकीचा भाग दहा बारा चौरस फुटाच्या मोठ–मोठ्या चिऱ्यांनी बांधला आहे. मोठ्या शिबंदीला पुरेसी गोड पाण्याची व्यवस्था त्याच्या वर केली आहे.[९७]

इ.स. १६७२ मध्ये शिवाजी महाराजांनी मुंबई बंदराच्या दक्षिणेस २२ कि.मी. अंतरावर थळ या ठिकाणाच्या समोर, असलेल्या खांदेरी बेटावर किल्ला बांधण्यास सुरुवात केली. इंग्रजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी राजांनी खांदेरी बेटावर हा जलदुर्ग मायनाक भंडारीच्या नेतृत्वाखाली बांधला. ३० मावळे व ३०० मजूर पाठवून तटबंदीचे बांधकाम सुरु केले. शिवाजी महाराजांनी खांदेरी बेटावर किल्ला बांधल्याचा उल्लेख खाफीखानाच्या मुन्तखबल्लबाब या ग्रंथात आहे.[९८] खांदेरीच्या बेटावर किल्ला बांधणे इंग्रजांना अडचणीचे ठरणार होते. त्यामुळे २२ एप्रिल १६७२ च्या इंग्रज पत्रांमध्ये हेन्री–केन्रीवर किल्ला बांधण्याचा शिवाजीचा बेत आहे असे उल्लेख सापडतात.[९९] सुरत कौन्सिलने कंपनीला दि. १८ नोव्हेंबर १६७९ च्या पत्रात खांदेरीच्या बांधकामाविषयी म्हटले आहे. "गेल्या ऑगस्टमध्ये शिवाजीने खांदेरीवर किल्ला बांधण्याकरिता शेकडो माणसांची विविध प्रकारच्या साहित्यासह नेमणूक केली. हा बेत त्याने ताबडतोब व

गुप्तता पाळून अमलात आणला की त्याची दखल घेतली जाण्यापूर्वी त्याने अनेक ठिकाणी छातीइतक्या उंच भिंती आपल्या माणसांच्या रक्षणाकरिता बांधल्या होत्या आणि लहान तोफासुद्धा लावल्या होत्या."[१००] सुवर्णदुर्ग कोणी बांधला याविषयी इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. रत्नागिरी डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरप्रमाणे सुवर्णदुर्ग विजापूरच्या आदिलशहाने १६व्या शतकात बांधला व छ. शिवाजी राजांनी तो मजबुत केला. डाग रजिस्टरमध्ये १७ डिसेंबर १६६४ तारखेच्या नोंदीमध्ये हर्णे या खेड्याच्या समोरील एका बेटावर शिवाजी एक अत्यंत मजबूत किल्ला बांधत आहे असा उल्लेख आहे.[१०१] सुवर्णदुर्गाचे बांधकाम शके १५८५ (इ.स. १६६३-१६६४) मध्ये झाले अशी एक नोंद आहे.[१०२] सिद्दीला शह देण्यासाठी प्रभावळी मामल्यामध्ये शिवाजी राजांनी भक्कम पद्मदुर्ग बांधला त्याच्याबद्दल स्वत: शिवाजी राजेच म्हणतात, पद्मदूर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहेत.[१०३] शिवाजी राजांनी शृंगारपुराजवळ प्रचितगड आणि दापोलीजवळ पालगड व मंडणगड हे नवे किल्ले बांधले.[१०४] तर शिवभारतकार कवी परमानन्दच्या मते समर्थ व प्रसिद्ध अशा चिरदुर्ग या गडाच्या माथ्यावर शिवाजीने कारागिरांकडून सभोवार उंच तट बांधविले.[१०५] छ. शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग हा महत्वाचा सागरी किल्ला बांधला. छ. शिवाजी महाराजांनी सिंधुदुर्ग बांधण्याचा मुहूर्त १४ जमादिलावल, शुहूर सन खमस सितैन (अलाम), मार्गशीर्ष वद्य २ या दिवशी झाल्याचा उल्लेख व इ.स. १७२१च्या एका पत्रात आहे.[१०६] परंतु गजानन मेहेंदळे यांच्या मते या पत्रातातील इस्लामी कालगणनेनुसार दिलेली तारीख २३ नोव्हेंबर १६६४ या तारखेशी जुळते त्या दिवशी मार्गशीर्ष पौर्णिमा ही तिथी होती. मार्गशीर्ष वद्य २ नव्हती, पण उपरोक्त पत्रावरुन सिंधुदुर्ग बांधण्यास सुरुवात झाली हे निश्चित.[१०७] चित्रगुप्त बखरीमध्ये सिंधुदुर्ग किल्ल्याच्या बांधकामाचे सविस्तर वर्णन दिले आहे. हा किल्ला कुरटे बेटावर आहे. त्यांना मालवणजवळचे कुरटे बेट पसंत पडले. चौऱ्याएंशी बंदरी ऐसा जागा दुसरा नाही हे जाणून त्यांनी तानाजी, मानाजी, गंगाजी व सावजी कोळी यांना या बेटाचे निरिक्षण, समुद्राकडून त्या बेटाकडे जाणाऱ्या सुरक्षित मार्गाने परीक्षण करण्यास पाठविले. या सर्वांनी जीवाची तमा न करता आपले काम चोख बजावले. ५०० पाथरवट, २०० लोहार, १०० गोवेकर पोर्तुगीज कारागीर, ३००० मजूर सतत ३ वर्ष या किल्ल्याच्या बांधकामासाठी झटले.[१०८] शिवाजी राजांनी दमणजवळ पारनेर नावच्या टेकडीवर तटबंदी केली. त्यानंतर रामनगरच्या कोळी राजाचा बिमोड करुन पिंडवोल टेकडीवर मजबूत

किल्ला बांधला.[१०९] नव्या किल्ल्याच्या बांधकामाबरोबरच अनेक किल्ल्यांची दुरुस्ती, त्यावर नवे बांधकाम करुन छ. शिवाजी ते मजबूत करत. महत्वाच्या किल्ल्यांची दुरुस्ती करण्यासाठी एक लाख पंचाहत्तर हजार होन रक्कम बाजूला ठेवण्यात आली. कामगारांना नियमित मजूरी मिळाली नाही तर ते असंतुष्ट होतात व काम व्यवस्थित होत नाही म्हणून ही रक्कम खास बाजूला ठेवण्यात आली. शिवाजी महाराजांनी कर्नाटकातील जिंजी किल्ल्याची पुन्हा दुरुस्ती केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरुज इतक्या कुशलतेने बांधले की हे काम भारतीयांचे नसून युरोपियनांचे आहे असे वाटते.[११०] दुर्गरचनेत सरसकटपणे कमानींचा वापर करण्यास सुरुवात झाली.[१११]

शिवाजी महाराजांनी केलेली किल्ल्यांची दुरुस्ती ही कोणत्याही इंजिनिअरपेक्षा त्यांना अधिक ज्ञात होती. त्यांच्या या गुणाबद्दल फ्रेंच संशोधक ॲबे कॅरे याचे पुढील गौरवोद्गार काढले आहेत. “He (Shivaji) had studied with extreme care everything about the duties of a general soldier above all the art of fortification which he understood was, better than the ablest engineers”[११२]

शिवाजी महाराजांच्या किल्ले बांधणीस एक समान सूत्र दिसते. किल्ले बांधताना महाराजांनी डोंगराच्या सोंडाकडे किंवा जमिनीचे भूशीर असेल तेथे भक्कम अभेद्य तटबंदी उभारली. भक्कम मजबूत बुरुज बांधले होते. किल्ल्याला शक्यतो एकच मुख्य प्रवेशद्वार असे. प्रवेशद्वार म्हणजे गडावरील सर्वात बळकट व मोक्याचे ठिकाण होते. तेथे संरक्षणव्यवस्था, शिंबदी अधिकच बळकट वैशिष्ट्यपूर्ण असे.[११३] शिवाजी महाराजांच्या गड किल्ल्याचे लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर हनुमानाची मूर्ती कोरलेली असे.[११४] रामचंद्रपंत अमात्य यांनी किल्ल्याचे बांधकाम करताना कोणती काळजी घ्यावी ते सांगितले आहे. किल्ल्याजवळ उंच डोंगर असू नये असेलच तो किल्ल्याच्या माराच्या टप्प्यात आणावा. सर्व बांधकाम एकदम मजबूत, चूने गच्ची अजिबात फट राहणार नाही असे बांधावे. तट, बुरुज, पहाऱ्याच्या जागा, पडकोट, प्रवेशद्वार मजबूत बांधावे. प्रवेशद्वाराच्या पुढे शत्रुचा मारा चुकविण्यासाठी बुरुज बांधावेत. दोन, तीन दरवाजे, चोरवाटा, चोरदरवाजे, खंदक, जंग्या, पाण्याचे तलाव, तळी, विहिरी, राजमंदिर कचेरी, अंबरखाना, दारुखाना, टप्पेगुजर (तोफा चढविण्याचे उंचवटे), अधिकाऱ्यांची घरे, कैदखाना, राण्यांचे महाल असे अनेक प्रकारचे

बांधकाम किल्ल्यावर केले जात असे.

## गनिमीकावा युद्धतंत्राचा विकास –

गनिमी काव्याच्या युद्धतंत्राचे उल्लेख आपल्याला शिवपूर्वकाळापासून मिळतात. आंबेजोगाई येथे १६व्या शतकात (इ.स. १५५१ ते १६१५) दासोपंत हे दत्तसंप्रदायाचे संत होऊन गेले. त्यांनी गीतार्णव या आपल्या काव्यात राजनीतीवर सविस्तर चर्चा केली आहे. त्यामध्ये त्यांनी मायायुद्धाची चर्चा केली आहे. हे मायायुद्धशास्त्र शिवाजीराजांच्या गनिमी काव्याच्या युद्धाशी खुप मिळतेजुळते आहे. आपल्यापेक्षा समर्थ शत्रु असेल तर त्यावेळी मायायुद्ध करावे. हे युद्ध, दुर्ग, पर्वत, अवघड स्थानांच्या आश्रयाने लढावे. सैन्यास चूकीच्या दिशेला चकवावे व उरलेल्या सैन्यावर नेटाने हल्ला करावा. शत्रुसैन्य पुन्हा एकत्र झाले, वाढले की त्याच्यासमोर युद्धासाठी उभे न राहता लपावे. शत्रुसैन्यावर हल्ला करावा व वेगाने निसटून जावे. शत्रु बेसावध असताना आपण सावध राहून हल्ला करावा. शत्रुसैन्याला अडवावे, त्यांची फाटाफुट करावी व त्यांच्यावर हल्ला करावा अन पळून जावे. अशाप्रकारे समोरासमोरील युद्धापेक्षा मायायुद्धाचेच शौर्य जास्त आहे.[११५] शिवाजी महाराजांनी या युद्धपद्धतीमध्ये नवी भर घातली. या युद्धपद्धतीने व किल्ल्याच्या साखळ्या तयार करुन स्वराज्य स्थापना व राज्यविस्तार केला. शिवाजी महाराज व त्यांच्या मावळे सरदारांनी गनिमी काव्याचे उर्फ माया युद्धाचे तंत्र विकसित केले. या युद्धतंत्राने सर्व पातशाह्या मोगल बादशहाला मराठ्यांनी सळो की पळो करुन सोडले. पंचवीस वर्षे दक्षिणेत ठाण मांडूनही, सर्व शक्ती पणाला लावूनसुद्धा औरंगजेब शिवरायांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांवर निर्णायक विजय मिळवू शकला नाही.

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रातील भौगोलिक परिस्थिती व संरक्षण व्यवस्था यांच्यामध्ये समन्वय घडवून आणला. यासाठी त्यांनी किल्ल्यांची यंत्रणा संघटित केली. सर्व प्रकारच्या किल्ल्यांचे लष्करीदृष्ट्या एक वर्चस्वस्थान/शक्तिस्थान म्हणून आगळेच महत्व असते. किल्ल्यांचा वापर तीन प्रकारे होतो. १) आजूबाजूच्या शंभर मैलांवर जागता पहारा ठेवण्यासाठी एक संरक्षित ठाणे म्हणून. २) या संरक्षण ठाण्यामध्ये शिबंदी, धान्यरसद, पाणीसाठा, दारुगोळा, युद्धोपयोगी इतर साहित्य साठविण्याचे एक भांडार, युद्धागार म्हणून. ३) पुरवठा वाहिनी (Lines & Communication) अखंडित ठेवण्यासाठी संपर्कबिंदू (contact point) म्हणून. युद्धभूमीचे क्षेत्र व व्याप वाढत गेल्यानंतर पुरवठावाहिनी लांबत जाते. किल्ल्यांसारखा

संपर्कबिंदू नसेल तर अशावेळी शत्रूच्या अचानक हल्ल्यामुळे पुरवठावाहिनी खंडित होऊन युद्ध करणाऱ्या सैन्याची रसद तुटण्याचा धोका असतो. यामुळेच शिवाजी राजांनी स्वराज्य स्थापनेपासूनच जुन्या किल्ल्यांवर ताबा व त्यांची दुरुस्ती, मोक्याच्या जागी नवे किल्ले बांधणे यांच्याकडे अधिक लक्ष दिले.

बहामनी, यादव, आदिलशहा व स्थानिक राजे यांनी किल्ल्यांचा उपयोग आपापल्या साम्राज्याच्या रक्षणासाठी केला. किल्ले भेदणे हे या युद्धांचे मुख्य सुत्र राहिले. छ. शिवरायांनी तर महाराष्ट्रातील भौगोलिक स्थिती व स्वराज्याच्या संरक्षण व संघटनामध्ये किल्ल्यांची व्यवस्था निर्माण केली. इ.स. १८१७ मध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्याने इंग्रजांशी लढण्यासाठी किल्ल्यांची पूर्ण तयारी केली. दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या पाडावानंतरही इंग्रजांना एक एक किल्ला लढवून घ्यावा लागला.[११६]

## निष्कर्ष –

महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. उत्तर प्लायस्टोसीन (२५००० ते १०००० वर्षांपूर्वी) कालखंडामध्ये नद्यांच्या काठावर गाळ साचला. या कालखंडातील मानवी वसाहतीस पोषक हवामान निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये ज्वालामुखीय उद्रेकामुळे दख्खनचे पठार व जांभ्या खडकाची निर्मिती झाली. भूगर्भातील विवर्तनिकीमुळे दख्खनचे पठार उचलले जाऊन सह्याद्री पर्वताची निर्मिती झाली. या भौगोलिक घडामोडींचा व त्यातून निर्माण झालेल्या दख्खनचे पठार, जांभा खडक व सह्याद्री पर्वतरांगा या घटकांच्या निर्मितीचा महाराष्ट्राच्या इतिहासावर दुरगामी परिणाम पडलेला दिसतो.

महाराष्ट्रामध्ये चिरकी–नेवासा येथे एका खड्ड्यामध्ये बेसाल्टच्या मोठमोठ्या शिळा अर्धवर्तुळाकार स्वरुपामध्ये मुद्दाम रचून ठेवलेल्या आढळतात. हा काळ एक ते दीड लाख वर्षापूर्वीचा आहे. पण खऱ्या अर्थाने बांधलेल्या बुरुजयुक्त भक्कम तटबंदी इनामगाव येथील जोर्वे वसाहतीला आहे. याचा काळ इ.पू. १५०० आहे. म्हणून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये दुर्गबांधणीची सुरुवात याच काळापासून झाली.

शिलाहार राजा भोज, संगमेश्वरचा जाखुराय यांनी महाराष्ट्रातील याच दुर्गमतेचा उपयोग करुन घेत अनेक किल्ले बांधले. या राज्यकर्त्यांनी या किल्ल्यांच्या आधारावर आपली साम्राज्ये जतन केली.

सोळाव्या, सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रावर बलाढ्य मोगल बादशहा व आदिलशाहचे वर्चस्व होते. पण येथील डोंगर, दऱ्या–खोऱ्यांचा दुर्गम प्रदेश व दळणवळणाची अपुरी साधने यामुळे महाराष्ट्र मोगल किंवा आदिलशही साम्राज्याच्या इतर प्रदेशाशी घट्ट जोडला गेला नाही. यामुळे बादशहा किंवा आदिलशाही यांचे प्रभावी व दीर्घकाळ नियंत्रण या प्रदेशावर रहात नसे. त्यांच्या साम्राज्यातील हा प्रदेश थोडा अलगच पडत असे. याच पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांनी एतद्देशीयांचे विशाल साम्राज्य निर्माण केले. त्यांनी या किल्ल्यांच्या आधारे मोगल बादशहासारख्या अत्यंत समर्थ शत्रूला यशस्वी प्रतिकार केला. त्यांच्या या महान कार्यामध्ये महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा सिंहाचा वाटा आहे.

महाराष्ट्राची भौगोलिक रचना व किल्ल्यांचे स्थान व संख्या यांच्यामध्ये परस्पर आंतरसंबंध आहेत. या भौगोलिक रचनेचा महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या स्थान व बांधणीवर खूप मोठा प्रभाव आहे. दख्खन पठार हे किल्ले बांधणीस उपयुक्त नव्हते. पश्चिम घाट व कोकण हा प्रदेश किल्ल्यांच्या बांधणीस पोषक असल्याने तेथे आधिक किल्ले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या दाट व जंगलयुक्त व उंच डोंगराळ प्रदेशाने किल्ल्यांसाठी नैसर्गिक संरक्षण पुरवले. कोकणच्या प्रादेशिक विस्तारामध्ये एका बाजूला सह्याद्रीच्या पर्वतरांगा, दुसरीकडे अरबी समुद्र, बेटे, समुद्रापर्यंत घुसलेले डोंगर सुळके यांनी गिरीदुर्ग, खाडी मुखाशी व बेटातील जलदुर्ग उभारण्यास अत्यंत मोक्याच्या जागा पुरविल्या. त्याचा मराठा राज्यकर्त्यांनी विशेषतः छ. शिवाजी महाराजांनी अचूक उपयोग करुन घेतला. या किल्ल्यांनी स्वराज्य जतन व दृढ करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हे दक्षिण कोकणमध्ये आहेत. आदिलशाह व मोगल बादशहा यांनी सुरुवातीला या प्रदेशाकडे दुर्लक्ष केले. दुर्गम सह्याद्री व समुद्रापलिकडे प्रत्यक्ष वर्चस्व निर्माण करण्याचे मानसिक सामर्थ्य त्यांच्यामध्ये नव्हते. रत्नागिरी जिल्ह्याला बाह्य आक्रमणाचा धोका कमी होता. आक्रमकाला महाराष्ट्राचा इतर प्रदेशच नव्हे तर भक्कम सह्याद्रीही पार करावा लागे. आदिलशहा व मोगल बादशहा यांचे आरमारी सामर्थ्याकडे दुर्लक्ष होते. आदिलशहाने या प्रदेशामध्ये आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून सत्ता राबविली. पोर्तूगीज व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले. त्यांची राजकीय वर्चस्व निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा होती. व्यापार व राजकीय वर्चस्वासाठी त्यांनी गोवा व कोकणामध्ये शक्य तो प्रदेश व किल्ले जिंकले. त्यांनी

स्वतःचे आरमार व आरमारी किल्ले उभारले. स्थानिक राज्यकर्त्यांना प्रलोभने, लष्करी दबाव अशा विविध मार्गांनी ही सागरी सत्ता पोर्तूगीजांनी वाढविली. पोर्तूगीजांपाठोपाठ इंग्रजांनी हाच मार्ग अनुसरला. परकीयांचा हा धोका छ. शिवाजी महाराजांनी द्रष्टेपणाने जाणला. त्यांनी कोकणातील इतर प्रदेशासह रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गिरीदुर्गांबरोबर सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, जयदुर्ग, अंजनवेल, बाणकोट यासारखे आरमारी किल्ले ताब्यात ठेवले. या किल्ल्यांच्या आधाराने आरमारी सामर्थ्य वाढविले.

छ. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा पुरेपूर फायदा घेत किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण केल्या. त्यांच्या मदतीने जलद लष्करी हालचाली केल्या. त्यांनी महाराष्ट्राच्या भौगोलिकतेचा अचूक फायदा घेत गनिमी कावा युद्धतंत्राचा विकास केला. शिवरायांनी समुद्र व सह्याद्री यांचे नैसर्गिक संरक्षण लाभलेल्या कोकण किनारपट्टीवर वर्चस्व ठेवले. त्यामुळे त्यांना व्यापारावर नियंत्रण व आरमारी सामर्थ्य मिळविणे शक्य झाले.

शिवोत्तर काळातील राज्यकर्त्यांनी सुद्धा याच किल्ल्यांच्या आश्रयाने मोगल बादशहा औरंगजेब याच्याशी झुंज दिली. त्यामुळेच औरंगजेबसारखा मोगल बादशहा पंचवीस वर्षे सर्व लवाजमा व विशाल सैन्यासह महाराष्ट्रात ठाण मांडून बसला तरी त्याला मराठ्यांवर निर्णायक विजय मिळविता आला नाही. शिवकाळातील राजगड व नंतरची रायगड या राजधान्या त्यांच्या विशिष्ट भौगोलिक स्थान व दुर्गमतेमुळे समकालीन साम्राज्याच्या गरजा पूर्ण करणाऱ्या होत्या. सतराव्या शतकातील मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी मराठ्यांनी लढविलेले लष्करी डावपेच व युद्धतंत्र महाराष्ट्रातील भूरचनेशी सुसंगत होते. महाराष्ट्रामध्ये विकसित झालेल्या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा मुख्य आधार महाराष्ट्राची दुर्गमता हीच होती.

सह्याद्रीच्या दुर्गम पर्वतरांगा, अरबी समुद्राचे सानिध्य यांचे लष्करी डावपेचांमधील महत्त्व फक्त शिवाजी महाराजांनाच जाणवले. त्यांनी अनेक जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती व काही नवे किल्ले या प्रदेशात बांधले. त्यांनी जाणीवपूर्वक अशा किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण केल्या. त्यांच्या या द्रष्टेपणामुळेच स्वराज्याला दीर्घकाळ संरक्षण पुरवले.

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये किल्ले बांधण्यास योग्य अशा सर्व ठिकाणी किल्ले बांधले. आधीच दुर्गम ठिकाणी असलेल्या किल्ल्यांवर विशिष्ट प्रकारचे बांधकाम करुन ते अधिकच दुर्गम केले. शिवरायांनी युद्धप्रसंगी आक्रमण व वेळ पडल्यास स्वसंरक्षण करण्यास

उपयुक्त असे बांधकाम किल्ल्यांवर केले. तसेच किल्ल्यांवर खास झाडे राखली. इतर अनेक शस्त्रांबरोबर किल्ल्यांवरुन दगडांचा मारा करुन शत्रूला हतबल करण्याचा मार्ग आश्चर्यकारक आहे. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचे स्वराज्यातील राजकीय, लष्करी, आर्थिक व प्रशासकीय महत्त्व ओळखून त्यांच्या दुरुस्तीवर व बांधकामावर सढळ हाताने खर्च केला. किल्ल्यांच्या बांधकामासाठी खास स्थपती, त्याचे सहाय्यक व कारागिर पदरी बाळगले. एवढेच नव्हे तर इमारती हवालदार हे पद नव्याने निर्माण केले. किल्ले बांधताना जवळपास उंच डोंगर मोकळा ठेवला नाही. बंडखोरी टाळण्यासाठी किल्ल्याबाहेर पायथ्याशी गढी अगर तटबंदीयुक्त निवासस्थान बांधू दिले नाही. जुन्या गढ्या पाडून टाकल्या. हे किल्लेकोट त्यांनी वतनदारांच्या ताब्यामध्ये ठेवले नाहीत.

किल्ल्यावरील प्रशासनामध्ये एकाधिकारशाहीचा व फितुरीचा धोका टाळण्यासाठी परस्परांवर नियंत्रण ठेवणारे हवालदार, सबनीस व कारखानीस असे तीन समान दर्जाचे मुख्य अधिकारी नेमले. अपवाद वगळता ही पदे विशिष्ट जातीतील लोकांनाच दिली. याशिवाय संरक्षणासाठी श्रेणीबद्ध असे. सरनौबत, तटसरनौबत, सदर सरनौबत, सरनाईक, नाईक, रजपूत याशिवाय आडहत्यारी (किरकोळ शस्त्रधारी), सांगवाले (भालाईत) व बरचीवाले हे सुद्धा नेमले जात. बारगीर, पटवारी, मेटकरी हे अधिकारी असत. इतर अधिकाऱ्यांमध्ये गडणवीस, तटणीस, कोटणीस, रख्तवान, दिवाणी, मुजूमदार, फडणीस, पोतनीस, चिटणीस, सरकारकून, कारकून हे अधिकारी असत. किल्ल्याजवळच्या प्रदेशामध्ये वंशपरंपरेने आलेली मिळकत किंवा अधिकार असतील त्यांना त्या किल्ल्यावर नेमले नाही. फितूरी होऊ नये म्हणून सर्वतोपरी काळजी छ. शिवाजी महाराजांनी घेतली. किल्ल्यातील सर्व अधिकाऱ्यांना संरक्षणाच्या दृष्टीने कडक नियम घालून दिले. नियमांची अंमलबजावणी काटेकोर होते का याची स्वतः खात्री करुन घेतली. नियम पाळणाऱ्या अधिकाऱ्यांना वेतनवाढ, पदोन्नती व बक्षिसे देऊन प्रोत्साहित केले.

मराठा राज्यामधील हे किल्ले लष्करी दृष्टीने उपयोगी होते पण त्याचबरोबर ते राजकीय व प्रशासकीय केंद्र म्हणून काम करत. त्याचबरोबर किल्ला हे किल्ल्याखालील प्रदेशावर सामाजिक नियंत्रणाचे काम करत. राजाच्या आज्ञा व कायद्यांची अंमलबजावणी किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांमार्फत केली जात असत. किल्ल्याखालील लोकांच्या घराचे, मालमत्तेचे, उदरनिर्वाह

व जीविताचे संरक्षण करण्याची जबाबदारी किल्ल्यावर असे. किल्ल्यांनी पुरविलेल्या संरक्षणावरच तेथील जनतेच्या उदरनिर्वाह व जीविताचे संरक्षण अवलंबून होते. किल्ले हे राजाच्या सत्ता, सामर्थ्य व प्रतिष्ठेचे प्रतिक होते. किल्लेदार हा राजाच्या वतीने त्या परिसरात कायद्याची अंमलबजावणी व शांतता, सुव्यवस्था राखत असे. त्यामुळे  राजापेक्षा तेथील जनतेची निष्ठा किल्लेदारावर अधिक असे. याचा परिणाम शिवोत्तर काळामध्ये किल्ल्याच्या रुपात अनेक स्वतंत्र सत्ताकेंद्रांच्या उदयामध्ये झाला. दुर्बळ राज्यकर्त्यांच्या काळामध्ये ही सत्ताकेंद्रे अधिक सक्रीय झाले.

## संदर्भ


१) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश, खंड ३, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ प्रकाशन, मुंबई, दु. आ., २०००, पृ. ९५९

२) जोशी पं. महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खंड २, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, दु. आ., १९८५, पृ. ३५५

३) मराठे रामचंद्र विनायक (कोशकार), स्थापत्य शिल्पकोश साहित्य आणि संस्कृति मंडळ, महाराष्ट्र राज्य, १९६५, पृ. १०६

४) Mairi Robinson(Edt.), Chambers 21st Century Dictionary, New Delhi, Allied Publishers, (Revised Edition\ reprinted in 2008), P. 52

* Dhongde Ramesh V.(Edt.), Oxford English – English – Marathe Dictionary, Oxford Unty Press, New Delhi, 2009, P. 556

* Dorling Kindersley(Edt.), Illustrated Oxford Dictionary, Dorling Kindersley Iimited & Oxford Unty Press, Delhi, (Revised & Updated Edition, 2003), P. 317, 318

५) आपटे वा. गो.(संपा.), मराठी शब्दरत्नाकर, ढवळे प्रकाशन, मुंबई, १९९५, पृ. १०४.

⁕ भाटवडेकर मो. वि.(संपा.), राजहंस व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश, राजहंस प्रकाशन, पुणे, २००७, पृ. १६१

६) भाषा संचलनालय, महाराष्ट्र शासन, शासन व्यवहार शब्दावली (मराठी–इंग्रजी), भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २००५, पृ. १०९

७) वर्मा रामचंद्र(संपा.), प्रामाणिक हिन्दी कोश, साहित्य कुटीर, साहित्य रत्न–माला कार्यालय, १९३०, पृ. २५५, ६१८

⁕ भावे ह.अ.(संपा.), हिंदी मराठी शब्दकोश, वरदा प्रकाशन, पुणे, १९९८, पृ.२१७, ३५७

⁕ जोशी श्रीपाद(संपा.), अभिनव शब्दकोश, (हिंदी–मराठी–हिंदी, मराठी हिंदी), शुभदा – सारस्वत प्रकाशन, पुणे, २०००, पृ. ३६

⁕ दाते यशवंत रामकृष्ण(संपा.), सुलभ हिन्दी – मराठी कोश, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन, मुंबई, १९९६, पृ. १४७

८) सावंत बी.बी., साळुंखे टी.डी., ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९२, पृ. ८७

९) गद्रे प्रभाकर, भारतातील इतिहासप्रसिद्ध किल्ले, अखिल महाराष्ट्र इतिहासप्रसिद्ध किल्ले, अधिवेशन १ ले, निबंधसंग्रह, १९९२, पृ. २

१०) कित्ता, पृ.३

११) झा द्विजेंद्रनारायण, श्रीमाली कृष्णमोहन(संपा.), प्राचीन भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्विय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, १९८४, पृ. ८६

१२) कोसंबी डी.डी., इन्ट्रॉडक्शन टु स्टडी ऑफ इंडियन हिस्ट्री, अनुवादित डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पृ. ५८

१३) खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र्यं., चिटणीस कृ. ना.(संपा.), त्रैमासिक : वर्ष ६२, अंक १–४, शक १९०५–०६, (महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे, १९८३ : निबंधसंग्रह), १९८४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९८४, पृ. ४८, ५२

१४) कित्ता, पृ. ४०

१५) दिक्षितार व्ही. आर. रामचंद्र, वॉर इन ॲन्शिअंट इंडिया, पृ. २५०

१६) शर्मा रामशरण, एन्शंट इंडिया, अनुवादित, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. १२१

१७) थापर रोमिला, दि पेंग्वीन हिस्ट्री ऑफ अर्लि इंडिया, अनुवादित, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. १६९

१८) कित्ता, पृ. १९१

१९) मुखर्जी राधाकुमुद, चंद्रगुप्त मौर्य और उसका काल, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, २००७, पृ. २६७

२०) कोसंबी डी. डी., उपरोक्त, पृ. २०२

२१) कंगले र. पा.(संपा.), कौटिलियम अर्थशास्त्रम्, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९५, पृ. ७

२२) कित्ता, पृ. ७२ ते ७६

२३) सिंग उपिंद्र, अ हिस्ट्री ऑफ ॲन्शिअंट अँड अर्लि मेडिव्हल इंडिया फ्रॉम स्टोन एज टु द व्हेल्थ सेंच्यूरी, इ. बुक, न्यु. दिल्ली, पृ. ३३८

२४) कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६, पृ. ३१४

२५) थापर रोमिला, उपरोक्त, पृ. २४७

२६) शर्मा रामशरण, उपरोक्त, पृ. १९९

२७) कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह.(संपा.), उपरोक्त, पृ. ३१८

२८) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र : इतिहास  प्राचीन काळ खंड १ भाग २, स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दार्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. १७९

२९) नागराजराव एम. एस.(संपा.), दि चालुक्याज ऑफ बदामी : सेमिनार पेपर्स, बंगलोर, मिथिक सोसायटी, १९७८, पृ. ४४

३०) श्रीवास्तव आशिर्वादीलाल, दिल्ली सल्तनत (711 to 1526) शिवलाल अग्रवाल एन्ड के., आगरा, १९५९, पृ. १३,१४

३१) पाठक अरुणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. २६५

३२) हबीब इरफान(संपा.), मध्यकालीन भारत, भाग ३, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, २००२, पृ. २३

३३) वर्मा हरिशचंद्र(संपा.), मध्यकालीन भारत, भाग १, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, ३३ वी आवृत्ती, २००८ पृ. २३०

३४) खोबरेकर वि. गो., कोकणचा राजकीय इतिहास, मुंबई, मराठी ग्रंथ संग्रहालय इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, पु. क्र. २७, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ. २०

३५) ढेरे रा. चिं., जोशी प्र. न.(संपा.), रामचंद्र अमात्य प्रणीत स्वराज्यनीति आज्ञापत्र, वोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., १९६०, पृ. ९१

३६) वेलणकर एच. डी.(संपा.), बुधभूषणम् संभू, भांडारकर प्राच्य संशोधन संस्था, पुणे, १९२६, पृ. २, ३७,३८,३९

३७) आठवले सदाशिव, शिवाजी आणि शिवयुग, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु. आ. १९९२, पृ. ३०

३८) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, तृ. आ. २०१०, १९३५, पृ. १

३९) सवदी ए. बी., कोळेकर पी. एस., भारताचा समग्र भूगोल, खंड १, निराली प्रकाशन, २००९, १२.६

४०) तत्रैव

४१) जनगणना २०११

४२) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, देशमुख प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. ६६

४३) सवदी ए.बी., द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पूनर्मुद्रण २००९, पृ. २०१

४४) पठाण के. जी., मंगनाळे व्ही. एस., संदर्भ महाराष्ट्र, इंटेलेक्च्युअल बुक ब्युरो, भोपाळ, २००५, पृ. २, ३

४५) सवदी ए.बी., उपरोक्त, पृ. २१

४६) पठाण के.जी., मंगनाळे व्ही. एस., उपरोक्त, पृ. ३

४७) सवदी अे. बी., उपरोक्त, पृ. २,६

४८) पाठक अरुणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. ११, १२

४९) इंडियन आर्किओलॉजी : ए रिव्ह्यू, १९७४ –७५ ते १९७८ ७९

* एम. के. ढवळीकर, सेटलमेंट आर्किओलॉजी ऑफ इनामगाव पुरातत्व क्र. ८, १९७५–७६, पृ. ४४ ते ५४

५०) दिवेकर वा. द., कंटक मा. रा.(संपा.), त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, वर्ष ६६, अंक १–४, जुलै १९८७–एप्रिल १९८८, पृ. ४७, ४८

५१) चौहान दे.व्यं., दक्खिनी हिंदीतील इतिहास व इतर लेख, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९७३, पृ. ९४

५२) Balkrishna-Shivaji the great, Vol 2, Modern Pablishers & Distributors, Delhi, 1985, P. 79

५३) हेरवाडकर र.वि.(संपा.), मल्हार रामराव चिटणीस विरचित, श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २०००, पृ. २०६–२१३

५४) साने का.ना.(संपा.), रघुनाथ यादव उर्फ चित्रगुप्त विरचित शिवाजी महाराजांची बखर, काव्येतिहास संग्रह, क्र. २६, १८९३, पृ. १२७

५५) भगत दत्ता(संपा.), कृष्णाजी अनंत सभासदकृत, श्रीशिव छत्रपतींचे चरित्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे, जुलै २००१, पृ. १७०

५६) कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. ९५

५७) नंदुरबारकर पां.रा., दांडेकर ल.का.(संपा.), श्रीशिवदिग्विजय (श्रीशिवाजी महाराजांची बखर), बडोदे, १८७५, पृ. १९०

५८) कुलकर्णी अ.रा.(संपा.), रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र, मानसन्मान प्रकाशन, पुणे, २००४, पृ. १७५

५९) आपटे द. वि., केळकर न. चि.(संपा.), शिवकालीन पत्र सार संग्रह, खंड १, शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, ले. ९८२

६०) कुलकर्णी अ.रा., रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र,पृ. १७७

६१) आपटे द. वि., केळकर न. चि.(संपा.), शिवकालीन पत्रसार संग्रह, खंड १, श्रीशिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, ले. ९८२

६२) Sen S. N., Military System of Marathas, Unty of Calcutta, Calcutta, 1925, P. 95

६३) हेरवाडकर र. वि.(संपा.), उपरोक्त, पृ. ९३

६४) खरे ग. ह., भिडे श्री. र.(संपा.), आज्ञापत्र (मराठेशाहीतील राजनीति), सिटी बुकस्टॉल, पुणे, १९६०, पृ. ६७ ते ७२

६५) हेरवाडकर र. वि.(संपा.), उपरोक्त, पृ. १०५

६६) खरे ग. ह., भिडे श्री. र., आज्ञापत्र, पृ. ६२

६७) हेरवाडकर र. वि.(संपा.), उपरोक्त, पृ.१०६

६८) कित्ता, १४६

६९) कित्ता, १४७

७०) तत्रैव

७१) कुलकर्णी अ. रा.(संपा.), आज्ञापत्र, पृ. १७९

७२) कित्ता, पृ. १८१

७३) हेरवाडकर(संपा.), उपरोक्त, पृ. १०६

७४) कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, पृ. २३७

७५) हेरवाडकर(संपा.), उपरोक्त, पृ. ११५

७६) कित्ता, पृ. १०५

७७) कित्ता, पृ. १०५

७८) Sen S. N., Op. Cit, P. 99

७९) तेंडुलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे,२००९, पृ. ३५

८०) खरे ग. ह., भिडे श्री.र.(संपा.), आज्ञापत्र, पृ. ६३

८१) हेरवाडकर(संपा.), उपरोक्त, पृ. १०६

८२) खरे ग. ह.(संपा.), भिडे श्री.र., आज्ञापत्र, पृ. ६४

८३) हेरवाडकर(संपा.), उपरोक्त, पृ. १०६

८४) तत्रैव

८५) कित्ता, पृ. १०६

८६) खरे ग. ह., भिडे श्री. र.(संपा.), आज्ञापत्र, पृ. ७०

८७) SEN S. N., Op. Cit., P. 105

८८) हेरवाडकर(संपा.), चिटणीस बखर, पृ. ११५

८९) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्याच्या इतिहासची साधने, खंड ८, पृ. २८-३१

९०) SEN S. N. Military System of Marathas, P. 104

९१) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८, पृ. २९

९२) खरे ग. ह., भिडे श्री. र.(संपा.), आज्ञापत्र, पृ. ६४

९३) तत्रैव

९४) हेरवाडकर र. वि.(संपा.), चिटणीस बखर, पृ. ४५

९५) भावे वि. ल.(संपा.), श्रीमंत महाराज भोसले यांची बखर, मराठा दफ्तर संस्था, ठाणे, १९१७, पृ. ७१

९६) खरे ग. ह., भिडे श्री. र.(संपा.), आज्ञापत्र, पृ. ६१

९७) Gazetteer of the Bombay Presidency,Ratnagiri & Sawantvadi Districs, Vol X, Bombay, 1880, P. 758

९८) खरे ग. ह.(संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१, पृ. २२५

९९) बेंद्रे वा. सी.(संपा.), इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, महाराष्ट्रेतिहासाची साधने, विभाग –२, मुंबई, मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६६, पृ. १७६, खंड १, शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३१, पत्र क्र. ३०२

१००) कित्ता, पत्र क्र.४३९

१०१) मेहेंदळे ग. भा., शिंत्रे सं. प्र., शिवछत्रपतींचे आरमार, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०११, पृ. ४०

१०२) राजवाडे वि. का., भट भा. वा.(संपा.), मराठ्यांच्या इतिहाराची साधने, खंड २१, शंकर श्रीकृष्ण देव, धुळे, १९१८, लेखांक ४१, पृ. ७०

१०३) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८, राजवाडे संशोधन मंडळ, २००२, ले. ३१

१०४) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड १, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८, पृ. २०७

१०५) दिवेकर स. म.(संपा.), शिवभारत, अध्याय ३१, पृ. ३१६

१०६) सरदेसाई गो.स., काळे या. मा., वाकसकर वि. स.(संपा.), काव्यतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे लेख, चित्रशाळा प्रेस, पुणे, द्वि. आ., १९३०, पत्र क्र. १३

१०७) मेहेंदळे ग. भा., शिंत्रे सं. प्र., उपरोक्त, पृ. १६६

१०८) साने का. ना. (संपा.), उपरोक्त, पृ. ९१

१०९) Apte B.K., A History of the Merchant Nevy & Merchentship, Stte Board For Literature & Culture, Bombay, 1973, P.23

११०) केळकर न. चि.(संपा.), काळे डी. व्ही., उपरोक्त, पृ. १६३

१११) जोशी शं. ना.(संपा.), श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, शिवकालीन पत्रसार – संग्रह, खंड २, पृ. ५७१

११२) कुलकर्णी अ. रा.(संपा.), उपरोक्त, पृ. ३८८

११३) SEN S. N., Op. Cit, P. 246

११४) खोबरेकर वि. गो., कोकणचा राजकीय इतिहास, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९९७, पृ. ५९

११५) त्रैमासिक, भारत इतिहास संशोधन मंडळ, वर्ष ६६, अंक १–४, १९८७, पृ. ३६

११६) Naire, Rev Alexander, History, of Konkan, Bombay Gazzetteer, Vol I , Part II, Govt. Press, Bombay, P. 74

# प्रकरण दुसरे

# रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले

## प्रस्तावना

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये नऊ तालुके आहेत. या जिल्ह्यातील हापूस आंबा जगप्रसिद्ध आहे. या जिल्ह्यातून काजू व आंबा निर्यात होतो. या जिल्ह्याच्या पश्चिमेस अरबी समुद्र आहे. मध्ययुगीन कालखंडात रत्नागिरी जिल्ह्यातून महाराष्ट्राच्या इतर भागांना व देशातील इतर राज्याना जोडणारे अनेक घाटमार्ग, व्यापारी मार्ग होते. या वैशिष्ट्यामुळे मध्ययुगीन कालखंडात रत्नागिरी जिल्ह्यास व्यापारी व सामरिक महत्व होते. मध्ययुगीन इतिहासात रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांनी महत्वाची व निर्णायक भूमिका बजावली आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या भूवैशिष्ट्यामुळे या जिल्ह्यात अनेक गिरीदुर्ग व जलदूर्ग बांधण्यात आले. मध्ययुगीन राज्यकर्त्यांनी या किल्ल्यांचा उपयोग आपल्या साम्राज्यविस्तार व साम्राज्य संरक्षण त्यामध्ये अचूक करुन घेतला.

रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांच्या संख्येबाबत मतभेद आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ओळख पटलेले व ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख असलेले असे एकूण तीस किल्ले आहेत. त्यापैकी २६ किल्ले व ४ गढ्या आहेत. मंडणगड, हिंमतगड, गोवा, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, सुवर्णदुर्ग, प्रणालकदुर्ग, दाभोळ, पालगड, महिपतगड, सुमारगड, रसाळगड, गोवळकोट, भैरवगड, माणिकदुर्ग, नवते, कासारदुर्ग, विजयगड, अंजनवेल, प्रचितगड, भवानीगड, जयगड, रत्नदुर्ग, पूर्णगड, यशवंतगड, आंबोळगड हे किल्ले व चिपळूण, संगमेश्वर, साठवली व राजापूर या ४ गढ्या आहेत. चिपळूण व संगमेश्वर या गढ्यांचे सध्या कोणतेच अवशेष शिल्लक नाहीत. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा इतिहास समजून घेण्यापूर्वी आपण या जिल्ह्याचे भौगोलिक स्थान व पार्श्वभूमी पाहू या.

## रत्नागिरी जिल्ह्याचे भौगोलिक स्थान

रत्नागिरी जिल्हा हा महाराष्ट्राच्या नैऋत्येस अरबी समुद्रकिनाऱ्यावर वसलेला आहे. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उत्तर–दक्षिण लांबी १८० कि.मी. व पूर्व–पश्चिम विस्तार ६४ कि.मी. आहे.[१]

या जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १६°३० ते १८°४ उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७३°२ ते ७३°५२ पूर्व रेखांश आहे.[२] रत्नागिरी जिल्हा पश्चिम घाट व अरबी समुद्र यामध्ये वसलेला आहे. रत्नागिरी जिल्ह्याच्या पूर्वेला सह्याद्री पर्वतरांगा, त्यामागे सातारा, सांगली व कोल्हापूर हे जिल्हे आहेत. पश्चिमेस अरबी समुद्र आहे. दक्षिणेस सिंधुदुर्ग जिल्हा व उत्तरेस सावित्री नदी व रायगड जिल्हा आहे. १ मे १९८१ मध्ये जुन्या रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन रत्नागिरी व सिंधुदुर्ग अशा दोन जिल्ह्यात झाले. रत्नागिरी जिल्ह्यात मंडणगड, दापोली, खेड, गुहागर, चिपळूण, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा व राजापूर असे एकूण नऊ तालुके आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात उत्तरेस मंडणगड तालुका व दक्षिणेस राजापूर तालुका आहे.

**रत्नागिरी जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी**

रत्नागिरी हा महाराष्ट्र राज्यातील पस्तीस जिल्ह्यांपैकी एक जिल्हा आहे. हा जिल्हा दक्षिण कोकण प्रदेशात आहे. या जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ८,३२६ चौ.कि.मी. असून त्यापैकी ५८.६० टक्के जमीन जंगलाने व्यापलेली आहे.[३] या जिल्ह्याचे सरासरी तापमान ३५० ते १९० सेल्सियस आहे. या जिल्ह्याचे सरासरी पर्जन्यमान ३३० सेमी (२६५८ मी.मी. ते ३९७३ मी.मी.) आहे. या जिल्ह्यातील सर्व नद्या सह्याद्रीच्या पर्वतरांगामध्ये उगम पावून पश्चिमेस अरबी समुद्राला जाऊन मिळतात. शास्त्री, वाशिष्ठी, अंबा, जगबुडी, नळकडी, मुचकुंदी, जोग, काजळी व शुक्र (वाघोटन) या रत्नागिरी जिल्ह्यातील प्रमुख नद्या आहेत.[४] रत्नागिरी जिल्ह्यात ८ शहरे व १५१९ खेडी आहेत. जिल्ह्यातील ६७०० हेक्टर जमीन जंगलाने व्यापलेली आहे. हा जिल्हा प्राकृतिकदृष्ट्या तीन भागांमध्ये विभागला आहे. १) किनारपट्टीचा प्रदेश, २) डोंगरी प्रदेश विभाग ३) मध्य विभाग इ.

किनारपट्टीचा प्रदेश समुद्र किनाऱ्यापासून १०–१५ कि.मी. पसरला आहे. या प्रदेशास १६७ कि.मी. लांब समुद्र किनारा लाभला आहे. हा प्रदेश कमी उंच असून येथे २५०० मी.मी. पाऊस पडतो. या प्रदेशात अनेक समुद्र किनारे, खाड्या, बंदरे, गरम पाण्याचे झरे, गुहा, मंदिरे व जलदुर्ग आहेत.

डोंगरी प्रदेशाने जिल्ह्याचा ८५% भूप्रदेश व्यापला आहे. या प्रदेशात सह्याद्रीच्या पर्वत रांगा आहेत. हा प्रदेश चढ–उतारांनी युक्त आहे. सह्याद्रीच्या या मुख्य रांगामध्ये अनेक उंच व दुर्गम कडे आहेत. या प्रदेशाचा उतार पुर्वेकडून पश्चिमेकडे असून जवळ–जवळ ३५०० मी.मी.

पाऊस पडतो. रत्नागिरी जिल्ह्यात कशेडी, कुंभार्ली व आंबा हे प्रमुख घाट आहेत. या प्रदेशात डोंगरी किल्ले, घाटमार्ग, जंगल, जंगली पशुजीवन आहे.

मध्य विभाग हा किनारपट्टीचा प्रदेश व डोंगरी प्रदेशामध्ये वसला आहे. हा भाग मध्यम उंचीचा असून तो मुंबई–गोवा हायवे व कोकण रेल्वेमुळे सुलभ झाला आहे. या प्रदेशात धार्मिक स्थळे, गरम पाण्याचे झरे आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या २.७ टक्के क्षेत्रफळ रत्नागिरी जिल्ह्याने व्यापले आहे. या जिल्ह्यातील २,५३,३०० हेक्टर जमीन लागवडीखाली आहे.[५] आंबा, फणस, काजू, नारळ, तांदूळ, नाचणी, वरी ही प्रमुख पीके आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात बॉक्साइट, चिनी माती, डोलोमाईट, मँगेनीज, सिलिका, क्रोमाइट व इल्मेनाइट ही खनिजे मिळतात

रत्नागिरी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या १,६१२,६७२ असून त्यापैकी ७५९,७०३ पुरुष व ८५२,९६९ स्त्रीया आहेत. या जिल्ह्याचे स्त्री–पुरुष प्रमाण १०००–११२३ असे आहे. रत्नागिरी जिल्ह्याची एकूण लोकसंख्या महाराष्ट्राच्या १.४४ टक्के आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील १६.३५% लोक शहरी भागामध्ये राहतात.[६]

## रत्नागिरी जिल्ह्याचा इतिहास

### प्राचीन इतिहास

रत्नागिरी जिल्ह्याला इतिहासपूर्व काळापासून समृद्ध इतिहास लाभला आहे. आधुनिक पुरातत्वीय उत्खनन पद्धती व तंत्रे यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील इतिहासाची नवनवी दालने प्रकाशित होत आहेत. रत्नागिरी येथे जांभ्या खडकाच्या दोन पार्श्विका (Laterite profiles) विहिरींमध्ये उघड्या पडल्या आहेत. एक पार्श्विका खाडीच्या अवसादांवर तयार झालेली असून त्यामध्ये कार्बनीकरण झालेल्या वनस्पतींचे अवशेष व तृणमणी सापडतात. या खाडीच्या अवसादांचा काल कालमापनानुसार मायोसीन कालखंड ठरविण्यात आला आहे.[७]

रत्नागिरी येथे संपन्न झालेल्या प्राच्यविद्या परिषदेमध्ये डॉ. विजय साठे यांनी नोंदविल्याप्रमाणे इ.स. १८७३ मध्ये रत्नागिरी गावातील जांभ्या खडकावर लाल मातीच्या थराखाली माती व वाळूच्या गाळामध्ये एक ते दीड कोटी वर्षापूर्वीचे फळ व पानाचे अवशेष सापडले. कालमापन पद्धतीनुसार याचा कालखंड प्लाईस्टोसीन कालखंड होता. महाराष्ट्रामध्ये इतर ठिकाणी या काळातील प्राण्याचे अवशेष मिळाले आहेत. असे अवशेष रत्नागिरी येथे

सापडले नाहीत. भूशास्त्रज्ञांच्या मते कोकणातील माती आम्लीय असल्यामुळे प्राण्यांची हाडे अधिक काळ टिकत नाहीत. दापोली तालुक्यात कांगवई परिसरात एका वसाहतीतील मातीच्या थरामध्ये अश्मीभूत खोड व परागकण सापडले आहेत.[८]

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील पालशेत जवळील सुसरोंडी येथे डेक्कन कॉलेज, पुणे यांच्या वतीने पुरातत्वज्ञ श्री. अशोक मराठे यांनी उत्खनन केले. तेथे त्यांना उत्तर अँशुलिअन काळातील (५०००० हजार वर्षापूर्वीचा काळ) नैसर्गिक गुहा व मानवी हत्यारे मिळाली.[९] प्रथम टॉड याने पॅलिओलिथिक काळातील कोकणच्या स्थळांची पाहणी केली. त्यास वरळी, कांदिवली व दक्षिण कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड येथे जमिनीच्या पृष्ठभागावर पॅलिओलिथिक काळातील (४०००० वर्षापूर्वीचा काळ) मानवी हत्यारे मिळाली.[१०] भारतीय पुरातत्व खात्याच्या वतीने श्री. बोपर्डीकर व श्री. जोशी या पुरातत्वज्ञानी रत्नागिरीच्या आसपास उत्खनन केले. रत्नागिरी पासून १६ कि. मी. अंतरावर असणाऱ्या हातखंबा येथे या पुरातत्वज्ञांना नैसर्गिक गुहा व (मध्याश्मयुगीन) मिसिऑलिथिक (१०००० वर्षापूर्वीचा काळ) मानवी हत्यारे मिळाली.[११] रत्नागिरी जिल्ह्यात अनेक ठिकाणी डोंगर–माथ्यावरील सपाट कातळावर आदिमानवाने कोरलेल्या विविध स्वरुपांच्या, आकृती व चिन्हे सापडली आहेत. त्या चिन्हांना अश्म चिन्हे किंवा कातळशिल्प म्हटले जाते. डॉ. दाऊद दळवी व श्री. रविंद्र लाड यांना रत्नागिरी जिल्ह्यात गणपतीपुळे व राजापूर जवळच्या बारसव गावी कातळशिल्पे सापडली.[१२] या कातळशिल्पांचा काळ साधारणपणे १५००० वर्षापूर्वीचा मानला जातो.[१३] डेक्कन कॉलेज, पुणे येथील पुरातत्वज्ञ अशोक मराठे यांना उपग्रहावरुन कोकणातील सागरी सर्वेक्षणामध्ये रायगड जिल्हातील श्रीवर्धनपासून सिंधुदुर्गापर्यंत २२५ कि.मी. अंतराच्या दरम्यान २४ कि.मी. लांबीची पण खंडित स्वरुपाची मानवनिर्मित भिंत मिळाली आहे.[१४] या भिंतीचा कालखंड ८००० ते ६००० वर्षापूर्वीचा आहे. ही भिंत २४ कि.मी. लांब, २.७ मीटर उंच व २.५ मीटर रुंद आहे. सर्वप्रथम रत्नागिरी जिल्ह्यातील वेळणोर येथे या भिंतीचे अवशेष सर्वप्रथम सापडले.[१५] या भिंती नवाश्मयुगातील माणसांनी गलबते किंवा होड्या धक्क्याला लागाव्या म्हणून बांधलेल्या असाव्यात.

भाषाशास्त्रीय आधार, धौम्याचे आद्यतीर्थावली, कालीदासाचे रघुवंश, राष्ट्रकुट राजा अमोद्यवर्ष, शिलाहार राजे मुम्मुणि यांच्या कोरीव लेखांच्या उल्लेखाचा आधार घेऊन आर्यांनी

समुद्रमार्गे संपूर्ण कोकणपट्टी वसवली असे मत इतिहासतज्ञ शेजवलकर त्र्यं. शं. व्यक्त करतात.[१६] शेजवलकरांचे मत इतिहासकार दाऊद दळवी यांनी खोडून काढले आहे. त्यांच्या मते आर्यांनी जर नौकामार्गाने येऊन पश्चिम किनाऱ्यावर वसाहती केल्या तर त्यावेळी त्यांच्याकडे उत्तम प्रकारचे नौकानयन शास्त्र असले पाहिजे. परंतु आर्यांच्या कोणत्याही ग्रंथात एवढ्या मोठ्या प्रमाणात नौकानयन शास्त्राचे संदर्भ वा उल्लेख मिळत नाहीत.[१७] आर्य कोकणात कसे आले, याबाबत इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. आर्य नेमके कोकणात कधी आले? कोकणातील आर्यीकरणाची सुरुवात नेमकी कधी झाली. याबद्दलचे निश्चित पुरावे मिळत नाही.

इ.पू. ४ थ्या शतकामध्ये सम्राट अशोकाचे राज्य अपरांत म्हणजेच कोकणात होते. त्याच्या गिरनार येथील पाचव्या शिलालेखामध्ये त्याने धर्ममहारात्र हा अधिकारी अपरान्त सीमेवर नेमल्याचा उल्लेख आहे.[१८] सम्राट अशोकाच्या सोपारा शिलालेखावरुन त्याच्या कोकणातील साम्राज्याचे मुख्य केंद्र सुरपारक म्हणजे ठाणे जिल्ह्यातील सोपारा (आजचे नालासोपारा) हे होते.[१९] रत्नागिरी जिल्ह्यात सम्राट अशोकाचे साम्राज्य असल्याचा प्रत्यक्ष पुरावा मिळत नाही. कदाचित येथील स्थानिक राज्यकर्ते सम्राट अशोकाचे मांडलिक असावेत. इ.स. १५० च्या सुमारास टॉलेमीने आपल्या भूगोल ग्रंथामध्ये कोकणचे दोन विभाग सांगितले आहेत. गुजरात व उत्तर कोकण यास लारिका व रत्नागिरी जिल्ह्यासहित उर्वरित कोकण आरिका उल्लेखिले आहे. [२०] स्ट्रॅबोने आरिका हा समुद्री चाच्यांचा (समुद्री डाकू) प्रदेश असल्याचे म्हटले आहे. त्याने रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णेच्या चाच्यांचा उल्लेख केला आहे.[२१] रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक बंदरांचा उल्लेख स्ट्रॅबो, टॉलेमी, प्लीनी व पेरिप्लस ऑफ एरिथ्रिअन सीचा अनामिक लेखक या युरोपियन लेखकांनी केला आहे.

चिपळूण व कोल येथील लेण्यांवरुन इसवीसनाच्या सुरुवातीला (इ.स.न. पू. २०० ते इसवी सन ५०) या काळात रत्नागिरी जिल्यातील उत्तर भागामध्ये महत्वाची बौद्ध केंद्रे होती.[२२] महाराष्ट्र पुरातत्व विभाग, मुंबई यांच्या वतीने डॉ. खोबरेकर वि.गो. यांनी आपले सहकारी व पन्हाळेकाजीचे ग्रामस्थ यांच्या मदतीने रत्नागिरी जिल्ह्यातील पन्हाळेकाजी येथे बौद्ध व शैव लेणी तसेच बाराव्या शतकातील एक शिलालेख शोधला. पुरातत्वज्ञ डॉ. शां.भा. देव यांच्या मते या परिसरामध्ये हिनयान बौद्धलेणी इ.पू. पहिल्या शतकात कोरली आहेत. तर शैवलेणी इ.स. १०,११ व्या शतकातील आहेत.[२३] या लेण्यांवरील, टेकडीवर शिलाहार कालीन किल्ला व तळे

आहे.[२४] डॉ. प्रभुणे या संशोधकाच्या मते हा किल्ला इ.पू. पहिल्या शतकातील असावा.[२५]

प्राचीन व मध्ययुगीन काळातील आंतरराष्ट्रीय वाहतूक प्रामुख्याने जलमार्गाने चालत असे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील बंदरे प्राचीन काळातील प्रमुख वाहतूक व व्यापारी बंदरे होती. या बंदरांपासून भारतातील, महाराष्ट्रातील अंतर्गत भागात जाणारे व्यापारी मार्ग होते. या व्यापारी मार्गांवर अनेक बौद्ध, शैव लेणी प्राचीन काळापासून कोरली आहेत. रत्नागिरी जिल्ह्याच्या जवळच असलेल्या रायगड जिल्ह्यातील कोल व गांधारपालेची प्राचीन लेणी या परिसराचा इसवीसनपूर्व काळापासूनच्या इतिहासाची साक्ष देतात.

ग्रीक आक्रमक मिनॅडर याने इ.पू. १५५ ते इ.पू. १५३ या काळात संपूर्ण सिंधु नदीचे खोरे, सौराष्ट्राचे द्विपकल्प व पश्चिम घाटातील इतर प्रदेश मिळविला.[२६] यानंतर शकांनी रत्नागिरी जिल्ह्यातील प्रदेशावर आपले वर्चस्व स्थापन केले.[२७] शक क्षत्रप रुद्रसेन पहिला याच्या इ.स. १५० मधील जुनागढ शिलालेखात त्याने अपरान्त स्वपराक्रमाने जिंकून घेतला असे म्हटले आहे.[२८] सातवाहन राज्यकर्त्यांची पहिली राजकीय कारकीर्द महाराष्ट्र व कोकणात सुरु झाली. गौतमी बलश्री हिच्या नाशिक शिलालेखात गौतमीपुत्र सातकर्णीचे घोडे तीन्ही समुद्राचे पाणी पित होते असा उल्लेख आहे. वसिष्ठी पुत्र पुळुमावीच्या नाशिक शिलालेखामध्ये गौतमीपुत्र सातकर्णीच्या राज्यात अपरान्त, विंध्य ते ऋक्षवत (सातपुडा पर्वतरांगा) व परियात्र (अरवली पर्वतरांगा) ते सह्य (पश्चिम घाट, सह्याद्री पर्वतरांगा) होत्या.[२९] याशिवाय कर्नाटकमधील गुलबर्गा जिल्ह्यातील सन्नति येथे अनामिक लेखकाने कोरलेल्या लेखात गौतमीपुत्र सातकर्णीस खखरात कुलाचा नाश करणारा बऱ्याच राजांचा पराभव करणारा असंख्य युद्धांमध्ये विजय मिळविणारा आणि वेणाकट, विदर्भ उपगिरी, अपरान्त, अश्मक, मूलक आणि चकोर पर्वताचा स्वामी होता असे म्हटले आहे.[३०] यावरुन इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या सुरुवातीस रत्नागिरी जिल्हा गौतमीपुत्र सातकर्णीच्या साम्राज्यामध्ये समाविष्ट होता. इ.स. दुसऱ्या शतकामध्ये सातवाहनांच्या ताब्यातून गेलेला हा प्रदेश यज्ञश्री सातकर्णीने परत जिंकला.[३१] इसवी सनाच्या दुसऱ्या शतकाच्या शेवटी सातवाहनांचे राज्य पश्चिम भारतापासून कृष्णेचा त्रिभुज प्रदेश व उत्तर तामिळनाडूपर्यंत पसरले होते.[३२] यावरुन रत्नागिरी जिल्हा किमान शंभर वर्षे तरी सातवाहनांच्या साम्राज्याचा एक भाग होते.[३३]

सातवाहन राजांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन आभीर व त्रैकुटक यांनी कोकणावर आपले वर्चस्व स्थापन केले. कान्हेरी लेण्यातील लेख, ताम्रपट व अंजनेरी ताम्रपटामधील संदर्भावरुन त्रैकुटक राजांचे उत्तर कोकणामध्ये वर्चस्व असल्याचे पुरावे मिळतात. त्रैकुटक घराण्यातील राजांच्या ताम्रपटावरून या घराण्यातील कोकणचा राजा इंद्रदत्त याचे उल्लेख येतो. तो अपरान्ताधिपती होता. कालीदासाच्या रघूवंश काव्यात या घराण्यातील इंद्रदत्त, दऱ्हसेन व व्याघ्रसेन या तीन राजांचे उल्लेख आहेत. श्यामिलक कवीच्या पादताडितक (लत्ताप्रहार) या काव्यातही या घराण्यातील इंद्रवर्माचा उल्लेख अपरान्ताधिपती म्हणून येतो.[३४] त्रैकुटक हे आभीर घराण्यातील होते. त्यांच्यापैकी एखाद्या सुभेदाराने मुळे आभिरांचा पराभव करुन त्यांचे राज्य बळकाविले असावे.[३५] सातवाहन सत्तेच्या ऱ्हासानंतर उत्तर कोकणामध्ये आभिर व त्रैकुटक घराण्यातील राजांची सत्ता असल्याचे पुरावे मिळतात. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये मात्र असे पुरावे मिळत नाहीत. कोकणचा राजा झिम्मा खेळतो या लोकगीतातील राजा म्हणजे त्रैकुटक वंशातील इंद्रदत्त हाच होय. सातवाहन सत्तेनंतर त्रैकुटकांचे राज्य उत्तर कोकणाप्रमाणेच रत्नागिरी जिल्ह्यात इ.स. च्या तिसऱ्या शतकात असावे. त्रैकुटकांच्या काळात कोकणामध्ये महायान बौद्धवादाचा प्रसार झाला.

त्रैकुटकांनंतर वाकाटकांची सत्ता महाराष्ट्राबरोबर रत्नागिरी जिल्ह्यामध्ये स्थापन झाली.[३६] इसवीसन चौथ्या शतकाच्या शेवटी वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन याने आपला सासरा दुसरा चंद्रगुप्त यांच्या पाठिंब्याने गुजरात व पश्चिम भारतातील प्रदेश शक क्षत्रपांकडून जिंकले.[३७] याचवेळी वाकाटकांनी त्रैकुटकांकडून रत्नागिरी जिल्ह्यासहित कोकण जिंकले. वाकाटकांच्या राज्यात महाराष्ट्र, कोकण, गुजरात, सौराष्ट्र व उजैयिनी माळवा हे होते.[३८] सहाव्या शतकाच्या मध्यात मौर्य व नळ राजांचे वर्चस्व कोकणात होते. वातापीचा (बदामी) चालुक्य राजा किर्तीवर्मन याने कोकणातील मौर्य व नल यांच्या विरोधात लष्करी कारवाई केली.[३९] किर्तीवर्म्याने अनेक लढाया करुन कोकण जिंकले होते. त्याने नल, मोर्य, कदंब यांचे राज्य जिंकून कोकण घेतले. किर्तीवर्म्याचा विवाह चिपळूणच्या सह्येंद्रक सेनानंद राजाची कन्या हिच्याशी झाला होता.[४०] कोकणात किर्तीवर्माने चित्ती यज्ञ करुन, अनेक ब्राह्मणांचा उद्धार करुन तो गणपतीपुळे येथील नेवरे गावी राहीला होता.[४१] रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर येथील मंदीरांना नाव नसलेली व अप्रकाशित मंदीरे चालुक्य सम्राट किर्तीवर्मापासून ते विनयादित्य या

राजांच्या काळात बांधली गेली.[४२] रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळचे जमीनीत खोदलेले चंडिकादेवीचे मंदीर हे बदामीच्या दगडी मंदीरांच्या (इ.स. ५५०–५८७) काळातील आहे असे मानले जाते.[४३] चालुक्य राजा विजयादित्य याच्या नेरुर ताम्रपटामध्ये हिकुलांभ म्हणजे आत्ताच्या राजापूर तालुक्यातील कोलांभ व कुंडीवाटक म्हणजे संगमेश्वर तालुक्यातील आत्ताचे कुंडी या गावांचा उल्लेख आढळतो.[४४] इ.स. ७४२ मधील चालुक्य राजा दुसरा विक्रमादित्याच्या चिपळूण ताम्रपटात विजयी सैन्य आदित्यवाटा (आत्ताचे चिपळूण जवळील ऐतावडे) येथे असताना नखणे (चिपळूणजवळ) गाव ब्राह्मणांना दान केल्याचा उल्लेख आहे.[४५] यावरुन सहाव्या शतकाच्या मध्यापासून ते आठव्या शतकाच्या मध्यापर्यंत (इ.स. ५६७– इ.स. ७५०) रत्नागिरी जिल्ह्यामध्ये चालुक्याचे वर्चस्व होते.

चालुक्य राजा दुसरा पुलकेशी याच्या ऐहोळे प्रशस्तीमध्ये किर्तीवर्मा याने नळ, मौर्य, कदंब यांचा दारुण पराभव केला असा उल्लेख आहे. ही प्रशस्ती इ.स. ६३४–६३५ मध्ये कोरली आहे. यामध्ये कोकणात राज्य करणाऱ्या मौर्यांच्या राजधानी पुरीचा उल्लेख आहे. याच प्रशस्तीमध्ये दुसऱ्या पुलकेशीने कोकणामध्ये मौर्यांचे राज्य उध्वस्त केले. आरमारी युद्धात मौर्यांची राजधानी पुरी जिंकली असे आहेत.[४६] दुसरा पुलकेशीचे राज्य तिन्ही समुद्रापर्यंत पसरले होते. दुसऱ्या पुलकेशीने उध्वस्त केलेली कोकणातील मौर्यांची राजधानी पुरी नेमकी कोणती याबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. वासुदेवराव भावे, शेजवलकर त्र्यं.शं. यांच्या मते जंजिऱ्याजवळील राजपुरी हीच मौर्यांची व शिलाहारकालीन पुरी होय.[४७] तर संशोधकांचा एक गट मुंबईजवळील धारापुरी हीच कोकणातील मौर्यांची राजधानी पुरी होय असे मानतात.[४८] श्रीनिवास वेदक या अभ्यासकाच्या मते मंदगोर म्हणजे इंदापूर माणगाव जवळील मांदाड जवळील तळे शहर म्हणजे मौर्यांची पुरी होय.[४९] घारापूरी वगळता राजपुरी व तळे ही दोन्ही गावे रत्नागिरी जिल्ह्याला जवळ आहेत. आधुनिक पुराभिलेखीय संशोधनाने त्रैकुटक राजघराण्याच्या नाशानंतर इ.स. चौथ्या शतकाच्या शेवटी महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी व गोवा येथे कोकणातील मौर्यांनी आपले वर्चस्व निर्माण केले.[५०] मौर्य साम्राज्याच्या ऱ्हासानंतर काही मौर्य महाराष्ट्रात कोकणात आश्रयास आले होते. तेच हे मौर्य होत. वातापी चालुक्य नरेश किर्तीवर्मा व मंगलेश यांच्या सततच्या आक्रमणानंतरही मौर्यांनी कोकण आपल्या ताब्यात ठेवले होते. वाडा व ठाणे येथील शिलालेखांप्रमाणे सुकेतुवर्मा हा मौर्य राजा कोकणवर राज्य करत होता.[५१] चालुक्य राजा मंगलेश

याने रेवतीद्विप (वेंगुर्ल्या जवळील रेडी बेट) याचा अधिपती स्वामीराजा याचा नाश करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला असे नेरुर ताम्रपटात म्हटले आहे.[५२] वरील पुराव्यांवरुन चौथ्या शतकांमध्ये किर्तीवर्मा या वातापी चालुक्य राजाचे वर्चस्व रत्नागिरी जिल्हयामध्ये निर्माण झाले. राजपुरी, तळेपासून उत्तर कोकण मौर्यांच्या ताब्यात होते. दुसऱ्या पुलकेशीने मौर्यांचा आरमारी पराभव करुन त्यांच्या ताब्यातील उत्तर कोकण जिंकून संपूर्ण कोकणवर ताबा निर्माण केला. संगमेश्वरच्या अप्रकाशित मंदिरांचे व दाभोळच्या चंडिका मंदिराचे बदामी मंदिराशी असलेले साम्य रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वातापीच्या (बदामी) चालुक्याचे वर्चस्व होते. या मताला दुजोरा देतात.

चालुक्यांच्या प्रशासनात उच्च अधिकार पदावर असलेल्या दंतिदुर्ग नावाच्या मांडलिकाने आपली स्वतंत्र सत्ता घोषित केली. त्यांच्या कुटुंबाने हळूहळू व टप्प्याटप्प्याने चालुक्यांची सत्ता संपूर्णपणे हस्तगत केली व राष्ट्रकूट नावाचे नवे राजघराणे प्रस्थापित केले. दंतिदुर्गाचे घराणे मूळचे गुलबर्गा भागातील. पण त्यांनी आपल्या सत्तेचे मान्यखेट हे केंद्र केले.[५३]

इ.स. ७४९ मधील मनोर ताम्रपटावरुन कोकण प्रदेश राष्ट्रकुट राजा दंतिदुर्गाच्या राज्यामध्ये समाविष्ट झाला होता.[५४] दंतिदुर्गने सुरुवातीस नाशिक, खानदेश, कोकण व दक्षिण गुजरात या प्रदेशांवर आक्रमणे केली होती. दक्षिण गुजरात आणि कोकण हे प्रदेश चालुक्यांकडून जिंकल्यानंतर दंतिदुर्गने दक्षिण महाराष्ट्रवर स्वारी केली. चालुक्य सत्तेचा शेवट दंतिदुर्गने केला होता. त्याने संपूर्ण महाराष्ट्रावर आपली सत्ता स्थापन करुन उत्तर कर्नाटकाचा काही प्रदेश जिंकला होता. कर्नाटकमधील गुलबर्गा जिल्ह्यातील एका शिलालेखात त्या प्रदेशावरील दंतिदुर्गाच्या स्वारीचे वर्णन आले आहे.[५५]

नवव्या शतकाच्या शेवटी व दहाव्या शतकाच्या सुरुवातीस रत्नागिरी जिल्हा हैद्राबादजवळील मालखेटच्या (मान्यखेट) राठोड (राष्ट्रकुट) वंशाच्या अंमलाखाली असावा.[५६] इसवी सनाच्या आठव्या ते दहाव्या शतकापर्यंत रत्नागिरी जिल्ह्यावर राष्ट्रकुट राजांची सत्ता होती.

राष्ट्रकुट राजा पहिला कृष्ण याने दक्षिण कोकण (रत्नागिरी, सिंधुदुर्ग) जिंकले. त्याने शिलाहार शाखेचा संस्थापक सणफुल्ल याची दक्षिण कोकण प्रांताचा प्रशासक म्हणून नेमणूक केली. सणफुल्लचा नववा वंशज रट्टराज याने राष्ट्रकुट राजा कृष्णाने आपल्या पुर्वजांवर केलेल्या

कृपेचा आवर्जून उल्लेख केला आहे.[५७] कोकणातील शिलाहार घराण्यातील शेवटच्या ज्ञात राजाचे नाव रट्टराज होते. त्याची नंतरची राजधानी बलीपत्तन (खारेपाटण) होती. त्यांच्या राज्यात गोवा, सावंतवाडी आणि रत्नागिरीचा प्रदेश होता. दक्षिण कोकणातील ही शिलाहार सत्ता उत्तरेस चौलपर्यंत पसरली होती.[५८] कल्याणचा चालुक्य राजा दुसरा तैल याने राष्ट्रकुट सत्तेचा नाश केला याच काळात शिलाहार राजा अपराजित याने चिपळूण, संगमेश्वर आणि गोवा जिंकून संपूर्ण कोकणची किनारपट्टी आपल्या नियंत्रणाखाली आणली. (अपराजित मृत्यू इ.स. १०१०) कल्याणचा चालुक्य राजा जयसिंह याने दक्षिण कोकणवर स्वारी करुन तेथील शिलाहारांना आपले वर्चस्व स्विकारण्यास भाग पाडले.[५९] दक्षिण कोकणातील शिलाहार राजा छित्तराज याने कदंबांचे वर्चस्व मान्य करुन दक्षिण कोकण आपल्या ताब्यात ठेवले. (इ.स. १०२६ नंतर) या काळात कोल्हापूरचा राजा गौंक याने दक्षिण कोकणवर स्वारी करुन तो प्रदेश जिंकला.[६०] शिलाहार राजा अनन्तपालच्या काळात गोव्याचा कदंब राजा पहिला जयकेशी याने कोकणवर स्वारी केली. अनन्तपालला ठार करून कोकणचा समावेश आपल्या राज्यात केला.[६१] लवकरच अनन्तपालचा वारस अपरादित्य याने कदंबांचा पराभव करुन आपले राज्य परत मिळविल्याचे वर्णन वडवली ताम्रपटात आढळते.[६२] शिलाहार घराण्यातील मल्लिकार्जुन याचा इ.स. ११५६ सालातील चिपळूण लेख उपलब्ध आहे.[६३] रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली येथे शिलाहारांचा मांडलिक जैत्र सावंत यांचा इ.स. १२०२ मधील ताम्रपट सापडला आहे. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील वेळवी, कुडावळे, घोणसरे, बडवाडी, उंबर्ले या गावांचा उल्लेख आहे.[६४] रत्नागिरी जिल्ह्यातील पन्हाळेकाजी येथे शिलाहारकालीन किल्ला व तळे आहे. या तळ्याभोवती शिलाहारकालीन शिल्पे व मंदिरांचे अवशेष आढळतात.[६५] रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील कशेळी येथील सुर्यमंदिर (कनकादित्य) शिलाहार राजा भोज व हरपाळदेव यांच्या काळात पूर्ण झाले.[६६]

राष्ट्रकूट राजा दुसरा कर्क याच्याशी चालुक्य (कल्याणी) दुसरा तैल याचे इ.स. ९७३ मध्ये शेवटचे युद्ध उत्तर कर्नाटकमध्ये झाले.[६७] कोकणामध्ये कल्याणीच्या चालुक्य राजांचे अभिलेख मिळतात. तेरवण ताम्रपटामध्ये (राजापूर तालुका) चालुक्य राजे मंडलिक, मंडलोर, कण्वदेवराय यांची नोंद आहे.[६८] कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील दुसरा जयसिंह हा चोल आक्रमणाचा प्रतिकार करण्यात गुंतल्याचे बघून भोज परमारने इ.स. १०१९ मध्ये कोकणवर

स्वारी करुन वर्चस्व मिळविले. त्याच्या कोरीव लेखात कोकण विजयाचे वर्णन आले आहे.[६९] भोजाचा मांडलिक यशोवर्मन याच्या कळवण शिलालेखात त्याने कर्नाटक आणि कोकणच्या राजांचा पराभव करुन कोकण जिंकल्याची नोंद आहे.[७०] इ.स. १०२४ मधील जयसिंहाच्या मिरज ताम्रपटाप्रमाणे त्याने परमारांच्या सैन्यास पराभूत करून त्यांच्या ताब्यातील उत्तर आणि दक्षिण कोकण परत जिंकून घेतले.[७१] इ.स. १०२५ मध्ये जयसिंग किंवा जगदेव व मल्ल याने कोकणप्रांत काबीज केला व जवळजवळ पन्नास वर्षे कोकण प्रांताची व्यवस्था गोव्याच्या शिलाहारांनी पाहिली.[७२] कल्याणीच्या चालुक्य घराण्यातील कर्णदेव याने गुजरातमधून कलचुरी राजा कर्ण यास हाकलले. या कर्णदेवाची पट्टराणी मायनलादेवी ही गोव्याच्या कदंब राजा पहिला जयकेशी याची राजकन्या होती. त्यामुळे तो कल्याणीचा चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याचा साडू होता. या गुजरातच्या चालुक्य राजा कर्णदेवाने इ.स. १०७५ मध्ये संगमेश्वर येथे कर्णोर मंदिराची निर्मिती केली.[७३] कल्याणीचा चालुक्य राजा सहावा विक्रमादित्य याने आपल्या वडिलांच्या नावावरुन इ.स. १०४० ते इ.स.११२७च्या दरम्यान संगमेश्वर येथे सोमोर व काशी विश्वोर मंदिरांची उभारणी केली.[७४] चालुक्यांचा सरंजामदार श्री बाप्पदेवराय याचा इ.स. १२५९च्या चिपळूण ताम्रपट मिळाला आहे. यामध्ये संगमेश्वर तालुक्यातील म्हाळूंगे गाव (मातुलिंगी) वासुदेव प्रभु व इतर दहा ब्राह्मणांना दान दिल्याचा उल्लेख आहे.[७५]

अकराव्या शतकाच्या पूर्वाधापासून (इ.स.१०२४) मात्र रत्नागिरी जिल्हा कल्याणीच्या चालुक्य राजांच्या ताब्यात होता. कोल्हापूरच्या शिलाहार व गोव्याच्या कदंबांनी चालुक्यांचे मांडलिक म्हणून अनेक वेळा रत्नागिरी जिल्ह्याचा कारभार पाहिला.

**मध्ययुगीन काळ**

तेराव्या शतकाच्या शेवटी देवगिरीच्या यादवांची सत्ता संपूर्ण महाराष्ट्रावर होती. रामचंद्र यादव याच्या इ.स. १३१० मधील पुरुषोत्तमपुरी ताम्रपटात रामचंद्राच्या दिग्विजयांच्या यादीत संगम व खेट म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर व खेड यांचा उल्लेख आहे.[७६] रामचंद्र यादवाने माहीम, खेड व संगमेश्वर येथील राजांना जिंकले असा उल्लेख या ताम्रपटात आहे.[७७] यावरून त्या त्या ठिकाणी स्थानिक राजे उदयास आले होते. मुरुड गावच्या वसाहतीच्या बखरीमध्ये दापोली तालुक्यातील जालगावला शैलार–वंशीय जालंधर राजा होता असा उल्लेख आहे.[७८] कदंब, चालुक्य सत्तांच्या दुर्बळतेनंतर रत्नागिरी जिल्ह्यात छोटी छोटी स्थानिक राज्ये

उदयास आली. देवगिरीच्या रामचंद्रदेव यादवाने ही छोटी राज्ये जिंकून आपल्या साम्राज्यात समाविष्ट केली.

रामचंद्रदेव यादव याचा इ.स. १३१२ मध्ये मृत्यू झाला. त्याचा वारस सिंघणदेव याने सुलतान अल्लाउद्दिन यास खंडणी देण्याचे नाकारले. सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने आपला सरदार मलिक काफूर यास सिंघणदेव याच्यावर आक्रमण करण्यासाठी पाठविले. या युद्धात सरदार मलिक काफूर जिंकून त्याने इ.स. १३१२ मध्ये यादवांचे राज्य खालसा केले.[७९] मलिक काफूरने रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळपर्यंत आपली लष्करी ठाणी निर्माण केली व स्वत: देवगिरीत राहून राज्य करु लागला.[८०] रामचंद्रदेवराय यादव याचा जावई हरपाळदेव याने सुलतानाच्या सत्तेला प्रतिकार करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. अल्लाउद्दीन खिलजीने मलिक काफूर यास इ.स. १३१४ मध्ये दिल्लीस बोलवून घेतले. मलिक काफूरच्या अनुपस्थितीत माहिम, संगमेश्वर, दाभोळ येथे स्वतंत्र मराठी राज्ये अस्तित्वास आली.[८१]

दिल्ली सुलतान मुहंमद बीन तुलघकाच्या शेवटच्या काळात संगम घराण्यातील हरिहर व बुक्क यांनी दक्षिणेकडे विजयनगगर साम्राज्याची सत्ता इ.स. १३३६ मध्ये स्थापन केली.[८२] विजयनगरचे साम्राज्य दक्षिण कोकणात होते. मावळकर सरदेसाई घराण्याच्या बखरीत आपल्याला विजयनगरचे अधिकारी दक्षिण कोकणात वावरताना दिसतात. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर व इतर छोट्या राज्यांचे राजे विजयनगरच्या सम्राटांचे मांडलिक होते. सुलतान महंमद बीन तुघलकाच्या शेवटच्या काळात त्याच्या साम्राज्यात अराजक निर्माण झाले. याचा फायदा घेऊन अनेक प्रांताधिकारी, सरदार स्वतंत्र झाले. महंमद बीन तुघलकाच्या दक्षिणेतील अमीरांनी त्याच्या विरोधात बंड केले व दौलताबादवर आपले वर्चस्व निर्माण केले. या अमीरांनी ३ ऑगस्ट १३४७ रोजी अबुल मुजफ्फर अल्लाउद्दीन बहमनशाह याय आपला राजा निवडले. अशाप्रकारे दक्षिणेत बहामनी सत्तेची स्थापना झाली.[८३] अल्लाउद्दीन हसनने समुद्रकिनाऱ्याचे लष्करी व व्यापारी महत्व ओळखून गोवा, दाभोळ व कोकणातील अनेक बंदरे आपल्या ताब्यात घेतली.[८४] अल्लाउद्दीन हसन बहामनशाहने शेवटच्या काळात दाभोळवर वर्चस्व मिळविले. दाभोळ हे बहामनी साम्राज्यातील पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील महत्वाचे बंदर होते.[८५] बहामनी शासकांना रत्नागिरी जिल्हा व गोव्यावर फार काळ ताबा ठेवता आला नाही. दाभोळपासून गोव्यापर्यंतची कोकणपट्टी इ.स. १४७० पर्यंत संगमेश्वरच्या स्वतंत्र राजाच्या ताब्यात होती.[८६] बहामनी सेनापती

दक्षिण कोकण ताब्यात घेण्यासाठी सतत प्रयत्न करत होते. इ.स. १४५३ मध्ये बहामनी सेनापती खलफ हसन बसरी याने संगमेश्वरचा राजा जाखुराय याच्यावर आक्रमण केले. खेळण्याच्या शिर्के राजांनी व जाखूरायने संगनमत करून बहामनी सेनापतीस कोकणच्या दुर्गम प्रदेशात कोंडीत पकडले.[८७] जाखुराय व शिर्के यांच्या सैन्याने बहामनी सैन्याची कत्तल केली. यावेळी सेनापती खलफ हसन(मलिफुतुजार) व सात हजार बहामनी सैन्य मारले गेले. त्यामुळे दाभोळ सोडून इतर प्रदेशात बहामनी आपली सत्ता स्थापन करु शकले नाहीत.[८८] बहामनी वजीर महमूद गवान याने इ.स. १४७० मध्ये कोकणवर आक्रमण केले. त्याने संगमेश्वरच्या राज्यावर आक्रमण केले. संगमेश्वर जिंकण्यासाठी त्याने अथक प्रयत्न केले. संगमेश्वरच्या राजाचा पराभव केला. महमूद गवानने इ.स. १४७१ मध्ये दक्षिण कोकणवर बहामनी सत्तेचे वर्चस्व निर्माण केले.[८९] बहामनी काळात दाभोळ मुस्तफाबाद म्हणून ओळखले गेले. बहामनी शासक मुहम्मदशाह तृतीय याने ५ एप्रिल १४८१ मध्ये महंमद गवानचा वध केला.[९०] महंमद गवानच्या मृत्यूनंतर बहामनी सत्तेच्या ऱ्हासास सुरुवात झाली. अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक मलिक अहमद याने रत्नागिरी जिल्ह्यातील काही प्रदेशावर आपले वर्चस्व निर्माण केले.[९१] बहामनी साम्राज्याची शकले होऊन पाच शाह्या निर्माण झाल्या. त्यामध्ये विजापूरची आदिलशाही, गोवळाकोंड्याची कुतुबशाही व अहमदनगरची निजामशाही या तीन सत्ताच दिर्घकाळ टिकल्या. गोव्याचा अधिकारी बहादूरखान गिलानी याने उरलेला कोकण जिंकला व आपली सत्ता स्थापन केली. गोव्याच्या अधिकाऱ्याने विजापूरच्या युसुफ आदिलशाहचे वर्चस्व मान्य केले. त्यामुळे  बाणकोट खाडीच्या दक्षिणेचा सर्व कोकण प्रदेश विजापूरच्या राज्यात सामील झाला.[९२] दक्षिण कोकण ताब्यात आल्यावर युसुफ आदिलशाहने दाभोळ हे आपल्या कोकण प्रदेशाचे मुख्य केंद्र ठेवले.[९३] अशाप्रकारे रत्नागिरी जिल्हा विजारपूरच्या आदिलशाही राज्यात इ.स. १४९८ मध्ये सामील झाला.[९४]  संगमेश्वर, पालवणी, प्रभावलीचे राज्यकर्ते आता विजापूरचे सरदार म्हणून कारभार करु लागले.[९५]

इ.स. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी आदिलशहाकडून गोवा जिंकले. पोर्तुगीजांनी आदिलशाही दाभोळ बंदर तीन वेळा लुटले. पोर्तुगीजांनी दाभोळमधील घोड्यांच्या आयातीचे संरक्षण केले तर त्यांच्याशी मैत्रीपुर्ण आघाडी स्थापन करण्याचा प्रस्ताव इस्माईल आदिलशहाने इ.स.१५२० मध्ये ठेवला. पोर्तुगीजांनी ते अमान्य केले व इ.स. १५२२ मध्ये पोर्तुगीजांनी

दाभोळ बंदर लुटले.[१६] पोर्तुगीज लोकांचा दबाव कमी झाल्यावर (इ.स. १६००–१६५०) विजापूरच्या आदिलशहाचीच सत्ता जवळजवळ ५० वर्षे या प्रदेशावर होती.[१७] इ.स. १५८२ मध्ये दाभोळ बंदरावरुन पोर्तुगीज व आदिलशाहीमध्ये संघर्ष निर्माण झाला. आधीच्या कराराप्रमाणे आदिलशहाने दाभोळचा किल्ला पाडून टाकण्याचे तसेच किल्ल्यातील तोफा पोर्तुगीजांना देण्याचे मान्य केले होते. याच कराराप्रमाणे आदिलशहाने डेट व जकात या पोर्तुगीज नौका पोर्तुगीजांना परत केल्या नव्हत्या. या तहाच्या अटी पूर्ण करुन घेण्यासाठी पोर्तुगीजांनी आपले आरमार दाभोळ बंदरात आणले. अलि आदिलशहाने घाबरुन पोर्तुगीजांशी २९ जानेवारी १५८२ रोजी नवा करार केला.[१८] दाभोळच्या आदिलशाही सरदाराने पोर्तुगीजांच्या ताब्यातील आगाशीवर सैन्य पाठविले. इ.स.१६२३ मध्ये डच आरमार गोव्यावरुन सुरतकडे जात असताना त्यांना दाभोळ येथे पोर्तुगीजांशी कठोर प्रतिकार करावा लागला.[१९]

## रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले

सतराव्या शतकामध्ये या जिल्ह्यामध्ये आदिलशहाच्यावतीने स्थानिक सरदार व छ. शिवाजी महाराज यांच्यामध्ये सतत संघर्ष झाला. रत्नागिरी जिल्ह्यात ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख असलेले असे एकूण तीस किल्ले आहेत. हिंमतगड(बाणकोट), मंडणगड, गोवा(हर्णे), कनकदुर्ग, फतेदुर्ग, सुवर्णदुर्ग, पद्नाभदुर्ग(प्रणालकदुर्ग), दाभोळ, पालगड, महिपतगड, सुमारगड, रसाळगड, गोवळकोट, भैरवगड, माणिकदुर्ग, किल्ले नवते(गुढ), चिपळूण गढी, गोपाळगड, कासारदुर्ग, विजयगड, प्रचितगड, भवानीगड, संगमेश्वर गढी, जयगड, रत्नदुर्ग, पूर्णगड, साठवली, यशवंतगड, आंबोळगड, राजापूर गढी. यामध्ये चिपळूण, संगमेश्वर, साठवली व राजापूर या ४ गढ्या आहेत. चिपळूण व संगमेश्वर या गढ्यांचे सध्या कोणतेच अवशेष शिल्लक नाहीत. या किल्लयांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे–

### १) हिमंतगड(बाणकोट)

हिमंतगड हा किल्ला रत्नागिरी जिल्हयातील मंडणगड तालुक्यात बाणकोट या गावाजवळ आहे. या किल्ल्याची समुद्र सपाटीपासूनची उंची ५० मीटर एवढी आहे. हा किल्ला सागरीदुर्ग प्रकारातील आहे.

### किल्ल्याचे वर्णन

या किल्ल्यास मराठयांच्या काळात हिमंतगड हे नाव पडले आहे. हा किल्ला सावित्री नदीच्या मुखाशी दक्षिणतीरावर एका उंच डोंगराच्या माथ्यावर बांधलेला आहे. या डोंगराचा रंग काहीसा तांबूस आहे या किल्ल्याचा आकार चौकोनी आहे. या किल्ल्याचा अर्ध्यापेक्षा अधिक भाग पाण्याने वेढला आहे. दुसऱ्या बाजूला खंदक आहे. हा किल्ला शिवपूर्व काळापासून अस्तित्वात होता. हा किल्ला कोणी बांधला याचे निश्चित पुरावे मिळत नाहीत. किल्ल्यांचे प्रवेशद्वार त्याच्या दोन्ही बुरुजांसहित अस्तित्वात आहे. किल्ल्याची चारी बाजूंची तटबंदी भक्कम व चांगल्या अवस्थेत आहे. तटबंदीची रुंदी साडेतीन फूट आहे. समुद्राकडे बुजल्या गेलेल्या पायऱ्यांची वाट आहे. समुद्राजवळ किल्ल्याचा पडकोट आहे. पडकोटात बुरुज व तटबंदीचे अवशेष आहेत. मुख्य दरवाजावर अस्पष्ट गणेश प्रतिमा दिसते. मुख्य दरवाजाच्या आत देवड्या आहेत. बांधकामाची दोन मोठी जोती किल्ल्यावर आहेत. त्याला जमिनीकडील बाजूस खंदक खोदलेला आहे. याशिवाय खाडीच्या बाजूस मुख्य किल्ल्याचे बाहेर वर व खाली असे दोन बुरूज आहेत. खालील बाजूचा पाणबुरूज हबशीने (सिद्दीने) बांधला आहे. तर वरील बाजूचा बुरूज आंग्रानी बांधला आहे. हे दोन्ही बुरूज आज मोडकळीस आलेले आहेत. या किल्ल्यावर एक विहीर आहे. या विहिरीशेजारी तटबंदीमध्ये पश्चिमाभिमुख चोर दरवाजा आहे. किल्ल्यास चारही बाजूने तटबंदीच्या भिंती आहेत. या किल्ल्यास एकूण आठ बुरूज आहेत.

या किल्ल्यामध्ये ब्रिटिश अधिकाऱ्यांचे बंगले होते. चोर दरवाजातून बाहेर पडल्यावर ऑर्थर मॅलेट नावाच्या ब्रिटिश अधिकाऱ्याची पत्नी व नवजात मुलीचे स्मारक असून त्याचे नाव मॅलेट मेमोरियल आहे. या दोघींचा बाणकोट खाडीत वादळात नाव सापडून मृत्यू झाला होता. त्यांच्या स्मरणार्थ हे स्मारक उभारण्यात आलेले आहे.[१००]

महाबळेश्वरमध्ये आत्ताच्या ऑर्थर पॉइंटवर बसून हा इंग्रज अधिकारी बाणकोटच्या दिशेला नैराश्येने बघत तासोनतास बसायचा असे येथील स्थानिक लोककथा सांगते. हा किल्ला चौकोनी आकाराचा आहे. या किल्ल्यावर निजामशहा व नंतर आदिलशहाचे वर्चस्व होते. इ.स. १५४८ मध्ये हा किल्ला पोर्तुगीजांनी जिंकला व बाणकोट गाव जाळला.[१०१] खालचा पाणबुरुज हा जंजिऱ्याच्या सिद्दीने बांधला व वरचा बुरुज आंग्र्यांनी बांधला.[१०२]

**ऐतिहासिक महत्त्व**

हिमंतगड किल्ला शिलाहार काळात बांधला गेला. पुढे बहामनीशाही सुलतानांच्या ताब्यात तो होता. हा किल्ला इ.स.१६३६ मध्ये निजामशाहीच्या अस्तानंतर विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात गेला. इ.स.१५४८ रोजी पोर्तुगीजांनी हा किल्ला घेतला व बाणकोट गावात जाळपोळ केली. बाणकोट हा शिवाजीच्या दक्षिण कोकण स्वारीपूर्वी आदिलशाही सरदार जंजिऱ्याचा सिद्दी याच्या ताब्यात होता. इ.स. १६६१ मध्ये पल्लिवनचे दळवी, शृंगारपुरचे सूर्वे यांचा पराभव करुन शिवाजीने दाभोळ, पालवणी, संगमेश्वर, राजापूर जिंकले. त्याचवेळी शिवाजी राजांनी बाणकोट किल्ला जिंकला. शिवाजी महाराज इतर मोहिमेत गुंतल्यावर सिद्दीने परत तो जिंकून घेतला. शिवाजी महाराज व त्यांच्या सरदारांनीसुद्धा तो सिद्दीकडून पुन्हा पुन्हा जिंकून घेतला. बाणकोट किल्ला आरमारी दृष्टिकोनातून व आजुबाजुच्या प्रदेशावर, समुद्रमार्गावर नियंत्रण ठेवण्यास महत्वाचा होता. इ.स. १६७५ मध्ये मात्र शिवाजीराजांनी पूर्ण पश्चिम किनारपट्टी जिंकली त्यावेळी बाणकोट शिवाजी महाराजांच्याच ताब्यात होता.[१०३]

दि.७ मार्च १७३३ रोजी संभाजी आंग्रे यांनी सागरमार्गे बाणकोट घेण्याची तयारी केली. यामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या आज्ञेप्रमाणे महाडमधून हरी मोरेश्वर हे देखील आंग्रेच्या मदतीस गेले. २३ मे १७३३ रोजी बकाजी नाईक महाडीक यांनी हा किल्ला जिंकून घेतला. ४ सप्टेंबर १७३३ रोजी या किल्ल्याचा अधिकारी हरजी नाईक कदम याने बाजीराव पेशव्यांना पत्र लिहून सरखेल कान्होजी आंग्रेच्या मृत्यूनंतर तेथील परिस्थितीचे वर्णन केले आहे. २२ सप्टेंबर १७३३ रोजी सेखोजी आंग्रे बाणकोटात होते. ही माहिती आंग्रे शकावलीत मिळते. इ.स.१७५५ मध्ये कमांडर जेम्स या अधिकाऱ्याने तुळाजी आंग्रेकडून हा किल्ला जिंकून त्याचे फोर्ट व्हिक्टोरिया असे नामकरण केले. पुढे मराठा–इंग्रज तहात मराठयांना दिला. पुढे त्याचे नाव हिमंतगड ठेवले.[१०४]

**२) मंडणगड**

मंडणगड हा किल्ला मंडणगड तालुक्यात असून हा गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ३०० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पूर्वेकडील बाजूस पायथ्यास मंडणगड गाव व दक्षिणेस भारजा नदीचे खोरे आहे.

**किल्ल्याचे वर्णन**

मंडणगड किल्ल्याचे वैशिष्टये म्हणजे या किल्ल्यावर बालेकिल्ला नाही. या गडावर सर्वात मोठी वास्तू म्हणजे गणेश मंदिर आहे. या मंदिरास लागूनच तलाव आहे. या पायऱ्याच्या वाटेवर पूर्वी दरवाजा देखील होता. या दरवाजाच्या पुढे दुसरा एक तलाव आहे. दोन तलावाच्या पुढे उजवीकडे एक कबर आहे. या कबरीजवळ कुलुपाच्या आकाराचे काही दगड आहेत. ही कबर मंदिराच्या जोत्यावर ठेवलेली आहे. स्थानिक लोकांच्या म्हणण्याप्रमाणे ही कबर महाराजांचा एकनिष्ठ दर्यावर्दी व आरमार प्रमुख दौलतखान याची आहे. पण त्यास दुजोरा देणारा कोणताही लिखित अथवा अलिखित पुरावा आढळत नाही. या कबरीजवळ एक सुबक कोरीव काम केलेला दगड आहे. या दगडाशेजारी सिमेंटच्या चौथऱ्यावर २.५ मीटर लांब तोफ ठेवलेली आहे. या तोफेजवळ एका बांधीव चर तयार केलेला आहे. हा चर नैसर्गिक नसून जांभ्या दगडात बांधलेला आहे. या चराची लांबी एक फूट व रूंदी एक फूट असून खोली अंदाजे २ फूट आहे. गडावर तटबंदीचे अवशेष अत्यल्प प्रमाणात असलेले दिसतात.[१०५]

मंडणगड किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ३०० मी. आहे. बाणकोट(हिंमतगड) किल्ल्याची पायथ्यापासून उंची ५० मी. आहे. पालगड किल्ल्याची पायथ्यापासून उंची २५० मी. आहे.[१०६]

मंडणगड या किल्ल्याचा उल्लेख काही ठिकाणी मतगड, मदगड असा आहे. सध्या या किल्ल्यावर दोन तळी, एक विहिर आहे. जून्या वास्तूंची जोती, एक स्मृती शिलास्तंभ (नक्षीकाम असलेला कमी उंचीचा शिलास्तंभ), आठ फूट लांब व दोन फूट व्यासाची तोफ, कबर व गणेशमंदिर आहे. गणेशमूर्ती भंग पावल्याने नवी गणेशमूर्ती व मंदिराचे नुतनीकरण केलेले आहे. गणेशमंदिराला लागून असलेल्या तलावामध्ये बारा महिने पाणी असते. यास थोरला तलाव म्हणतात. या तलावात उतरण्यासाठी पश्चिमेकडे बांधीव पायऱ्या आहेत. दुसरा तलाव कोरडा आहे. असाच अजून एक बांधीव चर धर्मशाळेच्या इमारतीजवळ आहे. गडावर पाच, सहा बांधकामाची जोती आहेत. दोन वर्षापूर्वी किल्ल्याची साफसफाई करताना एका भूयाराचे अवशेष किल्ल्यावर सापडले आहेत. मंडणगड किल्ल्यास तिहेरी तटबंदी होती.[१०७] या किल्ल्याचे क्षेत्रफळ आठ एकर असून दोन वेगवेगळे किल्ले मिळून हा किल्ला बनला आहे. स्थानिक

लोककथेप्रमाणे मुख्य मंडणगड किल्ला शिवाजीने, परकोट, हबशीने (सिद्दी) तर जांबा आंग्र्यांनी बांधला.[१०८] डोंगराच्या दोन टोकावर दोन किल्ले आणि त्या दोन्ही किल्ल्यांस जोडणारा भक्कम तिहेरी तट बांधला होता. त्यांपैकी दक्षिण टोकावरच्या किल्ल्यास जांबा हे नाव आहे व उत्तर टोकावरील किल्ल्यास मंडणगड हे नाव आहे. जांबा आंग्र्यांनी बांधला तर मंडणगड शिवाजीने बांधला. मधील पडकोट हबशाने बांधला असे म्हणतात.[१०९] शिवकालीन कवी परमानंद याने याच किल्ल्याविषयी आपल्या श्रीशिवभारत काव्यात चिरदुर्ग या प्रसिद्ध गडावर शिवाजीने तट बांधल्याचा उल्लेख केला आहे.[११०] मंडणगड किल्ला हा इसवीसनपूर्व काळापासून अस्तित्वात असल्याचा उल्लेख नावाच्या साधर्म्यावरुन करण्यात आला आहे. टॉलेमी (इ.स. १५०) व अनामिक लेखकाने लिहलेल्या The Periplus of Arithrian Sea (तांबड्या समुद्राच्या सफरी) (इ.स. २४८) यांनी कोकणकिनाऱ्यावरील मंदगोरा या शहराचा उल्लेख केला आहे.[१११] या परकिय लेखकांनी उल्लेख केलेले मंदगोरा म्हणजेच हे मंडणगड असावे असा तर्क लावण्यात आला होता. परंतु डेक्कन पुरातत्व कॉलेजचे प्रा. विश्वास गोगटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्खननाद्वारे इंदापूर (ता. तळा) जवळची मांदाड बंदर हेच टॉलेमी व अनामिक लेखकाने उल्लेखलेले मंदगोरा बंदर आहे हे सिद्ध केले आहे. त्याठिकाणी सापडलेली खापरे, काचेचे मणी, दगडी पात्र, भाजलेल्या वीटांचा काळ २००० वर्षापूर्वीचा आहे. त्यामुळे गॅझेटिअर व त्याचा आधार घेऊन गोगटे चिंतामण गंगाधर व कमलापुर जे.एन[११२] या लेखकांनी मांडलेला मंदगोरा म्हणजेच मंडणगड व तेथील किल्ला इसवीसनपूर्व काळापासून अस्तित्वात होता हा तर्कवाद खोटा ठरला आहे. हा किल्ला मध्ययुगीन काळामध्ये आदिलशहाने बांधला असावा. मंडणगड मधील एक जेष्ठ नागरिक श्री आण्णा अधिकारी यांच्याशी अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी मंडणगड किल्ल्याशी संबंधित एक ऐकिव कथा सांगितली.[११३] त्यांचा पूर्वज हा मंडणगड किल्ल्याचा किल्लेदार होता. शिवाजी महाराज पालवणीवरुन आले तेव्हा हा किल्लेदार पालखीत बसून त्यांना भेटावयास गेला. पालखीत बसून मला भेटण्यास येणारा हा कोण? असा विश्वास करुन शिवरायांनी त्यास किल्ल्यावरुन कडेलोट केले असा त्या कथेचा आशय होता. अशाच प्रकारची दंतकथा संभाजीकालीन रायगड किल्ल्याशी संबंधित आहे.[११४] तत्कालिन लष्करी नियमांनुसार पराभूत सेनाधिकाऱ्याने विजयी राजापुढे येताना पालखीत बसून येणे मान्य नव्हते.

प्रत्यक्षात त्या किल्लेदाराचा कडेलोट केला. याविषयी निश्चित विधान करता येत नाही. पण पालवणीचे आदिलशाही सरदार यशवंतराव दळवी यांच्या ताब्यात मंडणगडचा किल्ला होता. या ऐतिहासिक लिखित संदर्भास या लोककथेने पुष्टी मिळते. मंडणगड किल्ला हा शिवपूर्वकाळापासून अस्तित्वात असून त्यावर नवे बांधकाम, दुरुस्ती शिवाजी, सिद्दी व आंग्रे यांनी वेगवेगळ्या काळात केले होते.

**ऐतिहासिक महत्त्व**

हा किल्ला शिलाहार राजांनी बांधला याचा कोणताही लेखी व पुरातत्त्वीय पुरावा उपलब्ध होत नाही. किल्ल्याच्या एकूण बांधकामावरून हा किल्ला आदिलशहाच्या काळातील वाटतो. निजामशाही संपुष्टात आल्यावर निजामशहाचा कोकणातील प्रदेश मोगल व आदिलशहाने वाटून घेतला. तेव्हा दक्षिण कोकणातील सर्व किल्ले विजापूरकर आदिलशहाकडे राहिले. मंडणगडावरील बांधकाम याच काळातील असल्याचे दिसून येते.

शिवाजी राजांनी २९ एप्रिल १६६१ रोजी शृंगारपूरावर हल्ला केला. प्रभावळीचा राजा सुर्यराव सुर्वे याची शृंगारपूर ही राजधानी आत्ताच्या संमगोर तालुक्यात संगमेश्वर पासून आठ मैलांवर होती. राजा सुर्यराव सुर्वे पळून गेल्यामुळे शृंगारपूर ताब्यात आले. पुढे शिवाजी राजांनी सुर्यराव सुर्वे यास आपल्या बाजूस वळवून घेतले.[११५] यावेळी शिवाजी महाराजांनी पालवणीच्या दळवींवर दबाब ठेवण्यासाठी तसेच ह्या जिंकलेल्या सर्व प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी चिरदुर्ग या प्रसिद्ध किल्ल्यावर उंच व मजबूत तटबंदी केली. या प्रदेशाचे हे मंडनच (भूषण) आहे हे सुचविण्यासाठी या किल्ल्याचे नाव मंडणगड ठेवले. शिवाजी महाराजांनी मंडणगड व पालगड हे नवे किल्ले बांधले.[११६]

फितुर लोकांच्या मदतीने पोर्तुगीज, मोगल व सिद्दीने मराठ्यांच्या ताब्यातील कोकण प्रदेश ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. संभाजी राजे व त्यांच्या पराक्रमी सरदारांनी या कारवाया निष्फळ ठरवल्या. रत्नागिरी जिल्ह्यात संगमेश्वर, राजापूर व दाभोळ येथे पोर्तुगीज व मोगलांच्या लष्करी हालचाली चालू होत्या. मंडणगड, बाणकोट, पालगड येथे प्रत्यक्ष मोगल, पोर्तुगीज यांनी आक्रमण केले नाही. सिद्दीने मोगलांच्यावतीने हे किल्ले जिंकण्याचा प्रयत्न केला. मराठ्यांनी त्याचे हे प्रयत्न अयशस्वी केले. १६८० ते १६८९ या काळात सतत युद्धे सुरु होती. या युद्धाचाच एक भाग म्हणून सिद्दी व मराठे यांनी वारंवार मंडणगड, पालगड व बाणकोट किल्ले

जिंकण्याचा प्रयत्न केला. या किल्ल्यांवर या काळात सतत संघर्ष होत होता. कधी सिद्दी तर कधी मराठे यांचे वर्चस्व या किल्ल्यांवर असे. कान्होजी आंग्रे हे संभाजीच्या काळात आरमारातील पदावर काम करत असत. संभाजी राजे रायगड येथे राज्य करत असता कान्होजी आंग्रे फिरते आरमार घेऊन सदरहु लोकांचा (सिद्दीच्या सैन्याचा) परामर्श घेत असे.[११७]

इ.स.१७३३ मध्ये मंडणगड किल्ला आणि परिसर छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे होता. पण सेखोजी आंग्रे यांनी हा भाग शाहूचा कधीच मानला नाही. त्यामुळे सेखोजी आंग्रे यांनी या परिसरात सतत कारवाया केलेल्या दिसून येतात. हे समकालीन पत्रावरुन स्पष्ट होते. दुसऱ्या एका पत्रात असा उल्लेख आहे की, 'अंजनवेल किल्ल्याचे सहाय्य मंडणगड, गोवळकोट व विजयगड हे किल्ले करतात. यापैकी मंडणगड जिंकून घेतला आहे' यावरून असे दिसते की, इ.स. १७३३ मध्ये हा किल्ला आंग्र्यांकडे होता. रामाजी महादेव याने मे १७५५ मध्ये जे सात किल्ले आंग्र्याकडून घेतले त्यात मंडणगड होता. शेवटी इ.स.१८१८ मध्ये हा किल्ला ब्रिटिशांनी जिंकून घेतला.[११८]

### ३) गोवा

रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यात गोवा हा सागरी किल्ला आहे. या किल्ल्याची उंची २० मीटर एवढी आहे. गोवा या किल्ल्यास हर्णे दुर्ग असेही संबोधले जाते.

### किल्ल्याचे वर्णन

हर्णे गावातून हर्णे बंदराकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर गोवा किल्ल्याचा कमानयुक्त दरवाजा आहे. दरवाजाच्या आतील टेकडीवर बालेकिल्ला आहे. किल्ल्याच्या उत्तर व पश्चिम दिशेस समुद्र आहे. किल्ल्याच्या उत्तर तटबंदीमध्ये बुजवलेला दर्या दरवाजा आहे. या दरवाजास देवड्या आहेत. या देवड्यांच्या जोत्यावर वाघासारख्या दिसणाऱ्या प्राण्यांची शिल्पे आहेत. ही शिल्पे शरभांची आहेत.[११९] डाव्या बाजूच्या देवडीच्या जोत्यावर दगडी उंबऱ्याजवळ आतल्या पृष्ठभागावर अर्धवट गाडले गेलेले शरभाचे शिल्प आहे. महाकाय शरभाने आपल्या शेपटीमध्ये एका हत्तीला दाबून धरले आहे. या शिल्पाच्या खालचा भाग बुजला गेल्यामुळे शरभाच्या पायात किती हत्ती आहेत हे दिसत नाही. याच दर्यादरवाजाच्या कमानीवर मध्यभागी अस्पष्ट असे पक्षीरुप गंडभेरुंडाचे द्वारशिल्प आहे.[१२०] या गंडभेरुंडाच्या दोन्ही बाजूला एक शरभ आहे. उजव्या

बाजूचे शरभाचे शिल्प भग्न आहे. गंडभेरुंडाच्या डाव्या पायात वर्तुळाकार ढालीसारखे शस्त्र आहे. त्याचा उजवा पाय तुटला आहे. दर्या दरवाजाच्या बाहेर डाव्या देवडीच्या पायथ्याशी एक गंडभेरुंडाचे शिल्प आहे. या शिल्पामध्ये त्याने दोन पायात दोन व दोन चोचीत दोन असे एकूण चार हत्ती दाबून धरले आहेत यावरुन हे शिल्प चतुर्गज विजयी पक्षीदेहधारी गंडभेरुंड या प्रकारचे आहे.[१२१] उजव्या देवडीच्या खालच्या बाजूस ओळखता न येणारे अस्पष्ट शिल्प आहे. किल्ल्याच्या पश्चिम तटबंदीवर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. बालेकिल्ल्यात इंग्रज काळातील दोन युरोपियन बंगल्यांचे अवशेष दिसतात. किल्ल्याला सात बुरुज आहेत. किल्ल्यामध्ये बांधलेला तलाव आहे. बालेकिल्ला समुद्र सपाटीपासून चाळीस फूट उंच आहे. किल्ल्यामध्ये वाढलेली झाडेझुडपे आहेत.

### ऐतिहासिक महत्त्व

गोवा/हर्णे किल्ला सरखेल कान्होजी आंग्रे यांनी फत्तेदुर्ग व कनकदुर्ग येथील सिद्दीच्या सैन्यास शह देण्यासाठी हा किल्ला बांधला. ब्रिटिश काळात येथे इंग्रजांचा बंगला होता. इ.स.१७५४ रोजी आंग्र्याच्या आरमाराने गोवा किल्ल्याजवळ डच कंपनीच्या तीन जहाजांवर हल्ला केला. यात आंग्र्यांची काही जहाजेही जळून खाक झाली होती. परंतु त्याची आग डच जहाजावर जाऊन त्यांचीही दोन जहाजे जळाली. १६ एप्रिल १७५५ रोजी रामाजी महादेव यांनी तुळाजी आंग्रे यांचे चार किल्ले घेतले. त्यामध्ये हा किल्ला होता. इ.स.१७५५ मध्ये पेशवे व इंग्रज यांच्यात झालेल्या तहानुसार सुवर्णदुर्ग किल्ल्याबरोबरच गोवा किल्ला देखील पेशव्यांच्याकडे आला. त्यानंतर इ.स.१८१८ मध्ये इंग्रजांनी सुरू केलेल्या मोहिमेत अनेक किल्ले त्यांच्या वर्चस्वाखाली आले. त्यामध्ये कर्नल केनेडी या इंग्रज अधिकाऱ्याने गोवा किल्ला पेशव्यांकडून जिंकून घेतला.[१२२]

## ४) कनकदुर्ग

रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यात कनकदुर्ग हा सागरी किल्ला आहे. या किल्ल्याची उंची २० मीटर एवढी आहे.

### किल्ल्याचे वर्णन

कनकदुर्ग हा किल्ला हर्णे बंदरावर आहे. या बंदरावरुन किल्ल्यावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. हा किल्ला तीन बाजूने समुद्राच्या पाण्याने वेढला आहे. समुद्राच्या बाजूला किल्ल्यास

तटबंदी नाही. जमिनीच्या बाजूला तटबंदी व बुरुजाचे अवशेष आहेत. किल्ला चढतानाच एक बुरुज आहे. किल्ल्यावर दिपगृह आहे. किल्ल्यावर कातळामध्ये खोदलेली पाण्याची आठ टाकी आहेत. दिपगृहाशेजारीच त्याचे कार्यालय आहे.[१२३]

**ऐतिहासिक महत्त्व**

छत्रपती शाहू महाराजांनी कनकदुर्ग हा किल्ला इ.स.१७१० मध्ये बांधला असा एक मतप्रवाह आहे. हा किल्ला बंधण्याचा त्यांचा उद्देश असा होता की, सुवर्णदुर्ग आंग्र्यांचे ताब्यात होता. तेव्हा त्याच्या शेजारी आपण हे दोन किल्ले बांधले म्हणजे तेणेकरून आंग्र्यावर आपला बराच दबाव राहून त्याला विशेष हालचाल करता येणार नाही. परंतु पुढे लवकराच हा किल्ला आंग्र्याच्या स्वाधीन केला. परंतु हे कारण पटत नाही. कारण इ.स १७०८ मध्ये शाहू महाराज हे साताऱ्यात आले. त्यावेळी ते व ताराबाई यांच्यामध्ये फार तीव्र संघर्ष सुरू होता. ती इ.स.१८११ पर्यत चालूच राहिली. त्यावेळी कोकणातील जास्तीत जास्त प्रदेश कान्होजी आंग्रे यांच्याकडे होता. कान्होजी आंग्रे हा महाराणी ताराबाईच्या पक्षात होता. त्यामुळे तो आपल्या प्रदेशात छत्रपती शाहू महाराजांना किल्ला बांधण्यास विरोध करणार हे निश्चित आहे. तर काहींच्या मते हा किल्ला इ.स.१७०० मध्ये जंजिऱ्याचा सिद्दी खैरातखान याने हा किल्ला बांधला. इ.स.१७०० मध्ये खैरातखानाने सुवर्णदुर्गावर स्वारी केली होती पण त्यामध्ये त्याचा पराभव झालेला होता. या दरम्यान खैरातखान सुवर्णदुर्गच्या किनाऱ्यावरील प्रदेश जिंकून घेतला होता. सुवर्णदुर्ग या किल्ल्यावर व आजूबाजूच्या प्रदेशावर दबाव ठेवण्याच्या या हेतूने त्याने हे दोन किल्ले बांधले. कारण हे दोन्ही किल्ले इ.स.१७२७ पर्यत त्याच्याकडेच होते.[१२४]

**५) फत्तेदुर्ग**

रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यातील फत्तेदुर्ग हा सागरी किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासून उंची २० मी. आहे.

**किल्ल्याचे वर्णन**

हर्णे बंदरावरच कनकदुर्गाच्या अलीकडे एका लहान टेकडीवर फत्तेदुर्ग आहे. भरतीच्या वेळी वहिवाटीसाठी कनकदुर्ग व फत्तेदुर्ग यांना जोडणारा दगडी पूल दिसतो. सध्या या पुलावरुन हर्णे बंदरापर्यंत जाणारा रस्ता आहे. सध्या या किल्ल्यावर कोळ्यांची दाट लोकवस्ती आहे. फत्तेगडाच्या सुरुवातीलाच कोळीवस्ती फत्तेगड असा फलक आहे.[१२५]

## ऐतिहासिक महत्त्व

फत्तेदुर्ग हा किल्ला खैरातखान याने बांधला. त्याच्या काळात या किल्ल्याचे सुभेदार म्हणून धर्मराज सावंत, हिब्राव दळवी, सिद्दी मसाउदखान, सिद्दी सैय्यद, सिद्दी याकूब इत्यादीची नियुक्ती केली होती. इ.स.१७५५ च्या सुमारास हे किल्ले तुळाजी आंग्रे यांच्याकदे होते. कमांडर जेम्स याने सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग व कनकदुर्ग जिंकूण ते पेशव्यांना दिले. इ.स.१८१७ मध्ये सुवर्णदुर्गबरोबर हे दोन्ही किल्ले पेशव्याकडून इंग्रजानी जिंकून घेतले होते.[१२६]

## ६) सुवर्णदुर्ग

परकीय सागरी सत्ताना शह देण्यासाठी छ.शिवाजी महाराजांनी आरमाराची निर्मिती केली. त्या अनुषंगाने समुद्रातील किल्ले जिंकून घेण्याचा यशस्वी प्रयत्न सपाटा छ.शिवाजी महाराजांनी केला होता. तेव्हा छ.शिवाजी महाराजांनी सुवर्णदुर्ग हा किल्ला जिंकून घेतला होता. त्याचा उपयोग स्वराज्यासाठी करून घेतला होता. सुवर्णदुर्ग या किल्ल्यांच्या प्रचंड भिंती थेट समुद्रातून वर येतात. हा किल्ला जवळजवळ आठ एकर विस्तार असलेल्या बेटावर आहे.

## सुवर्णदुर्ग किल्ल्याची भौगोलिक पार्श्वभूमी–

सुवर्णदुर्ग किल्ला रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दापोली तालुक्यामध्ये आहे. हा किल्ला रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे या बंदराजवळ आहे. मध्ययुगामध्ये आरमारी दृष्टिकोनातून सुवर्णदुर्ग किल्ला खुपच महत्वाचा होता. ते एक महत्वाचे आरमारी ठाणे होते. सुवर्णदुर्ग किल्ल्याचे अक्षांश रेखांश उ. १७°४९'०१.०५'' पू. ७३°०५'०३.९१'' सुवर्णदुर्ग हा बेटावरील किल्ला असून त्याच्या चारी बाजूने समुद्र आहे. किल्ल्याची अधिकतर तटबंदी भक्कम खडक फोडून तयार केली आहे. उरलेली तटबंदी दहा बारा चौरस फुटांच्या मोठमोठया चिऱ्यांनी बांधली आहे. या जलदुर्गातील शिबंदीस पुरेल एवढी पाण्याची व्यवस्था त्यामध्ये आहे.[१२७]

## किल्ल्याचे वर्णन

या किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ थोडीशी तटबंदी व भग्न दरवाजाचे अवशेष आहेत. या किल्ल्यावर तीन तोफा सात फूट लांबीच्या आहेत.या किल्ल्यास एकूण चोवीस बुरुज आहेत. या किल्ल्याचा मुख्य दरवाजा असलेला बुरूज ३० फूट उंचीचा आहे. या किल्ल्याचा प्रमुख दरवाजा सुस्थितीत असून त्याच्याजवळ अनेक शिल्पकृती आहेत. दरवाजाच्या कमानी जवळच्या भिंतीवर हनुमानाचे कोरीव शिल्प आहे. कमानीवर मध्यभागी फुल कोरलेले आहे. या

मुख्य दरवाजाच्या पायरीवर कासवाचे शिल्प आहे.[१२८] दरवाजाच्या दोन्ही बाजूला देवडया आहेत. डाव्या देवडीमध्ये दोन खोल्या बांधल्या आहेत. किल्ल्यामध्ये खडकात खोदलेले एकमेकांना जोडलेले तीन तलाव आहेत. किल्ल्यावर खडकामध्ये खोदलेले पाण्याचे टाके, बुजलेली विहिर आहे. किल्ल्याच्या पश्चिम तटबंदीवर पाच बुरुज आहेत. या तटबंदीला चार फूट उंचीचा चोर दरवाजा आहे. किल्ल्यामध्ये अर्धवट बांधकाम व जोती आहेत. किल्ल्यामध्ये बोरीची व इतर झाडेझुडपे वाढलेली आहेत.

### शिवकालीन इतिहास

शिवाजी महाराजांनी सुवर्णदुर्ग किल्ला इ.स. १६६३ मध्ये बांधला.[१२९] इ.स. १६६३ मध्ये सेखोजी आंग्रे यांनी सुवर्णदुर्गची तटबंदी बांधली.[१३०] इ.स. १६७४ मध्ये मराठा आरमार बांधणीचा पद्धतशीर प्रयत्न झाला. यावेळी सुवर्णदुर्गची दुरुस्ती करण्यात आली.[१३१] इ.स. १६७१–७२ मध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्याला आर्थिक स्थिरता लाभल्यावर किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक तरतुद केली. शिवाजी महाराजांच्या एका जाबित्यात इ.स. १६७१–७२ या वर्षासाठी वेगवेगळया किल्ल्यांवर बांधकाम करण्यासाठीच्या खर्चासाठी १ लाख ७५ हजार होनची तरतुद केलेला अर्थसंकल्प दिला आहे. त्यामध्ये सुवर्णदुर्ग या किल्ल्यावरील बांधकामासाठी १०,००० होनांची तरतुद केली आहे.[१३२] यावरुनच या किल्ल्याचे स्वराज्यातील महत्व लक्षात येते.

शिवाजी महाराज यांनी वडील शहाजीराजे यांच्या मध्यस्थीने विजापूरच्या अली आदिलशहाशी मैत्रीचा करार केला. त्याप्रमाणे कोकणातील इतर जिल्ह्यांसहित राजापूर शिवाजी महाराजाच्या मुलुखापैकी एक भाग म्हणून आदिलशहाने मान्य केले. शिवाजी महाराजांनी जिंकून घेतलेला कोकणातील कल्याण ते फोंडयापर्यंतचा व पश्चिमेस दाभोळ ते पूर्वेकडे इंदापूर पर्यंतचा प्रदेश शिवाजी महाराजांच्या ताब्यात देण्यात आला व त्याचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले.[१३३] शिवाजी महाराजांनी दक्षिण कोकणमधील खेळण्याचे शिर्के व शृंगारपूरचे सुर्वे यांना जिंकून आपल्या पक्षात घेतले. त्यामुळे  वसईपासून मालवणपर्यंतचा कोकणचा पश्चिम किनारा, आंतरभागातील भूप्रदेशासहित शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला.[१३४]

## शिवोत्तर काळाचा इतिहास

छ. शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० मध्ये रायगडावर झाला. राज्यारोहणानंतर छ. संभाजीने कोकणामध्ये लक्ष घातले. त्यांनी राजापूर येथे नव्या सुभेदाराची नेमणूक केली. रामनगर, जव्हार, कल्याण, भिवंडी, चौल, दाभोळ, राजापूर, कुडाळ, भीमगड, फोंडा, अंकोले ही कोकणातील ठिकाणे छ. संभाजीच्या ताब्यात होती.[१३५]

कान्होजी आंग्रे सुवर्णदुर्गाची अधिकारी सुभा अचळोजी मोहिते यांचेकडे नोकरीस होते.[१३६] संभाजी राजांनी सत्तेवर येताच कान्होजी आंग्र्यांचा एकनिष्ठपणा पाहून कोकणातील प्रदेशावर हल्ले करण्याचा हुकूम व अधिकार त्यांना दिला. यावेळी कान्होजीने कोकणपट्टीतील सर्व किल्ले, मोगलांच्या ताब्यातील किल्ले युद्धे करुन घेतले.[१३७] कान्होजी आंग्रे संभाजीच्या काळात फिरत्या आरमाराचा प्रतिनिधी होता.[१३८]

अशाप्रकारे मोगलांचे मराठ्यांविरुद्धचे दक्षिण कोकणातील आक्रमण अयशस्वी ठरले. मराठे अतिशय पराक्रमाने लढले. ते मोगलांपेक्षा लष्करी डावपेचामध्ये वरचढ ठरले. मराठ्यांच्या पराक्रमाने व रसदेच्या कमतरतेमुळे औरंगजेबाची कोकणात सैन्य पाठवून संभाजी महाराजांना नामोहरम करण्याची योजना फसली.

छ. संभाजी यांच्या कारकिर्दीच्या अगदी शेवटच्या काळामध्ये कान्होजी आंग्रेच्या कार्याची सुरुवात झाली. जंजिऱ्याच्या सिद्दी खैरातखानाने इ.स. १६८९ सुवर्णदुर्गवर आक्रमण केले. सुवर्णदुर्गला वेढा दिला. बाहेरून किल्ल्यामध्ये जाणारी रसद बंद झाली. शेवटी किल्लेदार अचलोजी मोहिते यांनी किल्ला खैरातखानाच्या ताब्यामध्ये देण्याची तयारी केली. अचलोजि मोहिते यांचे सहाय्यक कान्होजी आंग्रे यांना सिद्दीला शरण जाणे मान्य नव्हते. कान्होजीने अंतस्थपणे संभाजी राजांशी संपर्क साधला. त्यांच्या आज्ञेप्रमाणे अचलोजी मोहिते यास कैद केले. कान्होजीने किल्ल्याबाहेर येऊन सिद्दीच्या सैन्यावर जोरदार हल्ला चढविला. यावेळी कान्होजीस सिद्दीने कैद केले. रात्रीच्या वेळी कान्होजी कैदेतून युक्तीने पळून गेले. ते पाण्यातून पोहत परत सुवर्णदुर्गमध्ये गेले. पराक्रमाची शर्थ करुन सुवर्णदुर्ग राखला. सिद्दीने कान्होजी आंग्रेशी तह केला.[१३९] यानंतर कान्होजी आंग्रे यांना सुवर्णदुर्गचे किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.[१४०] स्वराज्यात ठिकठिकाणी मोगलांची धामधुम सुरु होती. ऑक्टोबर–नोव्हेंबर १६८८

मध्ये कवि कलश यांचे व शिर्के यांच्यामध्ये वितुष्ट आले. कवि कलश शिर्क्यांना घाबरुन खेळणा किल्ल्यावर आश्रयास गेले.[१४१] छ. संभाजी कवि कलशासह खेळण्यावरुन पन्हाळामार्गे रायगडला येण्यासाठी निघाले. रायगडकडे परतण्याच्या प्रवासामध्ये जानेवारी १६८९ मध्ये दोघे संगमेश्वर येथे पोहोचले. नावाडी येथे छ. संभाजी व कवि कलश यांना १ फेब्रुवारी १६८९ रोजी मोगल सरदार मुकर्रबखानाने पकडले.[१४२]

कान्होजी आंग्रेने सिद्दीस शह देण्यासाठी गोवा हा किल्ला बांधला. पुढे सरखेल कान्होजी आंग्र्यांचे वर्चस्व या सर्व किल्ल्यांवर निर्माण झाले. छ. शाहूंनी कान्होजी आंग्रेशी केलेल्या करारामध्ये सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग, कनकदुर्ग व गोवा हे किल्ले कान्होजी आंग्रे यांना दिले. तेव्हापासून ते तुळोजी आंग्रेचा पाडाव होईपर्यंत हे सर्व किल्ले आंग्रे घराण्याच्या ताब्यातच होते. आंग्रे घराण्यातील सर्व प्रमुख सरदारांनी वेळोवेळी या किल्ल्यांची दुरुस्ती केली.

### ७) पद्मनाभदुर्ग(प्रणालकदुर्ग)

रत्नागिरी जिल्हयातील दापोली तालुक्यात पद्मनाभदुर्ग हा गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची १०० मीटर आहे.

### किल्ल्याचे वर्णन

पद्मनाभदुर्ग या किल्ल्याच्या पायथ्यास झोलाईदेवीचे मंदिर आहे. या किल्ल्याच्या माथ्यावर खापर व विटाचे तुकडे पसरलेले आहेत. तेथेच मधोमध एका जोत्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविलेला आहे. जोत्याशेजारी जुन्या बांधकामाचा एक घडीव दगड पडलेला आहे. माथ्यावर बांधकामाची तीन ते चार जोती आहेत. या जोत्यावर विटांचे बांधकाम केलेले आहे. या गडावर पश्चिमेला खडकात खोदलेली तीन पाण्याची टाकी आहेत.[१४३]

### ऐतिहासिक महत्त्व

या किल्ल्याचे जुने नाव पन्हाळे होते. शिलाहारांच्या काळात प्रणालक म्हणजे पन्हाळे हे गाव अस्तित्त्वात होते हे दिसून येते. प्रणालकदुर्ग हा किल्लादेखील त्याच काळातील असावा असे तेथील अवशेषावरून दिसते. आदिलशहा, छ.शिवाजी महाराज, पेशवे व इंग्रजांच्या काळात या भागात किल्ला बांधल्याची किंवा कोणतीही ऐतिहासिक घटना घडल्याची माहिती मिळत नाही.[१४४]

वशिष्टी नदी जिथे सागराला मिळते त्याच्या उत्तरेस दाभोळ हे प्रसिद्ध बंदर आहे. तर प्रणालक हे दुय्यम बंदर होते. या बंदरातून व्यापार चालत असे. खेड या ठिकाणी येथून माल

जात होता. तेव्हा या व्यापारी केंद्राचे, मार्गाचे संरक्षण करण्यासाठी या टेकडीवर पद्मनाभदुर्ग बांधला गेला असावा.[१४५]

## ८) दाभोळ

दाभोळा हा किल्ला दापोली तालुक्यात आहे. दाभोळ या किल्ल्याचा इतिहासामध्ये स्वतंत्रपणे कोठेही उल्लेख आलेला नाही. आज दाभोळ या ठिकाणी या किल्ल्याचे अवशेष कोठेही दिसून येत नाहीत. पण १५०३ मध्ये वर्थेमा(Varthema) याने हे बंदर युरोपियन पद्धतीच्या भिंतीनी बंदिस्त केलेले होते असा उल्लेख केला आहे. इ.स.१५०८ मध्ये दाभोळ हे मजबूत तटबंदी केलेला मजबूत किल्ला होता. त्याच्या संरक्षणासाठी ६००० सैन्य ठेवले होते. त्यापैकी ५०० तुर्क होते. प्रवाशांनीसुद्धा दाभोळच्या मजबूत तटबंदीचा उल्लेख इ.स.१५०८ मध्ये केला आहे. इ.स.१५१४ मध्ये सुद्धा दाभोळला तटबंदी असून त्यामध्ये संरक्षणासाठी शस्त्रास्त्रे होती. यामध्ये अनेक प्रसिद्ध व्यापाऱ्यांची भव्य घरे होती. मध्ययुगीन काळात दाभोळ हे एक व्यापारी बंदर होते. या बंदरातून परदेशातील मध्य आशियाई देशांशी व्यापार होत होता. वारंवार लुटण्यामुळे काही काळ दाभोळचे महत्त्व कमी झाले. इ.स.१५४७ मध्ये दाभोळ येथे ४००० रहिवाशी दोन किल्ले असल्याचा उल्लेख मिळतो. [१४६]

## ९) पालगड

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यात पालगड हा गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची २५० मीटर आहे.

### किल्ल्याचे वर्णन

या गडावर चढून जाण्यासाठी १०० पायऱ्या बनविलेल्या आहेत. या गडाचा दरवाजा दोन बुरूजाच्यामध्ये बसविला असून त्या दरवाजाची पूर्वीची कमान नसली तरी कमान पेलणारे दोन बुरूज खांब आजही दिसून येतात. प्रवेशद्वाराच्या आतील बाजूस समोरच एक मोठे दगडी जोते असून त्यावर दीड मीटर लांबीची तोफ ठेवलेली आहे. गडाच्या माथ्यावर बांधकाम केलेली तीन जोती आहेत. गडाच्या मधोमध खडकात खोदलेली एक छोटी विहीर आहे. वायव्येकडील तटबंदीवर एक तोफ उभी जमिनीत रोवून ठेवलेली आहे. गडाची तटबंदी व बुरूज आजही चांगल्या अवस्थेत असलेले दिसून येतात. या गडाचे वैशिष्टय म्हणजे या गडास एकच दरवाजा आहे. दुसरा नाही.[१४७]

### ऐतिहासिक महत्त्व

इ.स. १७२६ मध्ये कान्होजी आंग्रे यांचे जंजीरेकर सिद्दी याच्याबरोबर पालगड जिंकून घेण्यासाठी युद्ध झाले. यावेळी कान्होजींना पालगड घेणयत यश आलेले दिसत नाही. कारण इ.स.१७२९ मध्ये कान्होजी आंग्रे यांनी पालगड जंजिऱ्याच्या सिद्दीकडून घेतला अशी माहिती मिळते. पेशवे नानासाहेब यांच्या काळात रामाजी महादेव यांनी १६ मे १७५५ रोजी जे सात किल्ले घेतले त्यात पालगडचा ही समावेश होता. इ.स.१८१८ मध्ये हा किल्ला ब्रिटिशांनी जिंकून घेतला. [१४८]

### १०) महिपतगड

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यात महिपतगड हा गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ६०० मीटर आहे.हा किल्ला रसाळगड व सुमारगड या किल्ल्यांच्या शेजारी आहे.

### किल्ल्याचे वर्णन

महिपतगड किल्ल्यास एकूण सहा दरवाजे आहेत. त्यामध्ये खेड दरवाजा, यशवंत दरवाजा, पुसाटी दरवाजा, लालदेवडी दरवाजा, कोतवाल दरवाजा, शिवगंगा दरवाजा यांचा समावेश होतो. यातील खेड दरवाजा सोडला तर बाकीच्या दरवाजाचे अवशेष दिसून येतात. मात्र कमानी दिसत नाहीत. गडावर प्रवेश केल्यानंतर प्रथम एका जुन्या बंधाऱ्याची भिंत व त्या भिंतीमध्ये पावसाचे पाणी बाहेर काढण्यासाठी वाट केलेली आहे. हे पाणी तेथील एका छोटया बंधाऱ्यात अडविले जात होते. या गडावर पारेश्वर मंदिर, मारूती मंदिर व गणपतीचे मंदिर आहे. [१४९]

### ऐतिहासिक महत्त्व

महिपतगड किल्ल्याचा उल्लेख शिवकालीन कागदपत्रात दिसून येतो. श्री.रामदास स्वामी व छत्रपती शिवाजी महाराज यांनी या किल्ल्यास अनेकवेळा भेटी दिल्याचे पुरावे सापडतात. छ.शिवाजी महाराज हे साधु संतांचा कायम आदर करीत असत. महिपतगडाचा हवालदार दसमाजी नरसाळा यास मोरोपंत पिंगळे याने छ.शिवाजी महाराजांच्या आज्ञेने पत्र पाठविले. ८ ऑगस्ट १६७६ रोजी हे पत्र लिहिले असून त्यातील मजकूर पुढीलप्रमाणे होता.

दसमाजी नरसाळी, सरहवालदार, किल्ले महिपतगड यास, 'श्री गोसावी (रामदास स्वामी) शिवथर येथे राहतात. ते काही दिवसांसाठी महिपतगडावर राहायला येतील. त्यांना व त्यांच्या शिष्यांना गडावर प्रवेश करू द्यावा. त्यांना घर व मोकळी जागा देऊन काय हवेनको ते विचारणे. त्यांना जेवढे दिवस रहायचे असेल तेवढे दिवस गडावर राहून द्यावे'[१५०]

तुळाजी आंग्रे याने ८ जानेवारी १७५३ रोजी महाराणी ताराबाईस जे पत्र पाठविले आहे त्यातील मजकूर असा आहे की, महिपतगडाचा किल्लेदार व बाजी रूद्र हे छत्रपतींच्या विरोधात म्हणजे छ.रामराजांच्या विरोधात बंड करून छत्रपतीच्या किनारी प्रदेशावर हल्ला करण्याच्या तयरीत होते. त्यांना प्रतिकार करण्यास आपण (तुळाजी आंग्रे) तयार असल्याचे हे पत्र सांगत आहे. दि.१८ मार्च १७५५ रोजी खंडोजी माणकर गोसावी यांना श्री रामाजी महादेव यांनी पत्र पाठविले आहे. त्यामध्ये दिनकरपंत महिपतगड येथे गेले. पेशव्यांचे कोकणातील सुभेदार रामाजी महादेव व दिनकरपंत यांच्यामध्ये असा ठराव झाला होता की, इंग्रजांशी बोलणी करूनच तुळाजी आंग्रेविरोधातील मोहिमेचे नियोजन करावे.[१५१]

### ११) सुमारगड

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यात सुमारगड हा गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ६०० मीटर आहे. या गडाच्या पायथ्याला वाडी जैतापूर हे गाव वसलेले आहे.

#### किल्ल्याचे वर्णन

सुमारगड हा किल्ला रसाळगड व महिपतगड या दोन किल्ल्यांच्या मधोमध आहे. या गडाच्या माथ्यावर मधोमध ३ फूट आकाराचा भुयारासारखा दिसणारा बोगदा आहे. हा बोगदा पाण्याने भरलेला असतो. या गडावर जाण्यासाठी उजव्या बाजून घसाऱ्याची वाट आहे. ही वाट खूप अवघड आहे. दोराशिवाय एकवेळ चढता येऊ शकते. परंतु उतरता येणे अवघड आहे. त्यासाठी कातळारोहण सामग्री बरोबर घेऊनच गडावर जावे लागते. या गडाच्या दरवाजाचे अवशेषच आज पाहावयास मिळतात. माथ्यावर खडकात खोदलेली दोन पाण्याची टाकी आहेत. तसेच बांधकाम केलेले एक जोते आहे. गडावर दोन देवतांची मंदिरे आहेत. या गडावर इ.स.१८६२ मध्ये १६ तोफा होत्या.[१५२]

**ऐतिहासिक महत्त्व**

सुमारगड हा किल्ला सुरक्षिततेच्या कारणास्तव बांधला असावा. या किल्ल्याचा वापर हा एक चौकीनाक्याचा किल्ला किंवा टेहळणीसाठी वापरात येणारा किल्ला असाच असावा. इ.स.१८१८ मध्ये जेव्हा ब्रिटिशांनी किल्ले घेण्याचे प्रयत्न केले. त्यावेळी हा किल्ला घेण्याची आवश्यकता देखील त्यांना वाटली नसेल. कारण फारच छोटया जागेत म्हणजे अंदाजे पाऊण एकरात या किल्ल्याचे बांधकाम केले आहे. जेव्हा रसाळगड व महिपतगड ब्रिटिशांनी जिंकले त्याचवेळेस सुमारगड हा ब्रिटिशांनी सहजपणे जिंकून घेतला असावा.[१५३]

**१२)रसाळगड**

रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यात रसाळगड हा गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ३६०० मीटर आहे. या गडाच्या पायथ्याला पेठ किंवा झापाडी किंवा निमणी ही गावे वसलेली आहेत.

**किल्ल्याचे वर्णन**

या किल्ल्याचे जुने प्रवशेद्वार काढून त्या ठिकाणी नवीन बांधकाम केलेले आहे. या मुख्य दरवाजातून आत प्रवेश केल्यानंतर दुसऱ्या दरवाजाकडे जाताना रस्त्यात मारूतीचे मंदिर आहे. त्याच्या पुढे दोन बुरूजामध्ये बांधलेल्या दरवाजावर जंग्या आहेत. तिसऱ्या दरवाजाची कमान आज शिल्लक नाही. या किल्ल्याच्या माथ्यावर एक छोटा तलाव व दरवाजासमोर आणखी एक मोठा तलाव आहे.दोन तलावाच्या मधोमध एक मोठी तोफ आहे. तसेच तेथेच एक कबरी सदृश्य बांधकाम असून त्याच्या शेजारील बुरूजावर लहान तोफ आहे. तर तेथील झोलाई मंदीरामागे तटावर दोन ब्रिटिश बनावटीच्या तोफा आहेत.

गडावरील झोलाई मंदिरात झोलाई देवी, नवचंदी, शिवपार्वती, भैरव इ.अनेक मूर्ती आहेत. या मंदिराचे पुजारी पेठ येथील गावातील रहिवाशी आहेत. कान्होजी आंग्रे याचे मूळ आडनाव सकपाळ असे होते. येथील सकपाळ लोक त्यांचे वंशज असल्याचे सांगतात. मंदिराबाहेरील दोन उखळी तोफा ठेवलेल्या आहेत. मंदिरासमोर सध्या बांधलेली मोठी दीपमाळ आहे. तसेच नवीन पद्धतीने बांधलेला मनोरा आहे. या मंदिराशेजारी दोन तलाव आहेत. या तलावास लागूनच चौबुर्जी वाडा आहे. पूर्वेकडून वाडयात प्रवेश करता येतो. या वाडयात मधोमध बांधकमाचे जोते आहे. याशिवाय वाडयातील एका बुरूजावर तीन तीन तोफा ठेवलेल्या आहेत.

वाडयाच्या दक्षिणेला आणखी एक तोफ आहे. या मंदिराच्या पूर्वेकडे कोठार आहे. या कोठारासमोरच उभी जमिनीत गाडलेली एक तोफ आहे. त्याच्या शेजारी एका जोत्यावर दुसरी एक तोफ आहे. तसेच कोठासमोरच्या तटावर एक तोफ आहे. कोठाराशेजारील कडयाजवळ एक नंदी व शिवलिंग आहे. माथ्याच्या पूर्वेकडील बाजूला एका खोलगट भागात तीन समाधी सदृश्य शिळा रचलेल्या आहेत. त्यातील एक समाधी अलिबाग येथील कान्होजी आंग्रे यांच्या समाधीशी मिळतीजुळती आहे. पूर्व टोकाकडून ५० मीटर खाली उतरल्यास एक खांबटाके व टाक्याशेजारीच एक तोफ दिसून येते. या टाक्याच्या भिंतीवर श्रीगणेशाची प्रतिमा कोरलेली आहे. टाक्याच्या खांबांवर उत्तम कोरीव काम केलेले दिसते. या खांबाच्या कोरीव कामावरून हे टाके किल्ला बांधण्यापूर्वीचे असल्याचे निश्चित सांगता येते. या टाक्याच्या पूर्वेकडील बाजूला आणखी एक तोफ आहे.[१५४]

### ऐतिहासिक महत्त्व

रसाळगड किल्ल्याच्या बांधणीवरून असे स्पष्ट करता येते की, हा किल्ला छ.शिवाजी महाराजांनी बांधला असावा. छ.शिवाजी महाराजांच्या काळात किल्ल्यावर मोठी लढाई किंवा ऐतिहासिक घटना झाल्याची कोठेही नोंद नाही. इ.स. १७१६ पूर्वी रसाळगड येथे विठ्ठल कान्हो ठोसर यांचे भाऊ दादो कान्हो ठोसर हे सबनीस होते. छ.शाहू व कान्होजी आंग्रे यांच्यातील कराराप्रमाणे रसाळगड आंग्रे यांच्याकडे गेल्यानंतर दादो कान्हो ठोसर हे साताराला छत्रपतीकडे आले ते त्यावेळी बेराजगार झाले होते. त्यांना तळेगावला खंडेराव दाभाडे यांचे वाकेनिस म्हणून नेमण्यात आले. त्यांनी तळेगावला घर बांधले.[१५५]

संभाजी आंग्रे बाणकोट येथे २२ सप्टेंबर १७३३ रोजी होते. तेथून ते कुलाब्याला न जाता रसाळगडला जाणार होते. अशी माहिती आंग्रे शकावलीत शं.ना.जोशी देतात. १० एप्रिल १७३४ रोजी रसाळगडचे नामजाद तानाजी नाईक चाळके यांनी ब्रम्हेंद्र स्वामी यांना १५६, मोहरा, ५७ पुतळया, रूपये ६६१५ व ६ तोळे सोने पाठविले. १६ मे १७५५ रोजी गणेश कृष्ण पेंडसे यांनी रूमाजी दाभोळकर यांना लिहिलेल्या पत्रातील माहितीनुसार पेशव्यांचे सरदार रामाजी महादेव यांनी आंग्र्याकडून सात किल्ले जिंकून घेतले होते त्यात रसाळगड किल्ल्याचा समावेश होता.[१५६]

## १३) गोवळकोट

गोवळकोट किल्ल्याचे दुसरे नाव गोविंदगड हे आहे. हा किल्ला रत्नागिरी जिल्हयातील चिपळूण तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ६० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास गोवळकोट बंदर व करंजेश्वरी मंदिर आहे.

### किल्ल्याचे वर्णन

या गडाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस दोन बुरूज आहेत. यातील डावीकडील बुरूजावर आठ फूट लांबीच्या दोन तोफा आहे. तर उजव्या बुरूजावर एक प्लॅस्टिकची पाण्याची टाकी ठेवलेली आहे. या किल्ल्याच्या तटाच्या आतील बाजूस एक बांधीव टाके आहे. या टाक्याच्या आकार ४८ × ४४ फूट असून खोली २० फूट आहे. माथ्यावर दक्षिण बाजूस तटबंदीजवळ आधुनिक पद्धतीचे विझांई देवीचे मंदिर आहे. या मंदिरा बाहेरील भागात लहान घुमटी आहे त्यात रेडजाईदेवीची मूर्ती आहे. हा किल्ला तिन्ही बाजूने नदीने वेढलेला आहे. या किल्ल्याच्या पुर्वेकडील बाजूस खंदक असून तो मातीने बुजलेला आहे. या किल्ल्यावर इ.स.१८६२ मध्ये २१ तोफा होत्या. आज फक्त दोनच तोफा शिल्लक आहेत.[१५७]

### ऐतिहासिक महत्त्व

छ.शिवाजी महाराजांनी इ.स.१६७० मध्ये त्याची दुरूस्ती केली. हा किल्ला छ.शिवाजी महाराजांच्यानंतर सिद्दीकडे गेला असावा. १६ जुलै १७३३ रोजी प्रतिनिधी यांनी बकाजी नाईक यास परशुराम येथून बोलावून घेतले व गोवळकोट आपण घेऊ असा सल्ला दिला. तसे झाले तर वाद वाढतील असे पत्रकर्त्याचे म्हणणे आहे. गोवळकोट मोहिमेतून पेशव्यांच्याकडे तक्रार केलेले एक १६ जुलै १७३३ रोजीचे पत्र उपलब्ध झालेले आहे. त्यामध्ये असा मजकूर आहे की, प्रतिनिधी व त्याचे २५० सैन्य गोवळकोटला न लढता नुसतेच स्थीर बसले आहेत. सिद्दीसात व श्रीनिवास प्रतिनिधी यांच्यात बोलणी चालू होती. पत्रकर्ता व प्रतिनिधी यांच्यामध्ये वाद आहेत. ते वाढतील तरी पेशव्यांनी योग्य उपाय आधीच करावा. कारण प्रतिनिधी गोवळकोटवरून अंजनवेलकडे येणार अशी बातमी आहे.

जुलै १७३३ च्या पत्रात पुढील मजकूर दिलेला आहे. गोवळकोट सिद्दीकडून जिंकला की कोकणामधील मराठयांची सत्ता निष्कंटक होईल असा पत्राचा आशय आहे. श्रीनिवास पंतप्रतिनिधी यांनी सिद्दीशी बोलणी चालू केली होती. निजामाने सिद्दीस मदत करण्याची तयारी

केली होती. तेव्हा सिद्दीने आपला वकील जमातदार मोहनलाल यास निजामाशी बोलणी करण्यास पाठविले होते.

१९ ऑगस्ट १७३३ रोजी श्रीनिवास प्रतिनिधी यांनी पेशव्यांना छ.शाहूचे आलेले पत्र व त्यांनी दिलेले उत्तर यांचा वृत्तांत सांगून कळविले होते की, गोवळकोट किल्ल्याभोवती नदी आहे. या नदीचा पूर कमी झाल्यावरच पाऊस कमी झाल्यावर व काही करता येईल.

२ सप्टेंबर १७३३ रोजी पेशव्यांना आण्णाजी नाईक साटम यांचे पत्र आले होते. त्यामध्ये पेशव्यांनी बोलविल्याप्रमाणे आण्णाजी साटम पेशव्यांच्या भेटीस निघाले गोवळकोटजवळ सिद्दीशी युद्ध झाले. आण्णाजी साटम यांचे भाऊ माणकोजी साटम व इतर २५ सैनिक मरण पावले. आण्णाजी साटम विजयी झाले.

१५ ऑक्टोबर १७३३ च्या पत्रानुसार पेशवे धर्माजीपंत हिंमतबहाद्दर व सर्व सरदारांनी चर्चा करून ६ ऑक्टोबर १७३३ रोजी गोवळकोटवर हल्ला करून घ्यावा असे ठरले. या चर्चेमध्ये ठरल्याप्रमाणे महादजी घाटगे, सयाजी पंत, काही घोडदळ यांनी हिराबा दळवी यांच्या बागेकडून हल्ला चढविला. पेशवे यांनी कासी बंदरावरून हल्ला केला. काही सरदारांनी मोपमध्ये युद्ध सुरू करून सिद्दी सात यास बाहेर आणावे यमाजी पंत व हिंमत बहाद्दर यांनी पायदळ व इतर सैन्यासहित कालकेश्वराचा डोंगर उतरून गोवळकोटच्या पश्चिम बाजूवर आक्रमण केले. या ठिकाणी मराठे व सिद्दी सात याचे घनघोर युद्ध झाले सिद्दीच्या कासी बंदरामध्ये आलेल्या पाच गलबतांनी मारा केला यामध्ये मराठयांचे खूप सैनिक व घोडे जखमी झाली. या पत्रात पत्रकर्त्याने एक तक्रार केली आहे ती म्हणजे अंजनवेल खाडीत गंगाधरराव व महादजी घाडगे हे गेले होते. त्यांनी सिद्दीची ५ ते ७ सैनिक ठार केले. गोवळकोटला ठरलेल्या नियोजनाप्रमाणे मदत न मिळाल्यामुळे किल्ला जिंकता आला नाही अशीही तक्रार केली आहे.

१ नोव्हेंबर १७३३ रोजी संभाजी आंग्रे यांना छ.शाहू महाराजांनी पत्र पाठविले होते. या पत्रात संभाजी (सरखेल) आंग्र्याना आधी गोवळकोटच्या मोहिमेचा बंदोबस्त करण्यास सांगितले होते. पेशवे बाजीराव यांना संभाजी आंग्रे यांना सातारा दरबारात प्रत्यक्ष घेऊन येण्यास सांगितले होते.[१५८]

अशा प्रकारचा पत्रव्यवहार करून शेवटी इ.स.१७३४ मध्ये आंग्रे यांचे सरदार बकाजी महाडीक यांनी सिद्दी सात यांच्याकडून गोवळकोट जिंकून घेतला. २४ डिसेंबर १७३५ रोजी

दुर्गाजी भोईटे व संताजी आंग्रे यांनी गोवळकोटवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी गोवळकोट किल्ल्यास वेढा दिला होता. संताजी आंग्रे, येसाजी अनंत, हरजी नाईक हे सर्व आपापल्या सैनासहित गोवळकोटच्या मराठयांच्या सैन्यात सामील झाले. हे सर्वजण वेढयात सामील झाले युद्धाची सुरूवात झाली. परंतु आंग्र्याच्या सैन्याने जल्दबाजी केली. त्यामुळे यात आंग्र्यांचा पराभव झाला. ११ फेब्रुवारी १७४५ रोजी रामाजी महादेव यांनी इंग्रंजाना पत्र लिहीले. त्या पत्रामध्ये तुळाजी आंग्रे यांनी गोवळकोट घेतल्याची माहिती दिली आहे.गोवळकोटच्या लढाईत संताजी जाधव, दुर्गोजी भोईटे व बावाजी म्हसके याबरोबर आलेला आहे.[१५९]

## १४) भैरवगड

भैरवगड किल्ला रत्नागिरी जिल्हयातील चिपळुण तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ५०० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास हेळवाक व दुर्गवाडी ही गावे आहेत.

### किल्ल्याचे वर्णन

भैरवगड किल्ला हा सहयाद्री पर्वताच्या रांगेपासून वेगळा झालेल्या डोंगरावर आहे. या किल्ल्याच्या तीन बाजूने खोल दरी आहे. मात्र पूर्वेकडून गडावर जाण्यासाठी प्रवेशद्वारापर्यंत रस्ता आहे. गडाच्या तीनही बाजूस ताशीव कडे आहेत. या किल्ल्यावर भैरवाचे मंदिर आहे. या किल्ल्याच्या दरवाजातून तटबंदीवरून गडाच्या माथ्यावर जाण्यासाठी रस्ता आहे. या किल्ल्याचे बुरूज ढासळलेले आहेत. माथ्यावर एका कातळात पाण्याचे टाके आहे. या किल्ल्याचे क्षेत्रफळ सुमारे आठ एकर आहे. या किल्ल्यात पाण्याचा पुरवठा चांगला आहे.[१६०]

### ऐतिहासिक महत्त्व

हा किल्ला कोणी बांधला याविषयी कोठेच उल्लेख सापडत नाही. मात्र हा किल्ला दुर्गमतेविषयी प्रसिद्ध असल्याने त्याचा उपयोग घाटमार्गावरील हालचालीवर नजर ठेवण्यासाठी भैरवगड किल्ला बांधला. हे घाटमार्ग म्हणजे भैरव, गोवळ व सांबरसरी हे तीन होत.[१६१]

## १५) माणिकदुर्ग

माणिकदुर्ग किल्ला रत्नागिरी जिल्हयातील चिपळुण तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची २५० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास मांडकी खुर्द हे गाव जातो.

**किल्ल्याचे वर्णन**

माणिकदुर्ग किल्ल्याचा माथा उत्तरदक्षिण पसरलेला आहे. उत्तर दिशेला बुरूजाचे ढासळलेले अवशेष आहेत. दक्षिणेकडील भागात ३ ते ४ फूट खोल विहिरीसारखा दिसणारा खड्डा आहे. उत्तर टोकाच्या बुरूजाखाली सपाटीवर सुकाई देवीचे मंदिर आहे. गडावर मोठया प्रमाणात खापरांचे तुकडे व बांगडयाचे तुकडे पसरलेले आहेत. या बांगडया १५ व १६ व्या शतकातील असाव्यात असा अंदाज व्यक्त केला आहे.

माणिकदुर्ग किल्ल्याच्या बालेकिल्ल्याच्या पश्चिमेला कातळात पाण्याची टाकी खोदलेली आहे. यातील पहिल्या टाक्याची लांबी १८ फूट असून रूंदी १२ फूट आहे. तर दुसऱ्या टाके पहिल्या टाक्यापासून १५ फूट अंतरावर आहे. या टाक्याची लांबी १५ फूट व रूंदी १५ फूट आहे. या टाक्याच्या तोंडावर शिल्पकाम केलेले आहे. यामध्ये दोन्ही बाजूंना दोन भारवाहक, मध्ये हत्ती व एक स्त्रीसारखी दिसणारी प्रतिमा कोरलेली आहे. हे शिल्पकाम मध्ययुगीन काळातील आहे.[१६२]

**ऐतिहासिक महत्त्व**

विजयनगरच्या पवार या सरदाराकडे गुढे किल्ल्याच्या परिसरात अजून दोन किल्ले होते. त्यापैकी एक माणिकदुर्ग किल्ल्याच्या परिसरात सर्वेक्षण व उत्खनन केल्यावर असे दिसून आले की, किल्ला जरी विजयनगर राज्याच्या काळातील असला तरी गडावरील पाच लेणी व पाण्याची टाकी हे आठव्या व नवव्या शतकातील असावीत. डेक्कन कॉलेज पुरातत्त्व विभागातर्फे झालेल्या उत्खननात मध्ययुगीन काळातील खापरे, बांगडया इत्यादी वस्तू मिळाल्या आहेत.[१६३]

## १६) किल्ले नवते (गुढे)

गुढे/नवते किल्ला रत्नागिरी जिल्हयातील चिपळुण तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ५० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास गुढे हे गाव आहे.

**किल्ल्याचे वर्णन**

गुढेचा किल्ल्यात आतील व बाहेरील बाजूस खूप दाट झाडी आहे. त्यामुळे या किल्ल्यातील अवशेष स्पष्टपणे दिसत नाहीत. एवढेच नव्हे तर किल्ल्यात प्रवेश करणेही अवघड झालेले आहे. किल्ल्याच्या एका बाजूला ओढा असून त्या ओढयावर नैसर्गिक कातळाला तासून

त्याचा खंदक म्हणून कल्पकतेने वापर केलेला होता. या खंदकामध्ये सन १९५६ मध्ये दगडाच्या बांधाने ओढयाचे पाणी अडवले होते. सन १९६७ साली हा बांध फुटला व पाणी गावात शिरले. या बांधाचे अवशेष आजही पाहावयास मिळतात. ओढयाची किल्ल्याच्या बाजूची भिंत सुमारे १५ फूट उंच आहे. या भिंतीवर वरील बाजूस पुन्हा तटबंदीचे बांधकाम केलेले आहे. किल्ल्याच्या तटाबाहेरील भागात शंकराचे शिल्प कोरलेले आहे. किल्ल्याच्या बाहेरील भागात बांधकामाची जोती आहेत. एक खडकात खोदलेले टाके आहे. याशिवाय किल्ल्यावर हनुमान मंदिर, वामनेश्वर मंदिर, सात विहिरी, व शेषशायी विष्णूची दगडी मूर्ती बांधकामाची जोती दिसून येतात.[१६४]

### ऐतिहासिक महत्त्व

विजयनगर साम्राज्याच्या कोकणातील पवार या सरदाराने गुढे गावाजवळ हा किल्ला बांधला. तेथे पेठ वसविली. मध्ययुगीन काळात या किल्ल्याच्या बाहेरील बाजूस बाजारपेठ वसवली होती. आज त्या किल्ल्याच्या बाहेरील बाजूस जे अवशेष दिसतात. त्यावरून हे स्पष्ट होते.[१६५]

### १७) चिपळूण गढी

चिपळूण गढी रत्नागिरी जिल्हयातील चिपळुण तालुक्यात असून तो लहान किल्ला आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची १० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास कसबे चिपळूण हे गाव आहे. हसबी खानसाहेब जंजिरे राजपुरीकर यांनी किल्ले अंजनवेल व गोवलकोट इ.स.१६९८ मध्ये जिंकून घेतला. त्यानंतर छ.शाहू महाराजांच्या आज्ञेने नानासाहेब पेशवे यांनी इ.स.१७४३ मध्ये कसबे चिपळूण येथे गढी बांधली.[१६६]

### १८) गोपाळगड

गोपाळगड किल्ला रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ६५ मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास अंजनवेल पेठ हे गाव आहे.

### किल्ल्याचे वर्णन

या किल्ल्यास पूर्व व पश्चिम बाजूस दोन दरवाजे आहेत. या किल्ल्याच्या पायथ्यास जमिनीच्या बाजूस खंदक खणलेला आहे. या किल्ल्याचा पूर्वेकडील बाजूचा जूना दरवाजा

काढून त्या जागी लोखंडी नवीन दरवाजा बसविलेला आहे. मात्र या दरवाजाच्या वरील बाजूस कमानीची पडझड झालेली आहे. कमानीच्या बांधणीवरून हे स्पष्ट होते की, दरवाजाची वेळोवेळी दुरूस्ती केलेली आहे. दरवाजाच्या आतील बाजूस आमराई आहे. तसेच तटबंदीत एक खोली आहे. या खोलीचा दरवाजा कमानयुक्त आहे.[१६७]

गोपाळगडच्या तटबंदीवर पर्शियन लिपीतील एक शिलालेख कोरलेला आहे. हा शिलालेख १७०७ मधील आहे. या शिलालेखाचा मजकूर पुढीलप्रमाणे, 'एखाद्याने नवीन इमारत बांधली व ती बांधत असताना त्याला मृत्यूचे बोलावणे आले तर ती इमारत पुढे दुसऱ्याची होत नाही काय, फक्त परमेश्वर अजरामर आहे. बाकी सर्व वस्तू नाशवंत आहेत. अखलि जगदीपक यास महाराजांनी हा किल्ला बांधण्याची आज्ञा केली. त्यावरून हा किल्ला बांधला. परंतु तो पाहण्यास ते जिवंत राहिले नाहीत.'[१६८]

गोपाळगड किल्ल्यावर एक विहिर, हौद किंवा तलाव, एक पडका वाडा व अनेक जोती, दरवाजाच्या मागील बाजूस देवडया, युरोपियन बांधणीचा चौकोनी बुरूज इत्यादी अवशेष आहेत.[१६९]

### ऐतिहासिक महत्त्व

गोपाळगडचा उल्लेख आदिलशाहीच्या काळापासून येतो. त्यामुळे तो आदिलशाहीच्या काळात बांधला. इ.स.१६६० पर्यत हा किल्ला विजापूरच्या आदिलशहाकडे होता. छ.शिवाजी महाराजांनी कोकण मोहिमेत हा किल्ला जिंकून घेतला. पुढे छ.संभाजी महाराजांनी किल्ल्याची दुरूस्ती केली. छ.संभाजी महाराजांच्यानंतर हा किल्ला इ.स.१६९९ मध्ये सिद्दी खैरातखान या सिद्दीकडे गेला. इ.स.१७०७ मध्ये सिद्दी खर्यातखान याने पडकोट बांधून काढला. पडकोटातील शिलालेखावरून ही माहिती मिळते. ऑगस्ट १७३३ मध्ये पेशवे व आंग्रे यांनी एकत्र येऊन गोवळकोट व गोपाळगड घेण्याची तयारी चालू होती. सेखोजी आंग्रे यांनी पेशव्यांना पत्र पाठविले आहे. हे पत्र १७ जुलै १७३३ चे आहे. त्यानुसार सातारवरून छ.शाहू यांच्या आज्ञेवरून किल्लेदार बकाजी नाईक महाडीक व श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यांनी एकत्रपणे गोपाळगडचा वेढा लढवावा. पण पेशवे व सरखेल सेखोजी आंग्रे यांनी एकत्रितपणे प्रतिनिधीना यशाचे श्रेय मिळू नये असे ठरविल्यामुळे किल्लेदार बकाजी नाईक महाडिक यांना प्रतिनिधीना मदत न करण्याचे कळविण्यात आले. प्रतिनिधी नसतील तरी त्यास वेढा द्यावा. २० जानेवारी

१७४५ रोजी छत्रपती शाहू महाराजांनी इंग्रंजाना पत्र पाठविले की तुळाजी आंग्रे यांना गोपाळगड घेण्यासाठी मदत करावी. या पत्रानंतर २३ जानेवारी १७४५ रोजी तुळाजी आंग्रे यांनी अंजनवेलचा किल्ला सिद्दी याकूतखान याच्याकडून रात्री जिंकून घेतला व त्याचे नाव गोपाळगड ठेवले. गोपाळगड किल्ला तुळाजी आंग्रे यांनी जिंकून घेतला त्यावेळी देवराय मेघःशाम यांनी छत्रपतींना १४ फेब्रुवारी १७४५ रोजी पत्र पाठविले होते. त्यामध्ये असा मजकूर होता की, यादव सबनाजी प्रभू सबनीस सीद्दी सातला सामील होते. त्यांना तुळाजी आंग्रे यांनी अंजनवेल(गोपाळगड) जिंकल्यावर कुटुंबासहित कैद केले. परमहंस स्वामीच्या मध्यस्थीने या सर्वांना सोडविण्याचा प्रयत्न देवराय मेघःशाम हे मराठा सरदार करीत होते. यावेळी तुळाजी आंग्रे यांनी या किल्ल्यावर बालेकिल्ला बांधला. इ.स.१७५५ मध्ये गोपाळगड तुळाजी आंग्रेकडून पेशव्यांकडे आला. पण पुन्हा तो आंग्र्यांनी जिंकून घेतला. अखेर पेशव्यांचे सेनापती रामाजी महादेव यांनी आंग्र्याकडून २४ जानेवारी १७५६ रोजी गोपाळगड जिंकून घेतला.[१७०]

### १९) कासारदुर्ग

कासारदुर्ग किल्ला रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची १०० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास शीर हे गाव आहे.

### किल्ल्याचे वर्णन

कासारदुर्ग या किल्ल्याच्या तीनही बाजूस कुटगिरी नदीचे पात्र आहे. तर चौथ्या जमिनीकडील बाजूस दक्षिणोत्तर १५ फूट रूंदीचा व साडेपाच फूट खोलीचा खंदक आहे. खंदकाची लांबी ३५० फूट आहे. खंदकाच्या आतील भागात तटबंदीचे अवशेष आहेत. या किल्ल्याचा खंदक हा चढउतारांचा असल्याने तेथे पाणी राहू शकत नाही. सध्या या किल्ल्यावर भात शेती केली जाते. या शेतीच्या कामामुळे किल्ल्याचे अवशेष नष्ट होत चालले आहेत.[१७१]

### ऐतिहासिक महत्त्व

विजयनगरचा सरदार पवार याने कोकणातील जी दोन ठाणी घेतली होती. त्यामध्ये कासारदुर्ग हा किल्ला होता. कासारदुर्ग परिसरात शंभर वर्षापूर्वी कासार लोकांची वसाहत होती. असे स्थानिक लोकांनी दिलेल्या माहितीवरून समजते. कासारदुर्ग, गुढे व माणिकदुर्ग हे तीनही किल्ले पालशेत बंदरावरून कऱ्हाड या बाजारपेठेकडे जाणाऱ्या व्यापारी मार्गावर आहेत. व्यापारी

मार्गावर कर गोळा करण्यासाठी आणि या मार्गावरून जाणाऱ्या व्यापाऱ्यांना व वाटसरूंना सरंक्षण देण्यासाठी हे तीन किल्ले बांधले असावेत.[१७२]

## २०) विजयगड

विजयगड किल्ला रत्नागिरी जिल्हयातील गुहागर तालुक्यात असून तो सागरीदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची १० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास तवसाळ हे गाव आहे.

### किल्ल्याचे वर्णन

विजयगड किल्ला शास्त्री नदीच्या मुखावर वसलेला आहे. या किल्ल्याच्या तटबंदी व दरवाजे नष्ट झालेले आहेत. हा किल्ला दाट झाडीत आहे. या किल्ल्यावर जुन्या बांधकामाची दोन जोती तसेच बुजलेल्या दोन विहिरींचे अवशेष आहेत.[१७३]

### ऐतिहासिक महत्त्व

या किल्ल्याचा उल्लेख आंग्रे काळातच येतात. ३० जून १७३३ रोजी विजयगड सेखोजी आंग्रे यांनी रघुनाथ बाबाजी म्हस्के यांच्याबरोबर एकत्र येऊन जिंकून घेतला. ही लढाई अंदाजे ६ ते ७ दिवस चालू होती. या किल्ल्याचा उपयोग खाडीतील व्यापारी वाहतुकीवर नजर ठेवण्यासाठीची चौकी म्हणून हा किल्ला बांधला असावा.[१७४]

## २१) प्रचितगड

प्रचितगड या किल्ल्याचा उचितगड या नावाने अनेक ऐतिहासिक कागदपत्रात उल्लेख आलेला आहे. मराठा काळात एकाच वेळी कोकण, सातारा व कोल्हापूरकडील हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी प्रचितगड या किल्ल्याचा उपयोग होत होता. अशा या प्रचितगड किल्ल्याने मराठयांच्या इतिहासात महत्त्वपूर्ण कामगिरी केलेली आहे. या किल्ल्यावरील अवशेषावरून हा किल्ला मराठ्यांच्याच ताब्यात राहिला हे कळते.

### किल्ल्याचे वर्णन

प्रचितगड हा किल्ला रत्नागिरी जिल्हयात आहे. एका टोकाला घनदाट अरण्य आणि दुसऱ्या टोकाला खोल दऱ्या यामुळे हा किल्ला दुर्गम बनला आहे. हा गड चढण्यास व उतरण्यास अतिशय अवघड असल्याची प्रचिती शत्रूला येत असल्याने या किल्ल्याला प्रचितगड असे नाव पडले असावे. हा किल्ला चांदोली अभयारण्यात असल्याने तेथे गवा, रानडुक्कर, अस्वल, गेंडा,

सांबर, साळींदर, बिबटया व पट्टेवाला वाघ अशी वन्यजीव वावरताना दिसतात.[१७५]

प्रचितगड हा किल्ला सहयाद्रीच्या मुख्य रांगेत दक्षिणोत्तर पसरलेला आहे. या किल्ल्यावर दरवाजापर्यंत जाण्यासाठी लोखंडी शिडीचा वापर करावा लागतो. लोखंडी शिडी संपल्यावर कातळात खोदलेल्या १० ते १२ पायऱ्या चढून गेल्यावर दरवाजाचे अवशेष आहेत. आज त्या ठिकाणी दरवाजाची कमान अस्तित्त्वात नसली तरी कमान ज्या खांबावर उभी होती. ते खांब तेथे आहेत. या किल्ल्याचा दरवाजा उत्तराभिमुख आहे. दरवाज्याच्या आतील बाजूस इतर किल्ल्याप्रमाणे देवडया असलेल्या दिसत नाहीत.[१७६]

प्रचितगड किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची ५४० मीटर आहे. या किल्ल्याच्या तिन्ही बाजू तासलेल्या कडयाप्रमाणे असून याची उत्तरेकडील बाजू सहयाद्रीच्या मुख्य रांगेला चिकटलेली आहे. या गडावर जाण्यासाठी पाच मार्ग आहेत. प्रचितगडाच्या प्रवेशद्वाराचा उजवीकडील बुरूज व त्याच्या शेजारील दगडी खांब एवढेच अवशेष आज तेथे पाहावयास मिळतात. गडावर वाडयांचे व घरांचे अवशेष पाहावयास मिळतात. तेथेच एका घुमटीमध्ये भवानी देवीच्या मूर्तीसह आणखी दोन मूर्ती आहेत. या भवानी मंदिराच्यासमोर प्रचितगडाच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या चार तोफा ठेवलेल्या आहेत.[१७७]

प्रचितगडावर पूर्व दिशेला खडकात खोदलेल्या पाच पाण्याच्या टाक्या आहेत. त्यातील एका टाकीचे तोंड उघडे असून त्यात आत उतरण्यासाठी पायऱ्याही आहेत. या टाक्याचे पाणी खडकातून पाझरणारे असल्याने स्फटिकासारखे शुभ्र व थंडगार आहे. तसेच गडावर दारूचे कोठाराची छत नसलेली इमारत आहे. या गडाचा कोकणाकडील जो उतार आहे. तेथे खडकात खोदलेला एक बुरूज आहे. या समोरच एक सुळकेवजा भाग आहे. त्यास 'वांदरटेंभा सुळका' असे म्हणतात.[१७८]

## किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व

प्रचितगड कोणी बांधला याबाबत इतिहासात नोंद नाही. पण या किल्ल्याची कातळ कोरीव टाकी, बुरूज पाहता याची बांधणी शिवपूर्वकालात झाली असावी असे अनुमान काढता येते. या गडावरून एकाच वेळी कोकण, सातारा व कोल्हापूरकडील हालचालीवर लक्ष ठेवता येत असे.

सन १६५९ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी दाभोळ जिंकले त्यावेळी तेथील आदिलशाही सरदार जसवंतराव हा पळून शृंगारपूरच्या सुर्वेच्या आश्रयास आला. शिवकाळात शृंगारपूर गाव प्रसिद्ध होते. तेथे सूर्यराव सुर्वे हा राज्य करीत होता. प्रचितगडावर त्यांची हुकमत होती. छत्रपती शिवाजी राजांनी सूर्यराव सुर्वेस समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. जसवंतरावास आपल्या ताब्यात देण्यास सांगितले परंतु तो दाद देत नाही हे पाहून छत्रपती शिवाजी राजांनी २९ एप्रिल १६६१ रोजी शृंगारपूर जिंकून घेतले. त्याचवेळी प्रचितगडही स्वराज्यात सामील केला.[१७९] छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रचितगड जिंकून घेतल्याचा उल्लेख शिवभारत, जेधे शकावली व शिवचरित्र प्रदीप या ग्रंथात दिलेला आहे. प्रचितगड किल्ल्यावरील वास्तू व अवशेष पाहून किल्ला कधीच मोगलांकडे किंवा इतर शाहयांकडे सत्ताधिशाकडे गेला नाही हे स्पष्ट होते.[१८०]

सन १६६४–६५ मध्ये पिलाजी शिर्के यांची कन्या येसूबाई हिचा विवाह छत्रपती संभाजी राजांशी झाला. छत्रपती शिवाजी महाराज १ नोव्हेंबर १६७६ रोजी कर्नाटक मोहिमेवर गेले त्यावेळी छत्रपती संभाजी येसुबाईसह शृंगारपूर येथे दोन वर्षे मुक्कामी होते. त्यावेळी त्यांचा प्रचितगडासी कितीतरी वेळा संबंध आलेला होता. या मुक्कामात त्यांनी 'बुधभूषणम्' हा ग्रंथ लिहीला. पुढे १६८८ साली शिर्केनी छत्रपती संभाजी महाराजांच्याविरूद्ध बंडखोरी केली. छत्रपती संभाजी राजांनी त्यांचा पराभव करून रायगडला जाताना वाटेत संगमेश्वर येथे मुक्काम केला. दुर्दैवाने शिर्केच्या फंदफितुरीमुळे मोगल सरदार मुकर्रबखानाने संगमेश्वरला संभाजीराजांना कैद केले. पुढे सन १७१२ मधील छत्रपती शाहू महाराज व रामचंद्रपंत अमात्य यांच्या करारात प्रचितगडाचा उल्लेख आला आहे.[१८१]

उत्तर पेशवाईच्या काळात चतुरसिंगाने १८१५ च्या सुमारास प्रचितगड ताब्यात घेतला आणि त्याच्या आधाराने त्याने आजूबाजूच्या प्रदेशावर ताबा ठेवला. पेशवाईच्या अस्तानंतर ब्रिटिशांनी प्रचितगडावर विशेष मोहिम काढली. यावेळी कर्नल कनिंगहॅम आणि कॅप्टन स्लिपर यांनी प्रचितगडाच्या जवळ लांब पल्ल्याच्या तोफा चढवल्या. तोफगोळयाचा भेदक मारा करून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी चतुरसिंगास शरण येण्यासाठी आवाहन केले. मात्र चतुरसिंगाने बंदुकीच्या साहाय्याने ब्रिटिशांना चोख प्रत्युत्तर दिले. शेवटी १० जून १८१८ रोजी किल्ला इंग्रज कर्नल प्रोर्थर या अधिकाऱ्याने जिंकून घेतला. ब्रिटिश सैनिकांनी किल्ल्यात घुसून चतुरसिंगास कैद

केले. अशाप्रकारे प्रचितगड किल्ला ब्रिटिशांनी आपल्या ताब्यात घेतला.[१८२]

## २२) भवानीगड

भवानीगड किल्ला रत्नागिरी जिल्हयातील संगमेश्वर तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. भवानीगड हा किल्ला मुंबई–गोवा महामार्गावर संगमेश्वरपासून १० कि.मी.अंतरावरील तुरळ या गावाजवळ आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची १५० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास राजेवाडी किंवा कडवई हे गाव आहे.

### किल्ल्याचे वर्णन

भवानीगड किल्ल्याच्या पूर्वेकडील बाजूस दरवाजा आहे. या दरवाजाच्या बाहेरील बाजूस तीन पाण्याची टाकी आहेत. त्या टाक्यांची नावे अनुक्रमे साखरटाके, राजनमुख टाके व पाळणाटाके अशी नावे आहेत. या टाक्यांना बारमाही पाणी असते. या किल्ल्याचा दरवाजाची कमान पडलेली आहे. या दरवाजाचे अवशेषच राहिलेले दिसून येते. किल्ल्यावरील परिसर फक्त दीड ते दोन एकर एवढाच आहे. या किल्ल्यावर भवानी देवीचे मोठे मंदिर आहे. हे मंदिर शिवकाळात बांधलेले असावे असे काही तज्ज्ञाचे मत आहे. या मंदिराच्या समोरच शंकराचे मंदिर आहे. भवानी मंदिरात शेंदूर लावलेली एक ३ फूट लांबीची तोफ ठेवलेली आहे.[१८३]

### ऐतिहासिक महत्त्व

भवानीगड किल्ल्याच्या बांधकामावरून हा किल्ला शिवकाळापूर्व किंवा शिवकाळातील आहे हे सांगता येणे अवघड आहे. इ.स.१६६१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्याची दुरूस्ती करून तेथे भवानी देवीचे मंदिर बांधले असावे, असे काही इतिहास तज्ज्ञाचे मत आहे.[१८४]

## २३) संगमेश्वर गढी

संगमेश्वर गढी ही संगमेश्वर तालुक्यात आहे. सहयाद्रीखंड यामध्ये संगमेश्वर हे मुळात रामक्षेत्र म्हणून ओळखले जात होते. याठिकाणी परशुराम उर्फ भार्गवराव याने देवळे बांधली. सातव्या शतकामध्ये चालुक्य राजा कर्ण हा कोल्हापूरवरून संगमेश्वर येथे आला. त्याने संगमेश्वर हे आपल्या प्रशासनाचे मुख्य केंद्र केले. या नगरास त्याने तटबंदी, मंदिरे, राजवाडे बांधून त्याचे शहरात रूपांतर केले तिच ही संगमेश्वर गढी होय. १६ व्या शतकामध्ये ते एक प्रमुख आदिलशाही केंद्र झाले. बार्बोसा याने व्यापार व वाणिज्य याने समृद्ध असलेले शहर

म्हणून संगमेश्वरचा उल्लेख केला आहे. छ.संभाजी यांना याच नगराजवळ नावाडी येथे औरंगजेबाचा सरदार शेख निजाम याने पकडले. या किल्ल्याचे इतर संदर्भ व सध्याचे अवशेष आढळत नाहीत.[१८५]

## २४) जयगड

जयगड किल्ला रत्नागिरी तालुक्यात असून तो सागरीदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ५५ मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास जयगड पोलीस चौकी आहे.

### किल्ल्याचे वर्णन

जयगड पोलिस चौकी ते किल्ल्याचा मुख्य दरवाजा यांचे अंतर पाच कि.मी. आहे. मुख्य दरवाजाशेजारी पूर्वेकडे एक लहानसा दरवाजा असून ही वाट जयगड बंदराकडे जाते. मुख्य दरवाजा आदिलशाही काळात बांधलेला आहे हे त्या दरवाजावरील कमानीवरून कळते. या कमानीवर इस्लामी स्थापत्या प्रभाव आहे. त्यावर दोन कमळशिल्प व मधोमध गुलमोहरासारख्या फुलांचे शिल्प कोरलेले आहे. किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या आतील डाव्या बाजूस तटबंदीत खोल्या आहेत. समोरच एक मोठा वाडा आहे. मुख्य दरवाजाच्या वर मेघडंबरीच्या जागेवर ब्रिटिश काळातील दुमजली विश्रामगृह बांधलेले होते. सध्या ते मोडकळीस आलेले आहे. किल्ल्याच्या माथ्यावर उत्तरेकडील बाजूस तीनमजली वास्तू दिसून येते. या वास्तूमागे एक मोठा तलाव आहे. या तलावाला लागून एक गणेश मंदिर आहे. मंदिरासमोर दोन दीपमाळा आहेत. गणेश मंदिरासमोर तटबंदीमध्ये जयबाचे स्मारक आहे. मंदिराच्या मागे वायव्येला एका मोठया वाडयाची वास्तू आहे. या वास्तूच्या मागे ब्रिटिश काळात बांधलेले एक विश्रामगृह आहे. या इमारतीच्या मागे दोन विहिरी आहेत. विश्रामगृहाच्या उत्तरेकडील बाजूस किल्ल्याचा दुसरा दरवाजा आहे. या दरवाजातही देवडया आहेत. दरवाजाजवळील तटभिंतीत खोल्या बांधलेल्या आहेत.

जयगड किल्ल्याचे बालेकिल्ला व पडकोट असे दोन भाग आहत. मुख्य किल्ल्याला १४ बुरूज व पडकोटाला १० बुरूज आहेत. पडकोटात मुख्य दरवाजाच्या रस्त्यावर २० फूट उंचीचे तीन दगडी स्तंभ आहेत. या स्तंभाजवळच कातळकडयात मोहमायी य स्थानिक देवतेचे मंदिर आहे. पडकोटामध्ये खाडीजवळ दहा बुरूज बांधलेले आहेत.[१८६]

**ऐतिहासिक महत्त्व**

जयगड या किल्ल्याच्या बांधकाम पद्धतीवरून तो विजापूरकरांनी बांधला असावा असे वाटते. इ.स.१५७८–८० या दरम्यान जयगड संगमेश्वर येथील नाईकांनी आदिलशहाकडून जिंकून घेतला. त्यानंतर किल्ला घेण्याचे विजापूरकरच्या आदिलशहाने अनेक प्रयत्न केले पण त्यांना तो कधीच घेता आला नाही.[१८७] जयगडच्या बालेकिल्ल्याचे बांधकाम शिवाजी महाराजांच्या काळात झाले. इ.स.१६९५ मध्ये जयगड हा कान्होजी आंग्रे यांच्याकडे होता. सातारचे छत्रपती शाहू महाराज व कान्होजी आंग्रे यांच्यात झालेल्या चर्चेमध्ये बाळाजी विश्वनाथ भट यांनी कान्होजींना शाहू महाराजांच्या पक्षात आणले. छत्रपती शाहू महाराजांनी कान्होजीचे १० किल्ले व स्वतःकडील ६ असे एकूण १६ किल्ले व सरखेलपद कान्होजी आंग्रे यांना बहाल केले.[१८८] हा किल्ला शेवटपर्यंत आंग्रे यांच्याकडेच राहिलेला आहे. आंग्रे शकावलीत कान्होजी आंग्रे यांनी हा किल्ला इ.स.१७२४ मध्ये बांधला आहे असा उल्लेख आहे. परंतु ते सुसंगत वाटत नाही. कान्होजी आंग्रे यांच्या काळात जयगड किल्ल्याची दुरूस्ती झाली असावी. सेखोजी आंग्रे यांच्या १५ सप्टेंबर १७२९ रोजी केलेल्या पत्रव्यवहारात जयगडच्या किल्लेदाराचा उल्लेख येतो. ९ एप्रिल १७३४ रोजी संभाजी आंग्रे विजयदुर्ग किल्ल्यावरून जयगडावर आल्याची माहिती मिळते. शेवटी १८१८ मध्ये हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात आला.[१८९]

## २५) रत्नदुर्ग

रत्नदुर्ग किल्ला रत्नागिरी तालुक्यात असून तो सागरीदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची १०० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास रत्नागिरी बंदर आहे.

**किल्ल्याचे वर्णन**

रत्नदुर्ग या किल्ल्याचे तीन प्रमुख भाग पडतात. त्यामध्ये महादरवाजा, दीपगृह परिसर व भगवती मंदिर यांचा समावेश होतो. या किल्ल्याच्या पूर्वेकडील महादरवाजात हनुमानाचे मंदिर आहे. या मंदिरासमोर एक मोठी खोली आहेत. या किल्ल्याच्या दुसऱ्या दक्षिणाभिमुख दरवाजा शेजारी बुरूज आहे. मुख्य दरवाजाच्या आतील बाजूस मदिराशेजारी पाण्याची दोन टाकी आहेत. या टाक्यांच्या बाजून जांब्या दगडातील बांधकाम केले आहे. उत्तरेकडे असणाऱ्या तटावर एक कोनाडा असून त्याच्या शेजारी घुमटीसदृश्य लहान खोली आहे. या तटबंदीची रूंदी

८ ते १० फूट आहे. तटबंदीतील एका बुरूजामधून आत उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. एक मोठे विहिरीसारखे बांधकाम तटाला लागून आहे. या तटबंदीत एकूण ८ बुरूज आहेत.[१९०]

दुसऱ्या दीपगृह परिसरात कोळी वस्तीतून दीपगृहाकडून जाताना रस्त्यात रतनगिरी बाबांची समाधी आहे. त्यांच्या नावावरून रत्नागिरी हे नाव पडले असावे. दीपगृह भागात सव्वा कि.मी.लांबीची तटबंदी आहे. दीपगृहाजवळ एक बुरूज आहे. शेजारी १२ फूट लांबीच्या चार तोफा ठेवलेल्या आहेत.

गडाचा तिसरा भाग म्हणजे भगवती मंदिर परिसर आहे. या भागास बालेकिल्ला असेही म्हणतात. या भागात तटबंदीत अकरा बुरूज आहेत. हा भाग समुद्रापसून साधारणपणे २०० फूट उंच आहे. बालेकिल्ल्याच्या दरवाजाजवळ एक बुरूज आहे. बालेकिल्ल्यावर भगवती मंदिर आहे. या मंदिराचा १९८९ मध्ये मंदिराच्या ट्रस्टने जीर्णोद्धार केलेला आहे. या परिसरात कर्मचाऱ्यांची घरे व कार्यालये आहेत. भगवती मंदिराशेजारी उत्तरेला तीन भुयारी मार्ग आहेत. हे भुयारी मार्ग किल्ल्याबाहेरील भागात निघून जाण्यासाठी केले आहेत. कारण गडाला एकच पूर्वाभिमुख दरवाजा आहे. त्यामुळे आणीबाणीच्या प्रसंगी या भुयाराचा वापर केला जात असावा.[१९१]

**ऐतिहासिक महत्त्व**

रत्नदुर्ग हा किल्ला बहामनी काळात बांधला गेला. पुढे विजापूरच्या आदिलशहाकडे इ.स.१६६० पर्यंत होता. किल्ल्याचा काही भाग विजापूरकरांनी बांधला आहे. छ.शिवाजी महाराजांच्या काळात या किल्ल्याची दुरूस्ती झाली. तर काही भाग आंग्रे काळात बांधला. असे गडावरील अवशेषावरून दिसते. इ.स.१६७० मध्ये छ.शिवाजी महाराजांनी कोकणातील अनेक किल्ले जिंकून घेतले त्यामध्ये या किल्ल्याचा उल्लेख सापडतो. याच सुमारास छ.शिवाजी महाराजांनी त्यावर बुरूज बांधला आहे. विजयदुर्गच्या धुळुपांशी झालेल्या लढाईमध्ये एक सिद्दी सरदार या बुरूजावर मारला गेला. इ.स.१७१० ते १७५५ या काळामध्ये रत्नदुर्ग हा आंग्र्यांकडे होता. रत्नागिरी मामल्याबद्दल राजश्री भगवंतराव अमात्य हूकमतपन्हा यांस श्रीराजा शंभू छत्रपती यांनी ६ एप्रिल पत्र पाठविले होते. त्यानुसार रत्नदुर्ग जिंकल्यानंतर नारोराम हरकारा व मल्हारजी सूर्यवंशी हे हत्ती घेऊन बावडयास आलेस ते हत्ती स्वामीस देणार आहेत. असे वर्तमान कळले असल्याचे छत्रपतींनी कळवले होते. इ.स.१७५५ नंतर किल्ला पेशव्यांकडे आला.

इ.स.१७९० मध्ये धोंडो भास्कर प्रतिनिधी यांनी किल्ल्यांची डागडुजी केली.[१९२]

## २६) पूर्णगड

पूर्णगड किल्ला रत्नागिरी तालुक्यात असून तो सागरीदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ३५ मीटर एवढी आहे. हा किल्ला मुचकुंदी नदीच्या उत्तर काठावर वसलेला आहे. तो खाडीच्या मुखाजवळ आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास पूर्णगड गाव आहे.

### किल्ल्याचे वर्णन

पूर्णगड या किल्ल्याच्या मुख्य दरवाजाबाहेर हनुमानाचे मंदिर आहे. या किल्ल्याच्या महाद्वारावर शिल्प कोरलेले आहे. यामध्ये चंद्र सूर्य व मधोमध गणेशाची प्रतिमा कोरलेली आहे. दरवाजाच्या आतमध्ये देवडया असून एका देवडीत दगडी पात्र ठेवलेले आहे. या किल्ल्याचे बांधकाम जांभा दगडात केलेले आहे. महादरवाजाच्या आतील बाजूस  जुन्या बांधकामाच्या तीन जोत्यांचे अवशेष आहेत. या जोत्यामागे तटबंदी आहे. पश्चिमेकडील तटबंदीतून सागराकडे जाण्यासाठी १० फूट उंचीचा दरवाजा बांधलेला आहे. किल्ल्यातून तोफा व बंदुकीचा मारा करण्यासाठी ठिकठिकाणी तटबंदीत व बुरूजात जंग्या आहेत.[१९३]

### ऐतिहासिक महत्त्व

आंग्रे शकावलीत हा किल्ला कान्होजी आंग्रे यांनी इ.स.१७२४ मध्ये बांधला अशी नोंद आहे. कान्होजी आंग्रे यांचा मृत्यू १७३० मध्ये झाला. इ.स.१७३२ मध्ये किल्ला पेशव्यांकडे होता. पेशव्यांच्या काळात हरबाराव धुळप यांच्याकडे हा किल्ला होता. त्यांनी गडावरील कारभारासाठी भोसले, गवाणकर, कनोजे, आम्ब्रे यांची नेमणूक केली होती. या लोकांचे वंशज आजही या परिसरात राहतात. इ.स.१८१८ मध्ये हा किल्ला इंग्रजांनी ज्किंून घेतला.[१९४]

## २७) साठवली गढी

साठवली ही गढी रत्नागिरी जिल्हयातील लांजा तालुक्यात आहे. या गढीची पायथ्यापासूनची उंची १० मीटर एवढी आहे. ही गढी मुचकुंदी नदीच्या उत्तर काठावर आहे. या गढीच्या पायथ्यास साठवली विठ्ठल मंदिर आहे.

**किल्ल्याचे वर्णन**

साठवली गढीचा दरवाजा दोन बुरूजामध्ये बांधलेला आहे. या बुरूजाची उंची १० ते १५ फूट एवढी आहे. गढीचा एकूण तटबंदीयुक्त परिसर हा साधारणतः ३ ते ४ एकर एवढा आहे. भग्न दरवाजातून आत गेल्यावर एक मोठे झाड आहे. या झाडाजवळ एक आयताकृती विहिर आहे. या विहिरीत एक मोठे झाड आहे. या विहिरीशेजारीच एक गोलाकार घडीव दगड पडलेला आहे. तसेच एक वाडयाच्या बांधकामाचा चौथरा ही तेथे आहे. या गढीच्या उत्तरेला दोन बुरूज, दक्षिणेला एक व पूर्वेला तीन बुरूज आहेत.[१९५]

**ऐतिहासिक महत्त्व**

मध्ययुगीन काळात साठवली या गढीचा उपयोग मुचकुंदी नदीच्या खाडीतील दुय्यम व्यापारी बंदर म्हणून केला जात होता. या गढीपासून प्रभानवल्लीमार्गे विशाळगडावर जाता येत होते. हा व्यापार आधुनिक काळापर्यत चालू होता. साठवलीमार्गे होणाऱ्या व्यापारावर देखरेख करण्यासाठी, या व्यापाराला संरक्षण देणाच्या दृष्टीने साठवली येथे ही गढी बांधला होता. साठवली किल्ल्याच्या पायथ्याला जे विठ्ठल मंदिर आहे त्याचे बांधकाम गुजराथच्या एका व्यापाऱ्याने केले आहे. इ.स.१७१३ मध्ये छ.शाहू महाराज व कान्होजी आंग्रे यांच्यातील तहामध्ये जे १६ किल्ले कान्होजी आंग्रे यांना मिळाले. त्यात साठवलीचा किल्ला होता. इ.स.१८१८ मध्ये हा किल्ला इंग्रजांनी जिंकून घेतला. इ.स.१८०१ ते ०५ च्या दरम्यान दुसरे बाजीराव पेशवे असताना रत्नागिरी जिल्हयातील इतर किल्ल्यांबरोबरच साठवली गढीचा दहा वर्षांचा सविस्तर जमाखर्च पाठविण्याचा आदेश रत्नागिरी किल्ल्याच्या कारखानीसास श्री. गणेश निळकंठ यास देण्यात आला.[१९६]

**२८) यशवंतगड**

यशवंतगड हा किल्ला रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यात असून तो सागरीदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची पायथ्यापासूनची उंची ५० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास नाट व जैतापूर ही गावे आहेत. हा किल्ला जैतापूर खाडीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलेला आहे.

### किल्ल्याचे वर्णन

किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या बाहेर १० फूट रूंदीचा एक खंदक खणलेला आहे. मुख्य दरवाजाला लागूनच एक छोटे सिद्ध पुरूषाचे मंदिर बांधलेले आहे. हे मंदिर आधुनिक काळात बांधलेले आहे. खंदकाच्या तटभिंतीवर खडकात हनुमानाचे शिल्प कोरलेले आहे. पुढे खंदकात एक विहिर आहे. त्याच्या पुढील बाजूस गडाचा पूर्वाभिमुख महादरवाजा आहे. या दरवाजाच्या आतील बाजूस सैनिकासाठी दोन खोल्या आहेत. किल्ल्याच्या माथ्यावर मधोमध एक गोलाकार १५ ते २० फूट उंचीचा बुरूज आहे. त्या बुरूजावर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. या बुरूजाशेजारी पाण्याचे टाके आहे. या बुरूजात प्रवेश करण्यासाठी एक दरवाजा आहे. या दरवाजावर शिल्पे कोरलेली आहेत. या बुरूजात तोफा व बंदुका यातून मारा करण्यासाठी रकाने व जंग्या केलेल्या आहेत. या किल्ल्याच्या दक्षिण तटात भुयारसदृश्य कोनाडा आहे. या तटातच गडाचा दुसरा दरवाजा आहे. या दरवाजातून खाडीत उतरता येते. दरवाजाच्या आतील भागात देवडया बनविलेल्या आहेत. गडाच्या पश्चिमेकडील तटात तिसरा दरवाजा आहे. दरवाजाबाहेरील बाजूस खाडी आहे. या दरवाजापासून एक तटबंदी आहे. या तटबंदीतून बालेकिल्ल्यात जाता येते. या तटबंदीत दोन बुरूज आहेत. या बुरूजाशेजारी बालेकिल्ल्याकडे जाणारा एक दरवाजा आहे. अशाप्रकारे यशवंतगड किल्ल्यास एकूण ३ दरवाजे व १७ बुरूज आहेत.[१९७]

### ऐतिहासिक महत्त्व

हा किल्ला कोणी बांधला याविषयी निश्चित माहिती मिळत नाही. परंतु किल्ल्याच्या बांधकामाच्या अवशेषावरून हा किल्ला छ.शिवाजी महाराजांनी दुरूस्त केला असावा. तर आदिलशहा किंवा निजामशहा यांच्या काळात बालेकिल्ल्याचे झाले असे दिसते. छ.शिवाजी महाराजांच्या काळात महादरवाजा व खाडीपर्यत तटबंदी हे काम झाले राजापूर हे महत्त्वाचे व्यापारी बंदर छ.शिवाजी महाराजांच्याकडे होते. त्यामुळे या बंदराचे संरक्षण करण्यासाठी तसेच जैतापूर खाडीतून राजापूरकडे येणाऱ्या बोटीवर नजर ठेवण्यासाठी यशवंतगड हा किल्ला दुरुस्त करुन मजबूत केला. इ.स.१७६७ मध्ये छ.शिवाजी महाराजांच्या सैन्याचे सिद्दी व मोगल यांच्याबरोबर जैतापूर गावाजवळ युद्ध झाले होते. यामध्ये सिद्दी व मोगलानी जैतापूर जाळले होते. यावेळी मराठे एका टकडीच्या आश्रयाने लढले होते.[१९८]

## २९) आंबोळगड

आंबोळगड हा किल्ला रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यात असून तो गिरिदुर्ग प्रकारातील आहे. या किल्ल्याची समुद्र सपाटीपासूनची उंची २० मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास आंबोळ हे गाव आहे.

### किल्ल्याचे वर्णन

आंबोळगड या किल्लयास दोन्ही बाजूने खंदक खोदलेला आहे. या किल्ल्याचा दरवाजा दोन बुरूजाच्या मध्ये आहे. या किल्ल्यात बांधकामाची चार जोती आहेत. त्यातील एका जोत्याजवळ दगडात घडवलेले पात्र आहे. विहिरीशेजारील दुसरे मोठया आकाराचे दगडी पात्र आहे. किल्ल्यात एक आयताकृती विहिर आहे. किल्ल्याच्या पश्चिमेकडील भागात एक गंजलेली तोफ आहे. हा किल्ला साधारणतः ३००० चौरस फूट भागात पसरलेला आहे.[१९९]

### ऐतिहासिक महत्त्व

मध्ययुगीन काळात आंबोळगडाचा उपयोग हा जैतापूर खाडीमार्गे राजापूरकडे जाणाऱ्या बोटीच्या वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी बांधला होता. आंबोळगड हा चौकी नाका म्हणून किंवा सागरी वाहतुकीवर टेहळणी करण्यासाठी बांधलेला किल्ला होता. इ.स.१६९० रोजी आंबोळगड कान्होजी आंग्रे यांच्याकडे होता. इ.स.१६९४ मध्ये या किल्ल्याजवळ कंपनीची जहाजे विल्यम कीड नावाच्या चाच्याने लुटली होती.[२००] १५ जानेवारी १८७१ रोजी झालेल्या वादळात जनरल ऑट्रम नावची आगबोट आंबोळजवळ बुडाली. इ.स.१८१८ मध्ये कर्नल इम्लाक या इंग्रज अधिकाऱ्याने आंबोळगड मराठयाकडून जिंकून घेतला.[२०१]

## ३०) राजापूर

राजापूर हा किल्ला रत्नागिरी जिल्हयातील राजापूर तालुक्यात असून तो गढीवजा किल्ला आहे. या किल्ल्याची समुद्र सपाटीपासूनची उंची २५ मीटर एवढी आहे. या किल्ल्याच्या पायथ्यास राजापूर हे गाव आहे. हा किल्ला नदीच्या काठावर बांधलेला आहे.

### किल्ल्याचे वर्णन

इंग्रजांनी आपल्या वखारीच्या संरक्षणासाठी हा किल्ला बांधला होता. राजापूर गावातील जवाहर चौक येथून धुतपापेश्वर मंदिराकडे जाण्यासाठी नदीवर दगडी पूल आहे. या पुलाजवळ ५० मीटर अंतरावर नदीच्या पूर्व किनाऱ्यावर हा गढीवजा किल्ला आहे. या किल्ल्यात ब्रिटिश

काळातील दुमजली सरकारी कार्यालयाची इमारत आहे. या कार्यालयाकडून एक रस्ता खाडीकडे जातो. या वाटेने ५० मीटर खाडीच्या दिशेने बांधीवर पायऱ्या आहेत. त्याच्यापुढे एक २५ फूट उंचीचा बुरूज आहे. कार्यालयाच्या डाव्या बाजूस १० द १० फूट आकाराची विहीर आहे. या विहिरीच्या मागे तटबंदीत १५ फूट उंचीचा दुसरा बुरूज आहे. किल्ल्यामध्ये सरकारी कार्यालय व पोलिस वसाहत यांच्यामध्ये एक मोठे जोते दिसते.[२०२]

**ऐतिहासिक महत्त्व**

रत्नागिरी जिल्हयातील प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेले राजापूर हे व्यापारी बंदर आहे. शिवकाळात हे बंदर प्रसिद्धीस आले होते. इ.स.१६३८ च्या ब्रिटिश कागदपत्रात या बंदराचा उल्लेख आलेला आहे. इ.स.१६४९ मध्ये व्यापारी बंदराच्या दृष्टीने इंग्रजांनी राजापूर येथे वखार बांधली. इ.स.१६६० ते १६७० मध्ये छ.शिवाजी महाराजांनी स्वारी करून ही वखार लुटली. इ.स.१६६१ मध्ये वखार लुटण्याचे कारण विजापूरकरांना इंग्रजांनी छ.शिवाजी महाराजांविरूद्ध मदत केली होती. त्यानंतर इंग्रजांची वखार ३७१७ पौंडांचा तोटा सहन करून बंद पडली. इ.स.१६६८ मध्ये वखार इंग्रजांनी पुन्हा सुरू केली. पण इ.स.१६७० मध्ये पुन्हा छ.शिवाजी महाराजांनी स्वारी केली. शेवटी १० वर्षांनी इंग्रजांनी वखार बंद केली. याच वेळी फ्रेंच कंपनीने वखार सुरू केली. ही वखार इ.स.१६७० मध्ये छ.शिवाजी महाराजांनी लुटली.[२०३] पुढे इ.स.१७१० पूर्वीच ही वखार कायमची बंद झाली. राजापूर येथून कोल्हापूरला जाण्यासाठी घाटमार्गाचा वापर केला जात होता. अशाप्रकारे राजापूर हे कोल्हापूरजवळचे सागरी बंदर होते.[२०४]

**निष्कर्ष –**

कोकण हा सह्याद्री पर्वतरांगामुळे महाराष्ट्राच्या इतर प्रदेशापासून वेगळा पडला आहे. या प्रदेशामधील घनदाट जंगल असलेला सह्याद्रीचा पर्वतमय प्रदेश, अरबी समुद्र, खाड्या व समुद्रातील बेटे आहेत. घनदाट जंगल असलेल्या सह्याद्रीमुळे कोकणामध्ये किल्ल्यांमधील अंतर खूपच कमी आहे. रत्नागिरी जिल्हयाच्या भौगोलिक स्थितीने किल्ल्यांच्या उभारणीस पोषक स्थळे पुरवली. सहयाद्री डोंगर रांगांनी गिरीदुर्ग तर समुद्रापर्यत पोहचलेल्या डोंगर सुळक्यांनी व समुद्रातील बेटांनी जलदुर्ग उभारण्यास पोषक स्थळे पुरवली. हा प्रदेश घनदाट जंगल व खोल दऱ्या यांच्यामुळे तो सहजपणे वेगवेगळा करता येणे अशक्य आहे. छ. शिवाजी

महाराजांनी या भौगोलिक वैशिष्ट्याचे लष्करी महत्त्व बरोबर ओळखले. त्यांनी या प्रदेशामध्ये किल्ले दुरुस्ती व बांधणी केली. त्यांनी लष्करी डावपेचांसाठी तसेच या प्रदेशावर कायम वर्चस्व टिकविण्यासाठी किल्ल्यांच्या रुपात संरक्षक स्थळे निर्माण केली.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे किल्ले दक्षिण कोकणमध्ये आहेत. आदिलशाह व मोगल बादशहा यांनी सुरुवातीला या प्रदेशाकडे दुर्लक्ष केले. दुर्गम सह्याद्री व समुद्रापलिकडे प्रत्यक्ष वर्चस्व निर्माण करण्याचे मानसिक सामर्थ्य त्यांच्यामध्ये नव्हते. रत्नागिरी जिल्ह्याला बाह्य आक्रमणाचा धोका कमी होता. आक्रमकाला महाराष्ट्राचा इतर प्रदेशच नव्हे तर भक्कम सह्याद्रीही पार करावा लागे. आदिलशहा व मोगल बादशहा यांचे आरमारी सामर्थ्याकडे दुर्लक्ष होते. आदिलशहाने या प्रदेशामध्ये आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून सत्ता राबविली. पोर्तूगीज व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले. त्यांची राजकीय वर्चस्व निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा होती. व्यापार व राजकीय वर्चस्वासाठी त्यांनी गोवा व कोकणामध्ये शक्य तो प्रदेश व किल्ले जिंकले. त्यांनी स्वतःचे आरमार व आरमारी किल्ले उभारले. स्थानिक राज्यकर्त्यांना प्रलोभने, लष्करी दबाव अशा विविध मार्गांनी ही सागरी सत्ता पोर्तूगीजांनी वाढविली. पोर्तूगीजांपाठोपाठ इंग्रजांनी हाच मार्ग अनुसरला. परकीयांचा हा धोका छ. शिवाजी महाराजांनी द्रष्टेपणाने जाणला. त्यांनी कोकणातील इतर प्रदेशासह रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गिरीदुर्गांबरोबर सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, जयदुर्ग, अंजनवेल, बाणकोट यासारखे आरमारी किल्ले ताब्यात ठेवले. या किल्ल्यांच्या आधाराने आरमारी सामर्थ्य वाढविले.

रत्नागिरी जिल्ह्यातील मानवी अस्तित्त्वाचे पुरावे पन्नास हजार (५०,०००) वर्षांपुर्वीचे मिळतात. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये इतिहासपूर्व काळाचे पुरावे सुसरोंडी, जयदुर्ग, हातरवंबा, गणपती पुळे, बारसव याठिकाणी व सुमुद्रामध्ये भिंतीच्या रुपात आढळतात. पुराव्याच्या अभावी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आर्यीकरणाची सुरुवात कधी झाली हे निश्चित सांगता येत नाही.

प्राचीन काळापासून ग्रीक व्यापाऱ्यांना रत्नागिरी जिल्ह्यातील बंदरांचा परिचय होता. ही बंदरे आंतरराष्ट्रीय व्यापार व वाहतूकीची केंद्रे होती. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये प्रमुख व्यापारी मार्गांच्या जवळपास बौद्ध लेणी व महत्त्वाची बौद्ध केंद्रे होती. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सातवाहन, त्रैकुटक, वाकाटक, चालुक्य राजघराण्यांची सत्ता होती. बदामीच्या चालुक्य राजांचे रत्नागिरी जिल्ह्यातील स्थानिक राज्यकर्त्यांशी वैवाहिक संबंध होते. रत्नागिरी जिल्ह्यावर प्राचीन

काळातील राज्य करणारे शेवटचे घराणे राष्ट्रकूट हे होते.

मध्ययुगाच्या सुरुवातीस रत्नागिरी जिल्ह्यामध्ये शिलाहार व इतर स्थानिक राज्यकर्त्यांची सत्ता होती. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये साम्राज्य विस्तार व संरक्षणासाठी किल्ल्यांचा वापर याच काळामध्ये प्रथम सुरु झाला. मध्ययुगामध्ये रत्नागिरीचा प्रदेश जिंकण्यासाठी राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, कदंब, कल्याणचे चालुक्य यांच्यामध्ये सतत संघर्ष झाला. यापैकी शिलाहारांचा अपवाद वगळता इतर घराण्यांचे रत्नागिरीच्या प्रदेशावर अल्पकाळ वर्चस्व निर्माण झाले. शिलाहार राज्यकर्त्यांनी स्वतंत्र व मांडलिक राज्यकर्ते म्हणून रत्नागिरी जिल्ह्यावर दीर्घकाळ सत्ता गाजविली. चालुय राजांनी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी मंदिरे बांधली. बाराव्या शतकामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये स्थानिक राज्ये उदयास आली. देवगिरीच्या यादवांनी ही स्थानिक राज्ये जिंकून रत्नागिरी जिल्ह्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. यादव राजांच्या नाशानंतर मलिक काफूरच्या अनुपस्थितीने रत्नागिरी जिल्ह्यामध्ये परत स्थानिक राज्ये उदयास आली. रत्नागिरी जिल्हा हा चौदाव्या शतकात विजयनगरच्या सरंजामदारांच्या ताब्यात होता. या सरंजामदारांनी रत्नागिरी जिल्ह्यात अनेक अर्धस्वतंत्र, स्वतंत्र स्थानिक राज्ये निर्माण केली. १५ व्या शतकात महंमद गवान या बहामनी वजीराने रत्नागिरी जिल्ह्यावर बहामनी सम्राटाचे वर्चस्व स्थापन केले. बहामनी सत्तेच्या ऱ्हासानंतर या जिल्ह्यात निजामशहा, आदिलशहा यांचे वर्चस्व स्थापन झाले. पोर्तुगीज, डच, इंग्रज या परकीय सत्तांच्या भारतातील आगमनानंतर या परकीय सत्तांनी विशेषत: पोर्तुगीजांनी या प्रदेशावर प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी आदिलशाही सत्तेचे या प्रदेशातील प्रमुख केंद्र दाभोळवर लष्करी दबाव ठेवला. डच व इंग्रज या प्रतिस्पर्ध्यांमुळे पोर्तुगीजांची सत्ता दुर्बळ होत गेली. त्यांनी भारतीय स्थानिक राज्यकर्त्यांशी मवाळ धोरण ठेवले. सम्राट अकबराच्या काळामध्ये इ.स. १६०० च्या दरम्यान खानदेश, अहमदनगर, विजापूर, गोवळकोंडा येथील राजांनी मोगल बादशहास खंडणी देण्याचे मान्य केले. पण येथील राज्यकर्त्यांनी मोगलांशी सतत संघर्ष चालूच ठेवला. या संघर्षात अहमदनगरचा अल्पवयीन सुलतान बहादूर निजामशाह व खानदेशचा राजा मीरन बहादूर यांना सम्राट अकबराने इ.स. १६०० मध्ये ग्वाल्हेरच्या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवले. संधी मिळेल त्याप्रमाणे विजापूरचा आदिलशाह, गोवळकोंड्याचा कुतुबशाह व अहमदनगरचे निजामी सरदार मोगलांना विरोध करत. दक्षिणेत मोगलांची अप्रत्यक्ष सत्ता असली तरी रत्नागिरी जिल्ह्यामधील

प्रदेश दक्षिणी शाह्यांच्या, विशेषत: आदिलशाही सरदारांच्याच ताब्यात होता. संगमेश्वरचे शिर्के, पालवणीचे दळवी, जंजिऱ्याचा सिद्दी हे आदिलशाही सरदार म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील वेगवेगळ्या प्रदेशांचा कारभार पहात. अहमदनगर व विजापूरच्या सुलतानांनी कोकण किनाऱ्यावरील पोर्तुगीज, इंग्रज व डच या परकीयांचा बंदोबस्त करण्याचे काम आपापल्या कुवतीनुसार केले.

पंधराव्या शतकामध्ये महमंद गवान या बहामनी सरदाराने रत्नागिरी जिल्ह्यातील बराच प्रदेश जिंकला. यानंतर रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या प्रदेशामध्ये निजाम, आदिलशाह व पोर्तुगीज यांचे वर्चस्व निर्माण झाले. आदिलशहाने दळवी, सुर्वे, शिर्के व इतर सरदारांच्या माध्यमातून रत्नागिरीवर आपले राजकीय वर्चस्व ठेवले. मराठा सरदार शहाजी भोसले यांचा मुलगा शिवाजी यांनी इ.स. १६४६ मध्ये आदिलशाही सरदाराकडून तोरणा किल्ला जिंकला. इ.स. १६५३ मध्ये छ. शिवरायांनी स्वराज्याचा पाया घातला. इ.स. १६५८ मध्ये छ. शिवाजी महाराजांनी दक्षिण कोकणवर आपले वर्चस्व मिळविले.

शिवकाळापासून ते पेशवाई नष्ट होईपर्यंत रत्नागिरी जिल्ह्यावर मराठा छ., पेशवे, आंग्रे, मोगल, सिद्दी व शेवटी इंग्रजांची सत्ता स्थापन झाली. या सर्वांच्या लष्करी हालचालींचे प्रमुख केंद्र रत्नागिरी जिल्ह्यात राहीले.

छ. शिवाजी महाराजांनी रत्नागिरी जिल्ह्याचे सामुद्री व्यापार व वाहतुकींवर नियंत्रण ठेवण्याच्या व आरमारी दृष्टीकोनातून महत्त्व ओळखले. त्याचप्रमाणे त्यांनी या प्रदेशावर वर्चस्व निर्माण केले. रत्नागिरी जिल्ह्याच्या भौगोलिक स्थितीचा रत्नागिरी जिल्ह्याच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाला आहे. घनदाट अरण्ये असलेल्या प्रदेशाने हा जिल्हा अतिशय दुर्गम केला. रत्नागिरीचा प्रदेश महाराष्ट्राच्या दख्खन पठारापासून वेगळा झाला आहे. त्यामुळे या प्रदेशातील लोक स्वातंत्र्यप्रिय होते. या जिल्ह्यास पश्चिम बाजूस अरबी समुद्राचे संरक्षण होते. या जिल्ह्यावर पूर्वेकडून आक्रमणाचा धोका खूप कमी होता. कारण महाराष्ट्राचा इतर प्रदेश पार करण्याबरोबर परकीय आक्रमकाला भक्कम सह्याद्री पार करण्याची मानसिक तयारी करावी लागे.

## संदर्भ


१) http://www. General Information of Ratnagiri Distric [M.S.India]

२) जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश, खंड १४, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निमिर्ती मंडळ, मुंबई, १९८९, पृ. ४२५

३) मंडल डी.एन, भारत सरकार, जलसंसाधन मंत्रालय, केंद्रिय भूजल बोर्ड, महाराष्ट्र राज्य के अंतर्गत रत्नागिरी जिले की भूजल विज्ञान जानकारी, मध्यवर्ती क्षेत्र, नागपूर,२००९,पृ. ०१

४) Pathan K.G. (Edt.), Mangnale Y.S., Sandarbh Maharashtra, Vol II, Intellectual Bool Bureau, Bhopal, 2004, P. 314

५) कित्ता.

६) http://www.censusindia-gov.in

७) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ, खंड १, दार्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२, पृ. ५

८) तत्रैव

९) http://mumbai readyreckoner.org/2010/04/acheulian – cave – an - susrond:konkan–Maharashtra / www.scribd/com/ doc/ 56731059/ palshet-Guhagar-cave

१०) तत्रैव.

११) तत्रैव.

१२) पवार जयसिंगराव(संपा.), विभूते भालबा, महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पूनर्मांडणी, शाहू संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, २०११, पृ. २१२

१३) दळवी दाऊद, प्राग ऐतिहासिक गूढ आकृत्या, लोकसत्ता (लोकरंग), २२ सप्टेंबर १९९६.

१४) पवार जयसिंगराव(संपा.), विभूते भालबा, उपरोक्त, पृ. १६१

१५) www.abovetopsecret.com/forum/pg/hinduismtoday.com

१६) शेजवलकर त्र्यं.शं., कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमि, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६१, पृ. ७

१७) पवार जयसिंगराव(संपा.), विभूते भालबा, उपरोक्त, पृ. १६३

१८) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५, पृ.७४

१९) कित्ता, पृ. १००

२०) Gazetteer of Bombay Presidency, (Rantagiri & Sawantwadi Districts) Vol X, Bombay, 1880, P. 94

२१) तत्रैव

२२) फडके रामचंद्र माधवराव, रत्नागिरी जिल्हा. राजकीय इतिहास, १९२९, पृ. १

२३) खोबरेकर वि. गो.(संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृति, त्रैमासिक, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, जुलै–सप्टेंबर २००४, पृ. ४५

२४) तत्रैव

२५) प्रत्यक्ष चर्चा, डॉ. प्रभुणे, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, २५, नोव्हेंबर २०१३

२६) Gazetteer of Bombay Presidency, Vol X, P.102

२७) तत्रैव

२८) गोखले शोभना, पुराभि लेख विद्या, पृ. १३४

२९) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, पृ. १४०,

* केतकर श्री. व्य.,प्राचीन महाराष्ट्र, भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. १७३

३०) Sharma I.K., J. Var Prasad Rao, Early Brahmi Inscription From Sannatec, Harman Publishing House, New Delhi, 1993, P. 63

३१) Gazzeteer Of Bombay, Presidency, Vol X, P. 103

३२) थापर रोमिला, अनुवादित, प्रारंभापासून इ.स. १३०० पर्यंतचा प्राचीन भारताचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७ पृ. २६५

३३) झा व्दिजेन्द्र नारायण(संपा.), श्रीमाली कृष्णमोहन, प्राचीन भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्व विद्यालय, दिल्ली, पुनर्मुद्रण २००८, पृ. २३६

३४) शेजवलकर त्र्यं.शं., कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी, पृ. १२

३५) दिक्षित लीला(संपा.), कोकण : विविध दिशा आणि दर्शन, प्रतिमा प्रकाशन पुणे, २०११, पृ. १०४

३६) Gazzetteer of Bombay Predensy Vol. X,  P. 105.

३७) शर्मा आर. एस्., एन्शंट इंडिया, अनुवादित, (प्राचीन भारत), के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ. २३४

३८) मिराशी वा. वि., सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख, १९७९, पृ. ७३

३९) Gazzetteer Of Bombay, Presidency, Vol X,   P. 106,

* पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ (खंड १) पृ. ३०५

४०) दळवी दाऊद(संपा.), कोकण इतिहास परिषद, शोधनिबंध संग्रह, ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे, २०१२, पृ. ९९

४१) तत्रैव.

४२) कित्ता, पृ. १०१.

४३) Gazzetteer Of Bombay, Presidency, Vol X, P. 97

४४) Indian Antiquary, Vol IX, 1880, P. 124 - 130

४५) खरे ग.ह. (संपा.), पुनःसंपादन देशपांडे ब्रह्मानंद, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड १ ते ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, २००९ –१०, परिशिष्ट २, पृ. १०२

४६) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या, पृ. १८८

४७) शेजवलकर त्र्यं.शं., कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी, पृ. १५

४८) पाठक अरूणचंद्र(संपा.), उपरोक्त, पृ. ३०९

४९) दळवी दाऊद(संपा.), कोकण इतिहास परिषद, संशोधन पत्रिका, ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे, २०१२, पृ. ६०

५०) पाठक अरूणचंद्र(संपा.), महाराष्ट्र गँझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ, पृ. ३०९

५१) Gazzetteer of Bombay Presidency, Vol-X, P.106

५२) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, पृ. २८

५३) थापर रोमिला, भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, पंद्रहवी आवृत्ति, २०००, पृ. १५७

५४) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ, पृ. ३३१

५५) कित्ता, पृ. ३३२

५६) फडके रामचंद्र, रत्नागिरी जिल्हा राजकीय इतिहास, पृ. १

५७) मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख, नागपूर, १९७४,पृ. ४१,४२

५८) दिक्षित लीला(संपा.), कोकण : विविध दिशा आणि दर्शन, पृ.१०५

५९) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ, खंड १, पृ. ३९४

६०) तत्रैव

६१) कित्ता, पृ. ३९५.

६२) तत्रैव

६३) मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास, पृ. १८१.

६४) खरे ग.ह. (संपा.), पुनः संपादन, देशपांडे ब्रह्मानंद, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड ३, पृ. १६

६५) खोबरेकर वि.गो. (संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृती, त्रैमासिक, जुलै–सप्टें २००४, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, २००४, पृ. ४५

६६) कांबळे आर. एच. (संपा.), कोकण इतिहास परिषद, १ले, अधिवेशन, संशोधन निबंधांचे संकलन, प्राचीन काळ, गोगटे–जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी,२०११, पृ. ६

६७) Indian Antiquary, Vol V, 1876, P. 20

६८) कांबळे आर. एच. (संपा.), उपरोक्त, पृ. ६

६९) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ, खंड १, पृ. ३६८

७०) तत्रैव

७१) तत्रैव

७२) फडके रामचंद्र माधवराव, उपरोक्त, पृ.१

७३) दळवी दाऊद(संपा.), कोकण इतिहास परिषद, शोधनिबंध संग्रह, पृ. ९७

७४) कित्ता, पृ.९८

७५) खरे ग.ह. (संपा.), पुन:संपादन देशपांडे ब्रह्मानंद, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, पृ. १११

७६) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, इतिहास : प्राचीन काळ, खंड १, पृ. ४३४

७७) शेजवलकर त्र्यं.शं., कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी, पृ. ३०

७८) तत्रैव

७९) वर्मा हरीशचंद्र(संपा.), मध्यकालीन भारत, भाग १, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्व विद्यालय, दिल्ली, तैतीसवाँ संस्करण, २००८, पृ. २२६

८०) Gazzetteer of Bombay Presidency, Vol X, P. 128.

८१) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, पृ.१५

८२) श्रीवास्तव आशीर्वादीलाल, दिल्ली सल्तनत,शिवलाल अग्रवाल एण्ड कम्पनी, आग्रा, नवीन संशोधित संस्करण, पृ. २५७,

* वर्मा हरीशचंद्र, मध्यकालीन भारत पृ. २६९

८३) श्रीवास्तव आशीर्वादीलाल, दिल्ली सल्तनत, पृ.२५२

८४) पवार जयसिंगराव(संपा.), विभूते भालबा, महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी, पृ. १७७

८५) वर्मा हरिश्चंद्र, उपरोक्त, पृ. २८१

८६) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, पृ. १५

८७) खोबरेकर वि.गों., कोकणचा राजकीय इतिहास, पृ. १६

* फडके रामचंद्र, रत्नागिरी जिल्हा राजकीय इतिहास, पृ. ४

८८) Gazzetteer of Bombay Presidency, Vol X, P. 131.

* खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, पृ. १६

८९) वर्मा हरिशचंद्र, उपरोक्त, पृ. २८६

९०) श्रीवास्तव आशिर्वादीलाल, उपरोक्त, पृ. २५४

९१) फडके रामचंद्र, उपरोक्त, पृ. ४

९२) तत्रैव

९३) तत्रैव

९४) Gazzetteer of Bombay Presidency, Vol X, P. 138.

९५) Loc. Cit.

९६) खरे ग.ह. (संपा.), ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४९ पृ. १६

९७) फडके रामचंद्र, रत्नागिरी जिल्हा, राजकीय इतिहास, पृ.५

९८) बेंद्रे वा.सी., पोर्तुगीजांच्या महाराष्ट्रातील हालचाली, मुंबई मराठी ग्रंथालय प्रकाशन, मुंबई, १९६७, पृ. १३

९९) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, पृ.२७

१००) गोगटे चिंतामण गंगाधर, महाराष्ट्र देशातील किल्ले भाग २, प्र.आ. इंदिरा, १ सन १९०७, पृ.८०, ८१

१०१) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, 1880, P. 776, P. 740.

१०२) गोगटे चि.गं., उपरोक्त, पृ. ८१

१०३) पगडी सेतूमाधवराव(संपा.), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. ३३.

१०४) अक्कलकोट सतीश गुरूसिद्ध, दुर्ग खंड पहिला, सहयाद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली, पृ.२८२ ते २८४

१०५) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्हयाची दुर्गजिज्ञासा, बुकमार्क पब्लिकेशन्स पुणे, प्रथम आवृत्ती, मे २०११, पृ.१२

१०६) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ. ९,११,२३

१०७) गोगटे चिंतामण गंगाधर, महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग २, इंदिरा, पुणे, १९०७, पृ. ८९

१०८) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, 1880, P. 776

१०९) Sardesai G.S.(Edt.), Shivani Sourenir, 1927, (Section Marathi), P. 74

११०) दिवेकर सदाशिव महादेव(संपा.), कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत, शब्दवेध प्रकाशन, पुणे, दु.आ., १९९८, पृ. ३१६

१११) Gazetteer of the Bombay Presidency, Vol.X, P. 776

११२) Kamalapur J.N., The Deccan Forts, A study in the Art of Fortification & Mediaeval India, Popular book Publication, Bombay, 1961, P. 119

११३) श्री. आण्णा अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा मंगळवार, दि. २७ जानेवारी २००९, स्थळ– श्री. आण्णा अधिकारी यांचे घर

११४) इतिहास अभ्यासक श्री. महेश तेंडुलकर यांच्याशी शुक्रवार १० मे १०१३ रोजीची चर्चा, स्थळ ग्रंथालय, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे

११५) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ९, सत्कार्योतेजक सभा, धुळे, १९०६, पृ. ४१,४२)

११६) गर्गे स.मा.(संपा.)., मराठी रियासत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९८८, पृ. २०७

११७) सोवनी अविनाश(संपा.), ऐतिहासिक बखरी, खंड १, (चेऊलची बखर), शब्दवेश प्रकाशन, पुणे. १९९८, पृ. २९.

११८) कित्ता, पृ.१२

११९) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्हयाची दुर्गजिज्ञासा, पृ.१३

१२०) प्रत्यक्ष पाहणी व वर्णन

१२१) कित्ता, पृ.१४

१२२) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P.768

१२३) कित्ता, पृ.१६

१२४) गोगटे चिंतामण गंगाधर, उपरोक्त, पृ.८७

१२५) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.१७

१२६) कित्ता, पृ.१७

१२७) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P. 758

१२८) तेंडुलकर महेश, गड मंदिरांवरील द्वारशिल्प, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०११, पृ. ७७

१२९) Gazetteer of the Bombay Presidency, Vol. X, P. 759

१३०) Apte B.K., The Maratha Navy and Merchantships, Central Press, Bombay, 1972, P.75

१३१) कित्ता.

१३२) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड, श्रीमंत गगनबावडेकर पंत अमात्य यांच्या दफ्तरातील लेख, विजापुरकर विष्णू गोविंद, कोल्हापूर, १९०३, पत्रांक २२, पृ. १८,१९

१३३) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ. ४६.

१३४) कित्ता, पृ. ४७

१३५) शिवचरित्र कार्यालय, इंग्लिश रेकॉर्डस् ऑन शिवाजी, खंड २, पत्रांक ५०९, पृ. ३१३३०.

१३६) Mawjee Purshotam Vishram, Parasnis D.B., Kaifiyats, Yadis, & C., Mawjec P.V., Bombay, 1908, P. 2

१३७) Op.Cit., P. 3

१३८) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३२

१३९) कित्ता, २

१४०) कित्ता, २

१४१) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदीप, (जेधे शकावली), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पुनम२००९, पृ. ३४

१४२) कित्ता, पृ. ३५

१४३) प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण

१४४) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्हयाची दुर्गजिज्ञासा, पृ.२२

१४५) अक्कलकोट सतीश गुरूसिद्ध, दुर्ग, खंड पहिला, उपरोक्त, पृ.२८८

१४६) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, Bombay, 1880, P.747

१४७) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, , पृ.२३

१४८) गोगटे चिंतामण गंगाधर, महाराष्ट्र देशातील किल्ले भाग २, उपरोक्त, पृ.९२

१४९) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, Bombay, 1880, P.769

१५०) कुलकर्णी अनुराधा गोविंद(संपा.), शिवछत्रपतींची पत्रे खंड १, परम मित्र पब्लिकेशन्स मुंबई, २०११, पृ.३५०

१५१) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दप्तरातून निवडलेले कागदपत्र खंड २४, पश्चिम किनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली(१७४० १७७२), मुंबई सरकार, मुंबई १९३३, पत्रांक–८३ व ९१, पृ. ८२ व ८९

१५२) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, Bombay, 1880, P.806

१५३) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.२९

१५४) Gazetteer of the Bombay Presidency, Ratnagiri & Sawantvadi Districs, Vol X, P.788

१५५) मुजुमदार गंगा., वाकेनिस (ठोसर), भारत इतिहास संशोधन मंडळाचा अहवाल व इतिवृत्त, शके १८३५, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९१३, पृ.३०९

१५६) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.३१

१५७) Gazetteer of the Bombay Presidency, Ratnagiri & Sawantvadi Districs, Vol X, P.745

१५८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,खंड–३३, (जंजिऱ्याची मोहिम), मुंबई सरकार, मुंबई १९३३, पत्रांक–५३, ५७, ६१, ६९, ७५, ७७, ८०, ८२, ८३, ८९, पृ. ४५ ते ७९

१५९) कित्ता, पत्रांक–५३, पृ.४४, ४५

१६०) गोगटे चिंतामण गंगाधर, उपरोक्त, पृ.९६

१६१) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्हयाची दुर्गजिज्ञासा, पृ.३५

१६२) प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण

१६३) पोतदार दत्तो वामन, भारत इतिहास संशोधक मंडळाचा वार्षिक अहवाल व इतिवृत्त, (अंजनवेलची वहिवाट), भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९९४, पृ.२१

१६४) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.३८, ३९

१६५) पोतदार दत्तो वामन, उपरोक्त, पृ.२२

१६६) कित्ता, पृ.३२८

१६७) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.३८, ३९

१६८) गोपाळगड किल्ल्याच्या तटावरील शिलालेखावरून.

१६९) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.४२

१७०) सरदेसाई गो.स.(संपा.), महाराष्ट्रातील किल्ल्यांची यादी, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पृ.६६

१७१) कित्ता, पृ.४४

१७२) पोतदार दत्तो वामन, उपरोक्त, पृ.२८

१७३) प्रत्यक्ष पाहणी व सर्वेक्षण

१७४) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.४५

१७५) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५, पृ.३३

१७६) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ. ४७

१७७) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P.807

१७८) चिले भगवान, दुर्गसंपदा महाराष्ट्राची, शिव–स्पर्श प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, एप्रिल २००७, पृ.३५–३८

१७९) कित्ता, पृ.३८,३९

१८०) जोशी सचिन विद्याधर, , उपरोक्त, पृ.४७

१८१) चिले भगवान, उपरोक्त, पृ.३८

१८२) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, उपरोक्त, पृ.३४

१८३) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, 1880, P.742

१८४) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.४९

१८५) Gazetteer of the Bombay Presidency, Ratnagiri & Sawantvadi Districts, Vol X, Bombay, 1880, P.802
१८६) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्हयाची दुर्गजिज्ञासा, पृ.५४
१८७) Coutto De, XII.30; Faria in Brggs, III.524.
१८८) Duff Grant, History of Maratha's, P.116
१८९) Ibid, P.55
१९०) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P.790
१९१) पिंपळे पराग, साद सागराची, बुकमार्क पब्लिकेशन्स, पुणे, २००७, पृ.३७
१९२) सबनीस केशव गोविंद(संपा.), पंत अमात्य बावडा दप्तर भाग २ रा, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३८, पृ.२५९
१९३) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.६१
१९४) कित्ता, पृ.६१
१९५) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.६३
१९६) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P.804
१९७) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.६५
१९८) कित्ता, पृ.६६
१९९) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.६७
२००) कित्ता, पृ.६८
२०१) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P. 734
२०२) Ibid, 787
२०३) सरदेसाई गो.स.(संपा.), महाराष्ट्रातील किल्ल्यांची यादी, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पृ.८७
२०४) जोशी सचिन विद्याधर, उपरोक्त, पृ.७०

## प्रकरण तिसरे

# मंडणगड, बाणकोट व पालगड या किल्ल्यांची ऐतिहासिक महत्त्व

## प्रास्ताविक–

मध्ययुगीन काळातील आरमार निर्मिती करण्याचे श्रेय छ.शिवाजी महाराजांच्याकडे जाते. परकीय सागरी सत्ताना शह देण्यासाठी छ.शिवाजी महाराजांनी आरमाराची निर्मिती केली. रत्नागिरी जिल्ह्यातील शिवाजी महाराजांच्या समुद्रकिनाऱ्यावरील किल्ल्यांचे दोन प्रकार आहेत. एका प्रकारामध्ये हे किल्ले किनाऱ्यावर आहेत तर दुसऱ्या प्रकारामध्ये ते बेटावर उभारलेले असून त्यांच्याभोवती समुद्र आहे. सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग हे असे दुसऱ्या प्रकारातील बेटावर उभारलेले किल्ले आहेत.

शिवाजी महाराजांचे रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ले अंतर्गत प्रदेशात किंवा समुद्रकिनाऱ्यावर आहेत. समुद्रकिनाऱ्यावर असणाऱ्या किल्ल्यांचे दोन प्रकार आहेत. एका प्रकारात हे किल्ले किनाऱ्यावर आहेत किंवा दुसऱ्या प्रकारात ते बेटावर उभारलेले असून त्यांच्या सभोवती समुद्र आहे. भूशिरांवरील किल्ल्यापैकी बहुतेक नदीच्या काठावर आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील बाणकोट अंजनवेल किंवा गोपाळगड, गोवळकोट, रत्नागिरी, पूर्णगड, राजापूर हे असे नदीच्या काठावरील महत्वाचे किल्ले आहेत.

## मंडणगड, पालगड व बाणकोट किल्ल्यांचे भौगोलिक स्थान

मंडणगड, पालगड व बाणकोट हे किल्ले रत्नागिरी व रायगड जिल्ह्याच्या सीमेवर आहेत. ते दक्षिण कोकणच्या उत्तर टोकावर आहेत. हा किल्ल्यांचा प्रदेश पश्चिम किनारपट्टीच्या जवळ आहे. हे तिन्ही किल्ले सावित्री नदीची खाडी मंडणगड पासून ३५ कि.मी. ते ४० कि.मी. अंतरावर आहे. मध्ययुगीन काळात म्हाप्रळ, बाणकोट, वेळास, पंदेरी, निगडी ही महत्वाची बंदरे होती. या खाडीतून महाड तालुक्यातील दासगाव बंदरामध्ये व महाडमधून भोर मार्गे पश्चिम महाराष्ट्रात जाणारे व्यापारी मार्ग होते. मंडणगड व बाणकोट किल्ला यामधील अंतर ३८ कि.मी. आहे. मंडणगड व पालगड किल्ला हे अंतर २५ कि.मी. आहे. परंतु घेरा पालगड व पालगड किल्ला हा खेड तालुक्यात समाविष्ट आहे. बाणकोट व मंडणगड किल्ले मंडणगड तालुक्यामध्ये आहेत. मंडणगड हा रत्नागिरी जिल्ह्यातील ९ तालुक्यांपैकी एक आहे. मंडणगड किल्ल्याचा अक्षांश

रेखांश उ. १७$^{\circ}$५८ ४३.४० व पू. ७३$^{\circ}$१४ ३९.३२ आहे. बाणकोट किल्ल्याचा अक्षांश रेखांश उ. १७$^{\circ}$५८ २३.७४ व पू. ७३$^{\circ}$०२ २३. ०४ आहे. पालगड किल्ल्याचा अक्षांश रेखांश उ. १७$^{\circ}$४८ ५५.५७ पू. ७३$^{\circ}$२१ ०२.५३ आहे.[१]

बाणकोट हा समुद्र किनाऱ्यावरील महत्वाचा किल्ला आहे. तो मध्ययुगामध्ये आरमारा बरोबरच व्यापार व वाणिज्य या दृष्टीने महत्वाचा किल्ला होता. सुवर्णदुर्ग व सिद्दीचा जंजिरा किल्ला हे सुद्धा मंडणगड किल्ल्यापासून सर्वसाधारणपणे ६५ कि.मी. अंतरावर आहेत. स्वराज्यातील महत्वाच्या डोंगरी व सागरी किल्ल्यांपासूनचे मंडणगड, पालगड व बाणकोट किल्ल्यांचे अंतर तसेच सावित्री खाडीपासूनचे स्थान लक्षात घेता मध्ययुगीन कालखंडातील या किल्ल्यांचे महत्व लक्षात येते. मध्ययुगीन लष्करी डावपेच, जलमार्गावरील नियंत्रण, व्यापार व वाणिज्य या दृष्टिकोनातून त्यांचे भौगोलिक स्थान महत्वाचे आहे.[२]

पालगड किल्ल्यांचे क्षेत्रफळ दीड एकर आहे. खेड शहराच्या वायव्य सीमेवर उंच डोंगरमाथ्यावर हा किल्ला आहे. शिवाजी महाराजांनी हा किल्ला बांधला.[३] या किल्ल्याला १०० पायऱ्या आहेत. किल्ल्याच्या उत्तर दिशेस तटबंदीचे अवशेष दिसतात. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या कमानीचे खांब व दोन बुरुज आढळतात. त्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर एका इमारतीच्या जोत्यावर दीड मीटर लांब तोफ आहे. किल्ल्यावर तीन बांधकामाची जोती दिसतात. किल्ल्यावर एक विहिर आहे. किल्ल्याच्या वायव्य तटबंदीवर जमीनीत रोवलेली एक तोफ आहे. सध्या किल्ल्यावर दोन तोफा आहेत. इ.स. १८६२ च्या पाहणीत या किल्ल्यावर ९ निरुपयोगी तोफा असल्याचा उल्लेख मिळतो.[४]

शिवाजी महाराजांच्या रत्नागिरी जिल्ह्यातील अंतरभागातील किल्ल्यांचे स्वरुप सारखेच आहे. ते स्वभावत: सोईच्या ठिकाणी बांधलेले आहेत. जर ते समुद्रकिनाऱ्यावर असतील तर एखाद्या कड्यावर किंवा भूशीरावर, ज्याचा अर्ध्यांपेक्षा अधिक भाग पाण्याने वेढलेला आहे, जर सखल प्रदेशात असेल तर एखाद्या सुळक्यासारख्या डोंगरावर नदीच्या किंवा खिंडीच्या टप्प्यात, घाटावर असेल तर एखाद्या मोठ्या खडकाच्या टोकावर किंवा मोठ्या नैसर्गिक चढणीवर, सर्वांच्या बांधणीमागे एकच तत्व असे.

## शिवकालीन इतिहास

अफजलखानाच्या वधानंतर आदिलशहाने कर्नुल प्रांताचा सुभेदार सिद्दी जोहर सलाबतखान यास मार्च १६६० मध्ये शिवाजी महाराजांवर आक्रमण करण्यास पाठविले. शिवाजीराजे पन्हाळा किल्ल्यावर असल्याचे हेरांकडून समजल्या नंतर सलाबतखानाने पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला. यावेळी सलाबतखानास इंग्रज, सिद्दी, सावंतवाडीचे सावंत व पालवणीचे आदिलशाही सरदार यशवंतराव दळवी यांनी मदत केली.[५] शिवाजी महाराज, नेताजी पालकर, प्रतापराव गुजर यांनी पराक्रमाची शर्थ केली. याचवेळी मोगल सरदार शाहिस्तेखानाने पुण्यात जाळपोळ व लुटालूट सुरु केली. शिवाजी महाराज व स्वराज्य यावर एकाचवेळी दोन संकटे आली. छ. शिवाजी महाराज पन्हाळा किल्ल्यात अडकले असताना पल्लिवनचा (पालवणी) राजा यशवंतराव दळवी सलाबतखानाच्या बाजूने शिवाजी राजांशी लढला. शिवाजी राजांनी तहाचा देखावा करत सलाबतखानास गाफील ठेवले. अंधाराचा फायदा घेत शिवाजीराजे १६ जुलै १६६० रोजी मध्यरात्री एक हजारांची फौज घेऊन शत्रूच्या चौक्या पहारे चुकवत पन्हाळ्यावरुन निसटून विशाळगडाकडे गेले.[६]

शाहिस्तेखानाचा सरदार करतलबखान व वाशिमची राणी रायबागण शिवाजी महाराजांच्या ताब्यातील उत्तर कोकण जिंकण्यासाठी निघाले. शिवाजी महाराजांनी ३ फेब्रुवारी १६६१ रोजी कारतलबखानाचा पराभव केल्यानंतर शिवाजी महाराज आदिलशहाच्या ताब्यातील दक्षिण कोकण जिंकण्यास निघाले. याबरोबरच राजांना पल्लिवनचा आदिलशाही सरदार राजा यशवंतराव दळवी यास धडा शिकवावयाचा होता. फेब्रुवारी १६६१ मध्ये राजांनी निजामपूर लुटून पालवणीवर आक्रमण केले. पालवणीचा राजा यशवंतराव दळवी प्रभावळीचा आदिलशाही सरदार राजा सुर्यराव सूर्वे यांच्याकडे शृंगारपूरला पळून गेला. पालवणी जिंकल्यानंतर शिवरायांनी यशवंतराव दळवींच्या ताब्यात असलेले दाभोळ बंदर जिंकले. यानंतर शिवाजीराजे परशुराम, चिपळूण, संगमेश्वर जिंकत राजापूरला गेले. संगमेश्वर जिंकून तेथे तानाजी मालूसरे व पिलाजी निलकंठ यांना बंदोबस्तासाठी ठेवले. राजापूरची वखार लुटून सहा इंग्रजांना कैद केले. आदिलशाही आज्ञेवरुन शृंगारपूरवरुन सुर्यराव सुर्वे याने संगमेश्वरच्या मराठी ठाण्यावर हल्ला केला.[७] २९ एप्रिल १६६१ रोजी शृंगारपूरावर हल्ला केला. प्रभावळीचा राजा सुर्यराव सुर्वे याची शृंगारपूर ही राजधानी आत्ताच्या संगमेश्वर तालुक्यात संगमेश्वर पासून आठ मैलांवर होती. राजा

सुर्यराव सुर्वे पळून गेल्यामुळे शृंगारपूर ताब्यात आले. पुढे शिवाजी राजांनी सुर्यराव सुर्वे यास आपल्या बाजूस वळवून घेतले. यावेळी शिवाजी महाराजांनी पालवणीच्या दळवीवर दबाब ठेवण्यासाठी तसेच ह्या जिंकलेल्या सर्व प्रदेशाचे संरक्षण करण्यासाठी चिरदुर्ग या प्रसिद्ध किल्ल्यावर उंच व मजबूत तटबंदी केली. या प्रदेशाचे हे मंडनच (भूषण) आहे हे सुचविण्यासाठी या किल्ल्याचे नाव मंडणगड ठेवले.[८] शिवाजी महाराजांनी मंडणगड व पालगड हे नवे किल्ले बांधले.[९]

शिवभारतातील नकाशात भोर संस्थानामधील पालीस पल्लीवन म्हटले आहे. शिवभारतात आलेले पल्लीवन रत्नागिरी जिल्ह्यातील आहे. या पल्लीवनाजवळच्या चिरदुर्ग डोंगरावर मंडणगड बांधल्याचा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणून नकाशात मंडणगडजवळ पल्लीवन दाखवले पाहिजे.[१०] शिवाजी महाराजांनी यावेळी आदिलशाहीच्या ताब्यातून संपूर्ण दक्षिण कोकण जिंकले.[११] शिवाजी महाराजांनी इ.स. १६४८ पासून विजापुरकरांचा बराच प्रांत काबीज केल्यानंतर, कोकणामध्ये सैन्य पाठवून कोकण प्रांत जिंकण्यास सुरुवात केली. कल्याणपासून कारवारपर्यंत सर्व कोकणावर विजापूर बादशहाचे नामधारी वर्चस्व होते. विजापूरचा बादशहा कमजोर झाल्यामुळे जंजिऱ्याचे सिद्दी, जव्हारचे कोळी व वाडीचे सावंत यांनी कोकणपट्टी बळकावली होती.[१२] याचवेळी परकीय फिरंगी, इंग्रज, वलंदेज व फरासीस (इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच वगैरे) हे कोकण प्रांतात व्यापाराच्या निमित्ताने येऊन एखादे–दुसरे बंदर ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत होते.[१३] जंजिऱ्याच्या सिद्दीस नागोठण्यापासून बाणकोटपर्यंत प्रदेश विजापुरच्या अदिलशहाकडून जहागीर मिळाला होता.[१४] इ.स. १६५८ पर्यंत कोकण प्रांतातील तळे, घोसाळे, रायगड, पाल इ. बारा किल्ले त्यांनी जिंकून घेतले व जंजिऱ्याचा सिद्दी फत्तेखान यास नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला.[१५] मल्हार रामराव चिटणीस आपल्या बखरीमध्ये म्हणतात, लोक लढाऊ, कोळी व खलाशी ठेऊन त्यांनी दर्यात स्वारी–शिकारी करुन जंजिरेकर याजवरि दहशत पाडिली. दर्यात सर्व टोपीकर यांजवर इभ्रत पाडोन, सावकारी माल जाहाजे लुटोन, हरजिनसी दर्यातील पैदास्ती करुन महाराजांस आणोन देऊ लागले. खर्चही आरमाराचा मोठा, तो चालविते झाले. समुद्रांत सत्ता बसविली, दर्या किनारा जागांजागां शहरे मारु लागले, व बेटे चांगली पाहून किल्ले बांधू लागले. समुद्रात सत्ता जाली. त्यांजवर द्रव्यही अपरिमित सांपडूं लागले.[१६] इ.स. १६६१ ते १६६३ मध्ये शिवाजी महाराजांनी दाभोळ, राजापूर

यावर विजयी आक्रमण केले. पल्लिवन व शृंगारपुरच्या अधिपतींना गुडघे टेकावयास लावले व सर्व रत्नागिरी जिल्हा त्यांच्या विजयी ध्वजाखाली आला.[१७] शिवाजी महाराजांचा सरदार व्यंकाजी दत्तो ह्याने हबशावर चाल करुन त्याचा पराभव केला व त्याचा राजपुराशिवाय बराच प्रांत काबीज केला.[१८]

शिवाजीने दंडराजपुरीच्या परिसरातील सात किल्ले काबीज केले.[१९] शिवाजीची फौज सुरतेजवळच्या मुलखावर हल्ला करण्यास गेल्याची संधी साधून जंजिऱ्याच्या सिद्दी याकूतने शिवाजीने जिंकलेल्या किल्ल्यांपैकी सहा किल्ले दोन तीन दिवसांच्या प्रतिकारानंतर जिंकले.[२०] इ.स. १६७२ मध्ये शिवाजी महाराज सर्व सैन्य घेऊन इतरत्र मोहिमेवर गेल्याची संधी साधून सिद्दीने दाभोळ व त्या परिसरातील काही गावे लुटली व जाळली होती. या दरम्यान फ्रेंच प्रवासी आबे कारे सुरतेहून खुष्कीच्या मार्गाने गोव्याला गेला. तेव्हा त्यास सिद्दीकडून पराभूत होऊन माघार घेत असलेले शिवाजी महाराजांचे सैनिक भेटले होते. खेड व संगमेश्वर येथील लोक सिद्दीच्या भीतीने डोंगरात पळून गेले होते.[२१] मुघलांशी युद्ध चालू असताना किनारपट्टीवर एवढे सैन्य कायमचे गुंतवून ठेवणे शिवाजी महाराजांना शक्य नव्हते.[२२] एप्रिल–मे १६७५ मध्ये शिवाजी राजांनी फोंडा किल्ला काबीज केला आणि थेट अंकोल्यापर्यंतचे आदिलशाही कोकणच काबीज केले.[२३] त्यामुळे त्यांच्या ताब्यातील किनारपट्टीत तर वाढ झालीच आणि आदिलशाहीला पश्चिमेकडे किनारपट्टीच उरली नाही! म्हणजे आदिलशहाचा प्रदेश तर गेलाच आणि अरबी समुद्रातून होणारा व्यापार त्याच्या हातून जाऊन शिवाजी महाराजांच्या हाती आला.[२४] शिवाजी महाराजांच्या ताब्यात दक्षिण कोकण, संपूर्ण रत्नागिरी जिल्हा व रायगड जिल्ह्याचा आग्नेय प्रदेश होता.[२५] २९ ऑगस्ट १६६६ च्या गोव्याच्या व्हॉईसरॉयने आपल्या राजास लिहिलेल्या पत्रामध्ये औरंगजेबाच्या कैदेतून सुटून आल्यानंतर शिवाजीराजांनी कोकणातील गमावलेला सर्व प्रदेश जिंकल्याचे कळवले आहे.[२६]

बादशहा औरंगजेबाने छ. शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्या पराक्रमी रजपूत सरदार मिर्झा राजा जयसिंग याची ३० सप्टेंबर १६६४ रोजी नेमणूक केली. त्याने शिवाजी महाराजांचा पराभव करुन पुरंदरचा तह घडवून आणला. (१३ जून १६६५) रोजी तहाचा पक्का मसुदा तयार झाला. त्याप्रमाणे बादशाही कृपा म्हणून शिवाजी राजांनी १२ किल्ले व त्याखालचा एक लाख होनाचा मुलूख स्वत:कडे ठेवावा असे ठरले. पुरंदर, रुद्रमाळ (वज्रगड),

कोंढाणा, खंडागाळा, लोहगड, तुंगतिकोना, रोहिडा, नरदुर्ग, माहुली, बंडारदुर्ग, पळसखोल, खपगड, बक्षगड, मोरबखन, माणिकगड, सरुपगड, साकरगड, मरकगड, अंकोला, सोनगड व माणगड हे २३ किल्ले व त्यांना लागून असलेला चार लाख होनांचा मुलूख शिवाजीने मोगलांना द्यावे असे ठरले. या तहावर सह्या झाल्यानंतर तो तह जयसिंगाने बादशहाकडे पाठविला. राजांनी किल्ल्यांच्या चाव्या मिर्झा जयसिंगास दिल्या. मोगलांचे किल्लेदार या किल्ल्यांवर नेमण्यात आले. मिर्झाराजांनी किल्ले घेतल्याचे बादशहास लिहून कळविले. यासोबत शिवाजीराजांची अर्जिसुद्धा पाठविण्यात आली.[२७] तहांच्या अटीचा खलिता मिळताच औरंगजेबाने त्यास मंजुरी पाठवली. या फर्मानामध्ये बादशहा औरंगजेबाने शिवाजी राजांना राजगड, घोरप, घोसाळा, उधेदुर्ग, तोरणा, अलवारी, तळगड, रायरी, लिंगमंगड, महागड, पाल(गड), कुंवारी हे बारा किल्ले व त्यांच्या खालील मुलुख देण्याचे मान्य केले.[२८]

## शिवोत्तर काळातील इतिहास

### छ. संभाजी काळ – इ.स. १६८०–१६८९

छ. शिवाजी राजांचा शालिवाहन शके १६०२ चैत्र पोर्णिमा (३ एप्रिल १६८०) रविवार या दिवशी दुःखद मृत्यू झाला.[२९] शिवाजी राजांचे पेशवे मोरोपंत पिंगळे यांनी राजाराम यांना छत्रपतींचे वारस म्हणून सत्तेवर बसविल्याचे व संभाजी राजांना कैद करण्याचे जाहीर केले.[३०] यावेळी संभाजी राजांना महाराजांच्या मृत्यूची बातमी कळली होती. त्यांनी विवेकाने व संयमाने वागून स्वराज्यातील सर्व अधिकाऱ्यांना आपल्याला येऊन मिळण्याविषयी खलिते पाठविले होते.[३१] राजापूर, कुडाळच्या कमावीसरदारांना पत्रे पाठवून पैसे घेऊन पन्हाळ्यावर बोलविले.[३२] सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी संभाजीराजांची बाजू घेऊन आण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांना कैद केले व पन्हाळ्यावर संभाजीराजांकडे आणले.[३३] संभाजीराजांनी त्या दोघांना पन्हाळा किल्ल्यामध्ये नजरकैदेत ठेवले. नंतर वीस हजार सैन्यासहित संभाजी राजांनी रायगडवर हल्ला करुन १८ जून १६८० रोजी रायगड ताब्यात घेतला. राजाराम राजे व सोयराबाई यांना नजरकैदेत ठेवले.[३४] २० जुलै १६८० रोजी संभाजी राजांनी राज्यरोहण केले. तसेच संभाजी राजांनी कोकणात राजापूर येथे आपल्या नव्या सुभेदाराची नेमणूक केली.[३५] इ.स. १६८० मध्ये कोकणातील रामनगर, जव्हार, कल्याण, भिवंडी, चौल, दाभोळ, राजापूर आणि तळकोकणातील कुडाळ, भीमगड, फोंडा, अंकोले ठिकाणे संभाजी महाराजांच्या ताब्यात होती.

जोधपूर व मेवाडच्या रजपूतांनी सम्राट औरंगजेबाविरोधात बंड केले होते. औरंगजेबाने शाहजादा अकबर यास मेवाडच्या एका मोहिमेचे नेतृत्व दिले होते. राजपूत्र अकबर याने राठोड व सिसोदिया रजपूतांच्या मदतीने औरंगजेबाविरोधात बंड पुकारले. त्याने ११ जानेवारी १६८१ रोजी स्वत:स बादशहा घोषित केले.[३६] औरंगजेब स्वत: अकबर व रजपुतांच्या संयुक्त आघाडी विरोधात आक्रमण करण्यास आला. त्याने कुटनीतीने खोट्या पत्राच्या आधारे रजपूत व राजपुत्र अकबर यांच्या मध्ये फुट पाडली. अल्पावधीतच राठोड राजपूतांना औरंगजेबाच्या कारस्थानाची खात्री पटली. अकबर हा राजपुतान्याच्या दुर्गादास राठोड याच्यासह दक्षिणेत संभाजी महाराजांकडे आश्रय घेण्यासाठी पळून आला.[३७] राजपुत्र अकबराने संभाजी महाराजांना सम्राट औरंगजेबास बादशहा पदावरुन दूर करण्यास मदत करावी अशी विनंती करणारी दोन पत्रे पाठविली होती. १ जून १६८१ रोजी अकबर उत्तर कोकणात रायगडाच्या उत्तरेत २५ मैलांवर नागोठाण्याजवळ पाली येथे आला. संभाजी राजांनी १३ नोव्हेंबर १६८१ रोजी शाहजादा अकबर याची भेट घेतली. छ. संभाजीने अकबरास आश्रय दिल्यामुळे औरंगजेब रजपूतांशी तडजोड करुन दक्षिणेकडे ६ सप्टेंबर १६८१ रोजी संभाजीवर आक्रमण करण्यास निघाला.

संभाजी राजांच्या काळात मुंबईच्या दक्षिणेला कुलाब्यापासून (अलिबाग) मालवण पर्यंतचे कोकण संभाजी राजांच्या राज्यात मोडत होते. मधला हबसाणचा काही भाग, (हबशी सरदार सिद्दीचा प्रदेश) जंजिरा व दंडराजपूरी हे किल्ले आणि लगतचा किनारा हे सिद्दीच्या ताब्यात होते. उंदेरी बेट सुद्धा सिद्दीकडे होते. चौल, रेवदंडा ही ठाणी पोर्तुगीजांकडे होती. दक्षिणेकडे वेंगुर्ल्याच्या दक्षिणेस गोव्याला पोर्तुगीजांचे राज्य होते. पश्चिम किनारपट्टीवर अशा प्रकारची राजकीय पार्श्वभूमी होती.[३८] शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रत्नागिरी जिल्ह्यातील भूप्रदेशास मोगली आक्रमणांना तोंड द्यावे लागले आणि किनारपट्टीवर पोर्तुगीज, मराठे, सिद्दी यांचा संघर्ष झाला.[३९] औरंगजेबाने संभाजीविरुद्ध लढण्याची जय्यत तयारी केली. संभाजी विरुद्धच्या लष्करी डावपेचाचा एक भाग म्हणून औरंगजेबाने सिद्दीस आपल्या बाजूला वळवून घेतले.[४०] जानेवारी १६८२ मध्ये मोगल कोकणात प्रथम उतरले. दख्खनच्या मोहिमेवर येण्यापूर्वी औरंगजेबाने आपला एक अधिकारी अबु महम्मद याच्याकडून दख्खनच्या प्रदेशाची, भूभागाची संपूर्ण माहिती करुन घेतली होती. त्यावरुन त्याला स्वराज्यामध्ये ३६० घाट होते हे कळले.

त्यापैकी काही घाटामधूनच उंट–हत्ती नेणे शक्य होते. कोकणातील बाकीचे सर्व घाट अरुंद होते. त्यानंतर औरंगजेबाने संभाजी महारांजांवर तिहेरी आक्रमण करण्याचे ठरवले.[४१] त्याने शहाबुद्दिनला कोकण प्रांतातून येण्यासाठी कल्याणवर आक्रमण करण्याचा आदेश दिला. शाहजादा मुअज्जम बेळगावहून निघाला. तो रामसेज घाटातून गोव्याच्या पोर्तुगीजांशी हात मिळवणी करुन आला. त्याच वेळी संभाजी महाराजांचे लक्ष वळविण्यासाठी आझमशहाने बागलाणमध्ये जाळपोळ, लुटालुट सुरु केली. याचवेळी सिद्दीला मराठ्यांना होणारा शस्त्रास्त्रे, रसद पुरवठा अडविण्याचे सांगण्यात आले होते. अशाप्रकारे संभाजी महाराजांना कोंडीत पकडण्याचे मोगलांनी प्रयत्न केले.

स्वराज्यामध्ये कोकणचे भौगोलिक स्थान खूप महत्त्वाचे होते. कोकणातून दख्खनमध्ये लष्करी हालचाली करणे सोयीचे होते. मराठ्यांना कोकण प्रदेशातून हाकलणे हे औरंगजेबाचे उद्दिष्ट होते. कारण विजापूर व मोगल प्रदेशात आक्रमण करण्यासाठी कोकणातील घाटमार्गांचा फायदा मराठ्यांना मिळत असे. त्यामुळे मोगल उत्तर व दक्षिण कोकण जिंकून घेण्यासाठी प्रयत्न करत होते. जानेवारी १६८२ मध्ये मोगलांनी हसन अली खान या मोगल सरदारास वीस हजार घोडदळ व पंधरा हजार पायदळ देऊन कोकण प्रदेश जिंकण्यास पाठविले.[४२] त्याच्यावर जिंकलेल्या कोकण प्रदेशाचा कारभार पहाणे व कोकणमध्ये मराठ्यांवर नियंत्रण ठेवणे ही कामे सोपविलेली होती. हसन अली खानच्या सैन्याला रसद व इतर मदत मिळावी म्हणून मीर मुहम्मद मोमीन याला जहाजातून सुरतमार्गे पाठविण्यात आले. रणमस्तखानही कल्याणला दाखल झाला.[४३] सिद्दीला मोगल आरमाराची मदत देण्यात आली.[४४] सिद्दी व औरंगजबाच्या लोकांकडून संभाजीच्या व अकबरांच्या सर्व हालचाली औरंगजेबाला कळत होत्या.[४५] यावेळी कोकणातील जमीनदार व इतर मराठा अधिकारी हे मोगल सरदारांना फितुर झाले. कोकणचा जमीनदार एसा याने जाहीर केले की, मला हरवलीस नेमले तर तळकोकणातील शत्रूच्या (संभाजीच्या) भरभराटलेल्या ठिकाणी तुम्हास नेईन. तेव्हा शिहाबुद्दीनने त्यास आपल्या हरावलीस नेमून खोऱ्यामध्ये दौड केली. असा उल्लेख औरंगजेबाच्या बातमीपत्रामध्ये आढळतो.[४६] संभाजीचे नातेवाईक, इतर सरदार व कोकणामधील देसाई मोगलांना जाऊन मिळाले होते.[४७] यावेळी संभाजीचा खास नोकर पुरणा, संभाजीचा चुलत भाऊ अर्जुन भोसले, संभाजीचा मेव्हणा

अचलोजीराजे महाडिक, साल्हेरचा किल्लेदार असोजी कृष्णाजी, त्रिंबक, हरिशगड, त्रिंगलवाडी, माहूली, रामसेज या किल्ल्यांचे किल्लेदार, जेधे–सिलीमकर हे वतनदार या सर्वांनी संभाजीची साथ सोडली होती. कोकणात वाडीचा खेमसावंत, शृंगारपूरचा राम दळवी, फोंड्याचा सावंत, काद्र्याचा देसाई हे पोर्तुगीज व औरंगजेब यांना मिळाले होते. त्यांनी दक्षिण कोकणात अराजक मांडले होते.[४८] कुडाळ प्रांताचा देसाई, खेम सावंत याने संभाजी विरुद्ध बंड करुन मराठ्यांचा शत्रू पोर्तुगीजांकडे आश्रय घेतला होता.[४९] पोर्तुगीजांच्या मदतीने तो गोव्याजवळच्या मराठी प्रदेशात जाळपोळ, लुटालुट करत असे. कुडाळ व सोंदे येथील देसायांनी सुद्धा संभाजीविरोधात बंड केले. राम दळवी बंडखोरांना सामील झाला. कादरा येथील देसाईने सुद्धा बंड करुन संभाजी महाराजांच्या प्रजेची घरे लुटली व जाळली होती. अशाप्रकारे मुघल, पोर्तुगीज, सिद्दी, कोकणातील अनेक सरदार यांची एकाचवेळी आक्रमणे मराठ्यांच्या ताब्यातील कोकणवर सुरु होती.

संभाजी महाराज कोकणात मुघलांच्या सर्व हालचाली रोखण्याचा प्रयत्न करत होते. संभाजी महाराजांनी तळकोकणात मुघल सैन्याला अडविण्याचे आपल्या अधिकाऱ्यांना हुकूम दिले. आक्टोबर १६८२ मध्ये मराठ्यांनी कोकणचे सर्व मार्ग रोखले होते. औरंगजेबाने बहादूरखान (रणमस्तखान) व इतर सरदारांना तळकोकणातील दऱ्याखोऱ्यांकडे जाण्याचा आदेश दिला. ३० जानेवारी १६८२ रोजी हसनअली खानाने कल्याण जिंकले. पण मराठ्यांचा तीव्र प्रतिकार व रसदेची टंचाई यामुळे तो कल्याणमधे टिकू शकला नाही. रुपाजी भोसले, निळोपंत पिंगळे, स्वत: संभाजी यांनी त्याची रसद तोडून व हल्ले करुन त्याला त्रस्त केले. हसन अली खानापाठोपाठ आलेल्या रणमस्तखानाची व रुहल्लाखानाची तीच गत झाली. रुहल्ला खानाला रुपाजी भोसले या मराठा सरदाराने टिटवाळाच्या घाटात अडवून जेरीस आणले. यावेळी मराठ्यांनी मोगलांचे कित्येक सेनाधिकारी ठार केले.[५०]

सिद्दी संबुळचा मुलगा व पुतण्या सिद्दी मिस्त्री हे दोघे सिद्दीचा पक्ष सोडून संभाजीस येऊन मिळाले. डिसेंबर १६८१ मध्ये सिद्दीने पनवेलपासून चौल पर्यंतचा मराठ्यांचा प्रदेश उध्वस्त केला. हसन अली खानच्या आक्रमणापूर्वी संभाजी महाराजांनी ३ जानेवारी १६८२ ते ३ फेब्रुवारी १६८२ या काळात सिद्दी विरोधात मोहिम सुरु करुन त्यास त्रस्त केले होते.

यावेळी मराठे जंजिरा जिंकून घेण्याच्या शक्यता निर्माण झाल्या होत्या. संभाजीने दादजी रघुनाथ देशपांडे यांना आरमारचे प्रमुख पद देऊन जंजिरा जिंकण्यासाठी पाठविले. जंजिऱ्याच्या सिद्दीचा पुतण्या सिद्दी मिस्त्री हा मराठ्यांच्या आरमारातील एक अधिपती होता. मराठ्यांनी नागोठणे व आपटे या ठिकाणांवर जोराचा मारा केला व हबशांच्या प्रांताचा फार नाश केला.[५१] याचवेळी हसन अलीखान कल्याणवर आक्रमण करण्यास आला.[५२] संभाजी राजे आपला सेनापती दादाजी रघुनाथ याच्यावर जंजिऱ्याची जबाबदारी सोपवून मोगलांचा प्रतिकार करण्यास निघून गेले. त्याने भरपूर पराक्रम गाजवून सिद्दीच्या मनात प्रचंड दहशत निर्माण केली. यावेळी औरंगजेब स्वत: विशाल सैन्यासह दक्षिणेत आला त्यामुळे तिकडे सैन्य पाठविण्यासाठी संभाजीला जंजिऱ्याचा वेढा उठवावा लागला.

मोगलांना मदत करणाऱ्या पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठी संभाजीने चेऊल, वसई, दमण या पोर्तुगीजांच्या प्रदेशावर हल्ले केले. मराठ्यांनी ठाणे–वसई भागातील पोर्तगीजांचे दोन किल्ले जिंकले. सिद्दी याकूतखानाने त्यातला एक किल्ला जिंकून जमीनदोस्त केला व भरपूर कत्तल केली. बहादूरखानाने दुसरा किल्ला जिंकला. निळोपंत पेशव्याने चेंबूर, तळोजे, कोळवे, माहिम, दंतोरे, सारगाव, सुपारी व सात हे किल्ले जिंकून करंजे, एलिफंटा हे पण जिंकले. फिरंग्यांचा ४० मैलाचा प्रदेश उध्वस्त करण्यात आला. पोर्तुगीजांनी फोंडा किल्ल्यावर आक्रमण केले. १ नोव्हेंबर १६८३ रोजी मराठ्यांना पराभूत करुन पोर्तुगीज व्हाइसरॉय किल्ल्यावर गेला. फोंडा किल्ल्याचा किल्लेदार येसाजी कंक व त्याच्या मुलाने पराक्रमाची शर्थ केली. संभाजी त्यांच्या मदतीसाठी आपले सैन्य घेऊन आला. पोर्तुगीजांना पराभव पत्करावा लागला. या युद्धात कोकणातील बहुतेक देसाईंनी पोर्तुगीजांना मदत केली. पेडण्याच्या देसायाने अंकोल्यापासून राजापूरपर्यंत संभाजीच्या किल्ल्यांचा तपशील पोर्तुगीजांना पुरविला.[५३] पोर्तुगीज आणि मुघल यांनी कोकणात येण्यापूर्वीच संभाजीने आक्रमक धोरण राबविल्यामुळे शत्रूचा कोकण जिंकण्याचा उद्देश सफल होत नसे. मोगलांनी लष्करी बळ, फितुरी, प्रलोभने या विविध मार्गाने कोकणातील किल्ले जिंकले पण ते किल्ले राखण्याची यंत्रणा उभी करु शकले नाहीत. त्यामुळे त्यांची पाठ वळताच मराठ्यांनी पुन्हा ते किल्ले जिंकून घेतले.

इ.स. १६८३ चा पावसाळा संपल्यानंतर मोगलांच्या दक्षिण कोकणातील हालचाली वाढल्या. सुलतान आज़मने दक्षिण कोकणवर स्वारी केली. औरंगजेबाने १५ सप्टेंबर १६८३

रोजी शहा आलम बहाद्दुर (शहाजादा मुअज्ज़मची) कोकणच्या मोहिमेवर नेमणूक केली. पन्हाळगडपासून जवळ असणाऱ्या दक्षिण कोकणातील रामदुर्ग या तालुक्यातून समुद्रकिनाऱ्यावर यावे. तसेच किनारपट्टीवरील मराठ्यांच्या हाती असणारे किल्ले जिंकावेत व तेथे आपली ठाणी निर्माण करावित हा शहा आलमचा हेतू होता.[५४] शहा आलम मोठ्या तयारीने, भरपूर लवाजम्यासहित कोकण जिंकण्यासाठी निघाला. औरंगजेबाने त्याच्या बरोबर मोठा तोफखाना व वीस हजार सैन्य दिले.[५५] यावेळी एप्रिल १६८३ मध्ये औरंगजेबाने शहा आलमला रुहउल्लाखानाचा आदर्श घेण्यास सांगितले. रुहल्लाहखानास दक्षिणी लोकांच्या लढाईची पद्धत माहित नसूनही तो टिकून राहीला. त्याने आपल्या कामात कुचराई केली नाही. याची जाणीव बादशहाने शहांजाद्यास करून दिली.[५६] मराठ्यांनी तीव्र प्रतिकार करुनही मराठ्यांचा काही प्रदेश व किल्ले मोगलांनी मिळविले. शहा आलम सप्टेंबर महिन्यात कोकणकडे निघाला. हसन अलीखानास शहा आलमच्या मदतीला जाण्याचे फर्मावण्यात आले. याचवेळी मुघल सरदार शिहाबुद्दीनखानाने संभाजीराजांचा कोकणातील प्रदेश किल्ले व निजामपूर कसबा लुटला.[५७] कोकणातील रस्ते अवघड व अरुंद होते. एका बाजूला उंच पर्वत तर दुसरीकडे खोल दऱ्या होत्या. त्यामुळे शहा आलमच्या आघाडीच्या सैन्याशी मराठ्यांची प्रखर युद्धे झाली. मराठ्यांनी तीव्र संघर्ष केला. मुघलांचे अनेक सैनिक व बुणगे यावेळी मरण पावले. यावेळचे अन्न व कोकणचे हवामान मोगल सैन्यास न मानवणारे होते. या हवामानामुळे मुघलांची खुप माणसे व जनावरे मरण पावली. सैन्यात घोडे शिल्लक राहिले नाहीत. मराठा सैन्याने मोगल सैन्याची सर्व मार्गांची कोंडी केली. त्यांची रसद तोडली. मोगल सैन्याची अवस्था फारच वाईट झाली. शहा आलम यास कोकणात अधिक काळ राहणे अशक्य झाले. शेवटी त्याने माघार घेण्याची परवानगी औरंगजेबास मागितली. परत येताना शहा आलमने कुडाळ व बांदे जाळले. यावेळी शहा आलमच्या सैन्यास अन्नधान्याची खुप टंचाई जाणवत होती. प्रचंड उपासमार झाली. स्वारीयोग्य घोडे राहिले नाहित. औरंगजेबास ही सर्व अवस्था कळविण्यात आली. औरंगजेबाच्या आज्ञेने सुरतवरुन शहा आलमला रसद पाठविण्यात आली. मराठ्यांना सुरतेवरुन जहाजातून रसद येत असल्याचे कळताच त्यांनी ती हल्ले करुन लुटली. मराठ्यांचे समुद्रकिनाऱ्यावर ठिकठिकाणी किल्ले असल्यामुळे ही रसद शहा आलमला मिळू शकली नाही. शेवटी औरंगजेबाने

शहा आलमला परत येण्याची आज्ञा केली. रणदुल्लाखान यास नव्या दमाचे सैन्य देऊन शहा आलम व त्याच्या सैन्यास सुरक्षित आणण्यासाठी एप्रिल १६८४ मध्ये पाठविले. शहा आलम १२ तारखेस अहमदनगरजवळ सुरक्षित पोहोचला.[५८] संभाजी राजांनी सत्तेवर येताच कान्होजी आंग्र्यांचा एकनिष्ठपणा पाहून कोकणातील प्रदेशावर हल्ले करण्याचा हुकूम, अधिकार त्यांना दिला. यावेळी कान्होजीने कोकणपट्टीतील सर्व किल्ले, मोगलांच्या ताब्यातील किल्ले युद्धे करुन घेतले.[५९] कान्होजी आंग्रे संभाजीच्या काळात फिरत्या आरमाराचा प्रतिनिधी होता.[६०]

अशाप्रकारे मोगलांचे मराठ्यांविरुद्धचे दक्षिण कोकणातील आक्रमण अयशस्वी ठरले. मराठे अतिशय पराक्रमाने लढले. ते मोगलांपेक्षा लष्करी डावपेचामध्ये वरचढ ठरले. मराठ्यांच्या पराक्रमाने व रसदेच्या कमतरतेमुळे औरंगजेबाची कोकणात सैन्य पाठवून संभाजी महाराजांना नामोहरम करण्याची योजना फसली.

यानंतर ऑक्टोबर १६८८ मध्ये महाराणी येसुबाईंच्या माहेरच्या लोकांनी शिर्क्यांनी संभाजी महाराजांविरोधात बंड केले. गणोजी शिर्के याने कवी कलशावर हल्ला केला.[६१] शिर्क्यांनी कवी कलशास युद्धकैदी म्हणून खेळणा किल्ल्यावर ठेवले. जेधे शकावलीप्रमाणे कवि कलश खेळणा किल्ल्यावर आश्रयास गेला. संभाजी राजांना रायगडावर हे कळताच त्यांनी संगमेश्वरास शिर्क्यांवर आक्रमण केले. शिर्क्यांचा पराभव करुन संभाजीने त्यांना संगमेश्वरवरुन पिटाळले. त्यांची सरदेशमुखीची वतने सरकारजमा केली. शिर्क्यांच्या कटात सामील असल्याच्या संशयावरुन संभाजीने प्रल्हाद निराजीला तुरुंगात ठेवले. शिर्क्यांचा पराभव करुन संभाजी खेळणा किल्ल्याकडे गेले. तेथे गणोजी शिर्क्यांचा पराभव केला व रायगडकडे निघाले. याचवेळी औरंगजेबाच्या आज्ञेनुसार मोगल सेनापती झुल्फीकारखान राजधानी रायगड जिंकण्यासाठी आपल्या सैन्यासहित निघाला होता.[६२] यावेळी संभाजी राजांनी आपल्या सुरक्षिततेची शक्य तितकी तयारी केली होती. घाटावरचा मोगलांच्या वर्दळीचा मार्ग त्यांनी मुद्दाम टाळला होता. ते आधी पन्हाळ्याला गेले. तेथून कराड, सातारा, वाई, महाड मार्गे रायगडास न जाता ते पन्हाळ्यावरुन दुर्गम दऱ्याखोऱ्यांमध्ये असलेल्या संगमेश्वर येथे गेले. तेथून चिपळूण, खेड मार्गाने त्यांनी राजधानी रायगडास येण्याचे ठरविले असावे. शेख निजामाने (मुकर्रबखान) एकदम हल्ला करुन संभाजी राजे व कवी कलश यांना संगमेश्वर येथे जिवंत पकडले.[६३] तो औरंगजेबाच्या

आज्ञेवरुन रायगड जिंकण्यास निघाला असताना वाटेत त्याच्या हेरांनी संभाजी राजांच्या हालचालीची व ते संगमेश्वरला असल्याची खबर दिली होती. मुकर्रबखानाने त्वरेने संगमेश्वर गाठले. संभाजी राजांनी बेसावध क्षणी जवळच्या अपुऱ्या सैन्यासह त्याच्याशी लढाई केली. कवी कलशाच्या हाताला बाण लागून ते जखमी झाले. यावेळी मराठ्यांचे सरसेनापती मालोजी घोरपडे धारातिर्थी पडले. शेवटी मुकर्रबखानाने कवि कलश व संभाजी राजे यांना जीवंत पकडले. संभाजी राजे व कवि कलश यांना बहादूरगडला औरंगजेबाकडे नेण्यात आले. ११ मार्च १६८९ रोजी कवि कलश व संभाजी राजांना ठार मारण्यात आले.[६४]

वरील सर्व संदर्भावरुन लक्षात येते की शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर टपून बसलेले सर्व शत्रू एकाच वेळी स्वराज्यावर तुटून पडले. संभाजी महाराजांच्या अंतर्गत शत्रूची कटकारस्थाने, फितुरी यामुळे त्यांच्या मनात आपल्या माणसांविषयी अविश्वास निर्माण झाला. संशयातून त्यांनी अनेक जणांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली. त्यामुळे अनेक चांगली माणसे नष्ट झाली. संभाजी राजे सत्तेवर येताच शहाजादा अकबर आश्रयास आला. अकबराला आश्रय दिल्यामुळे आधीच संतप्त असलेला औरंगजेब अधिकच चिडला. त्याने विशाल सामर्थ्याने स्वराज्यावर आक्रमण केले. सिद्दीसारखा मराठ्यांचा पिढीजात शत्रू औरंगजेबास मिळाला. पोर्तुगीजसुद्धा मोगलांना मिळाले. इंग्रजांनी शहाणपणाने तटस्थ धोरण ठेवले. कोकणातील मराठा स्वराज्याचे अनेक अधिकारी, सरदार, जवळचे सेवक व नातेवाईक मोगल व पोर्तुगीज व सिद्दीला जाऊन मिळाले. कान्होजी आंग्रेच्या त्यांच्या कारकिर्दीची ही सुरुवात राजाराम राजांच्या काळात आहे. त्यामुळे त्यांनी स्वतंत्रपणे कोकणातील किल्ले जिंकले नाहीत पण संभाजी राजांच्या काळात फिरत्या आरमाराचा प्रतिनिधी या नात्याने सिद्दीस त्रस्त केले.[६५]

**छ. राजाराम व महाराणी ताराबाई काळ**

छत्रपती संभाजी महाराजांना मोगलांनी पकडल्याची बातमी त्वरीत रायगडवर पोहचली. येसुबाईंच्या सल्ल्याने राजाराम यांना ९ फेब्रुवारी १६८९ रोजी छत्रपती जाहीर करण्यात आले.[६६] शिर्क्यांच्या कटात सामील असल्याच्या संशयावरुन कैदेत असणाऱ्या प्रल्हाद निराजी यांना मुक्त करण्यात आले. राज्याचा कारभार रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी या मातब्बरांच्या हाती सोपविण्यात आला. महाराणी येसुबाईंनी राजमंडळासमोर ठेवलेल्या मसलतीप्रमाणे महाराणी येसूबाई व संभाजीपुत्र शाहू यांनी रायगडावर राहून किल्ला लढण्याचे ठरले. याशिवाय छत्रपती. सुरक्षित रहावा म्हणून त्यांनी रायगड सोडून फिरते राहून मोगलांशी

लढा देण्याचे तसेच दूर कर्नाटकात जिंजी येथे राजधानी करुन तेथून मोगलांशी लढा चालू ठेवण्याचे ठरले.[६७] येसुबाईंच्या स्वार्थत्यागामुळे सर्व मराठा सरदार व मुत्सद्दी स्वराज्यरक्षणासाठी कटिबद्ध झाले.

छ. राजाराम यांनी आपल्या राण्या व प्रमुख सरदारांसहित ५ एप्रिल १६८९ रोजी रायगड सोडला. रायगडवरुन ते प्रतापगड, सातारा, परळीमार्गे पन्हाळा किल्ल्यावर आले. सततच्या मोगली पाठलागामुळे ते आक्टोबर १६८९ रोजी कर्नाटकात गेले.[६८] याच दरम्यान मोगल सरदार झुल्फिकारखान याने दि. २५ मार्च १६८९ रोजी रायगड किल्ल्यास वेढा दिला. तो किल्ला जिंकला.[६९]

छत्रपती संभाजी राजांच्या वधानंतर मोगलांनी स्वराज्याचा बराचसा प्रदेश जिंकला होता. फक्त थोडा रत्नागिरीचा प्रदेश, सातारा–परळी, विशाळगड, राजमाची आणि कुलाबा (अलिबाग) हे किल्ले मराठ्यांच्या ताब्यात होते.[७०] सिद्दीने संभाजीच्या मृत्यूनंतर अंजनवेल व सूवर्णदुर्ग हे मराठ्यांचे किल्ले जिंकले होते.[७१] छ. राजाराम यांनी रामचंद्रपंत अमात्य बावडेकर यांना हुकूमतपन्हा (राज्याचा आधार) असा किताब देऊन स्वराज्याची व्यवस्था बघण्याचे काम त्यांच्यावर सोपविले. छ. राजाराम यांच्याबरोबरच त्यांचे मंत्री रामचंद्रपंत अमात्य बावडेकर, प्रल्हाद निराजी प्रतिनिधी, शंकराजी नारायण हे रायगडवरुन निसटले होते. या तिघांनी महाराष्ट्रात सैन्य उभारण्याचे काम केले.[७२] जिंजीला पोहोचल्यानंतर राजाराम महाराज यांनी स्वराज्याचे दोन भाग पाडले. कऱ्हाड, तळकोकण, गोकर्ण हा मराठी राज्याचा दक्षिण भाग त्यांनी रामचंद्रपंत अमात्य यांच्या ताब्यात दिला.[७३] कऱ्हाडपासून वरघाटच्या उत्तरेकडील प्रदेश, उत्तर कोकणचा उत्तरेकडील प्रदेश शंकराजीपंत अमात्य यांच्या ताब्यात दिला. राजाराम महाराजांनी रामचंद्रपंतांची नेमणूक पश्चिम राज्याचे प्रमुख कारभारी म्हणून केली. रामचंद्रपंत अमात्यानी हा कारभार अत्यंत चांगल्या पद्धतीने व कार्यक्षमपणे संभाळला. राजाराम महाराजांनी पराक्रमी सरदारांना वतने, इनाम गावे देण्याची पद्धत सुरु केली. छ. राजाराम यांनी कोकणचे सरदार कृष्णाजी गोळे यांना वतनाचे प्रलोभन देत आपल्या सहकाऱ्यांसहित मराठ्यांना सामील होण्याचे आवाहन केले. रामचंद्रपंत अमात्यानी त्यासाठी प्रयत्न केले व गोळे सरदार मराठ्यांना सामील झाले. कोकणातून बहुसंख्य तरुण या काळात मराठा सैन्यात भरती झाले. त्यांनी रामचंद्रपंतांचे आदेश व योजना अंमलात आणल्या. अशा पराक्रमी, धाडसी तरुणांपैकीच

कान्होजी आंग्रे हे एक होती. त्याने आपल्या पराक्रमाने शत्रूंमध्ये दहशत निर्माण केली. कान्होजी आंग्रे आणि कोकण यांचे इतके अतुट नाते निर्माण झाले की कोकणचा इतिहास त्यांच्या नावाशिवाय अपुरा राहिल.[७४]

इ.स. १६८९ मध्ये कान्होजीची सागरकोट व राजकोट येथे सिद्दीशी लढाई होऊन सिद्दी पराभूत झाला.[७५] इ.स. १६९० मध्ये कान्होजी आंग्रे याची छ. राजाराम महाराजांच्या नाविक दलामध्ये दुय्यम दर्जाचा अधिकारी म्हणून नेमणूक झाली.[७६] छ. राजाराम यांच्याबरोबर आरमार प्रमुख सिदोजी गुजर जिंजिकडे गेले. तेव्हा छ. राजारामानी कान्होजी आंग्रे यांना वस्त्रे व सरखेल ही पदवी दिली. तसेच कोकणचा सुभा देऊन रवाना केले. कोकण प्रांत सोडविण्याची आज्ञा केली. आंग्रे यांनी विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग घेऊन, तेथे जमाव करुन, तमाम कोकणात स्वारी करु लागले आणि सारे किल्ले घेतले, व आरमार सैन्य पाण्यातील खाऱ्या लढाया करु लागले.[७७] इ.स. १६९१ मध्ये कान्होजी आंग्रे व सिद्दी यांच्यामध्ये तह होऊन राजकोट, सागरगड, उंदेरी व परहूर येथे दोघांचा अंमल सुरु झाला.[७८] इ.स. १६९२ मध्ये कान्होजी आंग्रे सुवर्णदुर्गवरुन राजारामाच्या ताब्यातील महालामधील वसूल घेऊन खांदेरीस गेले.[७९] १६९३ च्या सुमारास रायगड जिल्ह्यातील बहुतेक प्रदेश सिद्दीच्या ताब्यात होता. मराठ्यांचा आरमार प्रमुख व बलाढ्य सेनानी कान्होजी आंग्रे हा अलिबागच्या आपल्या मुख्य आरमार तळावरुन मोगलांनी हस्तगत केलेल्या किनारपट्टीवरील मुलखात दहशत निर्माण करत होता.[८०] इ.स. १६९५ मध्ये कान्होजी हा विजयदुर्गपासून कुलाब्यापर्यंतच्या बंदरांचा मालक होता. त्याने देशी व परकीयांची जहाजे लुटली.[८१] इ.स. १६९५ मध्ये कान्होजी आंग्रे त्र्यंबकेश्वरची यात्रा करतात.[८२] त्यावेळच्या यात्रींच्या यादीत त्यांचा उल्लेख सूवर्णदुर्गचे सुभेदार असा होता.[८३] कान्होजी आंग्रे यांनी मोगलांकडून सागरगड जिंकला.[८४] इ.स. १६९७ मध्ये कान्होजीनी कुलाबा हे आपले मुख्य ठाणे केले. कान्होजी आंग्रे याने संभाजीच्या मृत्यूनंतर सिद्दीने मराठ्यांचा बळकावलेला प्रदेश जिंकण्याचे ठरवले. कोकणातील अराजक दूर करण्यासाठी कान्होजी आंग्रे यांनी सेक्रोजी मोहिते, राणोजी गोळे, कृष्णाजी मोड, हासनराव जमादार यांच्या मदतीने इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी यांच्या बरोबर लढाया केल्या.[८५] कान्होजीने जवळ-जवळ सर्व किनारपट्टी मिळवली. पोर्तुगीजांनी कान्होजीबरोबर तह केला. कान्होजीने आपल्या आरमाराच्या सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग या प्रमुख छावण्या ठेवल्या. मुख्य ठाणे कुलाबा हेच ठेवले.[८६] राजारामाने कान्होजी आंगरे यांना

शहाणे, पराक्रमी हे जाणून सुवर्णदुर्गी ठेवले. त्यांनी अत्यंत सावधतेने सर्व जंजिरे व प्रांत राखला. मोगलांकडे गेलेले किल्ले व प्रदेश जिंकले. मोडकळीस आलेले किल्ले दुरुस्त केले.[८७] मल्हार रामराव चिटणीस म्हणतात छ. राजारामाने जिंजिस आश्रय घेतला त्यावेळी आरमारप्रमुख सिदोजी गुजर त्यासोबत तिकडे गेला. कान्होजी आंग्रे यास सुवर्णदुर्गचा कारभारी म्हणून नेमला होता.[८८]

इंग्रज कान्होजीस चाच्यांचा नायक पण दुसरा शिवाजीच म्हणत. इंग्रजांच्या मुंबईहून सुरतला पाठविलेल्या दि. ६ फेब्रुवारी १६९८ च्या पत्रामध्येच आपणास समकालीन सर्व नोंदीमध्ये कान्होजीचा सर्वप्रथम उल्लेख आढळतो.[८९] या पत्रामध्ये सुभेदार कान्होजी याने डेप्यूटी गव्हर्नर यास त्याच्या प्रदेशात मीठाची जहाजे पाठविण्याची परवानगी द्यावी त्याबदल्यात पद्मदुर्ग किल्ल्यावरील दोन इंग्रज व्यापारी कैदी सोडण्याचे आश्वासन दिले आहे. कान्होजीने इ.स. १६९४ पासूनच मोगलांकडील कोकणपट्टीचे सर्व किल्ले घेण्यास सुरुवात केली. इ.स. १६९९ मध्ये कान्होजीने मोगल, सिद्दी व पोर्तुगीज यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला.[९०] इ.स. १६९९ मध्ये छ. राजाराम स्वत: कोकणात स्वारी करुन तिकडचे किल्ले पाहून परत आला. त्याने नारो पंडितास राजापूरास येत असल्याचे व तेथे आपली भेट घेण्याचे आश्वासन दिले.[९१] कोकणातील प्रवास आटोपून तो साताऱ्यास आला.[९२] बादशहा ८ डिसेंबर १७०० रोजी सातारला आला. त्याने सातारच्या किल्ल्याला वेढा दिला. २१ एप्रिल १७०० रोजी बादशहाने सातारा जिंकला. छ. राजाराम पळून सिंहगड किल्ल्यावर गेला. याठिकाणी ज्वर येऊन, छातीच्या विकाराने रक्ताच्या गुळण्या होऊन ३ मार्च १७०० रोजी मरण पावला.[९३]

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर राज्यकारभाराची जबाबदारी त्यांची पत्नी महाराणी ताराबाईवर आली. महाराणी ताराबाईने आपला मुलगा दुसरा शिवाजी यास छत्रपती जाहीर करुन राज्याची सर्व सूत्रे हाती घेतली. यावेळी रामचंद्रपंत अमात्य बावडेकर, परशुराम त्र्यंबक, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, दुसरे हंबीरराव मोहिते, नेमाजी शिंदे, राणोजी घोरपडे, हिंदूराव घोरपडे या पराक्रमी सरदारांनी महाराणी ताराबाईस चांगली साथ दिली.[९४]

कान्होजी आंग्रे हा महाराणी ताराबाईच्या काळात आरमार प्रमुख होता. त्याने कोकणातील मराठ्यांच्या मोहिमांचे नेतृत्व केले. कान्होजीच्या कारवायांनी त्रस्त होऊन इ.स. १६९९ मध्ये सिद्दी, फिरंगी (पोर्तुगीज) व मोगल यांनी त्याच्या विरोधात संयुक्त मोहिम

उघडली होती. पण कान्होजीने आपल्या आरमाराच्या जोरावर पराभूत केले.[९५] उलट त्यांच्या ताब्यातील प्रदेश सतत कान्होजीने आपल्या ताब्यात घेतला. त्याने सागरगड व त्या सभोवतालचा प्रांत जिंकून घेतला. कुलाबा, खांदेरी, पाली वगैरे ठिकाणी आपला अंमल बसविला. जंजिऱ्याचा सिद्दी व मोगल कान्होजी आंग्र्यास वसूल देण्यास तयार झाले. कान्होजीने मराठ्यांची सत्ता व वर्चस्व कोकणामध्ये पुन: संस्थापित केले.[९६] कान्होजीचा हाच दरारा पुढे कोकण किनाऱ्यावर राहिला. इ.स. १७०० मध्ये सिद्दीने अलिबागजवळ जंजिऱ्याचे लोक पाठवून कोट बांधण्याचा प्रयत्न केला पण कान्होजीने त्या ठिकाणी आपली चौकी ठेवली. नंतर तेथे हिराकोट हा किल्ला बांधला.[९७] इ.स. १७०० मध्ये कान्होजी आंग्रेने सिद्दीस शरण जाणाऱ्या सुवर्णदुर्गच्या किल्लेदारास अचलोजी मोहिते यास कैद केले. पराक्रमाने सुवर्णदुर्ग राखला. आपला सरदार बकाजी नाईक महाडीक यास किल्ले मंडणगडवर आक्रमणासाठी पाठविले. तेथील सिद्दीचा किल्लेदार सुरुलखान याचा पराभव केला.[९८] या काळात मलबार किनाऱ्यावरील परकीय व्यापाऱ्यांना कान्होजीने त्रस्त केले. शेवटी वसईच्या पोर्तुगीजांनी कान्होजी आंग्रेशी जानेवारी १७०१ मध्ये स्वतंत्रपणे तह केला.[९९] या दरम्यान कान्होजीने सिद्दीचा खांदेरी व कुलाब्याचा वेढा निष्प्रभ केला. इंग्रजांची अनेक जहाजे पकडली. इ.स. १७०५ मध्ये कान्होजीचे आरमार खुप समर्थ असून त्याचा प्रभाव मुंबईपासून मलबारपर्यंत निर्माण झाला होता. त्याच्या भीतीने परकीयांची जहाजे समुद्रात फिरण्यास दबकत. कोकण किनाऱ्यावर मराठ्यांची सत्ता काही दिवस नष्ट झाल्यामुळे परकियांना कोठेही प्रवेश करता येत होता. कान्होजीने आपले आरमार चांगले समर्थ करुन सर्व पश्चिम किनारा ताब्यात घेतल्यामुळे परराष्ट्रीय व्यापाऱ्यांस स्वैर संचार करण्याचे बंद झाले होते.[१००] कान्होजीचे आरमार व त्याची कोकण किनाऱ्यावरची सत्ता परकीयांना फारच त्रासदायक वाटू लागली होती.[१०१] २० फेब्रुवारी १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. यावेळी औरंगजेबाचा मुलगा आजमशाह याने संभाजीपुत्र शाहू यास कैदेतून मुक्त केले. स्वराज्याच्या वारसा पदावरुन महाराणी ताराबाई व शाहू यांच्यात संघर्ष निर्माण झाला. कान्होजी आंग्रे यांनी महाराणी ताराबाईचा पक्ष स्विकारला होता. ताराबाईने मुंबई ते सावंतवाडी हा सर्व समुद्रकिनारा कान्होजीच्या ताब्यात ठेवला.[१०२] कोकणात जाळपोळ करणाऱ्या सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी स्वत: ताराबाईने त्याच्यावर स्वारी केली. तिने मल्हारराव चिटणीसाला

कुंभार्ली घाटातून चिपळूणास जाण्याचा हुकूम केला. स्वत: चिटणीसांच्या मदतीला चिपळूणला स्वारीवर गेली.[१०३] सिद्दी आणि पोर्तुगीज यांच्या बेबंदशाहीमुळे संपूर्ण कोकण उध्वस्त झाले. सरखेल कान्होजी आंग्रे याने सिद्दीचा पूर्ण पराभव केला.[१०४]

अशाप्रकारे महाराणी ताराबाईच्या काळात संपूर्ण कोकणपट्टीवर कान्होजी आंग्रेचा प्रभाव व सत्ता होती. सिद्दीने वारंवार कोकण प्रदेश व किल्ले जिंकण्याचा प्रयत्न केला. पण कान्होजी आंग्रेने हे प्रयत्न यशस्वी होऊ दिले नाहीत. मंडणगड, बाणकोट, पालगड या किल्ल्यांवर कान्होजी आंग्रेचे वर्चस्व असावे. त्या किल्ल्यांवरील अधिकारी कान्होजीच्या नियंत्रणात काम करत होते.

भीमसेन म्हणतो, या सुमारास नर्मदेच्या दक्षिणेस दख्खन खानदेश, वऱ्हाड, कोकण या प्रांतातील परगण्यातून खेड्यातून, सारांश सर्वत्र, मराठे हे टोळ व मुंग्यांप्रमाणे पसरले होते.[१०५]

मराठ्यांचे किल्ले घेतले म्हणजे त्यांना पायबंद बसेल असे औरंगजेबाला वाटत होते. प्रत्यक्षात असे झाले नाही म्हणून खाफीखान खेदाने म्हणतो, बादशहा मराठ्यांचे किल्ले घेण्यात गुंतला होता, पण शेवटी मराठ्यांचा मोड करणाच्या दृष्टीने त्याचा काही उपयोग झाला नाही.[१०६]

औरंगजेबाची किल्ले घेण्यातील शोकांतिका मोठी होती. औरंगजेबाकडे घेतलेले किल्ले संभाळण्याची यंत्रणाच नव्हती. त्यामुळे महाराष्ट्रात त्याची पाठ फिरताच मराठ्यांनी औरंगजेबाने जिंकलेले किल्ले परत घेण्यास सुरुवात केली. औरंगजेबाची सहा वर्षांची मेहनत वाया गेली. औरंगजेबाच्या ताब्यातील किल्ले गेलेच पण मराठे पुन्हा प्रबळ झात्यामुळे हातातील राज्य जाण्याची वेळ आली. दक्षिण जिंकण्याच्या नादात उत्तरेकडील सत्ता गमावण्याचा धोका निर्माण झाला.

**शाहू काळ (इ.स. १७०७–१७४९)**

दि. २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर येथे औरंगजेब बादशहाचा मृत्यू झाला. आजमशहाने उत्तरेस जात असताना वाटेतच झुल्फिकारखान व इतर मुत्सद्यांच्या सल्ल्याप्रमाणे करार करुन संभाजीपुत्र शाहूची ८ म १७०७ रोजी सुटका केली. त्यानंतर सत्तेवर आलेल्या बादशाह आजमशाहने कोकणसहित स्वराज्याचा सर्व प्रदेश शाहू महाराजांना दिला. बाळाजी विश्वनाथने औरंगाबादचा सुभेदार हुसेन अली सय्यद याच्याकडे तहाचा जो मसुदा दिला त्यामधील पहिल्या कलमामध्येच मोगल बादशहा रायगड, मिरज, जुन्नर, कल्याण व भिवंडी ही

स्थळे व त्यांच्या परिसरातील जिल्हे शाहू महाराजांच्या ताब्यात देत आहे असा उल्लेख होता. औरंगजेबाने सिद्दीला रायगड, महाड, दाभोळ व रत्नागिरी ही ठिकाणे दिली होती. पण सिद्दीने रेवस, थळ व अंजनवेल जिंकले या ठिकाणांवरुन सिद्दी आरमाराच्या मदतीने मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ले करु लागला.[१०७]

छ. शाहूच्या सूटकेनंतर मराठ्यांच्या राज्यात यादवी सुरु झाली. महाराणी ताराबाई आणि शाहू यांच्यामध्ये वारसा संघर्ष सुरु झाला. शाहूने प्रथम हा प्रश्न तडजोडीने सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे सर्व सामान्य जनता व अनेक मराठा सरदारांमध्ये शाहूविषयी आदर निर्माण झाला. महाराणी ताराबाईने मात्र लष्करी बळावर शाहूचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न सुरु केला. त्यामुळे शाहूनेसुद्धा लढा देण्याची तयारी केली.

ताराबाईने पन्हाळा किल्ल्यात आश्रय घेतला होता. त्यामुळे पन्हाळा व सातारा अशी दोन समांतर सत्ताकेंद्रे मराठ्यांच्या सत्तेमध्ये निर्माण झाली. शाहू व ताराबाई यांचा संघर्ष चालू असतानाच २७ जून १७०८ मध्ये रांगण्याच्या मोहिमेवरुन परत येताना सेनापती धनाजी जाधवांचा मृत्यू झाला. धनाजीच्या मृत्यूने शाहूची बाजू काही काळ कमकुवत झाली. इ.स. १७०९ मध्ये परसोजी भोसले यांचा मृत्यू झाला. धनाजीच्या मृत्यूनंतर छ. शाहूने धनाजीचा मुलगा चंद्रसेन यास सेनापती केले. ताराबाईच्या प्रोत्साहनामुळे चंद्रसेन जाधवने छ.शाहूविरोधात बंड केले. शाहूने हैबतराव सरलष्कर यांच्याकडून चंद्रसेन जाधवाचा बंदोबस्त केला. चंद्रसेन जाधव उघडपणे महाराणी ताराबाईस जाऊन मिळाला.

दरम्यान कान्होजी आंग्रेने मराठा आरमाराचा विकास केला होता. मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात या आरमाराने महत्वाची भूमिका निभावली होती. कान्होजी आंग्रेंचा पराक्रम व त्यांचे आरमार यांनीच कोकणातील स्वराज्याचा प्रदेश मोगल, सिद्दी, पोर्तुगीज यासारख्या बलाढ्य शत्रूकडून जिंकला व राखला होता. कान्होजी आंग्रेंचा धाक सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यांना वाटत असे. कान्होजीने ताराबाईचा पक्ष स्विकारला होता. तिने कान्होजीला मुंबईपासून सावंतवाडीपर्यंत सर्व किनाऱ्याचे अधिपत्य दिले.[१०८] याशिवाय ताराबाईने राजमाची किल्ला व कल्याण प्रांत कान्होजीकडे सोपविला.[१०९] कान्होजीने कोकण मुक्त केले. विजयदुर्ग हे मुख्य केंद्र केले व सुवर्णदुर्ग, रत्नागिरी किल्ले घेतले.[११०] रायगड किल्ला, जंजिरा वगैरे किरकोळ ठिकाणे सिद्दीकडे, कर्नाळा, राजकोट मोगलांकडे व रेवदंडा, वसई फिरंगी (पोर्तुगीज) यांच्याकडे राहिले.

बाकी सर्व आंग्रे यांनी सोडविले.[१११] कान्होजीने याशिवाय भिवानी गुजर याजकडून कुलाबा प्रांत घेतला. तेथे त्याने समुद्रातील बेटावर चौकीच्या ठिकाणी मजबूत किल्ला बांधला. प्रांत कर्नाळा येथे डोंगरावर माणिकगड बांधला. विकटगड, राजमाची, कोथळा, विसापूर, लोहगड हे किल्ले व मुलूखसुद्धा घेतले.[११२] कान्होजी आंग्रेंने अशाप्रकारे ताराबाईच्या प्रेरणेने शाहूच्या सत्तेला आव्हान दिले. कोकणातून शाहूच्या फौजेला कान्होजीने हुसकावून लावले. राजमाची, तुंग, तिकोणा, लोहगड हे महत्वाचे किल्ले घेऊन कान्होजीने कोकणात दहशत निर्माण केली. छ. शाहूने कान्होजींचा बंदोबस्त करण्यासाठी पेशवे बहिरोपंत पिंगळे, व प्रतिनिधी यांना पाठविले.[११३] कान्होजी आंग्रेने पेशवे बहिरोपंत पिंगळे यांचा पराभव करुन त्यांना व निळो बल्लाळ चिटणीसास कैद केले.[११४] त्या दोघांना कुलाबा येथे कैदेत ठेवले. इ.स. १७१३ मध्ये पावसाळ्यात कान्होजी आंग्र्यांच्या कारवाया वाढल्या. कान्होजी व ताराबाईने मोगलांकडून कर्नाळा व इतर किल्ले जिंकले. आता कान्होजीचा बंदोबस्त करणे आवश्यक झाले होते. छ. शाहूंनी आता पराक्रमी व मुत्सद्दी बाळाजी विश्वनाथ यांना पेशवेपद देऊन कान्होजी आंग्रेंच्या बंदोबस्ताची जबाबदारी सोपविली. बाळाजी विश्वनाथ याने कान्होजी विरोधात मोहीमेची तयारी केली. युद्धाची तयारी करतानाच कान्होजीशी बोलणी करुन तडजोडीने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी काही प्रस्ताव हस्ते परहस्ते कान्होजीकडे पाठविले. चार हजाराचे सैन्य घेऊन पेशवे बाळाजी विश्वनाथ कोकणातील कान्होजी आंग्रेच्या बंदोबस्तासाठी निघाले. वाटेतच लोणावळ्याजवळ वळवण येथे बाळाजी विश्वनाथ व कान्होजी आंग्रे यांची प्रत्यक्ष भेट झाली. बाळाजी विश्वनाथने कान्होजीला शाहू हाच खरा सनदशीर वारस असल्याची तसेच कोल्हापूरमध्ये महाराणी ताराबाई व राजसबाई यांच्यातील सत्तास्पर्धा व त्यामुळे निर्माण झालेल्या कोल्हापूर गादीच्या अस्थिर राजकीय स्थितीची जाणीव करुन दिली. शाहूच्या पक्षात येणे कसे फायद्याचे आहे हे बाळाजीने कान्होजीस पटवून दिले. कान्होजीने बाळाजीचा प्रस्ताव मान्य केला. दोघांमध्ये तह झाला. राजमाची सोडून इतर दहा मोठे किल्ले आणि सोळा ठाणी व गढ्या शाहूला देण्याचे कान्होजीने मान्य केले. बहिरोपंत पिंगळे यांना सोडून देण्यात आले. घाटावरील लोहगड वगैरे किल्ले राजमंडळाकडे (छ. शाहू) ठेऊन बाकीचे सर्व संस्थान कान्होजीने चालवावयाचे ठरले.[११५] बाळाजीने छ. शाहू व कान्होजी यांनी प्रत्यक्ष भेट जेजूरी जेथे घडवून आणली. छ. शाहूंनी

कान्होजी आंग्रेच्या निष्ठेची खात्री पटवून घेतली. यानंतर कान्होजीस छ. शाहूने आरमाराचा अधिकार व सरखेल ही पदवी कायम केली.[११६] हा तह १८ फेब्रुवारी १७१४ रोजी झाला. या तहाविषयी अनेक ठिकाणी वेगवेगळे संदर्भ मिळतात. दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती व यादी वगैरे मध्ये राजांनी आंगरे यांची खात्री करुन, विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग व कुलाबा विकटगड वगैरे सत्ताविस किल्ले, चौतीस लक्षांचा मुलूख व आरमारचा सुभा (अधिकार) व सरखेल हे पद ही संस्थानचे अक्षयी देऊन कोकणात रवाना केले.[११७]

कान्होजीचा सन्मान सुवर्णदुर्गचा अधिकारी करुन घेतला. उंदेरी मराठ्यांनी आंग्र्यांकडे दिला.[११८] वरघाटचे किल्ले मोगलाईतून राजकारणामुळे अगर सक्तीने आम्ही घेतले (आंग्रेनी) तरी तुमच्या (छ. शाहूंच्या) स्वाधीन करावे. तळघाटचे किल्लयास तुम्ही (छ. शाहूनी) राजकारण करुन घेतले तर ते आमच्याकडे (आंग्र्याकडे) द्यावेत. त्रिंबक आम्हाकडे (आंग्रे) पट्टा तुम्हाकडे (छ. शाहू) घ्यावा. कोकणची मसलत दसऱ्यापासून मार्गशीर्षपर्यंत तुम्ही राहून प्रतिवर्षी करावी. (छ. शाहूने पेशव्यांकडून) हबशी फिरंगी मारुन गर्देस मेळवावे. राजमाची, श्रीवर्धन, मनरंजनगड, मुजगड, कोथळा आम्हाकडे (आंग्र्यांना) द्यावे. लोहगड, तुंगी, तिकोणा, कोरगड, वनगड सामानासहित तुम्हाकडे (छ. शाहूंकडे) घ्यावे. रायगड आम्ही (आंग्र्यांनी) घेतला तर तुम्हाकडे (छ. शाहूंना) द्यावा.[११९] छ. शाहूंनी कान्होजी आंग्र्यांना सरखेल हा किताब व सर्व आरमाराचे आधिपत्य दिले; आणि सरंजामा दाखल त्याच्याकडे दहा किल्ले व सोळा महाल दिले. या दहा किल्ल्यांमध्ये खांदेरी, कुलाबा, अवचितगड, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड यशवंतगड, देवदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड ह्या समुद्रातील किल्ल्यांचा समावेश असून, सोळा महालांमध्ये मुंबईपासून खारेपाटणपर्यंत सर्व मुलूख आंग्र्यांच्या ताब्यात आला. आंग्र्यांकडून शाहू महाराजांना सार्वभौमत्वाबद्दल प्रतिवर्ष १२००० रुपये दिले जात.[१२०] कान्होजीने शाहूराजाबरोबर सख्य केले व त्यामुळे मराठ्यांच्या आरमारावरील त्याचे अधिपत्य कायम करण्यात आले. शिवाय दाभोळ व अंजनवेल येथील सिद्दीचा मुलुख सोडून सावंतवाडीपासून मुंबईपर्यंतचा सर्व किनारा त्याच्या ताब्यात देण्यात आला आणि जमिनीवरील पालगड, रसाळगड, खारेपाटण आणि राजापूर ही मुख्य ठाणी सुद्धा त्याचे ताब्यात दिली गेली.[१२१] १८ फेब्रुवारी १७१४ रोजी शाहू महाराज व कान्होजी आंग्रे यांच्यात तह झाला. त्या तहाप्रमाणे काही किल्ल्यांच्या मालकीचे हस्तांतर झाले.

कान्होजीला राजमाची, खांदेरी आणि कोकणातील २६ किल्ले मिळाले. त्यापैकी काही सिद्दीने बळकावले होते. शिवाय असे ठरले की दरवर्षी दसऱ्यापासून मार्गशिर्षपर्यंत (ऑक्टोबर ते डिसेंबर) पेशव्यांनी कोकणात कान्होजीच्या शत्रू विरुद्ध स्वारी करावी आणि कान्होजीचे जे शत्रू असतील ते आपले शत्रू असे मानावे.[१२२] कान्होजी आंग्रे मराठा आरमाराचा प्रमुख म्हणून कायम करण्यात आला आणि कुलाबा ते वेंगुर्ल्यापर्यंत किनाऱ्याचा प्रभारी करण्यात आला. याशिवाय पालगड, रसाळगड, खारेपाटण व राजापूर या अंतर्गत प्रदेशांचे नियंत्रण त्याचेकडे देण्यात आले.[१२३] राजमाची सोडून इतर दहा मोठे किल्ले आणि सोळा ठाणी व गढ्या शाहूस देण्याचे कान्होजीने मान्य केले. छ. शाहूने आरमाराचा अधिकार आणि सरखेल ही पदवी कान्होजीकडे कायम ठेवली.[१२४] खांदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, देवदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड, अवचितगड व यशवंतगड असे दहा किल्ले व बहिरवगड, कोटला, विकटगड, माणिकदुर्ग, मीरगड, सागरगड, रसाळगड, पालगड, रामदुर्ग, खारेपाटण, राजापूर, अंबेड, सातवरे, कामटे, श्रीवर्धन व मनरंजन हे सोळा महाल आंग्र्यांना शाहूने १७१४ मध्ये देऊन टाकिले.[१२५]

अशाप्रकारे कान्होजी आंग्रे शाहूंच्या पक्षात आले त्यांना मराठ्यांचे आरमारप्रमुख, सरखेल ही पदवी व २६ किल्ले देण्यात आले. कोकणातील विविध किल्ल्यांच्या घेरियाचा, जवळपासच्या गावांचा महसूल कोणी वसूल करायचा हे निश्चित करण्यात आले. कोल्हापूरला राज्यक्रांती होऊन राजसबाईच्या गटाचा विजय झाला. राजसबाई पुत्र संभाजी कोल्हापूरच्या गादीवर बसले. कोल्हापूरच्या छ. संभाजीने सुद्धा छ. शाहूंना विरोध करण्याचेच धोरण अवलंबले. त्याने शाहूविरोधात शाहूच्या शत्रुंशी विशेषत: मोगल सरदार निजाम–उल–मुल्कशी संपर्क साधण्यास सुरुवात केली.

सिद्दी हा मराठ्यांचा शत्रू होता. इ.स. १७०८–१० या काळात सिद्दीने मराठ्यांच्या मुलखावर हल्ले केले. या प्रदेशातील प्रजेला त्रास दिला.[१२६] औरंगजेबाने कोकणातील जिंकलेले मराठ्यांचे किल्ले व त्याखालील मुलुख सिद्दीला दिला होता. त्यामुळे अलिबाग, पेण तालुका सोडून सर्व कुलाबा जिल्हा सिद्दीने व्यापला. मुंबईचा आश्रय घेऊन सिद्दी पेण, नागोठाण्याच्या खाडीत शिरुन गावेच्या गावे जाळत, खेडूतांना पकडून गुलाम म्हणून विकत असे. सिद्दीने कान्होजी आग्रेंचा बंदोबस्त करण्याचा खुप प्रयत्न केला. पण ते शक्य झाले नाही. सिद्दीने राजापुरी नदीच्या तोंडाशी असणारा पद्मदुर्ग किल्ला जिंकला. कान्होजी आंग्रे शाहू विरोधी

मोहिमेत गुंतला असताना सिद्दीने सुवर्णदुर्ग किल्ल्यावर हल्ला केला. सिद्दीने सुवर्णदुर्ग किल्ला जिंकला.[१२७] छ. शाहू व कान्होजी यांच्यामध्ये तह होताच शाहूच्या वतीने पेशवे व कान्होजी यांनी एकत्र येऊन सिद्दीवर आक्रमण केले. यावेळी सिद्दीला मराठ्यांशी दि. ३० जानेवारी १७१५ रोजी तह करावा लागला.[१२८] या तहाप्रमाणे शाहू महाराजांनी सिद्दीच्या ताब्यातील गोरेगाव, गोवेल, निजामपूर, नागोठणे, अष्टमी, पाली, आश्रे व अंतोणे या गावांचा अर्धा महसूल वसूल करावा.[१२९] याशिवाय सिद्दीने सुरगड, प्रतापगड, यशवंतगड, बाणकोट, कोंडाणा, खुपगड, पट्टेदुर्ग, कुतूरगड, विजयदुर्ग, मुक्तरगड व मदनगड किल्ले मराठ्यांना द्यावेत असे ठरले.[१३०]

कान्होजी हा इ.स. १७१४ मध्ये मराठ्यांचा आरमाराचा प्रमुख झाल्यावर मरेपर्यंत त्याने आपले कर्तव्य उत्तम पार पाडले. इ.स. १७१४ पासून इ.स. १७२९ पर्यंत आंग्र्यांच्या आरमाराचा समुद्र किनाऱ्यावर प्रचंड दरारा निर्माण झाला होता. या मुदतीमध्ये कान्होजीने सिद्दीस शिरजोर होऊ दिले नाही. व्यापाराच्या हेतूने कोकणात आलेल्या परकियांना तर कान्होजीने जेरीस आणले. त्याने विजयदुर्ग येथे आपल्या आरमाराचे मुख्य ठिकाण केले. सर्व बंदरी किल्ल्यांना उत्तम तटबंदी करुन तेथे आरमाराचा पक्का बंदोबस्त केला. मुंबईपासून गोव्यापर्यंत सर्व समुद्र किनाऱ्यावर एकही खाडी, एकही बंदर किंवा एकही नदीचे मुख त्याने तटबंदीवाचून किंवा जहाजाच्या नाक्यावाचून मोकळे ठेवले नाही.[१३१] इ.स. १७१७–१८ मध्ये छ. शाहूकडे दाभोळ सुभ्यातील सारंगगड, जयगड खुर्द, सुमारगड व महिपतगड हे चार किल्ले तर कान्होजी आंग्रेकडे दाभोळ सुभ्यातील रसाळगड, फत्तेगड, कनकदुर्ग, सुवर्णदुर्ग, गोवा व पालगड हे सहा किल्ले होते.[१३२]

इ.स. १७१५ च्या तहानंतर इ.स. १७२५ पर्यंत मराठे व सिद्दी यांच्यामध्ये मोठा संघर्ष झाला नाही.[१३३] इ.स. १७२३ मध्ये कान्होजी आंग्रे यांनी सुवर्णदुर्ग तालुका घेतला.[१३४] कान्होजी आंग्रे यांनी इ.स. १७२४ मध्ये जयगड व पूर्णगड बांधला.[१३५] बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूनंतर अप्रत्यक्षपणे सत्ता प्रभावी सरदारांच्या हाती गेली. सय्यद बंधुंनी दि. २८ सप्टेंबर १७१९ रोजी रोशन अख्तर यास मुहम्मदशाह या नावाने गादीवर बसवले. सर्व सत्ता सय्यद बंधूंच्या हातातच होती.[१३६] छ. शाहूने निजाम–उल–मुल्कच्या विरोधात मदत करण्याची तयारी दाखवून दिल्ली दरबारी, सय्यद बंधूंकडे आपल्या मागण्या पाठविल्या त्यामध्ये शिवनेरी, चाकण, माहुली, कर्नाळा, मिरज या किल्ल्यांबरोबर पालगड किल्ला व छ. शाहूंच्या प्रदेशात त्यांच्या ताब्यात

असणारे किल्ले व त्याखालील प्रदेश छ. शाहूंच्याच ताब्यात ठेवण्याची मागणी केली होती.[१३७] २० जून १७२५ मध्ये निजाम–उल–मुल्क मोगलांचा दक्षिणेचा सुभेदार म्हणून दक्षिणेत परत आला. त्याने छ. शाहू विरोधात कोल्हापूरच्या छ. संभाजी व सिद्दीस चिथावणी देण्यास सुरुवात केली. २ एप्रिल १७२० मध्ये पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचा मृत्यू झाला. छ. शाहूंनी बाळाजीचा मुलगा पहिला बाजीराव यांना १७ एप्रिल १७२० रोजी पेशवा म्हणून नेमले. पेशवे पहिले बाजीराव कर्नाटकच्या मोहीमेवर गेल्यानंतर निजाम–उल–मुल्कने छ. शाहू विरोधात मोहीम उघडली. सिद्दीने नव्याने मराठ्यांच्या कोकण प्रदेशावर हल्ले सुरु केले. निजाम–उल–मुल्कच्या चिथावणीने सिद्दीने एप्रिल १७२५ मध्ये पालगडच्या किल्ल्याखालील प्रदेशावर आक्रमण करण्यासाठी सैन्य गोळा केले.[१३८] यावेळी  कान्होजी आंग्रेना पालगडला मदत पाठविण्यास शाहूने सांगितले.[१३९] यावेळी सिद्दीने पालगड किल्ला जिंकला. इ.स. १७२६ मध्ये कान्होजी आंग्रेचे जंजिरेकर सिद्दीबरोबर पालगड घेण्यासाठी युद्ध झाले.[१४०] इ.स. १७२८ मधील कान्होजी आंग्र्यांच्या ताब्यातील किल्ल्यांच्या यादीमध्ये पालगड किल्ल्याचे नाव आहे.[१४१] अशाप्रकारे सिद्दीने १७१५ मध्ये मराठ्यांशी केलेला तह मोडून मराठ्यांच्या, आंग्र्यांच्या प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. त्यामुळे  सरखेल कान्होजी व सिद्दी यांच्यातील शत्रुत्व वाढत गेले. सरखेलांनी छ. शाहूना सिद्दीचा बंदोबस्त करण्यास लष्करी मदत मागितली. छ. शाहूने दसऱ्याचा समारंभ झाल्यानंतर ऑक्टोबर १७२६ नंतर लष्करी मदत पाठविण्याचे वचन दिले. कान्होजीने सिद्दी विरोधात मोहीम सुरु केली.[१४२] इ.स. १७२९ मध्ये कान्होजीने सिद्दीकडून पालगड जिंकला.[१४३]

## बह्मेंद्रस्वामी प्रकरण

ब्रह्मेंद्रस्वामी एक थोर आध्यात्मिक व्यक्ती मानले जात. छपत्रती शाहू, पेशवे, सरखेल आंग्रे व इतर सरदार त्यांचा खुप आदर करत. छ. शाहू, पेशवे, अनेक मातब्बर सरदार, त्यांच्या बायका व इतर कुटुंबियांचा ब्रह्मेंद्रस्वामींशी नेहमी पत्रव्यवहार चालत असे. ब्रह्मेंद्रस्वामीना सिद्दी सुरुरने १७०८ व १७०९ मध्ये चिपळूण जवळील पेढे व आंबडस ही गावे इनाम म्हणून दिली होती.[१४४] इ.स.१७२६ नंतर सिद्दी सात (जंजिऱ्याच्या सिद्दीचा नातेवाईक व अंजनवेलचा किल्लेदार) याचा व ब्रहमेंद्रस्वामींचा हत्तीवरुन तंटा सुरु झाला. त्यामुळे  ब्रहमेंद्रस्वामींना कोकण सोडून साताऱ्याजवळ धावडशी येथे येऊन रहावे लागले. ब्रहमेंद्रस्वामींकडे पेढे, आंबडस

याबरोबर डोरले म्हाळुंगे व लायसी ही गावे होती. त्यातील परशुरामाचे मंदिर व काही इनाम गावे सिद्दीच्या राज्यात (हबसाण) होती. स्वामींचा खजिना व साठे रसाळगड किल्ल्यावर होते. हा किल्ला सिद्दीच्या प्रदेशापासून जवळ होता. सिद्दीसात हा सिद्दीचा पराक्रमी सेनापती व अंजनवेल, गोवळकोट किल्ल्यांचा प्रमुख होता.

बादशहाच्या मृत्यूनंतर शाहूच्या सुटकेवेळी सिद्दीने रायगड जिंकला व १७३४ पर्यंत राखला.[१४५] छ. शाहूंना मराठ्यांची राजधानी रायगड सिद्दीच्या ताब्यातून सोडविण्याची खुप इच्छा होती. याबरोबरच अंजनवेल गोवळकोट किल्ले जिंकावेत तसेच शक्य झाले तर जंजिऱ्यावर ताबा मिळवून सिद्दीची ताकद खच्ची करावी असा छ. शाहूंचा मानस होता.[१४६] समकालीन पत्रांमध्ये सिद्दीच्या कोकणातील प्रजेवर केलेल्या अन्यायाचे, जुलमाचे अनेक उल्लेख मिळतात.[१४७] अशाप्रकारे हबसाणातील व मराठ्यांच्या प्रदेशातील गावांवर हल्ले करुन सिद्दी सातने जनतेस त्रस्त केले होते. नोव्हेंबर १७३३ मध्ये परशुराममधील लोकांनी एकत्र येऊन बाजीराव पेशव्याला सिद्दीसातच्या ताब्यातून अंजनवेल व गोवळकोट हे किल्ले व त्या खालील मुलूख घेण्याची विनंती केली होती. त्या बदल्यात एक लाख रु. देण्याची तयारी दाखविली.[१४८] अशाप्रकारे कोकणातील जनता सिद्दीसातच्या जुलमाने त्रस्त झाली होती. या जनतेला अन्यायापासून वाचविण्यासाठी सिद्दीसातचा बंदोबस्त करणे गरजेचे होते. याच दरम्यान हत्ती प्रकरण घडले. यातून उद्‌भवलेल्या संघर्षात सिद्दीसात मरण पावला.

सावनूर बंकापूरच्या नवाबाने सिद्दी याकुबखानचा अंजनवेल व गोवळकोटचा सुभेदार सिद्दीसात यास हत्ती भेट दिला होता.[१४९] बंकापूर ते अंजनवेल या दरम्यान जागोजागी मराठ्यांच्या चौक्या होत्या. त्यामुळे सिद्दीसातचा हत्ती अंजनवेलपर्यंत सुरक्षित आणणे शक्य नव्हते.[१५०] सिद्दीसातने हत्ती सुरक्षित आणण्यासाठी ब्रह्मेंद्रस्वामींची मदत घेण्याचे ठरविले. मराठ्यांच्या दरबारात, सरदारांमध्ये स्वामींच्या प्रभावाचा उपयोग करुन घ्यावा असे सिद्दी सातने ठरविले. सिद्दीसातने ब्रह्मेंद्रस्वामींना हत्ती आणण्यासाठीची दस्तके आणून देण्याविषयी पत्र लिहले.[१५१] ब्रह्मेंद्रस्वामींनी भिक्षाटनार्थ सावनूर प्रांती जात आहे तेव्हा सोबतच आपला हत्ती घेऊन येऊ, असे आश्वासन सिद्दीसातला दिले. सिद्दीसातने आपले दहा पठाण स्वामींबरोबर हत्ती आणण्यासाठी पाठविले.[१५२] पेशवे कर्नाटकाच्या स्वारीवर असतानाच ब्रह्मेंद्रस्वामी

कर्नाटकामध्ये गेले. स्वामींना लोकप्रियतेची व मोठेपणाची हौस होती. त्यामुळे त्यांनी हे सिद्दीसातचे काम अंगावर घेतले. त्या काळात देशामध्ये ठिकठिकाणी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या चौक्या असत. या चौक्यांमधून परवानगीशिवाय फौज, जनावरे व इतर माल सहजासहजी सोडला जात नसे. ब्रह्मेंद्रस्वामी सावनूरच्या नबाबाकडून हत्ती घेऊन विशाळगड मार्गे परत आले. विशाळगडच्या घाटामध्ये प्रतिनिधींच्या चौकीदारांनी हत्ती नेण्यास अटकाव केला. स्वामींनी किल्ल्यावरील अधिकाऱ्यांना सविस्तर पत्र पाठवून हत्ती नेण्याची परवानगी घेतल्यामुळे तसेच सिद्दीसातने प्रतिनिधीस आधीच विनंतीपत्र पाठविल्याने तेथून हत्ती सुखरुप निसटला. माखजन येथे आंग्रे व सिद्दी या दोघांच्या चौक्या होत्या. दोघांच्या चौकीदारांमध्ये भांडण लागले. आंग्र्यांच्या चौकीदारांनी जयगडवरुन मदत मागवून हत्ती जप्त केला. हा हत्ती जयगडला पाठवून दिला. स्वामी यावेळी मागच्या मुक्कामावर होते. माखजनला आल्यानंतर त्यांना ही बातमी कळली. त्यांनी जयगडच्या हवालदाराला निरोप व कान्होजींना पत्र पाठविले. कान्होजीने पत्र पाठवून हत्ती परत देण्याची आज्ञा केली. कान्होजीने जयगडावरील आपल्या अधिकाऱ्याना आदेश देऊन हत्ती सोडून दिले. दरम्यान सिद्दीसातने आपले सैन्य जयगडकडे पाठविले होते. आंग्र्यांच्या सैन्याने त्यांचा पराभव केल्याने ते हत्ती न घेताच रिकाम्या हाताने परत आले. हे पाहून सिद्दीसात संतापला. त्यास वाटले ब्रह्मेंद्रस्वामींनी भांडणाचे खोटे निमित्त करुन जाणिवपूर्वक हत्ती मराठ्यांच्या ताब्यात दिला. त्याने स्वामींच्या परशुराम देवस्थानावर ८ फेब्रुवारी १७२७ रोजी हल्ला केला. देवालयाची लुटालुट, नासधुस करुन तेथील लोकांना मारझोड केली. अनेक ब्राम्हण जीवाच्या भीतीने पळून गेले. ब्रह्मेंद्रस्वामी हत्ती घेऊन गोवळकोट येथे आले. त्यांनी सिद्दीसातला निरोप देऊन बोलविले व हत्ती त्याच्या स्वाधीन केला. सिद्दी सातने स्वामींजवळ केल्या कृत्याची माफी मागितली. परंतु परशुरामवरील हल्ल्याने स्वामी खुप दु:खी झाले होते. परशुराम देवालयाची व आपल्या शिष्यांची अवस्था बघून ते दंडराजपुरीस सिद्दी याकुदखानाकडे सिद्दीसातची तक्रार करण्यास गेले. सिद्दी याकुदखानाने स्वामींची माफी मागून सिद्दीसातकडून परशुराम देवालयाचा लुटलेला सर्व ऐवज स्वामींना परत दिला. स्वामींनी परशुरामास येऊन पुन्हा देवालयाची नीट व्यवस्था लावली. सिद्दीसातला स्वामींनी जंजिऱ्याच्या सिद्दीकडून केलेला अपमान बोचला. तो अप्रत्यक्षपणे स्वामींना त्रास देऊ लागला. आता

स्वामींनी देशावर धावडशी येथे जाण्याचे निश्चित केले. कान्होजी आंग्रेने स्वामीना समजावले, सिद्दी याकुदखानने अजून दोन गावे इनाम देण्याची तयारी दाखवली. परंतु स्वामींनी आता कोकणात रहायचे नाही असे ठरविले. त्याप्रमाणे स्वामी धावडशीस आले. ६ मार्च १७२७ रोजी तेथे स्वामींची व छ.शाहूंची भेट झाली. स्वामींनी आता शाहू महाराजांच्याकडून सिद्दीच्या प्रांतावर स्वारी करुन त्याचे निर्मुलन करण्याचे ठरविले.[१५३] स्वामींनी आता छ.शाहू व पेशव्यांकडे सिद्दीचा बंदोबस्त करण्याविषयी आग्रह धरला.

### छ. शाहूंची सिद्दीविरुध्दची मोहिम

४ जुलै १७२९ रोजी सरखेल कान्होजी आंग्रे यांचा मृत्यू झाला.[१५४] कान्होजींची सिद्दीवर दहशत होती. कान्होजीच्या मृत्यूने ती कमी झाली. सिद्दीने मराठ्यांच्या प्रदेशात त्रास देण्यास तसेच जबरदस्तीने वसूल करण्यास सुरुवात केली. कान्होजी आंग्रेना सेखोजी, संभाजी, मानाजी, येसाजी व तुळाजी अशी पाच मुले होती. याशिवाय धोंडजी नावाचा अजून एक मुलगा कान्होजीस असल्याचे उल्लेख मिळतात. छ. शाहूनी दि. २१ जुलै १७२९ रोजी सेखोजी आंग्रे यास सरखेल पदाची वस्त्रे व कान्होजीच्या ताब्यातील प्रदेश व किल्ले दिले.[१५५] ब्रह्मेंद्रस्वामीनी आता छ. शाहूंकडून सरखेल सेखाजीच्या मदतीने सिद्दीवर आक्रमण करण्याची योजना उभारली.

छ. शाहूंची रायगड, अंजनवेल, गोवळकोट घेण्याची महत्वाकांक्षा, कोकणातील प्रजेस सिद्दीचा होणारा उपद्रव व ब्रह्मेंद्रस्वामींचा आग्रह यामुळे सिद्दीविरोधी मोहिमेचे छ. शाहूंनी नियोजन केले. कान्होजी आंग्रेने मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदर सिद्दीकडूंन पालगड किल्ला जिंकला होता. पेशवे बाजीराव बुंदेलखंड व उत्तर भारतातील राजकारणात गुंतले होते. छ.शाहूनी श्रीनिवास परशुराम प्रतिनिधी, जिवाजी खंडेराव चिटणीस यांना सिद्दीच्या बंदोबस्तास पाठविले. त्यांनी शेख याकूब उर्फ शेरवजी या हबशांच्या पराक्रमी सरदारास फितुर करुन सिद्दीचे सर्व राज्य मराठ्यांच्या राज्यात समाविष्ट करण्याचे ठरविले.[१५६] प्रतिनिधी हबशाच्या बंदरात उतरले होते. त्यांनी सिद्दी सात याची काशी बंदरावर भेट घेऊन त्यास घोडा नजर करुन त्याच्याशी सलोखा करण्याचा प्रयत्न केला.[१५७]

दि. १३ एप्रिल १७३१ रोजी छ. शाहू व छ. संभाजी यांच्यामध्ये वारणेचा तह झाला. त्यामध्ये किल्ला कोपळ संभाजीला दिल्यामुळे त्याबदल्यात रत्नागिरी छ. शाहूला मिळाला.

कोकण प्रांत साळशी पलीकडे तहत पंचमहाल अंकोले पावे तो दरोबस्त तुम्हाकडे (छ. संभाजीस) दिले असत.[१५८] वारणेच्या तहाप्रमाणे विजयदुर्गच्या दक्षिणेचे किल्ले व प्रदेश कोल्हापूरकरांना व उत्तरेकडील किल्ले व प्रदेश छ. शाहूंना मिळाले.[१५९] या तहामुळे रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व किल्ले छ. शाहूना मिळाले.

छ. शाहूनी यशवंतराव महादेव पोतनीस यास जंजिऱ्याचे कारस्थान रचण्यासाठी कोकणात पाठविले.[१६०] यावेळी फेब्रुवारी १७३३ मध्ये जंजिऱ्याचा मुख्य सिद्दी रसूल याकुबखान मरण पावला. त्याला अब्दुल्ला हा मोठा मुलगा याशिवाय, सिद्दी संबूल, सिद्दी अंबर, सिद्दी रहमान, याकूत, हसन व अजून सहा लहान मुलगे होते. सिद्दी रसूल याकुबखानाच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये वारसा संघर्ष सुरु झाला.[१६१] शेख याकुब उर्फ शेखजी हा मूळचा कोळी पण धर्मांतरित मुस्लिम सिद्दींचा एक पराक्रमी सरदार होता. त्यास पन्नास हजार रु. देऊन फितुर केले.[१६२] सिद्दी रसूल याकुबखानाचा मोठा मुलगा अब्दुल्ला, व इतर भाऊ जंजिऱ्याच्या किल्ल्यात राहिले. अब्दुल्लाचा मोठा मुलगा रहमान किल्ल्याबाहेर सिद्दी रसूल याकुतखानाचे प्रेत दफन करण्यास राजपूरीला आला. किल्ल्यात सिद्दी संबुल, सिद्दी अंबर आफवाणी, सिद्दी राहाण व सिद्दी याकूत या चौघांनी एकत्र येऊन कारस्थान करुन सिद्दी अब्दुल्लास ठार मारले. त्यांनी जंजिऱ्याचे दरवाजे लाऊन घेतले व सिद्दी रहमान यास जंजिऱ्यात घेतले नाही.[१६३] शेखजीने सिद्दी रहमान यास मराठ्यांच्या बाजूस वळवून घेतले. सिद्दी रहमानने शेखजीच्या मार्फत मराठ्यांकडे मदत मागितली.[१६४] शाहूने या कारस्थानाची पुर्तता केली. छ.शाहूने पेशवे बाजीरावास ताबडतोब बोलवून खर्चाची सोय करुन पेशवे बाजीरावास कोकणात पाठविले. यावेळी श्रीपतराव प्रतिनिधी व फत्तेसिंग भोसले यांना सुद्धा सैन्यासहित मदतीस पाठविले. सिद्दी रहमान पेशवे बाजीराव यांना भेटले.[१६५] यशवंतराव महादेव पोतनीस यांनी शेखजीशी बोलणी केली. त्याप्रमाणे शेखजीने मराठ्यांना सर्वप्रकारे मदत करावी. त्याबदल्यात त्यास सर्व आरमाराचे अधिपत्य, सिद्दीच्या सर्व प्रदेशाची सुभेदारी, अनेक किल्ले व इनाम गावे द्यावीत. तसेच त्याच्या भावास रायगडची किल्लेदारी, सैन्यातील लोकांना एक लाख रु. बक्षिस म्हणून द्यावेत असे ठरले. मार्च व ४ एप्रिल १७३२ च्या दरम्यान सेखोजी आंग्रे यांनी पंत अमात्य (छ. संभाजींचे सरदार) यांच्याकडून रत्नागिरी घेतली.

सिद्दीविरुद्धच्या मोहिमेसाठी पेशवे बाजीराव २ मे १७३३ रोजी राजगड, पाली, सुरगड, अष्टमी मार्गे राजपूरीला पोहोचले. शेखजीने पेशवे बाजीराव यांना खोकरी उर्फ याकुबनगरची गुप्त वाट दंडराजपूरीत प्रदेश करण्यासाठी दाखविली.[१६६] शेखजीशी गुप्तपणे सल्ला मसलत करुन पेशव्यांनी सिद्दीची मुख्य ठिकाणे जिंकण्यास सुरुवात केली. बाणकोट खाडी पासून उत्तरेस रेवदंड्यापर्यंतच्या किनाऱ्याच्या पूर्वेकडील प्रदेश हा सिद्दीचा मुख्य प्रदेश होय. याशिवाय मुंबईजवळचे उंदेरी बेट, रेवस, थळ, बाणकोट, जयगड, दाभोळ ही पश्चिम किनाऱ्यावरील अनेक महत्वाचे प्रदेश व किल्ले सिद्दीच्या ताब्यात होते. या ठिकाणांवरुन तो मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ला करुन प्रजेस त्रस्त करत होता. हे महत्वाचे प्रदेश सिद्दीच्या ताब्यातून सोडविणे, जंजिरा घेणे व सिद्दीला नेस्तनाबूत करणे या हेतूने ही मोहिम सुरु करण्यात आली. शेखजीच्या माहितीच्या आधारे पेशव्यांनी कोकणातील सिद्दीचा बराच प्रदेश जिंकला. ७ मार्च १७३३ रोजी संभाजी आंग्रे आपल्या आरमारासहित जलमार्गे बाणकोट घेण्यासाठी आले. छ. शाहूंच्या आज्ञेप्रमाणे महाडवरुन हरी मोरेश्वर राजाज्ञासुद्धा बाणकोटकडे संभाजी आंग्रेंच्या मदतीला गेले.[१६७] अंजनवेलच्या सिद्दीसातच्या वसुली अधिकाऱ्यांनी वसुलीसाठी पालगडच्या प्रदेशात अत्याचार व लुटालूट केली. त्यामुळे चिपळूणच्या स्वारीवरुन आल्यानंतर ताबडतोब बकाजी महाडिक सैन्यासहित मार्च १७३३ मध्ये पालगडला सिद्दीच्या वसुली अधिकाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी गेले.[१६८] तोच पंडित प्रतिनिधी यांना आंग्र्यांच्या प्रदेशातून पैसा मिळवावा असा स्वार्थ निर्माण झाला. त्या लोभाने त्यांनी बकाजी महाडिक यांना लष्कराच्या खर्चासाठी पैसे हवेत म्हणून घेरा रसाळगड व पालगड येथील वसूल कारकुनाबरोबर पाठविण्याची व नाही दिला तर लष्करी कारवाईची धमकी दिली. लक्ष्मीबाई आंग्रे (कान्होजीची विधवा पत्नी) यांनी पेशव्यांकडे पंडित प्रतिनिधींविषयी तक्रार करताना म्हटले की, ज्याजकडे जे जे जागा फत्ते झाले त्याखालील मुलूक त्या त्याजकडे लागला यैसे असता, नसती कक्षा (खोडी) काढून परस्पर सौरस्य (सहकार्य) चालत आहे त्याजमध्ये कलुषता वाढवावी यैसे त्यास विहित (योग्य) नाही.[१६९] मंडणगड किल्ला हा बाणकोट किल्ल्यास आधार, आश्रय व सहाय्यक असल्याने तो आंग्रेंच्या ताब्यात न ठेवता छ. शाहूंच्या ताब्यात ठेवण्याचे प्रयत्न पेशवे व इतर मराठा सरदार करत होते.[१७०] आंग्रेचा सरदार, सुवर्णदुर्गचा किल्लेदार नाईक बकाजी महाडीक हा पेशव्यांचा

मदतीस होता. बकाजी महाडिक याने मे १७३३ मध्ये मंडणगड किल्ल्यास वेढा घातला होता. सरखेल सेखोजी आंग्रेंनी २६ मे १७३३ पूर्वीच बाणकोट किल्ला जिंकून स्वत:च्या ताब्यात ठेवला होता. २५ मे १७३३ रोजी मंडणगड किल्ला बकाजी नाईक याने जिंकला.[१७१] मंडणगड जिंकल्यानंतर त्याचा ताबा सरखेल सेखोजी आंग्रे यांच्याकडे गेला.[१७२] मंडणगडच्या लढ्याचे वर्णन मथुबाई हिने ब्रह्मेंद्रस्वामी यांना कळविले होते. ही मथुबाई कोण याविषयी पारसनीस द.ब. शंका व्यक्त करतात. पण रियासतकार सददेसाई यांच्या मते कान्होजी आंग्रे यांची पत्नी मथुराबाई म्हणजेच मथुबाई! पत्रातील स्वामींना कोकणात येण्याविषयी आग्रह, आंबे पाठविल्याचा उल्लेख व लढाईच्या बारीकसारीक तपशिलाची माहिती यावरुन रियासतकारांचे मत योग्य वाटते. ब्रह्मेंस्वामींविषयी व त्यांच्या आध्यात्मिक शक्तीबद्दल छत्रपती व पेशवे इतर मराठा सरदार व त्यांच्या कुटूंबाबरोबरच आंग्रे घराण्यातील स्त्रीयांची सुद्धा श्रध्दा होती. कुलाब्यावरुन मथुराबाईंनी युद्धाच्या हालचालींची सविस्तर माहिती ब्रह्मेंद्रस्वामी कळवली. त्या लिहतात, बकाजी नाईक यांस बाणकोटी रवाना करुन किल्ला फत्ते केला. तेथील सारीच माणसे मंडणगड रवाना करुन परीघ घातला होता. दहा-बारा दिवस खाली बसोन मेटेघाटे चौगीर्द मोर्चे देवून तोफांचा मार दिला. त्यामुळे लोक हकाफका किल्ल्यावरी जाहले. स्वामीचे पुण्यप्रतापे करुन छ. १९ जिल्हेजी प्रात:काळी किल्ला फत्ते केला. हे संतोषाचे वर्तमान स्वामीस विदीत व्हावे यास्तव लिहले असे. मंडणगड, बाणकोट स्वामींचे आशिर्वाद करुन फत्ते जाहले.[१७३] यावर ब्रह्मेंद्रस्वामींनी पत्राच्या उत्तरात सल्ला दिला आहे कि, बकाजी नाईक यांनी जिवाभ्यास करुन बाणकोट, मंडणगड फत्ते केला. तरी बकाजी महाडीक कामाचा आहे. त्याचवरी मर्जी तुहमी बहुतशी असो देणे.[१७४] बाजीराव पेशवे यांनी २६ मे १७३३ रोजी छ. शाहूना कुलाब्याचा बंदोबस्त व्यवस्थित नसल्यामुळे सरखेल सेखाजी आंग्रे कुलाब्यास परत गेले. मानाजी आंग्र्यांना सात-आठशे सैन्यासहित पेशव्यांच्या मदतीस ठेवले. राघुजी आंग्रे जयगडास आले आहेत. जिंकलेला बाणकोट सरखेल सेखोजींच्या ताब्यात असून त्यांचा सरदार बकाजी महाडीक याने मंडणगडास वेढा दिला आहे असे कळवले.[१७५] विविध मंत्री, सरदार त्यावेळी छत्रपतींशी व आपापसात पत्रव्यवहार करुन युद्ध हालचाली कळवत. फत्तेसिंग भोसले यांनीही दि. २ जून १७३३ रोजी छत्रपतींना युद्धाचा सविस्तर वृत्तांत व स्वत:ची मते कळविली आहे. सरखेलांच्या

म्हणण्याप्रमाणे नुसते युद्ध करुन जंजिरा हाती लागणार नाही त्यासाठी शकटभेद (कारस्थान) करावे लागेल असे मत मांडतो. आम्हास दर्याचा कारबार वाकिफ नाही म्हणून सर्व आरमार, कोली व सफरी सरखेल सेखोजींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांच्या स्वाधीन केले. सरखेलांनी मंडणगड व बाणकोट घेतला आहे. तरी महाराजांनी सरखेलांना आज्ञापत्र पाठवावे व आरमार व किल्ले छत्रपतींच्या आज्ञेप्रमाणेच स्वाधीन करावे असे लिहून पाठवावे अशा आशयाचे हे पत्र आहे.[१७६] मंडणगड किल्ल्याचे लष्करी महत्व समकालीन संदर्भामध्ये आढळते. पेशवे बाजीराव यांना सरखेल सेखोजी आंग्रे यांनी लिहलेल्या पत्रामध्ये (दि. ३१/०५/१७३३) मंडणगड किल्ल्याचे महत्व अधोरेखित केले. ते म्हणतात, जंजिरियाचे (सिद्दीचे) हात पाय उंदेरी व अजनवेल. अजनवेलीचे साह्यकर्ते मंडणगड व गोवलकोट व विजयगड येकूण तीन ठिकाणे. त्याजमध्ये मंडणगड जागा बाका व लोकांची जमियतही (जमाव) भारी होती. तो श्रीकृपे धण्याचे पुण्यप्रतापे हस्तगत जाहाला.[१७७] २७ एप्रिल १७३३ रोजी कृष्णराव चासकर यांची आई सिऊबाई चासकर यांनी चिमाजी आप्पांच्या सांगण्यावरुन पालगड विषयी जी माहिती समजली ती आप्पांना कळविली होती.[१७८] जून १७३३ च्या सुमारास सिद्दीने वारंवार प्रबळ होऊन बाणकोटच्या खाडीतून आरमारी हल्ले केले. शामलाच्या या हल्ल्याविषयी सातारला यशवंतराव पोतनीसांना सविस्तर कळविले आहे. सिद्दीने प्रबळ होऊन सात–आठशे सैनिकांच्या मदतीने आक्रमण केले. त्याने बाणकोट खाडीतील दालदि (मुस्लिम कोळी) लोकांना हाताशी धरले. त्यांना छोट्या बोटी देण्याच्या निमित्ताने सिद्दीचे लोक वेसवीस उतरवले. तेथील पेशव्यांच्या दोन चौक्यांवर हल्ला करुन त्याने ६०/७० लोक जखमी केले एक मारला. सिद्दी महांगिऱ्या (छोट्या बोटी) घेऊन गेला.[१७९] बाणकोटचे हवालदार हरजी नाईक महाडीक (कदम) हे बाणकोट खाडीतील लोकांना वसुलीसाठी त्रास देतात अशी तक्रार पेशव्यांपर्यंत गेली होती. पेशवे बाजीराव यांनी त्याबद्दल खाडी अलिकडे उपसर्ग लाऊ नये म्हणून आज्ञा करणारे पत्र हरजी नाईकांना पाठविले होते. हरजी नाईक कदम यांनी पेशव्यांना तुमच्यापर्यंत आलेली तक्रार खोटी आहे. लोक खोटेनाटे सांगतात व तुम्ही खरे मानता. बाणकोट किल्ला व त्याखालचा मुलूखही आपलाच आहे. लोक उगाचच आपल्या मनात संशयाचे बीज पेरतात. किल्ल्याचा बंदोबस्त तुम्हासच करावयाचा आहे. किल्ल्याची जागा खाडीच्या मुखावर आहे. याची मजबूती व किल्ल्यावरील दारुगोळा, अन्नधान्य

यांची व्यवस्था करण्याची जबाबदारी आपणावरच आहे. खाडीतील सावकार व मुस्लिम कोळी पुर्वापार चालत आलेली किल्ल्याची सेवा करत असतात. हे असेच चालविल्याशिवाय किल्ल्याची सुरक्षितता व जतन होणार नाही. असे प्रत्युत्तर हरजी नाईक कदम यांनी पेशव्यांना पाठविले.[१८०] हरजी कदमांचे हे पत्र सरखेल सेखोजी आंग्रेंच्या मृत्यूनंतरचे आहे. नोव्हेंबर १७३३ मध्ये सिद्दीसातने ३०/३५ गलबते भरुन युद्धसाहित्य व सैन्य आणून बाणकोटच्या खाडीत शिरुन किल्ल्यावर आक्रमण केले. किल्ल्यावरील शिबंदीने त्याच्या हल्ल्याचा तीव्र प्रतिकार केला. सिद्दीसात बाणकोटला पराभूत झाला. तेथून त्याने सुवर्णदूर्गला जाऊन पेठा जाळल्या. तो सुवर्णदुर्गवरुन अंजनवेलला गेला. यावेळी सिद्दीसात गोवळकोटच्या वेढ्यावर आक्रमण करण्याचे नियोजन करत होता.[१८१] बाणकोट किल्ल्याच्या बंदोबस्तास पेशव्यांनी ठेवलेल्या सैन्याने पराक्रमाने सिद्दीसातचा हा हल्ला परतवून लावला. ३१ डिसेंबर १७३३च्या पत्रामध्ये बाबुराव मल्हार बर्वे यांनी आंग्र्यांनी बाणकोट घेतल्याची बातमी खरी आहे का याची खात्री पेशव्यांकडे करुन घेतली.[१८२] पेशवे बाजीराव यांनी १७३३ मध्ये बाणकोट किल्ल्यावरच्या पाच तोफा गोवळकोटच्या वेढ्यासाठी पाठविल्या होत्या. बाणकोट किल्ल्याच्या संरक्षणासाठी त्या तोफांची बाणकोटवर गरज होती. बाणकोटचे किल्लेदार हरि मोरेश्वर राजाज्ञा यांनी पेशव्यांना वारंवार तोफांची मागणी केली. तोफा लवकरच बाणकोटला पाठवतो असे आश्वासन पेशवे बाणकोटकरांना देत होती. तोफांची बाणकोटवर अत्यंत आवश्यकता असल्याने त्या गोवळकोटवरुन ताबडतोब बाणकोटला पाठवाव्यात अशी छ. शाहूंनी पेशव्यांना आज्ञा केली.[१८३] अशाप्रकारे मे १७३३ ते डिसेंबर १७३३ पर्यंत पेशवे व इतर मातब्बर मराठी सरदार यांनी आंग्र्यांच्या मदतीने सिद्दीचा बंदोबस्त केला. बाजीराव पेशव्याने त्याचा पराभव करुन राजपूरीमध्ये सिद्दी अब्दुल्लाचा मुलगा सिद्दी रहमान यास सिद्दीच्या गादीवर बसविले.[१८४] जंजिऱ्याच्या सिद्दीची दोन सत्ताकेंद्रे एक किल्ल्यात व एक किल्ल्याबाहेर निर्माण झाले. २८ ऑगस्ट १७३३ रोजी सरखेल सेखाजी आंग्रे यांचा मृत्यू झाला.[१८५] छ. शाहू यांनी सेखोजी यांचे भाऊ संभाजी आंग्रे यांना सरखेल करण्याचे जाहीर केले. संभाजी आंग्रे सरखेलपदाची वस्त्रे घेण्यास सातारला गेले. छ. शाहूनी कुलाब्याच्या अलिकडचा प्रदेश मानाजी व सुवर्णदुर्गाच्या पलिकडचा प्रदेश संभाजी आंग्रेना वाटून दिले. संभाजी आंग्रे यांना सरखेलपद देऊन सुवर्णदुर्गास

पाठविले.[१८६] संभाजी व मानाजी आंग्रे यांच्यात कलह सुरु होता. छ. शाहूनी एप्रिल १७३४ मध्ये अंजनवेलचा वेढा चालू असतानाच संभाजी आंग्रे यांना सरखेल पदाची वस्त्रे व हत्ती जयगडला पाठविला.[१८७]

छ. शाहूंच्या अष्टप्रधान मंडळात प्रतिनिधी व पेशवे यांच्यात दुही होती. दोघेही कोकणात सिद्दी विरुद्धच्या मोहिमेवर एकत्र होते. दोघेही एकमेकांची तक्रार करणारी पत्रे छ. शाहूना लिहित. सरखेल आंग्रे व प्रतिनिधी यांच्यामध्ये सुद्धा बेबनाव होता. पेशवे यांनी आंग्र्यांचा सरदार बकाजी महाडीक यास हाताशी धरले. गोवळकोटला वेढा देण्यावरुन प्रतिनिधी व बकाजी महाडीक यांच्यामध्ये मतभेद झाले. प्रतिनिधींनी रायगड जिंकल्यामुळे त्यांचे सातारच्या दरबारात महत्व वाढले. ऑगस्ट १७३३ पर्यंत जंजिरा व अंजनवेल सोडून सिद्दीची जवळ–जवळ सर्व स्थळे बाजीरावाच्या ताब्यात आली.[१८८] बाजीराव पेशवे यांनी सिद्दीशी अलिबागजवळ नवदरे येथे तह केला व साताऱ्यास निघून गेले. या तहामध्ये ११ महालापैकी साडेपाच महालातील महसूल व सर्व करवसूलीसाठी प्रत्येकी वाटून घेतले.[१८९]

या तहानंतरही सिद्दी मराठे संघर्ष सुरुच होता. सिद्दीचे रायगडवरील आक्रमण मराठा सरदार हरि गणेश राजाज्ञा, उदाजी पवार, बाजी भिवराव, सोमवंशी बंधू यांनी परतवले. सरदार सिद्दी अंबर अफवानी या युद्धात मारला गेला.[१९०] पेशवा बाजीराव परत गेल्यानंतर सिद्दीने बाणकोटवर हल्ला करुन तो जिंकला. जंजिऱ्यातील सिद्दी अंबर, सिद्दी संबूल हे जंजिऱ्यातून अंजनवेल गोवळकोट येथे पळून गेले. डिसेंबर १७३३ मध्ये अब्दुल रहमान यास पेशव्यांनी जंजिऱ्यात सत्तेवर बसविले. परंतु सिद्दी अंबर, सिद्दी संबूल, सिद्दी सात या लोकांनी अंजनवेल, गोवळकोट लढविण्याचे कार्य सुरुच ठेवले.

पेशवे बाजीरावांची पाठ फिरताच सिद्दीने वारंवार बाणकोटवर आक्रमणे केली. या आक्रमणाचा प्रतिकार बाजी भिवराव याने केला. फेब्रुवारी १७३४ मध्ये तो बाणकोट, वेळपस जवळच्या प्रदेशात मुक्कामास होता.[१९१] बाजी भिवराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी सिद्दीचा पाठलाग करुन ८ मार्च १७३४ रोजी बाणकोट जिंकला.[१९२] कोंडाजीराव शिंदे व इतर सरदार यांनी पेशव्यांना बाणकोट जिंकल्याचे व सध्या त्याची स्थिती सुरक्षित असल्याचे १५ मार्च १७३४ रोजी कळविले.[१९३] मार्च १७३४ मध्ये मराठ्यांनी मंडणगड किल्ला जिंकल्यानंतर तेथील महसूल व करवसुलीची वाटणी छ. व सरखेल यांच्यात कशी करायची याची बोलणी करण्यासाठी

आंग्रेंचा कारकून छत्रपतींकडे गेला होता. छ. यासंबंधीचा निर्णय घेणार होते. त्यामुळे मंडणगडची करवसुली १२/१३ दिवस तहकुब करण्यात आली होती.[१९४] संभाजी आंग्र्यांच्या दडपणामुळे बाणकोटचा किल्लेदार ठरल्यापेक्षा केळशी व वेसवीचा कर कमी वसुल करत होता. पेशव्यांनी मंडणगडकर करतात तेवढीच करवसुली केळशी, वेसवी तसेच मंडणगड घेरियाची करावी याबद्दल बाणकोटचे किल्लेदार सुभानजी शिंदे यांना कडक शब्दात बजावले होते.[१९५] नोव्हेंबर १७३४ मध्ये चिमाजी आप्पाने बाणकोटकरांकडे मंडणगडकर व महाडकर यांच्या लष्करी हालचालींविषयी चौकशी केली.[१९६] बाणकोट किल्ला महत्वाचा व नाजूक आहे. तेथील बंदोबस्त, बेगमी व्यवस्थीत व्हावी म्हणून केळशी व वेसवी या दोन महालांचा हबसाणातील वसुलीचा अधिकार बाणकोटकरांना छ. शाहूंनी दिला होता. सरखेल संभाजी आंग्रे हे व त्यांचे वसुली अधिकारी सिवजी जाधव हे या महसूलावरुन बाणकोटकरांशी भांडण करत होते. छ. शाहूंनी संभाजी आंग्रेना सिवज जाधव यास ताकीद देऊन बाणकोटकरांना महसूल वसूलीस अडथळा आणू नये असे कळविले.[१९७] पूर्वी मराठ्यांच्या आरामारामध्ये ३०० टन वजनापर्यंत जहाजे होती. सरखेल संभाजी आंग्रेनी ती ४०० टनपर्यंत वाढवली. त्यांची ४०० टन वजनाची आठ जहाजे होती. त्याने आपल्या आरमाराच्या जोरावर दाभोळ व सावंतवाडी या प्रांतावर आपली सत्ता स्थापन केली होती.[१९८] बाजी भिवराव यांनी बाणकोटवरुन पहिला किल्लेदार, हावजी सेडगर पळून गेल्यामुळे  दुसरा किल्लेदार नेमबाजी व किल्ल्यांच्या बंदोबस्तासाठी काही सैन्य पाठविण्याची विनंती मार्च १७३४ मध्ये पेशव्यांना केली आहे. (बाणकोटवर तटबंदी बांधण्याचे काम सुरु असल्याची माहिती बाजी भिवरावांनी दिली.)[१९९] बाजी रेटरेकर (बाजी भिवराव) यांना सैन्यासह बाणकोटवरुन गोवळकोटला लढण्यास जाण्याची आज्ञा पेशव्यांनी केली. पण सतत लढल्यामुळे सैन्य थकले आहे म्हणून बाजी भिवराव यांना सैन्यासह गोवळकोटला जाण्याची इच्छा नव्हती.[२००] पेशव्यांनी बाणकोटच्या पाच तोफा गोवळकोटला देण्यासाठी वारंवार तगादा लावला होता. बाणकोट संरक्षणासाठी या तोफा बाणकोटलाच ठेवणे आवश्यक होते म्हणून बाजी भिवराव यांनी त्या देण्यास टाळाटाळ केली. पेशव्यांनी बाजी भिवरावांना खंडोजी माणकरांना बोलविण्याची तसेच बाणकोटची व्यवस्था लाऊन पाचशे सैन्यानिशी गोवळकोटला जाण्याची आज्ञा केली. सैन्यातील थकव्यामुळे बाजी गोवळकोटला जाण्यास नाखुष होते. बाणकोट किल्ला व बंदरात काही सैन्य गुंतले होते व काही आजारी पडले

होते. बाणकोट किल्ला व बंदराच्या संरक्षणासाठी पाच–सातशे सैन्य लागते असे असतानासुद्धा गोवळकोटला जाण्याची आज्ञा होते आहे, अशी बाजी भिवरावांची तक्रार होती.[२०१] पेशव्यांनी महाडवरुन प्रल्हाद प्रभू यांना बाणकोटला पाच तोफा आणण्यासाठी एप्रिल १७३४ मध्ये पाठविले. बाजी भिवरावने पाच तोफा व पाच गलबते प्रभुंकडे छ. शाहुंच्या आज्ञेप्रमाणे दिल्या.[२०२] बाणकोट जिंकल्यानंतर बाजी भिवरावने एप्रिल १७३४ मध्ये बाणकोट किल्ल्यावर बुरुज व तटबंदीची दुरुस्ती केली. छत्रपतींच्या आज्ञेने रामचंद्र मिर्धे हे या दुरुस्तीच्या कामासाठी आले होते. सिद्दीच्या दहशतीनें त्याच्या राज्यातील पळून आलेल्या जनतेकडून रोजगार देऊन बाणकोटचे बांधकाम करून घेतले.[२०३] बाजी भिवरावांनी स्वत:ला व त्यांच्या सैन्याला होत असलेला त्रास पेशव्यांना सविस्तर कळवून बाणकोटच्या संरक्षणासाठी नव्या दमाची सातशे सैनिकांची तुकडी पाठविण्याची विनंती केली होती. अंजनवेलला वेढा असेपर्यंत बाणकोटला धोका नसल्याचे मत बाजी भिवराव यांनी व्यक्त केले.[२०४] बाणकोटचे किल्लेदार बाजी भिवराव यांनी पेशव्यांना वारंवार आपल्या सैन्याच्या दैन्यावस्थेविषयी, अन्नधान्याच्या तुटवड्यामुळे सैन्य व घोडे यांचे होणारे हाल याविषयी सविस्तर वृत्तांत पेशवा यांना कळविले. बाजी भिलारे त्यांच्या सैन्यासहित पळून गेले. बाबुराव वैद्य महाडवरुन बाणकोटला न येता गोवळकोटला गेले. बाणकोटला असलेल्या सैन्यापैकी अर्धे आजारी होते. त्यामुळे किल्ल्याच्या संरक्षणाची चिंता बाजीना पडली होती.[२०५] पेशवे बाजीराव यांनी मे १७३४ मध्ये होनाजी बलकवडे व धोंडजी बने यांच्यासह दोनशे सैनिक बाणकोट किल्ल्याच्या संरक्षणासाठी पाठविले. पाऊस सुरु होण्यापूर्वीच अजून सैन्य पाठविण्याची विनंती बाजींनी पेशव्यांना केली.[२०६] बाणकोटचा वार्षिक खर्च पाऊण लाख असून वसुली मात्र दहा हजार होती.[२०७] मे १७३४ मध्ये बाणकोंट खाडीमध्ये मराठे व सिद्दीची दोन /तीन युद्धे झाली. यामध्ये मराठ्यांनी सिद्दीच्या सैन्याचा पराभव करुन त्यांना निगडीपर्यंत मागे रेटले.[२०८] मे १७३४ मध्ये पावसापूर्वी बाणकोट व पाणकोट यांची साफसफाई व किरकोळ दुरुस्ती करण्यात आली. एक बुरुज ढासळला होता. तो बळकट केल्याशिवाय किल्ला सुरक्षित होणार नाही असे बाजी भिवरावचे मत होते.[२०९] ऑक्टोबर १७३४ मध्ये पेशवे बाजीराव यांनी बाणकोटचे हवालदार सुभानजी शिंदे यांना जयगड येथील देवालयाच्या बांधकामाच्या सामानाच्या वाहतूकीसाठी एक बोट भास्कर वैद्य यांना देण्यास सांगितले.[२१०] नोव्हेंबर १७३४ मध्ये बाणकोटचे किल्लेदार हरि गणेश राजाज्ञा यांनी

आंग्र्यांनी केळशी–वेसवीची वसुली ठरल्याप्रमाणे बाणकोटकरांना दिली नाही म्हणून सुवर्णदुर्गची बाणकोट खाडीत आलेली गलबते हूसकावून लावली. सुवर्णदुर्गचे किल्लेदार हरजी नाईक कदम यांनी बाणकोटकरांनी सूवर्णदुर्गच्या रसदेच्या साठवणूकीमध्ये असा अडथळा आणल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.[२११] या पाठोपाठ हरजी नाईक कदम यांनी सिद्दीसातच्या केळशी व बाणकोटच्या संभाव्य हल्ल्याविषयीची पूर्वसूचना बाणकोटकरांना दिली. बाणकोटच्या संरक्षणाची तयारी करुन, केळशीच्या संरक्षणासाठी सैन्य पाठवून जनतेस सावध राहण्याच्या सूचना करण्याचा सल्ला सुवर्णदुर्गकरांनी दिला. त्यासाठी सूवर्णदूर्गवरुनही सैन्य पाठविण्याचे आश्वासन दिले.[२१२] पेशव्यांनी बाणकोटच्या किल्लेदारांना आंग्र्यांइतकाच वसूल केळशी व वेसवीचा घ्यावा अशी आज्ञा केली. बाणकोटकरांना ते शक्य होत नसेल तर त्यांनी चिमाजी आप्पांना कळवून अजून लोक मागवून घ्यावेत. बाणकोटवर जयगड, रत्नागिरी, रसाळगड प्रांतातील लोक आहेत. ते आंग्र्यांना भितात त्यामुळे  त्यांच्याच्याने वसुली होणार नाही. म्हणून त्यांना वसुलीस पाठवू नये. ज्याच्यावर आंग्र्यांचे नियंत्रण नाही. अशाच लोकांना वसुलीस पाठवावे. अशी सक्त ताकिद पेशवे बाजीराव यांनी बाणकोटकरांना दिली आहे.[२१३] बाणकोटकर सुभानजी शिंदे यांनी, परवाना नसलेले एक गलबत डिसेंबर १७३४ मध्ये जप्त केले. चिमाजी आप्पा यांनी बाणकोटकरांना, गलबतास सरखेल संभाजी आंग्रे यांचा गलबतास परवाना असताना ते पकडणे चुकीचे असल्याचे लक्षात आणून दिले. सुभानजी शिंदे आपल्या पत्रात चिमाजी आप्पांना कळवितात की, तावडे यावर कौल नव्हता तावडा तो पारमीणपटण या बंदराचा तावडा (गलबत) थेट राजपुरास जात होता, तो धरुन आणिला. तावडेयविसी श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाची (पेशवे) आज्ञा की, राजापूरचा तावडा तहकिक (खरे) असला तर सोडणे म्हणून आज्ञा. त्याजवरुन संभाजी आंगरे सरखेल याणी तावड्याविसी बहुत खटपट (प्रयत्न) माडिली आहे. कदाचित तावडा देविला तर, कापूस दोन खंडी फुरोख्त (जप्त) जाला आहे, त्याचाही दावा करितील. यैसा विश्वार असे. जी आज्ञा होईल ती सिरसा असे. केलसी वेसवी हरदू (उभयता) माहालाचा वसूल निमे प्रात बेमुलाहिजा घेणे, म्हणून श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेबाची आज्ञा आहे. त्यांस र।। संभाजी आंगरे सरखेल म्हणतात की, चौथाई घेणे नाही तर तुम्हा आम्हास खलदळ (संघर्ष) होईल यैसे म्हणता. त्यास आम्ही नेमे प्र।। (प्रमाणे) वसूल बेमुलाहिजा (पर्वा न करता) चालवतो.[२१४] बाणकोटचे किल्लेदार सुभानजी शिंदे यांनी हणमंत नानाजी सबनीस

यांच्याबरोबर हर्णे, मंडणगड या किल्ल्यांच्या पायथ्याचा प्रदेश व केळशी, वेसवी महालांचा हिशेब चिमाजी आप्पाकडे नोव्हेंबर १७३४ मध्ये पाठविला.[२१५]

चिमाजी आप्पा ऑक्टोबर १७३३ पासून कोकणात सिद्दीसातशी युद्ध करत होते. इंग्रजांनी सिद्दी बरोबर ६ डिसेंबर १७३३ ला तह केला व दोघांनी आंग्रेविरुद्ध संयुक्त आघाडी उघडण्याचे ठरविले.[२१६] जानेवारी इ.स. १७३४ मध्ये सिद्दीने पाचाड जिंकले. तो रायगडवर हल्ला करणार अशी बातमी येताच शाहू महाराजांनी कोकणात आणखी कुमक पाठविण्याचा हुकूम पेशव्यांना केला. छत्रपतींनी चिमाजी आप्पास रायगडच्या जवळ तळ देऊन सावध राहण्याचा हुकूम केला. मराठ्यांचे सैन्य ५ जानेवारी १७३४ रोजी पोलादपूरला जमले. हरि गणेश राजाज्ञा, उदाजी पवार, बाजी भिवराव ह्यांच्या नेतृत्वाखाली वेगवेगळ्या सैन्य तुकड्या होत्या. सुर्योदयावेळी लढाईस सुरुवात झाली. उदाजी पवारने आपल्या सैन्यासहित शत्रूवर जोरात आक्रमण केले. त्याच दिवशी वाडी व पाचाड ही गावे मराठ्यांनी जिंकली. सिद्दीचे बरेच सैन्य मारले गेले. उदाजी पवारने सिद्दी अंबर अफवानीचे शीर धडा वेगळे केले.[२१७] मराठ्यांनी सिद्दीचे शीर नेले. कृष्णाजी खटावकर व रायगडचे सरनौबत जिवाजी लाड या लढाईमध्ये मरण पावले.[२१८] सिद्दीसात महाडला पळून गेला. रायगड जिंकल्यानंतर मराठ्यांनी महाडवर आक्रमण केले. काही मराठा सैन्य अंजनवेल व गोवळकोटवर चालून गेले. छ. शाहू महाराजांनी संभाजी आंग्रेना सरखेल पदाची वस्त्रे देऊन अंजनवेल व गोवळकोटच्या वेढ्यास मदत करण्याची आज्ञा केली. सरखेल संभाजी आंग्रेनी हे मान्य करून आपले आरमार अंजनवेलला आणले.[२१९] सिद्दी बाणकोटला गेल्यावर मराठ्यांनी २४ फेब्रुवारी १७३४ रोजी महाड जिंकले.[२२०]

मराठ्यांनी सिद्दीचा पाठलाग करुन बाणकोट किल्ला ८ मार्च १७३४ रोजी जिंकला.[२२१] नोव्हेंबर १७३४ मध्ये चिमाजी आप्पांनी बाणकोटकरांकडे मंडणगडकर व महाडकरांना मतगडाकडील लष्करी हालचालीविषयी चौकशी केली.[२२२] संभाजी व मानाजी आंग्रे यांच्यामध्ये यादवी सुरु होती. बाजीराव पेशव्यांचा मानाजीस पाठिंबा होता. बाजीरावाने फेब्रुवारी ते एप्रिल १७३५ च्या दरम्यान आक्रमक धोरण स्विकारुन मानाजी आंग्रेना किल्ला राजमाची, कुलाबा, खांदेरी व कोहला जिंकून दिला. पेशव्यांनी अलिबागजवळ नवदरे येथे दोघा भावात तह घडवून आणला. संभाजीस सरखेल हा किताब व सुवर्णदुर्ग तर मानाजीस वजारतमाब हा किताब व कुलाबा दिला.[२२३] नोव्हेंबर १७३५ मध्ये सिद्दीसातने अंजनवेलवरुन मंडणगडवर हल्ला केला.

त्याने पालगडमध्ये फितुरी करुन जमीनमार्गे मंडणगडवर हल्ला केला. सिद्दीने आपले आरमार केळशीमध्ये आणले. केळशीचा चौकीदार लखमाजी खडा याने गोळीबार केला. सरखेल संभाजी आंग्रे यांनी केळशी खाडीत सिद्दीसातचा पराभव केला. सिद्दीसातची फजिती होऊन तो पळून गेला.[२२४] बाणकोटला जाण्यापूर्वी खंडाजी माणकर व हबशाचे युद्ध झाले. सिद्दी बाणकोटला जाणार हे नक्की असल्याने चिमाजी आप्पाने कृष्णराव महादेव यांना त्यांच्याकडचे २०० सैन्य बाणकोटला पाठविण्यास सांगितले.[२२५] यावेळी मंडणगड किल्ला सिद्दीकडे जातो की काय अशी भीती इतर ठिकाणी मोहिमेवर असणाऱ्या सरदारांना वाटत होती. आनंदराव रघुनाथ यांनी चिमाजी आप्पांकडे शामलाच्या मंडणगडच्या वेढ्याविषयी चौकशी केली व मंडणगड शामलाकडे गेला तर परत हस्तगत होणार नाही, असे मत व्यक्त केले.[२२६]

पेशवे बाजीरावांनी संभाजी व मानाजी आंग्रे यांच्यामध्ये शांतता तह घडवून आणला असला तरी त्यांचा गृहकलह संपला नव्हता. पेशव्यांनी मानाजीस पाठिंबा दिला होता. मानाजीचे मुख्य ठाणे कुलाबा होते. सातारवरुन संभाजी आंग्रेना मिळणारी कमी रसद, केळसी व वेसवी महालांच्या वसुलीवरुन पेशवे व सरखेल यांच्यात होणारा सततचा वाद तसेच पेशव्यांचा नेहमी सरखेलांना होत असलेला विरोध यामुळे सरखेलांच्या मनात संताप होता. त्यांना मानाजीचा कुलाबा जिंकण्याची महत्वाकांक्षा होती पण पेशव्यांमुळे तो जिंकता येत नव्हता. आता सरखेल संभाजी आंग्रे यांनी मानोजीच्या विरोधात सिद्दी सातशी गुप्तपणे संधान साधले. त्याच्याशी गुप्त वाटाघाटी सुरु केल्या. सिद्दीसात सरखेलांना हर्णेजवळचा फत्तेगड मागत होता. सरखेलांनी फत्तेगड ऐवजी मंडणगड व विजयगड हे सिद्दीसातला देण्याचे कबुल केले. त्या बदल्यात सिद्दीसातने इंग्रजांच्या मदतीने कुलाबा किल्ला व प्रदेश सरखेल संभाजी आंग्रेना घेऊन द्यायचा, असे या वाटाघाटीत ठरले. छ. शाहूना या कारस्थानाचा संशय येऊ नये म्हणून सिद्दीसातने मंडणगडला वेढा देण्याचे नाटक करायचे व किल्ला ताब्यात घ्यायचा असे ठरले. त्याप्रमाणे डिसेंबर १७३५ मध्ये सिद्दीसातने केळशी खाडीत येऊन गावे जाळली. तसेच पायवाटेने दिडशे सैन्य मंडणगडकडे पाठविले. केळशी खाडीत आरमार ठेऊन सिद्दीने आपली शंभर माणसे रानात दबा धरुन ठेवली होती. संभाजी आंग्रे व सिद्दीसातच्या कारस्थानाची बातमी बाणकोटच्या किल्लेदारांना त्यांच्या राजपुरीच्या व हर्णेच्या विश्वासू सहकाऱ्यांनी दिली होती. सिद्दीसातच्या हालचालींवरुन ह्या बातमीची सत्यता हरी गणेश राजाज्ञा यांना पटली. त्यांनी ही बातमी व सिद्दी

सातच्या बाणकोट जवळच्या लष्करी हालचाली पेशव्यांना कळविल्या. बाणकोटच्या आसपास लहान मोठी वीस तरांडी सिद्दीची घुटमळत असून सैन्य व दारुगोळा पाठविल्यास मंडणगड वाचेल तसेच बाणकोटास पण अपाय होणार नाही. मंडणगड सिद्दीकडे गेल्यास अप्रतिष्ठा होईल. आम्हासही उभे रहावयास जागा होणार नाही. खाडी, दर्या, मंडणगड व सुवर्णदुर्ग अशा कैचीत आम्ही सापडले आहोत. दोन तीन रोजात सरंजाम, सामान व कुमक पाठवावी. अशी विनंती हरि गणेश यांनी पेशव्यांना केली.[२२७] छ. शाहूंना सरखेलांचे कारस्थान बाणकोटकर व महाडकरांकडून कळल्यामुळे त्यांनी संभाजी आंग्रेची खरडपट्टी केली.[२२८] सरखेलांनी छत्रपतींना न जुमानता सिद्दीशी सलोखा केला. डिसेंबर १७३५ मध्ये सरखेलांनी सिद्दीसात बरोबर केळशी खाडीत आपली चौकी बसवली.[२२९] त्या परिसरात दोघांच्या वतनदारांनी महसूल वसूल केला. वेळासच्या गुरवाने रामजी महादेव यांना बाणकोटजवळच्या सिद्दीसातच्या लष्करी हालचालींची माहिती दिली. सरखेल व सिद्दीसातची एकी व बाणकोटजवळच्या सिद्दीसातच्या हालचालींची माहिती रामजी महादेव यांनी चिमाजी आप्पांना २३ डिसेंबर १७३५ रोजी कळवली.[२३०] सरखेल आंग्रे यांच्या बरोबरच खेम सावंत यांनीसुद्धा सिद्दीसातशी शांतता तह केला होता.[२३१] आंग्रेंचा विरोध नष्ट झाल्यामुळे सिद्दीसातने डिसेंबर १७३५ मध्ये बाणकोट किल्ला जिंकला. सिद्दी पुढे प्रतापगडकडे जाण्याची शक्यता लक्षात घेऊन महादजी अनंत यांनी बाणकोट पडल्याचे सांगून प्रतापगडच्या हवालदारांना सावध केले.[२३२] या युद्धावेळी बाणकोटचा किल्लेदार हरी गणेश राजाज्ञा जखमी होऊन पकडला व मारला गेला.[२३३] बाणकोट दुबळी जागा म्हणून तो पडला, असा उल्लेख सापडतो.[२३४] सिद्दीसातने बाणकोट घेतल्यानंतर लगेचच डिसेंबर १७३५ मध्ये मंडणगड किल्ल्यास वेढा देऊन तो जिंकला. संभाजी आंग्रेंशी केलेल्या संगनमतामुळेच सिद्दीसातने मंडणगड व बाणकोट जिंकले. रायगडच्या किल्लेदाराने ही बातमी छ. शाहूना कळविली. पण त्यांचा त्यावर विश्वास बसला नाही.[२३५] बाणकोट जिंकल्यानंतर किल्ल्यावरची सर्व रसद, दारुगोळा गलबतावर चढवून सिद्दीसातने आपले आरमार तयार ठेवले. मराठ्यांचे सैन्य मंडणगड पर्यंत आले की बाणकोट खाडीतून कर्नाळ्याकडे पळून जायचे व कर्नाळ्यावर आक्रमण करायचे असा सिद्दीसातचे नियोजन होते. याची कुणकुण मराठ्यांना लागली. त्यामुळे चिमाजी आप्पांनी कर्नाळ्याच्या किल्लेदारास सैन्यासहित सावध राहण्यास सांगितले.[२३६] सिद्दीसातच्या या

हालचालींची बातमी राजपूरीवरुन बाणकोटमार्गे आलेल्या एका ब्राह्मणाने दिली. त्यानेच मराठा सैन्य बाणकोटकडे आले नाही तर हबशी (सिद्दी) व आंग्रे यांनी संयुक्तपणे बाणकोटवर ताबा ठेवावा असे ठरल्याचे सांगितले.[२३७] बाणकोट जिंकल्यानंतर सिद्दीसातने बाणकोटची दुरुस्ती करुन किल्ला मजबूत करण्यास सुरुवात केली. कच्चे बांधकाम आहे तोपर्यंतच किल्ला जिंकावा, पक्के बांधकाम, मजबूती झाल्यावर किल्ला जिंकण्यास अधिक प्रयत्न करावे लागतील म्हणून तातडीने बाणकोट जिंकण्याच्या हालचाली कराव्यात असे चिमाजी आप्पांना कळविले.[२३८] बाणकोट पडल्याची बातमी कळताच छ. शाहूंनी पिलाजी जाधव यांना चिमाजी आप्पांच्या मदतीला पाठविले.[२३९]

जानेवारी १७३६, मध्ये सिद्दीने कोकणामध्ये मराठ्यांच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. त्याने बाणकोट घेऊन त्याची पडझड केली. सिद्दीने जयगड पासून विजयदुर्ग पर्यंतच्या मराठ्यांच्या प्रदेशात जाळपोळ केली.[२४०] सिद्दीने पावस येथे पण जाळपोळ केली.[२४१] पिलाजी जाधव यांनी बाणकोट घेऊन गोवळकोट व अंजनवेलवर आक्रमण केले.[२४२] जानेवारी १७३६ पासून सिद्दीसातने रेवस किल्ला जिंकला.[२४३] या बातमीने शाहूच्या दरबारामध्ये खळबळ माजली. चिमाजी आप्पांना तातडीने कोकणात सिद्दीसातच्या बंदोबस्तास जाण्याचा हुकूम झाला. त्याप्रमाणे चिमाजी आप्पा १८ एप्रिल १७३६ रोजी कुलाब्याजवळ आले.[२४४] रेवसनंतर सिद्दी सातचा डोळा रेवसपासून १३ मैलावर असणाऱ्या कुलाबा किल्ल्यांवर होता. मानाजी आंग्रे हे कुलाब्यात रहात होते. छ. शाहूनी संभाजी आंग्रेना गोवळकोट जिंकल्यास त्यांना देण्याचे जाहीर केले. सिद्दीसातची कुलाब्यावरची चढाई बघून सरखेल संभाजी यांनी परत त्याच्याशी जवळीक साधली. त्या दोघांची गुप्त बोलणी झाली. गोवळकोटला मोर्चा न देण्याच्या बदल्यात कुलाबा देण्याचे सिद्दीसातने कबूल केले.[२४५] सिद्दी सातचा बंदोबस्त झाला की सरखेल संभाजीची मस्ती उतरेल असे अनेक सरदारांना वाटले.[२४६] चिमाजी आप्पा कुलाब्याजवळ १८ एप्रिल १७३६ साली येऊन पोहोचले. चिमाजी आप्पा मोठ्या सैन्यासह कुलाब्याजवळ चऱ्हाईकरमाले येथे पोहोचले. मानाजी आंग्रे व चिमाची आप्पा सिद्दी सातच्या सैन्यावर चालून गेले. घनघोर लढाई झाली. सिद्दीसातचे दीड दोन हजार सैन्य मारले. स्वत: सिद्दी सात मृत्यू पावला. मराठ्यांचे ८०० सैन्य मरण पावले. उंदेरीचा सिद्दी याकूब, कृष्णाजी व सुभानजी घाडगे, कोंडनाईक

बाळाजी शेणवई हे मरण पावले. मानाजी आंग्रे जखमी झाले.[२४७]

सिद्दीसात सारख्या प्रबळ शत्रूला मारुन मराठ्यांचा कोकणातील प्रदेश निर्धोक केला. या यशानंतर चिमाजी आप्पा व मानाजी कुलाब्यास आले. मराठ्यांना आनंद झाला. सर्वांनी चिमाजी आप्पांचे अभिनंदन केले. चिमाजी व इतर सरदारांचा छ. शाहूने योग्य सन्मान केला.[२४८] सिद्दीसात व सिद्दी याकुब हे दोन प्रबळ सरदार मरण पावल्यामुळे जंजिऱ्याच्या प्रमुख सिद्दी रहमानने पेशव्यांशी पूर्वी केलेला तह कायम केला. हा तह झाला तरी सिद्दीने मराठ्यांना प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष त्रास देणे चालूच ठेवले. त्याने मानाजी आंग्र्यांच्या प्रदेशात जलमार्गे गुपचुप तेथील जाऊन गावांना उपद्रव दिला. पेठा प्रांतातील खार दादर गाव लुटून ४४ लोक कैद करुन नेले.[२४९] बाणकोटला येणारी अन्नधान्याची रसद सिद्दीने अडवली. बाणकोटला रसद येणार कळले म्हणून हबशाची गलबते टपून बसली होती. मराठ्यांनी इंग्रजांना ही रसद नेण्यास गलबते मागितली पण सिद्दीशी वाकडेपण घ्यावयाचा नसल्याने त्यांनी मराठ्यांना गलबते देण्याचे नाकारले.[२५०] बाणकोट किल्ल्यावरील मराठा सरदार कृष्णाजीराव येरुणकर, साबाजी पवार, कृष्णाजीराव दुदुसकर रत्नोजीराव हडपळे, गोविंदराव दळवी, सुर्याजीराव पारठे यांची शिफारस करुन त्यांना बाणकोटवर कुटुंब ठेवण्याची परवानगी व सरंजाम देण्याची विनंती चिमाजी आप्पांना मे १७३६ मध्ये करण्यात आली.[२५१]

## चिमाजी आप्पा व पोर्तुगीज युद्ध (मार्च १७३७)

चिमाजी आप्पा यांनी मार्च १७३७ मध्ये फिरंग्याच्या विरुद्ध (पोर्तुगीज) युद्ध सुरु केले.[२५२] बाणकोटवरुन ८०० सैनिकांपैकी ३०० सैनिक या मोहिमेसाठी नेण्यात आले.[२५३] सिद्दी रहमानशी केलेल्या तहानंतरही मराठ्यांनी गोवळकोटला घातलेला वेढा दिर्घकाळ (फेब्रुवारी १७३७) रेंगाळला पण पिलाजी जाधवांच्या आजारपणामुळे ही मोहिम आटोपजी घेण्यात आली.[२५४]

सिद्दीसातच्या मृत्यूनंतर संभाजी आंग्रे परत छ. शाहूंना शरण आले. संभाजी व मानाजी आंग्रे यांच्यातील संघर्ष मात्र कायम राहिला.[२५५] संभाजी आंग्रे व पेशवे यांच्यातील शत्रुत्व वाढत गेले. पेशवे व चिमाजी आप्पा नेहमी मानाजी आंग्रेना मदत करत. संभाजी चिमाजी आप्पांशी, पेशव्यांशी मध्येच तहाची बोलणी सुरु करत असे.[२५६] संभाजी आंग्रेनी कुलाबा जिंकण्यासाठी

पुन्हा एकदा पोर्तुगीज व सिद्दी यांच्याशी आघाडी निर्माण करण्याचा प्रयत्न केला.[२५७] पोर्तुगीज कुलाब्यावर हल्ला करण्यास आले तेव्हा बाजीराव पेशवे ६ जुलै १७३७ मध्ये कुलाब्यास आले. त्यांनी पोर्तुगीजांचा पराभव करुन त्यांना पिटाळून लावले.[२५८] १७३८ मध्ये संभाजीने पुन्हा मानोजी आंग्रेस कुलाब्यातून घालवून देण्याचा प्रयत्न केला.[२५९] ब्रह्मेंद्रस्वामींनी संभाजीस मानाजी बरोबर सख्य करून देण्याचे आश्वासन दिले होते. संभाजी त्याबद्दल ब्रह्मेंद्रस्वामींना तगादा लावत होता.[२६०] इंग्रजांनी मराठ्यांना संभाजी आंग्रेविरोधात मदत करण्याचे मान्य केले होते.[२६१] संभाजी आंग्रेने हिराकोटवर हल्ला केला. संभाजी आंग्रेने यावेळी हिराकोट, सागरगड, चौलचा कोट व थळचा कोट हे मानाजीच्या ताब्यातील किल्ले घेतले. कुलाब्याचा पाणीपुरवठा बंद केला. म्हणून मानाजीने नानासाहेब यास मदत मागितली. पेशवे बाजीराव यावेळी उत्तरेकडील स्वारीवर होते. नानासाहेबांनी वासुदेव जोशी, विठ्ठल शिवदेव, अंताजी नारायण यांना चारपाचशे सैन्यासहित मानाजीस मदत करण्यासाठी पाठविले. चिमाजी आप्पांनी इंग्रजांनासुद्धा कुलाब्याला मदत करण्यासाठी बोलाविले.[२६२] चिमाजी आप्पा नानासाहेबांसह कुलाब्याला आला. हिराकोटजवळ संभाजी आंग्रेंच्या सैन्याचा पराभव केला. इंग्रजांचे आरमार कुलाब्याला पोहचले होते. त्यांनी अलिबागमध्ये संभाजीच्या सैन्यावर तोफांचा मारा केला. नानासाहेबांनी सागरकोटजवळ संभाजीच्या सैन्याचा पराभव केला. संभाजी आंग्रे जीव वाचवून पळून गेला. संभाजीने इंग्रजांच्या भेटीने त्याच्या आरमारातील गुराबा व मोठी गलबते सुवर्णदुर्गकडे पाठवून दिली.[२६३] संभाजी आंग्रेने छोटी गलबते व महागिऱ्या मिळून साठ आरमारी नौका साखरीच्या खाडीजवळ ठेवेल्या होत्या. मानाजीने पेशव्यांचे देणे थकविले होते. तसेच पोर्तुगिजांच्या ताब्यातील उरण घेऊन स्वतःकडेच ठेवले होते. यानिमित्ताने चिमाजी आप्पाने संभाजीच्या सैन्याचा पराभव करुन पाल, विरगळ व उरण जिंकून त्यावर पेशव्यांचा ताबा ठेवला.[२६४] पेशवे नानासाहेब व संभाजी आंग्रे यांच्यात वरसोली येथे युद्ध झाले. यावेळी तुळाजी आंग्रे पेशव्यांविरोधात संभाजीस सामील झाला होता. ९ एप्रिल १७४० च्या या युद्धात संभाजी आंग्रे पराभूत झाले. तुळाजी जखमी होऊन धरला गेला. त्यास पुण्याला नेऊन परत सोडून देण्यात आले.[२६५] संभाजी आंग्रे दि. १२ जानेवारी १७४२ रोजी मरण पावले.[२६६] रावरखेडी येथे २३ एप्रिल १७४० रोजी त्यास ताप आला. २८ एप्रिल १७४० रोजी त्याचा मृत्यू झाला.

## पेशवे बाळाजी बाजीराव यांचे (इ.स. १७४०–१७६१) मधील कोकणातील कार्य –

### अ) छ. शाहू महाराजांचा काळ(इ.स. १७४०–१७४९)

छ. शाहूंनी २५ जून १७४० रोजी बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांस पेशवेपदाची वस्त्रे सातारा येथे दिली. संभाजी आंग्रे हे १२ जानेवारी १७४२ रोजी मरण पावले. त्यांच्या मृत्यूनंतर आंग्रे घराण्यात सरखेल पदासाठी संघर्ष सुरु झाला. संभाजीचा सावत्र भाऊ तुळाजी व मानाजी यांच्यात सरखेलपद मिळविण्यासाठी सातारा दरबारात प्रयत्न सुरु झाले. मानाजीचा जेष्ठत्वाच्या मुद्यावर सरखेल पदावर दावा होता. तुळाजीला सरखेल पद मिळविण्याची महत्वाकांक्षा होती. अंजनवेल व गोवळकोट हे दोन्ही किल्ले जो जिंकून देईल त्यास सरखेली देण्याचे छ. शाहूनी जाहीर केले. तुळाजीने हे आवाहन स्विकारले.[२६७] यमाजी शिवदेव यांनी मध्यस्थी केली. छ. शाहूनी तुळाजी आंग्रे यांना सरखेल केले.[२६८] अंजनवेलला वेढा दिल्यानंतर इंग्रजांनी सिद्दीस मदत करु नये म्हणून तुळाजीने इंग्रजांशी शांतता तहाचे बोलणी सुरु केली होती. पण चाणाक्ष इंग्रजांनी त्याचा हा डाव ओळखला.[२६९] यानंतर लगेचच नानासाहेब पेशव्यांनी छ. शाहूनीच अंजनवेल जिंकण्यासाठी तुळाजीला नेमले असून आपण अडथळा आणू नये, असे मुंबईच्या इंग्रजांना पत्र पाठविले.[२७०] नानासाहेब पेशव्यांनी या पत्रानंतर लगेचच तुळाजी विरोधात इंग्रजांना मदत करावी असे पत्र पाठविले.[२७१] २९ जानेवारी १७४५ रोजी तुळाजीने अंजनवेल जिंकला. अंजनवेलचा सुभेदार सिद्दी याकुबखान याने ही बातमी इंग्रजांना कळवली व आपला प्रदेश तुळाजीपासून वाचविण्यासाठी इंग्रजांची मदत मागितली.[२७२] २३ जानेवारी १७४५ मध्ये तुळाजीने याकुतखानाकडून अंजनवेल जिंकला. त्याचे नाव तुळाजीने गोपाळदुर्ग ठेवले.[२७३] लगेचच तुळाजीने गोवळकोट सुद्धा जिंकला. अशाप्रकारे आव्हान स्विकारल्याप्रमाणे तुळाजीने अंजनवेल व गोवळकोट जिंकला.[२७४]

तुळाजी आंग्रेच्या पत्रांमध्ये सरखेल उल्लेख असणारा शिक्का जानेवारी १७४३ पासून पुढच्या कागदपत्रात आढळतो.[२७५] तुळाजी आंग्रे यांनी आधीपासूनच छ. शाहू यांच्या विरोधात हालचाली सुरु केल्या होत्या. त्याने संभाजी आंग्रेच्या बाजूने छत्रपती व पेशवे यांच्याशी संघर्ष केला होता. एप्रिल १७४३ मध्ये त्यांनी बाणकोट जिंकला. त्यावरील काही इमारती पाडून पुन्हा छ. शाहूंच्या इच्छेविरुद्ध नव्या इमारती बांधल्या.[२७६] या गैरकृत्याबद्दल छ. शाहू यांनी कृष्णाजी

घाडगे यांना तुळाजीच्या व बाणकोटच्या बंदोबस्तासाठी पाठविण्याचे ठरवले. ते आल्यास त्यांना प्रतिकार करू असा निरोप तुळाजीने जगन्नाथ आवजीस पाठविला होता. त्याच्या या उद्धट वर्तनामुळे त्यावेळी त्यास सरखेली देण्यात आली नव्हती.[२७७] तुळाजीने छ. शाहूने इनाम दिलेल्या गावांमध्ये उपद्रव सुरु केला.[२७८] १७४४ मध्ये मानाजी आंग्रे व पेशवे यांच्यात संघर्ष सुरु झाला. इंग्रजांनी पेशवे व मानाजी आंग्रे यांच्यामध्ये मध्यस्थी करण्याचे प्रयत्न केले.[२७९] पेशव्यांच्या वतीने शंकराजी यांनी मानोजीच्या ताब्यातील भैरवगड जिंकून घेतला.[२८०] तुळाजी आंग्रेने इंग्रजांची जहाजे लुटून, जप्त करुन त्यांना त्रस्त केले होते.[२८१] तुळाजीने पोर्तुगीजांची जहाजे पकडून लुटण्याचा प्रयत्न केला.[२८२] तुळाजी आंग्रे दिवसेंदिवस छ. शाहूंना जुमानेसे झाले. १७४६ मध्ये महाडकर राघो केशव व तुळाजीच्या सैन्यात मंडणगड अलिकडे दोन कोसावर खाडीत व डोंगरात लढाई झाली. यामध्ये आंग्र्यांच्या सैन्याचा पराभव झाला.[२८३] 1 जानेवारी १७४८ मध्ये तुळाजी आंग्रे व पोर्तुगीज हे रेवदंड्यांच्या खाडीमध्ये आक्रमण करणार असल्याची बातमी पसरली होती. पेशव्यांच्या सैन्याने त्यासाठी प्रतिकाराची तयारी केली.[२८४] तुळाजीने मुढागड बांधून तेथे वस्ती केली. त्याची व्यवस्था लावली. छत्रपतींच्या व पेशव्यांच्या सैन्याने तुळाजीच्या ताब्यातील सुवर्णदुर्ग किल्ल्यात तुळाजी विरोधात फितूरी केली होती. तुळाजीला हे समजताच त्याने रातोरात येऊन किल्ल्याचा बंदोबस्त केला. फितुरांना मारुन टाकले. त्याने मुढागडच्या आश्रयाने पन्हाळे प्रांतात उपद्रव सुरु केला.[२८५] छ. शाहू यांनी भगवंतराव पंडित, गंगाधर पंडित प्रतिनिधी, सावंत, विशाळगडकर व आप्पाजी आंग्रे यांना तुळाजीच्या बंदोबस्तासाठी पाठविले. त्यांच्या सोबत चार–पाचशे स्वार व सात–आठ हजार पायदळ होते. छ. शाहूच्या सैन्याने मुढागड जिंकून राजापूर ते संगमेश्वरपर्यंतचा मुलूख जिंकला. तुळाजी आंग्रे याला आपल्या किल्ल्याची सुरक्षितता राखताना नाकेनऊ आले.[२८६] त्यांनी आंग्र्यांचा लांजापर्यंतचा प्रदेश जिंकला होता. तरीही गोवळकोट, अंजनवेल, मंडणगड, बाणकोट, विजयदुर्ग व सावंतांचे किल्ले जिंकून तुळाजीचा बंदोबस्त करण्यास भगवंतराव पंडित अमात्य यांना कळविण्यात आले.[२८७] पेशवे नानासाहेब यांनी तुळाजीची कान उघडणी केली.[२८८] तुळाजी व शाहू यांच्यातील हा संघर्ष एप्रिल १७४८ मध्ये झाला. ब्रह्मेंद्रस्वामींनी सदाशिवराव भाऊ यांना १७४२ मध्ये तुळाजी आंग्रेचा विनाशकाळ जवळ आला असून पालगड व रसाळगड घेण्याची

आज्ञा केली.[२८९] डिसेंबर १७४३ मध्ये अंताजी घाडगे यांनी पालगड व आसपासच्या प्रदेशात जाळपोळ लुटालुट सुरु केली होती. त्याच्या माणसांनी रात्री गुपचूप पालगड जवळील चिंचघर गावात येऊन घरांना आग लावली. त्याबद्दल तुळाजी आंग्रेचा कारकून केसो त्रिंबक यांनी वैद्य बंधूकडे तक्रार केली.[२९०] छ. शाहूंनी विश्वंभट वैद्य यांना तुळाजीकडे सामोपचाराच्या बोलणीसाठी १७४५ मध्ये पाठविले.[२९१] अशाप्रकारे छ. शाहूने तुळाजी आंग्रेचा शांततेच्या व लष्करी दबाव दोन्ही मार्गाने बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. पण तुळाजीचा बंदोबस्त झाला नाही. छ. शाहू यांचा १५ डिसेंबर १७४९ मध्ये सातारा येथे मृत्यू झाला.

**ब) छ. रामराजा काळ(इ.स. १७४९–१७६१)**

छ. शाहू निपुत्रिक होते. छ. शाहूंने माझ्या मृत्यूनंतरच रामराजास गादीवर बसवावे असे पेशव्यांना सांगितले होते.[२९२] ४ जानेवारी १७५० रोजी रामराजे यांचा राज्याभिषेक करण्यात आला.[२९३] तुळाजीने इंग्रजांना संभाजी आंग्रेपेक्षा अधिक त्रास दिला. १७४९ मध्ये त्याने कमांडर विल्यम जेम्सच्या आरमाराशी अयशस्वी टक्कर दिली. जेम्सने आंग्र्यांच्या १६ जहाजांवर हल्ला केला. तुळाजीचे सर्वात मोठे जहाज बुडवून बाकीच्यांना विजयदुर्गकडे पिटाळले.[२९४] आक्टो. १७४९ मध्ये तुळाजी आंग्र्याने इंग्रज कंपनीचे रेस्टोरेशन जहाज पकडले.[२९५] १७५० मध्ये मलबार किनाऱ्यावरील सर्व नाविक सरदार इंग्रजांशी बोलणी करण्यास आले. तुळाजी आंग्रे हेच फक्त न गेल्याने त्याला विरोध करण्यासाठी इंग्रजांना लढाऊ आरमार ठेवावे लागले.[२९६] इ.स. १७५० मध्ये सरखेल तुळाजी आंग्रे यांनी कमांडर लिस्ले यांचे ६४ तोफांचे झिलंट व ५० तोफांचे रुबी ही जहाजे पकडली.[२९७] जानेवारी १७५१ मध्ये तुळाजीने सावंतांवर आक्रमण केले.[२९८] इ.स. १७५४ मध्ये त्याने डचांच्या तीन मोठ्या जहाजावर आक्रमण केले.[२९९] सरखेल तुळाजी आंग्रे आरमारासह बाणकोट खाडीमध्ये आले. यशवंतगड जिंकून घ्यावा या उद्देशाने ते आले होते. महाडकरी व यशवंत गडकरी यांनी निजामपूर जवळ खादार भादेवमध्ये असणाऱ्या रामजी भगवंतांना ही बातमी कळवली. रामजी भगवंत तातडीने बाणकोट खाडीकडे गेले. रामजी भगवंत आल्याचे कळताच तुळाजी आंग्रे निघून गेले.[३००] नोव्हेंबर १७५५ मध्ये तुळाजीने डचांना (वलंदेज) देवगड देण्याचे, पोर्तुगीजांना ४ लाख रु. देण्याचे मान्य करुन डच व पोर्तुगीज यांची पेशव्यांविरोधात लष्करी मदत मिळविली होती. याशिवाय सुरतचा सिद्दी मसुदखान व जंजिऱ्याचा

सिद्दी यांची मदत मिळविण्याचे तुळाजीचे प्रयत्न सुरु होते. अशाप्रकारे डच, पोर्तुगीज, सुरतेचा सिद्दी मसूदखान, जंजिऱ्याचा सिद्दी व तुळाजी यांची पेशवे नानासाहेब यांच्या विरोधात संयुक्त आघाडी निर्माण करण्याचे राजकारण तुळाजीने सुरु केले होते.[३०१] देवगडला बाबुराव साटम, खारेपाटण येथे पाच-सातशे सैन्यासह रुद्राजी धुळप, रत्नागिरीस धुळपाचा भाऊ, जयगडला शंकराजी विश्वासराव, अंजनवेलला मोत्याजीराव विचारे गोवळकोटला राघोबस्वंत (यशवंत?) व स्वत: तुळाजी विजयदुर्ग येथे थांबून तुळाजीने पेशव्यांविरोधात लढाईचा जय्यत तयारी केली होती.[३०२] पेशव्यांच्या कोकणातील सुभेदार रामजी महादेवने तुळाजीच्या लोकांमध्ये फूट असल्याने ते पेशव्यांच्या सैन्याविरोधात टिकाव धरणार नाहीत. जर पेशव्यांच्या सैन्याने अधिक प्रयत्न केले तर तुळाजीचा पूर्ण बंदोबस्त होईल अशी आशा व्यक्त केली आहे.[३०३] नोव्हेंबर ते जानेवारी १७५५ मध्ये तुळाजीने पेशव्यांविरोधात पोर्तुगीजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. नानासाहेब हा आपला समान शत्रू असून दोघांनी परस्परांना मदत करुन शत्रूचे (पेशवे नानासाहेब) दमन करु. याबदल्यात तुम्हाला (पोर्तुगीजांना) तुमची ठाणी परत मिळवता येतील असे त्याने पोर्तुगीजांना कळवले.[३०४] तुळाजीचा हा प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला. पण पोर्तुगीजांनी आपले सैन्य परत बोलविले. पेशवे नानासाहेब यांनी गोव्याच्या राज्य सचिवाला पत्र पाठवून त्याचा समाचार घेतला.[३०५] अशाप्रकारे तुळाजी आंग्रे सातारचे छ., पेशवे, कोल्हापूरचे संभाजी, इंग्रज, पोर्तुगीज, डच, मानाजी, सिद्दी सर्वांनाच डोईजड होऊ लागला. १७५४ मध्ये इंग्रज आरमारी अधिकारी कमांडर जेम्स तुळाजीचे मुख्य केंद्र विजयदुर्गवर आक्रमण करता येते का याची चाचपणी करुन आला. त्याने इंग्रजांना हा किल्ला एकट्याने इंग्रजांना घेणे अशक्य आहे. असा रिपोर्ट केला.[३०६] १७५४ मध्येच तुळाजीने गोव्याजवळ डच कंपनीच्या तीन जहाजांवर हल्ला केला. यात आंग्र्यांची काही जहाजे जळावी. हीच आग डचांच्या जहाजावर जाऊन ती जळाली. काही डच लोक आंग्र्यांच्या ताब्यात आले. त्यांचा छळ झाला. याशिवाय पुन्हा तुळाजीने ५० तोफांची जहाजे पकडून जाळली. १८ तोफांचे जहाज पळवून नेले.[३०७]

ताराबाईने पुढाकार घेऊन सातारच्या गादीवर बसविलेले छ. रामराजे पेशव्यांच्या प्रभावाखाली गेले. त्यामुळे ताराबाईने हे रामराजे खोटे आहेत मी पेशव्यांच्या दबावाने हे केले असा कांगावा सुरु केला. तिने शवेटी पेशव्यांच्या विरोधात तुळाजी व पोर्तुगीजांशी तसेच फ्रेंच

अधिकारी ब्रुसी यांच्याशी संधान साधण्याचा प्रयत्न केला. पश्चिम किनारपट्टीच्या दक्षिणेचा भाग तुळाजी आंग्रेच्या ताब्यात होता तर उत्तरेकडील भाग पेशव्यांचा गव्हर्नर रामजी महादेव बिवलकर याच्या ताब्यात होता.[३०८] सरखेल झाल्यापासून तुळाजीने स्वत:च्या व पेशव्यांच्या हद्दीतील प्रत्येक जहाज लुटले होते.[३०९] प्रादेशिक व सागरी सीमा शेजारी असल्यामुळे रामजी महादेव व तुळाजी आंग्रे यांच्यातील वैर वाढत गेले. छ. शाहूंच्या मृत्यूनंतर सत्तांतर पेशव्यांकडे झाले. मराठा राज्याचे नेतृत्व पेशव्यांकडे येऊन छ. नामधारी झाले. सरखेल तुळाजी कोणालाच न जुमानता स्वतंत्रपणे सत्ता उपभोगू लागले. त्यांनी मराठा सत्तेविरुद्ध वारंवार बंडे केली. त्याशिवाय पेशव्यांविरोधात फ्रेंच अधिकारी ब्रुसी व ताराबाई यांच्याबरोबर संगनमत केले. तुळाजीमुळे इंग्रजांचा पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार धोक्यात आला. आरमारामध्ये पेशवे नानासाहेब दुर्बळ असल्यामुळे तुळाजीचा नाविक युद्धात पराभव करणे अशक्य होते. या पूर्वीच्या मराठा सरदारांच्या अनेक पत्रांमध्ये विशेषत: फत्तेसिंग भोसले, बाजीराव पेशवे यांच्या पत्रांमध्ये आम्हास दर्यातील कारभार वाकिफ नाही. आरमारचे आम्हाकडील लोकांस न कले असे उल्लेख आढळतात.[३१०] यावरुन आंग्रे बंधू व त्यांचे सरदार यांच्याशिवाय इतर मराठा सरदारांना आरमारी युद्धात गती नव्हती. पेशवे नानासाहेब यांच्या काळातही या परिस्थितीत फारसा फरक पडला नव्हता. नाविक युद्धात तुळाजीला जिंकण्याची पेशव्यांना खात्री नव्हती. इंग्रजांसारख्या समर्थ आरमारी शक्ती असणाऱ्या परकियांना सुद्धा एकट्याने तुळाजीने मुख्य ठाणे विजयदुर्ग जिंकणे अशक्य वाटत होते.[३११] साहजिकच तुळाजी आंग्रेसारख्या नाकात दम आणणाऱ्या समान शत्रूविरोधात पेशवे व इंग्रज एक झाले. इंग्रजांनी पेशव्यांविरोधात तुळाजीस मदत करु नये, असे पेशव्यांना वाटत होते. पेशव्यांनी तुळाजीची जबाबदारी रामजी महादेव याच्यावर सोपवली.[३१२] नानासाहेब पेशव्यांनी तुळाजी विरोधात इंग्रजांच्या आरमाराची मदत घ्यावी, हा रामजी महादेवचा सल्ला मान्य केला. तुळाजी आंग्रेने नोव्हेंबर १७५४ मध्ये तुळाजीने इंग्रजांकडे शांतता तहाचा प्रस्ताव ठेवला.[३१३] इंग्रजांनी तुळाजीच्या प्रस्तावाचा फार गांभिर्याने विचार केला नाही.[३१४] रामजी महादेव यांनी मार्च १७५५ पासून इंग्रजांशी तुळाजी विरोधात संधान साधण्याचा प्रयत्न केला. १० मार्च १७५५ रोजी मराठ्यांचे तुळाजीचा पुर्ण बिमोड करण्याची अपेक्षा व्यक्त करणारे पत्र इंग्रजांना प्राप्त झाले.[३१५] रामजी महादेवने याबरोबरच

विजयदुर्ग व सुवर्णदुर्गामध्ये फितुरी केली. तुळाजीमुळे किनारपट्टीवरचा व्यापार धोक्यात आलेल्या इंग्रजांना ही चांगली संधी मिळाली. मुंबईचा इंग्रज गव्हर्नर रिचर्ड बुर्शियर व पेशव्यांच्या वतीने सुभेदार रामजी महादेव यांच्यामध्ये दि. १९ मार्च १७५५ रोजी करार झाला.[३१६] २२ मार्च १७५५ मध्ये रामजी महादेवने आरमार ताबडतोब पाठविण्याची विनंती करणारे पत्र पाठविले.[३१७] पेशव्यांनी वाडीकर सावंत, कोल्हापूरचे संभाजी, अमात्य, प्रतिनिधी यांनी तुळाजीच्या बंदोबस्तासाठी रामजी महादेव यांना आवश्यक ती मदत करावी अशी सूचना केली. जावजी गवळी व खंडोजी माणकर हे पेशव्यांचे सरदार कोकणमध्येच होते. याशिवाय पेशव्यांनी समशेरबदाद्दर व दिनकर महादेव यांना रामजी महादेव यांच्या मदतीस कोकणामध्ये पाठविले.[३१८] पोर्तुगीजांनी तुळाजीच्या मदतीस जाऊ नये असे नियोजन करण्यात आले. कोल्हापूरच्या संभाजीना तुळाजीचा मोड व्हावा, असे वाटत होते. पण पेशवे नानासाहेबांवर असणारे तुळाजीचे दडपण कायम रहावे असे वाटत होते. त्यामुळे ते वेळ पडेल तसे वागत होते.[३१९] दि. १९ मार्च १७५५ मध्ये मुंबईचा इंग्रज गव्हर्नर रिचर्ड बुर्शियर व पेशव्यांच्या वतीने तुळाजी विरोधात करार झाला. त्याप्रमाणे खालील कलमे ठरविण्यात आल्या.

१) सर्व आरमार इंग्रजांच्या ताब्यात असावे, परंतु कारभार दोघांच्या संमतीने व्हावा.

२) तुळाजी आंग्र्यांकडून जी जहाजे मिळतील ती इंग्रज व मराठ्यांनी निम्मी निम्मी वाटून घ्यावी.

३) बाणकोट/हिंमतगड आणि खाडीच्या दक्षिण काठावरील पाच गावे मराठ्यांनी इंग्रजांना द्यावित.

४) इंग्रजांनी समुद्रातून तुळाजीच्या सर्व ठिकाणांवर हल्ला करावा. पण सध्या फक्त सूवर्णदुर्ग, अंजनवेल व विजयदुर्ग यावर हल्ला करावा.

५) तुळाजीच्या किल्ल्यांमध्ये मिळणारी संपत्ती, तोफा, दारुगोळा हे सर्व मराठ्यांना द्यावे.

६) मानाजी आंग्रेच्या प्रदेशावर हल्ला केल्यास खांदेरी बेट बंदर व जवळपासची रेवस, रांजणखार, सारळ, शामी, मांडवे, कोळगाव, डोंबारण, केहीम व आवास ही गावे इंग्रजांना द्यावीत.

७)  आवश्यकता वाटल्यास गव्हर्नर व नानासाहेब पेशव्यांच्या संमतीने अधिकची कलमे ठरविण्यात यावीत.[३२०] या करारास पेशव्यांनी मान्यता दिली.

रामजी महादेव यांनी विजयदुर्ग आधी जिंकावा असा आग्रह धरला. पण पावसाळा जवळ आल्याने आधी सुवर्णदुर्ग व आजूबाजूचे किल्ले जिंकावेत त्यावर पक्की व्यवस्था करावी आणि मगच विजयदुर्गवर आक्रमण करावे असे ठरविण्यात आले.[३२१]

या करारानंतर इंग्रज आरमाराचा प्रमुख विल्यम जेम्स यास सुवर्णदुर्ग किल्ल्यावर हल्ला करण्याचा हुकूम करण्यात आला. मराठ्यांनी जमिनीवरुन हल्ला करावा व इंग्रजांनी किल्ल्यास समुद्रातून वेढा द्यावा असे ठरले. इंग्रजाच्या बरोबर यावेळी रामजी महादेव व मराठा आरमाराचे प्रमुख नानापंत होते. १२ एप्रिल १७५५ रोजी इंग्रज व मराठ्यांच्या संयुक्त सैन्याने सूवर्णदुर्ग किल्ला जिंकला. त्यापूर्वीच ४ एप्रिल १७५५ रोजी कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा हे किल्ले त्यांनी जिंकले. सूवर्णदुर्ग घेताच मराठ्यांनी बाणकोट, पालगड, रसाळगड जिंकले. आठ दिवसात आठ किल्ले घेतले.[३२२] १९ एप्रिल १७५५ रोजी लिहलेल्या पत्रात केसो बहिरव वैद्य, भिकंभट वैद्य यांना तुळाजी आंग्रेचे सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग, कनकदुर्ग व गोवे असे चार किल्ले व बाणकोट, मंडणगड व पालगड किल्ले घेतल्याचे कळविले.[३२३] २४ डिसेंबर १७५५ रोजी इंग्रजांना बाणकोटचा किल्ला व आसपासच्या पाच गावांचा ताबा मिळाला.[३२४] आक्टोबर १७५५ मध्ये कमांडर जेम्सला बाणकोट किल्ला व जवळच्या नऊ गावांचा ताबा देण्यात आला. ती नऊ गावे म्हणजे वेळास, वेसवी, बागमांडले, शिपोळे, कुडूक, पंदेरी, पेवे, कुंबळे व दासगाव इत्यादी होत.[३२५]

ब्रिटिशांनी हिंमतगडचे नाव बदलून फोर्ट व्हिक्टोरिया हे नाव ठेवले.[३२६] इंग्रजांनी अंजनवेल/गोपाळगडच्या वेढ्याला मदत पाठविण्यास नकार दिला. मराठ्यांच्या सैन्याने अंजनवेलवर मारा करुन पुढे गेले.[३२७] जानेवारी १७५६ रोजी मराठ्यांनी अंजनवेल किल्ला जिंकला.[३२८] पेशव्यांनी दासगाव इंग्रजांना देऊ नये असे रामजी महादेवाना कळविले होते. रामजी महादेव त्यासंदर्भात हिंमतगड/बाणकोटला जाऊन आले. पण इंग्रजांनी समजाऊन सांगितल्यामुळे शेवटी रामजी महादेव यांनी दासगाव व कुंबळे देण्याचे मान्य केले.[३२९] जानेवारी, फेब्रुवारी १७५६ च्या दरम्यान तुळाजी आंग्रेने पेशव्यांशी शांतता वाटाघाटी करण्याचा प्रयत्न विविध सरदारांच्या माध्यमातून केला.[३२८] नानासाहेब पेशव्याने तुळाजीशी कोणतीही बोलणी करु

नये. जोरदार आक्रमण करुन त्यांच्या बंदोबस्ताचे काम पूर्ण करावे अशी आज्ञा केली.[३२९] पण हा प्रयत्न अयशस्वी झाला नाही. मुंबईच्या गव्हर्नरने मद्रास येथे इंग्लंडवरुन आलेली आरमारी मदत पाठविण्याची विनंती मद्रासच्या इंग्रज अधिकाऱ्यांना केली. त्यांनी इंग्लंडमधून आलेल्या क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली काही सैन्य व ॲडमिरल वॉटसनच्या नेतृत्वाखाली आरमार यांना मदतीस पाठविले. वॉटसनचा विश्वासू सहकारी विल्यम ह्युवेट एका लहान गलबतासह विजयदुर्गाची पाहणी करुन आला. ७ फेब्रुवारी १७५६ रोजी वॉटसन व क्लाईव्हने मुंबई सोडले. ११ फेब्रुवारीस विजयदुर्गवर इंग्रज आरमाराने आक्रमण केले. मराठ्यांची ४०–५० जहाजे त्यांना येऊन मिळाली. एक गोळा तुळाजीच्या आरमारावर पडून ते भस्म झाले. १३ फेब्रुवारी १७५६ रोजी विजयदुर्ग ताब्यात आला. दरम्यान तुळाजीने रामजी महादेव यांच्याशी पेशव्यांना शरण येण्याविषयी, बोलणी केली. पण रामजी महादेव यांनी टाळाटाळ केली. किल्ला मिळाल्यानंतर कॅप्टन फोर्बसने मराठ्यांच्या सैन्याला घेरियामध्ये जाऊ दिले नाही. वॉटसनने मराठ्यांनी तुळाजीला इंग्रजांच्या ताब्यात द्यावा. यासाठी रामजी महादेवचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.[३३०] तुळाजी आंग्रे यास मराठ्यांनी इंग्रजांच्या ताब्यात दिले नाही. तो मराठ्यांच्या कैदेतच १७८६ मध्ये वंदन किल्ल्यावर मरण पावला. ५ मार्च १७५६ ला रत्नागिरी व १३ मार्च १७५६ रोजी रसाळगड जिंकल्याचे वृत्त आले.[३३१] इंग्रजांनी बाणकोट व तुळाजी आंग्रे मराठ्यांकडे ठेवण्याच्या बदल्यात विजयदुर्ग इंग्रजांना द्यावे अशी बोलणी कर्नल वॉटसनने गंगाधरपंत व रामजी महादेव यांच्याकडे लावली.[३३२] बाणकोटच्या सनदा घेऊन विजयदुर्ग ताब्यात घेण्यासाठी रामजी महादेव यांचे प्रयत्न सुरु होते. महंमद सोफी पलवकर व बाजीपंत यांचे मार्फत कराराची कलमे त्यापूर्वी ठरविण्यात आली होती. २ मार्च १७५६ रोजी गंगाधरपंत व रामजी महादेव यांनी इंग्रजांकडून आलेल्या करारावर अनेक हरकतीचे मुद्दे मांडले. विल्यम डेलगार्डे यास घेरियाचा किल्लेदार म्हणून पाठविले. त्याचवेळी बाणकोटचा किल्लेदार विल्यम अँड्र्यू प्रिन्स मुंबईस गेला.[३३३] रामजी महादेव यांनी बाणकोटचा किल्लेदार विल्यम अँड्र्यू प्रिन्स याच्याकडे भास्करपंत शिर्के व गणेश परशुराम यांना बाणकोटच्या सनदा देऊन पाठविले.[३३४] कर्नाटकच्या मोहिमेवरुन परत आल्यावर दुसऱ्या दिवशी नानासाहेब पेशव्यांनी २१ जुलै १७५६ रोजी इंग्रज गव्हर्नरला विजयदुर्ग मराठ्यांच्या ताब्यात न दिल्याबद्दल तसेच बाणकोट देऊन विजयदुर्ग इंग्रजांना घेण्याच्या

प्रयत्नांबद्दल खरमरीत पत्र लिहले.[३३५] गव्हर्नरने पेशव्यांना विजयदुर्ग कायम ठेवण्याचा कोणताही इरादा नाही. पावसाळा संपताच किल्ला ताब्यात देतो. तुमच्या माणसांनी नुकताच बाणकोट किल्ला आमच्या ताब्यात दिला असून बाजीपंतांनी विजयदुर्ग ताब्यात देईपर्यंत बाणकोट जवळच्या गावांचा ताबा इंग्रजांना देऊ नयेत, असे आदेश दिले आहेत.[३३६] टॉमस वायफिल्ड व जॉन स्पेन्सर यांना पुण्यास नानासाहेब पेशव्यांशी विजयदुर्ग व बाणकोट संदर्भात गव्हर्नरच्या वतीने बोलणी करण्यासाठी पुण्याला सप्टेंबर १७५६ मध्ये पाठविण्यात आले.[३३७] त्याप्रमाणे बोलणी होऊन बाणकोट व त्याच्या जवळची वेळास, बागमांडले, वेसवी, शिपोळे, कुडुक, पंदेरी, पेवे, दासगाव व कुंबळा ही गावे इंग्रजांना देण्यात आली.[३३८] अशाप्रकारे ऑक्टोबर १७५६ मध्ये इंग्रजांना बाणकोट व उपरोक्त गावांचा ताबा मिळाला. बाणकोटच्या खाडीत यापैकी काही गावांची चौथाई सिद्दी घेत असे त्याचा उपाय पेशव्यांनी करावा असे ठरले.[३३९] पानिपत युद्धात मराठ्यांचा दारुण पराभव झाला. यामध्ये सदाशिवरावभाऊ व नानासाहेब पेशव्यांचा मुलगा विश्वासराव तसेच अनेक मराठा सरदार मरण पावले. लाखो मराठा सैन्याची कत्तल झाली. नानासाहेब पेशव्यांना याचा धक्का बसला. २३ जून १७६१ रोजी नानासाहेब पेशवे यांचा पर्वतीवर मृत्यू झाला.[३४०]

## छ. रामराजे – इ.स. १७६१–१७७७

### अ) माधवराव पेशवे (२० जुलै १७६१ ते १८ नोव्हेंबर १७७२)

नानासाहेबाचा मुलगा माधवराव यास महाराणी ताराबाईच संमतीने छ. रामराजे यांनी २० जुलै १७६१ रोजी पेशवेपदाची वस्त्रे दिली. त्यावेळी त्यांचे वय फक्त १६ वर्षाचे होते. पेशवे माधवराव यांच्या काळात सदाशिवराव भाऊच्या तोतयास पुढे रत्नागिरीला हलविण्यात आले. रत्नागिरीचा मामलेदार रामचंद्र नाईक परांजपे याने माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर तोतयास सोडून त्याच्याकडून बंड करविले. या तोतयाने दक्षिण व उत्तर कोकण जिंकले. रत्नागिरी जिल्ह्यातील सर्व किल्ले त्याने ताब्यात घेतले. पण हे पेशवे सवाई माधवराव यांच्या काळात घडले. त्यामुळे त्याविषयीचा सविस्तर वृत्तांत येथे देत नाही.

पेशवे माधवराव यांच्या कारकिर्दीतील मंडणगड, बाणकोट, पालगड यांच्या काळातील संदर्भ खुपच कमी मिळतात. सुवर्णदुर्ग, जयगड, रत्नागिरी, अंजनवेल यांचे उल्लेखही अभावानेच आढळतात. या काळातील २९ जानेवारी १७६३ मध्ये कोकण प्रांताचे सुभेदार रामजी महादेव

यांना कळविण्यात आले की, त्यांच्या तालुक्यामध्ये आधीच्या वर्षी (इ.स. १७६२) कारखानीस व सुभ्याच्या अधिकाऱ्याकडून सुवर्णदुर्ग तालुक्यातील किल्ल्यांच्या वहिवटदारांवर आकारलेल्या करामध्ये असमानता होती. त्यामुळे  नवा करार करुन त्या त्या किल्ल्यांना काही सुट दिली आहे. उर्वरित करवसुली करुन जमा करावी. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील सुवर्णदुर्ग ७०० रु., मंडणगड ५०० रु., रसाळगड ५०० रु., सुमारगड २०० रु. व कोठी आरमार सुवर्णदुर्ग ३०० रु. वार्षिक कर आधी आकारला होता. नव्या कराराप्रमाणे सुवर्णदुर्गला ५५० रु., आरमार सुवर्ण दुर्गला १०० रु., सुमारगडला १०० रु., रसाळगडला ७५ रु., व मंडणगडला ७५ रु. सुट देण्यात आली. सुट दिलेली एकूण २५०० रु तालुक्यातील मातब्बर दरकरांकडून वसुल करावेत.[३४१]

अर्थात हा सर्व उल्लेख आर्थिक करवसुली संदर्भात आहे. सरखेल तुळाजी आंग्रेच्या पाडावाने व सिद्दीचा बंदोबस्त झाल्यामुळे  माधवराव पेशव्यांच्या काळात रत्नागिरी जिल्ह्यात राजकीय हालचाली अपवादानेच झाल्या असाव्यात.

माधवराव पेशवे यांची प्रकृती नाजूक होती. अखेर त्यांना क्षय झाला. १८ नोव्हेंबर १७७२ रोजी अवघ्या अठ्ठाविसाव्या वर्षी माधवराव पेशवे यांचा मृत्यू झाला.

### ब) नारायणराव पेशवे(१३ डिसेंबर १७७२ ते ३० ऑगस्ट १७७३)

दि. १३ डिसेंबर १७७२ रोजी नारायणरावाला पेशवाईची वस्त्रे मिळाली. ११ ऑगस्ट १७७२ रोजी हरिपंत फडके यांना सुवर्णदुर्गचे सुभेदार नेमले.[३४२] नारायणरावांनी आठ महिने कारभार केला. नारायणरावाकडे राज्यकर्त्याचे, प्रशासकाचे गुण नव्हते. तो आपल्या पूर्वजांप्रमाणे पराक्रमी नव्हता. नारायणरावांविषयी त्यावेळच्या पत्रामध्ये त्यांच्या स्वभावाने, कारभाराचे उल्लेख मिळतात. ३० ऑगस्ट १७७२ रोजी नारायणराव पेशव्यांचा खून करण्यात आला. त्यांच्या बचावासाठी आलेले अथवा अडचण निर्माण करणारे व मध्येच आलेल्या सहा ब्राह्मण व्यक्ती, एक हुजऱ्या, एक नाईक, दोन कुणबिणी व एक गाय ठार झाली.

### क) रघुनाथराव पेशवे–(१० ऑक्टोबर १७७३ ते १७ जानेवारी १७७४)

रघुनाथरावाने नारायणरावाच्या खुनानंतर छत्रपतींकडून पेशवाईची वस्त्रे आणली. त्याने १० ऑक्टोबर १७७३ रोजी स्वत:ला पेशवे जाहीर केले. खुनाच्या आरोपावरुन रामशास्त्री प्रभुण्यांनी त्यांना ताबडतोब पदच्यूत केले. अर्थात रामशास्त्री यांनी न्यायास अनुसरुन पदच्यूत

केले तरी राघोबादादा पेशवेपदावर होते. नारायणरावाच्या खुनाची बातमी पसरल्याने निजाम, हैदर, इंग्रज यांनी या संधीचा फायदा घेण्याचा प्रयत्न सुरु केला.

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर पुण्यातील पेशवे दरबारात निर्माण झालेल्या अराजकतेचा फायदा घेण्याचे इंग्रजांनी ठरविले. त्यांनी मुंबईच्या दृष्टिने महत्वाचा असलेला साष्टी प्रांत जिंकण्याचे ठरवले. फेब्रुवारी १७७४ मध्ये ठाण्याचा किल्ला दोन लाख ऐंशी हजार रुपये लाच दिल्यास इंग्रजांच्या ताब्यात देण्यास ठाण्याचा किल्लेदार तयार होता. पेशवे दरबारातील राजकीय अराजकाचा फायदा घेऊन अशी लाच न देता किल्ला मिळेल असे इंग्रजांना वाटले. याचवेळी गोव्यातील पोर्तुगीज गव्हर्नरच्या विनंतीवरुन पोर्तुगालवरुन डॉम जुझ पेद्र द कमेरा याच्यासोबत लष्कर पाठविण्यात आले होते. मराठ्यांच्या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन मराठ्यांनी पोर्तुगीजांचे घेतलेले प्रदेश व किल्ले परत मिळविण्यासाठी ही लष्करी मदत आली होती. गोव्यातील इंग्रज वकीलाने ही बातमी मुंबईला कळविताच बॉम्बे सिलेक्ट कमिटीने २८ फेब्रुवारी १७७४ रोजी साष्टी प्रांत घेण्याचा ठराव केला. पोर्तुगीजांकडे हा प्रांत जाण्यापूर्वीच तो ताब्यात घेण्याचा इंग्रजांचा विचार होता. साष्टीवर हल्ला करण्याची जबाबदारी मुंबई सरकारने आपल्या लष्करी व नाविक दलावर सोपवली. ब्रिगेडिअर जनरल गॉर्डन याने जमिनीवरुन हल्ला चढवावा तर जॉन बॉक्सन याने आरमारी चढाई करावी असे ठरले. १२ डिसेंबर १७७४ रोजी गॉर्डन व बॉक्सन हे दोघेही कामगिरीवर निघाले. त्याच दिवशी पोर्तुगाल गलबते मुंबईच्या दिशेने आली. इंग्रजांनी विरोध केल्यामुळे पोर्तुगीजांना गप्प बसावे लागले. सुवर्णदुर्गचे हवालदार मोरो बापुजी यांनी साष्टीच्या या युद्धाचा सविस्तर वृत्तांत पेशव्यांना कळविला होता. जानेवारी १७७४ पर्यंत राघोबादादा पेशवे होते. साष्टीच्या मराठा सैन्याने पराक्रमाची शर्थ केली. विजयदुर्गच्या आरमारास साष्टीकरांच्या मदतीस जाण्याविषयी कळविण्यात आले होते. सुवर्णदुर्गवरुन साष्टीच्या मदतीस दोन गुराबा व पाच गलबते पाठविण्यात आली. जानोजी धुळप आपल्या आरमारासहीत साष्टीस निघाला. सुवर्णदुर्गचे आरमार आंग्रेनी कुलाब्यास पाठविले. तेथून ते पायी साष्टीस जाणार होते. सिद्दी व बाणकोटच्या इंग्रज किल्लेदाराने आपल्या पाच सात हजाराच्या संयुक्त सैन्यासहित सुवर्णदुर्गच्या आसपास कारवाया सुरु केल्या.[३४३] सुवर्णदुर्गच्या किल्लेदाराने किल्ला लढविण्याची उत्तम तयारी केली होती. याशिवाय पुण्यावरुन लष्करी मदत मागितली होती.[३४४]

इंग्रजांनी चिमाजी आप्पाशी ३५ वर्षापूर्वी केलेला तह मोडून साष्टीवर आक्रमण केले. साष्टी किल्ल्यातील लोक प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. अशा विश्वासघातकी इंग्रजांना कोंडीत पकडावे. त्यासाठी बाणकोट/हिंमतगडास वेढा द्यावा, दासगावचे इंग्रजांचे ठाणे उठवावे, आंग्रे व धुळपांच्या आरमाराकडून मुंबईवर आक्रमण करावे. सुवर्णदुर्ग व विजयदुर्गच्या सैन्याने पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांना सळो की पळो करुन सोडावे. पोर्तुगीजांचे बिनसले असल्याने ते आता इंग्रजांच्या मदतीस येणार नाहीत. असा सल्ला काही मराठे सरदार पेशवे दरबारास देत होते.[४५] महाड तालुक्यातील बाणकोटकरांची जी गावे आहेत ती जप्त करुन तेथे मराठ्यांनी वसूल करावा. तेथील जे लोक मुंबईत इंग्रजांच्या नोकरीत असतील त्यांची घरी जप्त करावीत. बाणकोटचे ठाणे घ्यावे असा लेखी सल्ला नारो आप्पाजी या पेशवे दरबारातील फडणीस पदावर काम करण्याऱ्या अधिकाऱ्यास सुवर्णदुर्गचे मोरो बापुजी यांनी दिला.[३४६] बाणकोट किल्ला इंग्रजांकडून जिंकण्यासाठी मोरो बापूजींना रायगडवरुन चांगले पराक्रमी १०० सैनिकांची मदत पाठविण्याचा रायकडकरांना आदेश देण्यात आला. याशिवाय इंग्रजांकडील दासगावची जप्ती करण्यासाठी रायगडच्या गणपतराव कृष्ण यांची नेमणूक करण्यात आली.[३४७] मराठ्यांचा प्रदेश घेण्यासाठी टपून बसलेल्या सिद्दीने या कठीण प्रसंगात इंग्रजांशी हात मिळवणी केली. इंग्रजांनी बाणकोट शामलास डिसेंबर १७७४ मध्ये दिला. सिद्दी तेथून अंजनवेलवर आक्रमण करणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. अंजनवेल/गोपाळदुर्ग जागा नाजूक असल्याने तेथे चांगला बंदोबस्त ठेवला पाहिजे. त्यामुळे  गोपाळगडचा किल्लेदार कृष्णाजी विश्वनाथ यांनी पुण्यास पत्र पाठवून नारो आप्पाजी यांना लष्करी मदत मागितली.[३४८]

डिसेंबर १७७४ रोजी इंग्रजांनी साष्टी बेट जिंकले. ठाण्याचा किल्ला, वर्सोवा, करंजा ही सर्व ठाणी जिंकल्यामुळे  साष्टी प्रांत पुर्णपणे इंग्रजांच्या ताब्यात गेला. मे १७७५ मध्ये मराठ्यांनी हा प्रदेश परत घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

मोरो बापुजी यास बाणकोट घेण्यासाठी आणखी शंभर माणसे लष्करात भरती करण्याची परवानगी पेशव्यांच्या वतीने देण्यात आली. रायगड व राजापूर तालुक्यातून प्रत्येकी शंभर असे एकूण दोनशे लोक मोरो बापूजीच्या मदतीस पाठविण्यात आले. मोरो बापूजीने इंग्रजांच्या बाणकोट परिसरात इंग्रजांना गाफील ठेऊन गावांची जप्ती केली. तेथील इंग्रज

अधिकाऱ्यास पकडले.[३४९] या मोहिमेसाठी वसुलीतील काही खर्च करण्याची परवानगी देण्यात आली.[३५०] बाणकोटकडील इंग्रजांकडे असणाऱ्या गावांची जप्ती करुन त्याचा हिशेब सरकारात जमा करण्याची आज्ञा मोरो बापूजी–सुवर्णदुर्ग तालुका, गणपतराव कृष्ण–रायगड तालुका व चिमाजी माणकर–प्रांत राजापुरी यांना देण्यात आली.[३५१] इंग्रजांनी मराठ्यांशी केलेला तह मोडून साष्टीवर आक्रमण केले. म्हणून या परिसरातील जे लोक मुंबई, सुरत व बाणकोट येथे इंग्रज सैन्यात भरती झाले असतील त्यांच्या घराची जप्ती करुन त्याचा हिशेब सरकारला देण्याची आज्ञा झाली. त्या लोकांच्या घरातील माणसांना त्रास द्यावा. त्यामुळे इंग्रजांच्या सेवेतील हे लोक ताबडतोब आपापल्या घरी येतील. अशा आज्ञा महिपतराव कृष्ण–तालुका रत्नागिरी, कृष्णाजी विश्वनाथ–तालुका अंजनवेल, मोरो बापुजी–तालुका सुवर्णदुर्ग, चिमाजी माणकर–प्रांत राजापुरी, गणपतराव कृष्ण–तालुका रायगड व आनंदराव धुळप – सुभा आरमार यांना देण्यात आल्या.[३५२] इ.स. १७७४–७५ मध्ये सिद्दीचे सैन्य दासगाव व ठिकठिकाणी जमा झाले. इंग्रजांशी आलेल्या शत्रूत्वाने इंग्रज सैन्य बाणकोटजवळ जमा झाले होते. बाणकोट खाडी इंग्रजांकडे होती. अशा युद्धजन्य स्थितीत रायगडच्या बंदोबस्तासाठी पुण्यावरुन लष्करात भरती करण्यासाठी लोक पाठविण्यात आले. रायगडच्या बंदोबस्ताची चांगली व्यवस्था करुन पुण्यास कळविण्याच्या आज्ञा रायगडकरांना देण्यात आल्या.[३५३]

नारायणरावाची पत्नी गंगाबाई ही गरोदर होती. राघोबादादांशी सखाराम बापूंचे मतभेद झाले ते राघोबादादाची स्वारीवरची साथ सोडून ३० नोव्हेंबर १७७३ रोजी पुण्यात आले. राघोबादादा साबोजी भोसले व निजाम यांचा बंदोबस्त करण्यासाठी पुण्याबाहेर गेल्यानंतर पेशवे दरबारातील मुत्सद्यांनी राघोबाविरोधात कारस्थान केले. हे कारस्थान बारभाई कारस्थान म्हणून इतिहासात प्रसिद्ध आहे. राघोबा दादाच्या अनुपस्थितीचा फायदा घेत सखाराम बापूने नारो आप्पाजीच्या मदतीने नारायणाची पत्नी गंगाबाई हिस माहेरी जाण्याच्या निमित्ताने शनिवारवाड्यातून बाहेर काढले. तिला पुरंदर किल्ल्यावर बंदोबस्तात ठेवण्यात आले. १७ जानेवारी १७७४ पासून बारभाईंनी गंगाबाईच्या नावे पेशवाईचा कारभार करण्यास सुरुवात केली.

**ड) सवाई माधवराव पेशवे (१९ मे १७७४ ते २७ आक्टोबर १७९५)**

१८ एप्रिल १७७४ रोजी गंगाबाईला मुलगा झाला. त्याच्या जन्माच्या चाळीसाव्या दिवशीच सवाई माधवराव या नावाने त्यास २९ मे १७७४ रोजी पेशवे पदाची वस्त्रे देण्यात आली. सुरुवातीला सहा वर्षे हा कारभार बारभाईंनी चालविला. नाना फडणीस व सखाराम बापूच्या हाती पूर्ण हा कारभार आला. मोरोबाला त्यामध्ये फार स्थान नव्हते. त्यामुळे मोरोबादादाचे कारस्थान इतिहासात उभे राहिले. राघोबा दादा सुरतला इंग्रजांच्या आश्रयास गेला. मोरोबा दादाच्या कारस्थानाचा बंदोबस्त करुन पुढे काही काळ पेशव्यांचा कारभार नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्या ताब्यात आला. सवाई माधवराव हा विशेष करुन नाना फडणीसाच्या संरक्षणामध्ये होता. तो लहान म्हणजे दोन वर्षाचा असताना इ.स. १७७६ मध्ये सदाशिवरावभाऊच्या तोतयाचे बंड उद्‌भवले. त्यापाठोपाठच मार्च १७७८ मध्ये मोरोबादादाचे कारस्थान उद्‌भवले. तोतयाच्या बंडाचा प्रमुख प्रसार कोकणामध्ये झाला. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सवाई माधवरावाच्या काळात बऱ्याच राजकीय, लष्करी हालचाली झाल्या. मराठ्यांच्या दरबारातील या अराजकाचा फायदा घेऊन इंग्रजांनी मराठ्यांच्या ताब्यातील साष्टी किल्ल्यावर आक्रमण केले. तेव्हा मराठ्यांनी इंग्रजांना विविध ठिकाणी विरोध सुरु केला. या मोहिमेचा एक भाग म्हणून हिमंतगडास वेढा घालण्याची तसेच दासगावचे इंग्रजांचे ठाणे उठवून लावण्याची आज्ञा द्यावी अशी मागणी काही मराठा सरदारांना केली.[३५४] धुळप व आंग्रे यांच्याकडून मुंबईवर आरमारी आक्रमण करावे. विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग किल्ल्यावरील पराक्रमी सैन्यास ठिकठिकाणी इंग्रजविरोधी युद्ध करण्यास आज्ञा कराव्यात अशी मागणीसुद्धा या सरदारांनी केली.[३५५] मोरोबादादाच्या कारस्थानातील एक कैदी मंडणगड किल्ल्यावर ठेवण्यात आला.

**तोतयाचे बंड**

सदाशिवराव भाऊ पानिपतावर मरण पावला. त्याचा तिकडेच दहन संस्कार झाला. याची खात्री काशीराज शिवदेव यांनी दिली. पण त्यावर सदाशिवराव भाऊची पत्नी पार्वतीबाई व काही मराठा सरदारांचा विश्वास नव्हता. त्यातच सदाशिवराव भाऊंच्या चेहऱ्याशी साम्य असणाऱ्या सुखलालला हाताशी धरुन गणेश संभाजी, विश्वासराव लक्ष्मण या मराठा सरदारांनी तोतयाचे बंड घडवून आणले. त्याची शहानिशा होऊन तोतयास कैद करुन अहमदनगर, घनगड,

सोलापूर, दौलताबाद येथील किल्ल्यांवर ठेवण्यात आले.[३५६] दौलताबादवरुन तोतयास मिरज येथे ठेवण्यात आले होते. सदाशिवरावभाऊ यांची पत्नी पार्वतीबाई यांना अजूनही तोतया हाच खरा सदाशिवराव भाऊ आहे असे वाटत होते. त्यामुळे तोतयास मिरजवरुन दुसरीकडे हलवू नये असे पार्वतीबाईस वाटत असे.[३५७] तोतयास ऑक्टोबर १७७५ मध्ये रत्नागिरीच्या किल्ल्यामध्ये ठेवण्यात आले.[३५८] त्याचवेळी बचाजीपंत बर्वे, मामलेदार यांच्या कुटुंबास सुवर्णदुर्ग येथे पाठविण्याचे ठरले. रत्नागिरीचा सुभेदार रामचंद्र नाईक परांजपे हा होता. तोच तोतयावर देखरेख ठेवत असे. रामचंद्र नाईक यांनी सांगितल्यावरुन त्याच्या कुटूंबियांनी यांनी तोतयास सोडले. त्याच्या नावाने राज्यात व्दाही फिरवली. माधवराव पेशवे व आत्ताच्या कारभाऱ्यांनी मुद्दाम सदाशिवरावभाऊंना तोतया ठरवून विश्वासघाताने कैदेत ठेवले होते. तेच आता राज्यकारभार पाहू लागले आहेत असे जाहीर करण्यात आले. सुटका होताच तोतयाला हजारो अनुयायी व सैन्य मिळाले. या सैन्यासह त्याने विजयदुर्ग, देवगड हे किल्ले जिंकले. पेशव्यांचे आरमार आनंदराव धुळप यांच्या ताब्यात होते. ते त्यांनी तोतयाच्या ताब्यात दिले. तोतयाने जून १७७६ मध्ये अंजनवेल व गोवळकोट हे किल्ले जिंकले. रत्नागिरीच्या आसपासच्या किल्ल्यांचा बंदोबस्त करुन तोतया पुण्याकडे निघाला.[३५९] तोतयाच्या बंडाचा प्रसार वाढला. तोतयाने अंजनवेल, गोवळकोट घेतानाच मंडणगड, पालगड जिंकला असावा. बाणकोट इंग्रजांच्या ताब्यात होता. तोतयाच्या बंदोबस्तासाठी कारभाऱ्यांनी दोन हजार गारदी व अरब एका प्रभू सरदाराच्या हाताखाली पाठवले. त्यांची अंजनवेल जवळपास गाठ पडून लढाईस सुरुवात झाली.[३६०] तोतयाने गारद्यांनी फितवून आपल्याकडे वळवून घेतले. त्यामुळे प्रभु सरदार व अरब सैन्य युद्ध सुरु ठेवून हळूच निसटून प्रतापगडच्या आश्रयास आले.[३६१] बाजाजी शिंदे यांना तोतयाच्या बंदोबस्तासाठी पेशव्यांनी कोकणात पाठविले. या कामासाठी त्याला दोनशे लोक अजून भरती करण्याची परवानगी देण्यात आली. तोतयाने जुलै १७७६ मध्ये सुवर्णदुर्गवर स्वारी करुन हरिपंत फडक्यांचा पुतण्या, ज्याच्या ताब्यात सुवर्णदुर्ग होता मोरो बापुजीस व सुवर्णदुर्ग तालुक्याचा मामलेदार बचाजीपंत बर्वे अशा दोघा अंमलदारांना कैदेत टाकून सुवर्णदुर्ग किल्ला जिंकला.[३६२] तोतयाने मिरजच्या सरदारांच्या कोकणात राहणाऱ्या कानकुनांची घरे लुटली.[३६३] तोतयाच्या सैन्याच्या एका तुकडीने देवरुख जिंकून मलकापुरात आपले ठाणे

बसवले. तोतयाने संपूर्ण उत्तर कोकण जिंकला.[३६४] उत्तर कोकणमधील माणकर, सुर्वे हे पेशव्यांचे सरदार तोतयास जाऊन मिळाले.[३६५] हरि भास्कर पटवर्धन, इचलकरंजीचे व्यंकटराव घोरपडे व इतर अनेक सरदार तोतयास येऊन मिळाले. मुंबईचे इंग्रज, कोल्हापूरकर व हैदरअली अप्रत्यक्षपणे तोतयास प्रोत्साहन देत होते.[३६६] तोतयाने वीस हजार सैन्यासह राजमाची घेतली. त्याने सिंहगड मध्ये फितुरी केली. कारभाऱ्यांनी (नाना फडणीस) सवाई माधवरावाच्या नावाने महादजी शिंदे व भिवराव पानसे यांना तोतयाच्या बंदोबस्ताचा आदेश दिला. होळकरांना सैन्याची मदत देण्याची आज्ञा करण्यात आली. महादजी शिंदयांनी सिंहगडाखाली असणाऱ्या तोतयाच्या लष्करी चौकीवर आक्रमण केले. तेथील अनेक गारद्यांना ठार मारले. अनेकांना हुसकावून लावले. होळकरांना सिंहगडच्या किल्लेदाराचा बंदोबस्त करण्यास सांगून महादजी शिंदे स्वत: बोरघाटाकडे आले. शिंदे येण्यापूर्वीच भिवराव पानस्यांनी तोतयास त्रस्त केले होते. महादजी शिंदयांनी राजमाचीच्या पायथ्याशी तोतयाच्या छावणीवर आक्रमण केले. तोतयाचे शेकडो लोक या आक्रमणात बळी पडले. उरलेले सैरावैरा पळत सुटले. तोतया दोन, तीनशे सैन्यासह कोकणात पळून गेला. महादजी शिंदयांनी आपला दिवाण बाळाराम गोविंद यास त्याच्या पाठलागावर पाठविले.[३६७] तोतया बेलापुरातून मुंबईस इंग्रजांच्या आश्रयास गेला. तोतयाच्या रत्नागिरीपासून राजमाचीपर्यंतच्या आक्रमणाचे उल्लेख मुंबईच्या इंग्रजांच्या कागदपत्रात आढळतात. पत्रामध्ये ते तोतयाचा उल्लेख भाऊ व भाऊसाहेब असाच करतात.[३६८] राघोजी आंग्रेना तोतया इंग्रजांकडे जात आहे याची पूर्वकल्पना होती. राघोजी आंग्रे यांनी तोतयाचे गलबत पकडले. तोतया व त्याचे साथीदार राघोजीच्या ताब्यात आले. तोतयासोबत असणाऱ्या व्यंकटराव घोरपडे व हरबा पटवर्धन यांना आंग्र्यांनी सोडून दिले. इंग्रज गव्हर्नर हॉर्न बी याने राघुजीकडे माणसे पाठवून तोतयास इंग्रजांच्या ताब्यात देण्यास सांगितले व नाही दिले तर हल्ला करण्याची धमकी दिली.[३६९] राघुजी आंग्र्यांनी इंग्रजांना नकार दिला.[३७०] राघुजी आंग्रे तोतयास घेऊन नोव्हेंबर १७७६ मध्ये तोतयास घेऊन पुण्यात आले.[३७१] तोतयाची चौकशी झाली. तोतया खोटा आहे हे सिद्ध झाल्यावर त्याची धिंड काढून देहांताचे शासन १८ डिसेंबर १७७६ रोजी करण्यात आले. तोतयास सामील झालेल्या लोकांचे सरंजाम जप्त करण्यात आले. तोतयाचे बंड मोडल्यावर पेशव्यांच्या सैन्याने कोकणात जाऊन पुर्ववत आपले वर्चस्व निर्माण

केले.[३७२] तोतयास कैद केल्यामुळे पेशव्यांनी बाळाजी गोविंद यांना सैन्यासह रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा ताबा परत पेशव्यांकडे घेण्यासाठी पाठविले. या किल्ल्यावर तोतयाने नेमलेल्या किल्लेदारांना किल्ले पेशव्यांच्या ताब्यात द्यावेत, तुम्हाला कोणताच त्रास होणार नाही असे कळविण्यात आले. अशी सनद सुवर्णदुर्ग तालुक्यातील किल्ला सुवर्णदुर्ग, रसाळगड, पाणगड, मंडणगड, सुमारगड तर अंजनवेल तालुक्यातील किल्ला अंजनवेल, विजयगड, गोविंदगड (गोवळकोट), बहिरवगड तसेच रत्नागिरी तालुक्यातील जंजिरा, रत्नागिरी किल्ले जयगड, महिपतगड, पूर्णगड येथील किल्लेदार, कारकून व सरदार यांना कळविण्यात आले.[३७३] बाळाजी जनार्दन फडणीस यांना १७७६-७७ मध्ये तोतयाच्या बंदोबस्तासाठी कोकणामध्ये पेशवे दरबारातून पाठविले. त्यांना दोनशे माणसे लष्करात भरती करुन अंताजी रघुनाथ यांच्याबरोबर त्या लोकांची हजेरी पाठविण्यास सांगितले.[३७४] रामराव नारायण किल्लेदार राजमाची यांना पेशवे दरबारातून आधी दिलेल्या आदेशाप्रमाणे कोळ्याच्या दंग्याकरता जादाचे भरती केलेले सैन्य बरखास्त करण्याचा आदेश रद्द समजावा. तोतयाच्या बंडाचा प्रसार कोकणात झाला आहे. तो राजमाची वर आक्रमणाची शक्यता लक्षात घेऊन ते अतिरिक्त भरती केलेले सैन्य कायम ठेवावे असा आदेश देण्यात आला.[३७५] वजारत महासरखेल राघोजी आंग्रे यांच्याकडील सैन्य भिवराव यशवंत पानसे यांच्या मदतीस तोतयाच्या बंदोबस्तासाठी देण्यात आली. त्यांचे ३१०० रु. वेतन देण्यासाठी सरकारकडून भिवराव यशवंत यांच्याकडे पाठविण्यात आले.[३७६] तोतयाबरोबर सापडलेले लक्ष्मण कृष्णा कोल्हटकर यांना कुलाब्याच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्याचा आदेश राघोजी आंग्रे यांना देण्यात आला.[३७७] तोतयाला फितुर झालेल्या लोकांनी शिवाजी व गोपाळ बल्लाळ केतकर यांची गुरेढोरे, चीजवस्तू लुटल्या होत्या. त्या फितुरांची घरे जप्त करून त्यातून पैसा वसूल करुन केतकर बंधूना त्यांची नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले.[३७८] तोतयाच्या बंडाचा बंदोबस्त करत असताना सरकारी सैन्याकडून बिरवाडी तालुक्यात नासधूस झाली. तेथील कमाविसदार व दरकदारांना प्रामाणिकपणे लोकांना नुकसान भरपाई देण्यास कळविण्यात आले.[३७९] नारो महादेव रिसबूड तोतयाला फितुर होता म्हणून त्यांना चाकण येथील किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले. रिसबूड वृद्ध असल्याने त्याला सोडावे अशी रदबदली धोंडो नारायण यांनी केल्यामुळे त्याला बेड्या काढून रामचंद्र बल्लाळ याच्या ताब्यात देण्याचा आदेश

चाकणचे किल्लेदार नारायणराव कृष्ण यांना देण्यात आला.[३८०] रोजकिर्दीतील नोंदीवरुन कोकणातील अनेक कामगार, दरकदार, जमीनदार व घाट प्रदेशातील अनेक लोक तोतयास फितूर झालेले आढळले.[३८१] तोतयाच्या बंदोबस्तासाठी गेलेल्या सैन्यामुळे कोकण प्रदेशात नासधूस झाली. जनता दहशतीने पळून गेली. त्यांना त्यांची योग्य नुकसान भरपाई व करामध्ये सवलत देऊन पुन्हा बसविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तोतयाच्या भाऊबंदकीतील सखाराम केशव याने देवगड तालुक्यात हल्ला व लुटालुट केली. बाळाजी गणेश यांनी त्याचा बंदोबस्त करुन कैद केले. या सखाराम केशव यास रत्नागिरीस कैदेत ठेवण्यात आले. अंजनवेल व सुवर्णदुर्ग तालुक्यात तोतयास फितुर झालेल्या लोकांची चौकशी करण्याचे अधिकार सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापुजी यांना देण्यात आले.[३८२] अवचितगड, प्रांत राजपुरी येथील तोतयास फितुर झालेल्या प्रत्येकास १५ रु. दंड ठोठावण्यात आला. तोतयाच्या बंडाचा फायदा घेऊन सिद्दीने पण राजापूरी प्रांतातील मराठी प्रदेशात धुमाकुळ घातला होता. ऑक्टोबर १७७७ मध्ये शंकरराव मोरे तोतयास फितूर झाला होता. तो बाणकोटला होता. बाणकोटवरुन तो मुंबईला गेला. मुंबईवरुन शंभर माणसे घेऊन तो परत जंजिऱ्यास परतला.[३८३] रामचंद्र नाईक यांना रुजवातीसाठी पुण्यात आणून कैद करण्यात आले. रामचंद्र नाईक यांच्या पत्नीस अन्नपुर्णाबाईस कैद करुन रत्नागिरीपासून पुण्यापर्यंत चालवत आणले. सवाई माधवरावांची पत्नी गंगाबाईने रदबदली करुन रामचंद्र नाईकास मुक्त करुन कामावर घेतले. इचलकरंजीचे व्यंकटराव घोरपडे व त्यांची आई अनुताई घोरपडे तोतयाला सामील असल्याने त्यांच्याकडून दंड म्हणून दोन लाख रुपये वसुल करण्यात आले. अशाप्रकारे तोतयाच्या बंडाचा शेवट डिसेंबर १७७६ मध्ये झाला. जयराम कृष्ण, बाजी गोविंद यांनी तोतयाच्या बंडावेळी पोलादपूर, रायगड येथे चांगले काम केल्याबद्दल त्यांना दुसरे बाजीराव पेशव्यांच्या काळात मशाल, अब्दागिरीचा मान देण्यात आला. अशाप्रकारे तोतयाच्या बंडात चांगले काम करणाऱ्यांचे वेतन वाढवून, अब्दागिऱ्या, मशाल, दिवटीचा खर्च देऊन योग्य सन्मान करण्यात आला. तोतयाचा बंदोबस्त केल्यानंतर बाळाजी गोविंद यांना सैन्यासहीत तोतयाने घेतलेले सुवर्णदुर्ग ताल्लुयातील सुवर्णदुर्ग, मंडणगड, रसाळगड, पाणगड, सुमारगड घेण्यासाठी पाठविण्यात आले.[३८४] याशिवाय अंजनवेल तालुक्यातील अंजनवेल, विजयगड, गोविंदगड (गोवळकोट), बहिरवगड व रत्नागिरी

तालुक्यातील रत्नागिरी, जयगड, महिपतगड व पूर्णगड हे किल्लेसुद्धा बाळाजी गोविंद यांना ताब्यात घेण्याची आज्ञा केली.[३८५] उपरोक्त सर्व किल्ल्यांवरील तोतयाने नेमलेल्या किल्लेदार, कारकून व इतर सरदारांना पेशव्यांच्या वतीने कळविण्यात आले की, त्यांनी आपापले किल्ले बाळाजी गोविंद यांच्या ताब्यात देण्यात यावे. तोतयास सामील असणाऱ्या या अधिकाऱ्यांना कोणताच त्रास होणार नाही, असे आश्वास पेशवे सवाई माधवरांच्या वतीने देण्यात आले.

**इ) मोरोबादादांचे कारस्थान (इ.स. १७७८)**

बारभाई कारस्थान यशस्वी होऊन दि. २८ मे १७७४ रोजी बालपेशवा सवाई माधवरावांच्या नावाने नाना फडणवीस व सखाराम बापू यांनी मराठ्यांचा कारभार हाती घेतला. सदाशिवभाऊच्या तोतयाच्या बंडापाठोपाठ १७७८ मध्ये मोरोबादादाच्या कारस्थानच्या रुपाने एक नवेच संकट पेशवाईवर आले.

मोरोबा फडणीस हा नानांचा चुलतभाऊ नानाकडे सर्व कारभार व अखत्यारी असल्यामुळे तो नानाचा द्वेष करत असे. नाना व बापूंनी मोरोबाला कारभारात घेऊन खूष करण्याचा प्रयत्न केला. राघोबादादांना दीड हजार स्वारांचा सरंजाम (साडेचार लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख) देऊन नानांकडे मुलकी, मोरोबाकडे लष्करी कारभार द्यावा. सखाराम बापूंनी त्यावर देखरेख ठेवावी, असा सर्वसमावेशक तडजोडीचा प्रस्ताव तयार करण्यात आला.[३८६] नानाची महादजी शिंद्यांशी जवळीक निर्माण झाल्यापासून बापू अस्वस्थ झाले होते. त्यात काही लोकांनी बापूंचे कान भरले की, ''नाना व मोरोबा हे भाऊ भाऊ एकत्र आले तर तुमचा नाश करतील!'' आता बापूने ही तडजोड अस्तित्त्वात येऊ नये, म्हणून प्रयत्न सुरु केले. त्याने मोरोबास भडकवले. मोरोबाने नानाकडे अवास्तव मागण्या पुढे केल्या. त्यामुळे ही तडजोड फिसकटली. नाना शिंद्यानाच अधिक जवळ करत असल्यामुळे तुकोजी होळकर नाराज होते. पडद्यामागे राहून बापूने मोरोबादादाचे कारस्थान उभे केले. यामध्ये होळकर, बजाबा पुरंदरे, चिंतो विठ्ठल, गोपाल नाईक, तांबवेकर यांना सामील करुन घेतले.[३८७] इंग्रज वकील मॉस्टिन व रघुनाथदादांनी या कारस्थानास पाठींबा दिला. याचवेळी रघुनाथदादा यांनी पेशवेपद मिळवून देण्यासाठी इंग्रज वकील मॉस्टिन याच्याकडून मुंबई सरकारला छत्तीस लाख रुपये दिले.

या कारस्थानामध्ये प्रत्येकाचे हितसंबंध वेगवेगळे होते. सखारामबापूस नानाच्या हातून अखत्यारीचा कारभार काढून घेऊन आपली ज्येष्ठता कायम राखायची होती. नानाने शिंद्यांना

जवळ केल्यामुळे ते कारभारात नसावेत, रघुनाथदादा पेशवे व्हावेत असे तुकोजी होळकरांना वाटत होते. रघुनाथदादा पेशवे झाल्यावर चिंतो विठ्ठलास गेलेली दिवाणी, बजाबा पुरंदरे यांना सातारचा किल्ला व छत्रपतींच्या संस्थांनाच्या बंदोबस्ताचे काम व गोपाळ नाईक तांबवेकर यांना पेशवे सरकारची पोतदारी परत मिळणार होती. या तिघांकडे पूर्वी असलेली ही कामे नानाने काढून घेतली होती. इंग्रजांना शह देण्यासाठी नानाने मराठा दरबारात फ्रेंच वकील ल्युबिन याचे महत्त्व वाढवले होते. इंग्रज वकील मॉस्टिन याला मराठा दरबारातून फ्रेंचांचे उच्चाटन व्हावे. रघुनाथदादास पेशवे करुन मराठ्यांच्या राज्यकारभारावर नियंत्रण ठेवावे व याबदल्यात इंग्रज सरकारसाठी भरपूर संपत्ती मिळवावी व इंग्रजांचा पक्का वैरी नाना कारभारातून दूर व्हावा, हा हेतू होता.

मोरोबाने बहुलला राहून पुन्हा आपल्या कारवाया सुरु केल्याने नानाने सैन्य पाठवून त्यास कैद केले. आधी गुलटेकडी व नंतर नगरच्या किल्ल्यात मोरोबास कैदेत ठेवले. मोरोबाचा बंदोबस्त झाल्यावर शिंद्यांनी होळकरांवर आपली (निखालसता) प्रामाणिकता सिद्ध करण्यासाठी त्यांच्या आश्रयास असणाऱ्या या कारस्थानातील सरदारांना ताब्यात देण्यासाठी लष्करी दबाव आणला, होळकरांनी आपला दिवाण नारो गणेश, गोपाळ नाईक तांबवेकर, अपाजीपंत गोंधळेकर, कचोबा पाळंदे, बाळाजीपंत दामले, दादोपंत वाघोलकर, बाबाजी जामदार निंबाळकर यांना शिंद्यांच्या स्वाधीन केले.[३८८] बजाबा पुरंदरे हे पण कैद झाले. बजाबा पुरंदरे, नारो गणेश, गोपाळ नाईक तांबवेकर यांची डोंगरी किल्ल्यावर रवानगी झाली.[३८९]

चिंतो विठ्ठल याने सखाराम बापूंच्या या कारस्थानातील सहभाग दर्शविणाऱ्या दोन चिठ्ठ्या शिंद्यांना दिल्या.[३९०] नाना व शिंदे यांनी परस्पर चर्चा करुन बापूस कैद करुन सिंहगडावर ठेवले. गोपाळ नाईक तांबवेकर यांच्या मालखेडच्या मालमत्तेची व घराची जप्ती करण्यात आली.[३९१] नानांनी गोपाळ नाईक तांबवेकर यास रायगडच्या किल्ल्यावर तर बजाबा पुरंदरे यास चंदनच्या किल्ल्यावर कैदेत ठेवले.[३९२] गोपाळ नाईक तांबवेकर यास रायगडावर कैदेत पाठविण्यापूर्वी दाभोळ सुभ्यातील सुवर्णदुर्ग परगण्यातील मंडणगड येथील किल्ल्यावर काही काळ कैदेत ठेवले होते.[३९३] बजाबा पुरंदरे कैदेतच मरण पावला. गोपाळ नाईकाने मात्र पाच लाख रुपये दंड भरुन सुटका करुन घेतली.[३९४]

पेशव्यांच्या हातात सर्व सत्ता होती. ते पेशव्यांचे प्रधान म्हणून सत्ता वापरत. ज्याच्या हातात छ. तोच राज्याचा मालक या न्यायाने छ. हे सातारला पेशवे व त्यांच्या कारभाऱ्यांच्या नजरकैदेतच असत. इ.स. १७७७ मध्ये छ. रामराजे यांची तब्बेत बिघडत चालली. रामराजे यांना तीन मुली होत्या. मुलगा नव्हता. सखारामबापू व नाना यांनी भोसल्यांच्या घराण्यातील मुलगा रामराजांना दत्तक देऊन त्यास छ. करावा असे ठरविले. रामराजे यांनी बाबी येथील त्र्यंबकजी भोसले यांचा मोठा मुलगा १५ सप्टेंबर १७७७ रोजी दत्तक घेतला. त्याचे नवे नाव धाकटे शाहुराजे असे ठेवण्यात आले. ९ डिसेंबर १७७७ रोजी रामराजे मृत्यू पावले. चांगला मुहूर्त नसल्यामुळे ११ डिसेंबर १७७८ रोजी धाकट्या शाहूंचा राज्याभिषेक करण्यात आला.

राघोबादादांना पेशवेपदावर बसविण्यासाठी १७७९ मध्ये इंग्रज मराठ्यांच्या प्रदेशावर ठिकाणी आक्रमणे करत अशाच एका आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी १७७९ मध्ये कागोरीचे किल्लेदार वासुदेव बाबा बाणकोट येथे इंग्रजांच्या ठाण्यावर गेले.[३९५] इ.स. १७७९–८० मध्ये सर्वोत्तम शंकर यांना विजयदुर्गमध्ये चार इंग्रज लोक सापडले. त्यांना सुवर्णदुर्ग तालुक्यातील पालगड किंवा रसाळगड येथे पाठवत असल्याचे सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापुजी यांना कळविण्यात आले.[३९६]

मुंबई येथील हकीम, वैद्यांनी आजारी इंग्रज लोकांना बाणकोटचे गरम पाणी लाभदायी असल्याचे सांगितले. या आजारी माणसांना बाणकोटला जाणे आवश्यक असल्याने त्यांना बाणकोटला जाण्याची परवानगी कंपनीने दिली. ८ ऑगस्ट १७८४ च्या पत्राने ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने आर. एच. बॉडम् याने सवाई माधवराव पेशव्यांना महाडच्या सुभेदारास या लोकांना जरी ते बाणकोट जवळ राहिले, घर बांधले तरी अजिबात त्रास देऊ नये अशी ताकीद करण्यास कळविले.

### ई) जंजिऱ्याचे कारस्थान

जंजिऱ्याचा सिद्दी हा मराठ्यांचा मोठा शत्रू होता. म्हणून त्यास घरात जैसा उंदिर म्हटले आहे. रायगड जिल्ह्यातील दंडराजपूरीच्या खाडीच्या मुखाशी लष्करी व भौगोलिकदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणी सिद्दीचा जंजिरा किल्ला होता. आरमाराच्या दृष्टिने या किल्ल्यांचे स्थान खूप

महत्वाचे होते. छ.शिवाजी महाराजांच्या काळापासूनच हा किल्ला घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. प्रत्यक्ष युद्धामध्ये हा किल्ला जिंकण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले. किल्ल्याची दुर्गमता व इंग्रज, पोर्तुगीज या परकीयांची मदत, मराठे सरदारांमधील दुही यामुळे हा किल्ला जिंकणे मराठ्यांना शक्य झाले नाही. शिवकाळापासून हा किल्ला भेदनितीने घेण्याचे प्रयत्न मराठ्यांतर्फे करण्यात आले. असाच एक प्रयत्न पेशवे सवाई माधवरावांच्या काळात भेदनितीने, फितुरी करुन हा किल्ला घेण्याचे प्रयत्न करण्यात आले. नाना फडणीस हाच मुख्य कारभारी असल्यामुळे त्याच्या अधिकाऱ्यांनी इ.स. १७८४ मध्ये हे कारस्थान रचले. पण ते यशस्वी झाले नाही. हे कारस्थान रचले तेव्हा सिद्दी अब्दूल रहीमखान हा जंजिऱ्याचा प्रमुख होता. सिद्दी याकूतखान याच्यानंतर १७७२ ते १७८४ पर्यंत या सिद्दी रहीमखानाची कारकीर्द होती. त्याच्या काळात जंजिऱ्याची सत्ता दुर्बळ झाली होती. पहिला बाजीराव पेशवे व चिमाजी आप्पा यांनी इ.स. १७३३ मध्ये सिद्दीच्या राज्यावर चांगलाच आघात केला होता. सिद्दीसात व इतर प्रबळ सिद्दी सरदार यावेळी मराठ्यांकडून मारले गेले होते. यावेळी सिद्दीशी केलेल्या तहामध्ये जंजिऱ्याला लागून असलेले नांदगाव, मुरुड, श्रीवर्धन, दिवा, म्हसळे व गोवळ महालाचा अर्धा भाग असे साडेपाच महाल सिद्दीला दिले होते. इ.स. १७८४ मध्ये सिद्दी अब्दुल रहीमखान उर्फ खानजाद्याच्या ताब्यात हे महाल होते. याशिवाय सिद्दीकडे जंजिरा किल्ला, बेट, जंजिऱ्याच्या वायव्येस दोन मैलावर असणारा कांसा/पद्मदुर्ग हा किल्ला, उंदेरी बेट, दंडराजपूरी बंदर, मदगिरी/मदगड हा किल्ला व किनाऱ्यापासून समुद्रात असलेले छोटे छोटे प्रदेश सिद्दीच्या ताब्यात होते.

सिद्दी खानजादा हा दंडराजपुरीस रहात असे. जंजिरा किल्ल्याचा किल्लेदार सिद्दी जोहर होता. हा सिद्दी जोहर सिद्दी खानजाद्याचा जावई होता. तो जंजिरा किल्ल्यात रहात असे. सिद्दी जोहरपूर्वी सिद्दी जमरुद हा जंजिऱ्याचा बारा वर्षे किल्लेदार होता.[३१७] या सिद्दी जमरुदला बदलून मदगडची किल्लेदारी सिद्दी खानजाद्याने दिली. इ.स. १७६२ मध्ये सिद्दी इब्राहिमचा खून करुन त्याचा गुलाम सिद्दी याकूतखान हा सिद्दीच्या राज्यावर आला होता. यावेळी सिद्दी इब्राहिमचा मुलगा अब्दुल रहीमखान पुण्यास आश्रयास गेला होता. पेशवे माधवरावांनी अब्दुल रहीमखानाची बाजू उचलून धरली. इंग्रजांनी याकूत व खानजादा यांच्यामध्ये मध्यस्थी केली. या मध्यस्थीत ठरल्याप्रमाणे खानजादा हा दंडराजपुरीचा मुख्य व याकूतखानाच्या मृत्यूनंतर इ.स. १७७२ मध्ये

संपूर्ण जंजिरा राज्याचा प्रमुख झाला. इ.स. १७६६ च्या मराठे सिद्दी तहाप्रमाणे सिद्दीच्या अकरा महालांपैकी तळे, घोसाळे, बीरवाडी, निजामपूर, गोरेगाव व गोवळ महालाचा अर्धा भाग हे साडेपाच महाल मराठ्यांच्या ताब्यात राहिले.[३९८] सिद्दीकडे उरलेले नांदगाव, मुरुड, श्रीवर्धन, दिवा, म्हसळे, गोवळ महालाचा अर्धा भाग ठेवण्यात आला.[३९९] एकूण इ.स. १७३३ चा सिद्दी – मराठे तहच यावेळी कायम करण्यात आला. या अकरा महालातील वसूल सिद्दी व मराठे दोघांनी वाटून घ्यासचा होता. या वसूलीसाठी दोघांनी एकमेकांचे कारकून व मुलकी अधिकारी परस्परांच्या महालात ठेवावयाचे ठरले होते. सुरुवातीला व्यवस्थित चाललेली व्यवस्था नंतर बिघडली. सिद्दी खानजाद्याने मराठ्यांचे अधिकारी त्यांच्या ताब्यातील महालांबरोबर सिद्दीच्या नियंत्रणाखालील महालांचा वसुल बळजबरीने वसूल करतात अशी तक्रार करण्यास सुरुवात केली. यामुळे  मराठ्यांकडे ऐंशी हजार रुपये येणे आहे असा खानजाद्याने दावा केला.

सिद्दीच्या महालात मराठ्यांचे वसुली अधिकारी राहू लागल्याने सिद्दीला मराठ्यांच्या प्रदेशावर उघडपणे हल्ला करणे शक्य होत नव्हते. याउलट त्याच्या प्रदेशाला चोहोबाजूंनी मराठ्यांचा प्रदेश असल्याने त्याची कोंडी झाली. आता त्याने रात्रीच्या वेळी, लहान सैन्य तुकड्यांच्या मार्फत मराठ्यांच्या प्रदेशात लुटालूट, जाळपोळ, खंडणी वसूली करण्यास सुरुवात केली. त्यातच सिद्दीने १७६० मध्ये पेशव्यांच्या घराण्याचा श्रीवर्धनचा देशमुखीचा हक्क रद्द केला होता. तो खानजादा पुन्हा सुरु करुन देत नव्हता. इंग्रज सिद्दीला पाठिंबा देत असल्यामुळे जंजिरा जिंकणे अशक्य होते. शेवटी फितुरी व लाच यांच्या माध्यमातून जंजिरा जिंकण्याचे प्रयत्न नाना फडणीसाने सुरु केले. मार्च १७८४ पासून या कारस्थानाची सुरुवात झाली. सिद्दीच्या प्रदेशातील मराठा वसुली अधिकारी गोविंदराव माणकर (तळे महालाचा मुलकी अधिकारी), भिकाजी गोविंद ठोसर (रेवदंडा सुभ्याचा सुभेदार) अंताजी केशव बेहरे व गोपाळ महादेव काकिर्डे (सुवर्णदुर्ग तालुक्यातील मुलकी अधिकारी), शंकरराव मोरे (मंडणगडचा एक अधिकारी), जिवाजी गोपाळ (पूर्ण कोकण सुभ्याचा सरसुभेदार) हे होते. हे अधिकारी सिद्दीच्या साडेपाच महालातील वसूलीच्या निमित्ताने सिद्दीच्या प्रदेशात जात. त्यांचा सिद्दी खानजादा, जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर व मदगडचा किल्लेदार सिद्दी जमरुद यांच्याशी व सिद्दीच्या इतर अधिकाऱ्यांशी जवळचा संबंध येत असे. सिद्दीच्या सरदारांमध्ये, अधिकाऱ्यांमध्ये

आपापसात भांडणे लागली की ते या मराठा अधिकाऱ्यांना मदत करत. मराठ्यांच्या या मुलकी अधिकाऱ्यांच्या सिद्दीच्या प्रदेशामध्ये खुप ओळखी झाल्या होत्या. या ओळखीचा फायदा घेऊन जंजिरा, पद्मदुर्ग, व मदगड येथे फितुरी करुन हे किल्ले मराठ्यांनी घ्यावेत अशी योजना या मराठा मुलकी अधिकाऱ्यांनी आखली. पण माणकर, ठोसर, बेहरे, काकिर्डे, मोरे या सर्व अधिकाऱ्यांनी ही योजना एकत्रपणे ठरवली नाही. माणकर व ठोसर यांनी आपली योजना आखली तर बेहरे, काकिर्डे, मोरे यांच्या गटाने आपली वेगळीच योजना आखली. दोन्ही गटांना परस्परांच्या योजनांची माहिती नव्हती.

पद्मदुर्गचा किल्लेदार व सिद्दी खानजादा यांचे संबंध संघर्षाचे होते. पद्मदुर्गच्या या किल्लेदाराने आपला सरनोबत शेख महमद याच्याकडून गोविंद माणकरास निरोप दिला की, तो पद्मदुर्ग मराठ्यांच्या ताब्यात देऊन पेशव्यांच्या सेवेत येण्यास तयार आहे. त्या बदल्यात किल्लेदाराने पाच हजार रुपये व किल्ल्यातील अधिकाऱ्यांसाठी चार पालख्या व चार गावे ईनाम मागितली. तसेच किल्ला ताब्यात घेण्यासाठी दोनशे सैनिंकासह कोरलई गावजवळ बोलविले.[४००] पद्मदुर्गच्या किल्लेदाराचा हा निरोप माणकरांनी भिकाजीपंत ठोसर व नाना फडणीस यांना कळविला. मानकर पुण्याहून कारवाईच्या परवानगीची वाट पहात बसले.

याच दरम्यान बेहरे, काकिर्डे (सुवर्णदुर्ग तालुका), शंकरराव मोरे (मंडणगड) हे तिघे जंजिरा किल्ला जिंकण्याचे कारस्थान स्वतंत्रपणे रचत होते. जंजिऱ्याच्या किल्ल्यामध्ये सिद्दी खानजाद्याच्या विश्वासातील पिलाजीराव संकपाळ हा जमादार होता. शंकरराव मोरे यांनी पिलाजीरावास फितुर केले. त्याच्या मदतीने जंजिऱ्याच्या शिबंदीतील कोळी सैनिकांना फितुर केले.[४०१] या बोलणीतील मध्यस्थ लोक सिद्दी, मोरे–बेहरे–काकिर्डे व जंजिऱ्यातील शिबंदीच्या ओळखीचे होते. ही बोलणी झाल्यानंतर मंडणगडचा अधिकारी शंकरराव मोरे याने एप्रिल १७८४ मध्ये जंजिरा घेण्याची गुप्त योजना आखली. या योजनेप्रमाणे बेहरे, काकिर्डे, मोरे यांनी आपले काही सैन्य महागिऱ्यांमधून (एक प्रकारची बोट) जंजिऱ्याजवळ न्यावे. पिलाजीराव व शिबंदीतील कोळ्यांनी आपल्या ताब्यातील दरवाजातून या मराठ्यांना किल्ल्यामध्ये घ्यावे. मराठ्यांनी किल्ला ताब्यात घ्यावा. या बदल्यात पिलाजीराव व या कोळी शिबंदीला पेशव्याने आपल्या सरकारमध्ये नोकऱ्या देऊन त्यांचा उद्धार करावा. ही योजना नक्की झाल्यावर त्यास मान्यता मिळविण्यासाठी बेहरे व काकिर्डे पुण्याला गेले.[४०२] याच दरम्यान माणकर व ठोसर यांचे पद्मदुर्ग फितुरीने

घेण्याचे कारस्थान फुटले. खानजाद्याचा मोठा मुलगा अब्दुल करीम याला हे कारस्थान कळले. त्याने जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर याला या कारस्थानाची माहिती कळवली. सिद्दी जोहरने फितुर लोकांची चौकशी करुन त्यातील प्रमुख सात लोकांचा शिरच्छेद केला तर तीस लोकांना कैदेत टाकले.[४०३] यानंतर सिद्दी जोहरने जंजिरा किल्ल्यांचा बंदोबस्त अधिकच पक्का केला. खानजादा सावध झाल्याने जंजिऱ्याचे कारस्थान लगेच अंमलात आणणे अशक्य होते. त्यातच पावसाळा तोंडावर आला होता. बेहरे, काकिर्डे पुण्याला गेल्याने इकडे जंजिऱ्याकडील बदलेलेल्या परिस्थितीची त्यांना माहित नव्हती.

या कारस्थानातील मध्यस्थांनी बेहरे व काकिर्डे यांच्या गैरहजेरीत पहिल्या योजनेत बदल केला. त्यांनी सिद्दी खानजादा यास प्रतिनिधीच्या ताब्यातील कांगोरीचा किल्लेदार फितूर झाल्याचे सांगितले. तो किल्ला सिद्दीच्या ताब्यात देण्यास तयार करून त्यासाठी स्वत: सिद्दी खानजादा व सरदार अब्दुल कादिर जमातदार याच्यासह जंजिऱ्यातील सैन्य घेऊन जावे असे खानजाद्यास सांगितले. हे मध्यस्थ परिचयाचे व विश्वासातील असल्याने सिद्दी खानजादा या गोष्टीस तयार झाला. पण जंजिऱ्यातील सैन्य बाहेर नेले तर जंजिऱ्याची सुरक्षितता धोक्यात येईल, असे मत व्यक्त केले. मध्यस्थांनी नवे सैन्य भरती करण्याचा सल्ला दिला. खानजाद्याने नवे सैन्यभरतीचे काम या मध्यस्थांवरच सोपविले. मध्यस्थांनी खानजाद्याचा विश्वास मिळविण्यासाठी मुद्दाम या नव्या शिबंदीवर त्याच्या विश्वासातील अधिकारी नेमण्याचा सल्ला दिला.[४०४] मदगडचा किल्लेदार सिद्दी जमरुद व जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर यांचे आता सिद्दी खानजाद्याशी असणारे संबंध अधिकच बिघडले होते. या दोघांनी एकत्र येऊन सिद्दी खानजादा यास कैद करुन जंजिऱ्याचा कारभार हातात घेण्याचे कारस्थान रचले.[४०५] या कारस्थानाप्रमाणे सिद्दी जमरुदने सात–आठशे सैनिकांना घेऊन जंजिऱ्याजवळ यावयाचे ठरले. सिद्दी जमरुदला नव्या सैनिकांची भरती करावी लागणार होती. जंजिरा किल्ल्यातील फितुरांकडून ही बातमी बेहरे, काकिर्डे, मोरे कारस्थानातील मध्यस्थांना कळली. त्यांनी सिद्दी जमरुद व सिद्दी जोहर यांच्याकडून हे सैनिक भरतीचे काम मिळविले. सिद्दी जमरुदने हे सैन्य पाठविले आहे असे सांगून मराठ्यांचे सैन्य राजरोस जंजिऱ्यामध्ये नेण्याचा मध्यस्थांचा डाव होता. हे सैनिक जंजिरा किल्ल्यात शिरल्यानंतर सिद्दी खानजाद्यास कैद करण्याच्या निमित्ताने

जंजिऱ्यातील काही सैन्य, फितुर नसलेले सैन्य किल्ल्याबाहेर काढावे, हेच जंजिऱ्यातील सैनिकच खानजाद्यासोबत नवी शिबंदी म्हणून द्यायचे असा या मध्यस्थांचा विचार होता. त्यानंतर खानजादा या शिबंदीस घेऊन कांगोरी किल्ल्याकडे जाईल. जंजिऱ्यात शिरलेले सैनिक (पिलाजीराव व कोळी सैन्य) या फितुरांच्या मदतीने जंजिऱ्याचा किल्लेदार सिद्दी जोहर यास कैद करावे व जंजिरा ताब्यात घ्यावा. सिद्दी खावजादा कांगोरीजवळच्या रानात गेला की कांगोरीच्या मंगळगडच्या किल्लेदाराने बोलणी करण्यास लोक पाठविले आहेत या निमित्ताने त्यास त्याच्या सैन्यापासुन वेगळे काढावे. या बोलणीसाठी आलेल्या सिद्दी खानजादा व त्याच्या सोबतच्या लोकांना एकदम हल्ला करुन कैद करावे.[४०६] असे गुंतागुंतीचे कारस्थान या मध्यस्थांनी रचले.

या कारस्थाना संदर्भात बळवंतराव आप्पाजीने नाना फडणीसाला लिहिलेले एक पत्र डेक्कन कॉलेजमधील पारसनीस दफ्तरामध्ये आहे. हे पत्र भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांनी प्रकाशित केलेल्या ऐतिहासिक संकिर्ण साहित्य खंड ७, त्रैमासिक, वर्ष ७ वे, अंक ३–४, जानेवारी–एप्रिल, १९४७ च्या अंकामध्ये लेखांक ३०, पृ. ३० वर प्रकाशित केले आहे. या पत्रातील आशयावरुन फितुरी करुन जंजिरा घेण्याचे कारस्थान उभे राहिलेले दिसते. बळवंतराव आप्पाजी म्हणतात, ‘माधवराव बेलोसे वगैरे मोकाशी भले लोक जंजिऱ्याची मसलत कबुल करुन छतिसी बेरटीत येऊन नवे लोक ठेवितात. २००० पावेतो माणूस जमा केले आहे. दुसरेही ठेवणार आणि भेद केला आहे. पाच सात मुसलमान यास काही बक्षिसे कबुल करुन जंजिरेयास रवाना केले आहे.’ ही माहिती एका खेडुताकडून बळवंत आप्पाजी यांना कळली होती. मदनराव येरुणकर यांचा सैनिक पाठवून आप्पाजींनी या बातमीची खात्री करुन घेतली होती. या दरम्यान बेहरे, काकिर्डे हे अधिकारी नाना फडणीसाची संमती मिळवून ३० एप्रिल १७८४ रोजी पुण्यावरुन पालगडच्या पायथ्याशी पालील गावामध्ये पोहोचले.[४०७] येथेच ३ मे १७८४ रोजी मध्यस्थांनी बेहरे, काकिर्डे यांना भेटून नवी योजना सांगितली. या अधिकाऱ्यांनी मध्यस्थांचे कबिले या कारस्थानाची हमी म्हणून सुवर्णदुर्गला ठेवले आणि मध्यस्थांशी नवा करार केला. नाना फडणीसाला पत्र पाठवून या नव्या योजनेस त्याची मंजूरी घेतली.[४०८] बेहरे, काकिर्डे यांनी चिमणाजी रायाजी या व्यक्तीबरोबर नव्या योजनेची माहिती मंडणगडवर शंकरराव

मोरे यांना कळविली.[४०९] शंकरराव मोऱ्यांनी जंजिरा व राजकोट मधील फितुर लोकांकडे आपला माणुस पाठवून कारवाईचा दिवस निश्चित केला. जून अखेरीस शंकरराव मोरे हा आपल्या हजार–बाराशे सैनिकांसहित जंजिरा व कांगोरीच्या योजना अंमलात आणणार होता. बेहरे व काकिर्डे पालील येथे हे सर्व कारस्थान यशस्वी होण्याची वाट पहात थांबले. याच सुमारास एक अनपेक्षित घटना घडली व हे कारस्थान यशस्वी होऊ शकले नाही.[४१०]

सिद्दी खानजादा यास सिद्दी जमरुद व सिद्दी जोहरच्या संयुक्त कारस्थानाची बातमी कळली. त्याने प्रथम मदगडच्या सिद्दी जमरुदचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. त्याने मराठ्यांशी संबंध बिघडले असल्यामुळे ते मदगडवर आक्रमण करणार आहेत असे सिद्दी जमरुदला कळविले. किल्ल्याच्या बंदोबस्तासाठी शंभर सैनिक, चार तोफा, दारुगोळा व एक कारकून पाठविले. सिद्दी जमरुदने ते साहित्य किल्ल्यामध्ये घेतले. सिद्दी खानजाद्याने पाठविलेल्या सैनिकांना किल्ल्याबाहेरच ठेवले. वास्तविक या सैन्याकडून सिद्दी जमरुदला कैद करण्याचा खानजाद्याचा उद्देश होता. खानजाद्याने गुप्तपणे आपल्या एका हेराबरोबर कारकुनाला सिद्दी जमरुदला ताबडतोब कैद करण्याविषयी पत्र पाठवले. हा हेर पोहोचण्यापूर्वीच जंजिऱ्याच्या सिद्दी जोहरकडून या पत्राची माहिती सिद्दी जमरुदला कळली. सिद्दी जमरुदने तो हेर मदगडावर पोहोचताच त्याला कैद केले.[४११] सिद्दी जमरुदने गोविंद माणकरांकडे तळ्याला लष्करी मदत मागितली. इकडे शंकरराव मोऱ्याने आपल्या कारस्थानाप्रमाणे मदगडातील सैनिकांना सिद्दी जमरुद विरोधात फितुर केले होते. माणकर हे बेहरे–काकिर्डे–मोरे यांच्या कारस्थानाविषयी अनभिज्ञ होते.[४१२] माणकर व सिद्दी जमरुद यांच्यामध्ये ठरले की, माणकराने आपले दोनशे सैनिक मदगडावर पाठवावे. स्वत: माणकर काही सैन्यानिशी मदगड किल्ल्याच्या आसपास थांबणार होता. मदगडात गेलेल्या माणकरच्या सैन्याने खानजाद्यांच्या लोकांस हाकलून द्यावे. सिद्दी जमरुदने माणकरच्या लोकांना किल्ल्यामध्ये घ्यावे व हे माणकरला कळण्यासाठी किल्ल्यावर तोफांचे तीन आवाज काढावेत. सिद्दी जमरुदने मदगड माणकरच्या ताब्यात द्यावा. या बदल्यात माणकरने सिद्दी जमरुदला खानजाद्यास अटक करण्यासाठी मदत करावी.[४१३] असे मानकर व सिद्दी जमरुद यांच्यामध्ये ठरले. बेहरे, काकिर्डे, मोरे यांना माणकराची ही योजना माहित नव्हती. याप्रमाणे माणकराने दोनशे सैनिक २६ जून १७८४ रोजी मदगडावर पाठविले.

माणकर स्वत: मदगडापासून चार, पाच मैलावर असणाऱ्या गायमुख गावी दोनशे सैनिकांसहित मदगडचा ताबा घेण्यासाठी थांबला. माणकराच्या सैन्याने किल्ल्याबाहेर असलेल्या खानजाद्याच्या सैन्यास पिटाळले. माणकर याच्याशी ठरलेल्या कराराप्रमाणे सिद्दी जमरुद माणकरच्या सैन्यास किल्ल्यात घेऊ लागला. पण मदगडवरील सैन्याने माणकरच्या सैनिकांना किल्ल्यात येऊ दिले नाही. कारण किल्ल्यातील सिद्दी जमरुदच्या सैनिकांचा शंकरराव मोऱ्यांशी करार ठरला होता माणकरशी नव्हे. सिद्दी जमरुदने आपल्या सैनिकांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला पण त्यांनी ऐकले नाही. शेवटी माणकरचे सैन्य किल्ल्याच्या दरवाजा बाहेरच उभे राहिले. किल्लेदाराने माणकरचे सैन्य किल्ल्यात आले नसतानासुद्धा तोफांचे तीन आवाज काढले. माणकरला वाटले काम फत्ते झाले. तो मदगडावरुन निरोप येण्याची वाट पहात गायमुख येथेच थांबला. निरोप न आल्याने माणकर दोन दिवसांनी परत तळ्याला निघून गेला.

खानजाद्यास मदगडवरच्या मराठा सैनिकांच्या हल्ल्याची बातमी त्याच्या हाकललेल्या सैनिकांकडून कळली. त्याने आपला मोठा मुलगा अब्दुला करीम उर्फ बाळुमिया यास पाचशे सैनिकांसहित जलमार्गे मदगडच्या संरक्षणासाठी पाठविले.[४१४] शंकरराव मोऱ्यांचे कारस्थान अयशस्वी झाले. मदगडावरील सिद्दी जमरुदच्या फितुर सैनिकांनी शंकरराव मोऱ्यांना कळविले होते की, आमचे सुत्र तुमच्याशी होते. म्हणून आम्ही माणकरचे लोक किल्ल्यावर घेतले नाहीत. तुम्ही लवकरात लवकर सैन्यासह मदगडावर या, आम्ही किल्लेदाराचे मन वळवून किल्ला तुमच्या ताब्यात देतो.[४१५] जंजिरा किल्ल्यातील जमादार पिलाजीराव संकपाळाने याने सुद्धा शंकरराव मोऱ्यांना १ ऑगस्ट १७८४ पूर्वी जंजिऱ्याजवळ सैन्यानिशी येण्यास सांगितले. मोरे आले की संकपाळ जंजिरा मोऱ्यांच्या ताब्यात देणार होते. मोऱ्यांनी दीड हजार सैनिकांसहित मदगड जाऊन घ्यावा व चार हजार सैन्य घेऊन जंजिरा ताब्यात घ्यावा असे मोरे, बेहरे, काकिर्डे यांनी ठरविले. ही योजना प्रत्यक्षात आल्याचा कोणताही पुरावा मिळत नाही. खानजादा सावध झाला. त्याने जंजिऱ्याचा बंदोबस्त पक्का केला. त्याचबरोबर मुंबईच्या इंग्रजांना मराठ्यांच्या आगळिकीबद्दल कळवले. इंग्रजांनी पुण्याला पेशवे सवाई माधवराव यांना मदगड सिद्दी खानजाद्याच्या ताब्यात देण्याविषयी कळविले. इंग्रजांच्या दबावामुळे मोरे, बेहरे, काकिर्डे यांना आपली योजना गुंडाळून ठेवावी लागली. माणकरचे सैनिक दोन तीन वर्षे मदगडच्या

किल्ल्याबाहेरच होते. मोरे यांनी मदगडातील शिबंदीला माणकरचे सैन्य आत घेण्यास कळविले असते किंवा नाना फडणीसाने या सर्व अधिकाऱ्यांना परस्पर समन्वयाने हे कार्य करण्यास सांगितले असते, तर हे कारस्थान यशस्वी झाले असते.

खुप प्रयत्न करुनही राघोबादादांना पेशवेपद मिळाले नाहीच. राघोबादादा ११ डिसेंबर १७८३ रोजी कोपरगावजवळ कचोर येथे मरण पावले. त्यानंतर राघोबादादांच्या पत्नी आनंदीबाई २७ मार्च १७९४ रोजी मरण पावल्या. नाना फडणीसाने सवाई माधवरावांना कधीही स्वतंत्रपणे कारभार करु दिला नाही. त्यांना अपरोक्ष कोणी भेटू नये म्हणून आपली माणसे त्यांच्या महालाच्या बंदोबस्तास ठेवली. नाना व सवाई माधवराव पेशवे यांच्यात अंतस्थ मतभेद होते. नानाच्या वाढत्या दबावाने सवाई माधवराव खिन्न झाले. दिनांक २५ नोव्हेंबर १७९५ रोजी सवाई माधवराव यांनी शनिवारवाड्यात वरच्या मजल्यावरुन खाली कारंज्यावर उडी टाकली. औषधोपचार चालू असताना २७ नोव्हेंबर १७९५ रोजी ते मरण पावले.

### उ) छ. धाकटे शाहू व पेशवे दुसरा बाजीराव काळ– (१७९६–१८१८)

२५ नोव्हेंबर १७९५ रोजी सवाई माधवराव याने शनिवारवाड्यात गच्चीवरुन खाली कारंजावर उडी टाकली. दोन दिवसानंतर तो मृत्यू पावला. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतरही सत्ताकेंद्र आपल्याकडे ठेवण्याचे नाना फडणीसाचे प्रयत्न सुरु होते. त्याने सवाई माधवरावाची विधवा पत्नी यशोदाबाई हिस पेशव्यांच्या नात्यातील मुलगा दत्तक देऊन त्यास पेशवा करण्याचा घाट घातला. नानाने श्रीवर्धन, केळशी, वसई या ठिकाणांवरुन दत्तक निवडण्यासाठी दहा मुले आणवली ती सर्व अपात्र ठरवून नानाने आपल्या अल्पवयीन मेव्हण्याचे नाव दत्तक म्हणून पुढे केले. त्यामुळे त्याचा सत्तेचा लोभ प्रकाशात आला. मराठा सरदारांमधील मतभेद तीव्र झाले. परिस्थिती अधिकच चिघळली.

दुसरीकडे पेशव्यांच्या घराण्यातील रघुनाथदादांचे दुसरा बाजीराव हा मोठा असल्याने तोच कायदेशीर वारस होता. दुसरा बाजीराव व चिमणाजी यांच्याशिवाय रघुनाथदादांचा अमृतराव हा दत्तकपुत्र होता. दुसरा बाजीराव व चिमणाजी हे पेशव्यांचे वारस जुन्नरला नाना फडणीसाच्या नजरकैदेत होते दुसरा बाजीराव पेशवा झाल्यास आपला सूड उगवेल ही भीती नानाला वाटत होती. तरीही ५ डिसेंबर १७९६ रोजी दुसऱ्या बाजीरावास पेशवे करण्यात आले.

नाना फडणीस यांचा मृत्यू १३ मार्च १८०० रोजी झाला. इंग्रज पत्रांमध्ये नाना बरोबर मराठा राज्याचे शहाणपण आणि मुत्सद्दीपणा लयास गेला असा उल्लेख आढळतो. यशवंतराव व विठोजी यांनी मल्हाररावाच्या मृत्यूचा बदला घेण्याचे ठरविले. दरम्यान यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे यांच्यात अनेक लढाया झाल्या. या युद्धांमध्ये यशवंतराव होळकरच प्रभावी ठरला. त्याने अनेक वेळा शिंद्यांचा पराभव केला. इ.स. १८०२ मध्ये यशवंतराव होळकर पुण्यावर आक्रमण करण्यास सर्व तयारी करुन निघाला. वाटेत पुण्यापर्यंत होळकरांनी आपले वर्चस्व निर्माण केले. होळकर पुण्याच्या अधिक जवळ येऊ लागताच पेशवे दुसरे बाजीराव यांनी शिंद्यांना मदतीस बोलविले. बारामती जवळ मेडते येथे फत्तेसिंग माने व पेशव्यांचे सरदार नाना पुरंदरे यांच्यात युद्ध झाले. पेशव्यांच्या सैन्याचा पराभव झाला. त्याच दिवशी पेशव्यांनी आपले व चिमणाजीचे कुटुंब रायगडावर पोहोचवले. सवाई माधवरावाची पत्नी यशोदाबाईचा पक्का बंदोबस्त केला. सर्व खजिना सिंहगडावर नेला. पेशव्यांनी पुण्याच्या बंदोबस्तासाठी शहराबाहेर तोफा ठेवल्या. २५ ऑक्टोबर १८०२ रोजी हडपसरची लढाई झाली. बाजीरावाने आधीच कोकणात पळून जाण्याची तयारी केली होती. या युद्धात पेशव्यांच्या मदतीस आलेल्या शिंद्यांच्या सैन्याची दाणादाण उडाली. यशवंतराव होळकर याचा या युद्धात विजय झाला. पेशवे दुसरे बाजीराव पर्वती, वडगावमार्गे डोणजास पोहोचले. येथे बाळाजीपंत पटवर्धन, बापूजी विठ्ठल चाफेकर यांनी पेशव्यांना इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचा सल्ला दिला. बाजीराव व त्याचे अनेक सहकारी डोणजावरून कोकणात पळून गेले. हडपसरच्या लढाईतील पराभवानंतर पुणे सोडून कोकणात जात असतानाच पेशव्यांनी स्वत:च्या सही शिक्याचे एक पत्र कर्नल क्लोजला पाठविले. पेशवे इंग्रजांची मदत घेत आहे हे कळून त्याचा होळकरावर दबाव निर्माण व्हावा हा पेशव्यांचा हेतू होता.

पेशवे पुणे सोडून गेल्यानंतर अमृतरावाने यशोदाबाईला रायगडवरून आणण्यासाठी आपले सैन्य रवाना केले. आपला मुलगा विनायकराव यास यशोदाबाईला दत्तक देऊन पेशवेपदावर बसवावे हा अमृतरावाचा हेतू होता. बाणकोटच्या खाडीत ब्रिटिश गलबते दिसल्याने अमृतरावाच्या सैन्याने इंग्रजांच्या हल्ल्याच्या भितीने यशोदाबाईस जबरदस्तीने रायगडवरून पुण्यास नेले नाही.[४१६] पेशव्यांच्या पाठलागावर होळकरांचे सैन्य, पंधरा हजार पठाण गेले. पेशवा

बिरवाडी, रायगडवरून महाड येथे गेले.[४१७] होळकर व पेशवे यांच्यातील संघर्षाचा प्रसार कोकणामध्ये पण झाला. होळकरांचे सैन्य चारी घाटाने कोकणात गेले. पेशव्यांचा बाणकोटला इंग्रजांकडे आश्रयाला जाऊन तेथून भडोचला शिंद्यांकडे जाण्याचा विचार होता.[४१८] कॅप्टन केनेडी बाणकोटवरुन महाडला येऊन पेशव्यांना भेटला.[४१९] पेशवे महाडवरून महागिरीत बसून जलमार्गे जाणार होते. परंतु त्यांना बाणकोटच्या इंग्रजांविषयी विश्वास नव्हता. त्यामुळे पेशवे थोडाच अंतर जलमार्गे गेले व त्यानंतर जमीनमार्गे हर्णेस गेले.[४२०] इंग्रज वकील कर्नल क्लोज २८ नोव्हेंबर १८०२ रोजी पुणे सोडून मुंबईला गेला. बाजीराव हर्णेवरुन सुवर्णदुर्गला गेला. सुवर्णदुर्गच्या बंदरात तो १ व २ डिसेंबर असे दोन दिवस गलबतामध्ये बसून राहिला. तेथून तो रेवदंडा, ठाणे येथून १६ डिसेंबर १८०२ रोजी वसईस गेला. त्यापूर्वीच त्याने १० डिसेंबर १८०२ रोजी मुंबईला जाऊन इंग्रजांची भेट घेतली होती. दुसरा बाजीराव व इंग्रज यांच्यामध्ये आधीपासूनच करारासंबंधी बोलणी चालू होती. तैनाती फौजेच्या खर्चासाठी तोडून द्यायच्या प्रदेशाच्या मुद्यावरुन पेशव्यांनी बोलणी लांबवली होती. दरम्यान शिंद्यांची पेशव्यांना मदत करण्यास येत असण्याविषयीची पत्रे आली होती. ब्रिटिश तैनाती फौजेच्या खर्चासाठी पेशव्यांचा गुजरातमधील प्रदेश मागत होते. दुसऱ्या बाजीरावाने आता शिंद्यांची मदत मिळविण्यासाठी भडोचला जाण्याचे ठरवले. त्याने मुंबईला ब्रिटिशांशी वाटाघाटी करत असणाऱ्या आपल्या वकिलाला वसईला बोलविले.

दुसऱ्या बाजीरावाला तैनाती फौजेचा करार करण्यास भाग पाडण्यासाठी ब्रिटिशांनी अमृतराव व होळकरांशी तैनाती फौजेचा करार करण्याची धमकी दिली. तसे झाले तर दुसऱ्या बाजीरावास पेशवेपद मिळण्याची शक्यताच नष्ट होणार होती. शेवटी दुसरा बाजीराव ब्रिटिशांच्या या डावपेचाला बळी पडला. भविष्यात सर्व मराठा सरदारांचे ऐक्य करुन ब्रिटिशांना घालवून देण्याचा आशावाद त्यास वाटत होता. ३१ डिसेंबर १८०२ रोजी दुसऱ्या बाजीरावाने वसई येथे तैनाती फौजेच्या करारावर सही केली.

३ ऑगस्ट १८०३ रोजी इंग्रजांनी मराठ्यांविरुद्ध दुसरे युद्ध सुरु केले. या वेळी मराठ्यांचे प्रतिनिधित्व दौलतराव शिंदे करत होते. ब्रिटिशांनी अमृतरावला पेशव्यांविरोधात अभय देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले. हे युद्ध सुरु होताच इंग्रजांनी शिंद्यांच्या सैन्यातील

सर्व युरोपीय अधिकाऱ्यांनी निवृत्त व्हावे. त्या बदल्यात इंग्रजांकडून त्यांचे सर्व आर्थिक लाभ सुरक्षित राखले जातील असे आश्वासन दिले. जनरल वेलस्लीने अहमदनगरवर हल्ला करताच शिंद्याच्या सैन्यातील सर्व युरोपियन अधिकारी आपापल्या पलटणीसहित इंग्रजांना जाऊन मिळाले. त्यामुळे उर्वरित शिंद्यांचे सैन्य दुर्बळ झाले. ९ ऑगस्ट १८०३ रोजी इंग्रजांनी अहमदनगर शहर व दोन दिवसातच फितुरी करुन अहमदनगरचा किल्ला जिंकला. शिंद्याकडील युरोपियन अधिकारी व काही मराठा सरदार, सैनिक इंग्रजांना फितुर झात्यामुळे इंग्रजांना हे यश मिळाले. लासवडी येथील युद्धातही इंग्रजच जिंकले.

दुसऱ्या इंग्रज–मराठा युद्धामध्ये इंग्रजांचा विजय झाला. दौलतरावाचे सामर्थ नष्ट झाले. फ्रेंचांचा प्रभाव नष्ट झाला. उत्तर भारतातील शिंद्यांच्या ताब्यातील दिल्ली, आग्रा, दुआबाचा प्रदेश व मोगल बादशाह शहा आलम इंग्रजांच्या ताब्यात आला. भडोच ताब्यातून गेल्यामुळे शिंद्यांचा समुद्र किनाऱ्याशी संपर्क तुटला व इंग्रजांचा फायदा झाला.

१८०३ मध्ये पेशव्याची पुनर्स्थापना झाल्यानंतर सातारा, कराड, कोकणचा प्रदेश प्रतिनिधीने केंद्र सत्तेविरुद्ध उठाव केला. या प्रदेशात हल्ले, जाळपोळ, लूट करुन अराजकता निर्माण केली. चिंतामणराव पटवर्धन यांनी प्रतिनिधींना मदत केली होती. पेशव्यांनी लष्करी कारवाई करुन या बंडाचा बंदोबस्त केला. यावेळी इंग्रजांनी तैनाती फौजेची मदत दुसऱ्या बाजीरावास केली नाही. पेशव्यांच्या अडचणी वाढाव्यात हाच हेतू यामागे होता. १८०५–०६ मध्ये सिद्दीचा जंजिरा ताब्यात घेण्यासाठी आणखी एक गुप्त आवाहन मराठा सरदारांनी करण्यात आले.[४२१] त्याबद्दल गुप्त पत्र महत्वाचे इनामदार, सरदार, कारकून यांना पाठविण्यात आले.[४२२] युद्ध न करता जंजिरा मिळवून देतील त्यांना एक लाख रुपये रोख व किल्ल्यातील गुरे, घोडे, धान्य, पैसे व गाव इनाम देण्याचे कबुल करण्यात आले. किल्ला मिळाल्यावर पुण्यातील ब्राह्मण, कारस्थानात सहभागी असणाऱ्यांना दहा हजार रोख बक्षिस देण्याचे कबूल करण्यात आले.[४२३] सिद्दीकडील जे लोक सरकारकडे (पेशवे) येतील त्यांची सरदारकी कायम ठेवण्याचे तसेच किल्ला ताब्यात आल्यानंतर कारस्थानाचा खर्च म्हणून दोन लाख देण्याचे सुद्धा सरकारकडून कबुल करण्यात आले.[४२४] कारस्थानात सहभागी सरदारांना पालख्या, अब्दागिऱ्या व चवऱ्या देऊन सन्मान करण्याचे जाहीर करण्यात आले. तसेच नियमाप्रमाणे वेतन घेऊन

चाकरी करण्याचे आवाहन करण्यात आले.[४२५] याच दरम्यान १८०५–०६ मध्ये विसाजी लक्ष्मण यांनी पालगडचे किल्लेदार हणमंतराव दळवी यांना मराठा सैन्याची तयारीबद्दल कळविले. पालगड किल्ल्यास तटबंदीची दुरुस्ती करुन कडक पहारा राखण्यास सुद्धा हणमतंराव दळवींना कळविण्यात आले.[४२६] याच वेळी पालगडच्या किल्लेदारांना किल्ल्याच्या संरक्षणाची योग्य काळजी घेऊन सावध राहण्यास सांगण्यात आले.[४२७] एप्रिल १८०५ मध्ये पालगडचे किल्लेदार हणमंतराव दळवी यांना पालगडच्या परिसरातील प्रदेशाचा योग्य बंदोबस्त राखण्याविषयी सांगण्यात आले. किल्ल्याच्या संरक्षणासाठी त्यांनी मागितलेल्या अधिकच्या रकमेचा बंदोबस्त नंतर करण्याचे पुणे दरबाराकडून मान्य करण्यात आले. त्यांना मौजे तान्हने येथून रोख पैसे घेऊन जाण्याविषयी कळविण्यात आले.[४२८] विन्हेरे येथील विश्राम सोनार सरकारच्या आज्ञेशिवाय खोटे शिक्के रुपयावर मारुन देत होता. त्यास १० रु. दंड पालगडकरांकडे जमा करुन सूवर्णदुर्ग सुभ्याच्या सुभेदाराकडे हजर राहण्याची आज्ञा २१ मे १८०६ रोजी देण्यात आली.[४२९] ऑक्टोबर १८०६ मधील महाडवरील हल्ल्याचा वृत्तांत पालगडच्या किल्लेदारांनी पुणे दरबारास कळविला. त्यांनी एक मनुष्य महाडला पाठवून तेथील सविस्तर वृत्तांत ताबडतोब कळविण्यास सांगण्यात आले.[४३०] डिसेंबर १८०६ मध्ये पालगडचे किल्लेदार म्हणून महादजीपंत भाऊ परळीकर यांना नेमण्यात आले. त्याप्रमाणे सामानसहित किल्ला परळीकरांच्या कारकुनाच्या ताब्यात देण्यास हणमंतराव दळवी यांना सांगण्यात आले.[४३१] पहिले किल्लेदार हणमंतराव दळवी यांना किल्ल्यावरील शिबंदीचा सर्व हिशेब पूर्ण करण्यास सांगण्यात आले. सर्व सामान, जिन्नस यांची मोजदाद करुन कारखानीसाकडून त्याबद्दलची पावती घेण्यास तसेच जमाखर्चाचा हिशेब हर्णेस पाठविण्यास सांगण्यात आले.[४३२] याचवेळी पालगड किल्ला सोडण्याविषयीचे आदेशपत्र सूवर्णदुर्गचे सुभेदार दिनकर महादेव केळकर यांनी हणमंतराव दळवी यांना पाठविले.[४३३] हणमंतराव दळवी यांना डिसेंबर १८०६ मध्ये आपल्या सैन्यासहित ताबडतोब पालगड किल्ल्यावरुन खाली उतरण्याची आज्ञा करण्यात आली.[४३४] जाने. १८०७ मध्ये पालगडचे किल्लेदार हणमंतराव दळवी यांना एक महिन्याच्या खर्चाचा हिशेब पुण्यास कळविण्यास सांगण्यात आले.[४३५] सदर महिन्याच्या खर्चासाठी केसोपंत खेर यांच्याकडे पंचाहत्तर रु. हणमंतराव दळवी यांना पाठविण्यात आले. किल्ल्यावरील लोकांचा हिशेब पूर्ण करण्यास सांगण्यात आले.[४३६] पुण्यावरुनही हणमंतराव दळवी

यांना पालगडवरुन मुक्त होण्याचे पत्र पाठविण्यात आले.[४३७] मुक्त होताना महादाजीपंत परळीकर यांच्या कारकुनाकडून सर्व साहित्य पोहोच झाल्याच्या पावत्या घेऊन पाठविण्यास सांगण्यात आले.[४३८] सन ८१० मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील, रत्नागिरी तालुक्यामधील रत्नागिरी, जयगड, पूर्णकोट, भुईकोट, भवानगड भुईकोट, साठवली गढी, सूवर्णदुर्ग तालुक्यातील सुवर्णदुर्ग जंजिरा, रसाळगड, पालगड, मंडणगड, सूमारगड, कनकदुर्ग भुईकोट, गोवा भुईकोट, तसेच किल्ला महिमतगड व अंजनवेल तालुक्यातील अंजनवेल, गोवळकोट, बहिरवगड (भैरवगड), विजयगड हे किल्ले पेशव्यांच्या ताब्यात होते.[४३९]

अशाप्रकारे सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर पेशवाईच्या वारसा संघर्ष, मराठा सरदारांचा आपापसातील संघर्ष, मराठे-सिद्दी संघर्ष, इंग्रज-पेशवे व इंग्रज-मराठा संघर्षामध्ये दक्षिण कोकणामध्ये रत्नागिरी जिल्ह्यात या संघर्षाचा प्रसार झाला. नाना फडणीस पेशवे दुसरे बाजीराव, पुण्यावर संकट आलेली आश्रयासाठी कोकणातील किल्ल्यांचा व लष्करी ठाण्यांचा उपयोग करत. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये कोल्हापूरकर, खेम सावंत व पेशवे यांचा आपापसात सतत संघर्ष चालू होता.

सातारच्या छत्रपतींचा भाऊ चतुरसिंग भोसले हा पेशव्यांविरोधात नेहमी कारवाया करत असे. पेशव्यांचा सरदार त्रिंबकजी डेंगळे यांनी त्यास विश्वसघाताने फेब्रुवारी १८११ मध्ये पकडले व कांगोरीच्या किल्ल्यावर कैदेत ठेवले. चतुरसिंग भोसले कैदेमध्ये असताना त्याचा तोतया निर्माण झाला. या तोतयाने रामोशांच्या मदतीने बंड केले. किल्ले ताब्यात घेणे, चतुरसिंग म्हणून वसुली घेणे, लुटमार करणे ही कृत्ये या तोतयाने सुरु केली. या तोतयाच्या बंडाचा प्रसार सुवर्णदुर्ग व अंजनवेल परिसरात झाला. १८१७ च्या सुरुवातीस पेंढाऱ्यांच्या ३ ते ४ टोळ्या कोकणात शिरल्या. त्यापैकी एका टोळीने सुवर्णदुर्ग परिसरातील काही गावे उध्वस्त केली. पेंढाऱ्यांच्या दुसऱ्या टोळीने नोव्हेंबर १८१७ मध्ये महाड लुटले. पेंढाऱ्यांच्या आगमनापूर्वीच गावकरी आजूबाजूच्या जंगलात पळून जात व गावे ओसाड पडत. चतुरसिंग भोसले कैदेमध्येच १८१८ मध्ये मरण पावला. हे तोतयाचे बंड सुरु असताना त्याचा व त्याच्या साथीदारांचा बंदोबस्त करण्यासाठी, तसेच गेलेला प्रदेश व किल्ले मिळविण्यासाठी पेशव्यांचे सैन्य सतत फिरत असे. पेशवाई नष्ट होईपर्यंत तोतयाच्या या बंडाचा बंदोबस्त झाला नाही.

पेशव्यांच्या दरबारातील इंग्रज वकील रसेल याने सातारच्या छ. आप्पासाहेब व दक्षिणेकडील जहागिरदार यांच्यावर लष्करी दबावाचे राबवलेले धोरण पेशव्यांना हितकारक ठरले. पेशवे अधिक समर्थ होऊ नये म्हणून पेशव्यांविरोधी बंडखोर जहागिरदार, सरदारांचा गट कायम टिकविणे आवश्यक होते. पण रेसिडंट रसेलने नेमके उलटेच धोरण राबविले म्हणून कंपनी सरकारने रसेल ऐवजी माउंट स्टुअर्ड एलफिस्टन यांची नेमणूक पेशवे दरबारामध्ये केली. पेशवा बाजीराव पैशाच्या लोभाने अनेक जहागिरदारांचे सरंजाम जप्त करू लागला. त्यामुळे जहागिरदार दिवसेंदिवस पेशव्याविरोधात बंड करु लागले. पेशवे कोल्हापूरचे छत्रपती व सावंतवाडीकरांवर आपला अधिकार सांगू लागले. त्यांनी एलफिस्टनकडे तक्रार केली. पेशवा दुसरा बाजीराव याने लष्करी कारवाईने बंडखोरांचा बंदोबस्त केला तर ते समर्थ होतील, पेशवे सरकारला स्थैर्य, शांतता व लष्करी सामर्थ्य प्राप्त होईल आणि पेशव्यांची स्थिती मजबूत होईल हे एलफिस्टनने ओळखले. पेशवे समर्थ झाले तर इंग्रजांचा प्रभावाखाली ते राहणार नाहीत हे स्पष्ट होते. एलफिस्टनने बंडखोर जहागिरदारांशी बोलणी सुरु केली. पेशव्यांच्या विरोधी सरदारांना पाठिंबा देऊन हा गट कायम टिकविणे पेशव्यांच्या हिताचे होते. लष्करी दबावाने बंडखोरांचा बंदोबस्त होत असताना ब्रिटिशांच्या मध्यस्थीने त्यांच्याशी तडजोड, करार करणे पेशवा दुसऱ्या बाजीरावला नको होते. एलफिस्टनने पेशव्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करत बंडखोर जहागिरदारांशी बोलणी सुरु केली. जहागिरदारांचे सरंजाम कायम टिकवायचे असतील त्यांना ब्रिटिशांचीच हमी घेऊनच पेशव्यांशी असलेले संघर्ष सोडविणे आवश्यक आहे हे एलफिस्टनने जहागिरदारांना पटविले. पेशवा जुलैमध्ये तीर्थयात्रेसाठी पंढरपूरला आला की सर्व जहागिरदारांनी पंढरपूरला येण्याची सूचना केली. एलफिस्टनने पेशव्यास जहागिरदारांची नवी व्यवस्था आधीच कळवली होती. इंग्रजांना लष्करी प्रतिकार करणे अशक्य वाटल्याने २० जुलै १८१२ रोजी पेशवा दुसऱ्या बाजीरावाने या करारावर सही केली यास पंढरपूरचा तह म्हणतात. या तहाप्रमाणे पेशवे व जहागिरदार यांनी आधीचे शत्रुत्व व नुकसान विसरावे. परस्परांचे असणारे देणे–घेणे रद्द समजावे. पेशव्यांशी निष्ठा ठेऊन कर्तव्ये करणाऱ्या जहागिरदारांचे सरंजाम सुरक्षित ठेवावेत. जहागिरदारांनी आपल्या ताब्यातील अनाधिकृत प्रदेश पेशव्यांना परत करावा. पेशव्यांच्या आदेशानुसार सेवेला हजर असावे. पेशव्यांची सेवा प्रामाणिकपणे करणाऱ्या जहागिरदारांच्या

नातेवाईकांच्या व जहागिरीच्या सुरक्षिततेची हमी इंग्रजांनी द्यावी. पेशवे व जहागिरदारांमधील संघर्ष तंटे इंग्रजांच्या मध्यस्थीने सोडवावेत. ही पंढरपूरच्या तहाची कलमे होती.

कोल्हापुरच्या छत्रपतींशी इंग्रजांनी १ ऑक्टोबर १८१२ रोजी तह केला. यावेळी इंग्रजांनी पेशव्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष केले. या तहाप्रमाणे कोल्हापूरकरांनी चिकोडी व मानोळी हे प्रदेश पेशव्यांना द्यावेत. पद्मगड, सर्जेकोट, राजकोट व त्याखालील प्रदेश, मालवण बंदर इंग्रजांना द्यावे. कोल्हापूरच्या छत्रपतींनी युद्धनौका बांधू नयेत, परंतु इंग्रजांच्या जहाजांना सर्व प्रकारची मदत करावी. इंग्रजांनी कोल्हापूरकरांचे परकीय शत्रूच्या आक्रमणापासून संरक्षण करावे. कोल्हापूरकरांनी इंग्रजांच्या संमतीशिवाय कोणाशीही करार करु नये. परकीयांशी असणारे मतभेद इंग्रजांच्या मध्यस्थीने सोडवावेत.

पंढरपूर व कोल्हापूरच्या या तहांमुळे पेशवा दुसऱ्या बाजीरावाची जहागिरदार व कोल्हापूरकर यांच्यावरील अधिकार संपले होते. इंग्रजांची मर्जी राखून आपापले प्रदेश, सरंजाम सुरक्षित राखणे वरील दोघांना शक्य होते. त्यामुळे पेशव्यांच्या विरोधाची, रागाची पर्वा करण्याची गरज जहागिरदार व कोल्हापूरकरांना उरली नाही.

### ऊ) पेशवा दुसरा बाजीराव व इंग्रज यांच्यामधील बिघडते संबंध

दुसऱ्या बाजीरावाने अत्यंत नाईलाजाने इंग्रजांशी तैनाती फौज स्विकारणारा वसईचा तह केला होता. या तहाप्रमाणे पेशवेपद मिळाल्यापासूनच दुसऱ्या बाजीरावाने शिंद्यांच्या मदतीने इंग्रजांचा पेशवाईवर असणारा लष्करी दबाव झुगारण्याचा प्रयत्न सुरु केला होता. इंग्रजांची या सर्वांवर नजर होतीच. त्यांनी दुसऱ्या बाजीरावाचे सर्व बाजूंनी खच्चीकरण केले. पंढरपूर व कोल्हापूरचा करार करुन जहागिरदार व कोल्हापूरकरांना पेशव्यांपासून दूर केले. दौलतराव शिंदे व यशवंतराव होळकर यांच्याशी परस्पर तह करून दुसऱ्या बाजीरावास एकटे पाडले.

इंग्रजांशी अंतिम संघर्ष ब्रिटिशांच्या पेशवे व त्यांच्या सरदारांच्या प्रदेशाबाबतच्या आक्रमक धोरणामुळे पेशवे व इंग्रज यांच्यातील मतभेद वाढत गेले. इंग्रजांचा स्वार्थ साधतील अशीच धोरणे कंपनी सरकार व इंग्रज रेसिडंटकडून राबविल्यामुळे पेशव्याचे हितसंबंध धोक्यात आले. पेशव्यापुढे अस्तित्वाचीच समस्या निर्माण झाली. त्यामुळे पेशवा दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांशी लष्करी संघर्ष करण्याची तयारी सुरु केली. त्याप्रमाणे महाराष्ट्र, गुजरातमधील आपल्या प्रदेशात दुसऱ्या बाजीरावाने लष्करभरती करण्यास सुरुवात केली. त्याने सर्व किल्ल्यांवर

शिबंदी वाढवून साधनसामग्री साठविण्यास सुरुवात केली. सर्व मराठा सरदारांचे ऐक्य करण्याचा व मदत मिळविण्याचा प्रयत्न दुसऱ्या बाजीरावाने सुरु केला. शिंदे, होळकर, भोसले यांच्याकडे खास दूत पाठवून इंग्रजांविरुद्धच्या या अंतिम लढ्यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

इ.स. १८१७ मध्ये दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजविरोधी युद्धाची जोरात तयारी केली. सांगली, मिरज, पुणे, वऱ्हाड, खानदेश या सर्व प्रदेशात पेशव्यांचे अधिकारी सैन्य भरती करत होते. रायगड, वासोटा, सिंहगड, पुरंदर या व इतर किल्ल्यांवर शिबंदी व साधनसामग्री सज्ज ठेवण्यात आली. पेशव्यांनी आपली संपत्ती व मौल्यवान वस्तू रायगड किल्ल्यावर पाठवून दिल्या.

इंग्रजांचे आक्रमक धोरण व पुणे करार  त्रिंबकजीने सैन्याच्या मदतीने सगळीकडे हल्ले व लुटालुट करण्यास सुरुवात केली. पेंढाऱ्यांना बरोबर घेऊन कोकणामध्ये लुटालुट केली. १८१७ च्या सुरुवातीला पेंढाऱ्यांच्या तीन-चार टोळ्या कोकणामध्ये शिरल्या. त्यातील एका तुकडीने सुवर्णदुर्गच्या परिसरातील काही गावे उध्वस्त केली.[४४०] उर्वरित टोळ्यांनी महाड, पनवेल, भिवंडी, तारापूर पर्यंत लुटालुट केली. पेंढारी येण्यापूर्वीच गावकरी पळून जात. गावे ओसाड पडत.

एलफिस्टन याला दुसऱ्या बाजीरावाची इंग्रजांविरुद्ध लष्करी तयारी त्यासाठी मराठा मंडळाचे ऐक्य करण्याचा प्रयत्न, इतर राज्यकर्त्यांची मदत घेण्याचे प्रयत्न व त्रिंबकजीला करत असलेली आर्थिक मदत लक्षात येत होती. त्रिंबकजीच्या पलायन व लष्करी कारवायांना पेशव्यांची फुस आहे हे एलफिस्टन चांगले जाणून होता. दुसऱ्या बाजीरावाचे अशी भारतीय राज्यकर्त्यांना एकत्र करण्याचे प्रयत्न, जय्यत लष्करी तयारी व त्रिंबकजीचे वाढते सामर्थ्य यांचा संभाव्य धोका एलफिस्टनला जाणवत होता. पावसाळा सुरु होताच पेशवा कोकणात रायगडला आश्रयास जाईल. कोकणात भर पावसाळ्यात पेशव्याचा पाठलाग करणे, युद्धसाहित्य नेणे अवघड होईल असे एलफिस्टनला वाटत होते. दुसऱ्या बाजीरावाचे लष्करी खच्चीकरण करण्यासाठी त्याच्याशी करावयाच्या नव्या कराराची गरज व तसेच पेशवे व त्रिंबकजीविरुद्ध लष्करी कारवाईची परवानगी एलफिस्टनने मार्च १८१७ मध्ये गव्हर्नर जनरलकडे मागितली.

गव्हर्नर जनरलने एलफिस्टनला कळविले की, त्याने पेशव्याकडे त्रिंबकजीस एक महिन्याच्या आत इंग्रजांच्या ताब्यात देण्यास सांगावे. तस केले नाही तर तैनाती फौजने पेशव्यांवर हल्ला करावा. त्यास कैद करुन त्याचा प्रदेश कंपनी सरकारच्या ताब्यात घ्यावा. पेशवा त्रिंबकजीस इंग्रजांच्या ताब्यात देऊन शरण आला तर त्याची शक्ती पूर्ण खच्ची होईल, असा नवा करार पेशव्यावर लादावा.

एलफिस्टनने ७ मे १८१७ रोजी पेशव्यांना निर्वाणीचे पत्र पाठविले. त्यामध्ये पेशव्याने एक महिन्याच्या आत त्रिंबकजीला इंग्रजांच्या ताब्यात द्यावे. याची हमी म्हणून ताबडतोब सिंहगड, रायगड, पुरंदर हे किल्ले इंग्रजांना द्यावेत असे कळविले. पेशव्याने या मागण्या मान्य न केल्यास इंग्रज ताबडतोब पेशव्यांविरोधात युद्ध सुरु करतील अशी धमकीही एलफिस्टनने दिली. ८ मे १८१७ रोजी पहाटे एलफिस्टनच्या आदेशाने कर्नल स्मिथने पुण्याला वेढा दिला. दुसरा बाजीराव अडचणीत सापडला. मागण्या अमान्य केल्यास तो ताबडतोब पकडला जाणार होता. दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांपुढे नमते घेत ८ व ९ मे १८१७ रोजी सिंहगड, पुरंदर व नंतर रायगड हे किल्ले इंग्रजांच्या ताब्यात दिले.

२८ मे १८१७ रोजी एलफिस्टनने पेशवे व इंग्रज यांच्यातील नव्या कराराचा मसुदा ठेवला. त्यामध्ये त्रिंबकजी हाच गंगाधरशास्त्रीचा खुनी असल्याचे जाहीर करुन पेशव्यांनी त्याला इंग्रजांच्या ताब्यात द्यावे. त्रिंबकजी ताब्यात देईपर्यंत त्रिंबकजीचे कुटुंबीय इंग्रजांच्या ताब्यामध्ये द्यावेत. मराठा संघराज्य विसर्जित झाले असून त्या संघराज्याचा प्रमुख म्हणून पेशव्यास कोणतेच अधिकार असणार नाहीत. मराठा सरदार किंवा इतर भारतीय राजांच्या दरबारात पेशव्याने आपले वकील ठेऊ नयेत किंवा त्यांचे प्रतिनिधी स्वतःच्या दरबारात ठेऊ नयेत. कोल्हापूरकर व सावंतवाडीकर यांच्यावरील सर्व हक्क पेशव्याने सोडून द्यावेत. पेशव्यांनी वार्षिक चार लाख रु. घेऊन बडोदा सरकारवरील सर्व हक्क सोडून द्यावेत. साडे चार लाख रुपयांच्या भाडेपट्टीने अहमदाबाद सुभा पेशव्यांनी परत गायकवाडांना द्यावा. पंढरपूरचा करार बंधनकारक असल्याचे पेशव्याने मान्य करावे. तैनाती फौजेसोबतच्या सैन्याच्या व शस्त्रास्त्रांच्या खर्चासाठी धारवाड व कर्नाटकमधील इतर किल्ले, उत्तर कोकणचा प्रदेश, अहमदनगर किल्ला, काठेवाडमधून पेशव्यांना मिळणारा ३४ लाख वसूल पेशव्यांनी इंग्रजांना द्यावा. सागर, झाशी याबरोबरच बुंदेलखंड व माळव्यातील (नर्मदेच्या उत्तरेकडील) सर्व प्रदेशावरील सार्वभौमत्व व इतर सर्व

अधिकार पेशव्यांनी सोडून द्यावेत. हे सर्व प्रदेश इंग्रजांना कायमचे द्यावेत. भारताच्या राजकारणात कसलाच हस्तक्षेप करणार नाही अशी हमी पेशव्यांनी इंग्रजांना द्यावी. अशा दुसऱ्या बाजीरावाचे सर्व बाजूने खच्चीकरण करणाऱ्या या कराराच्या अटी होत्या.

या करारामुळे मराठामंडळ बरखास्त होऊन पेशव्यांचा मराठा सरदारांवरील हक्क काढून घेण्यात आला. पेशवे व मराठे सरदार व इतर सत्ता यांच्यामध्ये परस्पर संबंध न येण्याची काळजी घेण्यात आली. बुंदेलखंड ताब्यात येताच उत्तरेकडील मराठा सरदारांबाबत आक्रमक लष्करी धोरण राबविणे इंग्रजांना सहज शक्य होणार होते. एकूणच गुजरात व उत्तर भारतातून पेशव्यांचा प्रभाव नष्ट करुन इंग्रजांचा प्रभाव निर्माण करण्याचा प्रयत्न या कराराने इंग्रजांनी केला. दुसऱ्या बाजीरावाने अनेक मार्गांनी या करारास विरोध केला. दुर्बळ, घाबरट असल्याचा दावा केला. पण एलफिस्टन या कोणत्याच गोष्टींना बळी पडला नाही. करार मान्य करणे किंवा युद्ध करणे हे दोनच पर्याय दुसऱ्या बाजीरावापुढे होते. पावसाळा तोंडावर आल्यामुळे सर्व मराठा सरदारांमध्ये सहकार्य व समन्वय निर्माण करणे अशक्य होते. पुण्याला कर्नल स्मिथच्या सैन्याचा वेढा होता. शेवटी अत्यंत नाईलाजाने १३ जून १८१७ रोजी या करारावर सह्या केल्या. हा करार पुणे करार म्हणून ओळखला जातो. ५ जुलै १८१७ मध्ये गव्हर्नर जनरलची मंजूरी या तहाला मिळाली. तह पूर्ण झाल्यानंतर इंग्रजांनी हमी म्हणून घेतलेले त्याचे किल्ले परत दिले.

युद्धाची तयारी  पुणे करारावर सही केल्यानंतर आता इंग्रजांशी युद्ध करण्याशिवाय पर्याय नाही हे पेशव्याने ओळखले. लवकरात लवकर इंग्रजांशी युद्ध करण्याची तयारी करावी या हेतूने दुसऱ्या बाजीरावाने पुढील हालचाली केल्या. तिर्थयात्रेसाठी म्हणून त्याने पुणे सोडून पंढरपुर गाठले. आषाढी एकादशी संपल्यावर तो माहूली येथे धर्मकार्य करण्याच्या निमित्ताने गेला. माहूली या ठिकाणी त्याने युद्ध तयारीचे शेवटचे प्रयत्न केले. अधिकाधिक संख्येने लष्करभरती, निजामाच्या राज्यात सुद्धा इंग्रजविरोधी गटांना लष्कर भरतीस प्रोत्साहन देण्यात आले. बापू गोखले, आप्पा देसाई, चिंतामणराव पटवर्धन, बाळासाहेब रास्ते व इतर अनेक सरदारांना भरघोस आर्थिक मदत देऊन लष्कर भरतीचे आदेश देण्यात आले. नारोपंत आपटे यांना अधिकची लष्करी मदत देऊन रायगडच्या संरक्षणासाठी पाठविण्यात आले. किल्ल्यांची दुरुस्ती संरक्षणाची चोख व्यवस्था, साधनसामग्रीची साठवणूक करण्यात आली. शेवटच्या

क्षणापर्यंत किल्ले लढविण्याचे आदेश किल्लेदारांना देण्यात आले. पेशव्याने वैयक्तिक व सरकारी खर्चात काटकसर करुन तो पैसा लष्करी तयारीसाठी वापरण्यात आला. बापू गोखले याची सर्व मराठा सैन्याचा सेनापती म्हणून नियुक्ती करण्यात आली. मराठा सरदारांमध्ये ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न पेशव्यांनी सुरु केला. नाराज असणाऱ्या छोटा भाऊ चिमणाजीची समजूत काढली. तो जेवणाच्या निमित्ताने सर्व सरदारांच्या घरी जाऊन संभ्याव्य इंग्रजविरोधी लढ्याबाबत चर्चा करु लागला. जप्त केलेली अनेक मराठा सरदारांची वतने व संरजाम परत केले. त्याबदल्यात त्यांना इंग्रजविरोधात मदतीचे आवाहन केले. पेशव्याने विंचूरकर, रास्ते, थोरात, जाधव या सरदारांना दसऱ्याला पुण्याकडे येण्याचे आदेश दिले. तोफखान्याची जय्यत तयारी झाली. शिंदे, भोसले, होळकर, अमीरखान, रणजीतसिंग, भरतपुरचा जाट रजपूत राजा, लखनौचा नबाब या सर्वांशी अंतिम व पक्की बोलणी झाली. त्याप्रमाणे दसऱ्यानंतर पेशव्यांनी इंग्रजांविरोधात युद्ध सुरु करताच या सर्वांनी आपापल्या प्रदेशामध्ये इंग्रजांविरुद्ध युद्ध सुरु करावे असे ठरले.

### ए) सातारच्या छत्रपतींची मदत मिळविण्याचा प्रयत्न

छ.शाहूच्या मृत्यूनंतर पेशवे प्रभावी होऊन छ. रामराजापासून छत्रपतींना पेशव्यांच्या दडपणाखाली रहावे लागत असे. अनेक कारणामुळे पेशवे व छ. संबंधांमध्ये कटूता निर्माण झाली होती. पेशवे दुसऱ्या बाजीरावाने हे संबंध सुधारण्याचा व इंग्रज विरोधी संघर्षात छत्रपतींचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. छत्रपतींचा कल पेशव्यांच्या विरोधात इंग्रजांकडे होता. पेशव्याने माहूलीच्या मुक्कामात छत्रपतींशी संधान साधण्याचा प्रयत्न केला. छत्रपतींच्या दरबारामध्ये अनेक सरदार, गुरु चाफळकर महाराज, बळवंत मल्हार चिटणीस, रंगो बापूजी गुप्ते असे पेशवेविरोधी गट होता. पेशव्यांचा बंदोबस्त करुन सर्व सत्ता छत्रपतींच्या नावे आपल्याकडे केंद्रित करण्याची या सरदारांची महत्वाकांक्षा होती. बळवंत मल्हार चिटणीसाने त्यासाठी एलफिस्टनकडे गुप्तपणे संधन साधले. पेशव्यांनी इंग्रजांच्या मराठा राज्यावरील वाढता प्रभाव छत्रपतींच्या लक्षात आणून दिला. इंग्रजविरोधी युद्धामध्ये छत्रपतींनी सामील व्हावे अशी पेशव्यांनी छत्रपतींना विनंती केली. इंग्रजांचा बंदोबस्त झाल्यावर सर्व सत्ता छत्रपतींच्या हाती देऊन त्यांच्या आज्ञेचे पालन करेन असे आश्वासन त्याने छत्रपतींना दिले. राज्याचा छत्रपती जर युद्धामध्ये असेल तर सर्व मराठा सरदार मनापासून इंग्रजविरोधी युद्धात सहभागी होतील ही

पेशव्यास आशा होती. इंग्रजांना आधीच सामील असलेल्या चिटणीसाने हा सर्व वृत्तांत व योजना एलफिस्टनला कळवल्या. चिटणीस व एलफिस्टन यांच्यामध्ये छत्रपतीने वरवर पेशव्यांशी सहकार्याचे नाटक करावे. पेशव्यांविरोधात इंग्रजांची लष्कर कार्यवाही सुरु होताच योग्य संधी साधून छत्रपतींनी इंग्रजांना जाऊन मिळावे, असे ठरले. छत्रपती त्याप्रमाणेच वागले.

दुसऱ्या बाजीरावाने आपला वकील ब्रह्मदेशामध्ये पाठवून त्याची मदत मिळविली होती हे गव्हर्नर जनरल हेस्टिंग्जच्या वैयक्तिक रोजनिशीतील ६ सप्टेंबर १८१८ च्या उताऱ्यावरुन कळते.[४४१] पुणे तहाने पेशव्यांचा बराच प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. त्यामुळे त्याला सैन्य कमी करणे भाग पडले. कॅप्टन फोर्डच्या नेतृत्वाखालील पेशव्यांची कवायती सैन्याची तुकडी एलफिस्टनने इंग्रज सैन्याला मदत करण्याच्या निमित्ताने काढून घेतली होती. एलफिस्टनचा दुसऱ्या बाजीरावाचे लष्करी खच्चीकरण करण्यावर भर होता.

पुणे करारानंतर दुसऱ्या बाजीरावाने अत्यंत भावनिक होऊन एलफिस्टनकडून होत असणारा अन्याय व इंग्रजांशी असणारी निष्ठा माल्कमकडे व्यक्त केली होती. माल्कम यास बळी पडला व दुसऱ्या बाजीरावाविषयी त्याचे चांगले मत झाले. त्याने गव्हर्नर जनरलपुढे पेशव्याची बाजू मांडली. गव्हर्नर जनरलकडून त्याने दुसऱ्या बाजीरावास पेंढाऱ्यांच्या विरुद्ध युद्धात सहभागी होण्याचा आदेश ठेवविला. दुसऱ्या बाजीरावास आपले सैन्य वाढविण्याची चांगली संधी यामुळे मिळाली. पेंढाऱ्यांविरुद्धच्या संघर्षासाठी म्हणून दुसऱ्या बाजीरावाने सैन्य जमविण्यास सुरुवात केली. त्याने सर्व मराठा सरदार रास्ते, आप्पा देसाई, पानसे, पटवर्धन, विंचूरकर यांच्याशी प्रेमाची व सहकार्याची बोलणी केली. त्या सर्वांना पुण्यात आणले. १० हजार अरब, ३ हजार नंगे गोसावी सेवेस ठेवले. तोफखाना, नवे बाण, दारुगोळयांची तयारी केली. ५० हजार सैन्य संख्या झाली. बापू गोखले १५ हजार, आबा पुरंदरे ३ हजार, विंचुरकर १० हजार याशिवाय नारो विष्णू आपटे, मिरजकर पटवर्धन, रास्ते थोरात, जाधव यांच्याकडे प्रत्येकी २ हजार सैनिक होते.[४४२] दुसऱ्या बाजीरावाचे पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी पुण्यात जमणारे एवढे सैन्य बघून एलफिस्टन अस्वस्थ झाला. एलफिस्टनने कॅ. फोर्ड याच्याकडून दुसऱ्या बाजीरावास पेंढाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी जमवलेले सैन्य पुण्यात न ठेवता वऱ्हाडच्या सीमेवर ठेवण्यास सांगितले. पुण्याच्या आजुबाजूला इंग्रजांनी सैन्य गोळा केल्यामुळे दुसऱ्या बाजीरावाने एलफिस्टनचे ऐकले नाही. इंग्रजांनी पेंढाऱ्यांच्या बंदोबस्ताचे निमित्त करुन शिंदे,

भोसले, पेशवे यांच्याभोवती आपले सैन्य ठेवले. १६ मे १८१७ रोजीच गव्हर्नर जनरलने पेशव्यांचे राज्य जिंकण्याचा हुकूम आपल्या सर्व अधिकाऱ्यांना पाठविला होता.

पेशव्याने प्रत्यक्ष इंग्रजांच्या सैन्यात फितुरी करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पेशव्यांच्या सरदारांपैकी अनेक सरदारांनी त्याला इंग्रजांशी युद्ध करु नये असा सल्ला दिला होता. सेनापती बापू गोखले ह्याचा मात्र बाजीरावास इंग्रजांविरुद्ध युद्ध करावे असा सल्ला होता. विठ्ठलराव विंचूरकरने जनरल स्मिथच्या सैन्याबरोबर अधिक काळ घालविला होता. मराठ्यांमध्ये ऐक्य व लष्करी शिस्त नसत्यामुळे इंग्रजांसमोर मराठ्यांचा टिकाव लागणार नाही असे त्याने पेशव्यास कळवले होते. गोविंदराव काळे या जुन्या मुत्सद्याने सुद्धा असाच सल्ला पेशव्यांना दिला होता. शिंदे सुरुवातीपासूनच भयभीत होते. होळकर घराण्यात प्रचंड यादवी निर्माण झाली होती. तर भोसल्यांच्या दरबारात इंग्रजांनी आधीच फितुरी केली होती. इंग्रजांनी पैसे, वतने व जहागिरीच्या सुरक्षिततेचे वचन देऊन अनेक मराठा सरदारांना फितुर केले. बाळाजीपंत नातू हा इंग्रजांना फितुर झाला होता. तो पेशव्यांच्या इंग्रजविरोधी हालचाली, योजना यांची तपशिलदार माहिती एलफिस्टनला देत असे.[४४३]

ऑगस्ट १८१७ मध्ये पेशवे इंग्रज सैन्यातच फितुरी करत असल्याचे एलफिस्टनला कळले. ऑक्टोबर १८१७ मध्ये इंग्रज सैन्यातील अनेक सैनिकांनी नोकरी सोडल्याची बातमी त्याला कळली. याच दरम्यान सैन्यातील एका इंग्रज अधिकाऱ्याने एलफिस्टनला बेसावध ठेवण्यासाठी २ लाख रु. घेतल्याचे कळले.[४४४] आता पेशव्यांबरोबरचे संभाव्य युद्ध लांबणीवर टाकणे एलफिस्टनला धोक्याचे वाटू लागले. १९ ऑक्टोबर १८१७ दसऱ्याच्या समारंभावेळी मराठा घोडेस्वारांचे एक मोठे इंग्रज सैन्याच्या दिशेला जाऊन पुढे निघून गेले. त्याचवेळी पेशवा इंग्रज सैन्याच्या तुकडीकडून मानाची सलामी घेण्यापूर्वीच शनिवारवाड्यात निघून गेला. या घटनांवरुन युद्ध अटळ असल्याचे व जवळच येऊन ठेपल्याचे पेशवे व इंग्रज दोघांच्याही लक्षात आले. पेशवे आप्पा देसाई व पटवर्धन हे पुण्यात येण्याची वाट पहात होता.

## ऐ) इंग्रजविरोधी मराठ्यांचा अखेरचा लढा

५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकीच्या मैदानात इंग्रज–मराठे युद्धाची सुरुवात झाली. खडकीच्या युद्धामध्ये मराठ्यांनी इंग्रजांना खंबीरपणे प्रतिकार केला. इंग्रजांचा पराभव होतो की काय अशी भीती एलफिस्टनला वाटू लागली. पण मराठा सरदारांमधील फितरीमुळे मराठ्यांना या युद्धात निर्णायक विजय मिळाला नाही. खडकीचे युद्ध अनिर्णित राहिले.[४४५]

यानंतर १६ नोव्हेंबर १८१७ रोजी येरवड्याच्या मैदानात इंग्रज–मराठ्यांची लढाई सुरु झाली. याठिकाणी जालन्यावरुन जनरल स्मिथ एलफिन्स्टनच्या मदतीसाठी सैन्यासह आला होता. येरवड्याच्या युद्धामध्ये मराठ्यांचा पराभव झाला. येरवड्याच्या युद्धामध्ये पराभव होत असल्याचे लक्षात येताच बापू गोखलेने पेशव्यांना पुणे सोडण्याचा निरोप दिला. पराभव निश्चित झाल्यावर पेशव्यांनी पुणे सोडले. येरवड्यांच्या विजयानंतर लगेचच इंग्रजांनी मराठा सत्तेचे प्रमुख केंद्र पुणे ताब्यात घेतले. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी बाळाजीपंत नारायण नातू यांच्याकडून इंग्रजांनी शनिवारवाड्यावर युनियन जॅक, इंग्रजांचे निशाण फडकवले. पेशवे हे चिमणाजी यांना घेऊन सासवडकडे पळून गेला. बापू गोखले व इतर सरदार त्यांच्या पाठोपाठ निघाले. इंग्रजांना हे कळताच २२ नोव्हेंबर १८१७ रोजी त्यांच सैन्य पेशव्याच्या पाठलागावर निघाले. पेशव्याला लवकरात लवकर पकडून युद्ध संपवावे हा एलफिस्टनचा हेतू होता. परंतु तीन महिने उलटून गेल्यानंतरही पेशवा इंग्रजांच्या ताब्यात आला नाही.

एलफिस्टनने आता पेशव्यांना पकडण्यापेक्षा पेशव्यांचा प्रदेश जिंकण्यावर भर दिला. छ.–पेशवे यांच्या संबंधातील कटुतेचा फायदा घेऊन एलफिस्टनने छत्रपतींना इंग्रजांच्या बाजूला वळवून घेतले. ११ फेब्रुवारी १८१८ रोजी इंग्रजांनी सातारा ताब्यात घेऊन, सातारच्या किल्ल्यावर छत्रपतींचे निशाण लावले. पेशव्याच्या अन्यायी वर्चस्वातून छत्रपतींची सुटका करुन, पुन्हा त्यांची सार्वभौम सत्ता निर्माण करण्याचे इंग्रजांचे ध्येय असल्याचे इंग्रजांनी जाहीर केले. पेशव्याने त्रिंबकजीकडून बडोद्याचा प्रतिनिधी गंगाधरशास्त्री याची हत्या केली तसेच इंग्रजांचा विश्वासघात केला त्यामुळे  नाईलाजाने इंग्रजांना पेशव्यांच्या विरोधात युद्ध करणे भाग पडले असे एलफिस्टनने जाहीर केले. पेशव्यांना सामील झालेल्या जहागीरदार व वतनदारांनी पेशव्यांची साथ सोडून आपापल्या वतनात दोन महिन्याच्या आत परत जावे. असे केल्यास त्यांच्या जहागिरी व वतने सुरक्षित राहतील असा जाहीरनामा इंग्रजांतर्फे जाहीर करण्यात आला. या संधीचा फायदा घेत छत्रपतींनी एलफिन्स्टनशी संधान साधले. त्यांनी योग्य संधी येताच

इंग्रजांच्या आश्रयाला येण्याचे आश्वासन दिले. या जाहीरनाम्यामुळे पेशवे व छत्रपतींचा अधिकार लुबाडणारे तर इंग्रज छत्रपतींच्या अधिकारांचे रक्षण करणारे मित्र अशी प्रतिमा मराठा सरदार व सर्वसामान्यांसमोर उभी राहिली.

पेशव्यांच्या हल्ल्याचा पुण्याला असलेला धोका ओळखून शिरुरवरुन कॅ. स्टॉटन ३१ डिसेंबर १८१७ रोजी रात्री आठ वाजता पुण्यास जाण्यास निघाला. १ जानेवारी १८१८ रोजी तो कोरेगाव येथे पोहोचला. तेथे स्टॉटन यास भीमा नदीच्या किनारी पेशव्यांचे प्रचंड सैन्य दिसले. याठिकाणी झालेल्या युद्धात इंग्रज वरचढ ठरले. तत्पुर्वीच दुसरा बाजीराव निसटून जेजुरीमार्गे सातारकडे निघाला.

डिसेंबर १८१७ मध्ये दुसरा बाजीराव उत्तर कोकणच्या दिशेने निघाला. त्याने उत्तर कोकणात प्रवेश करु नये म्हणून इंग्रजांनी चांगला बंदोबस्त ठेवला होता.[४४६] पेशवा घाटापर्यंत आल्याचे पुरावे मिळतात. बापूराव कंबे या सरदाराने पेशव्यांच्या वतीने उत्तर कोकणातील कोथळीगड हा किल्ला जिंकला.[४४७] ३० डिसेंबर १८१७ मध्ये कॅप्टन ब्रुक्सने तो परत जिंकून घेतला.[४४८] दक्षिण कोकणमध्ये दुसऱ्या बाजीरावास आश्रय मिळू नये म्हणून इंग्रजांनी तेथील किल्ले एकापाठोपाठ एक जिंकले. कॅप्टन केनेडी याने आश्चर्यकारकरित्या १५ फेब्रुवारी १८१८ रोजी प्रचंड लष्करी हानी सोसून मंडणगड किल्ला जिंकला.[४४९]

मंडणगड किल्ला घेण्यासाठी इंग्रजांना फार त्रास पडला.[४५०] ५ मार्च १८१८ रोजी कॅ. केनेडीने पालगड किल्ला जिंकला.[४५१] पालगडच्या शरणागतीबरोबरच बाणकोट ते अंजनवेल खाडी दरम्यानचा सर्व प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात आला.[४५२]११ मार्च १८१८ रोजी इंग्रजांनी रसाळगड जिंकला.[४५३] कॅप्टन केनेडी याने रामगड व पालगड हे किल्ले घेतले.[४५४] रसाळगड हा अवघड किल्ला घेण्यासाठी केनेडीला रसाळगडच्या किल्लेदाराला पाच हजार रुपये द्यावे लागले.[४५५] एप्रिल १८१८ मध्ये कॅप्टन प्रोथर सैन्यासहित कोकणमध्ये आला. त्याने तळे व घोसाळे हे किल्ले २४ एप्रिल १८१८ मध्ये जिंकले. २६ एप्रिल रोजी कॅप्टन प्रोथरने रायगड किल्ल्याला वेढा दिला. १० मे १८१८ पर्यंत वाटाघाटी होऊन रायगड इंग्रजांना खाली करुन देण्यात आला. यानंतर लिंगाणा, कांगोरी, चंदनगड व महिपतगड हे किल्ले इंग्रजांनी जिंकले.[४५६]

कॅप्टन इमलॅकने साष्टीतील पेशव्यांची सर्व ठाणी जिंकून घेतली. सिद्धगड, भगवंतगड घेऊन इंग्रज देवगडकडे वळले. देवगड जिंकल्यावर विजयदुर्ग किल्ल्याला वेढा दिला. या

किल्ल्यावरुन इंग्रजांना मोठा प्रतिकार व इंग्रज सैन्य व गलबतांवर जोराचा मारा केला. पण इंग्रज सैन्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही.[४५७] कॅप्टन केनेडीने सुवर्णदुर्ग परिसरातील किल्ले जिंकल्यानंतर १७ मे १८१८ रोजी अंजनवेल जिंकले.[४५८] चिपळूणमध्ये इंग्रज सैन्य शिरताच तेथे लुटमार करणाऱ्या व चिपळूण ताब्यात घेणाऱ्या रामोशी टोळीने पलायन केले. यानंतर इंग्रज सैन्याने बैरामगड, भगवंतगड हे किल्ले घेतले.[४५९] जुनच्या सुरुवातीपर्यंत रत्नागिरी, जयगड, सातवली (साठवली) पुर्णगड हे किल्ले इंग्रजांच्या ताब्यात आले.[४६०] धुळप यांच्या ताब्यातील विजयदुर्ग इंग्रजांच्या ताब्यात आले.[४६१] अशाप्रकारे संपूर्ण दक्षिण कोकणावर इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले. १ नोव्हेंबर १८१७ च्या खडकीच्या लढाईनंतर रत्नागिरी जिल्हा जिंकण्याची इंग्रजांनी तयारी केली. कर्नल केनेडी यांच्या सैन्याने नोव्हेंबर १८१७ मध्ये सुवर्णदुर्ग जिंकला.[४६२] इ.स. १८१८च्या सुरुवातीला मंडणगड, दापोली तालुक्यातील इतर किल्ले जिंकले.[४६३] थोड्याच दिवसात खेड तालुक्यातील रामगड, पालगड, रसाळगड हे केनेडीने हस्तगत केले.[४६४] वसिष्ठी नदीच्या मुखावरील अंजनवेलचा किल्ला, गोवळकोट व चिपळूण तालुक्यातील इतर किल्ले १७ मे १८१८ रोजी इंग्रजांनी जिंकले.[४६५] रत्नागिरीच्या देशमुखांनी आपल्या ताब्यातील किल्ले व धुळप यांनी विजयदुर्गचा किल्ला जून महिन्यात इंग्रजांच्या ताब्यात विनाअट दिले.[४६६] अशाप्रकारे सर्व रत्नागिरी जिल्हा इंग्रजांच्या ताब्यात आला.

१ ऑक्टोबर १८१२ च्या तहाने कोल्हापूरकरांना मालवण बंदर, सिंधुदुर्ग, राजकोट, सर्जेकोट व पद्मगड मिळाले होतेच. इंग्रजांनी सावंतवाडीकरांशी तह करुन वेंगुर्ला बंदर व किल्ल्याचा ताबा घेतला. इ.स. १८१८ मध्ये सावंतवाडीकरांनी इंग्रजांचे मांडलिकत्व स्विकारले.

२० फेब्रुवारी १८१८ रोजी आष्टी येथील लढाईमुळे पेशव्यांची बाजू एकदम दुबळी झाली. अनेक मराठा सरदार इंग्रजांना फितुर झाले होते. जवळ असलेल्या नेमक्या सैन्यासहित सेनापती गोखले आष्टी येथे इंग्रज सैन्यावर चालून गेला. त्याने पराक्रमाची शर्थ केली पण इंग्रजांच्या गोळ्यांना बळी पडला. बापू गोखलेंच्या मृत्यूमुळे पेशव्यांची लष्करी बाजू एकदमच दुबळी झाली. आष्टीची लढाईचा निर्णय लागत असतानाच छ. उघडपणे इंग्रजांना जाऊन मिळाले. छत्रपतीच इंग्रजांच्या प्रभावाखाली जाताच पेशव्यांच्या इंग्रजविरोधी युद्धाचा राजकीय व कायदेशीर आधारच संपला. इंग्रजांनी छत्रपतींना सातारला स्थानापन्न करुन ताबडतोब छत्रपतींच्या नावाने एक जाहीरनामा काढला. यामध्ये इंग्रजाचे मित्र व शत्रू तेच छत्रपतींचे मित्र व

शत्रू मानण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. त्यामुळे मराठा राज्यांचा पेशवा म्हणून दुसऱ्या बाजीरावाने मराठा राज्यातील स्थान व अधिकार नष्ट झाले. तो एक बंडखोर ठरला. या आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये भोसले, शिंदे, होळकर यांची पेशव्यांना मदत होण्याची शक्यता नष्ट झाली होती.

अनेक मराठा सरदारांनी स्वार्थी हेतूने अंतस्थपणे एलफिस्टनशी संधान साधले होते. छत्रपतींचा जाहीरनामा निघताच छत्रपतींना एकनिष्ठ राहण्याचे निमित्त करुन या सरदारांनी पेशव्यांची साथ सोडली. हे सर्वजण आपापल्या वतनात परतले. पटवर्धन, पंतसचिव, प्रतिनिधी, येसाजीपंत गोखले, पंत अमात्य, अक्कलकोटचे माधवराव रास्ते असे अनेक सरदार मार्च १८१८ पर्यंत पेशव्यांना सोडून आपापल्या सैन्यासहित परत गेले.

अशाप्रकारे दुसरा बाजीराव एकटा पडला. उत्तर भारतामध्ये गेल्यानंतर तरी शिंदे, भोसले आपल्यास मदत करतील असे त्याला वाटले. इंग्रजांनी मार्च १८१८ मध्ये आप्पासाहेब भोसले यांना कैद करुन अलाहाबादला पाठविले. तो उत्तर भारताकडे जाण्यास निघाला. परंतु स्मिथ, प्रिटझलर, डोव्हटन, स्कॉट, ॲडम्स अशा अनेक लष्करी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील इंग्रज सैन्य त्याच्या पाठलागावर चहूबाजूंनी होते. दुसरा बाजीराव नागपूरकडे जात असताना एप्रिल १८१८ मध्ये त्याचे सिवनी येथे इंग्रजांशी युद्ध झाले. दुर्बळ व आत्मविश्वास हरवलेल्या दुसऱ्या बाजीरावाच्या सैन्याचा सिवनी येथे पराभव झाला. मोठी प्राणहानी होऊन उरले सैन्य चारी दिशांना पांगले. सिवनीच्या युद्धानंतर दुसरा बाजीराव व त्याच्या सहकाऱ्यांचे अतोनात हाल झाले. मार्च १८१८ पर्यंत मराठा स्वराज्यातील जवळजवळ सगळाच प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला. त्याला साधन सामग्री व अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाली. त्याचे सैन्य अतिश्रम, उपासमार, तहान, पराभव, निराशा यामुळे अत्यंत हवालदिल झाले होते. चाऱ्याअभावी घोडे व इतर प्राणी एका पाठोपाठ एक मरत होते.

दुसरा बाजीराव सर्व बाजूने असा अडचणीमध्ये सापडला. त्याचवेळी १० मे १८१८ रोजी इंग्रजांनी पुन्हा एकदा जाहीरनामा काढून दुसऱ्या बाजीरावाच्या सहकाऱ्यांनी त्याचा पक्ष सोडावा नाहीतर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल अशी धमकी दिली. त्यानंतर ताबडतोब दुसऱ्या बाजीरावाचा भाऊ चिमणाजी आप्पा, आप्पा देसाई, रामचंद्रपंत सुभेदार, नारोपंत आपटे दुसऱ्या बाजीरावाला सोडून आपापल्या प्रदेशात परत गेली. पराभूत होत असलेल्या दुसऱ्या बाजीरावापेक्षा समर्थ असा संभाव्य राज्याच्या मालकाची मर्जी राखणे या

सरदारांना अधिक महत्वाचे वाटले. आप्पासाहेब भोसले कैद झाल्यामुळे त्यांच्या मदतीची आशा संपली होती. शिंद्यांकडे मदतीसाठी दुसरा बाजीराव निघाला. ५ मे १८१८ रोजी दुसरा बाजीराव चोपडा येथे पोहोचला. इंग्रज सैन्याने या प्रदेशातील सर्व वाटा अडवल्या होत्या. दक्षिणेकडे परत फिरावे तर दक्षिणेकडून अनेक इंग्रज सेनापती त्याच्या पाठलागावर होते. चारी बाजूंनी वेढत्यामुळे दुसऱ्या बाजीरावाने अशीरगडमध्ये आश्रय घेतला.

दिर्घकाळ युद्ध रेंगाळत्यामुळे इंग्रजांना पेशव्याविरुद्धचे हे युद्ध लवकरात लवकर थांबावे असे वाटत होते. त्यातच पावसाळा जवळ आल्याने अशीरगड किल्ल्याचा वेढा रेंगाळेल याची जाणिव इंग्रजांना होतीच इंग्रज अधिकारी माल्कम याने दुसऱ्या बाजीरावाशी तडजोडीची बोलणी सुरु केली. दुसऱ्या बाजीरावाला आता इंग्रजांशी संघर्ष चालू ठेवणे अशक्य वाटत होते. मराठा राज्याचा सर्व प्रदेश प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष इंग्रजांच्या ताब्यात गेला होता. आश्रयासाठी जागा उरली नव्हती. सर्व सहकारी, नातेवाईक त्याला सोडून गेले होते. अशीरगडच्या किल्लेदार यशवंतराव लाड याला आलेल्या शिंद्यांच्या पत्रावरून शिंद्यांची मदत मिळणे अशक्य होते याची दुसऱ्या बाजीरावास जाणिव झाली. जवळ असलेले सैन्य निराशव दुर्बळ झाले होते. चारी बाजूला इंग्रज सैन्याचा वेढा होता. त्यामुळे दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजविरोधी युद्ध थांबवून त्यांच्या तडजोडीच्या बोलण्यास प्रतिसाद दिला.

२ जून १८१८ रोजी खैरी येथे माल्कम व दुसरा बाजीराव यांची भेट झाली. या भेटीत अंतिम कराराचा मसुदा ठरला. या तहाने दुसऱ्या बाजीरावाने मराठा राज्यावरील आपले सर्व अधिकार सोडले. वार्षिक आठ लाख पेन्शन घेऊन गव्हर्नर जनरलच्या मान्यतेने व मर्जीने बनारस व आजूबाजूच्या प्रदेशात राहण्याचे कबूल केले. या तहाबरोबर सातारा व आजूबाजूचा १४ लाखांचा प्रदेश सोडून मराठा राज्यातील सर्व प्रदेश इंग्रजांच्या ताब्यात गेला.

**निष्कर्ष –**

मंडणगड, बाणकोट हे किल्ले शिवपूर्व काळापासून अस्तित्त्वात होते. छ. शिवाजी महाराजांनी आदिलशाही सरदारांच्या ताब्यातून हे किल्ले जिंकले. मंडणगड हा किल्ला पालवणीचा आदिलशाही सरदार यशवंतराव दळवी यांच्या ताब्यात होता. त्यावेळी तो चिरेदुर्ग म्हणून ओळखला जात होता. यशवंतराव दळवी पळून गेल्यानंतर तो शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. छ. शिवाजी महाराजांनी चिरेदुर्ग किल्ल्यावर संरक्षणात्मक बांधकाम करुन त्या प्रदेशाचे

भुषण म्हणून मंडणगड हे संस्कृत नाव ठेवले. बाणकोट हा किल्लासुद्धा छ. शिवाजी महाराज यांनी आदिलशाही सरदार सिद्दीच्या ताब्यातून जिंकला. त्यावर संरक्षणाच्या दृष्टीने दुरुस्ती केली. सुवर्णदुर्ग ते बाणकोट दुसऱ्या बाजूला रसाळगड, सुमारगड, महिपतगड यांच्या दरम्यान किल्ल्यांच्या साखळीतील एक दुवा म्हणून मंडणगड जिंकल्याबरोबर पालगड हा नवा किल्ला बांधला. पालगड किल्ला बांधण्यासाठी योग्य अंतरावर पुरेसी दुर्गमता पुरविणारा डोंगरकडा उपलब्ध झाला. तो अचूक हेरुन छ. शिवाजी महाराजांनी तो उपयोगात आणला. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची राजधानी ही आदिलशहा, मोगल बादशहा व परकीय व्यापारी यांच्या आक्रमणापासून वाचविण्यासाठी रायगड किल्ल्याच्या सभोवती अनेक किल्ल्यांचे संरक्षणात्मक कवच निर्माण केले. या संरक्षणात्मक कवचातील बाणकोट, मंडणगड व पालगड हे महत्त्वाचे किल्ले आहेत. रायगड या प्रमुख किल्ल्यास सहाय्यक, पुरक म्हणून बाणकोट, मंडणगड, पालगड या किल्ल्यांनी काम केले. या किल्ल्यांचा उपयोग प्रशासकीय व राजकीय कार्यापेक्षा लष्करी गरजेच्या दृष्टीकोनातून अधिक होता.

पोर्तुगीजांच्या रुपाने स्वराज्यावर आलेला संभाव्य धोका भारतातील इतर राज्यकर्त्यांपेक्षा शिवाजी महाराजांनी द्रष्टेपणाने जाणला. त्यांनी समर्थ आरमाराबरोबर त्यास सहाय्यक आरमारी किल्ले जिंकले किंवा बांधले. बाणकोट हे अशाच महत्त्वाच्या आरमारी किल्ल्यांपैकी एक होता. शिवोत्तर काळामध्ये कान्होजी आंग्रे यांनी नाविक दलातील एक अधिकारी व सरखेल म्हणून सिद्दीच्या ताब्यातून बाणकोट, मंडणगड व पालगड हे किल्ले वारंवार जिंकले. शिवोत्तर काळामध्ये कान्होजी आंग्रे यांच्या पराक्रमामुळेच हे किल्ले स्वराज्यात राहिले.

छ. शाहू यांच्या काळात या किल्ल्यांचे महत्त्व कायम राहिले. मराठे व मोगलांच्या वतीने सिद्दी यांच्या संघर्षामध्ये उपरोक्त तीनही किल्ले विशेषतः मंडणगड व बाणकोट हे केंद्रस्थानी राहिले. जलमार्गे बाणकोट तर जमिनमार्गे पालगड व मंडणगड येथे लष्करी हालचाली करुन मराठ्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न सिद्दी व नंतर तुळाजी आंग्रे यांनी केला. संकटकाळामध्ये मंडणगड हा किल्ला बाणकोट किल्ल्यासाठी आधार किंवा सहाय्यक म्हणून उपयोगी पडत असे. मंडणगड या किल्ल्याचे स्थान लष्करी डावपेचांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. म्हणून मराठ्यांनी नेहमी बाणकोटबरोबरच मंडणगड हा किल्ला ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. मंडणगड किल्ला शत्रूच्या ताब्यात जाणे म्हणजे मराठ्यांच्या दृष्टीने अप्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. संभाजी आंग्रे

याने छ. व मानाजी आंग्रे विरोधात सिद्दीशी करार केला तेव्हा त्याचे महत्त्वाचे सत्ताकेंद्र असणाऱ्या सुवर्णदुर्ग यास धोका नको म्हणून सिद्दीस फत्तेदुर्गऐवजी मंडणगड देण्याचे कबूल केले.

छ. शाहूनंतर पेशवाईमध्ये स्वराज्याचा विस्तार उत्तर भारतामध्ये झाला. पेशव्यांनी दक्षिणेतील साम्राज्य दृढ करण्यापेक्षा उत्तर भारतात लक्ष केंद्रित केले. तोफखान्याच्या विकासामुळे किल्ल्यांचे लष्करी महत्त्व कमी झाले. त्यामुळे पेशवाईमध्ये कोकणातील इतर किल्ल्यांबरोबर बाणकोट, मंडणगड, पालगड या किल्ल्यांचे महत्त्व आधीच्या काळापेक्षा तुलनात्मकदृष्ट्या कमी झाले. शिवाजी महाराजांची दुरदृष्टी पेशव्यांनी दाखविली नाही. किल्ले व आरमार याकडे दुर्लक्ष झाले. तरीसुद्धा इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी यांच्याशी होणाऱ्या संघर्षकाळामध्ये या किल्ल्यांवर अपवादात्मक लष्करी हालचाली झाल्या. इ.स. १७५६ पासून इंग्रजांनी बाणकोट हे समर्थ व मजबूत लष्करी ठाणे निर्माण केले. स्वराज्यातील बंडखोरांनी कोकणातील किल्ल्यांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. सदाशिवराव भाऊच्या तोतयाने मंडणगड, बाणकोट व पालगड या किल्ल्यांवर आपले वर्चस्व निर्माण केले. पेशवाईमध्ये आश्रय घेण्यासाठी, धनसंपत्ती सुरक्षित ठेवण्यासाठी, तसेच कैदी ठेवण्यासाठी प्रामुख्याने या किल्ल्यांचा उपयोग झाला. उत्तर पेशवाईमध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यास या किल्ल्याचे महत्त्व कळले. इंग्रजविरोधी संघर्षासाठी त्याने मंडणगड व पालगड किल्ल्यांवर रसद, शिबंदी व शस्त्रसाठा करुन तयार ठेवले. या अंतिम लढ्यामध्ये मंडणगडच्या किल्लेदाराने त्याच्या शिबंदीसह इंग्रजांना तीव्र प्रतिकार केला. मंडणगडसारख्या तुलनेने लहान असलेल्या किल्ल्यावरुन एवढा तीव्र प्रतिकार इंग्रजांना अपेक्षीत नव्हता. इतका तीव्र प्रतिकार करुनही बलाढ्य इंग्रजांपुढे तो टिकू शकला नाही. मध्ययुगामध्ये उपरोक्त तीनही विशेषतः बाणकोट व मंडणगड किल्ल्यांच्या उपयोग व्यापार व वाणिज्य यावर नियंत्रण ठेवण्यासाठी झाला. शिवकाळापासून समुद्रकिनाऱ्यावरील व आरमारी वर्चस्वामध्ये बाणकोट किल्ल्याची भूमिका महत्त्वाची होती.

## संदर्भ

१) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्ह्याची दुर्गजिज्ञासा, बुकमार्क पब्लिकेशन, पुणे, २०११, पृ. ९,११,२३

२) Gazetteer of the Bombay Presidency, (Ratnagiri & Sawantvadi Districts), Vol X, Bombay, 1880, P. 776,

* गोगटे चिंतामण गंगाधर, महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग २, इंदिरा, पुणे, १९०७, पृ. ८९

३) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, भाग १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती, १९८८, पृ. २०७

४) Gazetteer of the Bombay Presidency, Vol - X, P. 780.

५) दिवेकर स.म. (संपा.), कवीन्द्र परमानंदकृत श्रीशिवभारत, शब्दवेध प्रकाशन, पुणे, १९८८, पृ. २७३.

६) कित्ता, पृ. २७०.

७) कित्ता, पृ. ३०९

८) दिवेकर स.म. (संपा.), परमानंदकृत श्रीशिवभारत, पृ. ३१६,

* राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ९, सत्कार्योतेजक सभा, धुळे, १९०६, पृ. ४१,४२

९) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड १, पृ. २०७

१०). कर्वे चिं.ग.(संपा.), ऐतिहासिक संकिर्ण निबंध, खंड ५ वा, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९५२, पृ. ७१

११) हेरवाडकर र.वि.(संपा.), श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस विरचित), व्हीनस प्रकाशन, पुणे, दु.आ. २०००, पृ. ९३,

* साने का.ना.(संपा.), रघुनाथ यादव उर्फ चित्रगुप्त विरचित शिवाजी महाराजांची बखर, काव्येतिहास संग्रह ११ व ९, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १८८८, पुणे, पृ. ३५.

१२) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, तुकाराम जावजी (निर्णयसागर), मुंबई १९०४, पृ. ९

१३) तत्रैव

१४) तत्रैव

१५) तत्रैव

१६) हेरवाडकर र.वि.(संपा.), श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस विरचित), पृ. ८८

१७) Apte B.K., A History of the Merchant Nevy & Merchentship, Stte Board For Literature & Culture, Bombay, 1973, P. 71

१८) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, पृ. ११

१९) मेहंदळे ग.भा., शिंत्रे सं.प्र., उपरोक्त, पृ. ६७

२०) कित्ता, पृ. ६८.

२१) कित्ता, पृ. ७४.

२२) कित्ता, पृ. ७५.

२३) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदिप, (जेधे शकावली), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९, पृ. २७

२४) मेहंदळे ग.भा., शिंत्रे सं.प्र. शिवछत्रपतींचे आरमार, परममित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०१०, पृ. ८८

२५) कुलकर्णी अ.रा.(संपा.), खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड १,कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. १८२,१८३

२६) पिसुर्लेकर पांडुरंग स.(संपा.), अनुवाद देसाई स.शं., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४, पृ. २१५,

* भारतीय इतिहास आणि संस्कृती, इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, मुंबई, एप्रिल १९६८, पृ. ५८

२७) पगडी सेतूमाधवराव(संपा.), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. ३३.

२८) आपटे द.वि.(संपा.), केळकर न.चि., शिवकालीन पत्र सारसंग्रह, खंड १, श्रीशिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०, पत्रांक १०८३, पृ. २९७, २९८

२९) भगत दत्ता(संपा.), कृष्णाजी अनंत सभासदकृत, श्री शिवछत्रतींचे चरित्र,प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००१, पृ. १७४

३०) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., उपरोक्त, पृ. ३०

३१) गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, नवकमल प्रकाशन, पुणे, द्वि. आ., १९७१, पृ. ७७.

३२) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, भाग २, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. २३

३३) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदीप(जेधे शकावली), पृ.३००

* पवार जयसिंगराव(संपा.), छ. संभाजी स्मारकग्रंथ, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, द्वि.आ., २००९, पृ. ३५५

३४) आपटे द.वि, दिवेकर स.म. .(संपा.), उपरोक्त, पृ. ३०

३५) शिवचरित्र कार्यालय, इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी, खंड २, पत्रांक ५०९, पृ. ३१३,

* जोशी शं.ना., संभाजीकालीन पत्रसार–संग्रह, भारत इतिहास संशोधन मंडळ, स्वीय ग्रंथमाला, पुणे, १९४९, पृ. १०२

३६) श्रीवास्तव आशिर्वादीलाल, मुगलकालीन भारत (१५२६–१८०३) शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी, आगरा, १९५३, पृ. ३१९

३७) खरे ग.ह.(संपा.), भारत इतिहास संशोधन मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. १०६, ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, (औरंगजेबाच्या दरबारचे बातमीपत्र), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९७३, क्र. २०६, २१०, २१५, पृ. ११९,१२३, १२५)

* Sarkar J.N., House of Shivaji, 3rd ed., Calcutta, 1955, P. 180-184

३८) पवार जयसिंगराव(संपा.), उपरोक्त, पृ. २३६

३९) Gazetteer of the Bombay Presidency, Vol - X, P. 195.

४०) खरे ग.ह. (संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, कलम २२२, पृ. १२८

४१) कित्ता, कलम ३६०, पृ. २११

४२) कित्ता, कलम २६३, पृ. १४९,

* गोखले कमल, उपरोक्त, पृ. २५१

४३) जोशी शं.ना.(संपा.), संभाजीकालीन पत्रसारसंग्रह, पृ. ११०

४४) पवार जयसिंगराव(संपा.), उपरोक्त, पृ. १०८

४५) खरे ग.ह.(संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, क्र. ३०९, पृ. १७८

४६) कित्ता, खंड ६, क्र. ३६७, पृ. २१७

४७) कित्ता, खंड ६, क्र. ३९९, ४०१, ४६५, पृ. २४४, २४६, २९६

४८) पवार जयसिंगराव(संपा.), छ. संभाजी स्मारक ग्रंथ, पृ. १९४

४९) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदिप, (जेधे शकावली), पृ. ३३

५०) खरे ग.ह.(संपा.), उपरोक्त, पृ. ३२

५१) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, पृ. २८

५२) Sarkar J. N., History of Aurangzib, Vol IV, Culcutta, 1972, P. 312

५३) कुलकर्णी अ.रा.(संपा.), खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ. ३८६

५४) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, भारत इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ. ८६

५५) तत्रैव

५६) खरे ग.ह.(संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, कलम . ४६३, पृ. २९४

५७) कित्ता, खंड ६, कलम ४७१, पृ. ३०३

५८) कित्ता, कलम ४८५, पृ. ३१४

५९) Mawjee P.V. (Edt.), Parasnis D.B., Kaifiyats, Yadis & C. Mawjec P.V., Bombay, 1908, P. 3

६०) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३२

६१) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), उपरोक्त, पृ. ३४

६२) Sardesai G.S., New History of the Marathas, Vol I to III, Phoenix Publications, Bombay, 1948, P. 314

६३) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), उपरोक्त,पृ. ३५

६४) पगडी सेतुमाधवराव, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, जोशी व लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. १७

६५) सोवनी अविनाश(संपा.), ऐतिहासिक बखरी, खंड १, (चेऊलची बखर), शब्दवेध प्रकाशन, पुणे. १९९८, पृ. २९.

६६) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), उपरोक्त, पृ. ३५

६७) साने का. ना.(संपा.), मल्हार रामराव विरचित श्रीमंत छ. संभाजी महाराज यांचे चरित्र, ३ री आवृत्ती, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९१५, पृ. २,३

६८) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), उपरोक्त, पृ. ३५

६९) तत्रैव

७०) कुलकर्णी अ.रा.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ. ४१७

७१) Gazetteer of Bombay Presidency, Vol X, P. 195

७२) कित्ता, पृ. ४१६

७३) आपटे द.वि., मुजुमदार ग.ना. (संपा.), शिवचरित्र साहित्य, भाग २, क्र. २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०, पत्र क्र. २२५, पृ. २२२

७४) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे घराण्याचा इतिहास, आंग्रे शकावली, बॉम्बे, १९३९, पृ. ४

७५) तत्रैव

७६) तत्रैव.

* पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३०

७७) Mawjee P.V. (Edt.), Parasnis D.B., Op. Cit., P. 3

७८) तत्रैव

७९) तत्रैव

८०) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, भारत इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ. १०६, १०७

८१) कित्ता, पृ. ५

८२) तत्रैव

८३) Apte B.K., Op. Cit., P. 75

८४) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ५

८५) तत्रैव.

भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्त, इ.स. १८३५, भारत इतिहास संशोधक मंडळ, पृ. १६५

८६) ढबू दा.गो., तत्रैव.

* Gazetteer of Bombay Presidency, Vol X, P. 75

८७) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, पृ. ३१

८८) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव चिटणीस कृत थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, काव्येतिहास संग्रह ६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १८८२, पृ. ३८

८९) Sen S.N., Early career of kanhoji Angrea & Other Papers, Unty of Calcutta, Calcutta, 1941, P.6

९०) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ६

९१) गर्गे स.मा., मराठी रियासत, खंड २, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. २३७

९२) सबनीस केशव गोविंद(संपा.), पंत अमात्य बावडा दफ्तर, खंड १, सबनीस के.जी., सेक्रेटरी जनरल बावडा, कोल्हापूर, १९३७, पृ. ९६

९३) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदीप, (शिवापूरकर देशपांडे वहीतील शकावली), पृ. ६७

९४) कुलकर्णी अ.रा.(संपा.), खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ. ४५०

९५) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ६

९६) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३३

९७) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ६

९८) जोशी पु. म.(संपा.), आवळसकर शां. वि., भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९६३, ले. ४४, पृ. ५९

९९) तत्रैव

१००) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३३

१०१) कित्ता, पृ. ७८.

१०२) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ७

१०३) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. १२५

१०४) तत्रैव

१०५) पुराणिक श.श्री., मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर (उत्तरार्ध) १६८९-१७०७, काळ प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९८२, पृ. २५४

१०६) कित्ता, पृ. २५६

१०७) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. १३०

१०८) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ७

* पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३४

१०९) पारसनीस द.ब., उपरोक्त, पृ. ३४

११०) Mawjee P.V.( Edt.), Parasnis D.B., Op. Cit., P. 4

१११) तत्रैव

११२) तत्रैव

११३) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ८

* Mawjee P.V.( Edt.), Parasnis D.B., Op. Cit., P. 4

११४) तत्रैव

११५) Mawjee P.V.( Edt.), Parasnis D.B., Op. Cit., P. 4

११६) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ८

११७) Mawjee P.V., Parasnis D.B. (Edt.), Op. Cit., P. 4

११८) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ८, ९

११९) मावजी पु.वि., पारसनिस द.बा. (संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, तह व करारमदार, पुरुषोत्तम विश्राम मावजी, मुंबई, १९१४, पृ. १९७, १९८

१२०) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३४

१२१) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P. 196

* फडके रामचंद्र माधवराव, रत्नागिरी जिल्हा. राजकीय इतिहास, राजापूर, १९२९, पृ. ६,७

१२२) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड, ४, राजवाडे वि.का चित्रशाळा, पुणे, १९००, पृ. ३५

१२३) Nairne, Alxander, History of the Konkan, Govt. Central Press, Bombay, 1894, P. 82

१२४) कुलकर्णी अ.रा.(संपा.), खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५, पृ. १२

१२५) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, (पेशव्यांची शकावली) विजापूरकर विष्णू गोविंद, कोल्हापूर, १९००, पृ. २५

१२६) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६, पत्रे यादी वगैरे, श्री. समर्थ प्रसाद, कोल्हापूर, १९०५, पृ. ४०

१२७) आवळसकर शांताराम विष्णू, आंग्रेकालीन अष्टांगर (अधिकारी शकावली), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४७, कलम २०, पृ. ४

१२८) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९

१२९) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, (पेशव्यांची शकावली), पृ. २४,२५

१३०) भोसले बी.के.(संपा.), जंजिरा संस्थानचा इतिहास, पृ. ६५

१३१) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३५

१३२) गुजर मा.वि.(संपा.), करवीर छ. घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड १२, गुजर मा.वि., पुणे, पत्रांक २०, नं. ३३, पृ. ३८,३९

१३३) Ramdas R.V. Relations between the Marathas and the Siddis of Janjira, Unpublished thesis submitted to the University of Bombay, 1965, P. 125

१३४) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १५

१३५) कित्ता, पृ. १६

१३६) श्रीवास्तव आशिर्वादीलाल, मुगलकालीन भारत, शिवलाल अग्रवाल अँन्ड कंपनी, आग्रा, पृ. ३९४,३९५
१३७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १०, बाजीराव आणि निजाम हर्षामर्ष(१७२०–१७४०), मुंबई सरकार, मुंबई १९३१, पत्रांक १, पृ. १ व ४
१३८) पारसनीस द.ब.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे व छ. शाहू यांची रोजनिशी, सहस्त्रकर सातारा, पृ. ७
१३९) तत्रैव
१४०) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १६
१४१) सरदेसाई गो.स.(संपा.), कुलकर्णी कृ.पा., काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, सरदेसाई सदाशिव रामचंद्र, पुणे, १९३३, पत्रांक १०, पृ. ११
१४२) पारसनीस द.ब.(संपा.), छ. शाहू यांची रोजनिशी, पृ. ७
१४३) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे, सरखेल, (आंग्रे शकावली), पृ. १६
१४४) पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, बाबाजी सखाराम आणि कं निर्णयसागर, मुंबई, १९०९, पृ. १९
१४५) आवळसकर शां.वि.(संपा.), ऐतिहासिक साधने, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६०, पृ. २
१४६) Gazetteer of Bombay Presidency, Vol X, P. 166
१४७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३२, उत्तरकालीन पेशवे कौटुंबिक राहणी, मुंबई सरकार, मुंबई, १९३३, लेखांक ९५, पृ. ८४,८५
१४८) पुरंदरे कृ.वा.(संपा.), भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीयग्रंथमाला ३२, पुरंदरे दफ्तर, भाग १, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२९, पत्रांक १०८, पृ. ७६,७७
१४९) पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पृ. १९
१५०) तत्रैव
१५१) तत्रैव
१५२) तत्रैव

१५३) कित्ता, पृ. ४२

१५४) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. २१

१५५) कित्ता, पृ. २२,

※ पारसनीस द.बा., धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पृ. ४४

१५६) कित्ता, पृ. ४६

१५७) तत्रैव

१५८) मावजी पु.वि., पारसनिस द.बा. (संपा.), तह व करारमदार, पृ. ४४

※ साने का.ना.(संपा.), काव्येतिहास संग्रहातील पत्रे यादी वगैरे, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १८८९, कलम २०,२१ ता. १६/०४/१७३१

१५९) फडके रामचंद्र माधव, उपरोक्त, १९२९, पृ. ७

१६०) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव (चिटणीस) कृत थोरले शाहू महाराजांचे चरित्र, पृ. ६८

१६१) तत्रैव

१६२) तत्रैव

१६३) तत्रैव

※ सोवनी अविनाश(संपा.), ऐतिहासिक बखरी, खंड २, जंजिऱ्याच्या सिद्दीची हकीकत, शब्दवेध प्रकाशन, पुणे, १९८८, पृ. ६२

१६४) साने का.ना. (संपा.), मल्हार रामराव कृत थोरले शाहू महाराजांचे चरित्र, पृ. ६८

१६५) तत्रैव

१६६) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ३७

※ साने का.ना. (संपा.), काव्येतिहास संग्रह, पत्रे यादी वगैरे, कलम १६६, पृ. १४३)

१६७) पुरंदरे कृ.वा.(संपा.), पुरंदरे दफ्तर, भाग १, लेखांक १००, पृ. ६९,७०,

※ ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे, सरखेल, (आंग्रे शकावली), पृ. ३७.

१६८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून, खंड ३, जंजिऱ्याच्या सिद्दीवर शाहूची मोहिम, १७३३–१७३६, पत्रांक ५४, मुंबई, १९३०, पृ. ४८

१६९) कित्ता, पत्रांक ५५, पृ. ४९

१७०) सरदेसाई गो.स.(संपा.), कुलकर्णी कृ.पा., काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३३, लेखांक १९, पृ. १६

१७१) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पृ. ६८

१७२) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३०, शाहू व पहिले दोन पेशवे–संकिर्ण(१७००–१७४०), मुंबई सरकार मुंबई, १९३३, पत्रांक ९५, पृ. ७१

१७३) पारसनीस द.ब., धावडशी येथील उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, (स्वामीना आलेली पत्रे) पत्रांक २०३, पृ. २०६

१७४) कित्ता, स्वामीनी लिहलेली पत्रे, पत्रांक ३३०, पृ. ३०४

१७५) पुरंदरे कृ.वा.(संपा.), पुरंदरे दफ्तर, भाग १, पत्रांक १०४, पृ. ७२,७३,
* ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ४०

१७६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३०, पत्रांक ९५, पृ. ६९,७०,७१

१७७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, जंजिऱ्याची मोहिम(पुरवणी), खंड ३३, मुंबई सरकार, मुंबई, १९३३, पत्रांक १५, पृ. ११

१७८) कित्ता, पत्रांक ३, पृ. २

१७९) कित्ता, पत्रांक ५१, पृ.४३

१८०) कित्ता, पत्रांक ९२, पृ. ८१,८२

१८१) कित्ता, पत्रांक १२१, पृ. १०५

१८२) कित्ता, पत्रांक १३४, पृ.११४

१८३) कित्ता, पत्रांक १४०, पृ. ११८

१८४) कित्ता, पत्रांक १३६, पृ. ११५

१८५) ढबू दा.गो., कुलाबकर, आंग्रे सरखेल, पृ. ५४.

※ सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक २९, पृ. २३.

※ सोवनी अविनाश(संपा.), ऐतिहासिक बखरी, १, चेऊलची बखर, पृ. ३१

※ सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३, मुंबई सरकार, मुंबई, १९३०, पृ. ३०

१८६) डबीर ना.सं.(संपा.), इतिहास संग्रह, आंगरे यांची हकीकत, भारत इतिहास संशोथन मंडळ, पुणे, १९०९, पृ. ६

१८७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक, १८४, १८९, पृ. १५५,१५८,१५९

१८८) कित्ता, खंड ३३, ले. ५८,५९, पृ. ४९,५०

१८९) आवळसकर शां.वि.(संपा.), आंगरेकालीन अष्टागर, पृ.११

१९०) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक १४९,१६१, पृ. १२३,१३६,१३७

१९१) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३०, पत्रांक ३२२, पृ. ३३१

१९२) कित्ता, पत्रांक २५६, पृ.२२९,

- संपा. पुरंदरे कृ. वा., पुरंदरे दफ्तर, भाग १, पत्रांक १००, पृ. ६९,७०

१९३) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, पत्रांक १७०, पृ. १४४

१९४) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३, पत्रांक १०९, पृ. ३२३

१९५) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक २३७, पृ. २१३

१९६) कित्ता, पत्रांक २३९, पृ. २१५

१९७) कित्ता, पत्रांक ३५८, पृ. ३०९

१९८) पारसनीस द. ब., मराठ्यांचे आरमार, पृ. ४६

१९९) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक १७३, पृ. १४५
२००) कित्ता, पत्रांक १७८, पृ. १४८,१४९
२०१) कित्ता, पत्रांक १७९, पृ. १५०,१५१
२०२) कित्ता, पत्रांक १७८, पृ. १४९,१५०
२०३) कित्ता, पत्रांक १८५, पृ. १५६
२०४) कित्ता, पत्रांक १८६, पृ. १५६,१५७
२०५) कित्ता, पत्रांक १८५, १९१, १९४, १९६, १९७, २०८, २११, पृ. १५८, १६०, १६१, १६३, १६५–१६७,१७७,१७९–१८१
२०६) कित्ता, पत्रांक १९६, पृ. १६५,१६६
२०७) कित्ता, पत्रांक २००, पृ. १७०
२०८) कित्ता, पत्रांक १९९, पृ. १६८,१६९
२०९) कित्ता, पत्रांक २०९, पृ. १७८,१७९
२१०) कित्ता, पत्रांक २३३, पृ. २१०,२११
२११) कित्ता, पत्रांक २३५, पृ. २११,२१२
२१२) कित्ता, पत्रांक २३५, पृ. २१२,२१३
२१३) कित्ता, पत्रांक २३७, पृ. २१३,२१४
२१४) कित्ता, पत्रांक २४०, पृ. २१६,२१७
२१५) तत्रैव
२१६) Ramdas R.V., Op. Cit. P.163.
२१७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक १४९, पत्रांक १६१, पृ. १२३, १३६,१३७
२१८) कित्ता, पत्रांक १६४, १६८, पृ. १३९, १४३
२१९) कित्ता, पत्रांक १८९, पृ. १५८,१५९
२२०) कित्ता, पत्रांक १६३, १७०, पृ. १३८, १३९,१४४.

२२१) कित्ता, पत्रांक २५६, पृ. २२९

२२२) कित्ता, पत्रांक २३९, पृ. २१५

२२३) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, पृ. ४४

२२४) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक ३३३, पृ. २८९

२२५) कित्ता, पत्रांक ३६९, पृ. ३१४,३१५

२२६) कित्ता, पत्रांक ३४४, पृ. २९८,२९९

२२७) कित्ता, पत्रांक ३३६, पृ. २९२,२९३

२२८) कित्ता, खंड ३, पत्रांक १३४, पृ. ११५

२२९) कित्ता, खंड ३३, ले. ३५०, पृ. ३०२,३०३

२३०) कित्ता, खंड ३३, पत्रांक ३५०, पृ. ३०२,३०३

२३१) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. १४५

२३२) बांग्रास ए.बी.(संपा.), अनु. देसाई सं.श., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, १९६८, पत्रांक १८३, १९२, पृ. ३७४, ३८१.

* सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, पत्रांक ३४०, पृ.२९६

२३३) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड–२२, पेशव्यांच्या रोजनिशीतील उतारे, मुंबई, १९३२, पत्रांक ३०७, पृ. १७०

२३४) तत्रैव

२३५) तत्रैव

२३६) कित्ता, पत्रांक १६६, पृ. १३७,

* कित्ता, पेशवे दफ्तर, खंड ३३, पत्रांक ३५५, पृ. ३०७

२३७) तत्रैव

२३८) कित्ता, खंड ३, पत्रांक १५९, १६४, पृ. १३३,१३५

२३९) कित्ता, पत्रांक १७५,१७६, पृ. १४३,१४४.

※ कित्ता, खंड ३३, पत्रांक ३४१, पृ. २९६

※ कित्ता, खंड २२, लेखांक ३०८, पृ. १७०

२४०) कित्ता, खंड ३३, पत्रांक ३८०, पृ. ३२३

२४१) तत्रैव

२४२) पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पत्रांक, २७८, पृ. २६१, २६२

२४३) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३, पत्रांक १७८, १७९, १९२, पृ. १४५,१४६,१५८

२४४) कित्ता, पत्रांक १७७, पृ. १४५

२४५) कित्ता, खंड ३३, पत्रांक ३७५,४०१, पृ. ३१९,३२०,३३८,३३९,

कित्ता, खंड ३, पत्रांक १९२, पृ. १५८

२४६) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४०१, पृ. ३३९

२४७) कित्ता, खंड ३, पत्रांक १७९, १८१, १८२, १८४, १९२, पृ. १४६-१५२, १५८

※ कित्ता, खंड ३३, पत्रांक ४०९, पृ. ३४४,

※ बडोदे राज्य दफ्तरातील ऐतिहासिक वेचे पुस्तक, १ ले (बदोडा दफ्तर) (१७२४ ते १७६८), बडोदे संस्थान रेकॉर्डस, बदोडे, १९३४, लेखांक १९, २०, पृ. १७,

※ बांग्रास ए.बी.द.(संपा.), अनु. देसाई स.श., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड ३ (आशिया विभाग), पत्रांक २०६, पृ. ३८९)

२४८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३, पत्रांक १८२, पृ. १४९

२४९) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४३२, पृ. ३६१

२५०) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४०५, पृ. ३४१,३४२

२५१) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४३६, पृ. ३६४

२५२) पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पृ. ७४,

※ सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १६, वसई मोहिम(१७३७–३९), मुंबई सरकार, मुंबई, १९३१, पत्रांक १०८, पृ. ८८

२५३) कित्ता, खंड १६, पत्रांक ३२, पृ. २५,२६

२५४) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४३१, पृ. ३६०

२५५) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४५३, ४५७, पृ. ३७५, ३७९,

※ पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवराम यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पत्रांक ३६५, पृ. ३३०, ३३१

※ फडके रामचंद्र माधवराव, रत्नागिरी जिल्हा, राजकीय इतिहास, पृ. ८

२५६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १,२, पृ. १,२

२५७) कित्ता, खंड ३३, पत्रांक ४५७, पृ. ३७९, ३८०

२५८) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे शकावली, पृ. ७९

※ पारसनीस द.ब.(संपा.), धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पृ. ७२

२५९) पारसनीस द.ब.(संपा.), तत्रैव

२६०) कित्ता, पृ. ८३

२६१) कित्ता, पृ. ८६

२६२) साने का. ना.(संपा.), काव्येतिहास–संग्रह, ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे, साने का. ना. प्र.आ., १८८९, पत्रांक ३५, पृ. ५५.

२६३) पारसनीस द.ब.(संपा.), धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पत्रांक ५६, पृ. ८५–८८.

२६४) तत्रैव

२६५) कित्ता, पृ. ९२,

* Parasnis D.B.( Edt.), Op. Cit., P.5

२६६) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९४,

* Parasnis D.B.( Edt.), Op.Cit., P.6

२६७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक ४, ५, पृ. ३,४

२६८) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे शकावली, पृ. ९५

२६९) Ramdas R.V., Op. Cit. P. 200

२७०) Ramdas R.V., Loc. Cit.

* ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९९

२७१) Ramdas R.V., Loc. Cit.

२७२) Ramdas R.V., Loc. Cit.

२७३) ढबू दा. गो., उपरोक्त, पृ. १००

२७४) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ४९, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४९, (१७४५) – पत्रांक ८, १७, १९, पृ. ८, १६, १८, १९.

२७५) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड ४, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. १०३

२७६) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ४ (१७४३), पत्रांक ९–११, पृ. ९–११

२७७) कित्ता, प्रस्तावना, पृ. १९

२७८) कित्ता, (१७४३), पत्रांक १९, पृ. २०

२७९) ढबू दा.गो., उपरोक्त,पृ. ९८,

* सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १३, पृ. ११,१२

२८०) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९८

२८१) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १२, पृ. १०

* ढबू दा. गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे शकावली, पृ. ९९, १००,१०३

२८२) पिसुर्लेकर पांडूरंग(संपा.) अनु. देसाई स. श., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड २, पत्रांक ६६, पृ. ३३, ३४

२८३) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक १०, पृ. ७,८

२८४) कित्ता, पत्रांक ५३, पृ. ५४

२८५) कित्ता, पत्रांक २०, पृ. १९

२८६) तत्रैव

२८७) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८, इ.स.१६४९ ते १८१७ पर्यतचे श्रीमंत गगनबावडेकर पंत अमात्य यांच्या डायरीतील लेख, विजापूरकर विष्णू गोविंद, कोल्हापूर, १९०५, पत्रांक १५४, पृ. १७८

२८८) कित्ता, पत्रांक १५६, पृ. १७९

२८९) पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रहमेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पत्रांक ७९, पृ. १११

२९०) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ४, (१७४३) पत्रांक ३७, पृ. ४०

२९१) कित्ता, (१७४५), पत्रांक १८, ३५, पृ. १७, ३४

२९२) पुरंदरे कृ. वा.(संपा.), पुरंदरे दफ्तर, खंड १, लेखांक ३६८-३६९,पृ.२७२, २७३ ३६९.

२९३) पारसनीस द. ब.(संपा.), सातारकर छत्रपती व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांची रोजनिशी, भाग १, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०७, कलम १२५ ते १३२, पृ. ८२ ते ८४.

२९४) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०३,

* पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, पृ. ४६

२९५) ढबू रा.गो., तत्रैव

२९६) तत्रैव

२९७) तत्रैव

२९८) तत्रैव

२९९) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, पृ. ४६

३००) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक ६९, ७०, पृ. ६८,६९

३०१) कित्ता, पत्रांक ७२, पृ. ७१,७२

३०२) तत्रैव

३०३) तत्रैव

३०४) पिसुर्लेकर पांडूरंग स., अनुवाद. देसाई स.श., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड २, पत्रांक १२, पृ. १४८, १४९

३०५) कित्ता, पत्रांक १३, पृ. १४९,१५०

३०६) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०६

३०७) तत्रैव

३०८) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. १९५

३०९) Parvate T.V., Portugese Maratha Relations, Bombay, 1983, P. 180

३१०) पुरंदरे कृ.वा.(संपा.), पुरंदरे दफ्तर, खंड १, पत्रांक १०४, पृ. ७२,
सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३०, पत्रांक ९५, पृ. ७०

३११) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०६

३१२) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, भाग ४, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. ३८४

३१३) Shrivastavya B.K., Angreys of Kolaba in British Records (1719 A.D. to 1884 A.D.), 1950, P. 132-133

३१४) Shrivastavya B.K., Loc. cit

३१५) Shrivastavya B.K., Loc. cit

३१६) Shrivastavya B.K., Loc. cit

३१७) Shrivastavya B.K., Loc. cit

३१८) Shrivastavya B.K., Loc. cit

३१९) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १२४, पृ. १२१

३२०) पारसनीस द. ब.(संपा.), सातारकर छत्रपती व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांची रोजनिशी, भाग १, कलम ८०, पृ. ६०.

* सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १२४, पृ. १२१

३२१) Shrivastavya B.K., Op. Cit., P. 135

३२२) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०७

३२३) फाळके आनंदराव भाऊ(संपा.), शिंदेशाही इतिहासाची साधने, भाग ३, (कोटेकर व दाभोळकर संग्रह), ग्वाल्हेर, १९३७, पत्रांक १६२, ३०६, पृ. १३४, २४७

३२४) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ५, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९५१, पत्रांक १२, पृ. ८,९

३२४) फडके रामचंद्र, रत्नागिरी जिल्हा राजकीय इतिहास, पृ. ८

३२५) Gazetteer of Bombay Presidency, Vol. X, P. 740

३२६) Nairne Alaxander, History of konkan, P. 92,

* Shrivastavya B.K., Op. Cit., P. 139

३२७) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ५, पत्रांक १५, पृ. १४,१५

३२८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १२१, पृ. ११८,११९

३२९) कित्ता, पृ. १६७,१६८

३३०) कित्ता, पत्रांक १५३,१५४,१५५, पृ. १५०–१५२

३३१) कित्ता, पत्रांक १५६, पृ. १५२

३३२) Shrivastavya B.K., Angreys of Kolaba in British Records, P. 141,142

* सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १६०,१६२, १६३, १६४, पृ. १५६–१६१

३३३) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे शकावली, पृ. ११४

३३४) Shrivastavya B.K., Op. cit

३३५) Shrivastavya B.K., Loc. cit

३३६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पत्रांक १७४, पृ. १७२,१७३

३३७) Shrivastavya B.K., Op., cit, P. 146

३३८) Shrivastavya B.K., Op., cit, P. 147

३३९) Shrivastavya B.K., Op., cit, P. 148

३४०) Shrivastavya B.K., Op., cit, P. 149

३४१) Shrivastavya B.K., Op., cit, P. 146

* पारसनीस द. ब.(संपा.), बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांची रोजनिशी, भाग १, कलम ८५, पृ. ६२.

३४२) जोशी बापू पुरषोत्तम(संपा.), सातारकर छत्रपती व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणे, १९११, कलम ४८१, पृ. ९२

३४३) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १२७

३४४) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३५, इंग्रजांचा साष्टीवर हल्ला, मुंबई सरकार, मुंबई, १९३४, पत्रांक ५४, पृ. ४६

३४५) तत्रैव

३४६) कित्ता, पत्रांक ५६, पृ. ४७

३४७) कित्ता, पत्रांक १११, पृ. ९२, ९३

३४८) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सातारकर छत्रपती व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०९, कलम ४४०, पृ. १७.

३४९) कित्ता, पत्रांक १२३, पृ. १०१

३५०) कित्ता, पत्रांक ४४१, पृ. १७

३५१) तत्रैव

३५२) कित्ता, पत्रांक ४४२, पृ. १८

३५३) कित्ता, पत्रांक ४४३, पृ. १८

३५४) कित्ता, पत्रांक ४४८, पृ. २२

३५५) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३५, मुंबई सरकार, १९३४, पत्रांक ५६, पृ. ४७

३५६) तत्रैव

३५७) साने का. ना., थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड १, डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी, पुणे, १९११, कलम ३१८–३२०, पृ. २९५–२९६.

३५८) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ५, वासुदेव वामन खरे, मिरज, १९०८, पत्रांक १५२०, पृ. २४००,२४०१

३५९) कित्ता, पत्रांक १५२१, पृ. २४०१, २४०२

३६०) कित्ता, पत्रांक १८५१, १८५२, पृ. २६२२,२६२३

३६१) तत्रैव

३६२) कित्ता, पृ. २४६४.

३६३) तत्रैव

३६४) कित्ता, पत्रांक १८५४, पृ. २६२६

३६५) तत्रैव

३६६) तत्रैव

३६७) कित्ता, पृ. २४६५

३६८) तत्रैव

३६९) Shrivastavya B.K., Op. Cit., P. 153-154

३७०) Shrivastavya B.K., Loc. cit

३७१) Shrivastavya B.K., Loc. cit

३७२) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ५, पृ. २४६६

३७३) तत्रैव

३७४) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, कलम ६०५, पृ. १२१.

३७५) कित्ता, कलम ६०६, पृ. १२२

३७६) कित्ता, कलम ६०७, पृ. १२२

३७७) कित्ता, कलम ६०९, पृ. १२३

३७८) कित्ता, कलम ६११, पृ. १२४

३७९) कित्ता, कलम ६१२, पृ. १२४

३८०) कित्ता, कलम ६१३, पृ. १२४

३८१) कित्ता, कलम ६१४, पृ. १२६

३८२) कित्ता, कलम ६१७, ६१९, ६२४, पृ. १२७, १२९, १३८)

३८३) कित्ता, कलम ६२१, पृ. १२९

३८४) पोतदार दत्तो वामन(संपा.), मुजुमदार गंगाधरराज, नारायणराव, ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१,पत्रांक १७१, पृ. २४९, २५०

३८५) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सातारकर छत्रपती व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड १, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८, कलम ३३६, पृ. १२१.

३८६) तत्रैव.

३८७) खरे वासुदेव वामनराव, अधिकार योग, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९०८, पृ. ७०.

३८८) खरे वासुदेव वामन, ऐतिहासिक लेख संग्रह, भाग ७, वासुदेव वामन खरे, पत्रांक २३२८, पृ. ३२३१

३८९) कित्ता, पृ. ३२३२.

३९०) कित्ता, पत्रांक २४०५, पृ. ३३३०

३९१) कित्ता, पत्रांक २३९८, पृ. ३३२४.

३९२) कित्ता, पत्रांक २४०२, पृ. ३३२९.

३९३) अप्रकाशित, शासकिय अभिलेखागार, पुणे, रुमाल कृ. १९, पुडके क्र. ५, पत्रांक १०९५२.

३९४) खरे वासुदेव वामनराव, अधिकार योग, पृ. ११०.

३९५) खरे वासुदेव वामन, ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ५, वासुदेव वामन खरे, मिरज, १९०२, पत्रांक १४५२, पृ. २३०६

३९६) मराठे कशिनाथ बाळकृष्ण, सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, ४८६, पृ. ४५,४६

३९७) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे, खंड ६०, अंक १–४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, इ.स. १९८१, पृ. २४

३९८) आवळसकर शांताराम विष्णू(संपा.), आंगरेकालीन अष्टागर, अथिकारी शकावली, कलम ६४, पृ. ११

३९९) तत्रैव

४००) भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक, १९८१, पृ. २७

४०१) तत्रैव

४०२) तत्रैव

४०३) तत्रैव

४०४) कित्ता, पृ. २८

४०५) तत्रैव

४०६) कित्ता,पृ. २९

४०७) तत्रैव

४०८) तत्रैव

४०९) तत्रैव

४१०) कित्ता,पृ. ३०.

४११) तत्रैव

४१२) तत्रैव

४१३) कित्ता, पृ. ३०,३१

४१४) तत्रैव

४१५) कित्ता,पृ. ३२.

४१६) खरे ग.ह., कुलकर्णी अ. रा.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड ३, मराठी सत्तेचा उत्तरार्ध(१७६१–१८४८), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. १९६.

४१७) तत्रैव

४१८) खरे यशवंत वासुदेव(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, यशवंत वासुदेव खरे, कोल्हापूर, १९३०, खंड १४, लेखांक ६५१२, पृ. ७६०२.

४१९) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड ८, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ. २३०

४२०) खरे यशवंत वासुदेव(संपा.), ऐतिहाससिक लेख संग्रह, खंड १४, लेखांक ६५१०, पृ. ७६००

४२१) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३१, मुंबई सरकार, मुंबई, १९३३, पत्रांक १६३, पृ. १४२, १४३

४२२) तत्रैव

४२३) तत्रैव

४२४) तत्रैव

४२५) तत्रैव

४२६) खरे ग.ह.(संपा.), जोशी शं.ना., ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड १०, त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५६, पत्रांक ५०, पृ. ४९

४२७) तत्रैव

४२८) कित्ता, पत्रांक ६०, पृ. ६२.

४२९) कित्ता, पत्रांक ६५, पृ. ६४.

४३०) कित्ता, पत्रांक ६७, पृ. ६४.

४३१) कित्ता, पत्रांक ६८, पृ. ६५.

४३२) कित्ता, पत्रांक ६९, पृ. ६५

४३३) तत्रैव.

४३४) तत्रैव.

४३५) कित्ता, पत्रांक ७०, पृ. ६५

४३६) तत्रैव.

४३७) तत्रैव.

४३८) तत्रैव.

४३९) कित्ता, पत्रांक १६६, पृ. १४६–१५१

४४०) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. २३१

४४१) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड ८, पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, १९९२, पृ. ५०८

४४२) कित्ता, पृ. ५००

४४३) खरे ग.ह., कुलकर्णी अ.रा.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड ३, पृ. २२०

४४४) कित्ता, पृ. २२१

४४५) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड ८, पृ. ५१०

४४६) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. २३१

४४७) कित्ता, पृ. २३२

४४८) तत्रैव.

४४९) BLACKER VALENTINE, MEMOIR OF THE OPERATIONS OF THE BRITISH ARMY IN INDIA DURING THE MAHRATTA WAR OF 1817, 1818 & 1819, LONDEN, 1821, P. 310

४५०) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. ३२३

※ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक, भारतीय इतिहास आणि संस्कृति, जुलै – सप्टेंबर २००७, वर्ष ४४, पुस्तक १७४, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ. ३१

४५१) BLACKER VALENTINE, Op. Cit, P.310

* Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, P.780)

४५२) BLACKER VALENTINE, LOC CIT.

४५३) Loc Cit.

४५४) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, पृ.२३२

४५५) तत्रैव.

४५६) तत्रैव.

४५७) कित्ता, पृ. २३३.

४५८) तत्रैव.

४५९) तत्रैव.

४६०) तत्रैव.

४६१) तत्रैव.

४६२) फडके रामचंद्र, उपरोक्त, पृ. १३

४६३) तत्रैव.

४६४) तत्रैव.

४६५) तत्रैव.

४६६) तत्रैव.

### प्रकरण चौथे

# सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा किल्ल्यांची ऐतिहासिक पार्श्वभूमी

## प्रास्ताविक –

रत्नागिरी जिल्ह्यातील भूशीरांवरील किल्ले अधिकतर नदीच्या काठावर आहे. बाणकोट, अंजनवेल किंवा गोपाळगड, गोवळकोट, रत्नागिरी, पूर्णगड, राजापूर, जैतापूर हे असे मोठे किल्ले आहेत. अंजनवेल किंवा गोपाळगड, जयगड व राजापूर हे किल्ले समुद्रसपाटीपासून खुप कमी उंचीवर आहेत. किनारपट्टीच्या अंतरभागातील किल्ले ज्यांचे स्वरुप सारखे आहे. ते शक्यतो सोईच्या ठिकाणी बांधले आहेत. जर ते समुद्रकिनाऱ्यावर असतील तर एखाद्या कड्यावर किंवा भूशिरावर, ज्याचा अर्ध्यापेक्षा जास्त भाग पाण्याने वेढलेला आहे. जर सखल प्रदेशात असेल तर एखाद्या सुळक्यासारख्या डोंगरावर नदीच्या किंवा खिंडीच्या टप्प्यात, घाटावर असेल तर एखाद्या मोठ्या खडकाच्या टोकावर किंवा मोठ्या नैसर्गिक चढणीवर, सर्वांच्या बांधणीमागे एकच तत्व असे.

रत्नागिरी जिल्ह्यातील शिवाजी महाराजांच्या समुद्रकिनाऱ्यावरील किल्ल्यांचे दोन प्रकार आहेत. एका प्रकारामध्ये हे किल्ले किनाऱ्यावर आहेत तर दुसऱ्या प्रकारामध्ये ते बेटावर उभारलेले असून त्यांच्याभोवती समुद्र आहे. सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग हे असे दुसऱ्या प्रकारातील बेटावर उभारलेले किल्ले आहेत. सुवर्णदुर्ग किंवा सोनगड शिवाजीच्या अशा बेटांवरील किल्ल्याचे उत्तम उदाहरण आहे. या किल्ल्यांच्या प्रचंड भिंती थेट समुद्रातून वर येतात. हा किल्ला जवळजवळ आठ एकर विस्तार असलेल्या बेटावर आहे. हे बेट फार उंच व सपाट नाही.

## सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा या किल्ल्यांचे भौगोलिक स्थान

सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा हे किल्ले रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दापोली तालुक्यामध्ये आहेत. हा प्रदेश रत्नागिरी व रायगड जिल्ह्याच्या सीमेवर आहे. हे सर्व किल्ले रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे या बंदराजवळच आहे. या सर्व किल्ल्यांचे मुंबईपासून जमीनमार्गे अंतर २५० कि.मी. आहे. सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा हे सर्व किल्ले दक्षिण कोकणमध्ये पश्चिम किनारपट्टीवर आहेत. हर्णे, आंजर्ले व दाभोळ ही बंदरे या सर्व किल्ल्यांपासून जवळ आहेत. सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा हे किल्ले रायगड या किल्यापासून सर्वसाधारणपणे

७८ कि.मी. तर प्रतापगड किल्ल्यापासून ९३ कि.मी. वर आहे. या किल्ल्यांपासून दापोली हा तालुका १८ कि.मी. आहे. मध्ययुगामध्ये आरमारी दृष्टिकोनातून सुवर्णदुर्ग किल्ला खुपच महत्त्वाचा होता. ते एक महत्त्वाचे आरमारी ठाणे होते, हे समकालीन कागदपत्रांवरुन कळते.[१]

सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा या किल्ल्यांचे अक्षांश रेखांश खालीलप्रमाणे आहे. सुवर्णदुर्ग किल्ल्याचे उ.१७°४९′ ०१.०५′′ पू. ७३°०५′ ०३.९१′′, कनकदुर्गचे उ.१७°४८′ ३१.३५′′ पू. ७३°०५′ २१.२३′′, फत्तेदुर्गचे उ. १७°४८′ ४४.५०′′ पू. ७३°०५′ २३.०८′′, तर गोवा किल्ल्याचे उ. १७°४८′ ५६.५६′′ पू. ७३°०५′ २५.६९′′ असे आहे.

सुवर्णदुर्ग हा बेटावरील किल्ला असून त्याच्या चारी बाजूने समुद्र आहे. या किल्ल्याचे क्षेत्रफळ आठ एकर आहे. किल्ल्याची अधिकतर तटबंदी भक्कम खडक फोडून तयार केली आहे. उरलेली तटबंदी दहा बारा चौरस फुटांच्या मोठमोठ्या चिऱ्यांनी बांधली आहे. या जलदुर्गातील शिबंदीस पुरेल एवढी गोड्या पाण्याची व्यवस्था त्यामध्ये आहे.[३] हा किल्ला समुद्रसपाटीवर आहे. या किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ थोडीशी तटबंदी व भग्न दरवाजाचे अवशेष आहेत. या किल्ल्यावर तीन तोफा आहेत. त्यापैकी दोन जमिनीत अर्ध्या गाडलेल्या आहेत तर सात फूट लांब आहे. ३० फूट उंच बुरुजांमधून प्रमुख दरवाजाकडे जाण्याची वाट आहे. प्रमुख दरवाजा चांगल्या स्थितीत असून त्याच्याजवळ अनेक शिल्पाकृती आहेत. दरवाजाच्या कमानी जवळच्या भिंतीवर हनुमानाचे कोरीव शिल्प आहे. कमानीवर मध्यभागी फुल कोरलेले आहे. या मुख्य दरवाजाच्या पायरीवर कासवाचे शिल्प आहे. कासवाला किल्ल्याची संरक्षक देवता मानतात.[२] दरवाजाच्या दोन्ही बाजूला देवड्या आहेत. डाव्या देवडीमध्ये दोन खोल्या बांधल्या आहेत. किल्ल्यामध्ये खडकात खोदलेले एकमेकांना जोडलेले तीन तलाव आहेत. पावसाचे पाणी या तलावात साठवून सैनिकांसाठी गोड्या पाण्याची सोय केली जाई. याशिवाय किल्ल्यामध्ये अजून एक तलाव, खडकामध्ये खोदलेले पाण्याचे टाके, बुजलेली विहिर आहे. किल्ल्याच्या पश्चिम तटबंदीवर पाच बुरुज आहेत. या तटबंदीला चार फूट उंचीचा चोर दरवाजा आहे. किल्ल्याला चोवीस बुरुज आहेत. किल्ल्यामध्ये अर्धवट बांधकाम व जोती आहेत. किल्ल्यामध्ये बोरीची व इतर झाडे–झुडपे वाढलेली आहेत.[३]

कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा हे सागरी किल्ले आहेत. कनकदुर्ग व फत्तेदुर्ग हे किल्ले सुवर्णदुर्गाच्या समोरच्या किनाऱ्यावर बांधले आहेत. सुवर्णदुर्ग व या दोन किल्ल्यांच्यामध्ये छोटीशी खाडी आहे.

कनकदुर्ग हा किल्ला हर्णे बंदरावर आहे. या बंदरावरुन किल्ल्यावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. हा किल्ला पायथ्यापासून २० मी. उंच आहे.[३] हा किल्ला तीन बाजूने समुद्राच्या पाण्याने वेढला आहे. समुद्राच्या बाजूला किल्ल्यास तटबंदी नाही. जमिनीच्या बाजूला तटबंदी व बुरुजाचे अवशेष आहेत. किल्ला चढतानाच एक बुरुज आहे. किल्ल्यावर दिपगृह आहे. किल्ल्यावर कातळामध्ये खोदलेली पाण्याची आठ टाकी आहेत. दिपगृहाशेजारीच त्याचे कार्यालय आहे.

हर्णे बंदरावरच कनकदुर्गाच्या अलीकडे एका लहान टेकडीवर फत्तेदुर्ग आहे. या किल्ल्याची पायथ्यापासून उंची २० मी. आहे.[४] भरतीच्या वेळी वहिवाटीसाठी कनकदुर्ग व फत्तेदुर्ग यांना जोडणारा दगडी पूल दिसतो. सध्या या पुलावरुन हर्णे बंदरापर्यंत जाणारा रस्ता आहे. सध्या या किल्ल्यावर कोळ्यांची दाट लोकवस्ती आहे.

गोवा या किल्ल्यास हर्णे दुर्ग असेही संबोधले जाते. हर्णे गावातून हर्णे बंदराकडे जाणाऱ्या डांबरी रस्त्यावर गोवा किल्ल्याचा कमानयुक्त दरवाजा आहे. दरवाजाच्या आतील टेकडीवर बालेकिल्ला आहे. किल्ल्याच्या उत्तर व पश्चिम दिशेस समुद्र आहे. किल्ल्याच्या उत्तर तटबंदीमध्ये बुजवलेला दर्या दरवाजा आहे. या दरवाजास देवड्या आहेत. या देवड्यांच्या जोत्यावर वाघासारख्या दिसणाऱ्या प्राण्यांची शिल्पे आहेत. ही शिल्पे शरभांची आहेत.[५] डाव्या बाजूच्या देवडीच्या जोत्यावर दगडी उंबऱ्याजवळ आतल्या पृष्ठभागावर अर्धवट गाडले गेलेले शरभाचे शिल्प आहे. महाकाय शरभाने आपल्या शेपटीमध्ये एका हत्तीला दाबून धरले आहे. याच दर्या दरवाजाच्या कमानीवर मध्यभागी अस्पष्ट असे पक्षीरुप गंडभेरुंडाचे द्वारशिल्प आहे.[६] या गंडभेरुंडाच्या दोन्ही बाजूला एक शरभ आहे. उजव्या बाजूचे शरभाचे शिल्प भग्न आहे. गंडभेरुंडाच्या डाव्या पायात वर्तुळाकार ढालीसारखे शस्त्र आहे. त्याचा उजवा पाय तुटला आहे. दर्या दरवाजाच्या बाहेर डाव्या देवडीच्या पायथ्याशी एक गंडभेरुंडाचे शिल्प आहे. या शिल्पामध्ये त्याने दोन पायात दोन व दोन चोचीत दोन असे एकूण चार हत्ती दाबून धरले आहेत, यावरुन हे शिल्प चतुर्गज विजयी पक्षी देहधारी गंडभेरुंड या प्रकारचे आहे.[७] उजव्या देवडीच्या खालच्या बाजूस ओळखता न येणारे अस्पष्ट शिल्प आहे. किल्ल्याच्या पश्चिम

तटबंदीवर चढण्यासाठी पायऱ्या आहेत. बाले किल्ल्यात इंग्रज काळातील दोन युरोपियन बंगल्यांचे अवशेष आहेत. किल्ल्याला सात बुरुज आहेत. किल्ल्यामध्ये बांधलेला तलाव आहे.

## शिवकालीन इतिहास

मल्हार रामराव चिटणीस आपल्या बखरीमध्ये म्हणतात, "लाक लढाऊ व कोळी व खलाशी ठेऊन त्यांनी दर्यात स्वारी-शिकारी करुन जंजिरेकर याजवरि दहशत पाडिली. दर्यात सर्व टोपीकर यांजवर इभ्रत पाडोन, सावकारी माल जाहाजे लुटोन, हरजिनसी दर्यातील पैदास्ती करुन महाराजांस आणोन देऊ लागले. खर्चही आरमाराचा मोठा, तो चालविते झाले. समुद्रांत सत्ता बसविली, दर्याकिनारा जागांजागां शहरे मारु लागले, व बेटे चांगली पाहून किल्ले बांधू लागले. समुद्रात सत्ता जाली. त्यांजवर द्रव्यही अपरिमित सांपडूं लागले."[८] इ.स. १६६१ ते १६६३ मध्ये शिवाजीने दाभोळ, राजापूर किल्ल्यावर विजयी आक्रमण केले. पल्लिवन व शृंगारपुरच्या अधिपतींना गुडघे टेकावयास लावले व सर्व रत्नागिरी जिल्हा त्यांच्या विजयी ध्वजाखाली आला.[९] शिवाजी महाराजांचा सरदार व्यंकाजी दत्तो ह्याने हबशावर चाल करुन त्याचा पराभव केला व त्याचा राजपुराशिवाय बराच प्रांत काबीज केला.[१०] शिवाजीने दंडा राजपुरांच्या परिसरातील सात किल्ले काबीज केले.[११]

सुवर्णदुर्ग किल्ला विजापुरच्या आदिलशहांने सोळाव्या शतकात बांधला असा उल्लेख बॉम्बे गॅझेटियर आहे.[१२] डाग रजिस्टरमध्ये १७ डिसेंबर १६६४ या तारखेची एक नोंद आहे. ती म्हणजे शिवाजीकडे ४० चांगल्या फ्रिगेट्स असून त्या खारेपाटण व राजापूरच्या नद्यांमध्ये आहेत. याशिवाय तो अजून ६० नव्या फ्रिगेट्स बांधत आहे. त्याचे मागे काहीतरी मोठा विचार आहे. अशा बातम्या रोज येत आहेत. तो वेंगुर्ल्यापासून जवळच कोठेतरी आक्रमण करेल असे वाटते. हर्णे या खेड्याच्या समोरील एका बेटावर तो एक अत्यंत मजबूत किल्ला बांधत आहे.[१३] सखोजी आंग्रे शके १५८५ किले सुवर्णदुर्ग इमारत करुन पुढे कुलाबियासी गेले.[१४] शहाजीराजे भोसले यांच्यासोबत तुकोजी आंग्रे इ.स. १६४० मध्ये चौलच्या मोहिमेत होते.[१५] १६४० मध्ये तुकाजी आंग्रे (कान्होजीचे वडील) व शहाजीराजांनी कोकण जिंकले. तेव्हा चौलच्या लढाईत पराक्रम दाखविला.[१६] तुकोजी आंग्रे यानंतर कोकण जिंकण्याच्या मोहिमेत गुंतले. यानंतर तुकोजी शिवाजी महाराजांच्या सेवेत रुजू झाले.[१७] इ.स. १६५९ मध्ये त्यांची किल्लेदार म्हणून बढती होऊन ते सुवर्णदुर्गचे किल्लेदार व संरक्षक झाले.[१८] इ.स. १६६३ मध्ये सेखोजी आंग्रे यांनी

सुवर्णदुर्गची तटबंदी बांधली.[१९] इ.स. १६७४ मध्ये मराठा आरमार बांधणीचा पद्धतशीर प्रयत्न झाला. यावेळी सुवर्णदुर्गची दुरुस्ती करण्यात आली.[२०] इ.स. १६७१–७२ मध्ये शिवाजी महाराजांनी स्वराज्याला आर्थिक स्थिरता लाभल्यावर किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी आर्थिक तरतुद केली. शिवाजी महाराजांच्या एका जाबित्यात इ.स. १६७१–७२ या वर्षासाठी वेगवेगळ्या किल्ल्यावर बांधकाम करण्यासाठीच्या खर्चाचा १ लाख ७५ हजार होनची तरतुद केलेला अर्थसंकल्प दिला आहे. त्यामध्ये सुवर्णदुर्ग या किल्ल्यावरील बांधकामासाठी १०,००० होनांची तरतुद केली आहे.[२१]

शिवाजी महाराज यांनी वडील शहाजीराजे यांच्या मध्यस्थीने विजापूरच्या अली आदिलशहाशी मैत्रीचा करार केला. त्याप्रमाणे कोकणातील इतर जिल्ह्यांसहित राजापूर शिवाजी महाराजाच्या मुलुखापैकी एक भाग म्हणून मान्य करण्यात आले. शिवाजी महाराजांनी जिंकून घेतलेल्या कोकणातील कल्याण ते फोंड्यापर्यंतचा व पश्चिमेस दाभोळ ते पूर्वेकडे इंदापूरपर्यंतचा प्रदेश शिवाजी महाराजांच्या ताब्यात देण्यात आला व त्यांचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले.[२२] शिवाजी महाराजांनी दक्षिण कोकणमधील खेळण्याचे शिर्के व शृंगारपूरचे सुर्वे यांना जिंकून आपल्या पक्षात घेतले. त्यामुळे वसईपासून मालवणपर्यंतचा कोकणचा पश्चिम किनारा, अंतरभागातील भूप्रदेशासहित शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला.[२३] इंग्रज व्यापाऱ्यांनी लिहिले आहे की, आदिलशाही सरकारने शिवाजीच्या मागण्या मान्य करुन कल्याण ते फोंडा हे सर्व कोकण व दाभोळ ते इंदापूर हा घाटमाथा व देशावरचे प्रदेश हे शिवाजीचे राज्य अशी कबुली दिली.[२४] कनकदुर्ग व फत्तेगड शिवोत्तर काळामध्ये बांधले होते. गोवा किल्ला कधी बांधला याचे संदर्भ मिळत नाहीत.

डाग रजिस्टर मध्ये शिवाजी महाराज हर्णे या खेड्यासमोरच्या बेटावर एक अत्यंत मजबूत किल्ला बांधत आहे. ही ३ ऑक्टोबर १६६४ च्या तारखेची नोंद व शकावलीमध्ये सेखोजी आंग्रे शके १५८५ (इ.स. १६६३–१६६४) किले सुवर्णदुर्ग इमारत करुन पुढे गेले या दोन्ही घटनांमध्ये नोंदलेला काळ एकच आहे. ब्रिटिश अधिकाऱ्याने बेटावर अत्यंत मजबूत किल्ला बांधत आहे, असा स्पष्ट उल्लेख केला आहे. सुवर्णदुर्ग किल्ल्याचा १६६४ पूर्वीचा उल्लेख अजूनपर्यंत आढळला नाही.[२५] यावरुन आदिलशहाने सोळाव्या शतकामध्ये सुवर्णदुर्ग किल्ला

बांधला असावा हा तर्क निराधार ठरतो. छ. शिवाजी महाराजांनी आरमार उभारणीस उपयुक्त म्हणून सुवर्णदुर्ग किल्ला बांधला. संपूर्ण रत्नागिरी जिल्हा जिंकल्यानंतर हर्णे बंदराजवळची जलदुर्गांस योग्य अशी जागा हेऊन सुवर्णदुर्ग किल्ला बांधला असावा. श्री. आपटे बी.के. यांनी आपल्या 'The Marathe Navy and Merchant Ship' या ग्रंथामध्ये तुकोजी आंग्रे शिवाजीच्या सेवेत रुजू झाले. १६५९ मध्ये किल्लेदार या पदापर्यंत त्यांची बढती होऊन ते सुवर्णदुर्गचे किल्लेदार व संरक्षक झाले. असा संदर्भ पृ. क्र. ७४ वर दिला आहे. हा संदर्भ त्यांनी श्री. ढबू दा. गो. यांच्या कुलाबकर आंग्रे सरखेल या ग्रंथातील आंग्रे शकावली मधील पृ.क्र. ३ वरुन घेतला असे नमुद केले आहे. उपरोक्त शकावलीमध्ये पृ.क्र.३ वर तुकोजी आंग्रे १६५९ मध्ये शिवाजी राजांच्या पदरी राहतात असाच संदर्भ आहे. ते सुवर्णदुर्गचे किल्लेदार झाल्याचा संदर्भ मावजी पुरषोत्तम विश्राम व पारसनीस डी.बी. संपादित दक्षिणेतील सरदारांच्या कैफियती यादी वगैरे ग्रंथामध्ये पृ.क्र. २ वर आहे. पण डाग रजिस्टर मधील नोंद समकालीन आहे. त्यामुळे ती जास्त विश्वसनीय आहे. तुकोजीचा पुत्र सेखोजी याच्या कारकिर्दीत या किल्ल्याचे बांधकाम झाले. इ.स. १६७४ मध्ये किल्ल्यांच्या दुरुस्तीसाठी व त्यावरील नवीन बांधकामांसाठी शिवाजी महाराजांनी भरघोस आर्थिक तरतुद केली. त्यावेळी आरमाराच्या दृष्टिने महत्वाचा असणाऱ्या सुवर्णदुर्ग किल्ल्यासाठी दहा हजार होनाची तरतुद त्यांनी केली. यावरुनच या किल्ल्याचे स्वराज्यातील महत्व लक्षात येते.

## शिवोत्तर काळाचा इतिहास

छ. शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० मध्ये रायगडावर झाला. महाराणी सोयराबाईने अष्टप्रधान मंडळातील पेशवे मोरोपंत पिंगळे, सचिव आण्णाजी दत्तो व न्यायाधीश प्रल्हाद निराजी या मंत्र्यांना सामील करुन राजाराम यास छ. करण्याचे कारस्थान रचले. संभाजीने हंबीरराव मोहित्यांच्या मदतीने १८ जून १६८० रोजी राजारामला सत्तेवरुन दूर करत मराठ्यांची सत्ता ताब्यात घेतली. राज्यारोहणानंतर छ. संभाजीने कोकणामध्ये लक्ष घातले. त्यांनी राजापूर येथे नव्या सुभेदाराची नेमणूक केली.[२६] रामनगर, जव्हार, कल्याण, भिवंडी, चौल, दाभोळ, राजापूर, कुडाळ, भीमगड, फोंडा, अंकोले ही कोकणातील ठिकाणे छ. संभाजीच्या ताब्यात होती.

बादशहा औरंगजेबाचा मुलगा शाहजादा अकबर याने वडिलांच्या विरोधात बंड केले. शाहजादा अकबर, दुर्गादास राठोड याच्यासोबत महाराष्ट्रात छ. संभाजीकडे आश्रय घेण्यासाठी पळून आला.[२७] शाहजादा अकबर रायगडच्या उत्तरेस २५ मैलावर नागोठण्याजवळ पाली येथे दि. १ जून १६८१ रोजी पोहोचला.[२८] छ. संभाजीने शाहजादा अकबराचे भव्य स्वागत केले. पालीमध्ये त्याची सोबतच्या लवाजम्यासहित राहण्याची व्यवस्था केली. बादशहा औरंगजेबास छ. शिवाजीच्या मृत्यूचा फायदा घेत मराठ्यांचे राज्य जिंकण्याची महत्वाकांक्षा होती. त्यातच छ. संभाजीने शाहजादा अकबरास आश्रय दिला. औरंगजेबाला निमित्त मिळाले. त्याने बंडखोर पुत्रास व मराठ्यांच्या छत्रपतीस शिक्षा देण्याचे निश्चित केले. त्याने दख्खनच्या मोहिमेचे नियोजन केले.

छ. संभाजीने १३ नोव्हेंबर १६८१ रोजी पातशहापूर (धोंडसे पालीजवळचे गाव, शाहजादा तेथे राहिल्यामुळे त्या गावास पातशहापूर असे नाव देण्यात आले होते.) शाहजादा अकबर याची भेट घेतली. छ. संभाजीने परत कवी कलश यांच्या सोबत जाऊन गजापूर येथे पुन्हा शाहजादा अकबर याची भेट घेतली.[२९] छ. संभाजीने दुरदृष्टी दाखवत शाहजादा अकबरास सुरक्षिततेसाठी अज्ञात स्थळी नेऊन ठेवले.[३०] बादशहा औरंगजेबाने दख्खनवर आक्रमण करण्यास प्रचंड सैन्य पाठविले. या मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी स्वत: औरंगजेब १३ नोव्हेंबर १६८१ रोजी बुऱ्हाणपूर येथे येऊन पोहोचला.[३१] औरंगजेबाने तोफखान्याचा दरोगा सलाबतखानाकडे बुऱ्हाणपुरात शिल्लक असलेल्या तोफखान्याविषयी चौकशी केली होती.[३२] बादशाह औरंगजेबाने हसन अलीखान बहादूर आलमगीरशाही (हसन अलीखान) यास चौदा हजार सैन्य देऊन दक्षिणेस तळकोकणात आक्रमण करण्यासाठी पाठविले.[३३] शाहजादा शहाआलम ९ नोव्हेंबर १६८१ रोजी औरंगाबादला दाखल झाला.[३४] शाहजादा आजमशहा औरंगाबादवरुन पुढे चांभार टेकडी येथे आला.[३५] त्यानंतर शाहजादा आजमशहा बादशहाच्या आज्ञेप्रमाणे गुलशनाबादवरुन औरंगाबाद येथे दाखल झाला.[३६] मोगल सरदार हसन अलीखान अनेक अडचणींचा सामना करत कोकणामध्ये आला.

औरंगजेबाचे आक्रमण होण्यापूर्वी छ. संभाजी जंजिऱ्याच्या सिद्दीविरोधी मोहिमेत गुंतले होते. सिद्दी आता आदिलशाहीची सेवा सोडून मोगल बादशहा औरंगजेबाच्या आश्रयास गेला

होता. तो आता मोगल सरदार झाला होता. त्यामुळे इंग्रजांनी सिद्दीला मुंबई बेटावर राहण्याची परवानगी दिली. सिद्दीने या संधीचा उपयोग मराठ्यांच्या प्रदेशावर आक्रमण करण्यासाठी केला. त्याने मुंबईत राहून मराठ्यांच्या प्रदेशात लुटालुट व जनतेवर अत्याचार केले. सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी छ. संभाजीने सिद्दीची जहाजे जाळली. दोनशे सैन्य उंदेरी किल्ल्यात घुसविण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. यावेळी बरेच सैन्य सिद्दीच्या सैन्याकडून मारले गेले किंवा कैद झाले. सिद्दी, मराठे व इंग्रज यांच्यामध्ये कोकण किनारपट्टीवर अनेक छोट्या–मोठ्या आरमारी लढाया होत होत्या.

छ. संभाजीने मराठी प्रदेशातून मुंबईला होणारा धान्यपुरवठा बंद केला.[३७] दमण येथे पोर्तुगीजांनी छ. संभाजी महाराजांच्या काही माणसांना ठार मारले. मराठ्यांना हे कळताच त्यांनी मराठ्यांच्या प्रदेशातील पोर्तुगीजांची घरे जाळली.[३८] सिद्दीने ७ डिसेंबर १६८१ मध्ये मराठ्यांनी आपटे व नागोठणे ही गावे लुटून जाळली.[३९] अशाप्रकारे छ. संभाजीना सत्तेवर येताच कोकणामध्ये इंग्रज, पोर्तुगीज या परकियांशी व मोगल सरदार जंजिऱ्याच्या सिद्दीशी सतत संघर्ष करावा लागला. सिद्दीने औरंगजेबास शाहजादा अकबर व छ. संभाजीच्या हालचालींची माहिती कळवली.[४०] सिद्दीचा बंदोबस्त करण्यासाठी छ. संभाजीने कोंडाजी फर्जद याच्या मदतीने जंजिरा जिंकण्याचे कारस्थान रचले. त्याप्रमाणे कोंडाजी फर्जद ह्याने जंजिऱ्यामध्ये सिद्दीच्या सैन्यामध्ये नोकरी मिळवली. तो आपल्या कुटुंबासहित जंजिरा किल्ल्यामध्ये राहू लागला. सिद्दीला या कटाचा सुगावा लागला. सिद्दीने कोंडाजी फर्जदसह कारस्थानामध्ये सामील असणाऱ्यांना ठार मारले. हा प्रयत्न अयशस्वी होताच छ. संभाजीने दादाजी रघुनाथ देशपांडे यास जंजिऱ्यावर आक्रमण करण्यासाठी पाठविले. पाठोपाठ स्वतः शाहजादा अकबर व वीस हजार सैन्यानिशी दादोजी देशपांड्यांच्या मदतीस आले. सतत १५ दिवस तोफखान्याच्या माऱ्याने दंड राजपुरीच्या किल्ल्याची भिंत पाडण्याची सुरुवात झाली. सिद्दीचे सैन्य खडकामध्ये लपून स्वतःचे संरक्षण करत होते. पोर्तुगीजांना या हल्ल्यात मराठ्यांना मदत करावी, असे आवाहन व मदत नाही केली, तर कारवाईची धमकी छ. संभाजी यांनी पत्राद्वारे दिली. पोर्तुगीजांनी त्यास दाद दिली नाही. स्वतः छ. संभाजी या मोहिमेवर होते. जानेवारी १६८२ च्या सुमारास जंजिऱ्याच्या या मोहिमेची सुरुवात झाली होती. सिद्दीच्या सैनिकांनी जवळच्याच टेकड्यांमध्ये आश्रय घेतला. सिद्दी खैरातखान यास दंडराजपुरीस आश्रय न मिळाल्यामुळे तो तेथून पळून गेला. सिद्दी शरण

येईपर्यंत ही मोहिम चालविण्याचा संभाजीचा मानस होता. सिद्दी हळूहळू येथून आपले आरमार मुंबई बंदरामध्ये नेत होता. संभाजीला अरब आरमाराची मदत होती. पण मोगल सरदार हसन अलीखान याने कल्याणवर आक्रमण केले होते. त्यामुळे छ. संभाजीना त्याचा बंदोबस्त करण्यासाठी निघावे लागले. दादाजी रघुनाथ देशपांडे (प्रभू) यांच्यावर जंजिऱ्याची मोहीम सोपवून कल्याणला हसन अलीखानास प्रतिकार करण्यास गेले.

कान्होजी आंग्रे सुवर्णदुर्गाचा अधिकारी अचलोजी मोहिते यांचेकडे नोकरीस होते.[४१] संभाजी राजांनी सत्तेवर येताच कान्होजी आंग्र्यांचा एकनिष्ठपणा पाहून कोकणातील प्रदेशावर हल्ले करण्याचा हुकूम, अधिकार त्यांना दिला. यावेळी कान्होजीने कोकण पट्टीतील सर्व किल्ले व मोगलांच्या ताब्यातील किल्ले युद्धे करुन घेतले.[४२] कान्होजी आंग्रे संभाजीच्या काळात फिरत्या आरमाराचा प्रतिनीधी होता.[४३]

अशाप्रकारे मोगलांचे मराठ्यांविरुद्धचे दक्षिण कोकणातील आक्रमण अयशस्वी ठरले. मराठे अतिशय पराक्रमाने लढले. ते मोगलांपेक्षा लष्करी डावपेचामध्ये वरचढ ठरले. मराठ्यांच्या पराक्रमाने व रसदेच्या कमतरतेमुळे औरंगजेबाची कोकणात सैन्य पाठवून संभाजी महाराजांना नामोहरम करण्याची योजना फसली.

छ. संभाजी यांच्या कारकिर्दीच्या अगदी शेवटच्या काळामध्ये कान्होजी आंग्रेच्या कार्याची सुरुवात झाली. जंजिऱ्याच्या सिद्दी खैरातखानाने इ.स. १६८९ सुवर्णदुर्गवर आक्रमण केले. सुवर्णदुर्गला वेढा दिला. बाहेरून किल्ल्यामध्ये जाणारी रसद बंद झाली. शेवटी किल्लेदार अचलोजी मोहिते यांनी किल्ला खैरातखानाच्या ताब्यामध्ये देण्याची तयारी केली. अचलोजी मोहिते यांचे सहाय्यक कान्होजी आंग्रे यांना सिद्दीला शरण जाणे मान्य नव्हते. कान्होजीने अंतस्थपणे संभाजी राजांशी संपर्क साधला. त्यांच्या आज्ञेप्रमाणे अचलोजी मोहिते यास कैद केले. कान्होजीने किल्ल्याबाहेर येऊन सिद्दीच्या सैन्यावर जोरदार हल्ला चढविला. यावेळी कान्होजीस सिद्दीने कैद केले. रात्रीच्या वेळी कान्होजी कैदेतून युक्तीने पळून गेले. ते पाण्यातून पोहत परत सुवर्णदुर्गमध्ये गेले. पराक्रमाची शर्थ करुन सुवर्णदुर्ग राखला. सिद्दीने कान्होजी आंग्रेशी तह केला.[४४] यानंतर कान्होजी आंग्रे यांना सुवर्णदुर्गचे किल्लेदार म्हणून नेमण्यात आले.[४५] स्वराज्यात ठिकठिकाणी मोगलांची धामधुम सुरु होती. मोगल सरदार स्वराज्यातील अनेक

किल्ले जिंकत तर मराठे गनिमी काव्याने ते परत घेत. या युद्धजन्य परिस्थितीत शृंगारपुरचे गणोजी शिर्के व कवि कलश यांच्यामध्ये संघर्ष निर्माण झाला. कवि कलशाचा छ. संभाजीवरील वाढता प्रभाव अनेक मराठा सरदारांना सहन होत नव्हता. ऑक्टोबर-नोव्हेंबर १६८८ मध्ये कवि कलश व शिर्के यांच्यामध्ये वितुष्ट आले. कवि कलश शिर्क्यांना घाबरुन खेळणा किल्ल्यावर आश्रयास गेले.[४६] कवि कलशाच्या सांगण्यावरुन छ. संभाजीने प्रल्हाद निराजी व इतर सरकारकून यांना कैद केले.[४७] छ. संभाजीना शिर्क्यांच्या कवि कलशावरील आक्रमणाची बातमी कळताच ते कवि कलशाच्या मदतीसाठी खेळणा किल्ल्यावर गेले. खेळण्यास संभाजीने शिर्क्यांचा पराभव केला. शिर्के मोगल सरदार मुकर्रबखानाच्या छावणीत आश्रयास गेले.[४८] छ. संभाजी कवी कलशासह खेळण्यावरुन पन्हाळामार्गे रायगडला येण्यासाठी निघाले. रायगडकडे परतण्याच्या प्रवासामध्ये जानेवारी १६८९ मध्ये दोघे संगमेश्वर येथे पोहोचले. संगमेश्वरला देसायाने शिर्क्यांशी असलेला वाद छ. संभाजीना सांगितला. त्यानंतर संभाजीने शिर्क्यांच्या मोकासा काढून गाव सरकारमध्ये ठेवले. छ. संभाजी संगमेश्वर असतानाच मोगल सरदार शेख निजाम पन्हाळ्यावर आक्रमण करण्यासाठी कोल्हापूरपर्यंत गेला. मुकर्रबखानाचे चपळ हेर कोल्हापूर भागात सर्वत्र पसरलेले होते. या हेरांनीच छ. संभाजी संगमेश्वर मुक्कामी असून त्याच्याकडे थोडेच सैन्य असल्याची बातमी मुकर्रबखानास दिली.[४९] मुकर्रबखानाने इतस्तत: पसरलेल्या मराठा सरदार व सैन्याला गाफील ठेवत संगमेश्वर गाठले. संगमेश्वरला तो पोहचेपर्यंत संभाजी राजांना ही खबर मिळू शकली नाही. छ. संभाजीकडे फक्त ४००-५०० भालाईत स्वार होते. तर मुकर्रबखानाकडे २०००-३००० सैन्य होते.[५०] छ.संभाजी मुकर्रबखानाच्या आगमनाची बातमी कळताच त्याचा प्रतिकार करण्यास सज्ज झाले. संगमेश्वरजवळच हे युद्ध झाले. मराठा सरसेनापती मालोजी घोरपडे व इतर अनेक मराठा सैनिक या युद्धात ठार झाले. पराभव अटळ दिसताच संताजी घोरपडे व खंडो बल्लाळ एका दिशेने तर छ. संभाजी व कवि कलश दुसऱ्या दिशेने युद्धभूमीपासून दूर पळाले. नावाडी येथे छ. संभाजी व कवि कलश यांना १ फेब्रुवारी १६८९ रोजी मुकर्रबखानाने पकडले.[५१] १५ फेब्रुवारी १६८९ रोजी मुकर्रबखानाने छ. संभाजी व कवि कलश यांना बहादुरगड येथे औरंगजेब बादशहासमोर हजर केले. ११ मार्च १६८९ रोजी छ. संभाजी व कवि कलश यांना कोरेगाव उर्फ फतहाबाद येथे तलवारीने ठार मारण्यात आले.

जेधे शकावलीमध्ये त्यांना तुळापूर येथे मारल्याचा उल्लेख आहे. छ. संभाजीच्या अवशेषांचे दहन तुळापूरच्या संगमावर झाले असावे. औरंगजेबाच्या कैदेतून सुटल्यानंतर छ. शाहू व येसुबाई यांनी तुळापूर येथे वृंदावर बांधले. येथे पुजा–अर्चा करण्यासाठी व सभोवताली बाग करण्यासाठी छ. शाहूंनी भिकाराम गोसावी व वासुदेव भट यांना येथील जमीन इनाम दिली.

## छ. राजाराम व महाराणी ताराबाई काळ (१६८९ ते १७०७)

छ. संभाजी महाराज मोगलांच्या कैदेत पडल्याने स्वराज्यावर मोठे संकट कोसळले. महाराणी येसुबाईने व रायगडवरील मराठी मुत्सद्यांनी राजाराम यांना नजरकैदेतून मुक्त केले. १२ फेब्रुवारी १६८९ रोजी राजाराम यांच्याकडे स्वराज्याचे नेतृत्व देऊन त्यांना मराठ्यांचे छ. करण्यात आले. मोगल संनापती झुल्फिकारखान याने २५ मार्च १६८९ रोजी रायगडला वेढा घातला. बिरवाडीचा देशमुख नरसोजी गायकवाड मोगलांना फितूर झाला. त्याने झुल्फिकारखान यास रायगडच्या माऱ्याच्या जागांची व इतर माहिती पुरवली. रायगड लढविणे अशक्य दिसताच येसुबाईंनी छ. राजाराम यास रायगडवरुन पळून जाण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणे छ. राजाराम यांनी रामचंद्रपंत अमात्य बावडेकर, प्रल्हाद निराजी प्रतिनिधी, शंकराजी नारायण व इतर मराठा सरदारांसहित ५ एप्रिल १६८९ रोजी रायगड सोडला. ते स्वत: मोगलांविरुद्धची मोहीम तीव्र करण्यात गुंतले. छ. राजाराम यांनी प्रतापगडला जाऊन अनेक मराठा सरदारांना पत्रे लिहली. अनेक किल्ल्यांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथे संरक्षणाची सिद्धता केली. अनेक मराठा सरदारांना वतने देऊन आपल्या बाजूस वळवून घेतले. मोगलांचा हल्ला चुकवत छ. राजाराम प्रतापगड, वासोटा, सातारा, पन्हाळा येथे आश्रयास गेले. या दरम्यान सेनापती संताजी घोरपडे, बहिर्जी व मालोजी घोरपडे बंधू, विठोजी चव्हाण यांनी मोगलांना गनिमी काव्याने त्रस्त केले. छ. संभाजीच्या मृत्यूनंतर मोगलांनी मराठ्यांचा बराच प्रदेश जिंकला होता. रत्नागिरीचा थोडा प्रदेश, सातारा, परळी, विशाळगड, राजमाची, कुलाबा हे किल्ले मराठ्यांच्या ताब्यात होते.

छ. राजाराम पन्हाळा येथे असताना मोगलांनी पन्हाळ्यास वेढा घातला. छ. राजाराम यांनी रामचंद्रपंत अमात्य बावडेकर यांना हुकूमतपन्हा (राज्याचा आधार) हा किताब दिला व स्वराज्याचा कारभार त्यांच्यावर सोपवला. त्यानंतर छ. राजाराम सहकाऱ्यासह २६ सप्टेंबर १६८९ रोजी पन्हाळ्याच्या वेढ्यातून निसटून जिंजीला गेले.

मल्हार रामराव चिटणीस म्हणतात, "छ. राजारामाने जिंजीस आश्रय घेतला, त्यावेळी आरमारप्रमुख सिदोजी गुजर यास सोबत नेले. सिदोजी गुजराने सुवर्णदुर्गचा कारभार कान्होजी आंग्रेंच्या हाती सोपवला."[५२]

कान्होजी आंग्रे यांच्या काळात सुवर्णदुर्ग येथे पुढील दहा अंमलदार होऊन गेले. दत्ताजी आंग्रे(कान्होजीचा चुलतभाऊ), त्रिंबक गणेश, बकाजी नाईक महाडिक, दत्ताजी जाचक, हरजी नाईक कदम, मिजी बर्गे, मोत्याजीराव विचारे, रुद्राजी धुळप, बाबुराव साटम वरामजी पटेल इत्यादी.[५३]

पहिल्यापासून आंग्रे हे दर्यावर्दी वीर होते. इ.स. १६४० मध्ये तुकोजी आंग्रे यांनी शहाजी भोसले यांच्या आरमारावर चौल येथे मोठा पराक्रम केला. त्यामुळे  ते प्रसिद्धीस आले. त्यानंतर तुकोजीचा पुतण्या दत्ताजी आंग्रे हा काही दिवस सुवर्णदुर्गचा सुभेदार होता. याच वेळी कान्होजी आंग्रे हे प्रसिद्धीस येऊ लागले. सुवर्णदुर्गचा सरखेल अचलोजी मोहिते याचेवर जंजिरेकर सिद्दी याने स्वारी केली. त्यावेळी कान्होजी आंग्रे यांनी मोठ्या पराक्रमाने त्याचा वेढा उठवला. तेव्हापासून कान्होजीला मराठा आरमाराची मुख्य जागा सरखेली मिळाली.[५४] सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग प्रांताचा कारभार सेखोजी व तुळाजीस सांगितला.[५५]

कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा हे किल्ले कोणी बांधले. या संदर्भात वेगवेगळे उल्लेख मिळतात. इ.स. १७१० मध्ये सुवर्णदुर्गधिपती कान्होजी आंग्रे यांच्यावर दबाव ठेवण्यासाठी छ. शाहूनी कनकदुर्ग व फत्तेगड हे किल्ले बांधले. कान्होजी आंग्रे छ. शाहूंच्या पक्षात आल्याबरोबर कनकदुर्ग व फत्तेगड हे दोन्ही किल्ले शाहूने आंग्र्यांना दिले.[५६] छ. शाहूच्या मृत्यूनंतर जंजिऱ्याचा खानसाहेब यांनी सुवर्णदुर्गला शह देण्यासाठी कनकदुर्ग व फत्तेदुर्ग हे किल्ले बांधले व तालुक्यावर वर्चस्व निर्माण केले.[५७] सुवर्णदुर्गामध्ये अचलोजी मोहिते व कान्होजी आंग्रे हे होते. आंग्र्यांनी पराक्रमाने सुवर्णदुर्ग राखला. जंजिऱ्याच्या सिद्दीचा अंमल तालुक्यावर होता. इ.स. १७०० मध्ये जंजिऱ्याच्या सिद्दीचे सुवर्णदुर्ग तालुक्यावरील अधिकारी, सुभे धर्म सावंत, हरबाराव दळवी सिद्दी याकुब हे होते. या सर्वांनी अंजनवेलला राहून कारभार पाहिला.[५८] अचलोजी मोहिते सिद्दीस शरण जाऊ लागला म्हणून कान्होजी आंग्रेने त्यास कैद केले. पराक्रमाने सुवर्णदुर्ग राखला. कनकदुर्ग व फत्तेगड याच्या शहासाठी गोवा किल्ला बांधला.[५९] सुवर्णदुर्ग तालुक्यावर ३३ वर्षे दुतर्फा अंमल चालला. आंग्र्यांचा अंमल ११ वर्षे चालला. जाधव, महाडिक, हरजी नाईक कदम,

मोत्याजीराव विचारे, रामजी नाईक पाटोळे हे आंग्र्यांचे सुभे पदावरील अधिकारी होते.[६०] शाहीर बापू गीरकर यांच्या सवाई जानराव धुळपांच्या पोवाड्यामध्ये आंग्र्यांनी विजयदुर्ग, कनकदुर्ग, गोवागड, सारंगगड हे किल्ले बांधले, असा उल्लेख आहे. ''या तळे कोकणामधिराव आंगरा होता जी ।। त्याने विजयदु र्गाचा पाया घातला जी ।। ह्या कणक्या गोव्यापति सारंग दुर्गाला जी।। दुरुन कोट हा दिसतो जंजिरा जी।।''[६१]

एप्रिल–मे १६९२ मध्ये कान्होजी आंग्रे यांनी सुवर्णदुर्गवरुन आपले सैन्य गलबतामध्ये भरुन वाटेत लुटपाट करत खांदेरी किल्ल्याजवळ गेले. पावसाळ्यात चार महिने राहण्यासाठी तेथील किल्लेदाराला जागा मागितली. ती दिली नाही म्हणून कुलाब्यास गेले. कुलाब्यास भिवजी गुजर याने जागा दिली तेथे ते राहिले.[६२]

इंग्रज कान्होजीस चाच्यांचा नायक पण दुसरा शिवाजीच म्हणत. इंग्रजांच्या मुंबईहून सुरतला पाठविलेल्या दि. ६ फेब्रुवारी १६९८–९९ च्या पत्रामध्येच आपणास समकालीन सर्व नोंदीमध्ये कान्होजीचा सर्वप्रथम उल्लेख आढळतो.[६३] या पत्रामध्ये सुभेदार कान्होजी याने डेप्यूटी गव्हर्नर यास त्याच्या प्रदेशात मीठाची जहाजे पाठविण्याची परवानगी द्यावी त्याबदल्यात पद्मदुर्ग किल्ल्यावरील दोन इंग्रज व्यापारी कैदी सोडण्याचे आश्वासन दिले आहे. कान्होजीने इ.स. १६९४ पासूनच मोगलांकडील कोकणपट्टीचे सर्व किल्ले घेण्यास सुरवात केली. इ.स. १६९९ मध्ये कान्होजीने मोगल, सिद्दी व पोर्तुगीज यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला.[६४] इ.स. १६९९ मध्ये छ. राजाराम स्वत: कोकणात स्वारी करुन तिकडचे किल्ले पाहून परत आले. त्याने नारो पंडितास राजापूरास येत असल्याचे व तेथे आपली भेट घेण्याचे आश्वासन दिले.[६५] कोकणातील प्रवास आटोपून तो सातार्‍यास आला.[६६] बादशहा ८ डिसेंबर १७०० रोजी सातारला आला. त्याने सातारच्या किल्ल्याला वेढा दिला. २१ एप्रिल १७०० रोजी बादशहाने सातारा जिंकला छ. राजाराम पळून सिंहगड किल्ल्यावर गेला. याठिकाणी ज्वर येऊन, छातीच्या विकाराने रक्ताच्या गुळण्या होऊन ३ मार्च १७०० रोजी मरण पावला.[६७] औरंगजेबाच्या अखबार वरुन जदुनाथ सरकार राजारामाच्या मृत्यूची तारीख २ मार्च १७०० ही देतात.[६८]

छ. राजारामाच्या मृत्यूनंतर राज्यकारभाराची जबाबदारी महाराणी ताराबाईवर आली. महाराणी ताराबाईने आपला मुलगा दुसरा शिवाजी यास छ.त्रपती जाहीर करुन राज्याची सर्व

सूत्रे हाती घेतली. यावेळी रामचंद्रपंत अमात्य बावडेकर, परशुराम त्र्यंबक, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, दुसरे हंबीरराव मोहिते, नेमाजी शिंदे, राणोजी घोरपडे, हिंदूराव घोरपडे या पराक्रमी सरदारांनी महाराणी ताराबाईस चांगली साथ दिली. हा कालखंड (इ.स. १७०० ते १७०७) मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा, मोगल–मराठा संघर्षाचा तिसरा टप्पा होय. या कालखंडामध्येसुद्धा शेकडो लढाया मराठे व मोगल यांच्यामध्ये झाल्या. या काळापर्यंत औरंगजेब बादशहाने दक्षिणेतील इतर सत्ताचे, शाह्यांचे दमन केले होते. मराठ्यांनी मात्र आपला लढा चालूच ठेवला होता. महाराणी ताराबाई स्वतः लष्करी मोहिमा आखत.[६९]

महाराणी ताराबाईने कान्होजी आंग्रे यास विजयदुर्ग येथे सरखेल पदवी दिली.[७०] या काळात कान्होजी विजयदुर्गपासून कुलाब्यापर्यंतच्या बंदरांचा मालक होता. त्याने देशी व परदेशी जहाजे लुटली.[७१] कान्होजी आंग्रे सरखेल असताना कुलाबा हे आरमाराचे प्रमुख ठिकाण होते. वियजदुर्ग व सुवर्णदुर्ग ही प्रमुख आरमारी ठाणी होती.[७२] ताराबाईने मुंबई ते सावंतवाडी हा समुद्रकिनारा कान्होजीच्या ताब्यात ठेवला.[७३] मांडव्यापासून मालवण–त्रावणकोरपर्यंत जंजिऱ्याच्या सिद्दीचा किनारा वगळून सर्व कोकण किनारा आंग्र्यांच्या मालकीचा होता.[७४] कोकण किनारपट्टीवर कान्होजींने इंग्रजांच्या बोटी लूटून, त्यावरील माणसे पकडून त्यांना त्रस्त केले होते.

## शाहू काळ (इ.स. १७०७–१७४९)

### १) पेशवे बाळाजी विश्वनाथ (इ.स. १७१३–१७२०)

### २) पेशवे बाजीराव (इ.स. १७२०–१७४०)

### ३) पेशवे बाळाजी बाजीराव / पेशवे नानासाहेब (इ.स. १७४०–१७४९)

दख्खनच्या मोहिमेवर असतानाच २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर येथे औरंगजेब बादशहाचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूबरोबरच इ.स. १६८२ पासून सुरु असलेले मोगल–मराठा युद्ध संपले. शाहजादा आजमशाह माळव्याला सुभेदार म्हणून गेला होता. तो त्वरेने अहमदनगर येथे आला. १४ मार्च १७०७ रोजी त्याने स्वतःला बादशहा म्हणून घोषित केले. झुल्फिकारखान व इतर सरदारांच्या सल्ल्यावरुन वाटेतच आजमशाहने मोगल कैदेतील शाहू यांची ८ मे १७०७ रोजी सुटका केली. शाहूने खानदेशातून अहमदनगरला आल्यानंतर ऑगस्ट १७०७ मध्ये तोच मराठा राज्याचा खरा वारसदार असल्याचे जाहीर केले.

शाहूच्या सुटकेमुळे मराठा राज्यात यादवी होईल हा झुल्फिकारखान व इतर मोगल सरदारांचा अंदाज खरा ठरला. अनेक मराठा सरदारांना शाहू हाच स्वराज्याचा खरा वारस आहे असे वाटत होते. याशिवाय शाहूचा सौजन्यशील, धीरोदात्त स्वभाव, लोकांना पटविण्याची हातोटी व लोक संग्रह करण्याची वृत्ती यामुळे सर्वसामान्याचा शाहूला पाठिंबा मिळाला. शाहूने वारसाचा प्रश्न सामोपचाराने सोडविण्याचा प्रयत्न केला. महाराणी ताराबाईशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला. महाराणी ताराबाईने युद्ध मैदानावरच वारसा हक्काचा प्रश्न सोडविण्याचे ठरवले. खेड येथील युद्धात विजय मिळविल्यानंतर शाहूने तोरणा राजगड, रोहिडा हे किल्ले जिंकून मावळ प्रदेशात आपले वर्चस्व निर्माण केले.

छ. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत सरखेलपद मिळालेल्या कान्होजी आंग्रेने आपल्या आरमारी सामर्थ्याने पश्चिम किनारपट्टीवर दरारा निर्माण केला होता. पश्चिम किनारपट्टीवर सिद्दी, इंग्रज व पोर्तुगीज यांना कान्होजी आंग्रेंचा धाक वाटत असे. महाराणी ताराबाईनेही कान्होजी आंग्रेंचे सरखेलपद कायम ठेवले होते. कान्होजीने ताराबाईच्या वतीने कोकणामधून छ. शाहूच्या ताब्यातील प्रदेश जिंकण्याचा व त्याचे सैन्य हुसकावून लावण्याचा प्रयत्न सुरु केला. कान्होजीने राजमाची, तुंग, तिकोणा व लोहगड हे किल्ले जिंकले. छ. शाहूने पेशवा बहिरोपंत पिंगळे यास कान्होजीच्या बंदोबस्तासाठी पाठविले. कान्होजीने पेशवे बहिरोपंत पिंगळे यांचा पराभव केला. त्याने बहिरोपंत पिंगळे यांना कुलाबा येथे कैदेत ठेवले. छ. शाहूचा पेशवाच कैद झाल्याने छ. शाहूसमोर मोठे संकट निर्माण झाले. छ. शाहूने बाळाजी विश्वनाथ यास पेशवेपद देऊन कान्होजीचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. पेशवे बाळाजी विश्वनाथ याने प्रत्यक्ष युद्ध करण्यापूर्वी सामोपचाराची बोलणी करुन हा संघर्ष टाळण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये त्यास यश आले. कान्होजी आंग्रे ताराबाईचा पक्ष सोडून छ. शाहूकडे आला. छ. शाहूने कान्होजी आंग्रेकडे आरमाराचा अधिकार व सरखेलपद कायम ठेवले. याशिवाय खांदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड, विजयदुर्ग, जयगड, देवदुर्ग (देवगड), अवचितगड, यशवंतगड हे दहा जंजिरे व बहिरवगड, कोटला, विकटगड, माणिकदुर्ग, मीरगड, सागरगड, रसाळगड, पालगड, रामदुर्ग, खारेपाटण, राजापूर, अंबेड, सातवरे, कामटे, श्रीवर्धन व मनरंजन हे सोळा महाल १७१४ च्या तहाने छ. शाहूने आंग्र्यांना दिले.[७५]

कान्होजी आंग्रे छ. शाहूच्या पक्षात आल्यामुळे त्यांची बाजू बळकट झाली. कान्होजीला दिलेल्या किल्ल्यांपैकी अनेक किल्ले सिद्दीने जिंकून घेतले होते. छ. शाहू व कान्होजी आंग्रे यांच्यामध्ये किल्ल्यांबरोबरच विविध किल्ल्यांच्या घेरियाचा, जवळपासच्या गावांचा महसूल कोणी वसूल करायचा ते ठरविण्यात आले. कान्होजी आंग्रे छ. शाहूविरोधी मोहीमेत गुंतला असताना सिद्दीने सुवर्णदुर्ग किल्ल्यावर हल्ला केला. सिद्दीने सुवर्णदुर्ग किल्ला जिंकला.[७६] छ. शाहू व कान्होजी यांच्यामध्ये तह झाल्यानंतर पेशवे बाळाजी विश्वनाथ व कान्होजी यांनी सिद्दीवर आक्रमण केले. सिद्दीचा पराभव होऊन त्याने ३० जानेवारी १७१५ मध्ये मराठ्यांशी तह केला.[७७] त्याप्रमाणे सिद्दीच्या ताब्यातील गोरेगाव, गोवेले, निजामपूर, नागोठणे, अष्टमी, पाली, आश्रे व अंतोणे या गावांचा अर्धा महसूल वसूल करण्याचा अधिकार छ. शाहूना मिळाला.[७८] याशिवाय सिद्दीने सुरगड, प्रतापगड, यशवंतगड, बाणकोट, कोंडाणा, खुषगड, पट्टेदुर्ग, कुतूरगड, विजयदुर्ग, मुक्तरगड व मदनगड हे किल्ले सिद्दीने मराठ्यांना द्यावेत असे ठरले.[७९] सुवर्णदुर्ग पुन्हा कान्होजीच्या ताब्यामध्ये आला. इ.स. १७१७–१८ मध्ये कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यात दाभोळ सुभ्यातील रसाळगड, फत्तेगड, कनकदुर्ग, गोवा, सुवर्णदुर्ग व पालगड असे एकूण सहा किल्ले होते.[८०] पेशवे बाळाजी विश्वनाथ यांचा कोल्हापूरच्या स्वारीवरुन परत येताना २ एप्रिल १७२० रोजी सासवड येथे मृत्यू झाला. छ. शाहूने बाळाजी विश्वनाथ यांचा पराक्रमी मुलगा पहिला बाजीराव यांस १७ एप्रिल १७२० रोजी पेशवेपद दिले. इ.स. १७३३ मध्ये कान्होजी याने रामचंद्रपंत अमात्य बावडेकर (कोल्हापूरचे छ. संभाजी यांचे सरदार) यांच्याकडून सुवर्णदुर्ग तालुका जिंकला.[८१] ९ एप्रिल १७२७ रोजी छ. शाहूंच्या मागणीप्रमाणे कान्होजीने सुवर्णदुर्गवरुन दारु बारीक, मोठी, रंजकी १० खंडी, खलिते (पिशव्या) ११५ एवढा दारुगोळा पाठविला.[८२] इ.स. १७२८ मध्ये कान्होजी आंग्रे यांच्या ताब्यात जंजिरे रायदेरी, कुलाबा, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग, जयगड एकूण ५ तर किल्ले देवगड, जंजिरा कजलादुर्ग, किल्ले फत्तेगड, अवचितगड, यशवंतदुर्ग व रसाळगड हे किल्ले होते. याशिवाय बहिरवगड, कोथळा, विकटगड, माणिकगड, मृगगड, सागरगड, श्रीवर्धन, पालगड व रामदुर्ग, खारेपाटण, रामदुर्ग, राजापूर, कोट आंबेड, गड साठवली, गड कोलधे, मनरंजन हे किल्ले व कोट सुद्धा कान्होजी आंग्रेंच्या ताब्यामध्ये होते.[८३] कान्होजी आंग्रे यांनी कुलाब्यावरुन श्री ब्रह्मेंद्रस्वामी यांना देण्यासाठी सुरण, द्राक्षे, दारु,

नारायणतेल सुवर्णदुर्ग येथे पाठविले. सुवर्णदुर्गवरुन एप्रिल १७२९ मध्ये या सर्व वस्तू धावडशीस पाठविण्यात आल्या.[८४] ४ जुलै १७२९ मध्ये सरखेल कान्होजी आंग्रे यांचा मृत्यू झाला.[८५] छ. शाहू यांनी कान्होजीपुत्र सेखाजी यांना २१ जुलै १७२९ रोजी सरखेलपद व कान्होजीच्या ताब्यातील किल्ले व प्रदेश दिले.[८६] औरंगजेब बादशहाने मराठा साम्राज्यावर आक्रमण केले त्यावेळी सिद्दी त्यास सामील झाला होता. औरंगजेबाने कोकणातील जिंकलेले मराठ्यांचे किल्ले व त्याखालील प्रदेश सिद्दीस देऊन टाकला होता. त्यामुळे अलिबाग व पेण हे तालुके सोडून सर्व रायगड जिल्ह्यावर सिद्दीने वर्चस्व निर्माण केले. सिद्दी त्याच्याकडे असणाऱ्या समर्थ आरमार, तोफखाना जंजिरा किल्ल्याची दुर्गमता व मुंबईचा आश्रय यामुळे कोकणातील मराठ्यांच्या ताब्यातील प्रदेशातीत हल्ले, लुटालुट, जाळपोळ करत असे. सिद्दीने इ.स. १७३१ मध्ये सुरगड जिंकला. त्याने सुरगड किल्ल्याखाली राहात असणाऱ्या बकाजी गोमाजी चौधरी चौगुला यास बायकोसहीत पळवून नेले व बाटविले.[८७]

इ.स. १७२६ मध्ये ब्रह्मेंद्रस्वामी प्रकरण घडले. त्याविषयीचा सविस्तर वृत्तांत मागील प्रकरणामध्ये लिहला आहेच. सिद्दी सातने परशुराम देवालयाची केलेली विटंबना व अपमान सहन न झाल्याने स्वामींनी यापुढे कोकणामध्ये रहावयाचे नाही असे ठरविले. स्वामी पेशव्यांच्या संमतीने ६ मार्च १७२७ रोजी धावडशी येथे आले. स्वामींनी आता छ.शाहू व पेशवे बाजीराव यांच्याकडून सिद्दीच्या प्रदेशावर आक्रमण करुन त्याचे निर्मुलन करण्याचे निश्चित केले.[८८] स्वामींनी आता छ.शाहू व पेशव्यांकडे सिद्दीचा बंदोबस्त करण्याचा आग्रह धरला. १७२८ मध्ये निजामाचा पाडाव झाला. १७२८–२९ मध्ये माळवा, गुजरात येथे पेशव्यांचा प्रभाव पडला. १७३१ मध्ये कोल्हापूरकर छ. संभाजीचा बंदोबस्त झाला. सर्व महत्वाची राजकारणे निकालात निघाली होती. सेखोजी आंग्रे यांना सरखेलपदाची वस्त्रे देण्यात आली. त्यावेळी त्याच्याकडून सिद्दीचा बंदोबस्त करण्याचे कबुल करुन घेण्यात आले. सिद्दीचा बंदोबस्त करुन कोकणातील सिद्दीच्या ताब्यातील प्रदेश व किल्ले परत मिळविण्याचे छ. शाहूंनी निश्चित केले. त्याप्रमाणे कोकणामध्ये सिद्दीवर मोहीम काढण्याची पूर्वतयारी करण्यात आली. यशवंतराव महादेव पोतनीस यांच्या मार्फत सिद्दी सरदार शेखजीशी करार करण्यात आला. सिद्दीचा हा मातब्बर सरदार शेखजी हा आरामारासहित मराठ्यांना येऊन मिळाला. फेब्रुवारी इ.स. १७३३ मध्ये

सिद्दी रसूल याकुतखान मरण पावला. सिद्दीच्या मुलांमध्ये सत्तेसाठी अंतर्गत संघर्ष सुरु झाला.[८९] सिद्दी रसूल याकुतखानचा मोठा मुलगा अब्दुल्ला याचा त्याच्या भावांनी खून केला. अब्दुल्लाचा मोठा मुलगा अब्दुलरहमान हा शेखजीच्या मध्यस्थीने मराठ्यांना येऊन मिळाला. ही संधी साधून छ.शाहूने इ.स. १७३३ मध्ये पेशवे बाजीराव यांच्या नेतृत्वाखाली एक सैन्य तुकडी जंजिरा व दंडराजपुरीवर तर दुसरी श्रीपतराव प्रतिनिधी यांच्या नेतृत्वाखाली एक सैन्य तुकडी रायगड व आजूबाजूचा प्रदेश जिंकण्यासाठी पाठविली. पेशवे बाजीराव २ मे १७३३ रोजी दंडराजपुरीस पोहोचले. आंग्रेंचा सरदार, सुवर्णदुर्गचा किल्लेदार नाईक बकाजी महाडिक हा आपल्या सैन्यासहित पेशव्यांच्या मदतीस आला होता. सिद्दीने बाणकोट, मंडणगड हे किल्ले बळकावले होते. बकाजी नाईक याने २५ मे १७३३ रोजी मंडणगड किल्ला जिंकला.[९०] ७ मार्च १७३३ रोजी संभाजी आंग्रे आरमार घेऊन जलमार्गे तर हरि मोरोर राजाज्ञा हे छत्रपतींच्या आज्ञेवरुन बाणकोट जिंकण्यासाठी आले.[९१] बाणकोट किल्ला जिंकण्यानंतर सरखेल सेखोजी आंग्रे यांनी आपल्या ताब्यात ठेवला होता.[९२] मे १७३३ मध्ये सिद्दी सुवर्णदुर्गच्या प्रदेशात रात्री बेरात्री अचानक येऊन रयतेची लुटमार करत होता. त्याच्या भितीने तेथील रयत पळून जात होती.[९३] मराठ्यांशी मांडले बिरवाडी जसा दुतर्फा वसुलीचा तह झाला तसाच सुवर्णदुर्ग प्रांताचा पण झाला आहे असे सिद्दी आपल्या लुटीच्या समर्थनार्थ जनतेस सांगत होता.[९४] जनतेच्या संरक्षणासाठी व शामलास सुवर्णदुर्ग प्रांतामध्ये टिकू व बळावू देऊ नये यांसाठी योग्य बंदोबस्त करण्यास चिमाजी आप्पा यांना विनंती करण्यात आली.[९५] सुवर्णदुर्गचे किल्लेदार बकाजी नाईक महाडीक यांना सरदार पिलाजी जाधव व पेशवे दंडराजपुरी येथे पोहोचल्याचे कळले. पेशव्यांनी जंजिऱ्याच्या मोहीमेविषयी कळवून बकाजी नाईक यांना कर्तव्य करण्यास कळवले होते. त्याप्रमाणे सुवर्णदुर्गचे किल्लेदार बकाजी नाईक पेशव्यांच्या मदतीस दंडराजपुरीस गेले.[९६] जुलै १७३३ मध्ये सुवर्णदुर्गचे किल्लेदार बकाजी नाईक महाडीक सुवर्णदुर्गवरुन सैन्यासहित चिपळूणला गोवळकोटच्या मोहीमेसाठी गेले. त्याचवेळी सिद्दीसातने परशुरामवर आक्रमण केले. बकाजी नाईक यांनी त्याचा पराभव केला. त्यानंतर ते गोवळकोटच्या पायथ्याशी सैन्यासहित कोठड्या बांधून राहिले.[९७] शेखजीच्या मदतीने जंजिरा घेण्याच्या कारस्थानाप्रमाणे पेशव्यांनी सरखेल सेखोजी आंग्रे यांना २०० भोई ताबडतोब सिद्दीकडे पाठविण्यास कळवले होते. पण

पावसाळा असल्यामुळे सरखेलांकडील भोई रत्नागिरी व सुवर्णदुर्ग प्रांतात सुट्टीवर गेल्यामुळे ताबडतोब सिद्दीकडे पाठविता आले नाही.[९८] पेशवे बाजीराव यांचे छ. शाहुंच्या दरबारातील वाढत्या प्रभावामुळे अष्टप्रधान मंडळातील इतर मंत्र्यांच्या मनामध्ये पेशव्यांबद्दत दुस्वास वाढत होता. श्रीपतराव प्रतिनिधी व पेशवे बाजीराव यांच्यामध्ये अंतस्थ मतभेद होते. इ.स. १७३३ च्या सिद्दीविरोधातील मोहीमेमध्ये छ.शाहूंनी दोघांनाही कोकणात पाठविले होते. त्यांनी कोकणातील वेगवेगळ्या मोहीमा चालविल्या. पण मोहीमेवर असताना दोघांनी परस्परांबद्दल शहकाटशहाचे राजकारण खेळले. छ. शाहूंचा सरखेल आंग्रे यांना या मोहीमेत मदत करण्याचा आदेश होता. त्यास प्रतिसाद म्हणून सरखेलांच्या आज्ञेने सुवर्णदुर्गचा किल्लेदार बकाजी नाईक महाडीक या मोहीमेत सक्रिय सहभागी होता. त्यानेच २५ मे १७३३ रोजी मंडणगड किल्ला वेढा देऊन जिंकले. अंजनवेल व गोवळकोट किल्ल्यांची मोहीम श्रीपतराव प्रतिनिधी चालवणार होते. सुवर्णदुर्गचा किल्लेदार बकाजी नाईक महाडीक या मोहीमेसाठी जाणार होता. पेशवे बाजीराव यांनी सेखोजी आंग्रे, लक्ष्मीबाई आंग्रे व सुवर्णदुर्गचा किल्लेदार बकाजी नाईक महाडीक यांना वारंवार पत्रे पाठवून बकाजी नाईक यांनी जेथे श्रीपतराव प्रतिनिधी असतील तेथे मोहीमेत सामील होऊ नये, सामील झाले असल्यास लढण्याचा देखावा करावा व प्रतिनिधींची फजिती पहावी, स्वतंत्रपणे मोहीम चालवून यशाचे श्रेय घ्याचे असे कळविले आहे.[९९] सेखोजी आंग्रे व लक्ष्मीबाई आंग्रे यांना बकाजी नाईकास प्रतिनिधींना मदत न करण्याविषयी कळविले होते.[१००] सरखेल सेखोजी आंग्रे, लक्ष्मीबाई आंग्रे, बकाजी नाईक महाडीक यांनी पेशव्यांना त्यांच्या आदेशाप्रमाणेच सर्व होईल असे कळविले आहे.[१०१] अंजनवेल व गोवळकोट येथे मोहीमेवर गेलेले बकाजी नाईक महाडीक हे जुलै १७३३ मध्ये सुवर्णदुर्गला परत आले होते.[१०२] श्रीपतराव प्रतिनिधींनी संभाजी आंग्रे यांना पेशव्यांविरोधात प्रतिनिधींना सामील होऊन मदत करण्याविषयी कळवले होते. संभाजी आंग्रे प्रतिनिधींच्या आदेशाला बधले नाही.[१०३] सुवर्णदुर्ग प्रांतातील महाल घेण्याचा प्रतिनिधींचा कारस्थान सुवर्णदुर्गवरुन लक्ष्मीबाई आंग्रे यांना कळविण्यात आले होते.[१०४] याविषयी खास पत्र पाठवून संभाजी आंग्रे यांना सावध करण्यात आले व प्रतिनिधींना अजिबात मदत न करण्याचे कळविण्यात आले.[१०५] सरखेल सेखोजी हे कुलाब्यास तर संभाजी हे सुवर्णदुर्गला होते.[१०६]

२८ ऑगस्ट १७३३ रोजी सरखेल सेखोजी आंग्रे यांचा मृत्यू झाला.[१०७] तुळाजी आंग्रे त्यावेळी सुवर्णदुर्ग येथे होता. त्यास तेथील सुभा सांगितला.[१०८] छ. शाहूंनी संभाजी आंग्रे यांना सुवर्णदुर्ग पलिकडील प्रदेश व सरखेलपद देऊन सुवर्णदुर्गला पाठविले.[१०९] संभाजी आंग्रे यांनी येसाजीस विजयदुर्ग व सुवर्णदुर्ग सुभा दिला.[११०] एप्रिल १७३४ मध्ये छ. शाहूंनी संभाजी आंग्रे यांना सरखेलीची वस्त्रे व हत्ती जयगडला पाठविला.[१११] ऑगस्ट १७३३ पर्यंत जंजिरा व अंजनवेल सोडून सिद्दीचा जवळजवळ सर्व प्रदेश पेशव्यांच्या ताब्यात होता.[११२] पेशव्यांनी अलिबागजवळ नवदरे येथे तह केला व सातारला निघून गेले. सप्टेंबर १७३३ मध्ये संभाजी आंग्रे जयगडवरुन सुवर्णदुर्गला येणार होते. तेथील लोकांचे वेतन वगैरे देऊन समाधान केल्यानंतर त्यांना जंजिऱ्याच्या मोहीमेची चर्चा करण्यासाठी पेशव्यांच्या भेटीला घेऊन येण्याचे व पुर्ण मदत करण्याचे आश्वासन पिलाजी जाधव यांनी पेशव्यांना दिले होते.[११३] सप्टेंबर १७३३ मध्ये श्रीपतराव प्रतिनिधी यांनी सुवर्णदुर्गचे किल्लेदार बकाजी नाईक महाडीक यांना कोकणातील मोहिमेवर असणाऱ्या त्यांच्या सैन्याच्या खर्चासाठी पैसे पाठविण्यास सांगितले होते.[११४] सुवर्णदुर्ग प्रांतातून व सिद्दीच्या केळशी, वेसवी महालाचा निम्मा वसुल सैन्याच्या खर्चासाठी पाठवावा नाहीतर या सैन्यास परस्पर सूवर्णदुर्ग प्रांतातील गावे व सिद्दीचे केळशी, वेसवी महाल लुटण्याची परवानगी देण्यात येईल, अशी धमकी प्रतिनिधींनी आंग्र्याचे सरदार सुवर्णदुर्गाचे किल्लेदार बकाजी नाईक महाडीक यांना दिली होती.[११५] लक्ष्मीबाई आंग्रे यांनी प्रतिनिधींचे सैन्य आले, तर त्यांचा बंदोबस्त करण्याची आज्ञा बकाजी नाईक महाडीक यांना दिली होती.[११६] सेखोजी आंग्रे यांची पत्नी लक्ष्मीबाई आंग्रे यांनी सरखेल सेखोजीच्या मृत्यूनंतर सुद्धा पेशव्यांना आधीप्रमाणेच पुर्ण मदत करण्याचे आश्वासन दिले होते. त्यांनी सुवर्णदुर्गवरुन दर्यावर्दी लोक पेशव्यांच्या मदतीस पाठविले होते.[११७] बकाजी नाईक महाडीक यांनी सुद्धा पेशव्यांना सरखेलांच्या मृत्यूनंतर आधीप्रमाणेच मदत व सेवा करण्याचे पुर्ण आश्वासन दिले होते.[११८]

नोव्हेंबर १७३३ मध्ये सिद्दीने बाणकोटच्या किल्ल्यावर आक्रमण केले. बाणकोटच्या सैन्याने त्याचा पराभव केला. सिद्दी बाणकोटवरुन सुवर्णदुर्गला गेला. तेथे पेठा जाळून तो अंजनवेलला गेला.[११९] एप्रिल १७३४ मध्ये पेशव्यांच्या सैन्याने अंजनवेल(गोपाळगड) किल्ल्याला वेढा घातला तेव्हा सुवर्णदुर्ग किल्ल्यावरुन सरखेल संभाजी आंग्रे यांचे ४००–५०० सैन्य

मदतीस आले होते.[१२०] इ.स. १७३४ मध्ये संभाजी विजयदुर्गवरुन कुलाब्यास आले. कुलाब्यास असणाऱ्या कान्होजीच्या पत्नी लक्ष्मीबाई आंग्रे व भाऊ मानाजीस दुरुत्तरे केली. त्यांच्या कारभारात चुका काढून अपमानित केले. मानाजीस जीवे मारण्याचा बेत केला. त्यामुळे मानाजी रातोरात रेवदंड्याला निघून गेले. सिद्दीने थळच्या किल्ल्यावर आक्रमण केले. त्याचा प्रतिकार न करता आपल्या सैन्याला धीर न देता संभाजी आंग्रे सुवर्णदुर्गला निघून गेले.[१२१] सेखोजी आंग्रे यांच्या मृत्यूनंतर सरखेल संभाजी आंग्रे व मानाजी आंग्रे यांच्यामध्ये सुरु झालेला वाद इ.स. १७३५ मध्ये सुद्धा संपला नव्हता. छ. शाहू व पेशवे बाजीराव यांनी मध्यस्थी करुन कुलाबा किल्ला (अलिबाग) मानाजी आंग्रे यांना दिला होता. सरखेल संभाजी आंग्रे यांना कुलाबा किल्ला जिंकण्याची महत्वाकांक्षा होती. पेशवे बाजीराव मानाजीस मदत करत असल्यामुळे त्यांना ते शक्य होत नव्हते. छ. शाहू व पेशवे यांच्याबद्दल सरखेल संभाजी आंग्रेच्या मनात प्रचंड संताप होता. केळशी व वेसवी महालाच्या वसुलीवरुन छ.शाहू, पेशवे यांच्याशी सरखेलांचा नेहमी वाद होत असे. पेशवे नेहमीच सरखेलांना विरोध करत. यामुळे सरखेल संभाजी आंग्रे यांनी मानाजी विरोधात कुलाबा किल्ला जिंकण्यासाठी अंजनवेलचा किल्लेदार सिद्दी सात याच्याशी गुप्तपणे संधान साधले. दोघांमधील या गुप्त कराराप्रमाणे सिद्दीसात सरखेलांना फत्तेदुर्ग मागत होता.[१२२] त्याऐवजी सरखेलांनी मंडणगड व विजयगड सिद्दीसातला देण्याचे कबुल केले. हे सर्व कारस्थान डिसेंबर १७३५ मध्ये करण्यात आले.[१२३] छ. शाहूंना हे कारस्थान कळले होते. या कारस्थाना दरम्यान सरखेल संभाजी आंग्रे हे सुवर्णदुर्गला होते. छ. शाहूंना सरखेल संभाजी सुवर्णदुर्गला असल्याचे कळले होते.[१२४] छ. शाहू यांनी देवजी सोमवंशी व हिंदुराव यांच्या अडीच हजार सैन्यापैकी काही सैन्य कोकणात मानाजी आंग्रेच्या मदतीस पाठविण्याची आज्ञा केली. याशिवाय सिद्दीसात व सरखेलांच्या विरोधातील मोहीमेत चिमाजी आप्पा कोकणात जाण्यास नाखुश होते म्हणून सुमंत आनंदराव पंडित यांना चिमाजी आप्पाकडे पाठविण्याची आज्ञा छ. शाहूंनी केली.[१२५] इ.स. १७३६ मध्ये गोवळकोट किल्ल्याला छ. शाहूंचे प्रतिनिधी व सरदार पिलाजी जाधव यांनी वेढा घातला होता. त्यांच्या मदतीस आंग्र्यांचे सैन्य होते. पण प्रतिनिधींनी त्यांना लष्करी साहित्याची अजिबात मदत केली नाही. उलट आंग्र्यांच्या सैन्याची तक्रार छत्रपतींकडे प्रतिनिधींनी केली. त्यामुळे आंग्र्याचे सैन्य या वेढ्यामध्ये कायम

राहीले नाहीत. पिलाजी जाधव यांनी सुवर्णदुर्गचे किल्लेदार हरजी नाईक कदम यांना सैन्याची मदत मागितली होती. त्याप्रमाणे त्यांनी गुणाजी नाईक गावतळकर यांना पाच सैनिकांसहित सुवर्णदुर्गवरुन गोवळकोटला पाठविले होते.[१२६] या सर्वांना पोटास अन्न देऊन पिलाजी जाधव यांनी स्वत:कडे ठेवले आहे. हे सर्वजण घर बांधून पिलाजी जाधव यांची सेवा करत होते.[१२७]

सरखेल संभाजी आंग्रे व मानाजी आंग्रे यांच्यातील यादवीचा पोर्तुगीज व सिद्दी यांना मराठ्यांच्या प्रदेशात हस्तक्षेप करण्यासाठी फायदा मिळत असे. सरखेल संभाजीने जानेवारी १७३५ मध्ये पोर्तुगीजांची मदत घेऊन कुलाबा किल्ल्यास वेढा दिला.[१२८] मानाजी आंग्रे यांनी पेशव्यांना मदत मागितली. पेशवे बाजीराव यांनी शंकराजी केशव व खंडोजी मानकर या सरदारांना मानाजीच्या मदतीस पाठविले. या सरदारांचे व पोर्तुगीजांचे २ जानेवारी १७३५ रोजी मोठे युद्ध झाले. कुलाबा, राजमाची व खांदेरी हे किल्ले संभाजी आंग्रेने पोर्तुगीजांच्या मदतीने घेतले होते. ४ फेब्रुवारी १७३५ रोजी पेशवे बाजीराव स्वतः कुलाब्यास मानाजीच्या मदतीस गेले. त्यांनी कुलाबा, राजमाची व खांदेरी हे किल्ले ३ एप्रिल १७३५ रोजी संभाजी आंग्रे यांच्या सैन्याचा पराभव करुन जिंकले.[१२९] यानंतर संभाजी आंग्रे परत छत्रपतींशी सहकार्याचा करार करण्यास तयार झाला. छ. शाहू यांचे आज्ञेने पेशवे बाजीराव यांनी संभाजीशी तह केला. या तहाप्रमाणे मानाजीस 'कुलाबा व वजारतसाब' हा किताब व संभाजीस 'सुवर्णदुर्ग व सरखेलपद' दिले.[१३०] यानंतरसुद्धा सरखेल संभाजीने मानाजीच्या ताब्यातील कुलाबा घेण्यासाठी पेशवे बाजीराव व ब्रह्मेंद्रस्वामी यांनी मध्यस्थी करावी असा प्रयत्न केला.[१३१] संभाजीने पेशव्यांना या संबंधीची बोलणी करण्यासाठी सुवर्णदुर्ग किंवा रसाळगड येथे बोलविले.[१३२]

धावडशी येथील अंबाजी पाटील स्वामींच्या वाड्यात भूत घालतो असा ब्रह्मेंद्र स्वामींना संशय होता. त्यामुळे त्यांच्या कारकूनाच्या घरची माणसे व गुरे–ढोरे मरतात असे स्वामींना वाटत होते. म्हणून त्यांनी या भूतबाधेचे निवारण करण्यासाठी सुवर्णदुर्गवरुन मांत्रिक आणला होता.[१३३] ब्रह्मेंद्र स्वामी यांनी संभाजीला मानाजीकडून कुलाबा घेऊन देण्याचे कबूल केले होते. संभाजी आंग्रे सुवर्णदुर्गला आल्यानंतर ब्रह्मेंद्रस्वामींनी तेथे जावे. नंतर स्वामींनी कुलाब्याला जावून मानाजीची समजूत काढून कुलाबा संभाजीस मिळवून द्यावा, असे स्वामी व संभाजी यांचे ठरले होते.[१३४] संभाजी सुवर्णदुर्गला न आल्यामुळे हे कार्य पुर्ण झाले नाही. ब्रह्मेंद्र स्वामींनी

संभाजीस धावडशी येथे लष्करी तयारीसहीत बोलविले. तेथून दोघांनी कुलाब्यात जावून मानाजीकडून कुलाबा घेऊन देण्याचे स्वामींनी कबूल केले होते.[१३५]

चिमाजी आप्पा मानाजीच्या मदतीसाठी १८ एप्रिल १७३६ रोजी कुलाब्याजवळ आले.[१३६] चिमाजी आप्पा मोठ्या सैन्यासहित कुलाब्याजवळ चऱ्हाई करमाले येथे पोहोचले. चिमाजी आप्पा व मानाजीच्या संयुक्त सैन्याने सिद्दीसातच्या सैन्यावर आक्रमण केले. घनघोर लढाई झाली. सिद्दीसातचे दोन हजार सैन्य मारले. स्वत: सिद्दीसात मृत्यू पावला. मराठ्यांचे ८०० सैन्य मरण पावले. उंदेरीचा सिद्दी याकूब, कृष्णाजी व सुभानजी घाडगे, कोंडनाईक बाळाजी शेणवई हे मरण पावले. मानाजी आंग्रे जखमी झाले.[१३७] सिद्दीसात सारख्या प्रबळ शत्रूला मारुन मराठ्यांचा कोकणातील प्रदेश निर्धोक केला. या यशानंतर चिमाजी आप्पा व मानाजी कुलाब्यास आले. मराठ्यांना आनंद झाला. सर्वांनी चिमाजी आप्पांचे अभिनंदन केले. चिमाजी व इतर सरदारांचा छ. शाहूने योग्य सन्मान केला.[१३८] सिद्दीसात व सिद्दी याकुब हे दोन प्रबळ सरदार मरण पावल्यामुळे जंजिऱ्याच्या प्रमुख सिद्दी रहमानने पेशव्यांशी पूर्वी केलेला तह कायम केला.

पोर्तुगीजांनी इ.स. १५३४ मध्ये गुजरातचा सुलतान बहादूरशहा याच्याकडून वसई व आजुबाजूचा प्रदेश जिंकला. इ.स. १५५६ मध्ये फ्रान्सिस्को बरेटी या पोर्तुगीज गव्हर्नरने अशेरी व मनोरा हे किल्ले जिंकले. इ.स. १५५९ मध्ये पोर्तुगीज व्हॉइसरॉयने दमणचा किल्ला जिंकला. इ.स. १५८० मध्ये दीव, दमण, मुंबई बेट, वसई व चौल या उत्तर कोकणातील प्रदेशामध्ये पोर्तुगीजांनी आपली सत्ता स्थापन केली होती. इ.स. १६६५ मध्ये पोर्तुगीज राजाने आपल्या मुलीच्या लग्नात मुंबई बेट इंग्लंडच्या राजकुमारास भेट दिले. त्याने ते इस्ट इंडिया कंपनीस भाडेपट्टीवर दिले होते. अशाप्रकारे १६ व्या शतकामध्ये भारतीय समुद्रावर पोर्तुगीजांनी आपले वर्चस्व स्थापन केले होते. छ. शिवाजी महाराजांनी कल्याण प्रांत जिंकला. छ. शिवाजीने उत्तर कोकणातील प्रदेश जिंकला. त्यांनी भिवंडी, कल्याण, पनवेल येथे आरमारी तळ उभारले. तेव्हापासून पोर्तुगीज–मराठे संघर्ष सुरु झाला. छ. संभाजीने १६८३ मध्ये पोर्तुगीज प्रदेशावर आक्रमण केले. चौलच्या किल्ल्याला वेढा दिला. वसई व दमण यांच्यावर हल्ला करुन त्यांचा नाश केला. १२ डिसेंबर १६८३ रोजी मराठ्यांनी साष्टी व बारदेशमधील पोर्तुगीजांच्या प्रदेशावर

हल्ला करुन लुटालुट व जाळपोळ केली.[१३९] रायतर, मडगाव, आग्वाद, रेईसमागुस हे चार किल्ले सोडून या प्रदेशातील सर्व किल्ले मराठ्यांनी जिंकले. मोगलांनी पोर्तुगीजांना मदत पाठविल्याने छ. संभाजीने गोव्याचा वेढा उठवला. मराठे व पोर्तुगीज यांच्यामध्ये तह झाला.

अशाप्रकारे छ. शिवाजी महाराजांपासून १७०७ पर्यंत पोर्तुगीज–मराठे संबंध संघर्षाचेच होते. दमण, आगाशी, मनोरी, वसई, ठाणे, कारंजा, चौल, चौलमधील खडक मोरोकोट या उत्तर कोकणातील प्रदेशावर पोर्तुगीजांची सत्ता होती. पोर्तुगीजांचे हे वर्चस्व मराठ्यांच्या साम्राज्य विस्तारात अडचण ठरत होते. इ.स. १७१९ मध्ये हुसेन अली सय्यद याच्याशी केलेल्या कराराने मराठ्यांनी कल्याण व भिवंडीचा ताबा घेतला. त्यामुळे पोर्तुगीज–मराठे संघर्ष वाढला. पोर्तुगीज आपल्या प्रदेशातील भारतीय जनतेवर अत्याचार करत. त्यांना धर्मांतर करण्यासाठी दबाव आणत. त्यामुळे पेशवे बाजीराव यांनी आपले मेहुणे व सरदार रामचंद्र महादेव चासकर यांना पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्यासाठी कोकणात पाठविले. रामचंद्र चासकर यांनी पोर्तुगीजांच्या ताब्यातील कल्याण व भिवंडी प्रांत जिंकला. या प्रदेशातील अणजूरकर नाईक व इतर सरदार पेशव्यांना येऊन मिळाले. १७२३ मध्ये पिलाजी जाधव याने पोर्तुगीजांच्या सायगाव परगण्यात आक्रमण केले. तेथे मराठ्यांचे वर्चस्व स्थापन केले. दाभाडे पण पिलाजी जाधव यांच्या मदतीस पोर्तुगीजांच्या विरोधी मोहीमेत येणार ही बातमी कळताच पोर्तुगीजांनी कल्याणचा सुभा रामचंद्र जोशी चासकर यांच्याशी १६ डिसेंबर १७२३ मध्ये तहाची बोलणी सुरु केली. १० जानेवारी १७२४ रोजी तह होऊन त्यामध्ये परस्परांच्या मालावर जकात घेऊ नये, कल्याण भिवंडी येथून वसईकडे मराठ्यांची जहाजे जातील त्यावर पोर्तुगीजांनी जादा जकात आकारु नये, असे ठरले. पोर्तुगीजांच्या छ. शाहूकडून मराठे यापुढे पोर्तुगीजांच्या प्रदेशात आक्रमण करणार नाहीत असे आश्वासन देणारे पत्र २४ नोव्हेंबर १७२४ मध्ये छ. शाहूंनी पोर्तुगीजांना पाठविले होते.[१४०] इ.स. १७२८ मध्ये मराठ्यांनी १७२४ चा तह मोडून पोर्तुगीज प्रदेशावर आक्रमणे चालूच ठेवली. मे १७२८ मध्ये पिलाजी जाधव याने दमणच्या प्रदेशातील दोन गावे लुटली. याचा बदला म्हणून वसईच्या पोर्तुगीज अधिकाऱ्याने ऑगस्ट १७२८ मध्ये मराठ्यांच्या ताब्यातील कल्याणवर हल्ला करुन ते जाळून टाकले. कल्याण व्यापारी व जिल्ह्याचे केंद्र असल्याने ते घेणे अशक्य होते म्हणून पोर्तुगीजांनी ते जाळले.[१४१] कल्याणचा पाडाव

केल्यामुळे मराठ्यांनी वसई येथे गव्हर्नर सोबत तह केला.[१४२] अशाप्रकारे १७२८ मध्ये पोर्तुगीज मराठे यांच्यामध्ये तह झाला.

पेशवे बाजीराव यांनी १७३१ मध्ये पिलाजी जाधव, कृष्णाजी महादेव चासकर यांना उत्तर कोकणातील पोर्तुगीज प्रदेशावर आक्रमण करण्यास पाठविले. त्यांनी कांबेचे पोर्तुगीज ठाणे जिंकून, दोन जहाजे, काही दारुगोळा व शस्त्रास्त्रे मिळविली. इंग्रजांनी आपले ७०० सैन्य पोर्तुगीजांच्या मदतीस पाठविले. त्यामुळे मराठ्यांनी साष्टी बेटावर आक्रमण करण्याचे रद्द केले. १ मार्च १७३१ रोजी मराठ्यांनी मनोरच्या किल्ल्याभोवतीचा प्रदेश जिंकला. किल्ल्याला होणारा पाणी पुरवठा तोडला. वसईवरुन पोर्तुगीज सैन्य मदतीस आल्यामुळे मराठ्यांना मनोरच्या किल्ल्याचा वेढा उठवावा लागला. २ ऑक्टोबर १७३१ रोजी पोर्तुगीजांनी पनवेलजवळच्या मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ला करुन तेथील गावांमध्ये जाळपोळ केली. दि. १० फेब्रुवारी १७३२ रोजी पोर्तुगीज व मराठे यांच्यामध्ये तह झाला.[१४३] हा तह झाल्यानंतरही पोर्तुगीजांनी भारतीय जनतेबाबत आपले पूर्वीचेच अत्याचारी धोरण अवलंबले. पोर्तुगीजांनी सरखेल संभाजी आंग्रे यांना मानाजी विरोधात मदत केली. मानाजी आंग्रेस पेशव्यांचा पाठिंबा होता. त्यामुळे पेशवे बाजीराव व पोर्तुगीज यांचे संबंध अधिकच बिघडले. पोर्तुगीजांनी याच सुमारास ठाण्याच्या किल्ल्याचे बांधकाम पुर्ण करत आणले होते. हे बांधकाम पुर्ण झाले तर साष्टी बेटामध्ये मराठ्यांना प्रवेश करणे अवघड होणार होते. त्यामुळे लवकरच पोर्तुगीजांच्या विरोधात मराठ्यांचे युद्ध होणार हे निश्चित झाले. पेशवा बाजीरावाने १७३२ च्या तहानुसार साष्टी बेटामध्ये मराठ्यांना एक फॅक्टरी काढण्याची परवानगी पोर्तुगीज व्हॉईसरॉयला मागितली. पेशव्याने आपला मेव्हणा व्यंकोजीराव जोशी यास पोर्तुगीज व्हॉइसरॉयला भेटण्यास पाठविले. व्हॉईसरॉयने या मागणीस नकार देऊन पेशव्यांना असभ्य शब्द वापरले. यानंतर पेशव्यांनी अत्यंत तातडीने व गुप्ततेने पोर्तुगीजांविरुद्ध लढण्याची तयारी केली. फेब्रुवारी १७३७ मध्ये पोर्तुगीजांविरुद्धच्या या मोहिमेचे नेतृत्व चिमाजी आप्पा यांना देण्यात आले. त्यांच्या मदतीस शंकराजीपंत फडके, रामचंद्र हरी, चिमाजी बापूजी, अंजुरकर नाईक व इतर सरदार देण्यात आले. शंकराजीपंत फडके यांना मुख्य सेनापती, गंगाजी नाईक यास वसईच्या मोहीमेचे सेनापती, खंडोजी मानकर यास साष्टीच्या मोहीमेचे सेनापती नेमण्यात आले. कल्याणमध्ये एक

हजार सुसज्ज सैन्य तयार ठेवण्यात आले. मोहीमेची आखणी एकदम काळजीपूर्वक करण्यात आली होती. चिमाजी आप्पा, अंताजी रघुनाथ, नारायण व रामचंद्र जोशी यांनी २६ मार्च १७३७ रोजी ठाणे शहराला वेढा घातला. २७ मार्च रोजी पोर्तुगीजांना पराभूत होऊन ठाणे शहर सोडावे लागले. २८ मार्च १७३७ रोजी मराठ्यांनी साष्टी शहर व किल्ला ताब्यात घेतले. ७ एप्रिल रोजी बांद्रा, वेसावे, कारंजा किंवा उरण व वसईचा किल्ला सोडून पुर्ण साष्टी बेट मराठ्यांच्या ताब्यात आले. मराठ्यांनी आता वसईवर हल्ला करण्याची पुर्ण तयारी केली. नारायण जोशी याने बेलापूर किल्ला एप्रिलच्या शेवटी जिंकला. (१७३७) बेलापूर, वसईच्या प्रदेशात मे १७३७ मध्ये पोर्तुगीजांच्या आरमारी बोटी आल्या होत्या. सुवर्णदुर्गजवळ पण पोर्तुगीजांची १७ गलबते आली होती. तेथे पाणी भरुन ती उत्तरेकडे गेली.[१४४] पोर्तुगीजांविरुद्ध मराठ्यांच्या या हालचाली सुरु असतानाच सरखेल संभाजी आंग्रेनी मानाजीचे सावकारी जहाज (तरांडे) जप्त करुन सुवर्णदुर्गला नेले. सुवर्णदुर्ग येथे त्यांनी आरमार तयार ठेवले आहे. स्वत: ते विजयदुर्गला येऊन पुढचा बंदोबस्त करणार होते. ही सर्व तयारी मानाजीच्या कुलाब्यावर चढाई करण्यासाठी केली होती.[१४५] १७३७ मध्ये मानाजीने पेशव्यांच्या मदतीने संभाजी आंग्रे व पोर्तुगीजांचे संयुक्त हल्ले परतवून लावले. बांद्र्याचे बंदर व किल्ला मात्र पोर्तुगीजांनी जहाजातून सतत केलेल्या गोळीबारामुळे व इंग्रजांनी पोर्तुगीजांना पाठविलेल्या मदतीमुळे मराठ्यांना जिंकता आला नाही. ५ जून १७३७ मध्ये बांद्र्यावरुन मराठ्यांनी माघार घेतली. मराठ्यांचा वेसावे हे साष्टी बेटावरील तटबंदीयुक्त स्थळ घेण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला. मराठ्यांनी धारावी जिंकून तेथून तोफांचा मारा करुन पोर्तुगीजांचे गोव्याशी असणारे दळणवळण विस्कळीत केले. पोर्तुगीजांनी धारावीवर १७ फेब्रुवारी १७३८ रोजी हल्ला करुन जिंकले.

वसई किल्ल्याच्या दक्षिणेस खाडी व त्यापुढे अथांग समुद्र होता. पूर्व बाजूस दलदलीचा व सतत भरतीच्या पाण्याने साचलेला प्रदेश होता. असे नैसर्गिक संरक्षण वसईच्या किल्ल्यास होते. याशिवाय वसईच्या किल्ल्याची तटबंदी अभेद्य होती. तटाच्या भिंती जमिनीपासून चाळीस फूट उंच व पाच फूट रुंद होत्या. त्यावर चारी बाजूला टेहळणी बुरुज व तोफखान्याची उत्तम सोय होती. मराठ्यांनी किल्ल्याच्या आजूबाजूचा प्रदेश व गावे ताब्यात घेऊन वसईच्या किल्ल्याला वेढा दिला. २० मे १७३७ पर्यंत मराठ्यांनी किनदान, टकमक, कामणदुर्ग, मनोर,

मांडली, तांदुळवाडी, अर्नाळा हे किल्ले, बेट व प्रदेश जिंकले. अर्नाळा बेटाचे महत्त्व जाणून पेशव्यांनी तेथे किल्ला बांधण्याचे ठरविले. ९ जून १७३७ ते २९ मे १७३८ पर्यंत वसईचा वेढा मराठे तीव्रतेने लढवत होते. पोर्तुगीजांनी ऑगस्ट ते ऑक्टोबर १७३८ मध्ये मुंबईतील इंग्रजांच्या मार्फत मराठ्यांशी तह करण्याचा प्रयत्न केला. साष्टी व वसई बेटे मराठ्यांना देण्यास तयार नसल्याने हा तह झाला नाही.

वसईचा किल्ला लढविण्यासाठी गोवे व दमण या पोर्तुगीज प्रांतातून मदत येत होती. पेशवे बाजीराव यांनी कोकणातील पोर्तुगीजांची पूर्ण सत्ता उखडून टाकण्याचे ठरविले. त्याप्रमाणे अधिकाधिक शस्त्रास्त्रांची निर्मिती, किल्ल्यांची दुरुस्ती सुरु झाली. चिमाजी आप्पा आजारी पडल्यामुळे २९ मे १७३८ रोजी पुण्याला गेले होते. ते डिसेंबर १७३८ मध्ये परत मोहीमेवर आले. रामजी शिंदे यांनी दमणमधील नरगोळ, खताळवाडी, उंबरगाव, डहाणू या शहरांवर हल्ला व लुटालुट केली. मराठ्यांच्या एका तुकडीने जानेवारी १७३९ मध्ये गोव्यावर हल्ला केला. २३ जानेवारी १७३९ मध्ये दादाजी भावे नरगुंदकर, व्यंकटराव घोरपडे व जिवाजी शिंदे यांनी साष्टी महालावर हल्ला केला. त्यांनी राशीलचा किल्ला व मार्मागोवा (मुरगाव) सोडून संपूर्ण साष्टी महाल मराठ्यांच्या ताब्यामध्ये आला. खुप प्रयत्न केल्यानंतर १२ मे १७३९ रोजी मराठ्यांनी वसईचा किल्ला ताब्यात घेतला. मुंबईच्या इंग्रजांच्या मदतीने मराठे व पोर्तुगीज यांच्यामध्ये तह झाला. पोर्तुगीजांना कोकण किनाऱ्यावरुन मराठ्यांनी हुसकावून लावले. मे १७३९ मध्ये कोकणामध्ये मराठ्यांची सत्ता पुर्णत्वास पोहोचली होती.

संभाजी आंग्रेने हिराकोटवर हल्ला केला. पानिपत युद्धात मराठ्यांचा दारुण पराभव झाला. यामध्ये सदाशिवरावभाऊ व नानासाहेब पेशव्यांचा मुलगा विश्वासराव तसेच अनेक मराठा सरदार मरण पावले. लाखो मराठा सैन्याची कत्तल झाली. नानासाहेब पेशव्यांना याचा धक्का बसला. २३ जून १७६१ रोजी नानासाहेब पेशवे यांचा पर्वतीवर मृत्यू झाला.[१४६] पेशवे नानासाहेब व संभाजी आंग्रे यांच्यात वरसोली येथे युद्ध झाले. यावेळी तुळाजी आंग्रे पेशव्यांविरोधात संभाजीस सामील झाला होता. ९ एप्रिल १७४० च्या या युद्धात संभाजी आंग्रे पराभूत झाले. तुळाजी जखमी होऊन धरला गेला. त्यास पुण्याला नेऊन परत सोडून देण्यात आले. २८ एप्रिल १७४० रोजी पेशवे बाजीराव यांचा मृत्यू झाला.

## छ. शाहू पेशवे बाळाजी बाजीराव

## नानासाहेब काळ (इ.स. १७४०–१७६१)

२८ एप्रिल १७४० रोजी पेशवे बाजीराव यांचा मृत्यू झाला. छ. शाहू यांनी बाजीराव यांचा मुलगा बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांना २५ जून १७४० रोजी पेशवेपद दिले. ९ नोव्हेंबर १७४० रोजी संभाजी आंग्रे सुवर्णदुर्गवरुन आरमारासहित मुंबई बंदरास आले. त्यांनी १४ मच्छिमार बोटी व १४ खलाशी पकडले.[१४७] सरखेल संभाजी आंग्रे १२ जानेवारी १७४२ रोजी मरण पावले.[१४८] सरखेल संभाजी आंग्रे यांच्या मृत्यूनंतर सुवर्णदुर्गचे किल्लेदार बकाजी नाईक महाडीक यास आता तेच कर्ते आहेत असे कळवले होते. एक फळ आशिर्वाद म्हणून स्वामींनी पाठवले होते ते सुवर्णदुर्गाला पाठविण्यास सांगितले. सरखेल संभाजी आंग्रे यांच्या मृत्यूनंतर सरखेल पदासाठी संघर्ष सुरु झाला. तुळाजी व मानाजी हे एकमेकांचे स्पर्धक होते. संभाजी आंग्रे यांनी सिद्दी व पोर्तुगीजांशी गुप्त तह, करार करुन अनेक वेळा मानाजी आंग्रेच्या ताब्यातील कुलाबा घेण्याचा तसेच छ. शाहूविरोधी कारवाया केल्या होत्या. तुळाजीने यावेळी संभाजीस छत्रपतींविरोधात साथ केली होती. संभाजी आंग्रेच्या मृत्यूनंतर मात्र तुळाजीने सरखेलपद मिळविण्यासाठी छत्रपतींशी संधान साधण्याचा प्रयत्न केला. छ.शाहूने सिद्दीच्या ताब्यातून अंजनवेल व गोवळकोट हे किल्ले जिंकून देणारास सरखेल पद देण्याचे जाहीर केले. तुळाजीने हे आव्हान स्विकारले.[१४९] यमाजी शिवदेव याने मध्यस्थी केली. छ.शाहूनी तुळाजी आंग्रे यांना सरखेल केले.[१५०] तुळाजी आंग्रेच्या पत्रांमध्ये सरखेल असा उल्लेख असणारा शिक्का जानेवारी १७४३ पुढच्याच कागदपत्रांमध्ये मिळतो.[१५१] जुलै १७४२ मध्ये तुळाजी आंग्रे यांनी सुवर्णदुर्गवरुन नारो बल्लाळ व भिवजी तांबे यांच्याबरोबर नारळ, पोफळी, केळी, अननस, कोकंब, सुरमाड, तगर, भुईचाफा, मिस्वेली, असोगे यांची रोपे पाठविली होती.[१५२] तुळाजी आंग्रे एका बाजूला छ. शाहूकडे सरखेल पद मिळविण्यासाठी प्रयत्न करत होते. त्याचवेळी छ. शाहूविरोधी कारवाया ते दुसरीकडे करत होते. मार्च १७४५ मध्ये तुळाजी आंग्रेने छत्रपतींना न जुमानता बाणकोट किल्ल्यावर पहिल्या इमारती पाडून छ.शाहूंच्या इच्छेविरुद्ध नव्या दुसऱ्या इमारती बांधल्या.[१५३] याशिवाय छत्रपतींनी कृष्णाजी घाटगे यांना बाणकोटच्या बंदोबस्तासाठी पाठविले तर त्यास प्रतिकार करु असा निरोप तुळाजीने जगन्नाथ आवजी यास पाठविला

होता.[१५४] सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोत्याजीराव विचारे यांनी विश्वनाथभट वैद्य यांच्याकडे तुळाजीच्या बाणकोट वसविण्याबद्दलच्या बातमीची खात्री व कृष्णाजी घाटगे यांना कोकणात पाठविण्याबद्दल सातारच्या दरबारामध्ये काय ठरले याबद्दल चौकशी केली आहे.[१५५] याशिवाय सातारच्या दरबारातील राजकारणाची, पेशवे नानासाहेब यांच्या भावी आक्रमणांच्या योजनांची चौकशी मोत्याजीराव विचारे यांनी केली आहे. तुळाजी आंग्रेला कळविण्यासाठी सातारच्या राजकारणाची माहिती सविस्तर कळवावी अशी विनंती सुवर्णदुर्गच्या किल्लेदारांनी विश्वनाथ भट वैद्य यांना केली होती.[१५६] जुलै १७४३ मध्ये सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोत्याजीराव विचारे यांनी तुळाजी आंग्रेच्या आज्ञेप्रमाणे सुभानजी जगताप यांच्याबरोबर सुपारीची १५ पोती व इतर सामान विश्वनाथ भट वैद्य यांच्याकडे पाठविली. ती सुपारी छ. शाहूंना देण्याविषयी भट यांना कळविले.[१५७] याशिवाय अंतांजी घाटगे तुळाजी विरोधात सरखेल पदाच्या वाटाघाटीत सातारच्या दरबारामध्ये अडथळे आणतो. अंताजी व राजपुरीवरुन रुमाजी घाटगे यांनी येऊन अंताजी घाटगे यांची भेट घेतली. हे दोघे सिद्दीशी स्नेहभावाने वागतात. कृष्णाजी घाटगे यांच्या मताप्रमाणे कोकणातील राजकारण झाल्यास, सुवर्णदुर्ग व इतर ठिकाणांना सिद्दीचा धोका निर्माण होईल. प्रजेवर अन्यास होईल याबद्दल सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोत्याजीराव विचारे यांनी विश्वनाथ भट यांना सावध केले.[१५८] तुळाजीने विश्वंभट वैद्य यांना सातारला राणीकडे स्वत:ची बाजू मांडण्यास सांगितले.[१५९]

तुळाजीने बाणकोटवर नवे बांधकाम केल्यामुळे छ. शाहू त्याच्यावर नाराज झाले. म्हणून तुळाजीने विश्वनाथ व बाळंभट वैद्य यांना छत्रपतींकडे आपली रदबदली करण्यास सांगितले. त्याने बाणकोटवर संरक्षणाच्या दृष्टीने केलेल्या बांधकामविषयक कृत्याचे समर्थन केले. तुळाजी आंग्रे विश्वनाथ भट व बालंभट वैद्याना कळवतो की, सिद्दीने वेसवी खाडीच्या मुखाशी बाणकोट वसविला (किल्ल्यावरील बांधकाम) होता. राजापूरच्या सैन्याने (सिद्दीच्या) मध्येच किल्ला जिंकला होता. बकाजी नाईक महाडीक यांनी सैन्यासहित जाऊन तो पुन्हा जिंकला. तरीही परत सिद्दीने तो परत घेतला. बकाजी नाईक महाडीक यांच्यासारखा पराक्रमी माणूस त्या जागेसाठी (बाणकोट) कामास आले. अंजनवेलकर सिद्दीने बाणकोट घेण्यासाठी व त्यावर बांधकाम करण्यासाठी दहा गलबते सैन्य, कुदळ, फावडे व इतर सामान तयार केले. ही बातमी कळताच माणसे पाठवून बातमीची सत्यता तपासली. बाणकोट वसवून महाडपर्यंत लुटमार, हल्ला

(धुंदाई) करणार असे तथ्य आढळले. म्हणून लगेचच गुराबा, गलबते व सामान पाठवून बाणकोट वसविला.[१६०]

तुळाजी आंग्रे यांनी छ. शाहू, पेशवे, कोल्हापूरचे छ.संभाजी यांच्याबरोबरच इंग्रज, पोर्तुगीज यांना कोकण किनारपट्टीवर त्रस्त केले होते. मंडणगडजवळ दोन कोसावर खाडीत तुळाजी आंग्रेचे आरमार व पेशव्यांकडील महाडकर राघो केशव यांच्यामध्ये युद्ध झाले. आंग्र्याच्या लोकांना तेथून हुसकावून लावले.[१६१] छ.शाहूंच्या आज्ञेप्रमाणे प्रतिनिधी तुळाजी आंग्रेशी सहकार्याची बोलणी करण्यास गेले होते. दोघांची भेट राजापूर येथे झाली.[१६२] त्याप्रमाणे परस्परांचा वस्त्रे देऊन सन्मान झाला. तुळाजीने आपण छ.शाहू यांच्याशीच एकनिष्ठ असल्याचा हवाला देत छत्रपतींनी कृपा करावी, अशी विनंती प्रतिनिधींकडे केली. तुळाजीने छत्रपतींच्या भेटीस येण्याचे कबुल केले होते.[१६३] यानंतर लगेचच तुळाजी आंग्रे विशाळगड वेढा घालून जिंकणार अशी बातमी कळल्याने यमाजी शिवदेव, उदाजी चव्हाण व मालोजी घोरपडे यांना तुळाजीचा बंदोबस्तासाठी पाठविण्यात आले.[१६४] तुळाजी आंग्रे यांनी छत्रपतींच्या ताब्यातील मुढागड जिंकला. त्यावर संरक्षणाच्या दृष्टिने बांधकाम केले. या किल्ल्याच्या आश्रयाने तुळाजीने पन्हाळा प्रांतातील बराच प्रदेश बळकावला. बहुतच धामधूम केली, प्रलये आरंभला.[१६५] बावड्याचे भगवंतराव, विशाल गडकरी, (प्रतिनिधी) सावंत, आप्पाजी आंगरे यांच्या संयुक्त सैन्याने (५०० स्वार व ८००० पायदळ) मुढागड जिंकला. राजापूर ते संगमेश्वरपर्यंतचा आंग्रेंचा प्रदेश जाळून टाकला. तुळाजी आंग्रेंना आपल्या किल्ल्यांचा बंदोबस्त करताना नाकीनऊ आले. सुवर्णदुर्ग व इतर एक दोन किल्ल्यातील आंग्र्यांचे लोक छत्रपतींच्या सरदारांना फितुर झाले होते. तुळाजी आंग्रे यांनी रातोरात सुवर्णदुर्ग गाठून बंदोबस्त केला. फितुर झालेल्या वीस लोकांना मारुन टाकले.[१६६] छ. शाहूंनी कोकण प्रांतात जाळपोळ, लुटालुट करु नये, असे आपल्या सरदारांना कळविले. तुळाजी आंग्रेने सातारला छत्रपतींच्या भेटीस येण्याचे कबूल केले. तुळाजी आंग्रे व पोर्तुगीज यांचे संयुक्त सैन्य रेवदंडा किल्ल्यावर आक्रमण करणार असल्याचे कोकणमधील पेशव्यांच्या सरदारांना कळले.[१६७] यांच्या बंदोबस्तासाठी रेवदंडा खाडीत असणारे आरमार व युद्धाचे नियोजन पेशव्यांना कळविण्यात आले. इ.स. १७३९ मध्ये छ.शाहूंनी अमात्य भगवंतराव पंडित, प्रतिनिधी गंगाधर पंडित व सामंत यांनी तुळाजीचा बंदोबस्त करण्यासाठी

कोकणात पाठविले होते.[१६८] तुळाजी आंग्रे तीन पाल, सहा गुराबा, चाळीस गलबत एवढे आरमार घेऊन डिसेंबर १७५० मध्ये विजयदुर्गवरुन सुवर्णदुर्ग किल्ल्याकडे गेले.[१६९]

तुळाजीने १७४२ मध्ये नऊ गलबते व गुराबा स्वारीसाठी समुद्रात पाठविली. त्यांनी सुरतवरुन कोलकत्त्याला माल भरुन घेऊन जाणारे इंग्रजांची चार गुराबा व एक तावडा पकडून सुवर्णदुर्गला आणले.[१७०] कुलाब्यावरुन तुळाजीने समशेर व नागीण नावाची दोन गलबते पाठविली त्यांनी सुरत खाडीतून इंग्रजांची पाच गलबते पकडली. १८ जानेवारी १७४५ रोजी मुंबईच्या इंग्रज अधिकाऱ्यांनी नानासाहेब पेशवे यांना आंग्र्यांच्या होणाऱ्या त्रासाबद्दल संताप व्यक्त केला होता. तुळाजी आंग्रे यांनी ६ मे १७४५ रोजी कॅ. जेकब हे इंग्रजांचे व्यापारी गलबत पकडून विजयदुर्गला आणले. हे गलबत सोडविण्यासाठी तुळाजीने इंग्रजांना आठ हजार रुपये खंडणी मागितली. १७४९ मध्ये इंग्रज अधिकारी कमांडर जेम्स व तुळाजीचे आरमार, यांच्यामध्ये आरमारी युद्ध झाले. कॅप्टन विल्यम जेम्स याने तुळाजीच्या १६ जहाजांवर हल्ला केला. तुळाजीचे एक मोठे जहाज इंग्रजांनी बुडवून बाकिच्यांना विजयदुर्ग किल्ल्यामध्ये पिटाळले.[१७१] ऑक्टोबर १७४९ मध्ये तुळाजीने स्वत: नेतृत्व करुन ईस्ट इंडिया कंपनीचे रेस्टोरेशन ही जहाजे पकडली.[१७२] १७५० मध्ये दक्षिणेकडील सर्व नाविक सरदार इंग्रजांशी सहकार्याची बोलणी करण्यास मुंबईस गेले. फक्त आंग्रे त्या ठिकाणी गेले नाहीत. त्यामुळे इंग्रजांनी आंग्र्यांच्या आरमाराप्रमाणे लढाऊ आरमार ठेवले. ग्रोस हे इंग्रज अधिकारी तुळाजीच्या आरमाराविषयी लिहतात, "आंग्र्यांचे आरमार चांगल्याप्रतीचे होते. त्यातील गलबते वजनाला हलकी असल्यामुळे आणावयाचे अशी त्यांच्या युद्धाची हातोरी होती. १७५० मध्ये तुळाजीने कमांडर लिस्ले याचे चौसष्ट तोफांचे दि झिलंट व पन्नास तोफांचे रुबी ही जहाजे पकडली. मुंबईच्या कंपनी सरकारने आंग्र्यांना सामान्य, साधारण शत्रू म्हणूनच वागवावे असा आपल्या आरमारास हुकूम दिला."[१७३]

अशाप्रकारे तुळाजी आंग्रे यांनी मराठे, इंग्रज यांना त्रस्त केले होते. मुंबईच्या इंग्रजांनी पेशव्यांना कोकण किनाऱ्यावरील चाचेगीरीचा बंदोबस्त करण्याची योजना आखण्यास सांगितले होते.[१७४] ते म्हणतात, "तुम्ही जर कोकण किनाऱ्यावरील चाच्यांचा नि:पात करण्याची योजना आखलीत तर तुम्हालाही ते फायदेशीर होईल व मग आम्ही मदतीस तयार आहोत.[१७५] हे पत्र १८ जानेवारी १७४५ मधील आहे. यावरुन १७४५ पासूनच इंग्रज पेशवे नानासाहेब यांना

तुळाजीच्या विरोधात मदत करण्यास तयार असल्याचे दिसते. तुळाजी आंग्रे दिवसेंदिवस छ.शाहू यांना अजिबात जुमानेसे झाले. ते छत्रपतींशी दुटप्पी वर्तन करत असत. ते एका बाजूला अत्यंत लीन होऊन छत्रपतींशी एकनिष्ठ आहोत, त्यांच्याशिवाय दुसरा आधार नाही असे दाखवत तर दुसऱ्या बाजूला छ.शाहूंचे व त्यांचे पेशवे व सरदार यांच्या ताब्यातील किल्लेव प्रदेश घेत. छत्रपतींनी अनेक वेळा आपले सरदार पाठवून तुळाजीचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला. पण तुळाजीचा पूर्ण बंदोबस्त होऊ शकला नाही. छ. शाहूंनी प्रतिनिधींप्रमाणेच १७४५ मध्ये विश्वंभट वैद्य यांना तुळाजीकडे सामोपचाराची बोलणी करण्यासाठी पाठविले.[१७६] छ. शाहू यांनी तुळाजी आंग्रेचा शांततेच्या व लष्करी दबावाच्या माध्यमातून बंदोबस्त करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

इ.स. १७४३ पासून छ. शाहूंची प्रकृती ढासळू लागली. महाराणी ताराबाईची सत्तेची महत्वाकांक्षा अजून संपली नव्हती. वाढते कर्ज, राण्यांची भांडणे, वाढत्या मागण्या यामुळे छ. त्रस्त होते. अनेक वेळा त्यांचे राज्यकारभारामध्ये लक्ष नसे. एकेकाळी त्यांचे विश्वासू असणारे श्रीपतराव प्रतिनिधी जिवाजी खंडेराव चिटणीस हे सहकारी मृत्यू पावले होते.. दि. १५ डिसेंबर १७४९ रोजी छ. शाहूंचा शाहूनगर येथे रंगमहालमध्ये मृत्यू झाला. अशाप्रकारे छ. शाहूंच्या ४२ वर्षांच्या कारकीर्दीचा शेवट झाला.

## छ. रामराजे – इ.स. १७४९–१७६१

## पेशवे नानासाहेब १७४९–१७६१

छ. शाहूंच्या मृत्यूनंतर ४ जानेवारी १७५० रोजी रामराजे यांना राज्याभिषेक करण्यात आला. छ. शाहूंच्या कारकिर्दीतच सुरु झालेल्या कारवाया वाढतच गेल्या. मध्ये तुळाजीने विशाळगडवर आक्रमण केले. भगवंतराव अमात्य, विशाळगडकरी, आप्पाजी आंग्रे, यांनी तुळाजीचे हे आक्रमण परतवून लावले व त्याचा योग्य बंदोबस्त केला. बाबाजी विश्वासराव हे तुळाजी आंग्रे व छत्रपतींमध्ये सामोपचाराची बोलणी करण्यास आले. छत्रपतींच्या दर्शनास येण्याचे तुळाजीने कबूल केले.[१७७] राजश्री भगवंतराव पंडित व तुळाजी आंग्रे यांच्यातील संघर्ष वाढतच गेला. तुळाजीने कोल्हापुरच्या छत्रपतींच्या ताब्यातील गगनगड किल्ल्या खालील प्रदेशावर आक्रमण करुन त्या प्रदेशाची नासधूस केली होती.[१७८] सदाशिवपंत दाते यांना जुलै १७५४ मध्ये रत्नागिरीचे सुभेदार म्हणून नेमले होते. त्यांनी सुवर्णदुर्ग, तळे, घोसाळा हे किल्ले

जिंकले.[१७९] सरखेल तुळाजी आंग्रे आरमारासह बाणकोट खाडीमध्ये आले. यशवंतगड जिंकून घ्यावा या उद्देशाने ते आले होते. महाडकरी व यशवंतगडकरी यांनी निजामपूर जवळ खादार भादेवमध्ये असणाऱ्या रामजी भगवंतांना ही बातमी कळवली. रामजी भगवंत तातडीने बाणकोट खाडीकडे गेले. रामजी भगवंत आल्याचे कळताच तुळाजी आंग्रे निघून गेले.[१८०] नोव्हेंबर १७५५ मध्ये तुळाजीने डचांना (वलंदेज) देवगड देण्याचे, पोर्तुगीजांना ४ लाख रु. देण्याचे मान्य करुन डच व पोर्तुगीज यांची पेशव्यांविरोधात लष्करी मदत मिळविली होती. याशिवाय सुरतचा सिद्दी मसुदखान व जंजिऱ्याचा सिद्दी यांची मदत मिळविण्याचे तुळाजीचे प्रयत्न सुरु होते. अशाप्रकारे डच, पोर्तुगीज, सुरतेचा सिद्दी मसूदखान, जंजिऱ्याचा सिद्दी व तुळाजी यांची पेशवे नानासाहेब यांच्या विरोधात संयुक्त आघाडी निर्माण करण्याचे राजकारण तुळाजीने सुरु केले होते.[१८१] देवगडला बाबुराव साटम, खारेपाटण येथे पाच–सातशे सैन्यासह रुद्राजी धुळप, रत्नागिरीस धुळपाचा भाऊ, जयगडला शंकराजी विश्वासराव, अंजनवेलला मोत्याजीराव विचारे गोवळकोटला राघोबस्वंत (यशवंत?) व स्वत: तुळाजी विजयदुर्ग येथे थांबून तुळाजीने पेशव्यांविरोधात लढाईचा जय्यत तयारी केली होती.[१८२] पेशव्यांच्या कोकणातील सुभेदार रामजी महादेवने तुळाजीच्या लोकांमध्ये फूट असल्याने ते पेशव्यांच्या सैन्याविरोधात टिकाव धरणार नाहीत. जर पेशव्यांच्या सैन्याने अधिक प्रयत्न केले तर तुळाजीचा पूर्ण बंदोबस्त होईल अशी आशा व्यक्त केली आहे.[१८३] नोव्हेंबर ते जानेवारी १७५५ मध्ये तुळाजीने पेशव्यांविरोधात पोर्तुगीजांची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. नानासाहेब हा आपला समान शत्रू असून दोघांनी परस्परांना मदत करुन शत्रूचे (पेशवे नानासाहेब) दमन करु. आबदल्यात तुम्हाला (पोर्तुगीजांना) तुमची ठाणी परत मिळविता येतील असे त्याने पोर्तुगीजांना कळवले.[१८४] तुळाजीचा हा प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला. पण पोर्तुगीजांनी आपले सैन्य परत बोलविले. पेशवे नानासाहेब यांनी गोव्याच्या राज्य सचिवाला पत्र पाठवून त्याचा समाचार घेतला.[१८५] अशाप्रकारे तुळाजी आंग्रे सातारचे छ., पेशवे कोल्हापूरचे संभाजी, इंग्रज, पोर्तुगीज, डच, मानाजी, सिद्दी सर्वांनाच डोईजड होऊ लागला. १७५४ मध्ये इंग्रज आरमारी अधिकारी कमांडर जेम्स तुळाजीचे मुख्य केंद्र विजयदुर्गवर आक्रमण करता येते का याची चाचपणी करुन आला. त्याने इंग्रजांना हा किल्ला एकट्याने घेणे अशक्य आहे. असा रिपोर्ट (अग्रवाल) केला.[१८६] १७५४ मध्येच तुळाजीने गोव्याजवळ डच कंपनीच्या तीन जहाजांवर हल्ला केला. यात आंग्र्यांची काही जहाजे जळावी. हीच आग डचांच्या

जहाजावर जाऊन ती जळाली. काही डच लोक आंग्र्यांच्या ताब्यात आले. त्यांचा छळ झाला. याशिवाय पुन्हा तुळाजीने ५० व ३६ तोफांची जहाजे पकडून जाळली. १८ तोफांचे जहाज पळवून नेले.[१८७]

रामजी महादेव यांनी मार्च १७५५ पासून इंग्रजांशी तुळाजीविरोधात संधान साधण्याचा प्रयत्न केला. १० मार्च १७५५ रोजी मराठ्यांचे तुळाजीचा पुर्ण बिमोड करण्याची अपेक्षा व्यक्त करणारे पत्र इंग्रजांना प्राप्त झाले.[१८८] रामजी महादेवने याबरोबरच विजयदुर्ग व सुवर्णदुर्गामध्ये फितुरी केली. तुळाजीमुळे किनारपट्टीवरचा व्यापार धोक्यात आलेल्या इंग्रजांना ही चांगली संधी मिळाली. मुंबईचा इंग्रज गव्हर्नर रिचर्ड बुर्शियर व पेशव्यांच्या वतीने सुभेदार रामजी महादेव यांच्यामध्ये दिनांक १९ मार्च १७५५ रोजी करार झाला.[१८९] २२ मार्च १७५५ मध्ये रामजी महादेवने आरमार ताबडतोब पाठविण्याची विनंती करणारे पत्र पाठविले. पेशव्यांनी वाडीकर सावंत, कोल्हापूरचे संभाजी, अमात्य, प्रतिनिधी यांनी तुळाजीच्या बंदोबस्तासाठी रामजी महादेव यांना आवश्यक ती मदत करावी अशी सूचना केली. जावजी गवळी व खंडोजी माणकर हे पेशव्यांचे सरदार कोकणमध्येच होते. याशिवाय पेशव्यांनी समशेरबदाद्दर (बाजीराव मस्तानी पुत्र) व दिनकर महादेव यांना रामजी महादेव यांच्या मदतीस कोकणामध्ये पाठविले.[१९०] पोर्तुगीजांनी तुळाजीच्या मदतीस जाऊ नये असे नियोजन करण्यात आले. कोल्हापूरच्या संभाजीना तुळाजीचा मोड व्हावा असे वाटत होते. पण पेशवे नानासाहेबांवर असणारे तुळाजीचे दडपण कायम रहावे असे वाटत होते. त्यामुळे  ते वेळ पडेल तसे वागत होते.[१९१] दि. १९ मार्च १७५५ मध्ये मुंबईचा इंग्रज गव्हर्नर रिचर्ड बुर्शियर व पेशव्यांच्या वतीने रामजी महादेव यांच्यामध्ये तुळाजी विरोधात करार झाला. त्याप्रमाणे इंग्रजांनी समुद्रातून तुळाजीच्या सर्व ठिकाणांवर हल्ला करावा. पण सध्या फक्त सूवर्णदुर्ग, अंजनवेल व विजयदुर्ग यावर हल्ला करावा. या तुळाजीच्या किल्ल्यांमध्ये मिळणरी संपत्ती, तोफा, दारुगोळा हे सर्व मराठ्यांना द्यावे. मानाजी आंग्रेच्या प्रदेशावर हल्ला केल्यास खांदेरी बेट बंदर व जवळपासची रेवस, रांजणखार, सारळ, शामी, मांडवे, कोळगाव, डोंबारण, केहीम व आवास ही गावे इंग्रजांना द्यावित. आवश्यकता वाटल्यास गव्हर्नर व नानासाहेब पेशव्यांच्या संमतीने अधिकची कलमे ठरविण्यात यावित.[१९२] या करारास पेशव्यांनी मान्यता दिली.

रामजी महादेव यांनी विजयदुर्ग आधी जिंकावा असा आग्रह धरला. पण पावसाळा जवळ आल्याने आधी सुवर्णदुर्ग व आजूबाजूचे किल्ले जिंकावेत. त्यावर पक्की व्यवस्था करावी आणि मगच विजयदुर्गवर आक्रमण करावे असे ठरविण्यात आले.[१९३]

या करारानंतर इंग्रज आरमाराचा प्रमुख विल्यम जेम्स यास सुवर्णदुर्ग किल्ल्यावर हल्ला करण्याचा हुकूम करण्यात आला. मराठ्यांनी जमिनीवरुन हल्ला करावा व इंग्रजांनी किल्ल्यास समुद्रातून वेढा द्यावा असे ठरले. इंग्रजाच्याबरोबर यावेळी रामजी महादेव व मराठा आरमाराचे प्रमुख नानापंत होते. सदाशिवपंत दाते यांना जुलै १७५४ मध्ये रत्नागिरीचे सुभेदार म्हणून नेमले होते. त्यांनी सुवर्णदुर्ग, तळे, घोसाळा हे किल्ले जिंकले.[१९४]

सुवर्णदुर्गच्या मोहीमेची वेळ निश्चित झाली. तुळाजी आंग्रे यास इंग्रज व पेशवे यांच्या संयुक्त मोहीमेची बातमी कळताच त्याने पोर्तुगीजांशी संधान साधले.[१९५] तुळाजी व पोर्तुगीज हे इंग्रज व पेशव्यांच्या सुवर्णदुर्गच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यास जाणार अशी बातमी कृष्णाजी महादेव व इतर सरदारांना कळली. सुवर्णदुर्गच्या मोहीमेवरुन तुळाजीचे लक्ष दुसरीकडे वेधण्यासाठी कृष्णाजी महादेव यांनी जावजी गौळी गोसावी व खंडोजी माणकर यांना घाटमाथ्यावर मुक्काम करण्याचा सल्ला दिला.[१९६] घाटमाथ्यावर सैन्याचा मुक्काम झाल्यामुळे त्या प्रदेशात लष्करी दबाव निर्माण होईल व तुळाजी व पोर्तुगीजांचे लक्ष त्यामडे वेधले जाईल असे मत कृष्णाजी महादेव यांनी व्यक्त केले होते.[१९७]

रामजी महादेव, मोराजी शिंदे, बलकवडे व नारो त्रिंबक हे पेशव्यांचे सरदार आरमारासहित आंजर्ल्याच्या खाडीमध्ये गेले. जमीनमार्गे पेशव्यांचे पाच हजार सैन्य गेले. त्यानंतर दोन्ही सैन्य एकत्र सुवर्णदुर्ग किल्ल्याकडे गेले.[१९८] आंग्रे व पेशव्यांच्या सैन्यामध्ये युद्ध सुरु होऊन हर्णेची पेठ जळून भस्म झाली. हर्णेच्या गोड्या विहिरीवर पेशव्यांच्या सैन्याने मोर्चेबंदी केली होती. इंग्रजांची ४ मोठी व काही लहान जहाजे असे आरमार तयार होते. आंग्र्यांचे काही आरमार हर्णे बंदरावर होते. आंग्र्यांनी मोठी तरांडी व गुराबा हर्णे बंदरावर ठेवली होती. जादा असलेली लहान जहाजे त्यांनी आंजर्ल्याच्या खाडीमध्ये ठेवली होती.[१९९] अशाप्रकारे सुवर्णदुर्ग किल्ला जमीन व समुद्रमार्गे अनुक्रमे पेशव्यांचे सैन्य व इंग्रज यांनी वेढला होता. सुवर्णदुर्गच्या मोहीमेसाठी घनगड, लोहगड, कोरीगड या किल्ल्यावरील शिबंदीस जादा तैनात (मोबदला) देऊन पाठविले होते.[२००]

पेशव्यांचे सैन्य हर्णेतील गोडीबाव येथे युद्धासाठी तयार ठेवण्यात आले.[२०१] गोवा किल्ल्यातून तुळाजीच्या २५० सैनिकांनी हर्णेच्या पेठेमध्ये जाऊन जाळपोळ केली. पेशव्यांचे सैन्याने त्यांच्याबरोबर युद्ध करुन त्यांना परतवून लावले.[२०२] गोवा किल्ल्यातून सतत आंग्र्यांचे सैन्य युद्धासाठी बाहेर पडत होते. पेशव्यांच्या सैन्याने न घाबरता त्यांचा सतत प्रतिकार केला. जमिनमार्गे ३ तोफा, २ गर्नाळा, १ फटाकडीचा मारा सुवर्णदुर्गवर करण्यात आला. इंग्रजांनी पाण्यातून मनवर व गुराबांचा जबरदस्त आरमारी हल्ला केला. इंग्रजांनी दोन दिवस बाँब व गर्नाळांचा तिव्र मारा केला.[२०३] त्यामुळे सुवर्णदुर्गमधील दारुखाना व कोठी यांना आग लागली. या आगीमध्ये आर्धा किल्ला जळला.[२०४] किल्लेदार रामजी पाटोळे याच्याकडून दोन माणसे किल्ल्याबाहेर बोलणी करण्यास आली. पेशव्यांच्या पदरी सेवेस राहतो व सर्व जागा देतो. पण आक्रमण थांबवा असा निरोप या माणसांकरवी सुवर्णदुर्गचा किल्लेदार रामजी पाटोळे याने पाठविला.[२०५] ते मान्य करण्यात आले. ४ एप्रिल १७५५ रोजी गोवा, कनकदुर्ग व फत्तेगड हे तिनही किल्ले इंग्रज व मराठ्यांच्या संयुक्त सैन्याने घेतले.[२०६] सुवर्णदुर्ग किल्ल्यावर ४ एप्रिल १७५५ रोजी मराठ्यांचे निशाण चढणार होते. पेशव्यांच्या सरदाराशी बोलणी करुन सुवर्णदुर्गचा किल्लेदार रामजी पाटोळे ४ एप्रिल १७५५ रोजीच गोवा किल्ल्यातून सुवर्णदुर्ग किल्ल्यामध्ये गेले.[२०७] किल्ल्यातील नाईक व इतर सरदार सुवर्णदुर्ग पेशवे सरदारांच्या ताब्यात देण्यास काकू करत होते. त्यामुळे एक दोन दिवस वाट बघून रामजी महादेव यांनी पुन्हा इंग्रजांकडून सुवर्णदुर्गवर तीव्र मारा करण्याचे ठरविले होते.[२०८] रामजी महादेव यांनी सुवर्णदुर्गच्या या मोहिमेसाठी अजून काही सैन्य पाठविण्याची विनंती केली होती.[२०९] रामजी पाटोळे गोवा किल्ल्यातून सुवर्णदुर्गमध्ये गेल्यानंतर सुवर्णदुर्ग ताब्यात घेऊन त्यावर छत्रपतींचे निशाण चढविण्यासाठी श्रीवर्धन येथील महागिरी (एक प्रकारची बोट) आरमारासोबत सुवर्णदुर्ग किल्ल्याजवळ नेली होती. पेशव्यांकडील माणसांनी सुवर्णदुर्गच्या अंमलदाराजवळ सर्व माहिती सांगितली. अंमलदारांचे पत्र घेऊन ते परत आले.[२१०]

१२ एप्रिल १७५५ रोजी इंग्रज व मराठ्यांच्या संयुक्त सैन्याने सूवर्णदुर्ग किल्ला जिंकला. त्यापूर्वीच ४ एप्रिल १७५५ रोजी कनकदुर्ग, फत्तेगड व गोवा हे किल्ले त्यांनी जिंकले.[२११] सुवर्णदुर्ग घेताच मराठ्यांनी बाणकोट, पालगड, रसाळगड जिंकले. आठ दिवसात आठ किल्ले घेतले.[२१२]

१९ एप्रिल १७५५ रोजी लिहलेल्या पत्रात केसो बहिरव वैद्य, भिकंभट वैद्य यांना तुळाजी आंग्रेचे सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग, कनकदुर्ग व गोवे असे चार किल्ले व बाणकोट, मंडणगड व पालगड किल्ले घेतल्याचे कळवले.[२१३]

सुवर्णदुर्ग जिंकल्यानंतर ताबडतोब पावसाळ्यामध्ये रत्नागिरी व विजयदुर्ग तुळाजीकडून जिंकावा असे रामजी महादेव यांचे मत होते. यास विरोध करुन ईस्ट इंडिया कंपनीने रामजीपंताना कळविले की, जर आम्ही (इंग्रज) निघून गेलो तर तुळाजी तुम्हाला डोईजड होईल. त्यापेक्षा तुम्ही जे मिळवले आहे (सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेगड, गोवा, मंडणगड, पालगड) ते आधी पूर्ण ताब्यात घ्या.[२१४] शेवटी नाईलाजाने रामजी महादेव याने काही सैन्य अंजनवेलकडे आक्रमणासाठी पाठविले व तो जिंकला. अंजनवेलची मोहीम सुरु असताना सुवर्णदुर्गवरुन रामजी महादेव यांनी कृष्णाजी महादेव व खंडोजी माणकारांना लवकरात लवकर मदतीस बोलविले.[२१५] जानेवारी १७५६ मध्ये ठरल्याप्रमाणे ठरावात बाणकोट इंग्रजांना देण्यात आला. (कागदोपत्री, प्रत्यक्ष व्यवहारात नाही)[२१६] जानेवारी १७५५ मध्ये समशेर बहाद्दर व दिनकर महादेव यांना कोकणच्या मोहिमेवर पाठविले. पण तोपर्यंत सुवर्णदुर्गची मोहीम संपल्यामुळे ते आंबेघाटाने रत्नागिरीस उतरले. त्यांनी रत्नागिरी किल्ल्यास वेढा घातला.

जानेवारी, फेब्रुवारी १७५६ च्या दरम्यान तुळाजी आंग्रेने पेशव्यांशी शांतता वाटाघाटी करण्याचा प्रयत्न विविध सरदारांच्या माध्यमातून केला.[२१७] नानासाहेब पेशव्याने तुळाजीशी कोणतीही बोलणी करु नये. जोरदार आक्रमण करुन त्यांच्या बंदोबस्ताचे काम पूर्ण करावे अशी आज्ञा केली.[२१८] पण हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. मुंबईच्या गव्हर्नरने मद्रास येथे इंग्लंडवरुन आलेली आरमारी मदत पाठविण्याची विनंती मद्रासच्या इंग्रज अधिकाऱ्यांना केली. त्यांनी इंग्लंडमधून आलेल्या क्लाईव्हच्या नेतृत्वाखाली काही सैन्य व ॲडमिरल वॉटसनच्या नेतृत्वाखाली आरमार यांना मदतीस पाठविले. वॉटसनचा विश्वासू सहकारी विल्यम ह्युवेट एका लहान गलबतासह विजयदुर्गची पाहणी करुन आला. ७ फेब्रुवारी १७५६ रोजी वॉटसन व क्लाईव्हने मुंबई सोडले. ११ फेब्रुवारीस विजयदुर्गवर इंग्रज आरमाराने आक्रमण केले. मराठ्यांची ४०–५० जहाजे त्यांना येऊन मिळाली. एक गोळा तुळाजीच्या आरमारावर पडून ते भस्म झाले. १३ फेब्रुवारी १७५६ रोजी विजयदुर्ग ताब्यात आला. दरम्यान तुळाजीने रामजी महादेव यांच्याशी पेशव्यांना शरण येण्याविषयी बोलणी केली. पण रामजी महादेव यांनी टाळाटाळ केली.

किल्ला मिळाल्यानंतर कॅप्टन फोर्बसने मराठ्यांच्या सैन्याला घेरियामध्ये जाऊ दिले नाही. वॉटसनने मराठ्यांनी तुळाजीला इंग्रजांच्या ताब्यात द्यावा. यासाठी रामजी महादेवचे मन वळविण्याचा प्रयत्न केला.[२१९] तुळाजी आंग्रे यास मराठ्यांनी इंग्रजांच्या ताब्यात दिले नाही. तो मराठ्यांच्या कैदेतच १७८६ मध्ये वंदन किल्ल्यावर मरण पावला. ५ मार्च १७५६ ला रत्नागिरी व १३ मार्च १७५६ रोजी रसाळगड जिंकल्याचे वृत्त आले.[२२०] इंग्रजांनी बाणकोट व तुळाजी आंग्रे मराठ्यांकडे ठेवण्याच्या बदल्यात विजयदुर्ग इंग्रजांना द्यावे अशी बोलणी कर्नर वॉटसनने गंगाधरपंत व रामजी महादेव यांच्याकडे लावली.[२२१] बाणकोटच्या सनदा घेऊन विजयदुर्ग ताब्यात घेण्यासाठी रामजी महादेव यांचे प्रयत्न सुरु होते. महंमद सोफी पलवकर व बाजीपंत यांचेमार्फत कराराची कलमे त्यापूर्वी ठरविण्यात आली होती. २ मार्च १७५६ रोजी गंगाधरपंत व रामजी महादेव यांनी इंग्रजांकडून आलेल्या करारावर अनेक हरकतीचे मुद्दे मांडले. विल्यम डेलगार्डे यास घेरियाचा किल्लेदार म्हणून पाठविले. त्याचवेळी बाणकोटचा किल्लेदार विल्यम अँड्र्यू प्रीन्स मुंबईस गेला.[२२२] रामजी महादेव यांनी बाणकोटचा किल्लेदार विल्यम अँड्र्यू प्रीन्स याच्याकडे भास्करपंत शिर्के व गणेश परशुराम यांना बाणकोटच्या सनदा देऊन पाठविले.[२२३] कर्नाटकच्या मोहिमेवरुन परत आल्यावर दुसऱ्या दिवशी नानासाहेब पेशव्यांनी २१ जुलै १७५६ रोजी इंग्रज गव्हर्नरला विजयदुर्ग मराठ्यांच्या ताब्यात न दिल्याबद्दल तसेच बाणकोट देऊन विजयदुर्ग इंग्रजांना घेण्याच्या प्रयत्नांबद्दल खरमरीत पत्र लिहले.[२२४] गव्हर्नरने पेशव्यांना विजयदूर्ग कायम ठेवण्याचा कोणताही इरादा नाही. पावसाळा संपताच किल्ला ताब्यात देतो. तुमच्या माणसांनी नुकताच बाणकोट किल्ला आमच्या ताब्यात दिला असून बाजीपंतांनी विजयदुर्ग ताब्यात देईपर्यंत बाणकोट जवळच्या गावांचा ताबा इंग्रजांना देऊ नयेत, असे आदेश दिले आहेत.[२२५] टॉमस वायफिल्ड व जॉन स्पेन्सर यांना पुण्यास नानासाहेब पेशव्यांशी विजयदुर्ग व बाणकोट संदर्भात गव्हर्नरच्यावतीने बोलणी करण्यासाठी पुण्याला सप्टेंबर १७५६ मध्ये पाठविण्यात आले.[२२६] त्याप्रमाणे बोलणी होऊन बाणकोट व त्याच्या जवळची वेळास, बागमांडले, वेसवी, शिपोळे, कुडुक, पंदेरी, पेवे, दासगाव व कुंबळा ही गावे इंग्रजांना देण्यात आली.[२२७] अशाप्रकारे ऑक्टोबर १७५६ मध्ये इंग्रजांना बाणकोट व उपरोक्त गावांचा ताबा मिळाला. बाणकोटच्या खाडीत यापैकी काही गावांची चौथाई सिद्दी घेत असे त्याचा उपाय पेशव्यांनी करावा असे ठरले.[२२८]

नोव्हेंबर १७५९ मध्ये पेशव्यांच्या सैन्याने अहमदनगर किल्ला जिंकला व त्यामध्ये किल्लेदार नेमला. त्याबद्दल अंजनवेल, रत्नागिरी, विजयदुर्ग, साष्टी, सुवर्णदुर्ग व वसई येथील किल्ल्यांवर तोफांची सरबत्ती करण्यास सांगण्यात आले. त्या संबंधीचे पत्र अंजनवेल किल्ल्याचे किल्लेदार बाजी गंगाधर व मामलेदार चिमाजी माणकर, रत्नागिरीचे किल्लेदार मोराजी शिंदे, विजयदुर्गचे नारो त्रिंबक, साष्टीचे बाळाजी बाबदेव, सुवर्णदुर्गचे नारो कृष्ण व वसईच्या विसाजी केशव यांना पाठविण्यात आले.[२२९] पानिपत युद्धात मराठ्यांचा दारुण पराभव झाला. यामध्ये सदाशिवरावभाऊ व नानासाहेब पेशव्यांचा मुलगा विश्वासराव तसेच अनेक मराठा सरदार मरण पावले. लाखो मराठा सैन्याची कत्तल झाली. नानासाहेब पेशव्यांना याचा धक्का बसला. २३ जून १७६१ रोजी नानासाहेब पेशवे यांचा पर्वतीवर मृत्यू झाला.[२३०]

संभाजी आंग्रेने हिराकोट, सागरगड, चौलचा कोट. व थळचा कोट हे मानाजीच्या ताब्यातील किल्ले घेतले. कुलाब्याचा पाणीपुरवठा बंद केला. म्हणून मानाजीने नानासाहेब यांस मदत मागितली. पेशवे बाजीराव यावेळी उत्तरेकडील स्वारीवर होते. नानासाहेबांनी वासुदेव जोशी, विठ्ठल शिवदेव, अंताजी नारायण यांना चार, पाचशे सैन्यासहित मानाजीस मदत करण्यासाठी पाठविले. चिमाजी आप्पांनी इंग्रजांना सुद्धा कुलाब्याला मदतीस बोलविले. स्वत: चिमाजी आप्पा नानासाहेबांसहित कुलाब्याला आले. हिराकोटजवळ संभाजी आंग्रेच्या सैन्याचा चिमाजी आप्पाने पराभव केला. इंग्रजांचे आरमार कुलाब्याला पोहोचले होते. त्यांनी अलिबागमध्ये संभाजीच्या सैन्यावर तोफांचा मारा केला. नानासाहेबांनी सागरकोटजवळ संभाजीच्या सैन्याचा पराभव केला. संभाजी आंग्रे जीव वाचवून पळून गेला. संभाजीने इंग्रजांच्या भितीने त्याच्या आरमारातील गुराबा व मोठी गलबते सुवर्णदुर्गकडे पाठवून दिली.[२३१] त्याने लहान गलबते व महागिऱ्या मिळून साठ आरमारी नौका साखरीच्या खाडीजवळ ठेवल्या होत्या. मानाजीने पेशव्यांचे देणे थकविले होते तसेच पोर्तुगीजांच्या ताब्यातील उरण घेऊन स्वत:कडेच ठेवले होते. यानिमित्ताने चिमाजी आप्पाने संभाजीच्या सैन्याचा पराभव करुन पाल (पाली?), मिरगड व उरण जिंकून त्यावर पेशव्यांचा ताबा ठेवला.[२३२]

## छ. रामराजा – (इ.स. १७६१–१७७७)

## माधवराव पेशवे–( इ.स.१७६१–१७७२)

२३ जून १७६१ रोजी नानासाहेब पेशवे यांचा मृत्यू झाला. छ. रामराजे यांनी महाराणी ताराबाईच्या सल्ल्याप्रमाणे नानासाहेबांचा मुलगा माधवराव यांना दि. २० जुलै १७६१ रोजी पेशवेपदाची वस्त्रे दिली. रघुनाथराव त्याचा कारभारी बनला. पानिपतवरील पराभव, पेशवे नानासाहेबांचा मृत्यू व पेशव्यांच्या घराण्यातील यादवी याचा फायदा निजामाने घेतला. त्याने पुण्यावर आक्रमण करण्यासाठी वाटचाल सुरु केली. पण निजामाचा भाऊ व अनेक मराठा सरदार पेशव्यांना येऊन मिळाले. निजामाचा पराभव अटळ होता. उरळी येथे असणाऱ्या निजामाने मराठ्यांशी तहाची बोलणी सुरु केली. माधवराव पेशव्यांना याचवेळी निजामाचा पुर्ण बंदोबस्त करावयाचा होता. रघुनाथदादा चतुर होते. शत्रूचा शत्रू तो मित्र या नात्याने त्यांनी निजामाशी सख्य ठेवले. पेशव्यांच्या विरोधी राजकारणात निजाम आपणास उपयोगी पडेल या विचाराने पेशव्यांच्या या कारभाऱ्याने (रघूनाथदादाने) निजामाची फार हानी न होणारा तह जानेवारी १७६२ मध्ये केला. निजामाचा थोडा प्रदेश घेऊन ही लढाई थांबविण्यात आली. रघूनाथदादा व त्यांचा विश्वासू सहकारी सखारामबापू यांचा कारभारातील हस्तक्षेप थांबविल्याशिवाय स्वतंत्रपणे काही करता येणार नाही याची जाणीव पेशवे माधवराव यांना झाली. इथून पुढे पेशवे व कारभारी यांच्यातील वाद दिवसेंदिवस वाढतच गेला. रामजी महादेव यांच्याबरोबर सुवर्णदुर्ग व अंजनवेलच्या मोहीमेवर महादेव भिडे हे होते. मोहीमेत पराक्रम गाजविल्यामुळे त्यांना ठाणे येथे जमीन इनाम देण्याचे रामजी महादेव यांनी पेशव्यांच्यावतीने कबुल केले होते. अंजनवेलच्या मोहिमेत महादेव भिडे यांचा मृत्यू झाला. ऑक्टोबर १७६३ मध्ये त्यांचा मुलगा बाळाजी महादेव भिडे यांना ठरल्याप्रमाणे ठाण्यामध्ये भातशेत जमीन इनाम देण्यात आली.[२३३]

२९ जानेवारी १७६३ मध्ये कोकण प्रांताचे सुभेदार रामजी महादेव यांना कळविण्यात आले की, त्यांच्या तालुक्यामध्ये आधीच्या वर्षी (इ.स. १७६२) कारखानीस व सुभ्याच्या अधिकाऱ्याकडून सुवर्णदुर्ग तालुक्यातील किल्ल्यांच्या वहिवटदारांवर आकारलेल्या करामध्ये असमानता होती. त्यामुळे नवा करार करुन त्या त्या किल्ल्यांना काही सुट दिली आहे. उर्वरित करवसुली करुन जमा करावी. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील सुवर्णदुर्ग ७०० रु., मंडणगड

५०० रु., रसाळगड ५०० रु., सुमारगड २०० रु. व कोठी आरमार सुवर्णदुर्ग ३०० रु. वार्षिक कर आधी आकारला होता. नव्या कराराप्रमाणे सुवर्णदुर्गला ५५० रु., आरमार सुवर्ण दुर्गला १०० रु., सुमारगडला १०० रु., रसाळगडला ७५ रु., व मंडणगडला ७५ रु. सुट देण्यात आली. सुट दिलेली एकूण २५०० रु तालुक्यातील मातब्बर दरकरांकडून वसुल करावेत.[२३४]

इ.स. १७६३–६४ मध्ये सुवर्णदुर्ग तालुक्यातील पराक्रमी सैनिक यांना जिवधन किल्ला जिंकण्यास पाठविण्यात आले.[२३५] जिवधन किल्ला जिंकल्यानंतर त्यांना परत पाठविण्यात आले.

म्हैसूरचा हैदरअली हा सुद्धा पेशवे दरबारातील अराजकाचा फायदा घेण्यास टपून बसला होता. नागपूरच्या राघुजी भोसले यांचा मुलगा जानोजी भोसले पेशव्यांच्या विरोधात निजामास जाऊन मिळाला. छ. आपल्या ताब्यामध्ये ठेवण्यासाठी रघुनाथदादांनी सातारचा किल्ला मागितला. ७ मे १७६४ मध्ये पुरंदर किल्ल्यावर कोळ्यांचे बंड झाले. ज्याच्या विरोधात कोळ्यांनी हे बंड केले त्या आबा पुरंदरे यांनी रघुनाथदादाच्या सैन्याच्या मदतीने हे बंड मोडून काढले. पेशव्यांच्या विरोधकांनी पेशव्यांनीच हे कोळ्यांचे बंड घडवून आणले असा अपप्रचार सुरु केला. पेशवे माधवराव यावेळी कर्नाटकच्या स्वारीवर होते. स्वारीवरुन आल्यानंतर पेशव्यांनी पुरंदरच्या किल्ल्याची व्यवस्था ताब्यात घेतली. पेशवे माधवराव यांच्यासोबत त्यावेळी ६०–७० हजार सैन्य होते. असे लोक आपआपसात बोलत होते. विसाजीपंतांनी सुवर्णदुर्गवरुन कळविले की, सुवर्णदुर्ग येथे गुहागरवरुन सर्व माणसे आणली आहेत. यावेळी राघोबा व माधवराव यांच्यातील वाद व परस्पर कारस्थाने मोठ्या प्रमाणात सुरु होती. विसाजीपंतांनी पत्र वाचून फाडून टाकावे असे लिहिले आहे. यावरुन त्याकाळामध्ये सुवर्णदुर्गचे विसाजीपंत व त्याच्या मुलाचा प्रभाव राजकारणात दिसतो.[२३६]

इ.स. १७६५ मध्ये सिद्दी व पेशवे यांच्यामध्ये तह झाला. त्याप्रमाणे सुभा राजपुरीचा इ.स. १७६१ पासूनच्या महसुलाची सुट देण्यात आली.[२३७] वरील तह पूर्ण झाल्यानंतर सिद्दीची जी माणसे विविध किल्ल्यांवर कैद होती त्यांना सोडून सिद्दीच्या ताब्यात देण्याचे ठरले.[२३८] त्याप्रमाणे रामजी महादेव यांना सुवर्णदुर्ग किल्ला व तालुक्यामध्ये असणाऱ्या सिद्दीच्या कैद्यांना तळे येथे योग्य बंदोबस्तामध्ये पाठविण्याचे पेशव्यांच्या वतीने कळविण्यात आले.[२३९] तळयाचे अधिकारी गोविंदराव व चिमाजी माणकर यांच्याकडे ते कैदी पोहोचल्याचे पत्र घेण्याविषयी रामजी महादेव यांना कळविले.[२४०] कृष्णाजी विश्वनाथ यांना अंजनवेल तालुक्याविषयी अशीच

आज्ञा केली.[२४१]

जंजिऱ्याच्या सिद्दीच्या वतीने सुवर्णदुर्ग प्रांतामध्ये लूटालूट व चोऱ्या झाल्या होत्या. सुवर्णदुर्गच्या अधिकाऱ्यांनी मालजी भानत व बाळकोजी पुशीरकर या दोन चोरांची नावे पुणे दरबारास कळविली होती.[२४२] उपरोक्त चोरांना पकडण्यासाठी त्यांच्या कुटुंबातील माणसे शोधून त्यांना कैद करण्यात आले. मालजी भानत यांची बायको, सून व नऊ वर्षे वयाचा मुलगा असे तीन नातेवाईक तर बाळकोजी पुशीरकर यांची बायको, भावजय व नऊ वर्षे वयाचा पुतण्या असे तीन नातेवाईक एकूण सहा व्यक्ती सुवर्णदुर्ग प्रांतातून कैद करण्यात आल्या.[२४३] त्यांना राजपुरी येथे कैदेमध्ये ठेवण्यात आले. इ.स. १७७१–७२ मध्ये सुभेदार रामजी महादेव यांना सुवर्णदुर्ग तालुक्यामध्ये अनुभवी कारकून पाठवून तेथील जमिनीची योग्य मोजणी व पिकांची पाहणी करुन सारा आकारावा असे कळविण्यात आले.[२४४] अर्थात हा सर्व उल्लेख आर्थिक कर वसूली संदर्भात आहे. सरखेल तुळाजी आंग्रेच्या पाडावाने व सिद्दीचा बंदोबस्त ताब्यात झाल्यामुळे माधवराव पेशव्यांच्या काळात रत्नागिरी जिल्ह्यात राजकीय हालचाली अपवादानेच झाल्या असाव्यात.

इ.स. १७७०–७१ मध्ये सोनाराच्या मुलाचा खून केल्यामुळे राघोबा विंझ्या व रामजी दशपुत्रे या दोघांना सुवर्णदुर्ग किल्ल्यावर कैदेत पाठविण्यात आले.[२४५] माधवराव पेशवे यांची प्रकृती नाजूक होती. अखेर त्यांना क्षय झाला. कर्नाटक मोहिमेवर असतानाच मिरज येथे त्यांची तब्येत बिघडली. १८ नोव्हेंबर १७७२ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

## छ. रामराजे (इ.स. १७७२–१७७३)

## नारायणराव पेशवे (१७७२–१७७३)

दि. १३ डिसेंबर १७७२ रोजी नारायणरावाला पेशवाईची वस्त्रे मिळाली. दि. ११ ऑगस्ट १७७२ रोजी रामजी महादेव यांच्या जागी हरिपंत फडके यांना सुवर्णदुर्गचे सुभेदार नेमले.[२४६] ३० ऑगस्ट १७७३ रोजी खून होईपर्यंत आठ महिने नारायणरावाने कारभार केला. नारायणरावाकडे राज्यकर्त्याचे, प्रशासकाचे गुण नव्हते. तो आपल्या पुर्वजांप्रमाणे पराक्रमी नव्हता. नारायणराव पेशवे भर दरबारात मुत्सद्दी सरदारांचा अपमान करू लागले. नाना फडणीसाचा पर्वतीवर सर्वांसमोर त्याने अपमान केला. सखारामबापूंना भर दरबारात शिवीगाळ

केली. हरिपंत फडके व इतर सरदारांचा वेगवेगळ्या प्रकारे अपमान केला. अशाप्रकारे सर्व सरदार, मुत्सद्दी व जनतेमध्ये नारायणराव पेशवे हळूहळू अप्रिय होत चालले.

नारायणराव पेशवे व चुलते राघोबादादा यांचे संबंध दिवसेंदिवस बिघडतच गेले. अविचारी लोकांच्या सल्ल्याने ११ एप्रिल १७७३ रोजी नारायणरावाने राघोबादादाला अटक केले. नाना फडणीस व सखाराम बापू यांनी राघोबादादास अटक न करण्याचा पेशव्यांना सल्ला दिला. पण पेशव्यांनी जुमानले नाही. राघोबादादांनी आता नागपूरकर भोसले व हैदरअली यांच्याशी संधान साधून सुटकेचा प्रयत्न सुरु केला. लक्ष्मणराव काशी जेजुरीकडे पळून गेला. नारायणराव पेशव्यांनी देवपुजा, सुर्यास अर्ध्यदान करण्यास दालनाबाहेर पडण्यास राघोबादादास बंदी घालण्यात आली. शिक्षा म्हणून अनेकांचे नाक, कान, हात छाटले जाई. त्यावेळी पेशव्यांकडे गारदी म्हणजे कवायत शिकलेले पायदळातील सैनिक नोकरी करत होते. यामध्ये उत्तरेतील रोहीले, पठाण, हबशी, अरब मुस्लिम व काही हिंदू होते. महंमद इसफ सुमेरसिंग, खरकसिंग हे त्यातील प्रमुख गारदी अंमलदार होते. यांचे पगार थकित होते. जमेल तसे त्यांचे थकित पगार थोडे थोडे दिले जात. यातच काही गारद्यांना गरज नाही म्हणून नोकरीतून काढून टाकले होते. त्यामुळे हे गारदी पेशव्यांवर नाराज होते.

राघोबादादांना पेशव्यांने ‘तुम्ही अनुष्ठानानेच माधवरावास मारले’ असा आरोप करुन अधिकच दुखावले. राघोबादादा व आनंदीबाईने सखाराम बापूना बोलवून आपल्या हालअपेष्टा सांगितल्या. सखाराम बापू, मोरोबा फडणीस यांनी पेशव्यांना समजाऊन सांगितले. सखाराम हरी, आबाजी महादेव, चिंतो विठ्ठल, शिवाजी कान्हो, सदाशिव रामचंद्र, हैदरचा वकील अप्पाजी राम हे सर्व स्वार्थासाठी राघोबास मिळाले होते. दादांचा हुजऱ्या तुळाजी पवार (तुळ्या पवार) याला नारायणरावाने चाबकाने मारले होते. त्यांच्या मनामध्ये पेशव्यांचा सुड घेण्याचे होते. सुमेरसिंग हा दादांच्या कैदेतील देखरेखीवर होता. तुळ्या पवाराने त्याला फितूर करुन कटात सामील करुन घेतले. त्याने गारद्यांना पुरेसा पैसा दिला तर सांगितलेले कोणतेही काम ते करतील हे सुचविले. सखाराम बापू व मोरोबा या कटामध्ये अप्रत्यक्ष सामील झाले. पेशवे नारायणरावाला पकडून राघोबा दादांना सोडविण्याचे ठरले. गारद्यांना यासाठी तीन लाख देण्याचे ठरले. गारद्यांनी लेखी करार मागितला त्याप्रमाणे नारायणरावांस धरावे असे राघोबादादाच्या

सहीने लेखी देण्यात आले. मध्येच या करारामध्ये 'ध' चा 'मा' करण्यात आला. धरावेच्या ऐवजी मारावे असे झाले. हा 'ध' चा 'मा' कोणी केला हा अजूनही इतिहासातील अनुत्तरीत प्रश्न आहे. ३० ऑगस्ट १७७२ रोजी नारायणराव पेशव्यांचा खून करण्यात आला. त्यांच्या बचावासाठी आलेले अथवा अडचण निर्माण करणारे व मध्येच आलेल्या सहा ब्राह्मण व्यक्ती, एक हुजऱ्या, एक नाईक, दोन कुणबिणी व एक गाय ठार झाली.

रघुनाथरावाने नारायणरावाच्या खुनानंतर सातारवरुन पेशवाईची वस्त्रे आणली. त्याने १० ऑक्टोबर १७७३ रोजी स्वतःचे पेशवे जाहीर केले. खुनाच्या आरोपावरुन रामशास्त्री प्रभुण्यांनी त्यांना ताबडतोब पदच्यूत केले.

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर पुण्यातील पेशवे दरबारात निर्माण झालेल्या अराजकतेचा फायदा घेण्याचे इंग्रजांनी ठरविले. त्यांनी मुंबईच्या दृष्टिने महत्वाचा असलेला साष्टी प्रांत जिंकण्याचे ठरवले. फेब्रुवारी १७७४ मध्ये ठाण्याचा किल्ला दोन लाख ऐंशी हजार रुपये लाच दिल्यास इंग्रजांच्या ताब्यात देण्यास ठाण्याचा किल्लेदार तयार होता. पेशवे दरबारातील राजकीय अराजकाचा फायदा घेऊन अशी लाच न देता किल्ला मिळेल, असे इंग्रजांना वाटले. याचवेळी गोव्यातील पोर्तुगीज गव्हर्नरच्या विनंतीवरुन पोर्तुगालवरुन डॉम जुझ पेद्र द कमेरा याच्यासोबत लष्कर पाठविण्यात आले होते. मराठ्यांच्या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन मराठ्यांनी पोर्तुगीजांचे घेतलेले प्रदेश व किल्ले परत मिळविण्यासाठी ही लष्करी मदत आली होती. गोव्यातील इंग्रज वकीलाने ही बातमी मुंबईला कळविताच बॉम्बे सिलेक्ट कमिटीने २८ फेब्रुवारी १७७४ रोजी साष्टी प्रांत घेण्याचा ठराव केला. पोर्तुगीजांकडे हा प्रांत जाण्यापूर्वीच तो ताब्यात घेण्याचा इंग्रजांचा विचार होता. साष्टीवर हल्ला करण्याची जबाबदारी मुंबई सरकारने आपल्या लष्करी व नाविक दलावर सोपवली. ब्रिगेडिअर जनरल याने जमिनीवरुन हल्ला चढवावा तर जॉन बॉक्सन याने आरमारी चढाई करावी असे ठरले. १२ डिसेंबर १७७४ रोजी गॉर्डन व बॉक्सन हे दोघेही कामगिरीवर निघाले. त्याच दिवशी पोर्तुगाल गलबते मुंबईच्या दिशेने आले. इंग्रजांनी विरोध केल्यामुळे पोर्तुगीजांना गप्प बसावे लागले.

सुवर्णदुर्गचे हवालदार मोरो बापुजी यांनी साष्टीच्या या युद्धाचा सविस्तर वृत्तांत पेशव्यांना कळविला होता. जानेवारी १७७४ पर्यंत राघोबादादाचे पेशवे होते. साष्टीच्या मराठा सैन्याने पराक्रमाची शर्थ केली. विजयदुर्गच्या आरमारास साष्टीकरांच्या मदतीस जाण्याविषयी

कळविण्यात आले होते. सुवर्णदुर्गवरुन साष्टीच्या मदतीस दोन गुराबा व पाच गलबते पाठविण्यात आली. जानोजी धुळप आपल्या आरमारासहीत साष्टीस निघाला. सुवर्णदुर्गचे आरमार आंग्रेनी कुलाब्यास पाठविले. तेथून ते पायी साष्टीस जाणार होते. सिद्दी व बाणकोटच्या इंग्रज किल्लेदाराने आपल्या पाच–सात हजाराच्या संयुक्त सैन्यासहित सुवर्णदुर्गच्या आसपास कारवाया सुरु केल्या.[२४७] सुवर्णदुर्गच्या किल्लेदाराने किल्ला लढविण्याची उत्तम तयारी केली होती. याशिवाय पुण्यावरुन लष्करी मदत मागितली होती.[२४८] इंग्रजांनी चिमाजी आप्पाशी ३५ वर्षापूर्वी केलेला तह मोडून साष्टीवर आक्रमण केले. साष्टी किल्ल्यातील लोक प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. अशा विश्वासघातकी इंग्रजांना कोंडीत पकडावे. त्यासाठी बाणकोट(हिंमतगड) यास वेढा द्यावा, दासगावचे इंग्रजांचे ठाणे उठवावे, आंग्रे व धुळपांच्या आरमाराकडून मुंबईवर आक्रमण करावे. सुवर्णदुर्ग, विजयदुर्गच्या सैन्याने पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांना सळो की पळो करुन सोडावे. पोर्तुगीजांचे बिनसले असल्याने ते आता इंग्रजांच्या मदतीस येणार नाहीत. असा सल्ला काही मराठे सरदार पेशवे दरबारास देत होते.[२४९] महाड तालुक्यातील बाणकोटकरांची जी गावे आहेत. ती जप्त करुन तेथे मराठ्यांनी वसूल करावा. तेथील जे लोक मुंबईत इंग्रजांच्या नोकरीत असतील त्यांची घरे जप्त करावीत. बाणकोटचे ठाणे घ्यावे, असा लेखी सल्ला नारो आप्पाजी या पेशवे दरबारातील फडणीस पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यास देण्यात आला.[२५०] सुवर्णदुर्गचे मोरो बापुजी यांनीच हा सल्ला दिला होता. बाणकोट किल्ला इंग्रजांकडून जिंकण्यासाठी मोरो बापूजींना रायगडकरांना चांगले पराक्रमी १०० सैनिकांची मदत पाठविण्याचा आदेश देण्यात आला. याशिवाय इंग्रजांकडील दासगावची जप्ती करण्यासाठी रायगडच्या गणपतराव कृष्ण यांची नेमणूक करण्यात आली.[२५१] मराठ्यांचा प्रदेश घेण्यासाठी टपून बसलेल्या सिद्दीने या कठीण प्रसंगात इंग्रजांशी हातमिळवणी केली. इंग्रजांनी बाणकोट शामलास डिसेंबर १७७४ मध्ये दिला. सिद्दी तेथून अंजनवेलवर आक्रमण करणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. अंजनवेल (गोपाळदुर्ग) जागा नाजूक असल्याने तेथे चांगला बंदोबस्त ठेवला पाहिजे. त्यामुळे कृष्णाजी विश्वनाथ (गोपाळगडचा किल्लेदार) यांनी पुण्यावरुन नारो आप्पाजी यांना लष्करी मदत मागितली.[२५२]

डिसेंबर १७७४ रोजी इंग्रजांनी साष्टी बेट जिंकले. ठाण्याचा किल्ला, वर्सोवा व करंजा ही सर्व ठाणी जिंकल्यामुळे साष्टी प्रांत पूर्णपणे इंग्रजांच्या ताब्यात गेला. मे १७७५ मध्ये मराठ्यांनी हा प्रदेश परत घेण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

मोरो बापुजी यास बाणकोट घेण्यासाठी दोनशे व अजून लागले तर शंभर माणसे लष्करात भरती करण्याची परवानगी पेशव्यांच्या वतीने देण्यात आली. रायगड व राजापूर तालुक्यातून प्रत्येकी शंभर असे एकूण दोनशे लोक मोरो बापूजीच्या मदतीस पाठविण्यात आले. मोरो बापूजीने इंग्रजांच्या बाणकोट परिसरात इंग्रजांना गाफील ठेऊन गावांची जप्ती केली. तेथील इंग्रज अधिकाऱ्यास पकडले.[२५३] या मोहिमेसाठी वसुलीतील काही हिस्सा खर्च करण्याची परवानगी देण्यात आली.[२५४] बाणकोटकडील इंग्रजांकडे असणाऱ्या गावांची जप्ती करुन त्याचा हिशोब सरकारात जमा करण्याची आज्ञा मोरो बापूजी, सुवर्णदुर्ग तालुका, गणपतराव कृष्ण, रायगड तालुका व चिमाजी माणकर, प्रांत राजापुरी यांना देण्यात आली.[२५५] इंग्रजांनी मराठ्यांशी केलेला तह मोडून साष्टीवर आक्रमण केले. म्हणून या परिसरातील जे लोक मुंबई, सुरत व बाणकोट येथे इंग्रज सैन्यात भरती झाले असतील त्यांच्या घराची जप्ती करुन त्याचा हिशोब सरकारला देण्याची आज्ञा झाली. त्या लोकांच्या घरातील माणसांना त्रास द्यावा त्यामुळे इंग्रजांच्या सेवेतील हे लोक ताबडतोब आपापल्या घरी येतील. अशा आज्ञा महिपतराव कृष्ण – तालुका रत्नागिरी, कृष्णाजी विश्वनाथ–तालुका अंजनवेल, मोरो बापुरी–तालुका सुवर्णदुर्ग, चिमाजी माणकर–प्रांत राजापुरी, गणपतराव कृष्ण–तालुका रायगड व आनंदराव धुळप–सुभा आरमार यांना देण्यात आल्या.[२५६] इ.स. १७७४–७५ मध्ये सिद्दीचे सैन्य दासगाव व ठिकठिकाणी जमा झाले. इंग्रजाशी आलेल्या शत्रूत्वाने इंग्रज सैन्य बाणकोटजवळ जमा झाले होते. बाणकोट खाडी इंग्रजांकडे होती. अशा युद्धजन्य स्थितीत रायगडच्या बंदोबस्तासाठी पुण्यावरुन लष्करात भरती करण्यासाठी लोक पाठविण्यात आले. रायगडच्या बंदोबस्ताची चांगली व्यवस्था करुन पुण्यास कळविण्याच्या आज्ञा रायगडकरांना देण्यात आल्या.[२५७]

नारायणरावाची पत्नी गंगाबाई ही गरोदर होती. राघोबादादांशी सखाराम बापूंचे मतभेद झाले. ते राघोबादादाची स्वारीवरची साथ सोडून ३० नोव्हेंबर १७७३ रोजी पुण्यात आले. राघोबादादा शत्रुंचा नि:पात करण्यासाठी पुण्याबाहेर गेल्यानंतर पेशवे दरबारातील मुत्सद्यांनी राघोबाविरोधात कारस्थान केले. हे कारस्थान बारभाई कारस्थान म्हणून इतिहासात प्रसिद्ध

आहे. राघोबादादाला पेशवेपदावरुन दूर करण्यासाठी नाना फडणीस, हरिपंत फडके, सखारामबापू बोकील, त्र्यंबकराव पेठे, मोरोबा फडणीस, बापूजी नाईक, मालोजी घोरपडे, भवानराव प्रतिनिधी, रास्ते पटवर्धन, महादजी शिंदे व होळकर हे बारा प्रमुख सरदार होते. म्हणून यास बारभाई कारस्थान म्हणतात. राघोबादादाच्या अनुपस्थितीचा फायदा घेत सखारामबापूने नारो आप्पाजीच्या मदतीने नारायणरावाची पत्नी गंगाबाई हिस माहेरी जाण्याच्या निमित्ताने शनिवारवाड्याबाहेर काढले. तिला पुरंदर किल्ल्यावर बंदोबस्तात ठेवण्यात आले. १७ जानेवारी १७७४ पासून बारभाईंनी गंगाबाईच्या नावे पेशवाईचा कारभार करण्यास सुरुवात केली.

रघुनाथदादा यांनी बारभाई कारस्थानादरम्यान पेशवे या नात्याने भुखाराव मुरुडकर यांना सुवर्णदुर्ग तालुक्यातील किल्ल्यांच्या संरक्षणाची व्यवस्था चांगली ठेवण्याची आज्ञा केली.[२५८] बारभाईच्या सरदारांनी सुवर्णदुर्गवर आक्रमण केले तर त्यांचा चांगला बंदोबस्त करण्याविषयी रघुनाथरावाने मुरुडकर यांना कळविले.[२५९] सुवर्णदुर्गला आरमार तयार ठेवून विजयदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी येथील किल्लेदारांना बारभाईंच्या विरोधात सावध करण्यास रघुनाथदादांनी मुरुडकर यांस सांगितले.[२६०] उपरोक्त किल्ल्यांवरील किल्लेदार बारभाईंना मिळालेले नाही. याची खात्री करुन तशी सविस्तर माहिती रघुनाथदादांना कळवावी असेही मुरुडकरांना सांगण्यात आले.[२६१]

**छ. रामराजे – (इ.स. १७७४ ते १७७७)**

**छ. धाकटे शाहू राजे – (इ.स. १७७७ ते १७९५)**

**सवाई माधवराव पेशवे – (१९ मे १७७४ – २७ ऑक्टोबर १७९५)**

१८ एप्रिल १७७४ रोजी गंगाबाईला मुलगा झाला. त्याच्या जन्माच्या चाळीसाव्या दिवाशीच सवाई माधवराव या नावाने त्यास २९ मे १७७४ रोजी पेशवेपदाची वस्त्रे देण्यात आली. सुरुवातीला सहा वर्षे हा कारभार बारभाईंनी चालविला. नाना फडणीस व सखाराम बापूंच्या या दोघांच्या हाती हा कारभार आला. त्यामध्ये मोरोबा फडणीसास फार स्थान नव्हते. त्यामुळे मोरोबादादाचे कारस्थान इतिहासात उभे राहिले. राघोबादादा सुरतला इंग्रजांच्या आश्रयास गेला.

इ.स. १७७५ सुवर्णदुर्गच्या आरमाराने पहाऱ्यावर असताना मुंबईच्या इंग्रजांच्या गलबतावरील ५ लोक पकडले.[२६२] या पाच इंग्रजांना सुवर्णदुर्गमध्ये कैदेत ठेवण्यात आले.[२६३] पेशव्यांनी मुंबईकरांशी या कैद्यांना सोडण्याचा करार केल्यामुळे त्यांचा सन्मान करुन त्यांना गलबताने मुंबईस पोहचविण्याची जबाबदारी सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापूजी यांच्यावर टाकण्यात आली.[२६४]

मोरोबादादाच्या कारस्थानाचा बंदोबस्त करुन पुढे काही काळ पेशव्यांचा कारभार नाना फडणीस व महादजी शिंदे यांच्या ताब्यात आला. सवाई माधवराव हा विशेष करुन नाना फडणीसाच्या संरक्षणामध्ये होता. तो लहान म्हणजे दोन वर्षाचा असताना इ.स. १७७६ मध्ये सदाशिवराव भाऊच्या तोतयाचे बंड उद्‌भवले. त्यापाठोपाठच मार्च १७७८ मध्ये मोरोबादादाचे कारस्थान उद्‌भवले. तोतयाच्या बंडाचा प्रमुख प्रसार कोकणात झाला. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सवाई माधवरावाच्या काळात बऱ्या राजकीय, लष्करी हालचाली झाल्या.

## साष्टीची मोहिम –

पानिपतमधील मराठ्यांचा दारुण पराभव, पेशवे नानासाहेब यांचा मृत्यू, झाल्यानंतर पुणे दरबारात राजकीय पोकळी निर्माण झाली. याचा फायदा घेत सिद्दीने मराठ्यांनी घेतलेला त्याचा प्रदेश परत जिंकण्यास सुरुवात केली. यावेळी झालेल्या मराठा व सिद्दी यांच्या संघर्षात इंग्रजांनी नेहमीच सिद्दीला मदत केली. सिद्दीच्या घराण्यातील यादवीत मराठ्यांनी सिद्दी अब्दूल रहीम याची तर इंग्रजांनी सिद्दी याकुतची बाजू घेतली. इंग्रज–मराठ्यांविरुद्ध सिद्दी याकुतला मदत करत होते. म्हणून माधवराव पेशव्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या हितासाठी, त्यांच्या सांगण्याप्रमाणे डचांना राजापूरला वखार घालण्याची परवानगी दिली. हे उपकार लक्षात न ठेवता इंग्रज सिद्दीस मदत करतात याबद्दल पेशवे माधवराव यांनी इंग्रजांकडे खेद व्यक्त केला होता. त्यावेळी इंग्रज अधिकाऱ्यांनी सालसेट बेट ताब्यात येत नाही तोपर्यंत त्यांना आवश्यक असणारी रसद सिद्दीच्या प्रदेशातून मिळते. या कारणास्तव ईस्ट इंडिया कंपनी सिद्दीची बाजू घेते असे प्रत्युत्तर पेशव्यांना पाठविले. यानंतर झालेल्या सिद्दी याकुत व मराठे यांच्यातील युद्धामध्ये निर्णायक निकाल लागला नाही. २६ फेब्रुवारी १७७२ रोजी दोघांमध्ये तह झाला. तरीही सिद्दीने मराठ्यांच्या प्रदेशातील लुटालुट सुरुच ठेवली होती. अशाप्रकारे सिद्दीच्या निमित्ताने मराठे व इंग्रज यांच्यामध्ये अपवाद वगळता संघर्षाचेच संबंध होते.

तुळाजी आंग्रेचा पाडाव केल्यानंतर पश्चिम किनाऱ्यावर इंग्रजांचा प्रभाव वाढला. आग्र्यांचा धोका नाहीसा झाला तरी पश्चिम किनारपट्टीवर कुडाळकर सरदेसाई  यांच्या सरदारांच्या चाचेगिरीचा धोका इंग्रज जहाजांना होताच. या सरदारांचा प्रमुख व्यवसाय व्यापारी जहाजे लुटून तो माल विकणे हाच होता. ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी जहाजे हे सरदार लुटत असल्यामुळे कंपनीने त्यांच्या आश्रयस्थानावर, सिंधुदुर्ग, सर्जेकोट व पद्मगड यांच्यावर आक्रमण केले. मेजर गॉर्डन व कॅप्टन वॉटसन यांच्या आरमाराने सरदेसाईंच्या वरील किल्ल्यांना वेढा घातला. पेशवे माधवराव यांनी जानोजी धुळप यांच्या नेतृत्त्वाखाली आरमार कुडाळकर सरदेसाई यांच्या मदतीस पाठविले. या युद्धामध्ये इंग्रजांचा पराभव होवून त्यांना सिंधुदुर्ग किल्ल्याचा वेढा उठवावा लागला. यावेळी जानोजी धुळप यांच्या ताब्यात इंग्रजांची दोन जहाजे, पाच हजार रुपये किमतीच्या साहित्यासह आली. परंतु पुन्हा जय्यत तयारी करुन इंग्रजांनी कोल्हापूरकरांच्या ताब्यातील सिंधुदुर्ग किल्ला एप्रिल १७६५ मध्ये जिंकला. पुन्हा माधवराव पेशव्यांनी धुळपांना इंग्रजांच्या बंदोबस्तासाठी पाठविले. सप्टेंबर १७६५ मध्ये धुळपांच्या आरमाराने मालवण येथे इंग्रजांचा पराभव केला. मालवण बंदरावर इंग्रजांचा पराभव झाला तरी सिंधुदुर्ग, सर्जेकोट व पद्मगड हे किल्ले इंग्रजांच्याच ताब्यामध्ये होते. पेशव्यांच्या नारोपंतांच्या नेतृत्त्वाखालील आरमाराने पद्मगड जिंकला. पेशव्यांचे आरमार आता सिंधुदूर्गकडे मोर्चा वळविणार, तेवढ्यात कोल्हापूरकरांनी १२ जानेवारी १७६६ मध्ये परस्पर इंग्रजांशी तह केला. या तहाप्रमाणे कोल्हापूरकरांनी इंग्रजांना सात लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे व कंपनीने सिंधुदूर्ग किल्ला कोल्हापूरकरांना देण्याचे मान्य केले. अशाप्रकारे पेशवे व इंग्रज यांच्यामधील संघर्ष वाढतच गेला.

पेशवे नारायणरावांच्या खुनानंतर पुणे दरबारामध्ये अराजकाची स्थिती निर्माण झाली. या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन साष्टी प्रांत जिंकण्याचे ठरविले. फेब्रुवारी १७७४ मध्ये ठाण्याचा किल्लेदार दोन लाख साठ हजार रुपयांच्या मोबदल्यामध्ये तो किल्ला इंग्रजांच्या ताब्यात देण्यास तयार झाला. मुंबईचा गव्हर्नर हॉर्नबी यास तयार झाला नाही. एवढा खर्च करण्यापेक्षा पेशवे दरबारातील अस्थिरतेचा फायदा घेऊन ठाण्याचा किल्ला जिंकता येईल असे त्याचे मत होते. याच दरम्यान पोर्तुगिजांनी मराठ्यांकडे गेलेला प्रदेश जिंकण्यासाठी डॉम–जुझ–

पेद्र–द–कमेरा या अधिकाऱ्याची नेमणूक केली. ही बातमी गोव्यातील इंग्रज रेसिडेंटने मुंबईच्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना कळविली. कंपनीच्या बॉम्बे सिलेक्ट कमिटीमध्ये २८ नोव्हेंबर १७७४ च्या सभेमध्ये मराठ्यांकडून साष्टी प्रांत जिंकण्याचा ठराव केला. पोर्तुगिजांनी साष्टी प्रांत जिंकला तर कंपनीच्या व्यापारामध्ये अडथळे निर्माण होण्याची शक्यता होती. अशाप्रकारे इंग्रज व पोर्तुगिज एकाचवेळी मराठ्यांविरुद्ध युद्धाची तयारी करत होते.

पुणे दरबारातून ठाणे किल्ल्याच्या मदतीकरीता पाचशे सैनिक पाठवून किल्ल्याचा बंदोबस्त योग्य ठेवला. इंग्रजांनी जमीन व जल अशा दोन्ही मार्गे साष्टीवर आक्रमण करण्याचे ठरविले होते. त्याप्रमाणे जॉन बॉक्सन याच्या नेतृत्त्वाखाली आरमारी व गॉर्डन यांच्या नेतृत्त्वाखाली जमिनमार्गे हल्ला करण्याचे निश्चित झाले. १२ डिसेंबर १७७४ रोजी इंग्रज सैन्य ठाणे जिंकण्यासाठी निघाले. इंग्रजांच्या या सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी पेशवे सवाई माधवराव यांच्यावतीने नाना फडणीस, सखारामबापू यांनी विसाजी कृष्ण, जानराव व आनंदराव धुळप, त्रिंबक विनायक, विसाजी केशव लेले या सरदारांना पाठविले. पण ही मदत पोहचण्यापूर्वीच २८ डिसेंबर १७७४ रोजी इंग्रजांनी ठाणे किल्ला व जवळची वर्सोवा, करंजा ही बेटे जिंकली. अशाप्रकारे साष्टी प्रांत इंग्रजांच्या ताब्यात आला.

इंग्रजांच्या या लष्करी हालचालींची ठाणे किल्ला व साष्टी प्रांत जिंकण्याच्या महत्त्वकांक्षेची पेशवे दरबाराला आधीपासूनच कल्पना होती. इंग्रजांनी प्रत्यक्ष युद्ध सुरु केली होती. विजयदुर्ग येथे आनंदराव धुळप हे पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे आरमार तयार ठेवून फेब्रुवारी १७७४ मध्येच युद्धासाठी तत्पर होते.[२६५] इंग्रजांच्या या साष्टी मोहिमेच्या दरम्यान सुवर्णदुर्ग किल्ल्यातील शिबंदी व आरमार यांनी महत्त्वाची भूमिका निभावली. जून १७७४ मध्ये सुवर्णदुर्ग किल्ल्यावर संरक्षणात्मक बांधकाम सुरु होते.[२६६] इंग्रज मुंबईस जोरात आरमारी व लष्करी सिद्धता करत असल्यामुळे पुणे दरबाराकडून पेशव्यांच्यावतीने सुवर्णदुर्ग किल्ल्यावर चोख बंदोबस्त, संरक्षणासाठी तयार व सावध राहण्याची आज्ञा करण्यात आली. त्याप्रमाणे लखमोजीराव खानविलकर यांनी सुवर्णदुर्ग किल्ल्यावरील पहारा कडक केला. त्यांनी किल्ल्यावर लढण्याची सर्व तयारी करुन आरमार पण तयार ठेवले.[२६७] या सर्व लष्करी तयारीनिशी लखमोजीराव खानविलकर किल्ल्यावर आनंदराव शिंदे यांनी रेवदंडा किल्ल्याचे किल्लेदार आनंदराव शिंदे यांनी मुंबईमध्ये हेर ठेवून इंग्रजांच्या हालचालींची माहिती मिळविली.[२६८] रघुनाथदादा इंग्रजांच्या

आश्रयाला जाणार ही बातमी व इंग्रजांच्या मुंबईतील लष्करी तयारीबाबत आनंदराव शिंदे यांनी भिकाजीपंत यांना कळविले.[२६९] इंग्रज वकील मॉस्टिन पुण्यावरुन मुंबईस गेला. त्यानंतर लगेचच डिसेंबर १७७४ मध्ये इंग्रज दारुगोळ्यांनी भरलेली लहान जहाजे व त्यावर चार हजार सैन्यानिशी तयार होते.[२७०] कंपनीचे हे आरमार गोव्यावर आक्रमणासाठी जाणार अशी अफवा होती. पण खरी बातमी इंग्रज साष्टीवर आक्रमण करणार अशी होती.[२७१] बचाजी विश्वनाथ हे नोव्हेंबर १७७४ पासूनच इंग्रजांच्या हालचालींवर नजर ठेवून होते. इंग्रज युद्धाच्या तयारीने बाहेर पडले ते मराठ्यांच्या ठिकाणावर हमखास हल्ला करणार हे जाणून बचाजी विश्वनाथ युद्धास सज्ज राहिले होते.[२७२] मोरो बापूजीने इंग्रजांचा बाणकोट घेण्याचा प्रयत्न केला. रायगड किल्ल्यावरुन मोरो बापूजीला मदत पाठविण्यात आली.

१२ डिसेंबर १७७४ रोजी इंग्रज सैन्य ठाणे किल्ल्यावर आक्रमणासाठी बाहेर पडले. पोर्तुगीजांचे आरमार त्यावेळी मराठ्यांच्या प्रदेशावर आक्रमण करण्यासाठी तयार होते. पोर्तुगीजांचे लढाऊ सहा फरगते व दहा गलबते, सोबत लढाऊ सैन्य असे आरमार रत्नागिरी, कुलाबा, ठाणे यांच्या दिशेने गेले तेव्हा विजयदूर्गवरुन जानराव धुळप यांनी कृष्णाजी धुळप यांना दोन पाल, तीन गुराबा व सात गलबते एवढे आरमार सोबत देऊन पोर्तुगींजांच्या पाठलागावर पाठविले.[२७३] पोर्तुगीजांनी राखीव आरमार गोव्यामध्ये तयार ठेवले होते. मराठ्यांवरच त्यांचा आक्रमण करण्याचा हेतू आहे. पण ज्या ठिकाणी हल्ला करतील त्या ठिकाणी प्रतिकार करण्यासाठी जानराव धुळप तीन पाल व सात गलबतांसहीत त्यांना प्रतिकार करण्यासाठी विजयदुर्ग बंदरामध्ये तयार होते.[२७४] इंग्रज व पोर्तुगीज दोघांच्या आरमारी हल्ल्याचा धोका लक्षात घेऊन नानासाहेब फडणीसांनी सुवर्णदुर्ग व वसईच्या आरमारास जानराव धुळपांच्या मदतीस जाण्याची आज्ञा केली.[२७५] ते न पोहचल्यामुळे जानराव धुळप यांनी वसई व सुवर्णदुर्ग येथील किल्लेदारांना नानांनी ताबडतोब आज्ञापत्र व कडक ताकीद द्यावी अशी विनंती केली.[२७६]

नारो आप्पाजींना मॉस्टिन हा इंग्रज वकील मुंबईवरुन साष्टीजवळ येऊन थांबल्याचे कळले. तो साष्टी प्रांतावर आक्रमण करणार असल्याची साष्टी व उरणवरुन आल्याची पत्रे नारो आप्पाजींनी नाना फडणीसाकडे पाठविली. नारो आप्पाजींनी ताबडतोब इंग्रजांना प्रतिकार

करण्यासाठी आवश्यक त्या हालचाली केल्या. पुण्यावरुन साष्टीस लष्करी मदत पाठविली.[२७७] सासवडजवळ विसाजी कृष्ण लष्करासहीत होते. त्यांना साष्टीस पुरेसे सैन्य नसल्यामुळे तिकडे जाण्याची आज्ञा केली.[२७८] याशिवाय विजयदुर्ग, रत्नागिरी, सुवर्णदुर्ग व अंजनवेल येथील किल्लेदारांना सावध करण्यात आले.[२७९] जानराव धुळप यांना विजयदुर्ग बंदराच्या मुखाशी आरमारासहीत तयार राहून इंग्रजांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवण्यास नारो आप्पाजींनी सांगितले.[२८०] राघोजी आंग्रे यांनासुद्धा आरमारासहीत साष्टीस पाठविले. इंग्रजांनी साष्टीस वेढा दिला. त्याचवेळी पोर्तुगीजांचे आरमार वसई बंदराच्या मुखाशी आले होते. विसाजी कृष्ण यांचे सर्व सैन्य गोळा न झाल्यामुळे नारो आप्पाजी यांनी पुरंदरच्या किल्लेदारांना त्यांचे काही सैन्य विसाजीपंतांकडे पाठविल्याची आज्ञा केली.[२८१] त्याप्रमाणे पुरंदरकरांनी आपले सैन्य विसाजीपंताकडे पाठविले.[२८२] पुरंदरकरांना आणखी सैन्य व विसाजीपंत लेले यांना वसई व साष्टी येथे पाठविण्यास पुणे दरबारातून कळविण्यात आले. इंग्रजांनी साष्टीवर आक्रमण केले. तेव्हा आनंदराव राम यांनी तेथील युद्धाचा सविस्तर वृत्तांत पेशव्यांना कळविला.[२८३] विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग व राघोजी आंग्रे यांच्या आरमाराने वसईमार्गे येऊन इंग्रजांना शह द्यावा, त्यांना तशी आज्ञा करावी अशी विनंती आनंदराव राम यांनी पेशव्यांना केली.[२८४] साष्टीचा किल्लेदार या मोहिमेवेळी इंग्रजांना चिवट प्रतिकार करत होता.[२८५] पेशवे दरबारातून योग्य मदत साष्टीस पोहचली तर इंग्रजांचा नक्कीच पराभव होईल अशी आशा बेलापूर किल्ल्याचे किल्लेदार बाजी गंगाधर यांना वाटते.[२८६] जानराव धुळपांचे आरमार साष्टीला इंग्रजांच्या आरमारावर हल्ला करण्यास आले तर सुवर्णदुर्गचे आरमार व राघोजी आंग्रेचे आरमार ताबडतोब मदतीस येण्यास तयार होते.[२८७] बाजी गंगाधर यांच्या मते धुळप, राघोजी आंग्रे व सुवर्णदुर्गच्या आरमाराने साष्टीच्या अरुंद खाडीतील इंग्रजांच्या आरमारावर हल्ला केला तर त्यांची कोंडी होऊन फजिती होईल. त्यामुळे साष्टी सुरक्षित राहिल.[२८८] आनंदराव धुळप यांना माघारी पाठवून सुवर्णदुर्गचे आरमार आणण्यास पेशव्यांनी आज्ञा केली.[२८९]

वासुदेव नामक एका व्यक्तीने १८ डिसेंबर १७७४ रोजी इंग्रजांच्या साष्टी प्रांताच्या मोर्च्याविषयी सविस्तर वृत्तांत दिला आहे.[२९०] तो लिहितो की, ''साष्टीवर इंग्रजांकडून जोराचा मारा होत आहे. इंग्रजांनी रामजी सुभेदार यांच्या वाड्यापासून दिवाणाच्या घरापर्यंत आपल्या

सैन्याचा मोर्चा ठेवला आहे. वसई व वेसावे येथेपण इंग्रजी आरमार आहे. मुंबईवरुन खुप मदत साष्टीच्या इंग्रजांना येत आहे. साष्टीच्या सर्जत बुरुजावरुन इंग्रजांच्या आरामारावर हल्ला करत केला त्यावेळी इंग्रजांची दोन गलबते फुटली. अजून पुणे दरबाराकडून पाठविलेली मदत साष्टीस पोहचली नाही. विजयदुर्गचे आरमार सुवर्णदुर्ग येथे होते. विजयदुर्गवरुन फिरंगी आला आहे. तेव्हा परत फिरावे असे कळविल्यामुळे विजयदुर्गचे आरमार परत विजयदुर्गला गेले. सुवर्णदुर्गचे आरमार मात्र तेथेच बंदरात तयार आहे. राघोजी आंग्रे यांनी पाच सहाशे सैन्य जमिनीमार्गे साष्टीस पाठविले.[२९१] लवकरात लवकर साष्टीस लष्करी मदत पाठविण्याची विनंती वासुदेव यांनी साष्टीहून केली.

सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापुजी फडके यांनी विजयदुर्गला जानराव धुळप यांना लवकरात लवकर आरमार घेऊन यावे असे कळविले होते.[२९२] सुवर्णदुर्गवरुन दोन गुराबा व पाच गलबते एवढे आरमार कुलाब्याला जाऊन धुळपांच्या आरामाराची वाट पाहत होते.[२९३] इंग्रजांच्या आरमारी बोटी फिरत असल्यामुळे उंदेरी किल्ल्यापुढे मराठ्यांचे आरमार इतर जहाजे व होड्या जाऊ शकत नव्हत्या. उरण खाडीच्या मुखावर फिरंग्याच्या आरमारी बोटी नांगरल्या होत्या. मोरो बापूजींच्या मते, धुळपांचे आरमार आल्यावर उरण खाडीवर फिरंग्याना चांगलाच शह द्यावा. सुवर्णदुर्गचे आरमार कुलाब्यावरुन जमिनमार्गे साष्टीस जाणार होते. इतर ठिकाणची मदत आल्यावर सर्वांनी मिळून इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचे मराठ्यांचे नियोजन होते.[२९४] मुंबईचे इंग्रज मराठ्यांच्या साष्टी प्रदेशात हल्ले करत असतानाच बाणकोटच्या इंग्रज व जंजिऱ्याचा सिद्दीच्या यांच्या संयुक्त ५ ते ७ हजार सैन्याने मिळून जलमार्गे व जमिनमार्गे मराठ्यांच्या प्रदेशावर हल्ला व लुटालुट सुरु केली होती.[२९५] त्यामुळे मोरो बापूजी यांनी सुवर्णदुर्गच्या संरक्षणाची चोख व्यवस्था ठेवली होती.[२९६] इंग्रज व सिद्दीच्या प्रतिकारासाठी सुवर्णदुर्ग किल्ल्यामध्ये अपुरे सैन्य असल्यामुळे मोरो बापुजी यांनी पुण्यावरुन सैन्य व लष्करी साहित्य मागविले.[२९७] या मोहिमेतील लष्करी डावपेचाचा एक भाग म्हणून जयदुर्ग येथील राणोजी बलकवडे यांनी उंदेरी तालुक्यातून व्यापाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे जिन्नस, साहित्य मुंबईस विकण्यास मनाई केली.[२९८] पेशव्यांचे आज्ञेप्रमाणे मराठ्यांनी सुरत येथे व्यापारामध्ये अडथळे निर्माण केले. सुरत बंदराकडे जाणाऱ्या व्यापारी जहाजांना अटकाव केला.[३०९] राघोजी आंग्रे यांनी उरणच्या खाडीतून ५०० ते ६००

सैनिक साष्टीस मदतीस पाठविले व ते स्वतः उरणजवळच्या रेवस खाडीमध्ये थांबले होते.[३००] २० डिसेंबर १७७४ पर्यंत इंग्रजांच्या तोफांच्या माऱ्याने साष्टी किल्ल्याच्या भिंती पडल्या.[३०१] साष्टीचा किल्लेदार व त्यांच्या मुलांनी खुप पराक्रमाने किल्ला लढविला पण २३ डिसेंबर १७७४ रोजी साष्टी किल्ल्यातील लोकांची अवस्था खूपच दयनीय झाली. तोफा व बंदुकीच्या माऱ्यांनी किल्ल्यातील लोक हतबल झाले. विठ्ठल भास्कर व मानाजी खानविलकर यांनी इंग्रजांच्या हल्ल्यास चोख प्रत्युत्तर दिले.[३०२] अमावास्येच्या अंधाऱ्या रात्रीचा फायदा घेत इंग्रजांनी किल्ल्याजवळ लगट केली. पण किल्ल्यातील शिबंदीने त्यांचा तो प्रयत्न अयशस्वी केला. दुसऱ्या दिवशी सकाळपासून मात्र इंग्रजांनी किल्ल्यावर प्रचंड मारा सुरु केला. त्यामुळे किल्ल्यातील लोकांचे किल्ला राखण्याची आशा संपली.[३०३] एक एक क्षण त्यांना वर्षासारखा भासू लागला.

जानराव धुळप यांचे साष्टीला जाणारे आरमार रेवदंड्याच्या खाडीपर्यंत पोहोचल्यामुळे सुवर्णदुर्गचे किल्लेदार व राघोजी आंग्रे यांना त्वरीत आरमार पाठविण्याची आज्ञा पुण्याहून करण्यात आली.[३०४] मुंबईत इंग्रजांचे अतिशय थोडे सैन्य राहिल्यामुळे धुळप, आंग्रे व सुवर्णदुर्गच्या संयुत आरमाराने मुंबईवर मोठा आरमारी हल्ला करावा असा मराठ्यांचा विचार होता. २७ डिसेंबर १७७४ रोजी धुळप व सुवर्णदुर्गचे आरमार साष्टीजवळ आले.[३०५] या सर्वांनी इंग्रजांवर एकमताने जोराचा आरमारी हल्ला केला तरच इंग्रजांचा बंदोबस्त होईल असे गोविंद गंगाधर व बाळाजी महादेव या मराठा सरदारांना वाटत होते.[३०६]

एवढे प्रयत्न करुनही साष्टीचा किल्ला धुळप, आंग्रे व सुवर्णदुर्गची आरमारी मदत वेळेत न आल्याने २८ डिसेंबर १७७४ रोजी इंग्रजांच्या ताब्यात गेला. साष्टी किल्ल्याचे हवालदार भवानजी कदम मृत्यू पावले. तर आनंदराम व भवानजींचा मुलगा इंग्रजांच्या कैदेत सापडले. इंग्रजांनी त्यांना मुंबईस पाठविले.[३०७] साष्टी व यशवंतगड जिंकल्यानंतर इंग्रजांना आत्मविश्वास वाढला. त्यांनी जानेवारीच्या सुरुवातीस आपले आरमार सुवर्णदुर्गपर्यंत आणले.[३०८] इंग्रज व सिद्दीने कुलाबा व कोकणातील इतर प्रदेशांमध्ये हल्ले सुरु केले. त्यामुळे कुलाबा, रेवदंडा, उंदेरी येथील किल्ल्यांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला. चिमाजी मानकर यांनी पेशव्यांचे आज्ञेप्रमाणे सुवर्णदुर्गला बंदोबस्तासाठी १०० सैनिक पाठविले.[३०९] कृष्णाजी धुळप हे जानेवारी १७७५ मध्ये सुवर्णदुर्ग येथे त्यांच्या आरमारासहीत थांबले होते.[३१०] जानराव धुळप हे

कुंभारुगावाजवळ राजपुरी किल्ल्याजवळ आरमारासहीत होते. जानराव धुळप यांना पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे सुवर्णदुर्ग व राजपुरी येथील त्यांच्या आरमारासहीत इंग्रजांवर टेहळणी करण्यासाठी वसईच्या खाडीमध्ये जाण्यास सांगण्यात आले.[३११]

१७७५ मध्ये राघोबादादा व पेशव्यांचे सैन्य यांच्यामध्ये बडोद्याजवळ युद्ध झाले. राघोबादादांचा पराभव होऊन ते सुरतच्या इंग्रजांकडे आश्रय घेण्यासाठी पळून गेले. यावेळी सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था किल्लेदार मोरो बापूजी यांनी केले.[३१२] पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे जानराव धुळप सुवर्णदुर्गला आल्यानंतर त्यांना दारुगोळा देण्याचे आश्वासन मोरो बापूजी यांनी पेशव्यांना दिले.[३१३] सुवर्णदुर्गचे आरमार मार्च १७७५ मध्ये जानराव धुळप यांच्याबरोबर विजयदुर्ग येथे होते.[३१४] इंग्रज व सिद्दीच्या उपद्रवाचे गांभीर्य ओळखून सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापुजी यांनी आपल्या प्रदेशातील भूप्रदेश व किल्ल्यांच्या संरक्षणाची चोख व्यवस्था ठेवली.[३१५] सुवर्णदुर्गवरुन बाजी गोविंद हे सैन्यासहीत रत्नागिरी प्रांतात बंदोबस्तासाठी जमिनमार्गे गेले.[३१६] सुवर्णदुर्गवरुन जलमार्गे बाजी गोविंद यांच्या मदतीला आरमार पाठविण्यात आले.[३१७] रत्नागिरीचे कार्य संपल्यानंतर या सर्व सैन्यास वसईला विसाजी केशव यांच्या मदतीला पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे पाठविण्याचे आश्वासन मोरो बापुजी यांनी दिले.[३१८] हरबाजीराव धुळप यांच्याबरोबर गेलेल्या आरमाराला १७७५ मध्ये सुवर्णदुर्गला परत पाठविण्यात आले.[३१९]

अशाप्रकारे पेशवे दरबारातील अराजकाचा फायदा घेत इंग्रज व पोर्तुगीजांनी मराठ्यांच्या ताब्यातील प्रदेश जिंकण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये साष्टीप्रांत हा व्यापारी व लष्करी दृष्टीने महत्त्वाचा होता. इंग्रज व पोर्तुगीज या परकीयांनी साष्टी प्रांत जिंकण्यासाठी एकाचवेळी मोहिम काढली. इंग्रजांच्या लष्करी दबावामुळे पोर्तुगीजांना हा प्रयत्न सोडून द्यावा लागला. सवाई माधवराव पेशव्यांच्या काळामध्ये खरा कारभारी नाना फडणीस यांनी बालपेशव्यांच्या नावे सर्व पत्रव्यवहार व कारभार केला. इंग्रजांच्या साष्टी मोहिमेच्या दरम्यान सुवर्णदुर्ग किल्ला व तेथील आरमाराने महत्त्वाची भूमिका बजावली.

## तोतयाचे बंड

सदाशिवराव भाऊ पानिपतावर मरण पावला. सदाशिवराव भाऊंच्या चेहऱ्याशी साम्य असणाऱ्या सुखलालला हाताशी धरुन गणेश संभाजी, विश्वासराव लक्ष्मण या मराठा सरदारांनी

तोतयाचे बंड घडवून आणले. त्याची शहानिशा होऊन तोतयास कैद करुन दौलताबादवरुन तोतयास मिरज येथे ठेवण्यात आले होते. पुढे ऑक्टोबर १७७५ मध्ये तोतयाची रवानगी रत्नागिरीच्या किल्ल्यात करण्यात आली.[३२०] रत्नागिरीचा सुभेदार रामचंद्र नाईक परांजपे या सावकाराकडे होता. तोच तोतयावर देखरेख ठेवत असे. रामचंद्र नाईक यांनी सांगितल्यावरुन त्याच्या कुटुंबियांनी तोतयास सोडले. त्याच्या नावाने राज्यात व्दाही फिरवली. माधवराव पेशवे व आत्ताच्या कारभारांनी मुद्दाम सदाशिवराव भाऊंना तोतया ठरवून विश्वासघाताने कैदेत ठेवले होते. तेच आता राज्यकारभार पाहू लागले आहेत असे जाहीर करण्यात आले.[३२१] सुटका होताच तोतयाला हजारो अनुयायी व सैन्य मिळाले. या सैन्यासह त्याने विजयदुर्ग, देवगड हे किल्ले जिंकले. पेशव्यांचे आरमार आनंदराव धुळप यांच्या ताब्यात होते ते त्यांनी तोतयाच्या ताब्यात दिले. तोतयाने जुन १७७६ मध्ये अंजनवेल व गोवळकोट किल्ले जिंकले. रत्नागिरीच्या आसपासच्या किल्ल्यांचा बंदोबस्त करुन तोतया पुण्याकडे निघाला.[३२२]

तोतयाने सुवर्णदुर्गच्या किल्लेदाराकडे फितूर होण्यासाठी संधान साधले होते.[३२३] तोतयाने अंजनवेल किल्ला जिंकल्यानंतर जुलै १७७६ मध्ये सुवर्णदुर्ग किल्ला घेतला.[३२४] तोतयाचा बंदोबस्त करण्यासाठी दौलतराव शिंदे व बाजी भिवराव हे मराठा सरदार गेले. दौलतराव शिंद्याचा पाठलाग चुकवत तोतया २००–३०० सैन्यानिशी कोकणाकडे गेला. तो सुवर्णदुर्गकडे जाणार अशी अफवा होती.[३२५] बाळाराव हे शिंद्याचे सरदार तोतयाच्या पाठलागावर गेले. शिंदे, भिवराव, नरसिंगराव धायगुडे, नारो गणेश, बाजीपंत आण्णा, गोविंदराव मानकर, सुर्वे अशा सर्व सरदारांनी आपल्या प्रचंड सैन्यासहीत तोतयाचा बंदोबस्त केला. त्यांनी तोतयाने घेतलेले कोकणातील सर्व किल्ले जिंकण्याचा प्रयत्न सुरु केला. तोतयाच्या बंदोबस्ताची चिन्हे दिसताच तोतयाच्या कैदेमध्ये असलेले सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरोपंत फडके व मामलेदार बच्चाजीपंत बर्वे यांचा मुलगा कैदेतून पळून गेले.[३२६] नोव्हेंबर १७७६ मध्ये तोतयास कैद करुन पार्वतीबाईंच्या पुढे उभे करण्याचे ठरले होते.[३२७] तोतया कैद केल्यामुळे पेशव्यांनी बाळाजी गोविंद यांना सैन्यासह रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा ताबा परत पेशव्यांकडे घेण्यासाठी पाठविले. या किल्ल्यावर तोतयाने नेमलेल्या किल्लेदारांना किल्ले पेशव्यांच्या ताब्यात द्यावेत तुम्हाला कोणताच त्रास होणार नाही असे कळविण्यात आले. अशी सनद सुवर्णदुर्ग तालुक्यातील किल्ला सुवर्णदुर्ग, रसाळगड, पाणगड, मंडणगड, सुमारगड तर अंजनवेल तालुक्यातील किल्ला अंजनवेल,

विजयगड, गोविंदगड (गोवळकोट), बहिरवगड तसेच रत्नागिरी तालुक्यातील जंजिरा, रत्नागिरी किल्ले जयगड, महिपतगड, पूर्णगड येथील किल्लेदार, कारकून व सरदार यांना कळविण्यात आले.[३२८] पेशव्यांच्या सैन्याने अंजनवेल व सुवर्णदुर्ग हे किल्ले तोतयाच्या लोकांकडून घेऊन त्या ठिकाणी आपले वर्चस्व निर्माण केले.[३२९] तोतयाचा बंदोबस्त केल्यानंतर बाळाजी गोविंद यांना सैन्यासहीत तोतयाने घेतलेले सुवर्णदुर्ग तालुक्यातील सुवर्णदुर्ग, मंडणगड, रसाळगड, पानगड, सुमारगड घेण्यासाठी पाठविण्यात आले.[३३०] याशिवाय बाळाजी गोविंद यांना अंजनवेल तालुक्यातील अंजनवेल, विजयगड, गोविंदगड, बहिरवगड व रत्नागिरी तालुक्यातील रत्नागिरी, जयगड, महिपतगड व पुर्णगड हे किल्ले ताब्यात घेण्याची आज्ञा करण्यात आली.[३३१] उपरोक्त सर्व किल्ल्यांवरील तोतयाने नेमलेल्या किल्लेदार, कारकून व इतर सरदारांना पेशव्यांनी आपापल्या ताब्यातील किल्ले बाळाजी गोविंद यांच्या स्वाधीन करण्यास सांगितले.[३३२] तोतयास सामील असणाऱ्या या अधिकाऱ्यांना कोणताच त्रास होणार नाही असे आश्वासन पेशवे सवाई माधवराव यांच्या वतीने देण्यात आले.[३३३] तोतयाच्या बंडाचा पूर्ण बंदोबस्त झाल्यानंतर पेशव्यांनी विचारल्याप्रमाणे सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापूजी यांनी मे १७७९ मध्ये सुवर्णदुर्ग किल्ल्यावर पेशवे व तोतयांनी सोडून दिल्यानंतर किल्ल्यावर चौदा व्यक्ती कैदेत असल्याचे कळविले.[३३४] नारो लक्ष्मण भिडे हे बाजीपंतांबरोबर कोकणामध्ये तोतयाविरुद्ध लढण्यासाठी गेले होते. तोतयाचा पाडाव झाल्यानंतर त्यांना सुवर्णदुर्ग येथे कमाविसदार म्हणून नेमण्यात आले.[३३५]

श्रीमंत नारायणराव पेशव्यांच्या खुनामुळे पेशवाई अडचणीत आली होती. अंतर्गत यादवीला ऊत आला होता. मराठ्यांचे शत्रू मराठेशाही बुडविण्यासाठी टपून बसले होते. इंग्रजांच्या राजकारणाला उधाण आहे होते. अशा संकटात पेशवाई वाचविण्याचे काम नाना फडणवीस व महादजी शिंदे यांनी केले. महादजी शिंद्यांनी उत्तरेत प्रभाव निर्माण केला तर नानांनी दक्षिणेकडील राजकारण यशस्वी केले.

### मोरोबादादाचे कारस्थान (इ.स. १७७८)

बारभाई कारस्थान यशस्वी होऊन दि. २८ मे १७७४ रोजी बालपेशवा सवाई माधवरावांच्या नावाने नाना फडणवीस व सखाराम बापू यांनी मराठ्यांचा कारभार हाती घेतला. या कारभाराच्या सुरुवातीलाच सदाशिवभाऊच्या तोतयाचे बंद उद्भवले. महादजी शिंद्यांनी या

बंडाचा बंदोबस्त केला. तोतयाच्या बंडापाठोपाठ १७७८ मध्ये मोरोबादादाच्या कारस्थानच्या रुपाने एक नवेच संकट पेशवाईवर आले.

मोरोबादादाच्या कारस्थानामध्ये मोरोबादादास सामील असणाऱ्या अनेक व्यक्तींना त्यांच्या कुटुंबासहीत कैद करुन सुवर्णदुर्ग तालुक्यातील सुवर्णदुर्ग, रसाळगड, पालगड येथे कैदेमध्ये ठेवण्यात आले. बाबुराव बल्लाळ काणे यांची पत्नी सुवर्णदुर्ग तालुक्यातील पालगड येथे पांडुरंग बल्लाळ मोडक यांच्या घरी असल्याचे सांगून त्यास कैद करुन रसाळगड येथे कैदेत ठेवण्याचा व तीची चीजवस्तू जप्त करण्याचा हुकूम सुवर्णदुर्गाचे किल्लेदार मोरो बापूजी यांना पेशवे सवाई माधवराव यांच्या नावे करण्यात आला.[३३६] आबाजी महादेव सोवनी याची बायको, तिच्या मामाच्या, पांडुरंग बल्लाळ मोडक यांच्या घरी पालगड येथे होती. तिला कैद करुन रसाळगडावर कैदेमध्ये ठेवून तिची चीजवस्तू जप्त करण्यास मोरो बापूजी यांना सांगितले.[३३७] बाबुराव बल्लाळ काणे यांची मुले सुवर्णदुर्ग तालुक्यात गेली असे समजल्यामुळे पेशव्यांच्या वतीने मोरो बापूजी यांना सुवर्णदुर्ग तालुक्यामध्ये त्यांचा बारकाईने शोध घेण्यास पेशव्यांनी सांगितले.[३३८] त्यांचा शोध घेऊन त्यांना वेगवेगळ्या किल्ल्यावर कैदेत ठेवून त्यांची चीज-वस्तू जप्त करण्याच्या आज्ञा पेशव्यांकडून मोरो बापूजी यांना झाली.[३३९]

मुधोजी भोसल्यांचे वकील व्यंकटराव काशी हे सुवर्णदुर्ग किल्ल्यावर कैद होते. त्यांना चार शिपाई बरोबर देऊन पुण्यास पाठविण्याची आज्ञा पेशव्यांनी मोरो बापूजी यांना केली.[३४०]

इ.स. १७७९-८० मध्ये सर्वोत्तम शंकर यांना विजयदुर्गमध्ये चार इंग्रज लोक सापडले. त्यांना सुवर्णदुर्ग तालुक्यातील पालगड किंवा रसाळगड येथे पाठवत असल्याचे सुवर्णदुर्गचे किल्लेदार मोरो बापूजी यांना कळविण्यात आले.[३४१] बाणकोट येथे इंग्रजांचे ठाणे असल्यामुळे व मंडणगड बाणकोटपासून जवळ असल्याने त्याऐवजी या कैद्यांना पालगड किंवा रसाळगड येथे गुप्ततेने ठेवण्याचे आदेश मोरो बापुजींना देण्यात आले.[३४२] याशिवाय मोरो बापुजींना घाटातील किल्ल्याच्या पायथ्याशी एखाद्या घरात कैदेत ठेवण्याची आज्ञा पेशव्यांनी केली.[३४३]

या चार इंग्रज कैद्यांना बोटीने सुवर्णदुर्ग किल्ल्यावर पाठविण्यात आले. मोरो बापुजी यांना या कैद्यांसाठी पालगड, रसाळगड व अंजनवेल ताल्लुयातील बहिरवगड हे किल्ले योग्य वाटले.[३४४] मोरो बापुजींनी एक इंग्रज कैदी रसाळगडावर, दोन पालगडवर व व्हॉईसरायच्या कारकूनास बहिरवगडावर कैदेत ठेवण्याचे ठरविले.[३४५] या सर्व कैद्यांबरोबर कारकून, डोल्या,

पंचविस सैनिक देऊन हे सर्वजण पुण्याला जात आहे. असा देखावा करुन ठरल्याप्रमाणे उपरोक्त किल्ल्यांवर सर्वांना पाठविण्यात आले.

खुप प्रयत्न करुनही राघोबादादांना पेशवेपद मिळाले नाहीच. राघोबादादा ११ डिसेंबर १७८३ रोजी कोपरगावजवळ कचोर येथे मरण पावले. त्यानंतर राघोबादादांच्या पत्नी आनंदीबाई २७ मार्च १७९४ रोजी मरण पावल्या. नाना फडणीसाने सवाई माधवरावांना कधीही स्वतंत्रपणे कारभार करु दिला नाही. नानाच्या वाढत्या दबावाने सवाई माधवराव खिन्न झाले. दिनांक २७ ऑक्टोबर १७९५ रोजी सवाई माधवराव यांनी शनिवारवाड्यात उडी टाकली. औषधोपचार चालू असताना त्याचदिवशी ते मरण पावले.

## छ. धाकटे शाहू –( इ.स. १७९६ ते १८१८ )

## पेशवे दुसरे बाजीराव – (इ.स. १७९६ ते १८१८)

२५ नोव्हेंबर १७९५ रोजी सवाई माधवराव याने शनिवारवाड्यात गच्चीवरुन खाली कारंजावर उडी टाकली. दोन दिवसानंतर तो मृत्यू पावला. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर रघुनाथदादाचा मुलगा दुसरा बाजीराव हा इ.स. १७९६ मध्ये पेशवेपदावर आला. मराठा साम्राज्याचा तो शेवटचा पेशवा ठरला. पेशवे पदावर आल्यापासूनच त्याला अनेक अंतर्गत व बाह्य संकटांना तोंड द्यावे लागले. दुसऱ्या बाजीरावाचे स्वभावदोष, मराठा सरदारांमधील वाढती दुही, इंग्रजांची मराठ्यांचा प्रदेश बळकाविण्याची सतत महत्त्वाकांक्षा यामुळे त्यास सत्ता टिकविण्यासाठी सतत संघर्ष करावा लागला. अस्तित्त्वाच्या या लढाईतच त्याची कारकिर्द खर्ची पडली. इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांच्या विरोधी युद्धामध्ये पेशवा दुसरा बाजीराव पराभूत झाला. त्याच्या या पराभवाबरोबरच छ. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचा अंत झाला. याविषयीचा सविस्तर वृत्तांत आधीच्या प्रकरणामध्ये दिला आहेच.

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांनी सत्तेवर येताच अनेक जुन्या सरदारांशी संघर्ष सुरु केला. अनेकांशी युद्धे करुन त्यांना कैद केले. माधव अनंत रास्ते यांची मुले पेशवे दुसरे बाजीराव यांनी कैद करुन कोरीगडावर ठेवली होती.[३४६] रास्त्यांची इ.स. १८०१ मध्ये कोरीगडावरुन पळून गेल्यामुळे अंजनवेल व सुवर्णदुर्गच्या किल्लेदारांना सावध करण्यात आले.[३४७] त्यांना आपापल्या प्रांतात पहारा कडक करुन तर पळून गेलेले हे कैदी सापडले तर सरकारकडे पुण्यात पाठविण्याची आज्ञा करण्यात आली.[३४८]

कोल्हापूरांच्या वतीने अमात्य बावडेकर व इतर सरदारांसाठी इ.स. १८०१–०२ मध्ये पुणे दरबाराच्या अराजकाचा फायदा घेत पुणे सरकारच्या ताब्यातील प्रदेशामध्ये लुटालुट व आक्रमण करण्यात सुरुवात केली. त्यांच्या बंदोबस्तासाठी इतर मराठा सरदारांच्या मदतीस पेशवे दुसरे बाजीराव यांच्या आज्ञेप्रमाणे बाळोजी कुंजीर यांनी सुवर्णदुर्ग किल्ल्यावरुन दोनशे सैनिक पाठविले.[३४९] सिद्दी व मराठे यांच्यामध्ये संघर्ष सुरु होता. त्यामुळे पेशवे दुसरे बाजीराव यांनी सुवर्णदुर्गचे किल्लेदार बाळाजी कुंजीर यांना पेशव्यांचा हुकूम येईपर्यंत सुवर्णदुर्गाची वसुली दरवर्षी पुणे सरकारकडे जमा करावी. सिद्दीला देऊ नये अशी ताकीद पेशव्यांनी केली.[३५०]

तुकोजी होळकरांच्या मृत्यूनंतर त्यांच्या घरामध्ये सुरु झालेल्या वारसा संघर्षामध्ये दुसऱ्या बाजीरावाने तुकोजीचा मोठा मुलगा काशीराव यांची बाजू घेतली. दौलतराव शिंदे व पेशवे दुसरे बाजीराव यांचा काशीरावास पाठींबा होता. मल्हारराव होळकर यास होळकर घराण्याची सुभेदारी पाहिजे होती. त्याचे सावत्र भाऊ विठोजी व यशवंतराव यांचा त्यास पाठींबा होता. १४ सप्टेंबर १७९७ दौलतराव शिंदे व काशीरावच्या सैन्याकडून मल्हारराव होळकर मारला गेला. सप्टेंबर १७९९ मध्ये कोल्हापूरकरांशी परशुराम भाऊ मारला गेला. १३ मार्च १८०० मध्ये नाना फडणीस यांचा मृत्यू झाला.

यशवंतराव व विठोजी यांनी मल्हाररावाच्या मृत्यूचा बदला घेण्याचे ठरविले. दरम्यान यशवंतराव होळकर लष्करीदृष्ट्या समर्थ झाला. दौलतराव शिंद्याला यशवंतरावाचे मोठे आव्हान निर्माण झाले. शिंदे व पेशवे यांच्या सैन्यातील बेकार लोक लुटीच्या आशेने विठोजी होळकरास सामील झाले. विठोजी पेशव्यांच्या प्रदेशात मंगळवेढे, करकंब, पंढरपूर येथे लुट करू लागला. पेशव्यांचा बाळकृष्ण गंगाधर बावनपागे उर्फ कानडे, शिंद्यांचे येसाजी रामकृष्ण, बाजीबा व कृष्णराव मोदी हे सरदार विठोजीस जाऊन मिळाले. ते रघूनाथरावाचा दत्तक मुलगा अमृतराव याच्या नावाने लुटालुट करत. विठोजी होळकर जिंकलेल्या किल्ले कोट व प्रदेशावर अमृतरावाचे निशाण लावत असे. पेशव्यांचे सरदार बापू गोखले यांनी विठोजी होळकर यांना कैद करुन पुण्याला पाठविला. त्याला पेशव्यांनी १६ एप्रिल १८०१ रोजी हत्तीच्या पायाशी बांधून ठार मारले. यानंतर यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे यांच्यामध्ये अनेक लढाया झाल्या. दौलतराव शिंद्यांचे अनेक सैनिक व जिवाजी यशवंत हा सरदार होळकरांना जाऊन मिळाला. या

युद्धामध्ये यशवंतराव होळकरच विजयी झाला. त्याने अनेक वेळा शिंद्यांचा पराभव केला. इ.स. १८०२ मध्ये यशवंतराव होळकर पुण्यावर आक्रमण करण्यास युद्धाची सर्व तयारी करुन निघाला. वाटेत पुण्यापर्यंत होळकरांनी आपले वर्चस्व निर्माण केले. यशवंतरावाने पेशव्यांना मल्हारराव होळकरांचा मुलगा खंडोजी यास शिंद्यांच्या ताब्यातून आपणाकडे देण्याची मागणी केली. पण शिंदे खंडोजीस पेशव्यांच्या ताब्यात देईनात. शिंद्यांनी मल्हाररावाची पत्नी जिजीबाई व मुलगा खंडेराव यांना अशेरी किल्ल्यावर कैदेत ठेवले होते. होळकर पुण्याच्या अधिक जवळ येऊ लागताच पेशवे दुसरे बाजीराव यांनी शिंद्यांना मदतीस बोलविले. बारामती जवळ मेडते येथे होळकरांचा फत्तेसिंग माने व पेशव्यांचे सरदार नाना पुरंदरे यांच्यात युद्ध झाले. पेशव्यांच्या सैन्याचा पराभव झाला. त्याच दिवशी पेशव्यांनी आपले व चिमणाजीचे कुटुंब रायगडावर पोहोचवले. सवाई माधवरावाची पत्नी यशोदाबाईचा पक्का बंदोबस्त केला. सर्व खजिना सिंहगडावर नेला. पेशव्यांनी पुण्याच्या बंदोबस्तासाठी शहराबाहेर तोफा ठेवल्या. २५ आक्टोबर १८०२ रोजी हडपसरची लढाई झाली. बाजीरावाने आधीच कोकणात पळून जाण्याची तयारी केली होती. या युद्धाचा प्रसार घोरपडी, वानवडी पर्यंत झाला. या युद्धात पेशव्यांच्या मदतीस आलेल्या शिंद्यांच्या सैन्याची दाणादाण उडाली. यशवंतराव होळकर याचा या युद्धात विजय झाला. पेशवे दुसरे बाजीराव पर्वती, वडगावमार्गे डोणजे येथे पोहोचले. येथे बाळाजीपंत पटवर्धन, बापूजी विठ्ठल चाफेकर यांनी पेशव्यांना इंग्रजांच्या आश्रयास जाण्याचा सल्ला दिला. बाजीराव व त्याचे अनेक सहकारी डोणजावरून कोकणात पळून गेले. हडपसरच्या लढाईतील पराभवानंतर पूणे सोडून कोकणात जात असतानाच पेशव्यांनी स्वतःच्या सहीशिक्याचे एक पत्र कर्नल क्लोजला पाठविले. पेशवे इंग्रजांची मदत घेत आहे या बातमीचा होळकरांवर दबाव निर्माण करण्याचा पेशव्यांचा हेतू होता.

दुसरे बाजीराव पेशवे सुवर्णदुर्गला पोहचले. तेव्हा त्यांना किल्ल्यामध्ये घेतले नाही. शेवटी गलबतातच दोन तीन दिवस किल्ल्याबाहेर राहून त्यांना आपले कुटुंब सोडून तेथून वसईला जावे लागले.[३५१] दुसऱ्या बाजीराव पेशव्याचा पाठलाग करत आलेल्या होळकरांच्या सैन्याने सुवर्णदुर्ग किल्ला जिंकला.[३५२] पेशवे दुसऱ्या बाजीरावाने पुणे सोडताच अमृतरावाने होळकरांशी हातमिळवणी करत पुण्यामध्ये सत्ता ताब्यात घेतली. अमृतरावाच्या वतीने

होळकरांच्या सैन्याने सुवर्णदुर्ग १५ डिसेंबर १८०२ रोजी ताब्यात घेतला.[३५३] यावेळी सुवर्णदुर्ग किल्ल्यातील जुने सैन्य किल्ल्याबाहेर युद्धासाठी गेले होते. ते व किल्ल्यातील अधिकारी अमृतराव व होळकरांस फितुर झाले होते. त्यामुळे सकाळी किल्ल्याचे दार उघडताच परवानगी न घेता होळकरांच्या सैन्याने किल्ल्यात शिरुन दंगा केला.[३५४] त्यांनी किल्ल्यात राहिलेल्या जुन्या शिबंदीची शस्त्रास्त्रे काढून घेतली व त्यांना किल्ल्याबाहेर हाकलले.[३५५] सुवर्णदुर्ग किल्ला व दरवाजाची व्यवस्था या नव्या (अमृतराव व होळकरांच्या) शिबंदीकडे देण्यात आली. विठोजी नाईक याने दुसऱ्या बाजीराव पेशव्यांच्या वतीने किल्ला परत मिळविण्याचा प्रयत्न केला. पण तेथील किल्लेदार हरिपंत हा किल्ल्याबाहेर आला नाही व त्याने विठोजीस किल्ला दिला नाही.[३५६] हर्णे बंदरात इंग्रजांचे आरमार उभे होते. त्यापैकी सैन्याच्या तीन पलटणी जमिनीवर उतरल्या होत्या.[३५७]

दुसऱ्या बाजीराव पेशव्यांबरोबर सुवर्णदुर्गचे किल्लेदार बाळोजी कुंजीर हे वसईस गेले होते.[३५८] अनेक मराठा सरादार त्यांना वसईचा इंग्रजांशी होत असलेल्या वाटाघाटींविषयी सविस्तर वृत्तांत कळविण्यास सांगत.[३५९] दुसरे बाजीराव पेशवे यांनी वसईला जाताना आपल्या कुटुंबातील स्त्रीया (मोठी पत्नी व सौ. ताईसाहेब व इतर स्त्रीया) यांना सुवर्णदुर्गलाच ठेवले होते.[३६०] त्यांना सुवर्णदुर्गची हवा मानवणार नाही म्हणून पेशवे बाजीरावाने रायगडच्या किल्लेदारांना या स्त्रीयांना पालख्या व सरंजाम पाठवून रायगडला आणविण्याची आज्ञा केली.[३६१] इ.स. १८०४ मध्ये इंग्रजांनी मराठा सरदारांकडून दुसऱ्या बाजीराव पेशव्यांना सुवर्णदुर्ग किल्ला जिंकून दिला.[३६२]

दुसऱ्या बाजीरावाने १० डिसेंबर १८०२ रोजी मुंबईला जाऊन इंग्रजांची भेट घेतली होती. दुसरा बाजीराव व इंग्रज यांच्यामध्ये आधीपासूनच करारासंबंधी बोलणी चालू होती. तैनाती फौजेच्या खर्चासाठी तोडून द्यावयाच्या प्रदेशाच्या मुद्यावरुन पेशव्यांनी बोलणी लांबवली होती. दरम्यान शिंद्यांची पेशव्यांना मदत करण्यास येत असण्याविषयीची पत्रे आली होती. ब्रिटिश तैनाती फौजेच्या खर्चासाठी पेशव्यांचा गुजरातमधील प्रदेश मागत होते. दुसऱ्या बाजीरावाने आता शिंद्यांची मदत मिळविण्यासाठी भडोचला जाण्याचे ठरवले. त्याने मुंबईला ब्रिटिशांशी वाटाघाटी करत असणाऱ्या आपल्या वकिलाला वसईला परत बोलविले.

दुसऱ्या बाजीरावाला तैनाती फौजेचा करार करण्यास भाग पाडण्यासाठी ब्रिटिशांनी दुसऱ्या बाजीरावास अमृतराव व होळकरांशी तैनाती फौजेचा करार करण्याची धमकी दिली. शेवटी दुसरा बाजीराव ब्रिटिशांच्या या डावपेचाला बळी पडला. ३१ डिसेंबर १८०२ रोजी दुसऱ्या बाजीरावाने वसई येथे तैनाती फौजेच्या करारावर सही केली. तैनाती फौजेच्या खर्चासाठी सव्वीस लाखांचा प्रदेश ब्रिटिशांना तोडून देण्याचे ठरले. त्या बदल्यात तैनाती फौजेने पेशव्यांचे संरक्षण करणे, बंडखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी सदैव तयार रहावे. पेशव्यांचे अधिकार व प्रदेश यावर कोणी आक्रमण केल्यास कंपनी सरकारने त्याचा प्रतिकार करावा. पेशव्यानी कंपनी सरकारच्या मित्रराज्यांशी कोणत्याही प्रकारचे शत्रुत्व करू नये. पेशव्यांचे ब्रिटिशांच्या मित्रराज्यांशी मतभेद झाल्यास कंपनी सरकारच्या मध्यस्थीने ते सोडवावेत. कंपनी सरकार व बडोद्याचे गायकवाड यांच्यामध्ये झालेल्या कराराला पेशव्यांनी मान्यता द्यावी. बडोदा व पुणे सरकार यांच्यातील वित्तविषयक तंटा कंपनी सरकारच्या मध्यस्थीने सोडवावा. कंपनी सरकारशी शत्रुत्व असणाऱ्या कोणत्याही युरोपीय देशाच्या नागरिकांना पेशव्यांनी नोकरीत ठेऊ नये. पेशव्याने ब्रिटिशांच्या सल्ल्याशिवाय कोणत्याही परकीय सत्तेशी संबंध ठेऊ नयेत. कंपनीने पेशव्यांची मुले, नातेवाईक, सेवक, प्रजा यांच्याशी कोणत्याही प्रकारचे संबंध ठेऊ नयेत. या सर्वांवर पेशव्यांचा अधिकार राहील. कंपनीचे इतर कोणत्याही सत्तेशी युद्ध सुरु झाले तर पेशव्यांनी तैनाती फौजेपैकी ४ पलटणी, ६००० पायदळ व १० हजार घोडदळ कंपनी सरकारच्या मदतीला पाठवावे. अशा वसई तहाच्या अटी होत्या.

वसईच्या या तहाच्या कलमामध्ये अमृतराव, सवाई माधवरावाची पत्नी यशोदाबाई, होळकर, फडणीस, बाबा फडके यांचा बंदोबस्त व पूर्वापार वतनांचा सरंजाम त्याविषयीच्या तरतूदी होत्या. यामध्ये सुवर्णदुर्गचा सुभा पूर्वीपासून बाबा फडके यांच्याकडे होता.[३६३] १३ मे १८०३ रोजी इंग्रजांनी दुसऱ्या बाजीरावास पुन्हा पेशवेपदावर बसविले. यानंतर दुसऱ्या बाजीरावाने यशवंतराव होळकर व अमृतराव यांना फितुर झालेल्या लोकांची चौकशी व बंदोबस्त केला. सुवर्णदुर्ग येथील बाळाजी कुंजीर हा पेशव्यांबरोबर वसईला गेला. त्यानंतर सुवर्णदुर्गचा कारभार पाहणारा बाबाजी फडके हा अमृतराव व होळकरांना फितूर झाला होता. गणपतराव करमकर यांनी बाबाजी फडके यांच्याविषयी पेशवे दुसरे बाजीराव यांच्याकडे रदबदली केली.[३६४] त्याप्रमाणे बाबाजी फडके यांना वाचविण्याचे पेशव्यांनी मान्य केले. विठोजी नाईक व हरजी शिंदे

हे सुवर्णदुर्ग पुन्हा ताब्यात घेण्यासाठी गेले.[३६५] इ.स. १८०४ मध्ये इंग्रजांनी मराठा अधिकाऱ्याकडून सुवर्णदुर्ग जिंकला.[३६६] सुवर्णदुर्गवर इ.स. १८०४ मध्ये पुन्हा पेशवे दुसऱ्या बाजीरावाचे वर्चस्व निर्माण झाले.[३६७] त्यानंतर पेशव्यांनी सुवर्णदुर्ग किल्ला व सुभा, कनकदुर्ग, कोट गोवा, मंडणगड, पालगड, रसाळगड येथील कारखानीसांना त्या त्या ठिकाणी शिल्लक असणारी शस्त्रास्त्रे, दारुगोळा व इतर लढाईचे सामान सरकार जमा करण्याची आज्ञा केली.[३६८] यावेळी सुवर्णदुर्ग येथे जगन्नाथ आवजी, कनकदुर्ग येथे धोंडो वासुदेव, कोट गोवा येथे रघुनाथ सदाशिव व मंडणगड येथे येसाजी बल्लाळ तर रसाळगड येथे मुकुंद श्रीपत हे कारखानीस होते.[३६९] तैनाती फौजेचा स्विकार केल्यापासून पेशवे दुसरे बाजीराव यांनी शिंद्यांच्या मदतीने इंग्रजांचे वर्चस्व झुगारुन देण्याचे प्रयत्न सुरु केले होते. इंग्रजांनी विविध मार्गाने पेशवे दुसरे बाजीराव यांच्यावर दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला.

दुसरे इंग्रज–मराठा युद्ध ऑगस्ट १८०३ मध्ये सुरु झाले. यावेळी इंग्रजांचा सर्व रोख शिंदे, होळकर व भोसले यांचा बंदोबस्त करण्याकडे होता. इंग्रजांनी शिंद्यांकडील, युरोपियन सैन्याधिकाऱ्यांना फितूर केले. ऐनवेळी शिंद्यांच्या सैन्यातील अनेक इंग्रज अधिकारी शिंद्यांना सोडून कंपनीच्या सैन्यास सामील झाले. यावेळी इंग्रज अनेक मराठा सरदार व शिंद्यांच्या सैन्यातील मराठा लष्करी अधिकारी यांना फितुर करण्यात यशस्वी झाले. या फितुरीचा पहिलाच अनुभव अहमदनगरच्या युद्धामध्ये आला. ८ ऑगस्ट १८०३ रोजी जनरल वेलस्लीने अहमदनगर किल्ल्यावर हल्ला केला. त्यावेळी शिंद्यांच्या सैन्यातील व तोफखान्यातील युरोपियन अधिकारी आपापल्या सैन्यासह जनरल वेलस्लीस जाऊन मिळाले. भिंगारचे देशमुख रघुरावबाबा याने चार हजार रुपयांच्या बदल्यात अहमदनगरच्या किल्ल्याची माहिती व हल्ल्याच्या अचूक जागा सांगितल्या. त्यामुळे एकाच दिवसात अहमदनगर शहर तर दोन दिवसात किल्ला इंग्रजांच्या ताब्यामध्ये आला. इतका मजबूत किल्ला ताबडतोब पडल्याने त्याचा मराठ्यांचे नीतिधैर्य खचले. शिंद्यांचा दक्षिणेतील इतर सरदारांशी संपर्क तुटला. शिंदे एकाकी पडले.

वसईच्या युद्धात शिंद्यांचा पराभव इंग्रजांनी केल्यानंतर अशीरगड व बऱ्हाणपूर हे शिंद्यांचे किल्ले जिंकले. या किल्ल्यांना इंग्रजांनी वेढा दिल्यावर कॅ. डुपॉट, कॅ. मार्सिअर, कॅ. मान यांच्यासह एकूण सोळा अधिकारी शिंद्यांना सोडून इंग्रज सैन्यास जाऊन मिळाले. अलिगड

येथील शिंद्यांचा पेरॉन हा अधिकारी काही मराठी अधिकाऱ्यांसह इंग्रज सैन्यास जाऊन मिळाला. इंग्रजांनी शिंद्यांचे उत्तरेतील अलिगड, कौंगा, हंसी व आग्रा हे किल्ले इंग्रजांच्या ताब्यामध्ये गेले. लासवडीच्या मैदानातील शिंद्यांच्या पराभवाने या युद्धाचा निकाल लागल्यासारखे होते. इंग्रजांनी कराराच्या अटी देऊन शिंद्यांना विचार करण्यासाठी दहा दिवसांचा वेळ दिला होता. पण ही मुदत संपण्यापूर्वीच इंग्रजांनी शिंदे व भोसले यांच्यावर हल्ला केला. त्यामध्ये भोसल्यांचे गाविलगड व कटक तर शिंद्यांचे गुजरातमधील भडोच, पावनगड, चंपानेर हे प्रदेश व किल्ले इंग्रजांच्या ताब्यात गेले. बुंदेलखंडातील हिंमत बहादूर हा मराठा सरदार युरोपियन सैन्यासह इंग्रजांना जाऊन मिळाला.

शिंदे व भोसल्यांवरील या विजयामुळे दौलतराव शिंद्यांचे लष्करी सामर्थ्य नष्ट झाले. मराठा दरबारातील फ्रेंचांचा प्रभाव नष्ट झाला. शिंद्यांच्या ताब्यातील दिल्ली, आग्रा, दुआबचा सुपीक प्रदेश व उत्तर भारतातील खुप मोठा प्रदेश इंग्रजांना मिळाला. गुजरातमधील भडोच इंग्रजांच्या ताब्यात आल्यामुळे त्यांना व्यापारी वाहतुकीसाठी समुद्र किनारा ताब्यात आला. दौलतराव शिंदे यांचा समुद्र किनाऱ्याशी संपर्क तुटला. याशिवाय मोगल बादशहा शहाआलम व दिल्ली, आग्र्याजवळची छोट्या-छोट्या राज्यांवर इंग्रजांचा प्रभाव निर्माण झाला. इंग्रजांचा राजकीय, व्यापारी व आर्थिक फायदा झाला.

शिंदे व भोसल्यांचा बंदोबस्त केल्यानंतर इंग्रजांनी यशवंतराव होळकरांकडे लक्ष केंद्रित केले. यशवंतरावाने जोधपुरकरांना अजमेर जिंकून दिल्यामुळे त्यांनी त्यास आर्थिक व लष्करी मदत केली. यशवंतरावाने आपला पुतण्या खंडेराव होळकर व कुटुंबातील स्त्रियांना जोधपूरला ठेवले. आता तो इंग्रजांशी लढण्यास मोकळा झाला. यशवंतरावाने उत्तर भारतात ठिकठिकाणी इंग्रजांना सळो की पळो करुन सोडले. पण एकाकी लढताना त्यांचा इंग्रजांच्या सामर्थ्यासमोर टिकाव लागला नाही.

इंग्रज अधिकारी कॅ लेकने, कर्नल मॉनस्न यास यशवंतरावावर लक्ष ठेवण्यास जयपूरजवळ ठेवले. यशवंतराव माळव्याला जाताना मॉनस्न त्याचा पाठलाग सुरु केला. दौलतराव शिंद्यांनी मॉनस्नला लष्करी मदत दिली होती. यशवंतराव होळकराने जुलै १८०४ मध्ये हल्ला करुन इंग्रज व शिंदे यांच्या सैन्याचा पराभव केला. ल्युकन यास पकडून नेले. तो पुढे होळकरांच्या छावणीतच मरण पावला. मुकुंदरा खिंडीत होळकराने मॉनस्नला नाकेनऊ

आणले. तो जीव वाचवत आग्र्याला पळून गेला. १ ऑक्टोबर १८०४ मध्ये इंग्रजांनी होळकराबरोबर युद्ध सुरु केले. यशवंतरावाने शिंदे, भोसले व मराठा सरदारांना मदतीस बोलविले. आधीच पराभूत व दुबळे झालेले शिंदे व भोसले होळकरांच्या मदतीस गेले नाहीत. इतर मराठा सरदार तटस्थ राहिले. इंग्रज सैन्याचे नेतृत्व त्यावेळी जनरल लेक हा करत होता. लेकने मथुरेवर हल्ला करताच यशवंतरावाने त्याच्या प्रतिकारासाठी काही सैन्य ठेऊन मुख्य सैन्यानिशी इंग्रजांच्या ताब्यातील दिल्लीवर आक्रमण केले. त्याने दिल्लीच्या तटावर तोफांचा मारा करुन शहर जिंकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. जनरल लेक मथुरेवरुन दिल्लीकडे होळकरांवर हल्ला करण्यास निघाला. २६ ऑक्टोबर १८०४ रोजी कॅ बर्न हा अंमलदार दिल्लीवरुन सऱ्हाणपूरला मूळ नेमणूकीच्या जागी जाण्यास सैन्यासहित निघाला. यशवंतरावाने त्यास यमुनेपलीकडे शामली येथे २९ ऑक्टोबर १८०४ रोजी गाठले. लेक बर्नच्या मदतीस ३ नोव्हेंबर १८०४ रोजी शामली येथे पोहोचला. पण त्यापूर्वीच होळकर बर्नचा पराभव करून तेथून निसटला होता. यशवंतरावाने पेंढाऱ्यांच्या मदतीने इंग्रजांचा, लेकचा दारुगोळा खराब केला. १६ नोव्हेंबर १८०४ रोजी लेकने यशवंतरावावर फरुखाबादला असताना हल्ला केला. यशवंतरावाने तो यशस्वीपणे परतवला. तो कानपूरला इंग्रजी ठाणे जाळण्याच्या उद्देशाने निघाला. पण फितुरी झाल्याचे कळल्याने डीगच्या किल्ल्यात आश्रयास गेला. १ डिसेंबर १८०४ रोजी कॅ लेकने डीगच्या किल्ल्याला वेढा दिला. यशवंतरावाने दोन महिने इंग्रज सैन्याला त्रस्त केले होते. कॅ लेकने १० डिसेंबर १८०४ रोजी डीगच्या किल्ल्याला वेढा दिला. होळकरांनी तीव्र प्रतिकार करुनही १३ डिसेंबर १८०४ रोजी डीग किल्ला व शहर इंग्रजांच्या ताब्यात आले.

यशवंतराव तेथून भरतपूरला गेला. भरतपूरचा जाट राजा रणजितसिंग याने भरतपूरच्या बाहेरची जागा यशवंतरावाच्या सैन्यास ठरवून दिली. १९ डिसेंबर १८०४ रोजी लेकने भरतपुरवर आक्रमण केले. यशवंतरावाच्या सैन्याने गनिमी काव्याने त्याच्या सैन्याची हानी केली. यशवंतराव होळकराच्या मदतीला जाट सैन्य होते. भरतपूरची तटबंदी रुंद असून सभोवती खंदक होता. हा किल्ला जिंकण्यास अवघड होता. इंग्रजांनी जानेवरी व फेब्रुवारी महिन्यांमध्ये वारंवार आक्रमणे केली. जाटांच्या व होळकरांच्या सैन्याने ही आक्रमणे परतवून लावली. इंग्रजांचे या हल्ल्यांमध्ये खूप नूकसान झाले. होळकरांचा सरदार मीरखान हा होळकरांच्या मदतीस

आला होता. मीरखानाने चातुर्याने लष्करी हालचाली केल्यामुळे इंग्रज सैन्यास भरतपूरला नाकेनऊ आले. भरतपूरचा जाट व इंग्रज यांच्यामध्ये १० एप्रिल १८०५ रोजी तह झाला. दरम्यान शिंदे, होळकर यांच्यामध्ये ऐक्य झाले. दौलतरावाने काशीराव होळकर व यशवंतराव यांच्यातील मतभेद मिटवले. परंतु इंग्रजांनी शिंद्यांशी नवा तह केला. २२ नोव्हेंबर १८०५ रोजी नवा करार केला. या कराराला मुस्तफापुरचा तह म्हणतात. या तहाने शिंद्यांचे समाधान करुन त्यांना होळकरापासून दूर केले. सप्टेंबर १८०५ मध्ये यशवंतराव पंजाबमध्ये गेला. शीख व अफगाण यांच्या मदतीने इंग्रजविरोधी मोहीम तीव्र करण्याचा त्याचा विचार होता. गव्हर्नर जनरलने लेक यास होळकरांची समजुत घालून युद्ध संपवावे असा हुकूम केला. माल्कम याने मीरखान यांच्याकडे सलोखा करावा असा निरोप पाठवला होता. अखेर २४ डिसेंबर १८०५ रोजी होळकर व इंग्रज यांच्यामध्ये तह झाला.

१८०३ मध्ये पेशव्याची पुनर्स्थापना झाल्यानंतर सातारा, कराड, कोकण येथे प्रतिनिधीने केंद्र सत्तेविरुद्ध उठाव केला. या प्रदेशात हल्ले, जाळपोळ, लूट करुन अराजकता निर्माण केली. चिंतामणराव पटवर्धन यांनी प्रतिनिधींना मदत केली होती. पेशव्यांनी लष्करी कारवाई करुन या बंडाचा बंदोबस्त केला. यावेळी इंग्रजांनी तैनाती फौजेची मदत दुसऱ्या बाजीरावास केली नाही. पेशव्यांच्या अडचणी वाढाव्यात हाच हेतू यामागे होता.

पेशवेपदावर आल्यानंतर दुसऱ्या बाजीरावाने अनेक मराठा सरदारांची वतने काढून घेतली. त्यांचे अनेक पारंपारिक अधिकार नष्ट केले. त्यामुळे  हे सरदार पेशव्यांचे विरोधक बनले. विशेषतः पटवर्धन व पेशवे यांचे संबंध अधिक ताणले गेले. याचा प्रत्यय सावनूरच्या बंडावेळी आला. सावनूर प्रांताचा बंडखोर अब्दुल्लाखान पठाण यास आप्पासाहेब पटवर्धन यांनी पेशव्यांविरुद्ध मदत केली. सातारच्या दरबारातील प्रतिनिधी, सांगलीचे आप्पासाहेब पटवर्धन, निपाणीचे आप्पा देसाई व इतर अनेक जहागिरदार हे पेशव्यांचे विरोधक बनले. इंग्रजांना हा पेशवेविरोधी जहागिरदारांचा गट अस्तित्त्वात असणे फायद्याचे होते.

रेसिडंट एलफिस्टन याने पेशव्यांवर दबाव आणून व त्यास २० जुलै १८१२ रोजी पंढरपूरचा तह करण्यास भाग पाडले. हा तह घडवून आणून पेशवे व जहागिरदार यांच्यामध्ये ऐक्य निर्माण होऊन इंग्रजविरोधी आघाडी निर्माण न होण्याची काळजी एलफिस्टन याने घेतली.

पेशवे व इंग्रज यांच्यातील संबंध दिवसेंदिवस ताणले गेले. इंग्रजांनी तैनाती फौजेच्या खर्चाच्या निमित्ताने इंग्रजांनी पेशव्यांचा अधिकाधिक प्रदेश बळकावण्याचा प्रयत्न केला. मांडवी संस्थान, अहमदनगरचा किल्ला, बुंदेलखंड यावर इंग्रजांनी पेशव्यांना न जुमनता आपले वर्चस्व इंग्रजांनी निर्माण केले. पेशवे व निजाम, पेशवे व गायकवाड यांच्यामधील हिशेबाबाबत इंग्रजांनी हस्तक्षेप सुरु केले. पेशव्यांना निजामाकडील थकीत चौथाई वसूल करण्यास इंग्रजांनी अटकाव केला. तसेच बडोद्याचे गायकवाड यांच्या हिशोबाच्या निमित्ताने इंग्रजांशी सुरु झालेला संघर्ष पेशवाईच्या अस्ताबरोबरच संपला. इंग्रजांनी इ.स. १८०२ मध्ये गायकवाड यांच्यावर तैनाती फौज लादली होती. गंगाधरशास्त्री पटवर्धन या ब्रिटिश अनुकूल सरदाराचा प्रभाव गायकवाड यांच्या दरबारामध्ये होता. गंगाधरशास्त्री इंग्रजांना फायदेशीर असेच धोरण गायकवाडांच्या दरबारात राबवत असे. त्यामुळे आनंदराव गायकवाड, त्यांची पत्नी तक्ताबाई, दिवाण सिताराम हे गंगाधरशास्त्री यांचे विरोधक झाले होते.

पेशव्यांनी आता गंगाधरशास्त्री यासच फितूर केले. ११ जुलै १८१५ मध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने पेशवा दुसरा बाजीराव, पेशव्यांचा कारभारी त्रिंबकजी डेंगळे व गंगाधरशास्त्री हे पंढरपूरला गेले. २० जुलै १८१५ रोजी गंगाधरशास्त्री यांचा खून झाला.. एलफिस्टन याने गंगाधरशास्त्रीच्या खूनाचा आरोप पेशव्यांचे कारभारी त्रिंबकजी डेंगळे याच्यावर ठेवला. त्रिंबकजीस इंग्रजांच्या ताब्यात देण्यासाठी एलफिस्टनने पेशव्यांवर लष्करी दबाव आणला. पेशव्यांना फितुर झालेल्या गंगाधरशास्त्रीच्या मृत्यूने इंग्रजांना फायदा झाला होता. कोणतेही पुरावे नसताना इंग्रजांनी त्रिंबकजी डेंगळे यास या खुनाच्या निमित्ताने कैदेमध्ये टाकले.

पेशव्यांनी आता इंग्रजांविरोधी अंतिम युद्धाची तयारी जोरात सुरु केली. नव्याने लष्करभरती, किल्ल्यांवर रसद व शिबंदीची सिद्धता व मराठा सरदारांचे ऐक्य यावर पेशव्यांनी भर दिले. १२ सप्टेंबर १८१६ रोजी त्रिंबकजी डेंगळे ठाण्याच्या तुरुंगातून पळून जावून सैन्य भरती सुरु केली. पेशव्यांनी त्यास आर्थिक मदत दिली. इ.स. १८१७ मध्ये मिरज, सांगली, पुणे, वऱ्हाड, खानदेश या प्रदेशात पेशव्यांचे सरदार मोठ्या प्रमाणात लष्कर भरती करत होते. रायगड, वासोटा, सिंहगड, पुरंदर हे महत्त्वाचे किल्ले शिबंदी व रसद साठा करुन लढण्यास सज्ज करण्यात आले. पेशव्यांनी आपली संपत्ती विविध किल्ल्यांवर सुरक्षिततेसाठी पाठविली.

एलफिस्टनने त्रिंबकजी डेंगळेंना ताबडतोब इंग्रजांच्या ताब्यात देण्याचे आदेश पेशव्यांना दिला. या गोष्टीची हमी म्हणून ८ व ९ मे १८१७ रोजी इंग्रजांनी पेशव्यांवर अधिक जाचक नियंत्रण ठेवणारा व पेशव्यांचे इतर भारतीय राजे व मराठा सरदारांशी संबंध अधिकृतपणे नष्ट करणारा पुणे करार लादला. पुणे करारावर सह्या केल्यानंतर पेशवे आपल्या अनेक सहकाऱ्यांसहीत धर्मयात्रेचे निमित्त सांगून माहूली येथे आले. माहूली येथे पेशव्यांनी इंग्रजविरोधी युद्धतयारीला चांगलीच चालना दिली. पेशव्यांनी लष्करभरती बरोबरच पटवर्धन, रास्ते, शिंदे, भोसले या सरदारांना सामील करुन घेतले. बापू गोखले यास पेशव्यांचा सेनापती म्हणून नेमले. ५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकी येथे इंग्रज व मराठे यांच्यातील अखेरच्या संघर्षाची सुरुवात झाली. १६ नोव्हेंबर १८१७ रोजी येरवड्याच्या लढाईत मराठ्यांचा पराभव झाला. त्यानंतर इंग्रजांनी ताबडतोब पुण्याचा ताबा घेतला.

डिसेंबर १८१७ मध्ये दुसरा बाजीराव उत्तर कोकणच्या दिशेने निघाला. त्याने उत्तर कोकणात प्रवेश करु नये म्हणून इंग्रजांनी चांगला बंदोबस्त ठेवला होता.[३७०] पेशवा घाटापर्यंत आल्याचे पुरावे मिळतात. बापूराव कंबे या सरदाराने पेशव्यांच्या वतीने उत्तर कोकणातील कोथळीगड हा किल्ला जिंकला.[३७१] ३० डिसेंबर १८१७ मध्ये कॅप्टन ब्रुक्सने तो परत जिंकून घेतला.[३७२] दक्षिण कोकणमध्ये दुसऱ्या बाजीरावास आश्रय मिळू नये म्हणून इंग्रजांनी तेथील किल्ले एकापाठोपाठ एक जिंकले.

११ डिसेंबर १८१७ पुर्वीच इंग्रज आरमाराने सुवर्णदुर्ग येथे इंग्रजांनी आरमारी हल्ला केला होता.[३७३] सुवर्णदुर्गच्या अधिकाऱ्यांनी, बाळोबा बाबा विंचुरकरांनी पेशव्यांनी कोकणातील मामलेदारांना सुवर्णदुर्ग किल्ल्याला लष्करी मदत पाठविण्याच्या आज्ञा देणारी पत्रे पाठवावीत अशी विनंती केली.[३७४] अंजनवेलच्या खाडीत इंग्रजांचे आरमार पोहोचले होते.[३७५]

पेशव्यांनी बाळोबा बाबा व आन्याबा सुभेदार यांना आज्ञा केली की, कोकणातील किल्ले व महालांमधील सर्व रसद टाका ठिकाणी ठेवावी. कोकणात ज्या ठिकाणी गरज पडेल त्या ठिकाणी ही रसद पुरवावी.[३७६] तसेच सर्व प्रदेशाचा व किल्ल्यांचा योग्य बंदोबस्त ठेवावा. सुवर्णदुर्ग तालुक्यामध्ये सरंजाम व सैन्य कमी असेल तर रसाळगडवरुन ते पुरवावे असे पेशव्यांनी रसाळगडकर यांना सांगितले.[३७७] १७ डिसेंबर १८१७ पुर्वीच सुवर्णदुर्ग किल्ला इंग्रजांनी

जिंकला व रत्नागिरीमध्ये इंग्रजांनी वेढा दिला होता.[३७८] सुवर्णदुर्ग फितुरी झाल्यामुळे गेला अशी अफवा होती.[३७९] रसाळगड किल्ला हिंमतीने न डगमगता लढवावा, अशा सूचना दुसऱ्या बाजीरावाने दिल्या.[३८०] कोकणामध्ये कठीण प्रसंग आला असून चीजवस्तू ठेवण्यास वासोटा व रायगड हे दोन मजबूत किल्ले योग्य असल्याचा निर्वाळा या पत्रामध्ये देण्यात आला आहे.[३८१] सुवर्णदुर्गवरील आठशे अरब व मुस्लिम सैनिक न लढता इंग्रजांना शरण गेले.[३८२] लेफ्टनंट कर्नल केनेडी व इमलॅक यांनी सुवर्णदुर्ग व मालवण किल्ले जिंकले.[३८३] कॅ. प्रोथर याने रायगड किल्ला १० मे १८१८ रोजी जिंकला.[३८४] इमलॅकने साष्टी प्रांतातील पेशव्यांचा सर्व प्रदेश जिंकला. कॅ. केनेडीने सुवर्णदुर्ग भागातील सर्व किल्ले घेतल्यानंतर १७ मे १८१८ रोजी अंजनवेल जिंकला. पुण्यातून पळून गेलेल्या पेशव्यांचा पाठलाग इंग्रजांनी सुरु केला. पेशव्यांनी इंग्रजांना चकवत महाराष्ट्रात आठशे पन्नास मैल अंतर पार केले. सातारचे छ. पेशव्यांच्या विरोधात इंग्रजांना सामील झाले. २० फेब्रुवारी १८१८ रोजी आष्टी येथे सेनापती बापू गोखले मरण पावला. इंग्रजांनी सातारा ताब्यात घेतल्यानंतर छत्रपतींच्या नावे एक जाहीरनामा काढला. पेशव्यांच्या प्रभावातून छत्रपतींना सोडविण्यासाठी व त्यांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी इंग्रज प्रयत्नशील असल्याचे जाहीर करण्यात आले. या जाहिरनाम्यामुळे दुसऱ्या बाजीरावाचे पेशवा म्हणून असणारे छत्रपतींच्या राज्यातील स्थान व अधिकार नष्ट झाले. भोसले व होळकर यांचा एकेकट्यांना गाठून इंग्रजांनी पराभव केला होता. गायकवाड व शिंदे इंग्रजांच्या आक्रमणाच्या भितीने तटस्थ राहिले. पेशव्यांच्या सैन्याचा वारंवार होणारा पराभव व एलफिस्टनचे धमकीवजा आवाहन यामुळे अनेक मराठा सरदार पेशव्यांची साथ सोडून आपापल्या जहागिरीत परत आले. पटवर्धन, पंत सचिव, येसाजीपंत गोखले, पंत अमात्य, माधवराव रास्ते हे सर्व सरदार आपापल्या सैन्यासह परत गेले. भीमा कोरेगाव, सिवनी येथील पराभवानंतर दुसऱ्या बाजीरावास जिंकण्याची आशा उरली नाही. दुसरा बाजीराव अशीरगडावर गेला. शेवटी इंग्रज व दुसरा बाजीराव यांच्यामध्ये तहाची बोलणी सुरु झाली. २ जून १८१८ रोजी रवैरी येथे इंग्रज प्रतिनिधी माल्कम व दुसरा बाजीराव यांची भेट झाली. पेशव्यांनी सर्व अधिकार सोडले. वार्षिक आठ लाख रु. निवृत्तीवेतन घेऊन पेशव्यांनी गव्हर्नर जनरलच्या संमतीने बनारसच्या प्रदेशामध्ये रहावे. इंग्रजांनी पेशव्यांच्या अनुयायांबाबत सहानुभूतीचे धोरण स्विकारावे, असे या तहाने ठरले.

शिवाजी महाराजांनी सुवर्णदुर्ग किल्ला इ.स. १६६३ मध्ये बांधला. आरमाराचा विकास करत असतानाच एका बाजूला सुवर्णदुर्गसारखा आरमारी किल्ला शिवाजी महाराजांनी उभारला. दक्षिण कोकण जिंकल्यानंतर जलदुर्गासाठी हर्णे बंदरातील ह्या बेटावर त्यांचे लक्ष गेले. त्याचे महत्त्व जाणून त्यांनी सुवर्णदुर्गसारखे मजबूत आरमारी किल्ला उभारला. सुवर्णदुर्गास शह देण्यासाठी सिद्दीने कनकदुर्ग व फत्तेदुर्ग हे किल्ले बांधले. कान्होजी आंग्रेने सिद्दीस शह देण्यासाठी गोवा हा किल्ला बांधला. पुढे सरखेल कान्होजी आंग्र्यांचे वर्चस्व या सर्व किल्ल्यांवर निर्माण झाले. छ. शाहूंनी कान्होजी आंग्रेशी केलेल्या करारामध्ये सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग, कनकदुर्ग व गोवा हे किल्ले कान्होजी आंग्रे यांना दिले. तेव्हापासून ते तुळोजी आंग्रेचा पाडाव होईपर्यंत हे सर्व किल्ले आंग्रे घराण्याच्या ताब्यातच होते. आंग्रे घराण्यातील सर्व प्रमुख सरदारांनी वेळोवेळी या किल्ल्यांची दुरुस्ती केली.

## निष्कर्ष –

सुवर्णदुर्ग येथे किल्लेदार म्हणून काम करणाऱ्या कान्होजी आंग्रे, बकाजी नाईक महाडिक, मोरो बापूजी यांनी विविध मोहिमांमध्ये जमिनीवरील लढाईत तसेच आरमारी युद्धामध्ये पराक्रम गाजविला होता. आरमारी युद्धासाठी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नदुर्ग, जयगड, सुवर्णदुर्ग, बाणकोट, कुलाबा (अलिबाग), उंदेरी अशी आरमारी किल्ल्यांची साखळी स्वराज्यामध्ये निर्माण झाली. हे सर्व किल्ले एकमेकांना सहाय्यक होते. सिद्दीच्या जंजिऱ्यास व आरमारास शह देण्यासाठी बाणकोट व सुवर्णदुर्ग हे जलदुर्ग खुप उपयोगी पडले. आरमारी जहाजांना आश्रय, दुरुस्ती व दारुगोळा पुरविण्यासाठी सुवर्णदुर्ग किल्ला उपयोगी पडत होता. सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणासाठी सहाय्यक म्हणून कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचा उपयोग महत्त्वपूर्ण होता. सिद्दी व मराठे, मराठे व इंग्रज यांच्या संघर्षामध्ये सुवर्णदुर्ग किल्ला व तेथील आरमार केंद्रस्थानी राहिले.

रायगड ही स्वराज्याची राजधानी व नंतर महत्त्वाचा किल्ला, प्रतापगड तसेच सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, कुलाबा, उंदेरी या किल्ल्यांना सहाय्यक म्हणून सुवर्णदुर्ग व बाणकोट हे किल्ले उपयुक्त ठरले. खेड तालुक्यातील पालगड, रसाळगड, सुमारगड, महिपतगड, गुहागर तालुक्यातील गोपाळगड, मंडणगड तालुक्यातील मंडणगड, बाणकोट यांच्यापासून विशिष्ट

स्थानावर सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा हे किल्ले मध्ययुगामध्ये लष्करी डावपेचात्मकदृष्ट्या महत्त्वाचे होते. सुवर्णदुर्ग हे लष्करी केंद्राबरोबरच महत्त्वाचे राजकीय व प्रशासकीय केंद्र होते. या किल्ल्यांचा उपयोग कैदी ठेवण्यासाठी सुद्धा केला जात होता. तोतयाच्या बंडावेळी व इंग्रजांशी होणाऱ्या अंतिम संघर्षात सुवर्णदुर्ग किल्ल्याचे किल्लेदार फितुर झाले. इ.स. १७५६ मध्ये बाणकोट इंग्रजांच्या ताब्यात गेल्यानंतर तेथील इंग्रजांना शह देण्यासाठी सुवर्णदुर्ग किल्ला उपयुक्त ठरला. शिवकाळापासून पश्चिम किनाऱ्यावरील आरमारी वर्चस्वाच्या संघर्षामध्ये सुवर्णदुर्ग किल्ल्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

## संदर्भ


१) Sardesai G.S.(Edt.), Shivaji Souvenir, Bharat Itihas Sanshodhan Mandal, Pune(Marathi), 1927, P.66-90

२) Gazetteer of the Bombay Presidency, (Ratnagiri & Sawantvadi Districs), Vol X, Gazetteer Dept. Bombay, 1880, P. 758

३) जोशी सचिन, रत्नागिरी जिल्ह्याची दुर्गजिज्ञासा, बुकमार्क पब्लिकेशन, पुणे, २०११, पृ. १५

४) कित्ता, पृ. १७

५) कित्ता, पृ. २७

६) कित्ता, पृ. ५०

७) तत्रैव

८) हेरवाडकर र.वि.(संपा.), श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस विरचित), व्हीनस प्रकाशन पुणे, दु.आ. २००६, पृ. ८८.

९) Apte B.K., A History of the Merchant Nevy & Merchentship, Stte Board For Literature & Culture, Govt. Of Maharashtra, 1973, P. 71.

१०) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, तुकाराम जावजी(निर्णयसागर), मुंबई, पृ. ११

११) मेहंदळे ग.भा., शिंत्रे सं.प्र. शिवछत्रपतींचे आरमार, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०१०, पृ. ६७.

१२) Gazetteer of Bombay, Presidency, Vol X, P. 759

* गोगटे चिंतामण गणेश, महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग २, प.आ., इंदिरा, १९०७, पृ. ८३

१३) Bal Krishna, Shivaji the Great, Vol, I, Part II, Taraporewala & Sons, Bombay, 1932, P. 117-118.

१४) राजवाडे वि.का. आणि भट भा.वा.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड–२१, शिवकालीन घराणी, शं. श्री. देव, धुळे, १९१८, लेखांक ४१, पृ. ७०.

१५) Apte B.K., Op. Cit., P. 74

१६) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे शकावली, बॉम्बे १९३९, पृ.३
१७) साने का.ना. (संपा.), मल्हार रामराव चिटणीसकृत थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, काव्येतिहास संग्रह ६, भारत इतिहास संशोथन मंडळ, पुणे, १८८२, पृ. ३८
* ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ३.
१८) Apte B.K., Loc Cit.
१९) तत्रैव
२०) तत्रैव
२१) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड– ८, श्रीमंत गगनबावडेकर पंत अमात्य यांच्या दफ्तरातील लेख, विजापुरकर विष्णू गोविंद, कोल्हापूर, १९०३, पत्रांक २२, पृ. १८,१९
२२) खोबरेकर वि.गो., कोकणचा राजकीय इतिहास, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, पृ. ४६.
२३) तत्रैव
२४) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह., मराठ्यांचा इतिहास, खंड १, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पुनर्मुद्रण, २००६, पृ. १६०
२५) मेहेंदळे गजानन भास्कर, शिंत्रे संतोष प्र., शिवछत्रपतींचे आरमार, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०१०, पृ. ४१
२६) Kelkar N.C., Kale D.V(Edt.), English Record on Shivaji, Vol.2, Shivcharitra Karyalaya, Pune, 1931, Letter No.509, P.313.
* जोशी शं.ना., संभाजीकालीन पत्रसार संग्रह, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४९, पृ. १०२
२७) Sardesai G.S., New History of the Marathas, Vol I, Phoenex Publications, Bombay, 1948, P. 295,
* Sarkar J.N., House of Shivaji, 3rd ed., Calcutta, 1955, P. 180-184
२८) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. ७३
२९) पवार आप्पासाहेब(संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड १, शिवाजी विद्यापीठ, १९६९, पत्रांक ३२२, पृ. ४७०

३०) तत्रैव

३१) पगडी सेतुमाधवराव(संपा.), मराठे व औरंगजेब (मासिरे आलमगिरी), ज्ञानराज प्रकाशित, पुणे, १९६३, पृ. २१

३२) खरे ग.ह.(संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, (औरंगजेबाच्या दरबाराची बातमीपत्रे), भारत इतिहास संशोधन मंडळ (स्वीय ग्रंथमाला क्र. १०६), पुणे, १९७३, पत्रांक २६२, पृ. १४९

३३) कित्ता, पत्रांक २६३, पृ. १४९

३४) कित्ता, पत्रांक २६६, पृ. १५१

३५) कित्ता, पत्रांक २७०, पृ. १५३

३६) कित्ता, पत्रांक २७४, पृ. १५६

३७) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. ७५

३८) तत्रैव

३९) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव विरचित श्रीमंत छ. संभाजी महाराज यांचे चरित्र (संभाजी बखर), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९१५, तृतीय आवृत्ती, पृ. १७

४०) खरे ग.ह.(संपा.), ऐतिहासिक फार्सी साहित्य, खंड ६, कलम–३०९, पृ. १७८

४१) Mawjee Purshotam Vishram, Parasnis D.B., Kaifiyats, Yadis, & C., Mawjec P.V., Bombay, 1908, P. 2

४२) Ibid, P. 3

४३) पारसनीस द.बा., मराठ्यांचे आरमार, पृ. ३२

४४) Mawjee Purshotam Vishram, Op.Cit., P. 2

४५) Loc.Cit.

४६) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., शिवचरित्र प्रदीप, जेधे शकावली, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९, पृ. ३४

४७) तत्रैव.

४८) पवार जयसिंगराव भाऊसाहेब(संपा.), छ. संभाजी स्मारक ग्रंथ, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २००९, पृ. ८१

४९) कित्ता, पृ. ८२

५०) बेंद्रे वा.सी., श्री छ. संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, द्वि. आ., मुंबई १९७१, पृ. ४७७

५१) आपटे द.वि.(संपा.), दिवेकर स.म., उपरोक्त, पृ. ३५

५२) साने का. ना.(संपा.), मल्हार रामराव चिटणीसकृत थोरले शाहू महाराज यांचे चरित्र उपरोक्त, पृ. ३८

५३) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ३७५

५४) कित्ता, पृ. ३८२

५५) Mawjee Purshotam Vishram, Parasnis D.B., Op.Cit., P. 5

५६) गोगटे चिं.ग., उपरोक्त, पृ. ८६,८७

५७) जोशी पु.म.(संपा.), आवळसकर शां.वि., ऐतिहासिक साधने, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९६३, ले. ४४, पृ. ५९

५८) तत्रैव.

५९) तत्रैव.

६०) तत्रैव.

६१) केळकर य.न.(संपा.), ऐतिहासिक पोवाडे, खंड २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२८, पृ. २३९

६२) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ४.

६३) Sen S.N., Early career of kanhoji Angrea & Other Papers, Unty of Calcutta, Calcutta, 1941, P.6

६४) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ६

६५) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड २, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९, पृ. २३७

६६) सबनीस केशव गोविंद(संपा.), पंत अमात्य बावडा दफ्तर, खंड १, सबनीस के.जी., सेक्रेटरी जनरल बावडा, कोल्हापूर, १९३७, पृ. ९६

६७) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा.), शिवचरित्र प्रदीप, (शिवापूरकर देशपांडे वहीतील शकावली), पृ. ६७

६८) Sarkar J. N., History of Aurangzib, Vol V, Culcutta, 1972, P. 111

६९) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड १, पृ. ४५०

७०) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ४

७१) तत्रैव.

७२) तत्रैव.

७३) तत्रैव.

७४) कित्ता, पृ. ३८४

७५) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पेशव्यांची शकावली, विष्णू गोविंद विजापूरकर, कोल्हापूर, १९००, पृ. २५.

७६) आवळसकर शांताराम विष्णू, आंगरेकालीन अष्टागर (अधिकारी शकावली) भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४७, कलम २०, पृ. ४

७७) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९

७८) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पृ. २४,२५

७९) भोसले बी.के.(संपा.), जंजिरा संस्थानचा इतिहास, पृ. ६५

८०) गुजर मा.वि.(संपा.), करवीर छ. घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड २, गुजर मा.वि., पुणे, १९६२, पत्रांक २०, शाहू दफ्तर रुमाल नं. ३३, पृ. ३७

८१) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १५

८२) कित्ता, पृ. १७,

* सरदेसाई गो.स.( संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १७, शाहू आणि बाजीराव(राज्यकारभार), मुंबई सरकार, मुंबई, १९३१, पत्रांक ६, पृ. ५

८३) सरदेसाई गो.स., कुलकर्णी कृ.पा. (संपा.), काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, सदाशिव रामचंद्र सरदेसाई, पुणे, १९३३, पत्रांक १०, पृ.११

८४) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. २०

८५) कित्ता, पृ. २१

८६) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ४२,

* पारसनीस द.बा., धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार बाबाजी सखाराम आणि कंपनी निर्णयसागर, मुंबई, १९०९, पृ. ४४

८७) बेंद्रे वा. सि.(संपा.), महाराष्ट्रेतिहासाची साधने, खंड २, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६६, पत्रांक ३७७, पृ. ४१९.

८८) पारसनीस द.ब., धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पृ. ४२

८९) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव कृत थोरले शाहू महाराजांचे चरित्र, पृ. ६८

९०) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पृ. ६८

९१) पुरंदरे कृ.वा.(संपा.), पुरंदरे दफ्तर, भाग १, लेखांक १००, पृ. ६९,७०,
ढबू दा. गो., उपरोक्त,पृ. ३७

९२) पारसनीस द.ब.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, छ. शाहू यांची रोजनिशी, सहस्त्रकर, सातारा, कलम २४७, पृ. १२७, १२९

९३) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, जंजिऱ्याची मोहिम(पुरवणी), मुंबई सरकार, मुंबई, १९३३, पत्रांक १२, पृ. ९

९४) तत्रैव.

९५) तत्रैव.

९६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३, जंजिऱ्याच्या सिद्दीवर शाहूची मोहिम, मुंबई सरकार, मुंबई, १९३०, पत्रांक २०, पृ. १७

९७) कित्ता, पत्रांक ५७,६२, पृ. ४७,५१.

९८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३, पत्रांक ३०, पृ. २८.

९९) कित्ता, पत्रांक ६२, ६९, पृ. ५१,५८

१००) कित्ता, पत्रांक १५,१९,६२, ६९ पृ. ११,१६, ५१, ५८

१०१) कित्ता, खंड ३३, पत्रांक ६२,६९, पृ. ५१,५८

१०२) कित्ता, पत्रांक ८६,९०, पृ. ७०,७३

१०३) कित्ता, पत्रांक ६८, पृ. ६०

१०४) तत्रैव.

१०५) तत्रैव

१०६) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पेशव्यांची शकावली, पृ. ७१

१०७) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ५४

सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३३, पत्रांक २९, पृ. २३

१०८).राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पृ. ६९

१०९) डबीर ना.सं.(संपा.), इतिहास संग्रह, आंगरे यांची हकीकत, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९०९, पृ. ६

११०) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पेशव्यांची शकावली, पृ ६०

१११) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३३, पत्रांक १८४,१८९, पृ. १५५,१५८,१५९.

११२) कित्ता, पत्रांक ५८,५९, पृ. ४९,५०.

११३) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३, पत्रांक ९३, पृ. ७६

११४) कित्ता, पत्रांक ९६, पृ. ७८.

११५) तत्रैव.

११६) तत्रैव.

११७) कित्ता, पत्रांक ८६, पृ. ७०.

११८) कित्ता, पत्रांक ९०, पृ. ७३.

११९) कित्ता, पत्रांक १२१, पृ. १०५

१२०) कित्ता, पत्रांक १८२, पृ. १५३

१२१) साने का.ना.(संपा.), काव्येतिहास संग्रह, ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे, साने का.ना., १८८९, प्र.आ., पत्रांक २३, पृ. ४६

१२२) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३३, पत्रांक ३३६, पृ. २९२

१२३) तत्रैव.

१२४) कित्ता, पत्रांक १६२, पृ. १३४

१२५) तत्रैव.

१२६) तत्रैव.

१२७) तत्रैव.

१२८) पारसनीस द. ब., धावडशी येथील श्री. ब्रह्मेंद्र स्वामी उर्फ भार्गवबाबा उर्फ यांचे चरित्र व पत्रव्यवहार, पृ. ६८.

१२९) कित्ता, पृ. ६९.

१३०) तत्रैव.

१३१) कित्ता, पत्रांक ७१, लेखांक ३१४, ३१८, पृ. २९२, २९५.

१३२) कित्ता, पृ. ७१.

१३३) कित्ता, लेखांक २५४, पृ. २४४.

१३४) कित्ता, पत्रांक ३१४, पृ. २९२.

१३५) तत्रैव.

१३६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३, पत्रांक १७७, पृ. १४५

१३७) कित्ता, पत्रांक १७९, १८१, १८२, १८४, १९२, पृ. १४६–१५२, १५८.

* कित्ता, खंड ३३, पत्रांक ४०९, पृ. ३४४,

* बडोदे राज्य दफ्तरातील ऐतिहासिक वचने पुस्तक, १ ले (बदोडा दफ्तर) (१७२४ ते १७६८), बडोदे संस्थान रेकॉर्डस, बडोदे, १९३४, लेखांक १९, २०, पृ. १७

* बांग्रास ए.बी.द.(संपा.), अनु. देसाई स.श., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड ३ (आशिया विभाग), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ १९६८, पत्रांक २०६, पृ. ३८९

१३८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३, पत्रांक १८२, पृ. १४९

१३९) पिसुर्लेकर पांडुरंग स.(संपा.), अनुवाद देसाई स.शं., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई १९८४, पृ. २५२

१४०) बांग्रास ए.बी.द.(संपा.), अनुवाद, देसाई स.शं., उपरोक्त,कलम १७८, पृ. २२२,२२३

१४१) कित्ता, कलम १५२, पृ. २७४

१४२) तत्रैव

१४३) कित्ता, कलम १५२,१५३, पृ. ३५७,३५८

१४४) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड १६, मुंबई सरकार, मुंबई, १९३१, पत्रांक २८, पृ. १९.

१४५) सरदेसाई गो.स. (संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३४, वसईची मोहिम(पुरवणी), मुंबई सरकार, मुंबई, १९३३, पत्रांक ९, पृ. ७

१४६) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६, पत्र यादी वगैरे, विष्णू गोविंद विजापूरकर, कोल्हापूर, १९०५, पृ. ४१६.

१४७) ढबू दा.गो.(संपा.), उपरोक्त, पृ. ९३

१४८) कित्ता, पृ. ९४

* Parasnis D.B.( Edt.), Op. Cit., P. 6

१४९) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद,खंड २४, पश्चिम किनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली, पत्रांक ४,५, पृ. ३,४

१५०) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९५

१५१) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, खंड ४, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०, पृ. १०३

१५२) वैद्य शंकर लक्ष्मण, वैद्य दफ्तर, खंड ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४९, (१७४२), पत्रांक १९, पृ. १५

१५३) वैद्य शंकर लक्ष्मण, वैद्य दफ्तर, खंड ४, पुणे, १९४९, (१७४३), पत्रांक १०,११, पृ. ९,१०,११

१५४) कित्ता, प्रस्तावना, पृ. १९

१५५) कित्ता, पत्रांक ८, पृ. ८,९

१५६) तत्रैव.

१५७) कित्ता, पत्रांक २४,२८, पृ. २५,२६,२९

१५८) तत्रैव.

१५९) कित्ता, पत्रांक २४, पृ. २५,२६

१६०) कित्ता, (१९४५) पत्रांक १७, पृ. १६

१६१) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, मुंबई सरकार, मुंबई, १९३२, पत्रांक १०, पृ. ७,८.

१६२) कित्ता, पत्रांक ८, पृ.६.

१६३) तत्रैव.

१६४) कित्ता, पत्रांक ९, पृ.७

१६५) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक २०, पृष्ठ. १९.

* ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०२

१६६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक २०, पृष्ठ. १९.

१६७) कित्ता, पत्रांक ५३, पृ. ५४

१६८) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८, पत्रांक १५४, पृ. १७८,१७९

१६९) कित्ता, पत्रांक ५४, पृ. ५५

१७०) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ९५

१७१) कित्ता, पृ. १०३.

१७२) तत्रैव.

१७३) कित्ता, पृ. १०५

१७४) कित्ता, पृ. ९९

१७५) तत्रैव

१७६) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ४, (१७४५), पत्रांक १८, ३५, पृ. १७ व ३४

१७७) पारसनीस द. ब.(संपा.), छ. शाहू यांची रोजनिशी, कमल २४०, पृ. ११८.

१७८) तत्रैव

१७९) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ५, १७५४, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५१, पत्रांक १७, पृ. १८–१९.

१८०) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक ६९, ७०, पृ. ६८,६९

१८१) कित्ता, पत्रांक ७२, पृ. ७१,७२

१८२) तत्रैव.

१८३) तत्रैव

१८४) पिसुर्लेकर पांडूरंग स., अनुवाद. देसाई स.श., उपरोक्त, पत्रांक १२, पृ. १४८, १४९

१८५) कित्ता, पत्रांक १३, पृ. १४९,१५०.

१८६) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०६.

१८७) तत्रैव.

१८८) Shrivastavya B.K., Angreys of Kolaba in British Records (1719 A.D. to 1884 A.D.), 1950, P. 132-133

१८९) Loc. Cit.

१९०) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक १२४, पृ. १२१

१९१) तत्रैव.

१९२) Shrivastavya B.K., Op. Cit., P. 135.

१९३) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे शकावली, पृ. १०७

१९४) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ५, (१७५४), पत्रांक, पृ. १८,१९

१९५) कित्ता, पत्रांक १३७, पृ. १३४

१९६) तत्रैव.

१९७) तत्रैव.

१९८) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक २२३, पृ. २२४.

१९९) तत्रैव.

२००) पारसनीस द. ब.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांची रोजनिशी, भाग १, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०७, कलम, ३२१, पृ. १९८

२०१) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक १२५, पृ. १२२.

२०२) तत्रैव.

२०३) तत्रैव.

२०४) तत्रैव.

२०५) तत्रैव.

२०६) तत्रैव.

२०७) तत्रैव.

२०८) तत्रैव.

२०९) कित्ता, पत्रांक १२६, पृ. १२३.

२१०) Shrivastavya B.K., Op. cit, P. 137

* सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक १२५, पृ. १२२,१२३

२११) फाळके आनंदराव भाऊ(संपा.), शिंदेशाही इतिहासाची साधने, भाग ३, (कोटेकर व दाभोळकर संग्रह), ग्वाल्हेर, १९३७, पत्रांक १६२, ३०६, पृ. १३४, २४७

२१२) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तर, खंड ५, पत्रांक १२, पृ. ८,९.

२१३) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. १०७

२१४) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक ११६, ११९, पृ. ११४,११७.

२१५) कित्ता, पत्रांक ११६, पृ. ११४.

२१६) कित्ता, पत्रांक १५३,१५४,१५५, पृ. १५०-१५२.

२१७) कित्ता, पत्रांक १५६, पृ. १५२.

२१८) Shrivastavya B.K., Op. Cit., P. 141,142.

⁕ सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक १६०,१६२, १६३, १६४, पृ. १५६–१६१.

२१९) ढबू दा.गो., उपरोक्त, पृ. ११४.

२२०) Shrivastavya B.K., Op. Cit. P.141,142

२२१) Shrivastavya B.K., Loc. cit.

२२२) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड २४, पत्रांक १७४, पृ. १७२,१७३

२२३) Shrivastavya B.K., Op., cit, P. 146

२२४) Ibid, P. 147

२२५) Ibid, P. 148

२२६) Loc. Cit.

२२७) Ibid, P. 149

२२८) Shrivastavya B.K., Op., cit, P. 146,

⁕ पारसनीस द. ब.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांची रोजनिशी, भाग २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, कलम ८५, पृ. ६२.

२२९) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ४५,मराठेशाहीचा कारभार, मुंबई सरकार, मुंबई, १९३४, पत्रांक २५, पृ. ९६

२३०) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६, कोल्हापूर, १९०५, पृ. ४१६

२३१) साने का.ना.(संपा.), काव्येतिहास संग्रह, ऐतिहासिक पत्रे यादी वगैरे, साने का.ना., प्र.आ., १८८९, पत्रांक ३५, पृ. ५५

⁕ पारसनीस द.ब.(संपा.), धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर चरित्र व पत्र व्यवहार, पत्रांक ५६, पृ. ८५,८८

२३२) तत्रैव

२३३) पोतदार द.वा.(संपा.), मुजुमदार गं.ना., ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ,पुणे, १९४१, पत्रांक १९४, पृ. १८५

२३४) जोशी बापू पुरषोत्तम(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणे, १९११, कलम ४८१, पृ. ९२

२३५) साने का.ना.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, भाग १, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणे, १९११, कलम २५, पृ. २२

२३६) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १९, पेशवे माथवराव यांचा रघुनाथरावास विरोध, मुंबई सरकार, मुंबई, १९३१ पत्रांक ४५, पृ. ४८.

२३७) साने का.ना.(संपा.), थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड १, कलम ४६, पृ. ३९

२३८) कित्ता, कलम ४७, पृ. ३९

२३९) कित्ता, कलम २३३, पृ. २२०

२४०) तत्रैव.

२४१) तत्रैव.

२४२) कित्ता, कलम ६२४, पृ. २२१

२४३) तत्रैव

२४४) कित्ता, कलम ४१७ (जमिनीची पाहणी व जमाबंदी) पृ. ५

२४५) कित्ता, कलम ५९८, पृ. २००

२४६) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेख संग्रह, ४, वासुदेव वामन खरे, कोल्हापूर, १९०१, पत्रांक ११९९, पृ. १९१६.

* ढबू दा. गो., उपरोक्त, पृ. १२७.

२४७) सरदेसाई गो.स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३५, इंग्रजांचा साष्टीवर हल्ला, मुंबई सरकार, मुंबई, १९३४, पत्रांक ५४, पृ. ४६

२४८) तत्रैव.

२४९) कित्ता, पत्रांक ५६, पृ. ४७.

२५० कित्ता, पत्रांक १११, पृ. ९२, ९३.

२५१).मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, सवाई माधवराव पेशवे रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०९, कलम ४४०, पृष्ठ १७.

२५२) सरदेसाई गो. स. (संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३५, पत्रांक १२३, पृ. १०१

२५३) कित्ता, पत्रांक ४४१, पृ. १७.

२५४) तत्रैव.

२५५) कित्ता, पत्रांक ४४२, पृ. १८.

२५६) कित्ता, पत्रांक ४४३, पृ. १८.

२५७) कित्ता, पत्रांक ४४८, पृ. २२

२५८) राजवाडे वि.का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १२, रघुनाथ बाजीराव व बाजीराव रघुनाथ यांची अस्सल पत्रे, खंडेराव चिंतामण मेहंदळे, पुणे, १९१२, लेखांक १८२, पृ. १२३, १२४.

२५९) तत्रैव.

२६०) तत्रैव.

२६१) तत्रैव.

२६२) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे रोजनिशी, खंड २, कलम ४५४, पृ. २६.

२६३) तत्रैव.

२६४) तत्रैव.

२६५) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३५, पत्रांक ४, पृ. ४

२६६) कित्ता, पत्रांक ६, पृ. ५

२६७) तत्रैव.

२६८) कित्ता, पत्रांक १४, पृ. १०

२६९) तत्रैव.

२७०) कित्ता, पत्रांक १७, पृ. १२

२७१) तत्रैव.

२७२) कित्ता, पत्रांक १६, पृ. १२.

२७३) कित्ता, पत्रांक १८, पृ. १३.

२७४) तत्रैव.

२७५) तत्रैव.

२७६) तत्रैव.

२७७) कित्ता, पत्रांक २९, पृ. २२.

२७८) कित्ता, पत्रांक २९–३०, पृ. २२,३३.

२७९) कित्ता, पत्रांक २९, पृ. २२)

२८०) तत्रैव

२८१) कित्ता, पत्रांक ३१, पृ. २३.

२८२) तत्रैव.

२८३) कित्ता, पत्रांक ३६, पृ. २८

२८४) तत्रैव

२८५) कित्ता, पत्रांक ४२, पृ. ३६.

२८६) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३५, मुंबई सरकार, मुंबई, १७३४, पत्रांक ४२, पृ. ३६

राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १०, वासुदेव गोविंद आवटे, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, पुणे, १९०९, पत्रांक १५७, पृ. १०२.

२८७) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३५, पत्रांक ४२, पृ. ४२

२८८) तत्रैव.

२८९) भारत इतिहास संशोधन मंडळाचा अहवाल व इतिवृत्त, शके १८३३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९११, पत्रांक २, पृ. ११८.

२९०) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ३५, पत्रांक ४५, पृ. २८.

२९१) तत्रैव, पृ. ३८.

२९२) कित्ता, पत्रांक ५४, पृ. ४६.

२९३) तत्रैव.

२९४) तत्रैव.

२९५) तत्रैव.

२९६) तत्रैव.

२९७) तत्रैव.

२९८) कित्ता, पत्रांक ८७, पृ. ७४.

२९९) कित्ता, पत्रांक ८८, पृ. ७४–७५.

३००) कित्ता, पत्रांक ५७, ५९, पृ. ४८–४९.

३०१) कित्ता, पत्रांक ५८, पृ. ४९.

३०२) कित्ता, पत्रांक ८९, पृ. ७५.

३०३) तत्रैव.

३०४) कित्ता, पत्रांक ४८, पृ. ४१.

३०५) कित्ता, पत्रांक १०६, पृ. ८९.

३०६) तत्रैव.

३०७) तत्रैव.

३०८) तत्रैव.

३०९) कित्ता, पत्रांक १५९–१६०, पृ.१२९–१३०.

३१०) कित्ता, पत्रांक १८४, पृ. १५६.

३११) तत्रैव.

३१२) कित्ता, पत्रांक २०४, पृ. १७२.

३१३) तत्रैव.

३१४) तत्रैव.

३१५) तत्रैव.

३१६) तत्रैव.

३१७) तत्रैव.

३१८) तत्रैव.

३१९) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड– १०, पत्रांक १६०, पृ. १०४.

३२०) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ५, वासुदेव वामन खरे, मिरज, १९०८, पत्रांक १५२१, पृ. २४०१, २४०२

३२१) कित्ता, पृ. २४६४.

३२२) कित्ता, पत्रांक १८५१, १८५२, पृ. २६२२,२६२३.

३२३) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ६, वासुदेव वामन खरे, पुणे, १९१०, कलम १८७१, १८८२, पृ. २६४९,२६६०.

३२४) कित्ता, कलम १८८१, पृ. २३५८.

३२५) कित्ता, कलम १९०७, पृ. २६९४.

३२६) तत्रैव.

३२७) कित्ता, कलम १९१४, पृ. २७०१

३२८) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, कलम ६०५, पृ. १२१.

३२९) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, भाग ६, कलम १९१४, पृ. २७०१.

३३०) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड १, कलम ३३६, पृ. १२१.

३३१) तत्रैव.

३३२) तत्रैव.

३३३) तत्रैव.

३३४) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तर, खंड ४५, पत्रांक ४५, पृ. १२८.

३३५) सरदेसाई गो. स.(संपा.), कुलकर्णी कृ. पा., काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, पत्रांक १९५, पृ. १६२.

३३६) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे रोजनिशी, खंड १, कलम ६१, पृ. ४९–५०.

३३७) तत्रैव.

३३८) तत्रैव.

३३९) तत्रैव.

३४०) कित्ता, कलम २२८, पृ. १९७.

३४१) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, पत्रांक ४८६, पृ. ४५,४६

३४२) सरदेसाई गो. स. (संपा.), कुलकर्णी कृ.पां, काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, १९३३, पत्रांक १९५–१९६, पृ. १६२–१६३.)

३४३) कित्ता, पत्रांक १९६, पृ. १६३.

३४४) कित्ता, पत्रांक १९७, पृ. १६३.

३४५) तत्रैव.

३४६) जोशी बापू पुरुषोत्तम(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, दुसरे बाजीराव पेशवे रोजनिशी, सवाई माधवराव पेशवे रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८, कलम ८४, पृ. ९८,९९

३४७) तत्रैव.

३४८) तत्रैव.

३४९) कित्ता, कलम ११२, पृ. ११५.

३५०) खरे ग.ह., जोशी श.ना.(संपा.), ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड १०, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५६, पत्रांक २१, पृ. २८.

३५१) Gazzetteer Of Bombay Presidency, Vol. X, P. 759.

३५२) Loc Cit.

३५३) खरे ग.ह., जोशी श.ना.(संपा.), ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड १०, पत्रांक ३१, पृ. ३७–३८.

३५४) तत्रैव.

३५५) तत्रैव.

३५६) तत्रैव.

३५७) तत्रैव.

३५८) गुजर मा.वि.(संपा.), करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड ३, मा.वि.गुजर, कोल्हापूर, १९६२, लेखांक ३१०, पृ. २४६.

३५९) तत्रैव.

३६०) कित्ता, लेखांक ३०८, ३०९, पृ. २४५.

३६१) तत्रैव.

३६२) Gazetteer of Bombay Presidency, Vol.X,, P. 759

३६३) खरे ग. ह., जोशी शं. ना. (संपा.), ऐतिहासिक मराठी साधने, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९८३, लेखांक ३४, पृ. ५०.

३६४) खरे यशवंत वासुदेव(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड १५, यशवंत वासुदेव खरे मिरज, १९४८, कलम ६९७५, पृ. ८१९२.

३६५) तत्रैव.

३६६) Gazetteer Of Bombay Presidency, Vol. X, p.759.

३६७) Loc. Cit.

३६८) जोशी बापू पुरुषोत्तम(संपा.), दुसरे बाजीराव पेशवे रोजनिशी, कलम १८८, पृ. १८८–१८९.

३६९) तत्रैव.

३७०) खोबरेकर वि.गो., उपरोक्त, पृ. २३१

३७१) कित्ता, पृ. २३२.

३७२) तत्रैव.

३७३) पोतदार द. वा., मुजुमदार गं.ना.(संपा.), ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३४, पत्रांक २५३–२५४, पृ. ७९–८०.

३७४) तत्रैव.

३७५) तत्रैव.

३७६) कित्ता, पत्रांक २५४, पृ. ८०.

३७७) तत्रैव.

३७८) कित्ता, पत्रांक २५५, पृ. ८२.

३७९) तत्रैव.

३८०) तत्रैव.

३८१) तत्रैव.

३८२) Gazetteer, of Bombay Presidency, Vol. X, P. 759.

३८३) BLACKER VALENTNE, MEMOIR OF THE OPERATIONS OF THE BRITISH ARMY IN INDIA DURING THE MARATHA WAR OF THE 1817-1818 & 1819, LONDON, 1821, P. 309.

३८४) Op. Cit. P. 313.

## प्रकरण पाचवे

# उपसंहार

१. मानवाला आदिम काळापासून जगण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे. सुरुवातीला नैसर्गिक आपत्ती व रानटी पशूंचे भय निर्माण झाले. पुन्हा टोळ्यांमध्ये वर्चस्वासाठी संघर्ष करावा लागला. या सर्वांपासून संरक्षण करण्यासाठी मानवाने शिळा रचून किल्ला बांधण्याची सुरुवात केली.

मानव प्राण्याच्या उदयानंतर स्थापत्यशास्त्राचा विकास होत गेला. स्वत:च्या संरक्षणासाठी मानवाने काळाच्या ओघात अनेक प्रकारच्या वास्तू तयार केल्या. किल्ला ही त्या वास्तु वैशिष्ट्यांपैकी एक ! राज्यसंस्थेच्या विकासाबरोबर किल्ले हे राज्यशक्ती व सामरिक स्थापत्याचे प्रतिक बनले. प्राचीन काळापासूनचे असे किल्ल्यांचे अवशेष जगभर विखुरलेले दिसतात. अनेक प्रकारच्या साहित्यामध्ये किल्ल्यांचा उल्लेख प्रकार, उद्देश, प्रशासन यांचे सविस्तर वर्णन आढळते. भारतात कौटिल्याच्या अर्थशास्त्रापासून रामचंद्र अमात्यांच्या आज्ञापत्रापर्यंत किल्ल्याचे संदर्भ आढळतात. संस्कृतीच्या वाटचालीबरोबर राज्यसत्तेचा विकास झाला. प्राथमिक स्वरुपातील किल्ला स्थापत्याचा विकास होत मध्ययुगीन दुर्गवास्तू उदयास आल्या. भारतातील साहित्यिक व पुरातत्वीय पुराव्यांवरुन भारतातील दुर्गस्थापत्याचा इतिहास कळतो. राजसत्तेतील त्यांचे सामरिक महत्व कळते. दुर्गबांधणीसाठी आवश्यक तो मजूर वर्ग प्राचीन भारतात उपलब्ध होता. त्यांना खुप कमी मोबदला मिळत होता. ग्रीक गुलामांपेक्षा त्यांची अवस्था थोडी बरी होती. साम्राज्याच्या संरक्षणात दुर्ग बांधणाऱ्या या मजूर व युद्धकैद्यांचे मोठे योगदान आहे. संरक्षणाच्या दृष्टीने दुर्गस्थापत्यात अनेक बदल झाले. परकीय दुर्गबांधणीच्या तंत्राच्या मिश्रणाने भारतात एक नव्या प्रकारचे वैशिष्ट्यपूर्ण दुर्गस्थापत्य विकसित झाले.

महाराष्ट्राचे भौगोलिक स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. उत्तर व दक्षिण भारताला जोडणाऱ्या मध्यवर्ती प्रदेशामध्ये महाराष्ट्राचा प्रदेश अंतर्भूत आहे. उत्तर प्लायस्टोसीन (२५००० ते १०००० वर्षांपूर्वी) कालखंडामध्ये नद्यांच्या काठावर गाळ साचला. या कालखंडामध्ये मानवी वसाहतीस पोषक हवामान निर्माण झाले. महाराष्ट्रामध्ये ज्वालामुखीय

उद्रेकामुळे  दख्खनचे पठार व जांभा खडकाची निर्मिती झाली. भूगर्भातील विवर्तनिकीमुळे दख्खनचे पठार उचलले जाऊन सह्याद्री पर्वताची निर्मिती झाली. या भौगोलिक घडामोडींचा व त्यातून निर्माण झालेले दख्खनचे पठार, जांभा खडक व सह्याद्री पर्वतरांगा या घटकांच्या निर्मितीचा महाराष्ट्राच्या इतिहासावर दुरगामी परिणाम पडलेला दिसतो.

दख्खनच्या पठारामध्ये सेऊण, कुंतल, अश्मक ही प्राचीन काळातील राज्ये उदयास आली. या प्रदेशातील  लोकांना जगण्यासाठी सतत संघर्ष करावा लागल्यामुळे त्यांची प्रवृत्ती कष्टाळू व लढाऊ बनली. याच प्रवृत्तीचा उपयोग स्वराज्याच्या उभारणीमध्ये झाला. जांभा खडकांनी आदिम काळातील माणसाला हत्यारांसाठी योग्य दगड पुरवला. त्यामुळे  महाराष्ट्रामध्ये आद्यपुराणाश्मयुगापासून मानवाच्या अस्तित्त्वाचे पुरावे मिळतात. तर सह्याद्रीने महाराष्ट्राला दुर्गमता व किल्ल्यांच्या उभारणीसाठी मोक्याच्या जागा पुरवल्या. महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी त्याचा योग्य उपयोग करुन घेतला.

महाराष्ट्रामध्ये चिरकी–नेवासा येथे एका खड्ड्यामध्ये बेसाल्टच्या मोठमोठ्या शिळा अर्धवर्तुळाकार स्वरुपामध्ये मुद्दाम रचून ठेवलेल्या आढळतात. हा काळ एक ते दीड लाख वर्षांपूर्वीचा आहे. पण खऱ्या अर्थाने बांधलेल्या बुरुजयुक्त भक्कम तटबंदी इनामगाव येथील जोर्वे वसाहतीला आहे. याचा काळ इ.पू. १५०० आहे. म्हणून खऱ्या अर्थाने महाराष्ट्रामध्ये दुर्गबांधणीची सुरुवात याच काळापासून झाली.

शिलाहार राजा भोज, संगमेश्वरचा जाखुराय यांनी महाराष्ट्रातील याच दुर्गमतेचा उपयोग करुन घेत अनेक किल्ले बांधले. उपरोक्त राज्यकर्त्यांनी या किल्ल्यांच्या आधारावर आपली साम्राज्ये जतन केली.

सोळाव्या, सतराव्या शतकामध्ये महाराष्ट्रावर बलाढ्य मोगल बादशहा व आदिलशाहचे वर्चस्व होते. पण येथील डोंगर, दऱ्या–खोऱ्यांचा दुर्गम प्रदेश व दळणवळणाची अपुरी साधने यामुळे  महाराष्ट्र मोगल किंवा आदिलशही साम्राज्याच्या इतर प्रदेशाशी घट्ट जोडला गेला नाही. यामुळे  बादशहा किंवा आदिलशाह यांचे प्रभावी व दीर्घकाळ नियंत्रण या प्रदेशावर रहात नसे. त्यांच्या साम्राज्यातील हा प्रदेश थोडा अलगच पडत असे. याच पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांसारख्या द्रष्ट्या महापुरुषाने एतद्देशीयांचे विशाल साम्राज्य

निर्माण केले. त्यांनी आधीच्या राज्यकर्त्यांपेक्षा किल्ल्यांचे महत्त्व आधिक जाणले. या किल्ल्यांच्या आधारे मोगल बादशहासारख्या अत्यंत समर्थ शत्रूला यशस्वी प्रतिकार केला. त्यांच्या या महान कार्यामध्ये महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा सिंहाचा वाटा आहे.

महाराष्ट्राची भौगोलिक रचना व किल्ल्यांचे स्थान व संख्या यांच्यामध्ये परस्पर आंतरसंबंध आहेत. या भौगोलिक रचनेचा महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या स्थान व बांधणीवर खूप मोठा प्रभाव आहे. दख्खन पठार हे किल्ले बांधणीस उपयुक्त नव्हते. पश्चिम घाट व कोकण हा प्रदेश किल्ल्यांच्या बांधणीस पोषक असल्याने तेथे अधिक किल्ले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या दाट जंगलयुक्त व उंच डोंगराळ प्रदेशाने किल्ल्यांसाठी नैसर्गिक संरक्षण पुरवले. कोकणच्या प्रादेशिक विस्तारामध्ये एका बाजूला सह्याद्रीच्या पर्वतरांगा, दुसरीकडे अरबी समुद्र, बेटे, समुद्रापर्यंत घुसलेले डोंगर सुळके यांनी गिरीदुर्ग, खाडीमुखाशी व बेटातील जलदुर्ग उभारण्यास अत्यंत मोक्याच्या जागा पुरविल्या. त्याचा मराठा राज्यकर्त्यांनी विशेषतः छ. शिवाजी महाराजांनी अचूक उपयोग करुन घेतला. या किल्ल्यांनी स्वराज्य जतन व दृढ करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

महाराष्ट्राच्या डोंगराळ असणाऱ्या प्रदेशामध्ये म्हणजेच पश्चिम महाराष्ट्र, कोकण व उत्तर महाराष्ट्राचा काही भाग येथे महाराष्ट्रातील सर्वाधिक किल्ले आहेत. धुळे, नाशिक, ठाणे, मुंबई, रायगड, पुणे, सातारा, सांगली,. कोल्हापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्हयामध्ये महाराष्ट्रातील जवळजवळ ७५ टक्के किल्ले आहेत. महाराष्ट्राच्या दख्खन पठाराची भौगोलिक स्थिती किल्ले बांधणीस उपयुक्त नव्हती त्यामुळे मध्य महाराष्ट्र व पूर्व महाराष्ट्राच्या प्रदेशामध्ये महाराष्ट्रातील कमी किल्ले आहेत. अहमदनगर, अकोले, अमरावती, औरंगाबाद, बीड, बुलढाणा, जालना, जळगाव, लातूर, नांदेड, परभणी, सोलापूर, उस्मानाबाद, वर्धा, यवतमाळ या जिल्हयामध्ये सर्वसाधारणपणे १९टक्के किल्ले आहेत तर नागपूर, भंडारा, गडचिरोली, चंद्रपूर या जिल्हयांमध्ये साधारणपणे ६ टक्के किल्ले आहेत. महाराष्ट्रामध्ये दुर्गम डोंगराळ प्रदेश अधिक असल्यामुळे गिरीदुर्गाची संख्या सर्वाधिक आहे. त्याखालोखाल भुईकोट किल्ले नंतर किनाऱ्यावरील किल्ले व सर्वात कमी बेटावरील किल्ले आहेत.

छ. शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीचा पुरेपूर फायदा घेत किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण केल्या. त्यांच्या मदतीने जलद लष्करी हालचाली केल्या. त्यांनी महाराष्ट्राच्या भौगोलिकतेचा अचूक फायदा घेत गनिमी कावा युद्धतंत्राचा विकास केला. शिवरायांनी समुद्र व सह्याद्री यांचे नैसर्गिक संरक्षण लाभलेल्या कोकण किनारपट्टीवर वर्चस्व ठेवले. त्यामुळे त्यांना व्यापारावर नियंत्रण व आरमारी सामर्थ्य मिळविणे शक्य झाले.

शिवोत्तर काळातील राज्यकर्त्यांनी सुद्धा याच किल्ल्यांच्या आश्रयाने मोगल बादशहा औरंगजेब याच्याशी झुंज दिली. त्यामुळे औरंगजेबसारखा मोगल बादशहा पंचवीस वर्षे सर्व लवाजमा व विशाल सैन्यासह महाराष्ट्रात ठाण मांडून बसला तरी त्याला मराठ्यांवर निर्णायक विजय मिळविता आला नाही. शिवकाळातील राजगड व नंतरची रायगड या राजधान्या त्यांच्या विशिष्ट भौगोलिक स्थान व दुर्गमतेमुळे समकालीन साम्राज्याच्या गरजा पूर्ण करणाऱ्या होत्या. सतराव्या शतकातील मराठा साम्राज्याच्या विस्तारासाठी मराठ्यांनी लढविलेले लष्करी डावपेच व युद्धतंत्र महाराष्ट्रातील भूरचनेशी सुसंगत होते. महाराष्ट्रामध्ये आधी मायावी युद्ध म्हणून प्रचलित असलेल्या व नंतर विकसित झालेल्या गनिमी काव्याच्या युद्धपद्धतीचा मुख्य आधार महाराष्ट्राची दुर्गमता हीच होती. महाराष्ट्रातील किल्ल्यांचा विस्तार काही एकरांपासून शेकडो एकरांपर्यंत आहे. या किल्ल्यांचा उपयोग आजूबाजूच्या विस्तारीत भूभागावर नियंत्रण ठेवण्यासाठी होत असे.

डॉ. बाळकृष्ण शिवाजी महाराजांच्या ताब्यातील किल्ल्यांची संख्या ३५० देतात तर शां. वि. आवळसकर यांनी तीच संख्या ३६० दिली आहे. शिवाजी महाराजांच्या ताब्यामध्ये सर्वसाधारणपणे ३५० किल्ले होते. अर्थात किल्ल्यांच्या संख्यात्मक मुल्यापेक्षा गुणात्मक मुल्य अधिक आहे. म्हणून किल्ल्यांची संख्या फार महत्त्वाची नाही.

सह्याद्रीच्या दुर्गम पर्वतरांगा, अरबी समुद्राचे सानिध्य यांचे लष्करी डावपेचांमधील महत्त्व फक्त शिवाजी महाराजांनाच जाणवले. त्यांनी अनेक जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती व काही नवे किल्ले या प्रदेशात बांधले. त्यांनी जाणीवपूर्वक अशा किल्ल्यांच्या साखळ्या निर्माण केल्या. त्यांच्या या द्रष्टेपणामुळे स्वराज्याला दीर्घकाळ संरक्षण पुरवले.

छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये किल्ले बांधण्यास योग्य अशा सर्व ठिकाणी किल्ले बांधले. आधीच दुर्गम ठिकाणी असलेल्या किल्ल्यांवर विशिष्ट प्रकारचे बांधकाम करुन ते अधिकच दुर्गम केले. शिवरायांनी युद्ध प्रसंगी आक्रमण व वेळ पडल्यास स्वसंरक्षण करण्यास उपयुक्त असे बांधकाम किल्ल्यांवर केले.

मराठा राज्यामधील हे किल्ले लष्करीदृष्टीने उपयोगी होते पण त्याचबरोबर ते राजकीय व प्रशासकीय केंद्र म्हणून काम करत. त्याचबरोबर किल्ला हे किल्ल्याखालील प्रदेशावर सामाजिक नियंत्रणाचे काम करत. राजाच्या आज्ञा व कायद्यांची अंमलबजावणी किल्ल्यांवरील अधिकाऱ्यांमार्फत केली जात असे. किल्ल्याखालील लोकांच्या घराचे, मालमत्तेचे, उदरनिर्वाह व जीविताचे संरक्षण करण्याची जबाबदारी किल्ल्यावर असे. किल्ल्यांनी पुरविलेल्या संरक्षणावरच तेथील जनतेचा उदरनिर्वाह व जीविताचे संरक्षण अवलंबून होते. किल्ले हे राजाच्या सत्ता, सामर्थ्य व प्रतिष्ठेचे प्रतिक होते. किल्लेदार हा राजाच्या वतीने त्या परिसरात कायद्याची अंमलबजावणी करुन शांतता, सुव्यवस्था राखत असे. त्यामुळे राजापेक्षा तेथील जनतेची निष्ठा किल्लेदारावर अधिक असे. याचा परिणाम शिवोत्तर काळामध्ये किल्ल्याच्या रुपात अनेक स्वतंत्र सत्ता केंद्रांच्या उदयामध्ये झाला. दुर्बळ राज्यकर्त्यांच्या काळामध्ये ही सत्ताकेंद्रे अधिक सक्रीय झाली. किल्लेदाराच्या वर्तनाप्रमाणे जनतेमध्ये राजाची प्रतिमा निर्माण होत असे.

२. कोकण हा सह्याद्री पर्वतरांगामुळे महाराष्ट्राच्या इतर प्रदेशापासून वेगळा पडला आहे. या प्रदेशामधील घनदाट जंगल असलेला सह्याद्रीचा पर्वतमय प्रदेश, अरबी समुद्र, खाड्या व समुद्रातील बेटे आहेत. घनदाट जंगल असलेल्या सह्याद्रीमुळे कोकणामध्ये किल्ल्यांमधील अंतर खूपच कमी आहे. हा प्रदेश घनदाट जंगल व खोल दऱ्या यांच्यामुळे सहजपणे वेगवेगळा करता येणे अशक्य आहे. छ. शिवाजी महाराजांनी या भौगोलिक वैशिष्ट्याचे लष्करी महत्त्व बरोबर ओळखले. त्यांनी या प्रदेशामध्ये किल्ले दुरुस्ती व बांधणी केली. त्यांनी लष्करी डावपेचांसाठी तसेच या प्रदेशावर कायम वर्चस्व टिकविण्यासाठी किल्ल्यांच्या रुपात संरक्षक स्थळे निर्माण केली. रत्नागिरी व सिंधुदुर्ग हे जिल्हे दक्षिण कोकणमध्ये आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यातील मानवी अस्तित्त्वाचे पुरावे ५०,००० वर्षांपुर्वीचे मिळतात. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये इतिहासपूर्व काळाचे पुरावे सुसरोंडी, जयदुर्ग, हातरवंबा, गणपती पुळे, बारसव या ठिकाणी व सुमुद्रामध्ये भिंतीच्या रुपात आढळतात. पुराव्याच्या अभावी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये आर्थिकरणाची सुरुवात कधी झाली, हे निश्चित सांगता येत नाही.

प्राचीन काळापासून ग्रीक व्यापाऱ्यांना रत्नागिरी जिल्ह्यातील बंदरांचा परिचय होता. ही बंदरे आंतरराष्ट्रीय व्यापार व वाहतुकीची केंद्रे होती. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये प्रमुख व्यापारी मार्गांच्या जवळपास बौद्ध लेणी व महत्त्वाची बौद्ध केंद्रे होती. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सातवाहन, त्रैकुटक, वाकाटक, चालुय राजघराण्यांची सत्ता होती. बदामीच्या चालुक्य राजांचे रत्नागिरी जिल्ह्यातील स्थानिक राज्यकर्त्यांशी वैवाहिक संबंध होते. रत्नागिरी जिल्ह्यावर प्राचीन काळातील राज्य करणारे शेवटचे घराणे राष्ट्रकूट हे होते.

मध्ययुगाच्या सुरुवातीस रत्नागिरी जिल्ह्यामध्ये शिलाहार व इतर स्थानिक राज्यकर्त्यांची सत्ता होती. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये साम्राज्यविस्तार व संरक्षणासाठी किल्ल्यांचा वापर याच काळामध्ये प्रथम सुरु झाला. मध्ययुगामध्ये रत्नागिरीचा प्रदेश जिंकण्यासाठी राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, कदंब, कल्याणचे चालुक्य यांच्यामध्ये सतत संघर्ष झाला. यापैकी शिलाहारांचा अपवाद वगळता इतर घराण्यांचे रत्नागिरीच्या प्रदेशावर अल्पकाळ वर्चस्व निर्माण झाले. शिलाहार राज्यकर्त्यांनी स्वतंत्र व मांडलिक राज्यकर्ते म्हणून दीर्घकाळ सत्ता गाजविली. चालुक्य राजांनी रत्नागिरी जिल्ह्यामध्ये विविध ठिकाणी मंदिरे बांधली. बाराव्या शतकामध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये स्थानिक राज्ये उदयास आली. देवगिरीच्या यादवांनी ही स्थानिक राज्ये जिंकून रत्नागिरी जिल्ह्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. यादव राजांच्या नाशानंतर मलिक काफूरच्या अनुपस्थितीने रत्नागिरी जिल्ह्यामध्ये परत स्थानिक राज्ये उदयास आली. पंधराव्या शतकामध्ये महमंद गवान या बहामनी सरदाराने रत्नागिरी जिल्ह्यातील बराच प्रदेश जिंकला. यानंतर रत्नागिरी जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या प्रदेशामध्ये निजाम, आदिलशाह व पोर्तुगीज यांचे वर्चस्व निर्माण झाले. युसुफ आदिलशहाच्या काळामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील दाभोळ हे त्याच्या कोकण प्रदेशचे मुख्य केंद्र होते. दाभोळ बंदरावर वर्चस्व ठेवण्यासाठी आदिलशहा व पोर्तुगीज यांच्यामध्ये नेहमी

संघर्ष झाला. आदिलशहाने दळवी, सुर्वे, शिर्के व इतर सरदारांच्या माध्यमातून रत्नागिरीवर आपले राजकीय वर्चस्व ठेवले. छ. शिवाजी महाराजांनी रत्नागिरी जिल्ह्याचे सामुद्री व्यापार व वाहतुकींवर नियंत्रण ठेवण्याच्या व आरमारी दृष्टीकोनातून महत्त्व ओळखून या प्रदेशावर वर्चस्व निर्माण केले.

रत्नागिरी जिल्ह्याच्या भौगोलिक स्थितीचा रत्नागिरी जिल्ह्याच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाला आहे. सह्याद्रीने घनदाट अरण्ये असलेला हा प्रदेश अतिशय दुर्गम केला. रत्नागिरीचा प्रदेश महाराष्ट्राच्या दख्खन पठारापासून वेगळा झाला आहे. त्यामुळे या प्रदेशातील लोक स्वातंत्र्यप्रिय होते. या जिल्ह्यास पश्चिम बाजूस अरबी समुद्राचे संरक्षण होते. या जिल्ह्यावर पुर्वेकडून आक्रमणाचा धोका खूप कमी होता. कारण महाराष्ट्राचा इतर प्रदेश पार करण्याबरोबर परकीय आक्रमकाला भक्कम सह्याद्री पार करण्याची मानसिक तयारी करावी लागे.

आदिलशाह व मोगल बादशहा यांनी सुरुवातीला या प्रदेशाकडे दुर्लक्ष केले. दुर्गम सह्याद्री व समुद्रापलिकडे प्रत्यक्ष वर्चस्व निर्माण करण्याचे मानसिक सामर्थ्य त्यांच्यामध्ये नव्हते. रत्नागिरी जिल्ह्याला बाह्य आक्रमणाचा धोका कमी होता. आक्रमकाला महाराष्ट्राचा इतर प्रदेशाबरोबरच भक्कम सह्याद्रीही पार करावा लागे. आदिलशहा व मोगल बादशहा यांचे आरमारी सामर्थ्याकडे दुर्लक्ष होते. आदिलशहाने या प्रदेशामध्ये आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून सत्ता राबविली. पोर्तुगीज व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले. त्यांची राजकीय वर्चस्व निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा होती. व्यापार व राजकीय वर्चस्वासाठी त्यांनी गोवा व कोकणामध्ये शक्य तो प्रदेश व किल्ले जिंकले. त्यांनी स्वतःचे आरमार व आरमारी किल्ले उभारले. स्थानिक राज्यकर्त्यांना प्रलोभने, लष्करी दबाव अशा विविध मार्गांनी ही सागरी सत्ता पोर्तुगीजांनी वाढविली. पोर्तुगीजांच्या पाठोपाठ इंग्रजांनी हाच मार्ग अनुसरला. परकियांचा हा धोका छ. शिवाजी महाराजांनी द्रष्ट्येपणाने जाणला. त्यांनी कोकणातील इतर प्रदेशासह रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गिरीदुर्गांबरोबर सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, जयदुर्ग, अंजनवेल व बाणकोट यासारखे आरमारी किल्ले ताब्यात ठेवले. या किल्ल्यांच्या आधाराने आरमारी सामर्थ्य वाढविले.

सतराव्या शतकामध्ये या जिल्ह्यामध्ये आदिलशहाच्या वतीने स्थानिक सरदार व छ. शिवाजी महाराज यांच्यामध्ये सतत संघर्ष झाला. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांच्या संख्येबाबत मतभेद आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये ओळख पटलेले व ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये उल्लेख असलेले असे एकूण तीस किल्ले आहेत. त्यापैकी २६ किल्ले व ४ गढ्या आहेत. मंडणगड, हिंमतगड, गोवा, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, दाभोळ, सुवर्णदुर्ग, प्रणालकदुर्ग, पालगड, महिपतगड, सुमारगड, रसाळगड, गोवळकोट, भैरवगड, माणिकदुर्ग, नवते, गोपाळगड, कासारदुर्ग, विजयगड, प्रचितगड, भवानीगड, जयगड, रत्नदुर्ग, पूर्णगड, यशवंतगड, आंबोळगड हे किल्ले व चिपळूण, संगमेश्वर, साठवली व राजापूर या ४ गढ्या आहेत. चिपळूण व संगमेश्वर या गढ्यांचे तसेच दाभोळ किल्ल्याचे सध्या कोणतेच अवशेष शिल्लक नाहीत. रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा उपयोग संपर्कमार्ग, वाहतूक व व्यापारी मार्गावर नियंत्रण ठेवण्यासाठी होत असे. मध्ययुगीन काळात

३. मंडणगड, बाणकोट हे किल्ले शिवपूर्व काळापासून अस्तित्त्वात होते. छ. शिवाजी महाराजांनी आदिलशाही सरदारांच्या ताब्यातून हे किल्ले जिंकले. मंडणगड  हा किल्ला पालवणीचा आदिलशाही सरदार यशवंतराव दळवी यांच्या ताब्यात होता. त्यावेळी तो चिरेदुर्ग म्हणून ओळखला जात होता. यशवंतराव दळवी पळून गेल्यानंतर तो शिवाजी महाराजांच्या ताब्यात आला. छ. शिवाजी महाराजांनी चिरेदुर्ग किल्ल्यावर संरक्षणात्मक बांधकाम करुन त्या प्रदेशाचे भुषण म्हणून मंडणगड हे संस्कृत नाव ठेवले. बाणकोट हा किल्लासुद्धा छ. शिवाजी महाराज यांनी आदिलशाही सरदार सिद्दीच्या ताब्यातून जिंकला. त्यावर संरक्षणाच्या दृष्टीने दुरुस्ती केली. सुवर्णदुर्ग ते बाणकोट दुसऱ्या बाजूला रसाळगड, सुमारगड, महिपतगड यांच्या दरम्यान किल्ल्यांच्या साखळीतील एक दुवा म्हणून मंडणगड जिंकल्याबरोबर पालगड हा नवा किल्ला बांधला. पालगड किल्ला बांधण्यासाठी योग्य अंतरावर पुरेसी दुर्गमता पुरविणारा डोंगरकडा उपलब्ध झाला. तो अचूक हेरुन छ. शिवाजी महाराजांनी तो उपयोगात आणला. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची राजधानी रायगड ही आदिलशहा, मोगल बादशहा व परकीय व्यापारी यांच्या आक्रमणापासून वाचविण्यासाठी रायगड किल्ल्याच्या सभोवती अनेक किल्ल्यांचे संरक्षणात्मक कवच निर्माण केले. या संरक्षणात्मक कवचातील बाणकोट, मंडणगड

व पालगड हे महत्त्वाचे किल्ले आहेत. रायगड या प्रमुख किल्ल्यास सहाय्यक, पुरक म्हणून बाणकोट, मंडणगड, पालगड या किल्ल्यांनी काम केले. या किल्ल्यांचा उपयोग प्रशासकीय व राजकीय कार्यापेक्षा लष्करी गरजेच्या दृष्टीकोनातून अधिक होता.

पोर्तुगीजांच्या रुपाने स्वराज्यावर आलेला संभाव्य धोका भारतातील इतर राज्यकर्त्यांपेक्षा शिवाजी महाराजांनी द्रष्टेपणाने जाणला. त्यांनी समर्थ आरमाराबरोबर त्यास सहाय्यक आरमारी किल्ले जिंकले किंवा बांधले. बाणकोट हे अशाच महत्त्वाच्या आरमारी किल्ल्यांपैकी एक होता.

शिवोत्तर काळामध्ये कान्होजी आंग्रे यांनी नाविक दलातील एक अधिकारी व सरखेल म्हणून सिद्दीच्या ताब्यातून बाणकोट, मंडणगड व पालगड हे किल्ले वारंवार जिंकले. शिवोत्तर काळामध्ये कान्होजी आंग्रे यांच्या पराक्रमामुळे हे किल्ले स्वराज्यात राहिले.

छ. शाहू यांच्या काळात या किल्ल्यांचे महत्त्व कायम राहिले. मराठे व मोगलांच्या वतीने सिद्दी यांच्या संघर्षामध्ये उपरोक्त तीनही किल्ले विशेषतः मंडणगड व बाणकोट हे केंद्रस्थानी राहिले. जलमार्गे बाणकोट तर जमिनमार्गे पालगड व मंडणगड येथे लष्करी हालचाली करुन मराठ्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न सिद्दी व नंतर तुळाजी आंग्रे यांनी केला. संकट काळामध्ये मंडणगड हा किल्ला बाणकोट किल्ल्यासाठी आधार किंवा सहाय्यक म्हणून उपयोगी पडत असे. मंडणगड या किल्ल्याचे स्थान लष्करी डावपेचांच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. म्हणून मराठ्यांनी नेहमी बाणकोटबरोबरच मंडणगड हा किल्ला ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न केला. मंडणगड किल्ला शत्रूच्या ताब्यात जाणे म्हणजे मराठ्यांच्या दृष्टीने अप्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. संभाजी आंग्रे याने छत्रपती व मानाजी आंग्रे विरोधात सिद्दीशी करार केला तेव्हा त्याचे महत्त्वाचे सत्ताकेंद्र असणाऱ्या सुवर्णदुर्ग यास धोका नको म्हणून सिद्दीस फत्तेदुर्ग ऐवजी मंडणगड देण्याचे कबूल केले.

छ. शाहूनंतर पेशवाईमध्ये स्वराज्याचा विस्तार उत्तर भारतामध्ये झाला. पेशव्यांनी दक्षिणेतील साम्राज्य दृढ करण्यापेक्षा उत्तर भारतात लक्ष केंद्रित केले. तसेच नवनव्या तंत्राच्या तोफखान्याच्या विकासामुळे किल्ल्यांचे लष्करी महत्त्व कमी झाले. त्यामुळे पेशवाईमध्ये कोकणातील इतर किल्ल्यांबरोबर बाणकोट, मंडणगड, पालगड या किल्ल्यांचे

महत्त्व आधीच्या काळापेक्षा तुलनात्मकदृष्ट्या कमी झाले. शिवाजी महाराजांची दुरदृष्टी पेशव्यांनी दाखविली नाही. किल्ले व आरमार याकडे दुर्लक्ष झाले. तरीसुद्धा इंग्रज, पोर्तुगीज व सिद्दी यांच्याशी होणाऱ्या संघर्ष काळामध्ये या किल्ल्यांवर अपवादात्मक लष्करी हालचाली झाल्या. इ.स. १७५६ पासून इंग्रजांनी बाणकोट हे समर्थ व मजबूत लष्करी ठाणे निर्माण केले. स्वराज्यातील बंडखोरांनी कोकणातील किल्ल्यांवर ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. सदाशिवरावभाऊच्या तोतयाने मंडणगड, बाणकोट व पालगड या किल्ल्यांवर आपले वर्चस्व निर्माण केले. पेशवाईमध्ये आश्रय घेण्यासाठी, धनसंपत्ती सुरक्षित ठेवण्यासाठी, तसेच कैदी ठेवण्यासाठी प्रामुख्याने या किल्ल्यांचा उपयोग झाला. उत्तर पेशवाईमध्ये दुसऱ्या बाजीराव पेशव्यास या किल्ल्याचे महत्त्व कळले. इंग्रजविरोधी संघर्षासाठी त्याने मंडणगड व पालगड किल्ल्यांवर रसद, शिबंदी व शस्त्रसाठा करुन तयार ठेवले. या अंतिम लढ्यामध्ये मंडणगडच्या किल्लेदाराने त्याच्या शिबंदीसह इंग्रजांना तीव्र प्रतिकार केला. मंडणगडसारख्या तुलनेने लहान असलेल्या किल्ल्यावरुन एवढा तीव्र प्रतिकार इंग्रजांना अपेक्षीत नव्हता. इतका तीव्र प्रतिकार करुनही बलाढ्य इंग्रजांपुढे तो टिकू शकला नाही. मध्ययुगामध्ये उपरोक्त तीनही विशेषतः बाणकोट व मंडणगड किल्लांचा उपयोग व्यापार व वाणिज्य यावर नियंत्रण ठेवण्यासाठी झाला. शिवकाळापासून समुद्रकिनाऱ्यावरील व आरमारी वर्चस्वामध्ये बाणकोट किल्ल्याची भूमिका महत्त्वाची होती. मराठेशाहीची अगोदरची राजधानी व नंतर महत्त्वाचा असलेला रायगड हा किल्ला तसेच प्रतापगड या किल्ल्यांच्या संरक्षक कवचामध्ये उपरोक्त किल्ल्यांना महत्त्वाचे स्थान होते. याशिवाय हे किल्ले रायगड व प्रतापगड या किल्ल्यांना सहाय्यक व पूरक होते.

**किल्ल्यांची सद्यस्थिती –**

मंडणगड किल्ल्यावर सध्या खुपच कमी अवशेष शिल्लक आहेत. दोन वर्षापूर्वी किल्ल्यावर सफाई करताना एका वास्तूचे अवशेष सापडले आहेत. ती वास्तू कशासाठी वापरली जाई याची निश्चित ओळख पटली नाही. मंडणगड किल्ल्यावर वर्षातून एकदा गणेशजयंती निमित्त उत्सव साजरा केला जातो. त्या निमित्ताने विविध खेळांच्या स्पर्धा घेऊन, विविध वस्तूंचे व खाद्य पदार्थांचे स्टॉल उभारले जातात. मंडणगड पंचक्रोशीतील

हजारभर लोक यादिवशी किल्ल्यावर एकत्र जमतात. या सर्वांना त्यादिवशी तांदळांची खिचडी व लोणचे असे मोफत जेवण दिले जाते. पंचक्रोशीतील एखादा दानशूर व्यक्ती अथवा सहभागातून ही जेवणाची व्यवस्था केली जाते.

मंडणगड किल्ल्याची सर्व व्यवस्था मंडणगड या गावातील नवयुवक तरुण मित्रमंडळ हे मंडळ पाहते. या मंडळातील सदस्य लोकसहभागातून किंवा शैक्षणिक संस्थांतील विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सहभागातून उत्सवापूर्वीची स्वच्छता व उत्सवा दरम्यानचे सर्व व्यवस्थापन, महाप्रसादाचे आयोजन व वाटप करतात. मंडणगड किल्ल्याची नोंद आजही सरकारी कागदपत्रांमध्ये किल्ला म्हणून नाही. मंडणगड किल्ल्यावर असणाऱ्या दौलतखानाच्या दर्ग्याच्या नावेच या किल्ल्याच्या परिसरातील जमिनीचा सातबारा आहे. दर्गा म्हणूनच हा संपूर्ण हा किल्ला नोंदला गेला आहे. बाणकोट किल्ल्यावरील अवशेष अजून चांगल्या अवस्थेत आहेत. पालगड किल्ल्यावरील अनेक तोफा नष्ट झाल्या आहेत. त्यावरील अवशेष नष्ट झाले आहेत. घेरा पालगड येथे देवराई असल्यामुळे  वनस्पतीशास्त्र व अर्थशास्त्र विद्याशाखेतील अभ्यासक त्याठिकाणी अभ्यासासाठी अपवादाने येतात. मंडणगड, पालगड, बाणकोट येथे क्वचित हौशी गिर्यारोहक येतात. पर्यटक मात्र या किल्ल्यांकडे फिरकतच नाहीत. रत्नागिरी जिल्ह्याच्या पुरातत्त्व विभागाने केलेल्या शिफारशीनुसार महाराष्ट्र सरकारने नोव्हेंबर २०१२ मध्ये बाणकोट व मंडणगड हे किल्ले संरक्षित करण्याचे जाहीर केले आहे. यासाठी मंडणगड तालुक्यातील विविध वृत्तपत्रांच्या पत्रकारांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून या किल्ल्यांचे सरकारकडून जतन व्हावे म्हणून यासाठी पाठपुरावा केला होता.

मंडणगड व बाणकोट हे किल्ले सरकारने संरक्षित म्हणून जाहीर करुन दोन वर्षे झाले आहेत. अद्यापही या किल्ल्यावरील अवशेष जतन करण्याच्या दृष्टीने कोणतीही कार्यवाही झालेली नाही. पुरातत्त्व खात्याकडून या किल्ल्यांची पाहणी केल्याचे कोठेही अधिकृतपणे जाहिर झाले नाही. सरकार व स्थानिक राज्यकर्त्यांची याबाबतीत निराशा यातून जाणवते.

४. शिवाजी महाराजांनी सुवर्णदुर्ग किल्ला इ.स. १६६३ मध्ये बांधला. आरमाराचा विकास करत असतानाच एका बाजूला सुवर्णदुर्गसारखा आरमारी किल्ला शिवाजी महाराजांनी उभारला.

दक्षिण कोकण जिंकल्यानंतर जलदुर्गासाठी हर्णे बंदरातील ह्या बेटावर त्यांचे लक्ष गेले. त्याचे महत्त्व जाणून त्यांनी सुवर्णदुर्गसारखे मजबूत आरमारी किल्ला उभारला. सुवर्णदुर्गास शह देण्यासाठी सिद्दीने कनकदुर्ग व फत्तेदुर्ग हे किल्ले बांधले. कान्होजी आंग्रेने सिद्दीस शह देण्यासाठी गोवा हा किल्ला बांधला. पुढे सरखेल कान्होजी आंग्र्यांचे वर्चस्व या सर्व किल्ल्यांवर निर्माण झाले. छ. शाहूंनी कान्होजी आंग्रेशी केलेल्या करारामध्ये सुवर्णदुर्ग, फत्तेदुर्ग, कनकदुर्ग व गोवा हे किल्ले कान्होजी आंग्रे यांना दिले. तेव्हापासून ते तुळोजी आंग्रेचा पाडाव होईपर्यंत हे सर्व किल्ले आंग्रे घराण्याच्या ताब्यातच होते. आंग्रे घराण्यातील सर्व प्रमुख सरदारांनी वेळोवेळी या किल्ल्यांची दुरुस्ती केली.

सुवर्णदुर्ग येथे किल्लेदार म्हणून काम करणाऱ्या कान्होजी आंग्रे, बकाजी नाईक महाडिक, मोरो बापूजी यांनी विविध मोहिमांमध्ये, जमिनीवरील लढाईत तसेच आरमारी युद्धामध्ये पराक्रम गाजविला होता. आरमारी युद्धासाठी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, रत्नदुर्ग, जयगड, सुवर्णदुर्ग, बाणकोट, कुलाबा (अलिबाग), उंदेरी अशी आरमारी किल्ल्यांची साखळी स्वराज्यामध्ये निर्माण झाली. हे सर्व किल्ले एकमेकांना सहाय्यक होते. सिद्दीच्या जंजिऱ्यास व आरमारास शह देण्यासाठी बाणकोट व सुवर्णदुर्ग हे जलदुर्ग खुप उपयोगी पडले. आरमारी जहाजांना आश्रय, दुरुस्ती व दारुगोळा पुरविण्यासाठी सुवर्णदुर्ग किल्ला उपयोगी पडत होता. सुवर्णदुर्ग किल्ल्याच्या संरक्षणासाठी सहाय्यक म्हणून कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांचा उपयोग महत्त्वपूर्ण होता. सिद्दी व मराठे, मराठे व इंग्रज यांच्या संघर्षामध्ये सुवर्णदुर्ग किल्ला व तेथील आरमार केंद्रस्थानी राहिले.

स्वराज्याची राजधानी व नंतर मराठेशाहीतील महत्त्वाचा किल्ला तसेच प्रतागड या किल्ल्यांच्या संरक्षक कवचामध्ये सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांना महत्त्व आहे. याशिवाय सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, जयगड, कुलाबा, उंदेरी या जलदुर्गांना सहाय्यक व पूरक म्हणून सुवर्णदुर्ग व बाणकोट हे किल्ले महत्त्वाचे होते.

खेड तालुक्यातील पालगड, रसाळगड, सुमारगड, महिपतगड, गुहागर तालुक्यातील गोपाळगड, मंडणगड तालुक्यातील मंडणगड, बाणकोट यांच्यापासून विशिष्ट स्थानावर सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा हे किल्ले मध्ययुगामध्ये लष्करी डावपेचात्मकदृष्ट्या

महत्त्वाचे होते. सुवर्णदुर्ग हे लष्करी केंद्राबरोबरच महत्त्वाचे राजकीय व प्रशासकीय केंद्र होते. या किल्ल्यांचा उपयोग कैदी ठेवण्यासाठी सुद्धा केला जात होता. तोतयाच्या बंडावेळी व इंग्रजांशी होणाऱ्या अंतिम संघर्षात सुवर्णदुर्ग किल्ल्याचे किल्लेदार फितुर झाले. इ.स. १७५६ मध्ये बाणकोट इंग्रजांच्या ताब्यात गेल्यानंतर तेथील इंग्रजांना शह देण्यासाठी सुवर्णदुर्ग किल्ला उपयुक्त ठरला. शिवकाळापासून पश्चिम किनाऱ्यावरील आरमारी वर्चस्वाच्या संघर्षामध्ये सुवर्णदुर्ग किल्ल्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

सुवर्णदुर्ग ह्या किल्ल्यानंतर वास्तू व तोफा यांचे अवशेष आहेत. जवळच कर्दे–मुरुडच्या समुद्र किनाऱ्यावर पर्यटनासाठी आलेले पर्यटक जवळच असणाऱ्या सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा या किल्ल्यांकडे मात्र पाठ फिरवतात. गिर्यारोहक, अपवादानेच हौशी पर्यटक व विद्यार्थी सुवर्णदुर्ग किल्ल्यास भेट देतात. कनकदुर्ग येथे फक्त वास्तूचे खुपच कमी अवशेष आहेत. गोवा किल्ल्यामध्ये वास्तूचे थोडे अवशेष शिल्लक आहेत. फत्तेगड येथे मात्र काहीच अवशेष शिल्लक नाहीत. हा किल्ला कोळ्यांच्या घरांनी गजबजलेला आहे.

सुवर्णदुर्ग हा किल्ला महाराष्ट्र सरकारने संरक्षित वास्तू म्हणून जाहिर केला आहे. येथील अवशेषांचे जतन करण्याचा कोणताही खास प्रयत्न पुरातत्त्व विभागाकडून झाला नाही. एक रखवालदार फक्त या किल्ल्यामध्ये रखवाली करण्यास आहे. कनकदुर्ग येथे दीपगृहाचे कार्यालय आहे. गोवा हा किल्ला महाराष्ट्र सरकारने नोव्हेंबर २०१२ मध्ये संरक्षित वास्तू म्हणून जाहिर केला आहे. पण अद्याप त्याबाबतची पुढील कोणतीही कार्यवाही झाली नाही.

अशाप्रकारे पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार व वाणिज्य यावर नियंत्रण व दक्षिण कोकण ताब्यात ठेवण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यातील किल्ल्यांचा उपयोग झाला. रत्नागिरी जिल्हा हा अंतर्गत प्रदेशात असल्यामुळे  त्यावर शत्रूच्या आक्रमणाचा धोका तुलनेने कमी होता. रत्नागिरी जिल्ह्यावर पुर्वेकडून आक्रमण करु इच्छिणाऱ्या शत्रूस इतर जिल्ह्याचा प्रदेश तसेच सह्याद्रीचा भलामोठा अडथळा पार करावा लागत असे. रत्नागिरी जिल्ह्यातील या दुर्गम किल्ल्यांनी मोगल बादशहा व आदिलशहा यांच्या आक्रमणामध्ये प्रत्यक्ष अडथळा तर

निर्माण केलाच पण मानसिक अडथळा सुद्धा निर्माण केला. आरामाराची आवड नसणाऱ्या व मैदानी युद्धाची सवय असणाऱ्या आदिलशहा व मोगल बादशहा यांना या डोंगरी व आरमारी किल्ल्यांची तसेच त्यांच्या मदतीने लढल्या जाणाऱ्या गनिमी कावा युद्ध पद्धतीची भिती वाटत होती. म्हणून त्यांनी कोकणातील स्थानिक सरदारांना प्रतिनिधीत्त्व देऊन त्यांच्यामार्फत आपला कारभार पाहिला. अपवाद वगळता रत्नागिरी जिल्ह्यामध्ये खरा संघर्ष मराठे, सिद्दी, इंग्रज, पोर्तुगीज व बंडखोर मराठा सरदार यांच्यामध्येच झाला. इंग्रज व पोर्तुगीज यांच्याकडे आरमारी सामर्थ्य असल्याने ते कोकणात वर्चस्व टिकविण्यासाठी सक्रीय झाले.

## किल्ल्यांच्या इतिहासाची आर्थिक विकसाशी सांगड –

मध्ययुगामध्ये बाणकोट, मंडणगड व पालगड या तिन्ही किल्ल्यांना लष्करी डावपेचांच्या दृष्टीकोनातून तसेच व्यापार व वाणिज्य यावर नियंत्रण ठेवण्यासाठी, आश्रय घेण्यासाठी, कैदी ठेवण्यासाठी महत्त्व होते. सुवर्णदुर्ग हा महत्त्वाचा आरमारी किल्ला होता. कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, गोवा हे किल्ले सुवर्णदुर्गच्या संरक्षणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत होते. नंतच्या काळामध्ये वाहतुकीची व्यवस्था व साधनांमध्ये बदल झाल्यामुळे आधुनिक काळ गतीमान झाला. कोकणातील नवे रस्ते व वाहतुकीच्या साधनांमुळे मंडणगड तालुका, दापोली तालुका यांचे महत्त्व कमी झाले. विशेषतः मंडणगड हा रत्नागिरी जिल्ह्यामध्ये सर्वात मागास तालुका म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना शिक्षा म्हणून या तालुक्यामध्ये नेमणूक अथवा बदली केली जाते. या तालुक्याचा विकास अतिशय मंद गतीने होत आहे. दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठ असल्यामुळे व पंचक्रोशी मोठी असल्यामुळे तेथे विकासाची गती मंडणगड तालुक्याच्या तुलनेने चांगली आहे. मंडणगड तालुक्याची लोकसंख्या खुप कमी म्हणजेच पंधरा हजार आहे. महाराष्ट्रातील उर्वरित तालुक्यांच्या तुलनेत दापोली, मंडणगड या तालुक्यांचा विकास मंदगतीने होत आहे. दापोली तालुक्यामध्ये हर्णे, कर्दे, मुरुड, समुद्रकिनाऱ्यावर पर्यटन करण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या खुप आहे. पण हे पर्यटक सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, गोवा या किल्ल्यांकडे क्वचितच फिरकतात. फत्तेदुर्ग हा एक किल्ला होता याची ओळख पटविणारे कोणतेही अवशेष त्यावर नाहीत. किल्ल्याचा सर्व प्रदेश कोळी

वस्तीने गजबजलेला आहे.

एकूणच दापोली व मंडणगड तालुक्यांचा विकास अत्यंत अपूरा आहे. या तालुक्यांमधील अधिकतर कुटुंबाचा उदरनिर्वाह हा मुंबईवरुन येणाऱ्या पैशावर चालतो. या तालुक्यांतील बहुतांश पुरुष व स्त्रीया मुंबई येथे अकुशल कार्य करतात. सहाजिकच त्यांना मिळणारा मेहनताना खुप कमी असतो. या तालुक्यांमधील लोकांमध्ये शिक्षणाचा अभाव आहे. बहुतांश तरुण मुले व मुली बारावी झाल्यानंतर रोजगार मिळविण्यासाठी मुंबई गाठतात. पदवीधर होवूनही रोजगार मिळत नसल्याने अशा अर्धशिक्षित तरुण तरुणींची मुंबईकडे जाण्यामध्ये संख्यात्मक वाढ झालेली आढळते. अनेक तरुण विशेषतः मुस्लिम कुटुंबातील तरुण उदरनिर्वाहासाठी आखाती देशांमध्ये जातात. अर्थातच कमी शिक्षणामुळे आखाती देशांमध्ये ते अकुशल व कनिष्ठ दर्जाचे काम करतात. शेतीयोग्य जमिनीची अल्प उपलब्धता शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव, शेतीची पारंपारिक पद्धत, शेती व्यवस्थापनाचा अभाव यामुळे शेतीमध्ये अत्यल्प उत्पादन होते. कष्ट अधिक व तुलनेने उत्पादन कमी म्हणून अनेक कुटुंबांनी शेती कसण्याचे सोडून दिले आहे. नारळ, सुपारी, आंबे यांच्या बागांची मालकी समाजातील विशिष्ट वर्गाकडे आहे. पण बहुसंख्य लोकांची आर्थिक स्थिती अत्यंत दुर्बळ आहे.

दापोली व मंडणगड तालुक्यांना विकास व सरकारचे लक्ष वेधण्याची आवश्यकता आहे. या दोन तालुक्यांना विकासाच्या प्रमुख प्रवाहामध्ये आणण्यासाठी सरकारी प्रयत्न व लोक सहभागाची गरज आहे. दापोली व मंडणगड हे तालुके पर्यटन क्षेत्र म्हणून जाहीर झाले आहेत. पायाभूत सुविधा व चांगल्या निवासाच्या सोयींच्या अभावी येथे येणाऱ्या पर्यटकांची संख्या खुपच कमी आहे. विशेषतः मंडणगड येथे पायाभूत सुविधा व निवासाच्या सोयींची कमतरता खुपच मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे मंडणगडला पर्यटक अपवादानेच फिरकतात.

नव्यानेच २०११ मध्ये मँचेस्टर व न्युयॉर्क विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या व सी.ए. बॅली, विजयेंद्र राव व सिमॉन स्झेक्टर यांनी संपादीत केलेल्या ""History Historians & Development Policy : A Necessory Dialog" या पुस्तकामध्ये विकास अर्थतंज्ञांना इतिहासाच्या अभ्यासाची का गरज आहे आणि नवे इतिहासकार धोरणाच्या विश्लेषणामध्ये व नियोजन करण्यामध्ये कसे व का योगदान देऊ शकतात याची विविध कारणे दिली आहेत. या

आंतरविद्याशाखीय दृष्टीकोनातून मंडणगड व दापोली तालुक्यांचा विकास करता येऊ शकतो. या दोन्ही तालुक्यांमधील किल्ल्यांच्या व गावांच्या इतिहासाचा उपयोग या तालुक्यांच्या आर्थिक विकासासाठी करता येईल.

मंडणगड, बाणकोट, पालगड, सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग, गोवा या किल्ल्यांमध्ये पुरातत्त्व विभागाने व्यापक स्तरावर उत्खनन करावे. आधीचे व नंतर सापडलेले अवशेष यांचे किल्ल्यामध्येच चांगल्या प्रकारे जतन करावे. त्यामुळे इतिहासाचे नवे पुरावे उपलब्ध होऊ शकतील. किल्ल्यांच्या संबंधीत ऐतिहासिक घटना चित्र व शिल्प रुपाने त्या त्या किल्ल्यांमध्ये उभारता येऊ शकतील. या किल्ल्यांच्या सभोवती घडलेल्या घटनांवर आधारीत लघुपट व माहितीपट तयार करुन ती दाखविण्याची सोय किल्ल्यांवर करण्याचे नियोजन व व्यवस्था करावी. किल्ल्यांची ढासळलेली तटबंदी, प्रवेशद्वार पुन्हा बांधून तसेच किल्ल्यांमध्ये मध्ययुगीन वातावरण निर्माण करुन मध्ययुगात गेल्याची अनुभूती पर्यटकांना देता येईल. बाणकोट व सुवर्णदुर्ग येथील समुद्रामध्ये आरमारी युद्धांचे प्रात्यक्षिक दाखवता येईल. अशाप्रकारे या किल्ल्यांच्या इतिहासाची सांगड या तालुक्यांच्या आर्थिक विकासासाठी घालता येईल. या उपाययोजना केल्यामुळे देशाच्या विशेषतः महाराष्ट्रातील लोकांमध्ये देशभक्ती व देशाभिमान प्रज्वलित करता येणे शक्य आहे.

या तालुक्यांचा विकास निसर्ग व पर्यावरण पुरक केला पाहिजे असा चिरस्थायी विकास करण्यासाठी स्थानिक लोकांना प्रोत्साहित केले पाहिजे. त्यासाठी शेतीचे आधुनिक व सहाय्यक तंत्रज्ञान स्थानिक लोकांना पुरविले पाहिजे.

याशिवाय काजू प्रक्रिया उद्योग (Cashew Industry) औषधी वनस्पतींचा व्यापार (Medicinal Plant Trade), बांबू व्यापार (Bamboo Trade), मत्स्योद्योग (Fisheries Industry), करवंदापासून अल्कोहोल निर्मिती (Corinda Winary Industry), आंबा गर प्रक्रिया उद्योग (Mango Pulp Processing Industry), पाण्यातील खेळ व मगर दर्शनासहित नौकानयन (Water Sports Boating with Crocodiles View) अशा अनेक उद्योगांची उभारणी सरकारी व सहकारी प्रयत्नांमधून केली पाहिजे. सरकारने यासाठी स्थानिक लोकांना आवश्यक ते सर्व प्रकारचे आधुनिक तंत्रज्ञान, आर्थिक पतपुरवठा व पायाभूत सुविधा उपलब्ध केल्या पाहिजेत. उपरोक्त तालुक्यांमध्ये विविध ठिकाणी तसेच उपरोक्त सर्व

किल्ल्यांच्या प्रदेशामध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. चांगले रस्ते, सार्वजनिक स्वच्छतागृहे, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, निवासाची उत्तम सोय, उदयाने अशा पायाभूत सुविधा येथे निर्माण केल्या पाहिजेत. या सर्व उद्योगांना पुरक व पर्यटन मार्गदर्शनाचा अभ्यासक्रम शिकविण्याची सोय अनेक शिक्षण संस्थांमध्ये केली पाहिजे.

अशाप्रकारे सरकार, सहकारी संस्था व लोकसहभागातून मंडणगड व दापोली तालुयातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यांचे स्थलांतर थांबेल. स्थानिक लोकांची आर्थिक स्थिती सुधारुन शैक्षणिक विकास होईल. निसर्गाची हानी न करता पर्यावरण पुरक विकासाचा आदर्श या प्रकारे निर्माण करणे शक्य आहे.

# संदर्भग्रंथ सूची

## प्राथमिक साधने (मराठी)


१) अप्रकाशित, शासकिय अभिलेखागार, पुणे, रुमाल कृ. १९, पुडके क्र. ५, पत्रांक १०९५२.

२) आपटे द.वि., दिवेकर स.म.(संपा.), शिवचरित्र प्रदिप, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पुनर्मुद्रण २००९.

३) आपटे द.वि.(संपा.), केळकर न.चि., शिवकालीन पत्र सारसंग्रह, खंड १, श्रीशिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

४) आवळसकर शांताराम विष्णू, आंग्रेकालीन अष्टांगर (अधिकारी शकावली), शां. वि. आवळसकर, पुणे, १९४७.

५) आवळसकर शां.वि.(संपा.), ऐतिहासिक साधने, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६०.

६) इंडियन आर्किओलॉजी : ए रिव्ह्यू, १९७४–७५ ते १९७८–७९.

७) देवीरप्पा एच. (संपा.), शिवतत्वरत्नाकर केळदि बसव भूपाल विरचित, प्राच्यविद्या संशोधनालय, म्हैसुर विश्वविद्यालय, १९६४.

८) बांग्रास ए. बी. द. (संपा.), अनु. देसाई सं.श., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, १९६८.

९) कुलकर्णी अ.रा(संपा.)., रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र, मानसन्मान प्रकाशन, पुणे, २००४.

१०) कुलकर्णी अनुराधा गो.(संपा.), शिवछत्रपतींची पत्रे, खंड १, परम मित्र पब्लिकेशन, ठाणे, २०११.

११) केळकर य.न.(संपा.), ऐतिहासिक पोवाडे, खंड २, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२८.

१२) कंगले र. पा. (संपा.), कौटिलियम अर्थशास्त्रम्, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९९५.

१३) खरे ग. ह., भिडे श्री. र.(संपा.), आज्ञापत्र (मराठेशाहीतील राजनीति), सिटी बुकस्टॉल, पुणे, १९६०.

१४) खरे ग. ह.(संपा.), शिवचरित्र वृत्तसंग्रह, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१.

१५) खरे ग. ह.(संपा.), पुनःसंपादन, देशपांडे ब्रह्मानंद, दक्षिणच्या मध्ययुगीन इतिहासाची साधने, खंड १ ते ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, २००९–१०.

१६) खरे ग.ह.(संपा.), ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४९.

१७) खरे ग.ह. (संपा.), ऐतिहासिक फारसी साहित्य, खंड ६, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९७३.

१८) खरे ग.ह., जोशी शं.ना.(संपा.), ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड १०, त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५६.

१९) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ४, वासुदेव वामन खरे, मिरज, १९०१

२०) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ५, वासुदेव वामन खरे, मिरज, १९०८

२१) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ६, वासुदेव वामन खरे, मिरज, १९१०

२२) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड ७, वासुदेव वामन खरे, पुणे, १९१२

२३) खरे वासुदेव वामन(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड १०, वासुदेव वामन खरे, पुणे, १९१२

२४) खरे यशवंत वासुदेव(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड १४, यशवंत वासुदेव खरे, मिरज, १९२०

२५) खरे यशवंत वासुदेव(संपा.), ऐतिहासिक लेखसंग्रह, खंड १५, यशवंत वासुदेव खरे, मिरज, १९०१

२६) गुजर मा.वि.(संपा.), करवीर छ. घराण्याच्या इतिहासाची साधने, खंड १ व २, गुजर मा.वि., पुणे, १९६२, खंड ३, कोल्हापूर, १९६२.

२७) जनगणना २०११, तहसिलदार कचेरी, मंडणगड.

२८) जोशी पु. म.(संपा.), आवळसकर शां. वि., ऐतिहासिक साधने, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९६३.

२९) जोशी प्र. न.(संपा.), श्री वाल्मिकी रामायण, मराठी अनुवाद, खंड १, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, १९८७.

३०) जोशी बापू पुरुषोत्तम(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्यूलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणे, १९११.

३१) जोशी बापू पुरुषोत्तम. सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, दुसरे बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८

३२) जोशी शं.ना.(संपा.), शिवकालीन पत्रसारसंग्रह, खंड १ ते ३, श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

३३) जोशी शं.ना., संभाजीकालीन पत्रसार संग्रह, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४९.

३४) डबीर ना.सं.(संपा.), इतिहास संग्रह, आंगरे यांची हकीकत, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे,१९०९.

३५) ढेरे रा. चिं.(संपा.), जोशी प्र. न., रामचंद्र अमात्य प्रणित स्वराज्यनीति आज्ञापत्र, वोरा अँड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., १९६०.

३६) दिवेकर स. मा.(संपा.), कवीन्द्र परमानंदकृत श्रीशिवभारत शब्दवेध प्रकाशन, पुणे, १९९८.

३७) नंदुरबारकर पां.रा.(संपा.), दांडेकर ल.का., श्रीशिवदिग्विजय (श्रीशिवाजी महाराजांची बखर), बडोदे, १८७५.

३८) पगडी सेतुमाधवराव, (अहकामे आलमगिरी) औरंगजेबाची आज्ञापत्रे, (१७०२–१७०७) परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई.

३९) पवार आप्पासाहेब(संपा.), ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड १, शिवाजी विद्यापीठ, १९६९.

४०) पारसनीस द.ब.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, श्री. छत्रपती शाहू महाराज यांची रोजनिशी, सहस्त्रकर, सातारा.

४१) पारसनीस द.ब.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, बाळाजी बाजीराव(नानासाहेब) पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०७

४१) संपादकाचे नाव नाही, सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, बाळाजी बाजीराव(नानासाहेब) पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०६

४२) पारसनीस द.ब., धावडशी येथील श्री ब्रह्मेंद्रस्वामी उर्फ भार्गवबाबा यांचे चरित्र व पत्रव्यवहार, बाबाजी सखाराम आणि कं निर्णयसागर, मुंबई, १९०९.

४३) पिसुर्लेकर पांडुरंग स.(संपा.), अनुवाद देसाई स.शं., मराठ्यांच्या इतिहासाची साधने, पोर्तुगीज दफ्तर, खंड २, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

४४) पुरंदरे कृ.वा.(संपा.), भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीयग्रंथमाला ३२, पुरंदरे दफ्तर, भाग १–३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२९–१३४.

४५) पुरंदरे कृ. वा.(संपा.), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ३२, पुरंदरे दफ्तर, खंड३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३४.

४६) पुरंदरे कृ. वा.(संपा.), शिवचरित्र – साहित्य, खंड १, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९२६.

४७) संपा. नाव नाही, शिवचरित्र साहित्य, भाग २, क्र. २, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३०.

४८) पोतदार दत्तो वामन(संपा.), मुजुमदार गंगाधरराज नारायणराव, ऐतिहासिक संकिर्ण साहित्य, खंड ३, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९४१.

४९) फाटक न. र.(संपा.), श्री. मन्महाभारताचे मराठी सुरस भाषांतर, सुरेखा प्रकाशन, मुंबई, १९६८.

५०) फाळके आनंदराव भाऊ(संपा.), शिंदेशाही इतिहासाची साधने, भाग ३, (कोटेकर व दाभोळकर संग्रह), ग्वाल्हेर, १९३७.

५१) बदोडे राज्य दफ्तरातील ऐतिहासिक वेचे पुस्तक, १ ले (बदोडा दफ्तर) (१७२४ ते १७६८), बडोदे संस्थान रेकॉर्डस, बडोदे, १९३४.

५२) बेंद्रे वा. सी.(संपा.), महाराष्ट्रेतिहासाची साधने, खंड–२, इतिहास संशोधन मंडळ, (मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय), मुंबई, १९६६.

५३) भगत दत्ता(संपा.), कृष्णाजी अनंत सभासदकृत, श्रीशिव छत्रपतींचे चरित्र, प्रतिमा प्रकाशन, पुणे, जुलै २००१.

५४) भावे वि.ल.(संपा.), श्रीमंत महाराज भोसले यांची बखर, मराठी दफ्तर, ठाणे, १९१७.

५५) संपादकाचे नाव नाही, सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, सवाई माधवराव पेशवे रोजनिशी, खंड १, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०८.

५६) मराठे काशिनाथ बाळकृष्ण(संपा.), सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, पुणे, १९०९.

५७) मदनलाल, इब्न बतुता की भारत यात्रा या चौदहवी शताब्दी का भातर, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली, २००६.

५८) मंडल डी.एन, भारत सरकार, जलसंसाधन मंत्रालय, केंद्रिय भूजल बोर्ड, महाराष्ट्र राज्य के अंतर्गत रत्नागिरी जिले की भूजल विज्ञान जानकारी, मध्यवर्ती क्षेत्र, नागपूर, २००९.

५९) मावजी पु. वि.(संपा.), पारसनीस द. ब., सनदापत्रातील माहिती, पुरुषोत्तम विश्राम मावजी प्रकाशित, मुंबई, १९११.

६०) मावजी पु. वि.(संपा.), पारसनीस द. ब., तह व करारमदार, पुरुषोत्तम विश्राम मावजी, मुंबई, १९१४.

६१) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २, पेशव्यांची शकावली, विष्णू गोविंद विजापूरकर, कोल्हापूर, १९००.

६२) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ४, वि. का. राजवाडे, पुणे, १९००

६३) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६, पत्रे यादी वगैरे, विष्णू गोविंद विजापूरकर, कोल्हापूर, १९०१

६४) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८, श्रीमंत गगनबावडेकर पंत अमात्य यांच्या दफ्तरातील लेख, विष्णू गोविंद विजापूरकर, कोल्हापूर, १९०३

६५) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ९, सत्कार्योजक सभा, धुळे, १९०६

६६) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १०, थोरले माधवराव ते दुसरे बाजीराव या चार पेशव्यांसंबंधी पत्रव्यवहार, वासुदेव गोविंद आपटे, कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर, पुणे, १९०९

६७) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १२, रघुनाथ बाजीराव व बाजीराव रघुनाथ यांची अस्सल पत्रे, खंडेराव चिंतामण मेहेंदळे, पुणे, १९१२

६८) राजवाडे वि. का.(संपा.), मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड २१, शिवकलीन घराणी, शं. श्री. देव, धुळे १९१८.

६९) वेलणकर एच. डी.(संपा.), बुधभूषणम् संभू, भांडारकर प्राच्य संशोधन संस्था, पुणे, १९२६..

७०) वैद्य शंकर लक्ष्मण(संपा.), वैद्य दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ४ व ५, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पुरस्कृत ग्रंथमाला क्र. ४९, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९४९, १९५१.

७१) शामशास्त्री(संपा.), अभिलाषितार्थ चिन्तामणि सोमेश्वर विरचित प्रथम भाग : अदितः तृतीय प्रकरणान्तम, युनव्हर्सिटी ऑफ मिझोर, ओरिएंटल लायब्ररी पब्लिकेशन्स, संस्कृत सेरीज नं. ६९,१९२६.

७२) सबनीस केशव गोविंद(संपा.), पंत अमात्य बावडा दफ्तर, खंड १ व २, सबनीस के.जी., सेक्रेटरी जहागीर बावडा, कोल्हापूर, १९३७, १९३८.

७३) सरदेसाई गो.स. (संपा.), काळे या. मा., वाकसकर वि. स., काव्यतिहाससंग्रहात प्रसिद्ध झालेले ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे लेख, चित्रशाळा प्रेस, पुणे, द्वि. आ., १९३०.

७४) सरदेसाई गो.स.(संपा.), कुलकर्णी कृ.पा., काळे यादव माधव, ऐतिहासिक पत्रव्यवहार, सदाशिव रामचंद्र सरदेसाई, पुणे, १९३३.

७५) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३, जंजिऱ्याच्या सिद्दीवर शाहूची मोहिम,मुंबई सरकार, मुंबई, १९३०

७६) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १०, बाजीराव आणि निजाम हर्षामर्ष, मुंबई सरकार, मुंबई, १९३१.

७७) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १६, वसई मोहिम, मुंबई सरकार, मुंबई, १९३१.

७८) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड १९, माधवराव याचा रघुनाथरावास विरोध, मुंबई सरकार, मुंबई, १९३१.

७९) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २२, पेशव्यांच्या रोजनिशीतील उतारे, मुंबई सरकार, मुंबई, १९३२.

८०) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड २४, पश्चिम किनाऱ्यावरील पेशव्यांच्या हालचाली, मुंबई सरकार, मुंबई, १९३२.

८१) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३०, शाहू व पहिले दोन पेशवे संकिर्ण, मुंबई सरकार, मुंबई, १९३३.

८२) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३१, जमाव विभागातील कागद, मुंबई सरकार, मुंबई, १९३३.

८३) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३२, उत्तरकालीन पेशवे कौटंबिक राहणी, मुंबई सरकार, मुंबई, १९३३.

८४) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३३, जंजिऱ्याची मोहिम(पुरवणी), मुंबई सरकार, मुंबई, १९३३.

८५) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३४, वसईची मोहिम(पुरवणी), मुंबई सरकार, मुंबई, १९३३.

८६) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ३५, इंग्रजांचा साष्टीवर हल्ला, मुंबई सरकार, मुंबई, १९३४.

८७) सरदेसाई गो. स.(संपा.), पेशवे दफ्तरातून निवडलेले कागद, खंड ४५, मराठेशाहीचा करभार, मुंबई सरकार, मुंबई, १९३४

८८) साने का. ना.(संपा.), सातारकर महाराज व त्यांचे पेशवे यांच्या रोजनिशीतील उतारे, थोरले माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड १, डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटी, पुणे, १९११.

८९) साने का.ना.(संपा.), रघुनाथ यादव उर्फ चित्रगुप्त विरचित शिवाजी महाराजांची बखर, काव्येतिहास संग्रह, क्र. २६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १८९३.

९०) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव विरचित श्रीमंत छ. संभाजी महाराज यांचे चरित्र (संभाजी बखर), भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, तृतीय आवृत्ती, १९१५.

९१) साने का.ना.(संपा.), मल्हार रामराव चिटणीस कृत थोरले शाहू महाराज यांचे चरित्र, काव्येतिहास संग्रह ६, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १८८२.

९२) साने का.ना.(संपा.), काव्येतिहास संग्रहातील पत्रे यादी वगैरे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १८८९.

९३) हेरवाडकर र.वि.(संपा.), मल्हार रामराव चिटणीस विरचित, श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वि. आ. २०००.

९४) सोवनी अविनाश(संपा.), ऐतिहासिक बखरी, खंड १ व २, शब्दवेध प्रकाशन, पुणे. १९९८.

## प्राथमिक साधने (इंग्रजी)

1) BLACKER VALENTINE, MEMOIR OF THE OPERATIONS OF THE BRITISH ARMY IN INDIA DURING THE MAHRATTA WAR OF 1817, 1818 & 1819, LONDEN, 1821.

2) Gazetteer of the Bombay Presidency, Vol X, Gazetteers Dept., Govt. of Maharashtra, Mumbai, Re-Printed, 1996

3) Gazetteer of the Bombay Presidency,Ratnagiri & Sawantvadi Districts, Vol X, Gazetteer Dept., Bombay, 1880.

4) Kelkar N. C.(Edt.), Kale D. V., English Records on Shivaji, Vol 2, Shivcharitra Karyalay, Pune, 1931.
5) Mawjee P.V., Parasnis D.B.(Edt.), Kaifiats, Yadis & C. P.V.Mawjee Pune, 1908
6) Paranjape B.G.(Edt.), English Records on Shivaji, Vol. I, Bharat Itihas Mandal, Pune, 1931.

**कोश** :

१) आपटे वा. गो.(संपा.), मराठी शब्दरत्नाकर, ढवळे प्रकाशन, मुंबई, १९८५.
२) जोशी श्रीपाद(संपा.), अभिनव शब्कोश, (हिंदी–मराठी–हिंदी, मराठी हिंदी), शुभदा – सारस्वत प्रकाशन, पुणे, २०००.
३) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश, खंड ३, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ प्रकाशन, मुंबई, दु. आ. २०००
४) जोशी पं. महादेवशास्त्री(संपा.), भारतीय संस्कृतिकोश, खंड २, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे, दु. आ. १९८५
५) दाते यशवंत रामकृष्ण(संपा.), सुलभ हिन्दी – मराठी कोश, केशव भिकाजी ढवळे प्र., मुंबई, १९९६.
८) भावे ह.अ. (संपा.), हिंदी मराठी शब्दकोश, वरदा प्रकाशन, पुणे, १९९८.
९) भाटवडेकर मो. वि. (संपा.), राजहंस व्यावहारिक मराठी शब्दार्थ कोश, राजहंस प्रकाशन, पुणे, २००७.
१०) भाषा संचलनालय, महाराष्ट्र शासन, शासन व्यवहार शब्दावली (मराठी–इंग्रजी), भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई, २००५.
११) कोशकार, मराठे रामचंद्र विनायक, स्थापत्य शिल्पकोश साहित्य आणि संस्कृति मंडळ, महाराष्ट्र राज्य, १९६५.
१३) वर्मा रामचंद्र(संपा.), प्रामाणिक हिन्दी कोश, साहित्य कुटीर, साहित्य रत्न–माला कार्यालय, १९३०.
१४) केळकर य. न., ऐतिहासिक शब्दकोश, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६.

१५) Dorling Kindersley(Edt.), Illustrated Oxford Dictionary, Dorling Kindersley Iimited & Oxford Unty Press, Delhi, Revised & Updated Edition, 2003

१६) Dhongde Ramesh V. (Edt.), Oxford English – English – Marathe Dictionary, Oxford Unty Press, New Delhi, 2009.

१७) Mairi Robinson(Edt.), Chambers 21st Century Dictionary, Allied Publishers, New Delhi, Revised Edition\ reprinted in 2008

## दुय्यम साधने (मराठी)

१) अक्कलकोट एस. जी., दुर्ग, खंड १, सह्याद्री दुर्गभ्रमण मंडळ, सांगली.

२) आठवले सदाशिव, शिवाजी आणि शिवयुग, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, दु. आ. १९९२.

३) आवळसकर ए. एस., रायगडची जीवनगाथा, बॉम्बे, १९६२.

४) इ. बुक, इंडियन हिस्ट्री ॲन्शिअंट इंडिया, उपकार प्रकाशन.

५) कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, देशमुख प्रकाशन, पुणे, १९६२.

६) कुलकर्णी अ. रा.(संपा.), खरे ग. ह., मराठ्यांचा इतिहास, खंड १, शिवाजी आणि शिवकाल(१६००–१७०७), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००६.

७) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड २, शाहू आणि शाहूकाल (१७०७–१७६१), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८५.

८) कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र,राजहंस प्रकाशन, पुणे, १९९३.

९) कुलकर्णी अ.रा., शिवकालीन भारत, राजहंस, प्रकाशन, १९९७.

१०) कुलकर्णी अ.रा., मराठे आणि महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

११) केतकर श्री. व्य.,प्राचीन महाराष्ट्र, भाग २, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६३.

१२) कोसंबी डी.डी., इन्ट्राडक्शन टु स्टडी ऑफ इंडियन हिस्ट्री, अनुवादित डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

१३) कोसंबी डी.डी., कल्चर ॲड सिव्हिलायझेशन ऑफ एन्शिअंट इंडिया इन हिस्टॉरिकल आऊटलाईन, अनुवादित, डायमंड पब्लिकेशन्स, २००६, पुणे.

१४) कोसंबी डी. डी., प्राचीन भारतीय संस्कृती व सभ्यता, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.

१५) खरे वासुदेव वामनराव, अधिकार योग, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९०८.

१६) खरे ग.ह., कुलकर्णी अ. रा.(संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड ३.मराठी सत्तेचा उत्तरार्ध(१७६१-१८४८), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८६

१७) खोबरेकर वि. गो., कोकणचा राजकीय इतिहास, मुंबई, मराठी ग्रंथ संग्रहालय इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथमाला, पु. क्र. २७, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई.

१८) गर्गे स.मा.(संपा.), मराठी रियासत, भाग १ ते ८, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८ ते १९९२

१९) गझदर, एस. जे., क्वाटर्नरी एनव्हायर्नमेंट अँड स्टोन एज कल्चर्स ऑफ द कोकण कोस्ट ऑफ महाराष्ट्र, डेक्कन कॉलेज, पुणे, १९८०.

२०) गोखले शोभना, पुराभिलेखविद्या कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.

२१) गोखले कमल, शिवपुत्र संभाजी, नवकमल प्रकाशन, पुणे, द्वि. आ., १९७१.

२२) गोगटे चिंतामण गंगाधर, महाराष्ट्र देशातील किल्ले, भाग २, १९०७.

२३) चक्रवर्ती दिलिप, द आर्किआलॉजी ऑफ अर्लि इंडियन सिटीज, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, दिल्ली.

२४) चौहान दे.व्यं., दक्खिनी हिंदीतील इतिहास व इतर लेख, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, १९७३.

२५) जोशी महादेवशास्त्री, महाराष्ट्राची धारातीर्थे, भाग १ व २, जोशी ब्रदर्स, पुणे.

२६) जोगळेकर स. अ., सह्याद्री, प्रसाद प्रकाशन कार्यालय, पुणे.

२७) जोशी लक्ष्मणशास्त्री(संपा.), मराठी विश्वकोश, खंड १४, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई, १९८९.

२८) जोशी सचिन विद्याधर, रत्नागिरी जिल्ह्याची दुर्गजिज्ञासा, बुकमार्क पब्लिकेशन, पुणे, २०११.

२९) संपा. झा द्विजेंद्रनारायण, श्रीमाली कृष्णमोहन, प्राचीन भारत का इतिहास, हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, १९८४.

३०) ढबू दा.गो., कुलाबकर आंग्रे सरखेल, आंग्रे घराण्याचा इतिहास, आंग्रे शकावली, बॉम्बे, १९३९.
३१) तेंडुलकर महेश, गड–मंदिरांवरील द्वारशिल्प, स्नेहल प्रकाशन, पुणे, २०११.
३२) तेंडुलकर महेश, शिवकाळातील दुर्ग व दुर्गव्यवस्था, स्नेहल प्रकाशन, पुणे, २००९
३३) थापर रोमिला, दि पेंग्वीन हिस्ट्री ऑफ अर्लि इंडिया, अनुवादित, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७
३४) थापर रोमिला, भारत का इतिहास, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, पंद्रहवी आवृत्ति, २०००
३५) दिक्षित लीला(संपा.), कोकण : विविध दिशा आणि दर्शन, प्रतिमा प्रकाशन पुणे, २०११.
३६) दिक्षितार व्ही. आर. रामचंद्र, वॉर इन ॲन्शिअंट इंडिया.
३७) पगडी सेतू माधवराव, महाराष्ट्र आणि मराठे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३,
३८) पगडी सेतुमाधवराव(संपा.), मराठे व औरंगजेब, ज्ञानराज प्रकाशन, पुणे, १९६३, पृ. ३३.
३९) पगडी सेतुमाधवराव, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, जोशी व लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६२,
४०) पठाण के. जी., मंगनाळे व्ही. एस., संदर्भ महाराष्ट्र, इंटेलेक्च्युअल बुक ब्युरो, भोपाळ, २००५, पृ. २, ३
४१) प्रभु सुधाकर, छ. शिवाजी महाराजांचे किल्ले, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, १९७५
४२) पवार जयसिंगराव(संपा.), विभूते भालबा, महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी, शाहु संशोधन केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०११.
४३) पवार जयसिंगराव(संपा.), छ. संभाजी स्मारकग्रंथ, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, द्वि.आ., २००९
४४) पाठक अरुणचंद्र(संपा.), महाराष्ट्र : इतिहास प्राचीन काळ खंड १ भाग २, स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, दार्शनिका विभाग, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२.
४५) पानसे मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मुंबई, १९६३.
४६) पाळंदे आनंद, डोंगरयात्रा, ४ थी आवृत्ती, प्रफुल्लता प्रकाशन , पुणे, २००५.
४७) पारसनीस द.ब., मराठ्यांचे आरमार, तुकाराम जावजी (निर्णयसागर), मुंबई १९०४.

४८) पुराणिक श.श्री., मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर (उत्तरार्ध) १६८९–१७०७, काळ प्रकाशन, पुणे, डिसेंबर १९८२.
४९) फडके रामचंद्र माधवराव, रत्नागिरी जिल्हा. राजकीय इतिहास, १९२९.
५०) बेंद्रे वा. सी., गोवळकोंड्याची कुटबशाही, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९३४.
५१) बेंद्रे वा. सी., पोर्तुगीजांच्या महाराष्ट्रातील हालचाली, मुंबई मराठी ग्रंथ प्रकाशन, मुंबई, १९६७.
५२) बेंद्रे वा. सी., श्री छ. संभाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, द्वि. आ., मुंबई १९७१.
५३) भावे वा. कृ., पेशवेकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, तृ. आ. २०१०
५४) भोसले बी.के.(संपा.), जंजिरा संस्थानचा इतिहास.
५५) मिराशी वा. वि., सातवाहन व पश्चिमी क्षत्रप यांचा इतिहास आणि कोरीव लेख,नागपूर, १९७९.
५६) मिराशी वा.वि., शिलाहार राजवंशाचा इतिहास व कोरीव लेख, नागपूर, १९७४.
५७) मुखर्जी राधाकुमुद, चंद्रगुप्त मौर्य और उसका काल, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, २००७.
५८) मेहेंदळे ग. भा., शिंत्रे सं. प्र., शिवछत्रपतींचे आरमार, परम मित्र पब्लिकेशन्स, ठाणे, २०११.
५९) मोडक बी. पी., ब्राह्मणी राज्याचा इतिहास, कोल्हापूर, १८९१.
६०) रायचौधुरी हेमचंद्र, पॉलिटिकल हिस्ट्री ऑफ ॲन्शिअंट इंडिया, अनुवादित, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६.
६१) शर्मा रामशरण, एन्शंट इंडिया, अनुवादित, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००७.
६२) शेजवलकर त्र्यं.शं., कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमि, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९६१.
६३) सतीषचंद्र, मध्ययुगीन भारत, दिल्लीची सुलतानशाही १२०६ –१५२६, अनुवादित, के. सागर पब्लिकेशन, २००६.
६४) सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड ६, पॉप्युलर प्रकाशन, नागपूर, १९९१.

६५) सहस्त्रबुद्धे चिंतामणी, सांगलीच्या पाऊलखुणा, सकाळ पेपर्स प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती २००५

६६) सवदी ए. बी., कोळेकर पी. एस., भारताचा समग्र भूगोल, खंड १, निराली प्रकाशन, २००९.

६७) सवदी ए.बी., द मेगा स्टेट महाराष्ट्र, निराली प्रकाशन, पूनर्मुद्रण २००९.

६८) सावंत बी.बी., साळुंखे टी.डी., ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९२.

६९) श्रीवास्तव आशिर्वादीलाल, दिल्ली सल्तनत (७११ ी १५२६) शिवलाल अग्रवाल एन्ड के., आगरा, १९५९.

७०) श्रीवास्तव आशिर्वादीलाल, मुगलकालीन भारत, शिवलाल अग्रवाल एन्ड के., आगरा, १९५३.

७१) हबीब इरफान(संपा.), मध्यकालीन भारत, भाग ३, राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, २००२, पृ. २३

७२) वर्मा हरिशचंद्र(संपा.), मध्यकालीन भारत, भाग १, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, आवृत्ती ३३ वी, २००८

## दुय्यम साधने (इंग्रजी)

1) Apte B.K., A History of the Maratha Nevy & Merchant Ship, State Board For Literature & Calture, Govt. Of Maharashtra, Bombay, 1973.

2) Balkrishna-Shivaji the great, Vol 2, Modern Pablishers & Distributors, Delhi, 1985.

3) Begde Prabhakar, forts And Palaces of India, Sagar Publications, New Delhi.

4) Kamalapur J.N., The Deccan Forts, A study in the Art of Fortification & Mediaeval India, Popular book Publication, Bombay, 1961.

5) Naravane M.S., Forts of Maharashtra, Unpublished Ph. D. Thesis, Submitted on 4 th December, 1993, to Poona Unity

6) Parvate T. V., Portugese Maratha Relations, Bombay, 1983

7) Pathan K.G. (Edt.), Mangnale Y.S., Sandarbh Maharashtra, Vol II, Intellectual Bool Bureau, Bhopal, 2004

8) RadheSham, The Kingdom of Ahamednarar, Varanasi, 1966.

9) Ramdas R.V., Relations between the Marathas and the Siddis of Janjira, Unpublixhwd Ph.D. thesis, Submitted to the University of Bombay, 1965.

10) Sardesai G.S.(Edt.), Shivaji Souvenir, Bharat Itihas Sanshodhan Mandal, Pune,( Marathi Vibhag).

11) Sarkar J. N., History of Aurangzib, Vol IV, Vol V, Culcutta, 1972.

12) Sen S. N., Military System of Marathas, Unty of Calcutta, Calcutta, 1925.

13) Sen S.N., Early career of kanhoji Angrea & Other Papers, Unty of Calcutta, Calcutta, 1941

14) Sharma I.K.(Edt.), J. Var Prasad Rao, Early Brahmi Inscription From Sannatec, Harman Publishing House, New Delhi, 1993

15) Shrivastavya B.K., Angreys of Kolaba in British Records (1719 A.D. to 1884 A.D.), 1950.

16) Sing Upindra, AHistory Of Ancient and Early medieaval India From Stone Age to the Twelveth Century, E-Book, New Dehli.

## नियतकालिके व वृत्तपत्रे :-

१) गद्रे प्रभाकर, भारतातील इतिहासप्रसिद्ध किल्ले, अखिल महाराष्ट्र इतिहासप्रसिद्ध किल्ले, अधिवेशन १ ले, निबंधसंग्रह, १९९२.

२) कर्वे चिं.ग.(संपा.), ऐतिहासिक संकिर्ण निबंध, खंड ५ वा, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९५२.

३) कांबळे आर. एच.(संपा.), कोकण इतिहास परिषद, पहिले अधिवेशन, संशोधन निबंधांचे संकलन, र.प.गोगटे कला व विज्ञान महाविद्यालय आणि र. वि. जोगळेकर वाणिज्य महाविद्यालय रत्नागिरी, २०११.

४) खरे ग. ह., कुलकर्णी गो. त्र्यं., चिटणीस कृ. ना.(संपा.), त्रैमासिक : वर्ष ६२, अंक १–४, शक १९०५–०६, (महाराष्ट्र इतिहास परिषद, पुणे, १९८३ : निबंध), १९८४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, १९८४.

५) खोबरेकर वि. गो.(संपा.), भारतीय इतिहास आणि संस्कृति, त्रैमासिक, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई, जुलै–सप्टेंबर २००४.

६) दळवी दाऊद(संपा.), कोकण इतिहास परिषद, संशोधन पत्रिका, ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे, २०१२.

७) नागराजराव एम. एस.(संपा.), दि चालुक्याज ऑफ बदामी : सेमिनार पेपर्स, बंगलोर, मिथिक सोसायटी, १९७८.

८) भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्त, भारत इतिहास संशोधक मंडख, पुणे, १८३५.

९) भारतीय इतिहास आणि संस्कृती, इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, मुंबई, एप्रिल १९६८.

१०) भारत इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, पुणे, खंड ६०, अंक १–४, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, इ.स. १९८१.

११)पोतदार द.वा.(संपा.), भारत इतिहास संशोधन मंडळ, अहवाल व इतिवृत्त, शके १८३३, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९११

१२) भारत इतिहास संशोधन मंडळ, अहवाल व इतिवृत्त, शके १८३५, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९१३

१२) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक, भारतीय इतिहास आणि संस्कृति, जुलै – सप्टेंबर २००७, वर्ष ४४, पुस्तक १७४, इतिहास संशोधन मंडळ, मुंबई.

१३) त्रैमासिक, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, वर्ष ६२, अंक १–४, १९८४.

१४) त्रैमासिक, भारत इतिहास संशोधन मंडळ, वर्ष ६६, अंक १–४, १९८७.

१५) दैनिक लोकसत्ता, दि. २२ सप्टेंबर १९९६.

१६) दै. लोकसत्ता, दि. ९ ऑक्टोबर २०१३, अभिजित बेल्हेकर, केंजळगड

## इंटरनेट/वेबसाईट :–

1) http:\\www.scribd.com/mobile/doc/793/5957-hindi book,Manusmriti.

2) http:\\www.sanskritdocuments.org/pdf/manusmriti

3) http://en.wikipedia.org/list of forts in maharashtra

4) http://www. General Information of Ratnagiri Distric [M.S.India]

5) http://www.censusindia-gov.in

6) http://mumbai readyreckoner.org/2010/04/acheulian – cave – an - susrond:konkan – Maharashtra / www.scribd/com/ doc/56731059/ palshet-Guhagar-cave

7) www.abovetopsecret.com/forum/pg/hinduismtoday.com

## दुरदर्शन :–

१) सह्याद्री वाहिनीवरील भटकंती कार्यक्रम

## भेट दिलेल्या संस्था :–

१) शासकिय अभिलेखागार, मुंबई.

२) शासकिय अभिलेखागार, पुणे.


३) महाराष्ट्र पुरातत्त्व सर्व्हेक्षण खाते कार्यालय, मुंबई.

४) तहसिलदार कचेरी मंडणगड.

## मंडणगड किल्ल्यासंदर्भात एक अप्रकाशित पत्र

सदर पत्र सवाई माधवराव पेशवे यांच्या वतीने सुवर्णदुर्ग तर्फचे हवालदार मोरो बापुजी गोसावी यांना श्रावण शुद्ध २ शके १७०० म्हणजेच दि.२५ जुलै १९७८ रोजी लिहीलेले असून ते अप्रकाशित आहे. हे पत्र अस्सल असून ते पुणे पुराभिलेखागार, पुणे येथील संग्रहात आहे. हे पत्र रूमाल क्र.१९, फडके नं.५ मध्ये असून या पत्राचा क्रमांक १०९५२ आहे. कागदाचा आकार २४ से.मी.लांब व १३ से.मी.रूंद आहे.

या पत्रात गोपाळ नाईक तांबवेकर यास किल्ले मंडणगड तालुके सुवर्णदुर्ग येथे कैदेत ठेवण्यासाठी पाठवत आहोत. त्याचा पक्का बंदोबस्त ठेवावा. असा आदेश बालपेशव्यांच्या नावे कारभाऱ्यांनी दिला आहे.



**पत्र**

सु ।।तिसा सवैन २१.१७०० श्रावण शु.

मया अलफ शनिवार

(सु । । ११७९) २.१७७८जुलै २५

छ.३० जयादिलरवर

श्री

अखडीत लक्ष्मी अलकृत राजमान्य राजश्री

मोरो बापूजी गोसावी यास

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु । ।

तीसा सैवन मया व अलफ बलवंतराव बाजीनी । ।

गोपाळ नाईक तांबवेकर यास किल्ले मंडणगड

तालुके सुवर्णदुर्ग येथे अटकेत ठेवावयास पाठ

विला असे तरी कील्यावर पक्या बंदोबस्ताने

अटकेस ठेऊन पोटास सीधा मध्यम प्रतीचा

सीरस्तेप्रमाणे दररोज देत जाणे जाणीजे छ ३०


जामीलदारावर आज्ञा प्रमाण

श्री

लेखन


सीमा

मंडणगड तालुक्यातील मोगलांचा कडा



मंडणगड तालुक्यातील शिगवण या गावी हा कडा आहे. स्थानिक लोककथेप्रमाणे येथे मोगल सरदार सिद्दी व मराठे यांचे युद्ध होत असे. सिद्दीचे सैन्य या कडयापाठीमागे संरक्षणासाठी लपत असे. म्हणून आजही तेथील स्थानिक लोक यास मोगलांचा कडा म्हणून ओळखतात.

मंडणगड किल्ल्यामध्ये दोन वर्षापूर्वी सापडलेले वास्तूचे नवे अवशेष



बाणकोट किल्ल्यामधील भुयारी मार्ग



बाणकोट किल्ल्याशेजारील ग्रामदेवता कळंबादेवी मंदिराजवळील शिवाजीच्या पायऱ्या




बाणकोट किल्ल्यामध्ये हा भुयारी मार्ग आहे. हा मार्ग किल्ल्यापासून तीन कि.मी. दूर बाहेर निघतो असे स्थानिक लोककथा सांगते. किल्ल्यापासून तीन कि.मी.दूर असणाऱ्या ग्रामदेवता कळंबादेवी मंदिराजवळ हा भुयारी मार्ग निघतो. तेथे सात ते आठ जमिनीत उतरणाऱ्या पायऱ्या दिसतात. स्थानिक लोक त्यांना शिवाजीच्या पायऱ्या म्हणून संबोधतात.


फत्तेदुर्ग व कनकदुर्ग या किल्ल्यांना जोडणारा खाडीवरील पूल




मध्ययुगीन काळामध्ये आणीबाणीच्या प्रसंगी या दोन किल्ल्यांच्यामध्ये संपर्क राहावा म्हणून मध्ययुगीन काळात हा खाडीवर पूल बांधण्यात आला.




महाराष्ट्रातील किल्ले




कोकण दर्शन





रत्नागिरी जिल्हयातील किल्ले


श्रीवर्धन
बागमांडले
सावित्री नदी
हरिहरेश्वर
बाणकोट
हिंमतगड
मंडणगड
वेळास
केळशी
महालक्ष्मी
उटंबर
आडे
पाडले
कड्यावरचा
गणपती
आंजर्ले
जोग नदी
हर्णाई दुर्ग (गोवा)
हर्णे
सुवर्णदुर्ग
फत्तेदुर्ग
कनकदुर्ग
केशवराज
व्याघ्रेश्वर
आसुद
दापोली
मुरूड

डोंगरयात्रा

मंडणगड किल्ला

नकाशा




मंडणगड किल्ला



मंडणगड किल्ल्यावरील तोफ



मंडणगड  किल्ल्यावरील दर्गा किंवा दौलतखानाची कबर




मंडणगड  किल्ल्यावरील तलाव व गणेश मंदिर



मंडणगड किल्ल्यावरील नक्षीदार शिलाखंड



## बाणकोट /हिमतगड
## किल्ल्याचा नकाशा




बाणकोट किल्ला



बाणकोट किल्ल्याचे प्रवेशद्वार



बाणकोट किल्ल्यावरील ऑर्थरच्या पत्नीची कबर




बाणकोट किल्ल्याचे समुद्राकडील प्रवेशद्वार



## पालगड किल्ला

## नकाशा




पालगड किल्ल्याचा बुरुज



पालगड किल्ल्याची तटबंदी




पालगड किल्ल्यावरील तोफ



# सुवर्णदुर्ग


## नकाशा







समुद्राकडील चोर दरवाजा

बुरुजातील प्रवेशद्वार










कनकदुर्ग











कनकदुर्ग किल्ल्यावरील दिपगृह

कनकदुर्ग किल्ल्यावरील पायऱ्या

## गोवा किल्ला

### नकाशा




गोवा किल्ल्याचे प्रवेशद्वार



गोवा किल्ल्याचे समुद्राकडील प्रवेशद्वार




पाण्याचे टाके



## फत्तेदुर्ग


## नकाशा







फत्तेदुर्ग


## रत्नागिरी जिल्हयातील किल्ले



# रत्नागिरी जिल्हयातील किल्ले



# रत्नागिरी जिल्हयातील किल्ले



# रत्नागिरी जिल्हयातील किल्ले

